एप्रिल २०२२

ISSN 2233-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषद

कोविड (२०२० ते २०२२) कालावधीत आयोजित केलेल्या व्याख्यानांचे संकलन

संपादक
प्रा.डॉ.नारायण कांबळे
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद

कार्यकारी संपादक
प्रा. प्रियदर्शन भवरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना

मराठी समाजशास्त्र परिषद

नोंदणी क्रमांक: महाराष्ट्र/२७-८३ औरंगाबाद

-: कार्यालयाचा पत्ता :-

अध्यक्ष मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा: पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद
ता. अहमदपूर, जिल्हा लातूर ४१३५१४

-: कार्यकारी मंडळ :-

अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सचिव : डॉ वेदप्रकाश मलवाडे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

खजिनदार : डॉ. बळीराम पवार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सदस्य : प्रा. शिवाजी उकरंडे, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सदस्य : डॉ. संजय कोळेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदस्य : डॉ. प्रदीप गजभिये, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सदस्य : डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

सदस्य : डॉ. भाग्यश्री पाटील, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य : डॉ. श्रीराम खाडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

सदस्य : डॉ. प्रशांत सोनवणे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,

सूचना : या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या-त्या लेखकांचे आहेत. या मताशी

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.

एप्रिल २०२२

ISSN 2230-7745

मराठी समाजशास्त्र परिषद

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

कोविड (२०२० ते २०२२) कालावधीत आयोजित केलेल्या व्याख्यानांचे संकलन

संपादक

प्रा.डॉ.नारायण कांबळे

अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद

कार्यकारी संपादक

प्रा. प्रियदर्शन भवरे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना

समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबी विषयीचे निवेदन
(नियतकालिकांच्या नोंदणी संबंधी नियम ८ प्रमाणे)

प्रकाशन स्थळ :
मराठी समाजशास्त्र परिषद
द्वारा, पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरूर ताजबंद ता. अहमदपूर, जिल्हा: लातूर- ४१३५१५

नियतकाल :
वार्षिक (ISSN 2230-7745)

मुद्रकाचे नाव :
प्रा प्रियदर्शन भवरे, कार्यकारी संपादक
राष्ट्रीयत्व: भारतीय
पत्ता : समाजशास्त्र विभाग बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ४३१२१३

मुद्रण स्थळ :
यश मल्टी सर्व्हिसेस, जालना. मो. ९४२३४५७०३७

प्रकाशकाचे नाव :
डॉ. नारायण तुकाराम कांबळे, संपादक
राष्ट्रीयत्व: भारतीय
पत्ता: पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरूर ताजबंद ता. अहमदपूर, जि. लातूर- ४१३५१४

संपादकाचे नाव :
डॉ. नारायण तुकाराम कांबळे
पत्ता: वरील प्रमाणे
राष्ट्रीयत्व: भारतीय

मालकाचे नाव : मराठी समाजशास्त्र परिषद
पत्ता: वरील प्रमाणे

मी नारायण कांबळे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.
प्रा. डॉ. नारायण कांबळे
प्रकाशक

अनुक्रमणिका

अ.क्र.	दिनांक	व्याख्याते	पृष्ठ क्र.
१	विशेष व्याख्यान दि. २७ सप्टेंबर २०२०	वक्ते : डॉ. उत्तम भोईटे, माजी कुलगुरू,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.	१
२	विशेष व्याख्यान दि.६ डिसेंबर २०२०	वक्ते : डॉ. पी.जी. जोगदंड, सेवानिवृत्त प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.	६
३	विशेष व्याख्यान दि. २५ जानेवारी २०२१	बदलत्या जगाच्या बदलत्या समाजशास्त्रीय संकल्पना वक्ते : डॉ. डी. श्रीकांत, सेवानिवृत्त प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.	११
४	विशेष व्याख्यान दि. १ फेब्रुवारी, २०२१	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जाती निर्मूलनाचा विचार आणि वर्तमान परिस्थिती वक्ते : डॉ. सुरेश वाघमारे	१३
५	विशेष व्याख्यान दि. १९ फेब्रुवारी, २०२१	लोककल्याणकारी राजा: छत्रपती शिवाजी महाराज वक्ते : डॉ.व्ही.एल. एरंडे (सेवानिवृत्त प्राचार्य, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा जि. लातूर)	१६
६	विशेष व्याख्यान दि. ४ एप्रिल २०२१, वेळ – स.१०.०० वा.	समाजशास्त्र पद्धतीचे नवीन नियम : अँथनी गिडेन्स मार्गदर्शक : डॉ. नारायण चौधरी, सेवानिवृत्त प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक	२०
७	दि. ११ एप्रिल २०२१ वेळ: सकाळी १०.००	विषय : समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्याते : डॉ. प्रदीप आगलावे, प्रमुख डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.	२५
८	फुले शाहू आंबेडकर व्याख्यानमाला दि. १२ एप्रिल २०२१ वेळ सकाळी ११.०० वा.	विषय : महात्मा फुले यांचे राष्ट्रविकासातील योगदान व्याख्याते : प्रा.डॉ. जगन कराडे सचिव, अखिल भारतीय समाजशास्त्र परिषद, नवी दिल्ली. प्रमुख, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	२७
९	फुले शाहू आंबेडकर व्याख्यानमाला दि.१३ एप्रिल २०२१	राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री उद्धाराचे कार्ये आणि आजचे वास्तव प्राचार्या डॉ. मंजुषा पवार	३२
१०	एक दिवशीय संशोधन कार्यशाळा दि.२५ एप्रिल २०२१ सकाळी १०.०० ते १.३०	सत्र १ : शोध निबंध कसा लिहावा ? – डॉ.अनघा तेंडूलकर, उपप्राचार्य, सोफिया महाविद्यालय,मुंबई सत्र २ : शोध प्रबंध कसा लिहावा ? – डॉ. घनश्याम येळणे, संचालक, सामाजिक शास्त्रे विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.	३७
११	दि.१६ मे २०२१ रविवार वेळ १२.०० वा.	व्यक्तीपरिचय ग्रंथ प्रकाशन समारंभ मा.प्रा.डॉ.उत्तमराव भोईटे यांच्या शुभ हस्ते प्रमुख पाहुणे मा.प्रा.डॉ.जगन कराडे, प्रा.डॉ.सरोज आगलावे, प्रा.डॉ.राहुल भगत (संपादक, व्यक्ती परिचय ग्रंथ) प्रा.डॉ.नारायण कांबळे (अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद)	४७

अनुक्रमणिका

अ.क्र.	दिनांक	व्याख्याते	पृष्ठ क्र.
१२	दि. २७ मे २०२१ सकाळी ११.०० वा.	वार्षिक प्रगती अहवाल व संशोधन प्रबंधपूर्व सादरीकरण वक्ते : डॉ. घनश्याम येळणे, सामाजिक शास्त्रे संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	५१
१३	विशेष व्याख्यान दि.३० मे २०२१ सकाळी ११.३० वा.	महाराष्ट्रातील स्त्री चळवळ वक्ते : डॉ. स्मिता अवचार, (सेवानिवृत्त प्राध्यापक) माजी विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.	५३
१४	परिसंवाद दि. १३ जून २०२१ सकाळी १०.३० वा.	महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि सद्यकालीन परिस्थिती अध्यक्ष : प्रा. डॉ. पी. जी.जोगदंड, मुंबई सहभाग : प्रा.डॉ.श्रुती तांबे, पुणे प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे, कराड प्रा.डॉ.शिवकुमार सोळुंके,जालना	६४
१५	दि. १८ जुलै २०२१ सकाळी ११.०० वा.	परिघ आणि ज्ञान निर्मिती प्रक्रियेचे दृष्टीकोन वक्ते : डॉ. रमेश कांबळे, प्राध्यापक (निवृत्त) माजी विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.	८३
१६	दि. ८ ऑगस्ट २०२१ सकाळी ११.०० वा.	दिल्लीस्थित किसान आंदोलनाची भूमिका व वाटचाल : एक आकलन वक्ते : किशोर ढमाले सत्यशोधक शेतकरी सभा (महाराष्ट्र राज्य संघटक)	८८
१७	विशेष व्याख्यान दि. १२ सप्टेंबर सकाळी ११.०० वा.	प्रा.डॉ.गेल ऑम्वेट : एक समाजशास्त्रीय आकलन वक्ते : प्रा. डॉ. सुरेंद्र जोंधळे, प्रा. डॉ. रमेश कांबळे, प्रा. संजयकुमार कांबळे	९३
१८	दि. १६ जानेवारी सकाळी ११.०० वा.	भारतातील समाजशास्त्राचे शतक : अवलोकन आणि आव्हाने डॉ. बालाजी केंद्रे, प्राध्यापक व प्रमुख, समाजशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ	९६
१९	दि. ३० जानेवारी सकाळी ११.०० वा.	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजशास्त्रीय योगदान प्रा. राहुल कोसम्बी, समाजशास्त्र विभाग महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद	१०७
२०	भारतातील समाजशास्त्राची शतकमहोत्सवी वाटचाल	लेखक–आनंद कुमार अनुवाद–संदीप चौधरी	११२

कोरोना कालखंडात काळाने
आपल्यातून हिरावून नेलेले समाजशास्त्राचे अभ्यासक..

भावपूर्ण आदरांजली..

प्रा.डॉ. गेल ओम्वेट, सांगली.

प्रा.डॉ. तोष्णीवाल एस.आर., नागपूर.

प्रा.डॉ. एल. डी. गायकवाड, रेणापूर, लातूर.

प्रा.डॉ. काशिनाथ कावळे, नांदेड.

प्रा.डॉ. उमराव कावळे, वसमत, हिंगोली.

प्रा.डॉ. संतोष खंडारे कारंजा लाड, वाशिम.

प्रा.डॉ. सुनालिनी सत्तुर, पुणे.

प्रा.डॉ. विजयकुमार सुर्यवंशी, परभणी.

प्रा.डॉ. पी. एल. बनसोड, अहमदपूर.

प्रा.डॉ. मिलिंद जांभूळकर, चंद्रपूर..

प्रा.डॉ. बी एन. खोब्रागडे, चंद्रपूर.

प्रा.डॉ. मुकुंद खैरे, मूर्तिजापूर, अकोला.

प्रा.डॉ. मा.एस. सोमण, पुणे.

प्रा.डॉ. वसंत वैद्य, हिंगोली.

प्रा.डॉ. विजयकुमार पोकळे, आष्टी कडा

अध्यक्षांचे मनोगत

प्रा.डॉ. नारायण कांबळे
अध्यक्ष
मराठी समाजशास्त्र परिषद

सप्रेम नमस्कार,

मराठी समाजशास्त्र परिषद ही महाराष्ट्रातील समाजशास्त्र विषयाचे अध्ययन, अध्यापन व संशोधन करणाऱ्या अध्यापकांची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून आज सर्वांना परिचित झाली आहे. महाराष्ट्रात महाविद्यालयीन पातळीवर समाजशास्त्र विषयाचा विस्तार आणि विकास व्हावा हा नेमका केंद्रवर्ती विचार लक्षात घेऊन महाराष्ट्रातील तत्कालीन अभ्यासकांनी एकत्र येऊन हे विचारपीठ उभे केले आहे. या संस्थेची उभारणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील डॉ. एम. जी. कुलकर्णी, डॉ. सुधाताई काळदाते, डॉ. वि. वि. देशपांडे, डॉ. आर. बी. बिलावर इत्यादींच्या पुढाकारातून झाली. पुढे याचा विस्तार सबंध महाराष्ट्रात झाल्याचे चित्र पाहावयास मिळते. आजपर्यंत परिषदेने विविध स्वरूपाचे उपक्रम हाती घेतले त्याचाच एक भाग म्हणून अधिवेशन. अशा स्वरूपाचे अधिवेशन महाराष्ट्रातील विविध विभागात झाल्याचे दिसून येते. या अधिवेशनामध्ये प्रामुख्याने समकालीन प्रश्नावर व त्या त्या विभागातील समस्यांवर चर्चा घडवून आणणे व त्यावरील उपाय सुचविणे हा मुख्य हेतू होता. या अधिवेशनाच्या अनुषंगानेच एक संशोधन पत्रिकाही प्रकाशित केली जाऊ लागली. या संशोधन पत्रिकेत समाजशास्त्राच्या प्राध्यापकांनी आपले वैचारिक व संशोधनात्मक स्वरूपाची मांडणी केली पाहिजे आणि ती समाजशास्त्र संशोधन पत्रिकेतून प्रकाशित केले पाहिजे.असा एक विचार प्रवाह निर्माण झाला.

हे लिखाण आपल्या विभागातील एखाद्या समस्या अथवा प्रश्नांच्या अनुषंगाने संशोधनात्मकस्वरूपाचे असावे.अशी एक त्यामागची भावना होती. आजपर्यंत परिषदेची अधिवेशन महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यात झाली असली तरी त्यामागे फलदायी चर्चा झाल्याचे पहावयास मिळते आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेचा आज महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. या परिषदेचे सदस्यत्व आतादेशातील अनेक प्राध्यापकांनी स्वीकारले आहे. त्यामुळे ही परिषद आता राष्ट्रीय स्तरावर पोहोचली असली तरी त्यामागे चांगली चर्चा झाल्याचे दिसून येते याचा आम्हाला आनंद आहे.मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारणीमध्ये दर दोन वर्षांनीबदल होत असतो. जानेवारी २०२० मध्ये माझ्या कार्यकारिणीची निवड झाली आणि पाहता पाहता मार्च २०२० मध्ये कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर संबंध जग लॉकडाऊन झाले. कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे व्यक्ती एकमेकापासून दूर राहू लागली. साऱ्या जगभर हाहाकार निर्माण झाला आणि सारे जग अस्वस्थ झाले.देशातील सर्वच दळणवळण व्यवस्था बंद पडल्या. परिणामी मानवी जीवनाचे प्रचंड हाल झाले. हा प्रकार आजही थोड्याफार प्रमाणात कमी-अधिक प्रमाणात सुरु आहे.

कोरोनाच्या सतत बदलत्या व अनिश्चित परिस्थितीमुळे

मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशन व इतर उपक्रम आम्ही प्रत्यक्षात घेऊ शकलो नाही. परिषदेचे सूत्र आम्ही हाती घेतली आणि सरळ घरात बसावे लागले. याचा मनाला कुठे तरी आजही खेद वाटतो. कोरोनाची तीव्रता लक्षात घेऊन मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीने असा ठराव केला की, ऑनलाइनच्या माध्यमातून विशेष व्याख्यानाचे आयोजन केले जावे. याला प्रतिसाद किती मिळतो याबद्दल आमच्या मनात साशंकता होती परंतु ऑनलाइनच्या माध्यमातून सुरू केलेल्या उपक्रमाला लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. परिणामीआमचे मनोबल वाढले आणि हा प्रतिसाद पाहता आम्ही ह्या ऑनलाइनच्या माध्यमातून विशेष व्याख्यानासोबतच व्यक्तिपरिचय ग्रंथ प्रकाशन समारंभ सोहळा, परिसंवाद, व्याख्यानमाला, संशोधन कार्यशाळा, अभिवादन सभा असे कितीतरी वेगवेगळ्या स्वरूपाचे उपक्रम हाती घेतले. समाजशास्त्राच्या अभ्यासकाचा त्याला भरभरून प्रतिसाद मिळत राहीला एवढेच नव्हे, तर प्रत्येक कार्यक्रम झाल्यानंतर आमच्या सहभागीसदस्यांनी संपन्न झालेल्या कार्यक्रमाविषयी लिखित व मौखिक प्रतिक्रिया सुद्धा दिल्यात. हा एकूणच उपक्रमकसा वाटला या संबंधाने त्यांनी आम्हाला फीडबॅक दिले. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या प्रतिक्रिया आम्ही व्हाट्सअपच्या माध्यमातून त्या सबंध म. स. प.च्या सदस्यांपर्यंत पोहोचविल्या.त्यामुळे मराठी समाजशास्त्रपरिषदेला चांगल्या पद्धतीने कार्यक्रम घेता आलीत याचा आम्हाला आनंद आहे.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यक्रमाचे वेगळेपण काय होते तर या उपक्रमांमध्ये तीन पिढ्याचे अध्यापक या कार्यक्रमात सहभागी झाले होते नव्या पिढीला जुन्या जाणकार व तज्ञ प्राध्यापकांना जवळून पाहता आले नव्हे तर त्यांचे व जुन्या अध्यापकातील सुसंवाद निर्माण करता आला ही सगळ्यात मोठी जमेची बाजू आहे असे आम्हाला वाटते. यामध्ये प्रामुख्याने डॉ. उत्तमराव भोईटे यांनी परिषदेच्या विचारपीठावर दोन वेळा आभासी पद्धतीने येऊन मार्गदर्शन केले त्यामुळे समाजशास्त्र विचारविश्वात एक वेगळीच चर्चा घडून आली.या ऑनलाईनच्या विचारपीठावर महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांना निमंत्रित केले गेले होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे व काही जणांच्या वैयक्तिक कारणामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत तरी पण मराठी समाजशास्त्र परिषद त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. या विचारपीठावर अनेक सन्माननीय प्राध्यापकांनी हजेरी लावली व मार्गदर्शनही केले. आजपर्यंत मराठी समाजशास्त्र परिषदेच्या विचारपीठावर समाजशास्त्र विषयाचे अभ्यासक व कृतिशील संशोधक व नाविन्यपूर्ण अभ्यासात व समाजशास्त्र विषयात योगदान दिलेल्या प्राध्यापकांना आत्तापर्यंत निमंत्रित करून त्यांच्या ज्ञान अनुभवाचा आम्ही लाभ घेतला आहे. नव्या अभ्यासकांनाही त्यांच्या चिंतनाचा व संशोधनाचा मोठा लाभ झाला आहे. हाच मराठी समाजशास्त्र परिषदेचा केंद्रीभूत विचार आहे.

सुंदर व संशोधनात्मक मांडणी असलेले एवढेसर्व अहवाल एकत्रित करून एक विशेषांक काढावाही कल्पना माझ्या लक्षात आली. अशा पद्धतीची भूमिका कार्यकारणी पुढे ठेवली.त्याला उस्फूर्तपणे पाठिंबाही मिळाला. माझ्या माहितीप्रमाणे एखाद्या व्याख्यानाचे अहवाल लेखन कसे लिहिले जावेत याचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. व तशा प्रकारची अभ्यासपूर्ण मांडणी प्रत्येक लेखकांनी केली आहे. सर्वांच्या सहकार्यातून हा विशेषांक आज प्रकाशित होत आहे.

या अंकातील अनेक विचारवंतांची व्याख्याने, त्यांनी केलेली मांडणी मूलगामी व चिंतनशील स्वरूपाची आहे. त्यामुळे भविष्यातील भावी पिढीला व अभ्यासकाला याचा फायदा होऊ शकतो. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकाळातील हे सर्वात महत्त्वाचे आणिचिरंतन स्वरूपाचे कार्य करता आले याचा आम्हाला आनंद आहे. अशा या महत्त्वपूर्ण आशयाचे संपादन करण्यासाठी माझ्यासोबत कार्यकारी संपादक म्हणून मी प्रा. प्रियदर्शन भवरे यांची या कार्यासाठी निवड केली आणि ती त्यांनी आनंदाने मान्य केली. लेखांचे संकलन करून त्यांची नीटपणे व्यवस्थित मांडणी करणे तसे अवघड काम होते.नव्हे तर अहवालाचे संपादन करणे हे जिकीरीचे काम आहेते त्यांनी अधिक जबाबदारीने पार पाडले.

हा अंक लवकर प्रकाशित व्हावा यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. वेदप्रकाश मलवाडे, कोषाध्यक्ष डॉ. बळीराम पवार व कार्यकारणीचे सर्व सन्माननीय सदस्य यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. या सर्वांनी हा विशेषांक मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने प्रकाशित करण्यास अनुमती दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

शेवटी सर्वात महत्वाचे म्हणजे ज्यांच्यामुळे हे मी करू शकलो ते सर्व अहवाल लेखक ज्यात डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, डॉ. बालाजी दमकोंडावार, डॉ.अर्जुन जाधव, डॉ. साहेबराव हिवाळे, डॉ. आरती धनवे, डॉ. सीमा शेटे, डॉ. अंजली जोशी, डॉ. गंगाधर मोरे, डॉ. मंजुषा नळगिरकर, डॉ.विनोद खेडकर, डॉ. रमेश सोनटक्के, डॉ. गजानन मुधोळकर, प्रा. डॉ. संदीप चौधरी या सर्वांच्या अथक प्रयत्नातून हा अंक प्रकाशित होऊ शकला हे मी नम्रपणे नमूद करतो. या नाविन्यपूर्ण विशेषांकाचे वाचक, अभ्यासक, संशोधक, निश्चितच स्वागत करतील याची मला खात्री आहे.

■■■

मनोगत

कार्यकारी संपादक

प्रा. प्रियदर्शन भवरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना.

स.न.वि.वि.

लॉकडाऊन काळात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे डॉक्युमेंटेशन करण्याचे काम माझ्याकडे देण्यात आले होते. जवळपास वीस प्रकारच्या विविध आशयावर आधारित उपक्रमाचा तपशील एकत्रित करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला. हे फार मोठे जिकिरीचे व जबाबदारीचे काम होते.

डॉ.नारायण कांबळे, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद यांनी टाकलेला विश्वास व जबाबदारी याला कुठे तडा जाऊ देता कामा नये, याकरिता सतत कार्यशील मला राहता आले. अहवाल लेखकांनी बऱ्याचदा अगदी सवंग स्वरूपाचे लेखन केले होते, त्यावर संस्करण करणे गरजेचे होते. एवढे करूनही मी मात्र या कामावर अजिबात समाधानी नाही. मात्र केलेल्या कामाचा कुठेतरी उल्लेख व्हायला हवा यासाठीचा हा लेखनप्रपंच आहे. एखाद्या उपक्रमाचे कमीतकमी आणि आशयबद्ध शब्दात वर्णन करणे ही सोपी बाब नाही.त्यासाठी मोठी कसरत करावी लागते ही जाणीव अहवाल लिहिणाऱ्याना नक्कीच आली असेल. या निमित्ताने त्यांना त्यांच्या लेखनामध्ये केलेला बदलही नक्कीच जाणवेल. सदरहू लेखन करताना संगणकीय कौशल्य अंगी असल्याचा मला खूप फायदा झाला. भविष्यातील वाटचालीसाठी हा अहवाल विशेषांक निश्चितच उपयोगी ठरेल यात शंका नाही. हा विशेषांक अधिकाधिक व्यापक व आशयपूर्ण बनविण्याचा प्रयत्न केला आहे. बऱ्याच गोष्टी या ठिकाणी राहून गेलेल्या आहेत अथवा त्याचा परामर्श घेणे जमले नाही परंतु एक लेखाजोगा म्हणून तो निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल यात शंका नाही.

लॉकडाऊनच्या काळात मराठी समाजशास्त्र परिषदेने हाती घेतलेले विविध उपक्रम हे वेबिनारच्या स्वरूपातील असून मराठी समाजशास्त्र परिषदेच्या यूट्यूबच्या चॅनेलला सबस्क्राईब केल्यानंतर ही सर्व व्याख्याने आपणाला कधीही उपलब्ध होतील. त्यामुळे सविस्तर आढावा या ठिकाणी घेतलेला नाही व ते गरजेचेही नाही.

यानिमित्ताने माझ्यावर टाकलेली जबाबदारी मला पूर्ण करता आली याचा मनस्वी आनंद आहे. असे असले तरी लेखनाच्या स्वरूपात असलेला हा अहवाल आपल्या सर्वांसाठी निश्चितच उपयोगी आहे.या विशेषांकाचे आपण स्वागत कराल अशी अपेक्षा आहे. एखाद्या अहवालात वा लेखनात थोडीफार शंका असल्यास युट्युबवर असलेलं मूळ व्याख्यान आपणाला पुढील दिशा देईल. काही शंका असल्यास युट्युबवर त्या संदर्भातील प्रतिक्रिया आपण नोंदवाव्यात जेणेकरून त्याची दखल संबंधिताना घेता येईल.

अहवाल लेखकाला बऱ्याचदा मर्यादा असू शकतात त्या आपण समजून घेऊ या. या विशेषांकात प्रसंगानुरूप अधिकाधिक माहिती देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.काही अहवाल हे आहे त्या प्रसंगाचे लाईव्ह चित्रण आहेत.मूळ लेखनाला कुठेही धक्का न लावता ते मुद्दामहून तसेच ठेवण्यात आले आहे. २३ जानेवारी २०२० रोजी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अमरावती येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनातील डॉ. आनंद कुमार यांच्या बीज भाषणाचा मराठी अनुवादही प्रसिद्ध करण्यात आला आहे. समाजशास्त्राचे विषयाचे अभ्यासक या विशेषांकाचे निश्चितच स्वागत करतील.

■■■

विशेष व्याख्यान

दि. २७ सप्टेंबर २०२०

समाजशास्त्र विषयाच्या अध्ययनाची शतकपूर्ती

वक्ते : प्रा. डॉ. उत्तम भोईटे

भूमिका : डॉ. नारायण कांबळे

समाजशास्त्र विषयाच्या अध्ययनाची शतकपूर्ती व मराठी समाजशास्त्र परिषदेस चाळीस वर्षेपूर्ण होत असल्यामुळे या व्याख्यानमालेस विशेष महत्व प्राप्त आहे. कोरोना या महाभयंकर महामारीचा सामना संपूर्ण विश्व सध्या करीत आहे. या महामारीच्या आजारामुळे माणसं दुरावली, संपर्क क्षेत्राच्या बाहेर गेली, एक अनामिक भीती समाजात निर्माण झाली अशा कठीण परिस्थितीत समाजशात्राची शतकपूर्ती व परिषदेची चाळीशी पूर्ण होत असल्यामुळे अशा ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करणे तसे धाडसाचे काम होते.

समाजशास्त्राच्या अभ्यासाला शंभर वर्षे पूर्ण झाली त्यामुळे समाजशास्त्रातील विचारवंत, संशोधक व या विषयात रुची असणाऱ्या नवोदित अभ्यासकांना परिषदेच्या माध्यमातून एक चांगले व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उदात्त भावनेने केलेला हा छोटासा प्रयत्न असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्यात समाजशास्त्र विषयाचे अध्ययन व अध्यापन हे मोठ्या प्रमाणात मातृभाषेतून दिले व घेतले जाते. त्यामुळे समाजशास्त्र विषयाची आवड व रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांना या विषयाचे ज्ञान हे मराठीतून उपलब्ध व्हावे तसेच या विषयावर सातत्याने चर्चा व्हावी, समाजशास्त्र हा विषय समाजाच्या इतर घटकापर्यंत पोहोचला जावा, विषयातील नवनवीन संकल्पना, जाणीवा, समस्या यावर विचारसत्र घ्यावीत यासाठी परिषद सातत्याने प्रयत्न करीत आहे. आज परिषदेला चाळीस वर्षेपूर्ण झाली व एकेचाळीसव्या वर्षात पदार्पण करीत आहे याचा

आपल्या सर्वांना सार्थ अभिमान आहे. मोठ्या उमेदीने नूतन कार्यकारिणीने या परिषदेचा कार्यभार स्वीकारला. परंतु कोरोना या महामारीमुळे हा कार्यभार घेण्यास उशीर होत होता त्यामुळे शेवटी ऑनलाईन पद्धतीनेच आम्हाला या परिषदेचा कार्यभार स्वीकारावा लागला. लॉकडाऊनमुळे परिषदेचा कार्यभार कसा करावा हा मोठा प्रश्न आमच्यासमोर होता, विषयातील लोकांशी संपर्क कसा करावा, अधिवेशन कसे घ्यावे यासारखे प्रश्न पडत होते. अशावेळी तंत्रज्ञानाचा आधार मोठा वाटू लागला. आणि या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपण विषयातील लोकांशी संवाद साधू शकतो, त्यांच्याशी विचारविनिमय करू शकतो हीभावना निर्माण झाली आणि या विशेष व्याख्यानमालेचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे निश्चित केले.

माजी अध्यक्षांच्या अनुभवातून परिषदेने काय करण्याची गरज आहे, परिषदेकडून त्यांची काय अपेक्षा आहे हे कळल्यास परिषेदेला पुढील वाटचाल करण्यास यामुळे मदत होईल व समाजशास्त्राच्या विकासाच्या संदर्भात परिषदेला निश्चित भूमिका घेण्यास मदत होईल अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या माजी अध्यक्षांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे मत यावेळी डॉ. कांबळे यांनी व्यक्त केले. तसेच यापुढे मराठी समाजशास्त्र परिषदेची वाटचाल कशी असावी यासाठी या माजी अध्यक्षांची मनोगते जाणून घेणे गरजेचे आहे व त्यासाठी त्यांचे ऑनलाईन व्याखान आयोजित करण्याचा मनोदय त्यांनी यावेळी व्यक्त केला. आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महाविद्यालये MOU च्या माध्यमातून परिषदेशी जोडू इच्छितात यासाठी सर्वांच्या मार्गदर्शनाची व सहकार्याची गरज असल्याचे मतही त्यांनी यावेळी मांडले. शेवटी या व्याख्यानमालेस आपण सर्वानी खूप भरभरून प्रतिसाद दिला त्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक आभार मानून त्यांनी आपल्या प्रास्ताविकाची सांगता केली.

डॉ. उत्तम भोईटे यांनी आपल्या व्याख्यानाची सुरवात करण्या अगोदर सर्वप्रथम मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांचे या स्तुत्य उपक्रमाबद्दल अभिनंदन केले तसेच माझ्या जातकुळीच्या लोकांची भेट घडवून आणल्याबद्दल व त्यांच्याशी विचारविनिमय करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आनंद व्यक्त करून आभार मानले. विशेष म्हणजे रविवारी देखील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. सरांनी आपल्या व्यावसायिक जीवनाचा थोडक्यात परिचय देतांना म्हणाले की, माझ्या समाजशास्त्र विषयाच्या अध्ययनाची सुरुवात परभणी येथून केली पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे समाजशास्त्र विभागात प्राध्यापक व पुणे विद्यापीठात अशी एकूण ३५ वर्षेया विषयासाठी दिली. आजही एक विद्यार्थी म्हणून विषयाचा अभ्यास करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

समाजशास्त्र विषय भारतात कसा सुरु झाला याचे विवेचन त्यांनीकेले. ब्रिटिश राजवटीच्या काळात मुंबईमध्ये विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. नगर विकासासाठी नगररचनाकाराची गरज होती, तेंव्हा ही गरज ब्रिटिशांच्या लक्षात आली आणि त्यांनी पेट्रिक गेडीस या अभियंत्याला मुंबईला बोलावून घेतले. त्याकाळी मुंबई विद्यापीठामध्ये अर्थशास्त्राचा एक भाग म्हणून समाजशास्त्र या विषयाला सुरुवात झाली होती. भारतीय समाजशास्त्राचे उध्वर्यू म्हणून डॉ. जी. एस. घुर्ये यांना आपण सर्व जण ओळखतो. डॉ. घुर्ये हे मुळात संस्कृतचे विद्यार्थी, त्यांनी त्यांचे बी. ए. व एम. ए. हे संस्कृतमध्ये पूर्ण केले होते. मुंबई शहराची वाढ होत असल्यामुळे नागरीकरणाचे प्रश्न निर्माण होऊ लागले. या वाढत्या नागरीकरणावर डॉ. जी. एस. घुर्ये यांनी एक निबंध लिहिला, तो पेट्रिक गेडीस यांच्या वाचनात आला व ते या निबंधाने प्रभावित झाले आणि त्यांच्या असे लक्षात आले की, हा निबंधकारात चांगला समाजशास्त्रज्ञ होण्याचे गुण आहेत. गेडीस यांनी घुर्ये यांना शिष्यवृत्ती मिळवून देऊन त्यांना सामाजिक मानववंशशास्त्रात पीएच. डी. करण्यासाठी त्यांना केंब्रिज विद्यापीठात पाठवले. १९२२ मध्ये त्यांना पीएच. डी. मिळाली व ते परत १९२४ मध्ये भारतात परत आले. या काळात पेट्रिक गेडीस यांनी स्थापन केलेला समाजशास्त्र विभाग बंद पडण्याच्या मार्गावर होता. यावेळी सन १९२४ मध्ये डॉ. घुर्ये यांची मुंबई विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विभागात रीडर व विभागप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती ते १९५६ पर्यंत विभागात कार्यरत होते. समाजशास्त्रातील जेष्ठ विचारवंत व भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी जवळपास २७ ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या एवढे कार्य महाराष्ट्रात कोणीही केले नाही असे मत डॉ. भोईटे यांनी व्यक्त केले.

पुढे ते म्हणाले, भारतीय समाजशास्त्राच्या विकासाचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की, त्याला दोन अंगे आहेत. यापैकी एक अंग म्हणजे सामाजिक मानववंशशास्त्र (Social Anthropology) व दुसरे अंग म्हणजे प्राच्यविद्याशास्त्र (Indology) होय. प्राच्यविद्याशास्त्र हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. हि आपल्या विषयाची पूर्वपीठीका आहे. युरोपीय समाजशास्त्राची पूर्वपीठीका ही वेगळी आहे, त्याचा पोत वेगळा आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे असे मत त्यांनी यावेळी मांडले. त्यांनी सर्वप्रथम युरोपियन समाजशास्त्राचा विकास व पूर्वपीठिका यावर विवेचन केले.

युरोपियन समाजशास्त्राचा विकास व पूर्वपीठिका

युरोपियन समाजशास्त्राचा विकास व पूर्वपीठिकेचे विवेचन करतांना डॉ. भोईटे सर यांनी भारतीय समाजशास्त्राची पूर्वपीठिका व युरोपियन समाजशास्त्राची पूर्वपीठिका ह्या भिन्न भिन्न आहेत हे समजावून घेण्याची गरज आहे असे म्हटले. युरोपियन समाजशास्त्राची पूर्वपीठिका समजावून घेण्यासाठी

आपल्याला तीन गोष्टींचा विचार करावा लागतो. साधारणपणे १८ व्या शतकाच्या अखेरीस युरोपात प्रामुख्याने तीन महत्वाच्या घटना घडल्या, यामध्ये वैचारिक क्रांती, आर्थिक क्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती यांचा समावेश होतो.

१) वैचारिक क्रांती:–

पहली घटना म्हणजे युरोपात ज्ञानाच्या क्षेत्रात झालेली मोठी क्रांती होय. युरोपात प्रबोधन युगास सुरुवात झाली होती. या काळात लोक आपल्या सभोवतालच्या वास्तवाबद्दल वेगळ्या दृष्टीकोणातून अभ्यास व विचार करू लागले. धर्माचे वर्चस्व व प्रभाव बाजूला सारून समाजाचे तटस्थ व यथार्थपणे कसा अभ्यास करता येईल याचा विचार करणाऱ्या विचारवंतांचा मोठा समुदाय युरोपात निर्माण झाला. या समुदायाने आपल्या सभोवतालच्या वास्तवाचा अभ्यास वास्तववादी व यथार्थवादी (Positivism) दृष्टीकोणातून करायला सुरुवात केली. या positivism दृष्टीकोणातून विचारवंतांनी जे काम केले, त्यामुळे युरोपमध्ये रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र याप्रमाणे अनेक शास्त्र उदयाला आली व ती शास्त्र लोकांच्या उपयोगाला येऊ लागली. ही वैचारिक क्रांती युरोपमध्ये घडून आली हा एक महत्वाचा घटक समाजशास्त्राच्या विकासास कारणीभूत असल्याचे मत सरांनी व्यक्त केले.

२) आर्थिक क्रांती:–

युरोपियन समाजशास्त्राचा विकासास कारणीभूत असलेला दुसरा घटक म्हणजे आर्थिक क्षेत्रात झालेली कामगिरी होय. १७६० मध्ये जेम्स वॅट यांनी वाफेचे इंजिन शोधले आणि युरोपातील संपूर्ण व्यवस्था बदलून गेली. शेती हे उत्पादनाचे साधन न राहता कारखाने हे उत्पादनाचे साधन बनले. यामुळे संबंध आर्थिक क्षेत्र बदलून नवीन भांडवलशाही आर्थिक क्षेत्र निर्माण झाले. कारखानदारी वाढल्यामुळे नागरीकरण वाढले, नागरीकरण वाढल्यामुळे स्थलांतर वाढले. या सर्व उलथापालथीमुळे युरोपियन समाजामध्ये काही काळ अतिशय अस्वस्थता निर्माण झाली होती. त्यामुळे अनेक समस्या वाढल्या होत्या. ही अस्वस्थता समाजशास्त्राच्या अभ्यासाठी पोषक होती.

३) फ्रेंच राज्यक्रांती

युरोपियन समाजशास्त्राच्या विकासाला कारणीभूत असणारा तिसरा घटक म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती होय. हि केवळ राजकीय क्रांती नसून ती एक सामाजिक क्रांती असल्याचे मत भोईटे सर यांनी यावेळी व्यक्त केले. या क्रांतीला एक सामाजिक आशय होता, कारण प्रबोधन युगाच्या काळामध्ये युरोपमध्ये जी वैचारिक क्रांती होत होती त्यामधील विचारवंतांमध्ये एक उदारमतवादी विचाराचा प्रवाह वाहत होता. यामध्ये मॉन्टेस्क्यू, व्हाल्टेअर व रुसो या विचारवंतांचा समावेश होता. या विचारवंतानी एक नवीन तत्वज्ञान जगासमोर मांडले ते म्हणजे मानवकेंद्री समाजाच तत्वज्ञान होय. या तत्वज्ञानाने प्रेरीत होऊन फ्रांस मधील जनतेमध्ये जागृती होण्यास सुरुवात झाली. यातूनच फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. फ्रान्समधील लुई नावाचा जो राजा होता तो राज्यातील जनतेवर जुलूम जबरदस्ती करीत होता, यामध्ये जमीनदार व धर्मगुरू यांचाही समावेश होता. या सर्वांच्या विरोधात जनतेने बंड पुकारून विरोध केला आणि मानवांचे हक्क व अधिकार काय असावेत याविषयीचा जाहीरनामा तयार केला, व तो जाहीरनामा जगामध्ये सर्वदूर पसरवला. यामुळे जगामध्ये लोकशाही राजवट निर्माण होण्यास सुरवात झाली.

पुढे ते म्हणाले की, या तीन घटनांमुळे युरोपमध्ये वैचारिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक उलथापालथं झाली त्यामुळे समाजामध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. जुनी व्यवस्था मोडली होती परंतु नवीन व्यवस्था अजून निर्माण व्हावयाची होती. अशा परिस्थितीत समाजाची ही अस्वस्थता ऑगस्ट कॉम्प्ट नावाच्या तत्वज्ञानाच्या लक्षात आली. आणि त्याने विचार केला की, वास्तवाचा यथार्थपणे अभ्यास करून जर शास्त्र निर्माण करता येत असेल व ज्याप्रमाणे रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र निर्माण झाले, त्याप्रमाणे समाजाचा अभ्यास करून असे शास्त्र निर्माण करता येईल व या शास्त्राच्या आधाराने समाजात निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांचे निराकरण आपल्याला करता येईल असे विचार कॉम्प्टच्या मनामध्ये आला आणि त्या दृष्टीकोणातून त्याने अभ्यास करण्यास सुरुवात केली. याच काळामध्ये सेंट सायमन नावाचा एक उदारमतवादी तत्वज्ञानी होता. हाही एक समाजशास्त्रज्ञ होता पण तो कॉम्प्टचा आश्रयदाता होता. या दोघांच्या विचाराने समाजाचा अभ्यास करता येऊ शकतो याची त्यांना खात्री पटली आणि १८४८ मध्ये कॉम्प्टने आपले समाजशास्त्रा विषयीचे लिखाण निर्माण केले. ऑगस्ट कॉम्प्टबद्दल बोलतांना सर म्हणाले की, कॉम्प्टच्या लिखाणाचे वैशिष्टे म्हणजे त्यांनी दोन प्रकारे समाजाचा अभ्यास केला. एक म्हणजे समाजीक स्थितीशास्त्र व दुसरे सामाजिक गतिशास्त्र होय. समाजामध्ये स्थिरता निर्माण करणारे घटक कोणते व समाजात परिवर्तन घडून आणणारे घटक कोणते याचा त्यांनी अभ्यास केला. समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये सर्वप्रथम समाजशास्त्र या संज्ञेचा वापर प्रथमता ऑगस्ट कॉम्प्ट यांनी केला अस मानलं जात परंतु कॉम्प्टच्या अगोदर काही विचारवंतानी ही संज्ञा वापरली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

ऑगस्ट कॉम्प्ट हा परिवर्तनवादी विचारवंत नव्हता. त्याला समाजात होणाऱ्या परिवर्तनाची धास्ती वाटत होती. समाज स्थिर राहावा असा कॉम्प्टचा दृष्टीकोन होता. त्यामुळे कॉम्प्ट फ्रेंच क्रांतीला पाठिंबा देणारा नव्हता तर विरोध करणारा होता तसेच तो उदारमतवादी विचारालाही विरोध करणारा होता. कॉम्प्टला असे वाटत होते की, पूर्वीची राजवट व व्यवस्था ही चांगली होती त्यामुळे आपल्याला त्याच्या लिखाणामध्ये पुराणमतवादी (Conservative) दृष्टीकोन दिसतो. काही असले

तरी समाजशास्त्राचा पाया त्यांनी घातला याबद्दल कोणाला शंका असू नये.

ऑगस्ट कॉम्प्टच्या नंतर एमिल दुर्खीम यांनी १८४८ मध्ये Bordeaux विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विभाग सुरु केला. युरोपमध्ये स्वतंत्रपणे समाजशास्त्रातील अध्ययन, अध्यापन व संशोधन करण्यास एक अभ्यासविषय म्हणून मान्यता मिळाली. कॉम्प्टच्या दृस्टीकोनातूनच जर्मनी व इग्लंड मध्ये मेक्स वेबर आणि कार्ल मार्क्स यांनीही समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये योगदान दिले आहे. त्यांनी अनेक सिद्धांताची निर्मिती केली आहे. दुर्खीम आणि कॉम्प्ट यांना असे वाटत होते की, आपण समाजाचा अभ्यास वास्तववादी दृस्टीकोनातून करू शकतो. याची मांडणी दुर्खीमने आपल्या Rules of Sociological Methods ह्या ग्रंथामध्ये विषद केले आहे. सामाजिक वास्तव व भौतिक वास्तव यामध्ये दुर्खीम ने फरक केला नाही. त्याच्या मते, ज्याप्रमाणे रसायनशास्त्र, भौतिकशास्त्रात अभ्यास केला जातो त्याचप्रमाणे समाजाचा अभ्यास समाजशास्त्रामध्ये करता येतो असे त्यांना वाटत होते. परंतु याबाबतीत मॅक्सवेबर यांचे विचार वेगळे होते. वेबरच्या मते, सामाजिक वास्तव व भौतिक वास्तव यामध्ये फरक आहे. सामाजिक वास्तवाला आपण एक अर्थ देत असतो म्हणजे समाजातील एखाद्या सामाजिक रूढीला एक विशिष्ट अर्थ आपण देत असतो ज्यामुळे त्या रुढीचा आशय आपणास कळतो, त्यास सामाजिक वास्तव म्हटले जाते, यास वेबर interpretative Sociology असे म्हणतो व हा दृष्टीकोन विकसित केला. कार्ल मार्क्सने या दोघांपेक्षाही वेगळा विचार मांडला. मार्क्सच्या मते, सामाजिक वास्तव समजून घ्यावयाचे असेल तर आपणास इतिहासामध्ये काय घडले ते समजावून घ्यावे लागते. इतिहासाचा अभ्यास केला तरच योग्य पध्दतीने सामाजिक वास्तव लक्षात येईल. त्यामुळेच मार्क्स, मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे असे म्हणतो व मानवी इतिहासाच्या अभ्यासाला अधिक महत्व देतो. समाजाच्या वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळे वर्ग निर्माण झाले. वर्गातील सामाजिक संबध हे परस्परविरोधी होते. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण झाला व त्यातूनच मानवाचा विकास घडून आला. याच काळात युरोपमध्ये झपाट्याने जर्मनी, इंग्लंड व अमेरिकेत समाजशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात झाली. ही युरोपीय समाजशास्त्राची पूर्वपीठीका असल्याचे मत त्यांनी व्यक्तकेले.

भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासाची पूर्वपिठीका :

भारतामध्ये समाजशास्त्राच्या अभ्यासाला औपचारिक मान्यता ही १९२० मध्ये मिळाली. मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली व समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासाला सुरुवात झाली. भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासाची पूर्वपिठीका लक्षात घेतांना आपल्याला त्याचा ऐतिहासिक भाग समजावून घ्यावा लागतो. भारतात सर्प्रथम ब्रिटीश हे व्यापारी म्हणून आले व हळूहळू त्यांनी राजकीय सत्ता काबीज केली. आपला राजकीय अंमल राबविण्यास सुरुवात केली. राजकीय राजवट भारतावर राबविण्यासाठी ब्रिटिशांनी आपल्या देशातून प्रशासक आणले. ब्रिटीश प्रशासकांबाबत आपल्या मनात अनेक पूर्वग्रह आहेत. प्रामुख्याने आपण त्यांना आपले शत्रू मानतो हे चुकीचे आहे. त्यांची चांगली बाजूही आपण लक्षात घेतली पाहिजे असे मत यावेळी सरांनी व्यक्त केले. यासंदर्भात पुढे बोलतांना सर म्हणाले की, ब्रिटिशांनी भारतीयांवर मोठ्या प्रमाणात अन्याय केला असे आपल्याला वाटते. असे वाटण्यास काही अंशी सत्यता देखील आहे कारण दादाभाई नौरोजी यासारख्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी ब्रिटिशांनी भारताची आर्थिक पिळवणूक कशी केली तसेच त्यांनी भारतीयांवर कसा अन्याय केला याविषयी भरपूर लिखाण केले आहे. परंतु आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, ब्रिटिशांनी भारतात जे प्रशासक आणले होते त्यामध्ये दोन प्रकारचे प्रशासक होते असे माझे मत आहे असे सर म्हणाले. त्यांच्या मते काही प्रशासक हे विचारवंत प्रशासक होते तर काही प्रशासक हे साम्राज्यवादी प्रशासक होते. साम्राज्यवादी प्रशासकांचा उद्देश हा राज्यकारभार करणे हा होता. विचारवंत प्रशासक यांची संख्या ही जास्त होती. त्यांनी १७८४ मध्ये siatic Society of Bengal ही संस्था स्थापन केली. त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून भारतातील समस्या सोडविण्याचा व सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. यापैकी दोन प्रशासक महत्वाचे होते त्यापैकी एक म्हणजे सर विल्यम जोम्स होय. Dialog with civilization हे पुस्तक मोजेस नावाच्या दांपत्याने लिहिले. हे दोघेही खड अधिकारी होते. या विचारवंतांच्या असे लक्षात आले की, भारताला किती वैभवशाली परंपरा लाभली आहे, भारताचा इतिहास किती मोठा आहे, येथे वैचारिक संपन्नता प्रचंड आहे, भारतातील वाड.मय खूप मोठ आहे. त्यामुळे विल्यम जोम्स यांनी भारतातील या सर्व घटकांचा अभ्यास करण्यासाठी siatic Society ची स्थापना केली. जोम्स यांना २७ भाषा येत होत्या. भारतात तो न्यायाधीश म्हणून आला होता. येथे आल्यावर त्याने संस्कृत, पर्शियन, उर्दू या भाषा शिकल्या. त्यांनी शाकुंतल व गीता या ग्रंथाचे भाषांतर केले. जोम्सच्या असे लक्षात आले कि, भारताला समजून घ्यावयाचे असेल तर येथील वाड. मय,परंपरा यांच्या माध्यमातून येथील समाजाचा इतिहास लक्षात घेता येऊ शकतो. यालाच प्राच्यविद्या दृष्टीकोन (Indology Approach) म्हटले जाते. आज जगातील अनेक देशांत तेथील विद्यापीठांमध्ये भारतीय प्राचीन वाड.मयाचा अभ्यास केला जातो.

आपला देश हा एक समाजजीवन अभ्यास करण्याची मोठी प्रयोगशाळा आहे, त्यामुळेच की काय आपल्या देशाचा जेवढा अभ्यास बाहेरच्या देशातील विचारवंतांनी केला तेवढा भारतीय विचारवंतांनी केला नाही. त्यामुळे Indology या विषयाचा प्रभाव आपल्या समाजशास्त्रावर झालेला दिसून येतो. आज घुर्ये यांच्यावर असा आरोप केला जातो कि,त्यांनी

ब्राम्हणी पद्धतीचे समाजशास्त्र निर्माण केले आहे. परंतु आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, घुर्येयांच्यावर जो प्रभाव होता तो Indology चा होता. ते स्वतः संस्कृत्त तज्ञ होते व भारतातील बहुतांश वाङ्मय हे संस्कृतमध्ये असल्यामुळे Indology चा प्रभाव समाजशास्त्रात झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे मानववंशशास्त्राचा प्रभावही दीर्घकाळ समाजशास्त्रावर पहावयास मिळतो. त्याचे कारणही आपणास ब्रिटीश राजवटीत शोधता येतील. ब्रिटीश राजवटीमध्ये भारतीय सांस्कृतिक समूहाचे Indological Ethnic Group चा अभ्यास करणाऱ्या अनेक संस्था होत्या. त्यापैकी हर्बर्ट रिस्ले हा एक होता. तोही जोम्स प्रमाणे न्यायाधीश म्हणून भारतात आला होता. भारतीय प्रदेश महाकाय आहे, येथे अनेक वन्यजाती आहेत. या वन्यजाती जमातींचा अभ्यास करून त्याने त्या काळामध्ये Caste and Tribes in Bengal या नावाने चार खंडामध्ये ग्रंथ लिहिला. याचदरम्यान ब्रिटिशांनी Statistical survey of India सुरु केला होता. या सर्वेमध्ये सर्व प्रकारची माहिती व आकडेवारी त्यांनी गोळा केली. त्या माहितीमध्ये Ethnic Community ची माहिती होती. भारताची पहिली जनगणना करण्यात रिस्लेंचे मोठे योगदान होते. या काळात वन्यजमातीचा, रुढींचा,परंपरांचा अभ्यास करून विचारवंतांनी जे लिखाण केले होते ते Indology Approach ने झालेले होते. जेंव्हा समाजशास्त्र विषयाचा अभ्यासाला सुरुवात झाली तेंव्हा या लिखाणाचा खूप फायदा झाला. त्यामुळे आपल्या समाजशास्त्राला Indology व Social Anthropology या विषयांचे आवरण येते. पूर्वी बऱ्याच विद्यापीठामध्ये मानववंशशास्त्र विषय शिकविला जात असे, आज तो अभ्यास कमी झालेला दिसून येतो. हे सांगण्याचा उद्देश असा की, Indian Council of Social Science Research हे समाजशास्त्र आणि सामाजिक मानववंशशास्त्र यात फरक करीत नसे. भारतात तुम्हाला अभ्यास करावयाचा असेल तर समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र या दोनही विचारसरणीने करावा लागेल तरच खरे अध्ययन करता येईल अन्यथा नाही. सुरुवातीला समाजशास्त्र हा स्वतंत्र अभ्यासविषय नव्हता. कलकत्ता येथे सर्वप्रथम तत्वज्ञान या विषयाच्या अंतर्गत समाजशास्त्र विषय शिकविला जात असे. ए. आर. वाडिया हे तत्वज्ञानाचे प्राध्यापक होते. लखनौ मध्ये मुखर्जी आणि मुखोपाध्याय हे दोघेही अर्थशास्त्रज्ञ होते. मुंबई मध्ये डॉ. घुर्ये यांना संस्कृतची पार्श्वभूमी होती. म्हणजेच सुरुवातीला दीर्घकाळपर्यंत ज्यांनी समाजशास्त्राचा अभ्यास केला असे विचारवंत नव्हते तर ते दुसऱ्या विषयांचे अभ्यासक होते. हे लक्षात घेतले पाहिजे. एकंदरीत आपण पाहिलं तर १८५७ ते १९४७ पर्यंत भारतात एकूण २० विद्यापीठ होती. यामध्ये सुरुवातीचे मुंबई, कोलकत्ता, मद्रास येथील विद्यापीठांचा समावेश होतो. पुढे स्वातंत्र्यानंतर विद्यापीठ वाढत गेली व समाजशास्त्राचा विकास होत गेला. अशाप्रकारे समाजशास्त्र विकासाच्या पूर्वपीठीकेचा आढावा त्यांनी विषद केला.

समाजशास्त्राचा अभ्यासक म्हणून जेंव्हा मी विचार करतो की, माझे समाजशास्त्राचे विद्यार्थी आज काय करतात? त्यांचा समाजाला काही फायदा होतो काय? याचे उत्तर खेदाने नकारात्मक द्यावे लागत असल्याचे मत त्यांनी नोंदविले. वर्गामध्ये ज्यावेळी तुम्ही समाजशास्त्र शिकविता त्यावेळी केवळ वर्णनात्मक (Descriptive) समाजशास्त्र शिकवून फायदा नाही तर विद्यार्थांना समाजशास्त्र हे समीक्षकाच्या (Critic) भूमिकेतून शिकविले पाहिजे असे मत मांडले. आज समाजशास्त्र शिकवितांना समीक्षकांची भूमिका घेणे खूप कठीण आहे कारण समाजात ज्या घटना घडत आहेत त्या खूप भयंकर आहेत. जात, धर्म, आरक्षण, स्त्रिया यांच्याबाबतीत जे घडते ते वास्तव स्वरुपात व तटस्थपणे त्याची मांडणी करणे अथवा शिकविणे अवघड आहे. प्रामाणिकपणे समाजशास्त्र शिकवायचे असेल तर वरील गोष्टींचे भान ठेऊन अतिशय जाबाबदारीपूर्ण विषय शिकविला पाहिजे याची प्रत्येक प्राध्यापकाने जाणीव ठेवली पाहिजे असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. व्याखानाच्या शेवटी श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे त्यांनी दिले. सूत्रसंचालन डॉ. शिवाजी उकरंडे यांनी केले तर आभार डॉ. वेदप्रकाश मलवडे यांनी मानले.

■■■

अहवाल लेखन

डॉ. गंगाधर मोरे
समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड.
जि. औरंगाबाद
moregn007gmail.com
Mobile: 8275430557

विशेष व्याख्यानमाला

विषय : सामाजिक चळवळ संकल्पना व स्वरूप : दलित चळवळीच्या विशेष संदर्भात.

६ डिसेंबर २०२० वेळः स.११.००

व्याख्याते

डॉ. पी. जी. जोगदंड,

माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई

अध्यक्ष : **डॉ. नारायण कांबळे**

(अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद)

डॉ. प्रल्हाद जोगदंड

सामाजिक चळवळीमध्ये पर्यावरणवादी चळवळ, शेतकरी चळवळ, महिला चळवळ, दलित चळवळ इ. अशा दोनशेच्यावर चळवळींचा समावेश होतो. सामाजिक चळवळीच्या निर्मितीस संरचनात्मक परिस्थिती, दमनकारी शासन ही मुख्य कारणे आहेत. संरचनात्मक परिवर्तनासाठी सामाजिक चळवळीचा उदय होत असतो. समाजातील लोकांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराला वाचा फोडुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनावर दबाव आणण्याचे काम सामाजिक चळवळी करतात,

सामाजिक चळवळीची संकल्पना :

सामाजिक चळवळीची संकल्पना स्पष्ट करतांना सामाजिक चळवळीच्या निर्मितीस कोणकोणते घटक जबाबदार आहेत याची चर्चा आपल्या व्याख्यानात केली. सामाजिक चळवळीच्या निर्मितीस प्रमुख चार घटक जबाबदार आहेत.

१. सामुदायिकता : जेव्हा एखादा समुदाय आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संघटीत होऊन न्याय मागण्यासाठी लढा उभा करतो तेव्हा त्या समुदायात या मागण्यांसाठी आपल्या समुदायाप्रती आपुलकी, प्रेम आणि जिव्हाळयाची भावना निर्माण होऊन सामुदायिकता वाढीस लागते व ती सामुदायिकताच सामाजिक चळवळीच्या निर्मितीस कारणीभुत ठरते.

२. विचारप्रणाली : एखादी राजकीय व सामाजिक व्यवस्था कशी बदलायची, सुधारायची, टिकवायची याच्या व्यावहारिक साधनांशी संबंधित बरीचशी सुसंगत विचारसंहिता म्हणजे विचारप्रणाली होय. अशी विचारप्रणाली हीच एखादया सामाजिक चळवळीच्या निर्मितीस कारणीभूत ठरत असते.

३. बदलाभिमुखता : समाजाच्या सामाजिक संरचनेत जेंव्हा बदल घडून येतो तेंव्हा समाजात सामाजिक परिवर्तनास किंवा बदलास सुरूवात होते. जेंव्हा समाजातील एखादया समुहास असे वाटायला लागते की प्रस्थापित सामाजिक व्यवस्था आमच्या न्याय मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष करीत आहे, तेंव्हा अशा समग्र सामाजिक व्यवस्थेत बदल घडवुन आणण्याची बदलाभिमुखता समुह सदस्यांमध्ये निर्माण होते तेंव्हा सामाजिक चळवळींचा उदय होतो.

४. नेतृत्व : 'समुहाचे उद्दिष्टे पुर्ण करण्याकरिता अनुयायांच्या सहकार्याने एखादा नेता पुढाकार घेतो व त्या नेत्याचा तो पुढाकार संपुर्ण समुहास मान्य असतो तेव्हा त्यास नेतृत्व असे म्हणतात.' उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतातील मागासवर्गीयांच्या चळवळीस बाबासाहेबांचे नेतृत्व मिळाले नसते तर भारतात दलित चळवळीचा विकास झाला नसता.

हे चार घटक कोणत्याही सामाजिक चळवळीच्या निर्मितीस कारणीभूत असतात. सामाजिक चळवळींच्या संदर्भात अनेक पाश्चात्य विचारवंतांनी आपले मत व्यक्त केले आहेत.

समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी सामाजिक चळवळी निर्माण होतात. सदोष असणाऱ्या सामाजिक व्यवस्था आणि मानवी संबंधात बदल घडवून आणण्यासाठी सामाजिक चळवळी निर्माण होतात. काही समाजशास्त्रज्ञाच्या मते, परिघावरुन मुख्य प्रवाहात जाण्याचा मार्ग म्हणजे सामाजिक चळवळ होय. असे वेगवेगळे विचार समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक चळवळीच्या संदर्भत प्रगट केले आहेत.

सामाजिक चळवळीचे स्वरूप

प्रत्येक सामाजिक चळवळीसमोर 'ओळख निर्माण करण्याचा प्रश्न निर्माण झालेला असतो. दलित चळवळी समोरही ओळख निर्माण करण्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. कोणत्याही सामाजिक चळवळी समोर आपली ओळख निर्माण करण्यासाठी चार घटक महत्वाचे असतात तेच चार घटक भारतातील दलित चळवळी समोरील ओळख निर्मीतीचे घटक आहेत. त्या घटकांबद्दल विस्तृत चर्चा त्यांनी पुढील प्रमाणे केली.

१. प्रारंभिक /आदिम ओळख : कोणत्याही सामाजिक चळवळीला आपली प्रारंभिक ओळख निर्माण करण्यासाठी वंश आणि लिंग याचा आधार घ्यावा लागतो तेव्हाच एखादया चळवळीच्या निर्मीतीचे बिजे रोवली जातात.

२. स्वतः निर्माण केलेली ओळख : लोकांनी लोकांसाठी स्वतः निर्माण केलेली ओळख ही चळवळीच्या निर्मीतीस कारणीभुत ठरत असते. भारतातील दलितांनी आपली स्वतःची ओळख स्वतः निर्माण केली आहे. उदा. बहुजन, वंचीत ही ओळख दलितांनी स्वतः निर्माण केलेली ओळख आहे.

३. प्रायोजित ओळख : जेव्हा एखाद्या समुहास किंवा गटास वरून कोणीतरी विशिष्ट नावाने संबोधुन ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करतो त्यास प्रायोजित ओळख असे म्हणतात. उदा. दलितांसाठी म. गांधीनी दिलेली हरिजन ही ओळख किंवा आदिवांसीसाठी गिरिजन ही ओळख प्रायोजित ओळख म्हणून संबोधली जाते.

४. प्रशासकीय ओळख : जेव्हा एखादया समुहास प्रशासकीय व्यवस्थेच्या माध्यमातुन वैधानिक ओळख निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला जातो त्यास प्रशासकीय ओळख असे म्हणतात. उदा. भारतातील दलितांसाठी भारतीय संविधानात (Scheduled Caste) हा शब्द प्रशासकीय ओळख म्हणून उपयोगात आणल्या गेला आहे.

हे वरील चार घटक प्रत्येक सामाजिक चळवळीस आपली ओळख निर्माण करण्यासाठी कारणीभुत ठरत असतात. परंतू बहुतांश सामाजिक चळवळी या स्वतः निर्माण केलेली ओळख या आधारावरच आपल्या चळवळीचा पाया निर्माण करीत असतात. भारतातील दलित चळवळीने स्वतः निर्माण केलेली वंचित, बहुजन या ओळखीच्या आधारावरच आपली चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी इतरांव्दारे दिल्या गेलेल्या प्रायोजित ओळखी शिवाय आपली चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला आहे.

पुढे ते म्हणतात, कोणत्याही सामाजिक चळवळीत तीन प्रश्न महत्वाचे असतात. चळवळ कोणसाठी? कशासाठी? आणि चळवळीची साधणे कोणती? (हिंसात्मक आणि अहिंसात्मक) हेच प्रश्न भारतातील दलित चळवळीच्या संदर्भातही महत्वाचे होते. आपण कोणाच्या विरोधात चळवळ करीत आहोत हे चळवळीमध्ये सहभागी असणाऱ्या लोकांना माहीत असणे आवश्यक आहे.

भारतात अलीकडील काळात सामाजिक चळवळी किंवा दलित चळवळी संपूष्टात येत आहेत, त्या नामशेष होत आहेत अशी चर्चा होतांना दिसते. या अहवालानुसार भारतात ज्या सामाजिक चळवळी कार्यरत आहेत त्यामध्ये जमिनींचे हक्क, पाण्याचा प्रश्न, विस्थापितांचे प्रश्न, मानवी हक्क, इत्यादीमुळे निर्माण झालेले प्रश्न या सारख्या उद्देशांसाठी सामाजिक चळवळी आजही समाजात कार्यरत आहेत.सामाजिक चळवळीच्या वैशिष्टयांची चर्चा त्यांनी या वेळी केली.

वैशिष्टे :

१. उद्दिष्ट्ये : प्रत्येक सामाजिक चळवळीची काही निश्चित उद्दिष्ट्ये असतात. सामाजिक संरचना ही सदोष असते अशा समग्र सामाजिक संरचनेत बदल घडवून आणणे हे सामाजिक चळवळीचे उद्दिष्ट्ये असते. अशा बदलासाठी सामुदायिक कृति, सामाजिक वर्तन, साधने इ. घटक हे आवश्यक असतात. ते भारतातील दलित चळवळींमध्ये दिसून येते.

२. सामाजिक चळवळीची व्याप्ती : प्रत्येक सामाजिक चळवळीची व्याप्ती ही कुठपर्यंत आहे? ती सामाजिक चळवळ कोणत्या भौगोलिक क्षेत्रावर कार्यरत आहे? हे सामाजिक चळवळीसाठी अतिशय आवश्यक असते. सामाजिक चळवळीचे क्षेत्र आणि व्याप्ती जेवढे विस्तृत असते तेवढा त्या सामाजिक चळवळीचा प्रभाव अधिक दिसून येतो. उदा. भारतातील दलित चळवळ ही देशभर सुरू आहे. जाती व्यवस्था भारतात जेव्हापर्यंत अस्तित्वात राहील तेव्हापर्यत भारतात दलित चळवळी कार्यरत राहतील.

३. सामाजिक चळवळीचा जीवन प्रवास : प्रत्येक सामाजिक चळवळीचा जीवन प्रवास हा सुद्धा सामाजिक चळवळीच्या अस्तित्वासाठी महत्वाचा भाग असतो. एखादी चळवळ कधी सुरूवात झाली, कुठपर्यंत पोहचली, चळवळीने लढयासाठी कोणते विषय निवडले, त्या चळवळीचे उद्दिष्ट्ये कोणते होते इ. बाबतची माहीती चळवळीचा जीवन प्रवास उलगडून दाखवीत असते यामुळे ती चळवळ दीर्घ कालावधीसाठी निर्माण झाली की अल्प कालावधीसाठी हे माहीत होते. आणि हा चळवळीचा जीवन प्रवास चळवळीतील कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक असतो.

सामाजिक चळवळीच्या स्वरूपाबद्दल चर्चा करतांना

काही समाजशास्त्रज्ञांच्या मताचा संदर्भ दिला आहे. या विचारवंतामध्ये एम. एस. राव, घनश्याम शहा, पी. एन. मुखर्जी, टी. के. ओमेन, डॉ. डी. एन. धनागरे इ. या समाजशास्त्रज्ञांचा अभ्यास केल्याशिवाय सामाजिक चळवळीचे शास्त्रीय स्वरूप समजून घेता येत नाही. एम.एस. राव असे म्हणतात की, कोणत्या प्रकारचा सामाजिक बदल तुम्हाला घडवून आणायचा आहे त्यावरून सामाजिक चळवळीचे स्वरूप व चळवळीचे प्रकार निर्धारित होतात. त्यामध्ये सुधारणावादी चळवळ, संक्रमणात्मक चळवळ, क्रांतीकारी चळवळ इ. चळवळीच्या प्रकाराबद्दल चर्चा त्यांनी आपल्या अभ्यासात केली. पार्थनाथ मुखर्जी असे म्हणतात की, सामाजिक बदलाची गुणवत्ता काय आहे यावरून सामाजिक चळवळीचे स्वरूप निश्चित होत असते. मुखर्जी यांनी संचित चळवळ, पर्यायी चळवळ, संपूर्ण बदलासाठी चळवळ इ. चळवळीचे प्रकार सामाजिक बदलाची गुणवत्ता काय आहे यावरून निर्माण होतात असे सांगितले. टी. के. ओमेन यांनी सुद्धा सामाजिक चळवळीचे तीन प्रकार सांगितले आहेत. त्यामध्ये विचारप्रणालीवर आधारित चळवळ, संघटित चळवळ, दैवी शक्तीवर आधारित चळवळ इ. पुढे टी. के. ओमेन असे म्हणतात की, तुमच्या चळवळीची सहायक उद्दीष्ट्ये आणि प्रतिकात्मक उद्दीष्ट्ये हे नेतृत्वाला सिद्ध करावे लागतात. जर असे नाही झाले तर चळवळ निर्माण होऊ शकत नाही. इ. विचारवंताच्या विचारांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.

सामाजिक चळवळीचे सिध्दांत

यावेळी त्यांनी सामाजिक चळवळीच्या उदयाची मान्यताप्राप्त सहा सिध्दांताची चर्चा केली. ते पुढीलप्रमाणे

१. ताण तणावाचा सिध्दांत : समाजामध्ये जी संरचना स्थित असते त्या संरचनेत बिघाड झाला की ताण तणाव निर्माण होतो. हा ताण तणाव नाहीसा करण्यासाठी लोक चळवळी करतात.

२. पुनरूर्जीवन/पुनर्निमितीचा सिध्दांत : समाजामध्ये कार्यरत असणारे मुल्य आणि संस्कृती हे जर समाजातील बहुतांश लोकांच्या हिताच्या आड येत असतील तर अशा सांस्कृतिक बदलासाठी आणि मुल्यात्मक बदलासाठी जी चळवळ निर्माण होते ती चळवळ पुननिर्मितीची चळवळ ठरते. अशा चळवळींचे उद्दीष्ट्ये हे समाजाला पुनर्जिवीत करून नविन संस्कृतिची निर्मिती करणे हेच असते.

३. सापेक्ष वंचिततेचा सिध्दांत : समाजातील इतर घटकांपेक्षा आपण अधिक वंचित आहोत ही सापेक्ष वंचिततेची भावना लोकांच्या मनात निर्माण होते. सर्व स्तरात, सर्वच क्षेत्रात, सर्वच आघाडयांवर आम्ही उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित आहोत असा समज समाजातील विशिष्ट समुहातील लोकांचा होतो. अशा समजातुनच सामाजिक चळवळीचा उदय होतो असे मत टी. के. ओमेन, घनश्याम शहा यांनी मांडले आहे.

४. साधन सामुग्रीचा सिध्दांत : कोणतीही सामाजिक चळवळ चालवतांना साधन सामुग्रीची आवश्यकता असते. भौतिक स्वरूपाची(लोकांचा सहभाग, पैसा इ.) किंवा अभौतिक स्वरूपाची(नैतिक, सांस्कृतिक, सामाजिक इ.) साधने हे सामाजिक चळवळीच्या संचलनासाठी आणि उद्दीष्टये पूर्तीसाठी आवश्यक असतात. कोणत्याही चळवळीला यशस्वी करण्यासाठी साधन सामुग्रीची आवश्यकता असते. त्यामूळे साधन सामुग्रीच्या सिध्दांताचे महत्व सामाजिक चळवळीत असते.

५. उठावात्मक सिध्दांत : समाजामध्ये इतिहासाच्या पूनर्विलेखनासाठी अशा चळवळी निर्माण होतात. उदा. आदिवासी, दलित इ. समूहातील लोकांना असे वाटत असते की आमचा इतिहास हवा तसा अधोरेखित झाला नाही इतिहासामध्ये आमच्या मेहनतीचा, पराक्रमाचा, शौर्याचा उल्लेख यथोचितरित्या करण्यात आलेला नाही. म्हणून आम्ही प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह करून आम्हाला पाहीजे तसे इतिहासाचे पूनर्विलेखन करू ही भावना समूहाच्या मनात जेव्हा निर्माण होते. तेव्हा समाजात उठावात्मक सामाजिक चळवळी निर्माण होतात.

६. नविन सामाजिक चळवळी सिध्दांत : नविन सामाजिक चळवळी सिध्दांत हा सामाजिक चळवळीच्या अभ्यासामध्ये समकालिन दृष्टीकोन आहे. अशा चळवळी या समाजातील एखादया प्रश्नासाठी किंवा मुद्दयासाठी निर्माण झालेल्या आहेत. या चळवळी आपले उद्दीष्ट्ये पूर्ण झाले की संपुष्टात येतात. अशा सामाजिक चळवळी अराजकीय असतात. आर्थिक प्रश्नांवर या चळवळींमध्ये चर्चा होत नाही. साधारणपणे मानवी हक्कांसाठी, सामाजिक न्यायासाठी लढणे हाच मुख्य उद्देश समोर ठेवून या चळवळी निर्माण होतात. अशा सामाजिक चळवळींचे सदस्य हे आभासी असतात त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नसतो. डॉ. जोगदंड यांनी सामाजिक चळवळीच्या उपरोक्त सहा सिध्दांताची चर्चा आपल्या व्याख्यानात केली.

दलित चळवळीच्या विशेष संदर्भात

यावेळी त्यांनी स्वतःच्या संशोधनातुन आलेल्या अनुभवाचे कथन उपस्थित श्रोत्यांसमोर केले. भारतातील दलित चळवळीचा उदय हा प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या माध्यमातून दलितांवर करण्यात आलेल्या अमानुष, अमानवी अत्याचार, अन्याय, शोषण इ. कारणांमूळे झाला. हे त्यांनी उदाहरणासह सांगितले आहे. भारतातील निम्न जातीय समूहातील लोकांना स्वत्वाची, स्वअभिमानाची जाणीव झाली व सामाजिक न्याय प्राप्त करण्यासाठी भारतातील दलित चळवळींचा उदय झाला. भारतातील दलित चळवळ ही येथील समाज व्यवस्थेला प्रश्न विचारणारी चळवळ म्हणून ओळखली जाते. आमच्यावर एवढे अन्याय का? आमची पिळवणूक कशासाठी? आमच्या सोबत अमानवीय व्यवहार का? असे प्रश्न दलित चळवळीने भारतातील प्रस्थापित

समाज व्यवस्थेला विचारलेले आपणांस दिसून येतात. भारतातील दलित चळवळीचे स्वरूप विद्रोही आहे. भारतातील दलित हे प्रत्येक आघाडयांवर प्रस्थापित समाज व्यवस्थे विरोधात विद्रोह करतांना आपणास पहावयास मिळतील.

कोणत्याही प्रकारचा विद्रोह हा दोन प्रकारचा असतो, १. आहे ती सामाजिक व्यवस्था बदलविणे (Deconstruction) २.नविन सामाजिक व्यवस्था निर्माण करणे; (Reconstruction) विद्रोह हे अशा प्रकारचे दुधारी शस्त्र आहे. भारतातील दलित चळवळीसमोरील कोण-कोणते प्रश्न आहेत. यावर चर्चा करतांना ते म्हणतात, आत्मसन्मान, माणूसकी, निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, जातीय अत्याचाराचा विरोध करणे, सार्वजनिक संपत्तीच्या उपभोगात(सार्वजनिक विहीरी, पाणवठे, तळे इ. ठिकाणी) समान वाटा, गायरान जमीनीच्या वाटपाचा प्रश्न, आरक्षण इ. प्रश्न समोर ठेवून दलित चळवळी आपला लढा लढतांना दिसून येतात असे सांगितले आहे.

भारतातील दलित चळवळ ही गतीशील असून बदलाभिमुखतेचा नेहमीच स्वीकार या चळवळीने केला आहे. समाजामध्ये कार्यरत असणारी समाज संरचना (Social Structure) सदोष आहे. त्या संरचनेत बदल घडवून आणणे हे दलित चळवळीचे प्रमुख उद्दीष्टये आहे. दलित चळवळीने नेतृत्व, सामुदायिकता, विचारप्रणाली इ. घटकांमुळे ती एक सामाजिक चळवळ आहे हे सिध्द करून दाखविले आहे. भारतातील प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ टी. के. ओमेन. यांच्या भारतातील दलित चळवळीच्या संदर्भातील विचारांचा संदर्भ देताना ते म्हणतात, भारतातील दलित चळवळी सामाजिक व सांस्कृतिक वंचितता, राजकीय वंचितता आणि आर्थिक वंचितता या तीन प्रकारची वंचितता दुर करण्यासाठी निर्माण झाल्या आहेत. अशा टी. के. ओमेन यांच्या मताचा आधार घेवून मी माझे दलित चळवळीच्या संदर्भातील संशोधन पूर्ण केले आहेत.

भारतातील दलित चळवळीचे पर्व

भारतातील दलित चळवळीच्या विकासाचे व प्रगतीचे तीन पर्वात आपणास विभाजन करता येईल.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अगोदरची चळवळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अगोदरची दलित चळवळ ही श्री. गोपाल बाबा वलनकर, श्री भिमराव कांबळे, श्री. शिवराम जानबा कांबळे, श्री. किसन भागोजी बनसोडे इ. मंडळींनी सुरू केली. भारतातील दलित चळवळीचा पाया याच मंडळींनी उभारला आहे असे म्हणता येते. सुरूवातीच्या या दलित चळवळींमध्ये विद्रोह नव्हता परंतू सुधारणावादी दृष्टिकोन होता. आपल्याला आपला समाज सुधारायचा आहे, यासाठी ते समग्र दलित समाजातील लोकांना आव्हान करायचे हे सांगतांना उदा. मेलेल्या ढोरांचे मांस खाऊ नका, शिक्षण घ्या इ. प्रकारचे आव्हान या मंडळींनी केले. याच बरोबर त्यांनी दलितांसाठी वसतिगृहे काढले, दलितांमध्ये जाणीव आणि जागृती विकसित करण्यासाठी पुस्तके काढली. या सर्व मंडळींनी दलितांमध्ये सामाजिक जाणीव आणि जागृती निर्माण करण्याचे काम दलित चळवळीच्या पहिल्या पर्वात केले आहे. म्हणून भारतातील दलित चळवळीचा पाया व बाबासाहेबांच्या चळवळीचा पाया या लोकांनी निर्माण केला आहे. असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

२. बाबासाहेबांच्या काळातील दलित चळवळः बाबासाहेबांच्या काळातील दलित चळवळीचे तीन टप्पे डॉ. जोगदंड यांनी सांगितले आहेत. (अ) पहिला टप्पा (१९२४-१९३०) या काळात बाबासाहेबांची भुमिका ही समाज सुधारणेची होती. त्यात जातीयतेच्या विरोधातील लढा, अस्पृश्यतेच्या विरोधातील लढा, माणूसकीसाठीचा लढा इ. साठी बाबासाहेबांनी आपल्या सुरूवातीच्या काळात समाज सुधारणेची भूमिका स्विकारली होती. यासाठी त्यांनी काळाराम मंदिर प्रवेश, महाडच्या चवदार तळयाचे आंदोलन इ. प्रकारची आंदोलने समाज सुधारणेच्या भूमिकेतूनच केले होते. (ब) दुसरा टप्पा (१९३०-१९४७) या काळात बाबासाहेबांनी आपल्या भुमिकेत व चळवळीत थोडासा बदल केलेला आपणास दिसून येतो. १९३० नंतर बाबासाहेबांनी आपल्या चळवळीच्या माध्यमातुन दलितांच्या राजकीय सत्ता प्राप्तीला प्राधान्य दिले. सत्तेच्या केंद्रस्थानी दलित लोक आल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत त्यामुळे दलितांच्या राजकीय हक्क आणि सत्ता प्राप्तीसाठी बाबासाहेबांनी लढा उभारला याचाच परिपाक म्हणून राजकीय पक्षांची निर्मिती केली.त्यात भारतीय रिपब्लिकन पार्टी (RPI), मजुर पक्ष, शेडयुल्ड कास्ट फेडरेशन इ. ची स्थापना केली. पुढील काळात तीन गोलमेज परिषदांमध्ये सहभाग घेऊन तेथे दलितांच्या राजकीय अधिकारांची मागणी केली. (क) तिसरा टप्पा (१९४७-१९५६) या काळात बाबासाहेबांनी देशातील महत्वपूर्ण शिक्षण संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या Peoples Education Society (१९४९)स्थापना केली. १९५६ ला बाबासाहेबांनी धर्मांतर केले. या घटना बाबासाहेबांच्या काळातील दलित चळवळीच्या संदर्भात महत्वाच्या घटना म्हणून ओळखल्या जातात.

३. बाबासाहेबांच्या नंतरची दलित चळवळ : बाबासाहेबांच्या निधनानंतर म्हणजेच १९५६ नंतर भारतीय रिपब्लिकन पार्टीचे विभाजन होऊन दलित पँथरची स्थापना झाली. त्यानंतर दलित साहित्याची चळवळ, दलित रंगभुमी चळवळ, बामसेफ, बहुजन समाज पार्टी इ. चळवळीची व राजकीय पक्षांची निर्मिती बाबासाहेबांच्या निधनानंतर भारतात झाली. या चळवळींमुळेच दलितांमध्ये सामाजिक गतिशीलता निर्माण झाली. दलितांमध्ये सामाजिक गतिशीलता निर्माण करण्यामध्ये धर्मांतरण, स्थलांतर, राजकीय पक्ष, पारंपरिक व्यवसायाचा त्याग करुन नवीन व्यवसाय सुरु करणे, औद्योगिकरण, शहरीकरण, आत्मभान(आम्ही माणूस आहोत ही भावना), शिक्षणात झालेली प्रगती(शैक्षणिक प्रगतीसाठी

बाबासाहेब संदर्भ समूह झाले), राजकीय जागरुकता वाढली, आक्रमक ओळख निर्माण झाली. इ. सर्व घटक हे दलितांमध्ये सामाजिक गतिशीलता निर्माण करण्यास कारणीभूत ठरले. हे सर्व दलितांमध्ये झालेले बदल किंवा सामाजिक परिवर्तन दलितांच्या सामाजिक चळवळीची देण आहे,

दलित चळवळी समोरील प्रश्न आणि आव्हाने

भारतातील दलित चळवळीसमोर सद्यकालीन परिस्थितीमध्ये कोणते प्रश्न आणि आव्हाने आहेत याबाबत ते म्हणतात, सद्यकालीन परिस्थितीत भारतातील दलित चळवळीची स्थिती अतिशय निराशाजनक आहे ही खेदाची बाब आहे. आज भारतातील दलित चळवळीसमोर नेतृत्वाचा फार मोठा प्रश्न आहे. दलित चळवळी समोर काही प्रतिकात्मक स्वरूपाचे मुद्दे आज निर्माण झाले आहेत उदा. बाबासाहेबांचे स्मारक किती भव्य व्हावे याबद्दल लोकांची मत-मतांतरे यामध्ये बरीच तफावत दिसते जसे, काही अनुयायांना वाटते की, स्मारकातील पुतळा ३२० फुटाचा असावा तर काही लोकांना वाटते की, स्मारकाची गरजच काय? त्याऐवजी त्याठिकाणी दवाखाना, विद्यापीठ किंवा संशोधन केंद्र स्थापन करावे. अशा प्रकारचे मुद्दे घेऊन लोक समोर येत आहेत. अलिकडील काळात असाही सूर दलित लोकांच्या मधून येतो की, 'दलित' हा शब्द वापरु नये तर त्याऐवजी अनुसूचित जाती, मागासवर्गीय अशा शब्दांचा उपयोग करण्यात यावा असा एक विचार प्रवाह समाजात निर्माण होत आहे. दलित ऐक्यांचा प्रश्न भावनात्मक प्रश्न म्हणून समाजात निर्माण झाला आहे. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे कथात्मक वर्णन करण्यावर अलिकडील काळात अधिक चर्चा होतांना दिसते. अशा प्रकारचे बाबासाहेबांबद्दलचे प्रतिकात्मक मुद्दे आणि प्रश्न दलित चळवळीसमोर आव्हान बनून समोर आले आहेत. अलिकडील काळात समाजात बाबासाहेब हे घटनेचे शिल्पकार आहेत. यावरच चर्चा अधिक होतांना दिसते. परंतु अशा चर्चांमधुन बाबासाहेबांना व त्यांच्या विचारांना त्यांच्याच अनुयायांकडून संकुचित बनविण्याचा प्रयत्न समाजात केल्या जात आहे. म्हणून हा प्रश्न सुध्दा दलित चळवळीसमोरील आव्हान आहे. कारण १९४२-१९४६ च्या दरम्यान बाबासाहेबांनी भारताच्या समग्र विकासाचे मॉडेल निर्माण केले होते. त्यामध्ये त्यांनी वीज, पाणी, नौकानयन, नदयांचे प्रकल्प आणि जमीन, विस्थापितांचे प्रश्न, आदिवासींचे प्रश्न इ. विषयांवर बाबासाहेबांनी विपुल प्रमाणात आपले विचार मांडले आहेत. यामुळे ते केवळ भारतीय राज्यघटनेचे निर्माते नाहीत तर बाबासाहेब हे राष्ट्रनिर्माते होते. त्यामुळे बाबासाहेबांचे योगदान विश्व पातळीवर घेऊन गेले पाहीजे. बाबासाहेब हे भारताच्या विकासाचे शिल्पकार आहेत हे विचार जनमाणसात नेण्याची जबाबदारी बाबासाहेबांच्या अनुयायांची आहे. वर्तमानात दलित चळवळींमध्ये समन्वयांचा अभाव आहे. त्यामुळे ही चळवळ तुकडया-तुकडयामध्ये दुभंगलेली दिसुन येते म्हणून या चळवळींमध्ये समन्वय निर्माण झाला पाहिजे.

प्रश्न १: दलितांच्या सर्व राजकीय पक्षांचे उद्देश एकच असतांना या सर्व पक्षांचे सत्तेसाठीएकत्रीकरण का होत नाही? - डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, वरोरा.

उत्तर : राजकीय सत्ता प्राप्त करण्याच्या दृष्टिकोनातून सर्वच पक्ष प्रयत्न करतात. परंतू राजकीय सत्ता मात्र या लोकांना काही मिळत नाही. या मागचे मुख्य कारण म्हणजे, सत्तेसाठी आवश्यक असणारे संख्याबळ या लोकांना प्राप्त करता येत नाही. जर सत्तेची संधी प्राप्त झाली तर दलितांचे सर्व प्रमुख राजकीय पक्ष सर्वांचे एकत्रिकरण कसे होणार नाही याचीच काळजी अधिक करतात. पक्षीय एकत्रिकरणाविषयी दलितांच्या राजकीय पक्षात उदासीनता आहे. जेंव्हा सत्तेची संधी मिळते तेंव्हा एखादा पक्ष विरोधकांना जाऊन मिळतो, त्यामुळे सत्तेची चालून आलेली संधी गमवावी लागते. असे करण्यात इतर राजकीय पक्षांचा स्वार्थ असतो, त्यामूळे दलितांच्या राजकीय पक्षांचे एकत्रिकरण होत नाही.

प्रश्न २ : दलित चळवळीचे अध्ययन करणाऱ्या नवीन संशोधकांना आपण अध्ययनासाठी कोणती अभ्यासपध्दती सांगाल? - डॉ. श्रुती तांबे

उत्तर : दलितांच्या प्रश्नांच्या अध्ययनासाठी ठराविक पध्दतीशास्त्र आजपर्यंत विकसीत झाले नाही. असे पध्दतीशास्त्र विकसीत करण्याचा प्रयत्न के. सत्यनारायण यांनी केला आहे.परंतू ते यशस्वी झाली नाही. अनेक समाजशास्त्रज्ञ दलितांच्या अध्ययनासाठी ठराविकसिध्दांत, अभ्यासपध्दती किंवा पध्दतीशास्त्र विकसीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासंदर्भात आणखी अधिक लिखाण होण्याची गरज आहे. पूढील काळात असे पध्दतीशास्त्र निश्चितच विकसीत होईल.

डॉ. स्निग्धा कांबळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. नवनाथ शिंदे यांनी मानले.

■■■

अहवाल लेखन

डॉ. श्रीनिवास पिलगुलवार
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर.

विशेष व्याख्यान

बदलत्या जगाच्या बदलत्या समाजशास्त्रीय संकल्पना

वक्ते : डॉ. डी. श्रीकांत
सेवानिवृत्त प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डॉ. डी. श्रीकांत, यांचे बदलत्या जगाच्या बदलत्या समाजशास्त्रीय संकल्पना या विषयावर व्याख्यान दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजी आयोजित करण्यात आले होते. या विषयावरची मांडणी करताना त्यांनी समाजशास्त्रामध्ये कालसुसंगत बदल कसे झाले याचा आढावा घेतला. सामाजिक जीवनामध्ये होणाऱ्या उलथापालथीमुळे समाज विकास कसा होतो याचा परामर्श घेत असताना त्यांनी तत्त्वज्ञान ह्या ज्ञानशाखेपासून ते आधुनिक सामाजिक शास्त्रांमध्ये विविध तत्त्वज्ञांनी व विचारवंतांनी सामाजिक बदलाचा अन्वयार्थ कशारीतीने लावला याबद्दलचे चिंतन प्रगट केले.

आपल्या विवेचनात डॉ. श्रीकांत म्हणाले, मानव प्राणी हा बुद्धिप्रामाण्यवादी असून इतर प्राण्यांपेक्षा तो कसा वेगळा आहे. त्यांने आपल्या कुतूहलाच्या व बुद्धिचातुर्याच्याबळावर ज्ञानवृद्धी केली व त्याआधारे समाज संस्कृती समृद्ध केली. मानवी जैवसृष्टीबद्दलचे सिद्धांत प्रतिपादित केले. चार्लस डार्विन यांनी मांडलेल्या मानवी उत्क्रांतीच्या सिद्धांताद्वारे मानवी विकासाच्या वाटचालीचा वेध घेतला. मानवाने सातत्याने कालसुसंगत त्याच्या जगण्यात बदल करून घेतला यामुळेच तो सतत विकास व प्रगतीकडे आगेकूच करत राहिला आहे. मध्ययुगीनकाळानंतर मानवी जीवनात औद्योगिक क्रांतीमुळे आमूलाग्र बदल झाला. जीवनाचे प्रत्येक क्षेत्र या क्रांतीने व्यापले. मानवी जीवन यंत्राच्या वेगाने प्रगतीकडे आगेकूच करीत राहिले.

या वेगवान जीवनामुळे एकूणच सामाजिक सांस्कृतिक जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचे बनले त्यामुळे सामाजिक सामाजिक अस्वस्थता वाढली व त्या प्रश्नाची सोडवणूक कशी करावी याबद्दलची चिंतनशीलता समाजात वाढली. समाजचिंतकानी त्यांच्या बुद्धी सामर्थ्याच्या जोरावर ह्या सामाजिक गुंतागुंती सोडविण्याचे विविध मार्ग सांगितले. या

साऱ्या घडामोडींमुळे विविध ज्ञानशाखा उदयास आल्या व त्याद्वारे सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंचा शोध घेण्यात आला तसेच बदलत्या परिस्थितीचे आकलनही करण्यात आले. या सर्व सामाजिकशास्त्रज्ञांनी त्या त्या काळानुसार सामाजिक जीवनाचा अन्वयार्थ लावला. मानवी प्रश्नांना त्यांनी समजून घेतले. समाजातील विविध प्रश्न, सामाजिक परिस्थिती ही काही एका विशिष्ट भूप्रदेशात पुरती सीमित नाही या दृष्टीने ही अभ्यासाला सुरुवात झाली. समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी बदलत्या जगाचा मागोवा व विश्लेषण करताना चिकित्सक व सद्सद्विवेक बुद्धीने समाजाकडे पाहिले पाहिजे. आपणच निर्माण केलेल्या प्रश्नांची सोडवणूक निश्चितच करता येऊ शकेल व त्या माध्यमातून मानवी जीवन सुखकारक व निकोप बनविता येईल. समाजातील शोषणकारी दमन व्यवस्था बदलली पाहिजे, उपेक्षित घटकांना बरोबरीचे स्थान दिले पाहिजे म्हणून मानव निर्मित विषमता निर्मूलनासाठी सर्वांनी पुढे येणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

पुढे ते म्हणाले की, पराकोटीची सामाजिक विषमता असलेल्या आपल्या देशात सामाजिक न्याय ही सहज मिळणारी बाब नाही त्यासाठी संबंधित समाजानेही पुढे येणे व त्या विरोधात सामाजिक चळवळीच्याद्वारे आवाज उठविणे हे गरजेचे आहे. सामाजिक विषमतेची दरी मिटली तरच स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय या तत्वावर आधारलेला समाज निर्माण होऊ शकेल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. ब्रिटिशांच्या आगमनानंतर विविध सामाजिक सुधारणा चळवळींना वेग आला. भारतीय समाजव्यवस्थेमधील ताठरता जाऊन शिथिलता आली. संरचनात्मक बदल फारशे झाले नसले तरी सामाजिक व्यवस्थेमध्ये वरपांगी बदलाला चालना मिळाली. जात संरचना, वर्ग संरचना ह्या स्तरीकरण व्यवस्थेत बदलाला प्रारंभ झाला.

सामाजिक व्यवस्था बदलासाठी विषमतेवर आधारलेल्या जुन्या चालीरीती श्रद्धा, मूल्ये, रूढीपरंपरा यांना नाकारून लोकशाही मूल्यांचा स्वीकार केला पाहिजे. ही मूल्ये आपल्या जीवनाचा भाग बनली पाहिजे. सर्व प्रकारच्या विषमताना नकार देणं हे गरजेचे आहे. जागतिकीकरणाने निर्माण झालेले प्रश्न सोडवावे लागतील. अशा प्रकारे समाजातील अंतर्गत प्रश्न व नव्याने निर्माण झालेली आधुनिक प्रश्न अशा आवर्तनात भारतीय समाज सापडला असून त्यासाठी आपणाला नवे नवे मार्ग शोधावे लागतील. या सर्वच आघाड्यांवर लढणे हे तेवढे सोपे काम नाही. आपण सवानी शास्त्रज्ञांनीही या ग्लोबल मनाला समजून घेतले पाहिजे. सामाजिक वास्तवाला त्याने भिडले पाहिजे. सामाजिक संरचना समजून तरच भविष्यकाळ उज्वल राहू शकेल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले की, समाजशास्त्राचा प्राध्यापक हा खऱ्या अर्थानं कार्यकर्ता (Activist) असायला हवा. सामाजिक चळवळीबद्दल त्याने भूमिका घेतली पाहिजे व समाजातील असलेली असमानता, विविध सामाजिक प्रश्न या संदर्भात त्याने आपले विचार व्यक्त केले पाहिजे. समाजशास्त्राच्या अभ्यासाद्वारे विविध सामाजिक गुंतागुंतीवर विचार व्यक्त करता येऊ शकतात व समाजाचे आकलनही या निमित्ताने वाढू शकते. समाजाला विधायक दिशा देण्याचे कार्य समाजशास्त्रज्ञ करू शकतात म्हणून कालसुसंगत बदलाला त्याने सामोरे जाणे गरजेचे आहे.

याप्रसंगी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ.नारायण कांबळे, सचिव डॉ. वेदप्रकाश मलावडे, कोषाध्यक्ष प्रा.बळीराम पवार यांच्यासह मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.डॉ. मंगलमूर्ती धोकटे यांनी केले तर आभार डॉ. श्रीराम खाडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी लागणारी तांत्रिक बाजू प्रा. डॉ. प्रशांत सोनवणे यांनी सांभाळली. या व्याख्यानाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील समाजशास्त्राचे प्राध्यापक ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमाद्वारे एकत्र आले होते. तसेच अनेक सेवानिवृत्त प्राध्यापक ही सहभागी झाले होते. हे भाषण मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वेबसाईटवर (युट्युब चॅनेलवर) उपलब्ध करून देण्यात आले आहे.

https://youtu.be/weup2LLbgUc?t=1

■■■

अहवाल लेखन

प्रा. प्रियदर्शन भवरे
समाजशास्त्र विभाग,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना.
priyadarshan1971@gmail.com
Mobile : 9405913297

विशेष व्याख्यान

१ फेब्रुवारी २०२१

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जाती निर्मूलनाचा विचार आणि वर्तमान परिस्थिती

वक्ते : डॉ. सुरेश वाघमारे
सेवानिवृत्त प्राचार्य, संभाजी महाविद्यालय, मुरुड जि. लातूर

सध्याच्या सामाजिक अस्वस्थतेच्या व धार्मिक ध्रुवीकरणाच्या काळात विधायक सामाजिक बदलाची गरज असून परंपराप्रिय व रूढीग्रस्त समाजाला आधुनिकतेकडे नेण्याची आवश्यकता आहे व त्यासाठी व्यवस्था बदल होणे अपेक्षित असून विद्यमान समाजात जातीव्यवस्था अत्यंत टोकदार बनत आहे त्या विरोधात लढणे हे समाजशास्त्रज्ञासमोर मोठे आव्हान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती निर्मूलनाचा जो विचार दिला तो विचार देश व समाज बांधणीला महत्त्वाचे योगदान देणारा आहे. जाती निर्मूलनाच्या माध्यमातून देश खऱ्या अर्थाने एकात्म व मजबूत होऊ शकतो असे प्रतिपादन आंबेडकरी विचाराचे भाष्यकार डॉ. सुरेश वाघमारे यांनी केले.

मराठी समाजशास्त्र परिषदेने आयोजित केलेल्या ऑनलाइन विशेष व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जाती निर्मूलनाचा विचार आणि वर्तमान परिस्थिती या विषयावर ते बोलत होते. यावेळी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे, सचिव डॉ.वेदप्रकाश मलवडे, कोषाध्यक्ष प्रा. बळीराम पवार यांच्यासह आदी कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. संजय कोळेकर यांनी केले.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात डॉ. वाघमारे यांनी भारतातील जाती व्यवस्थेचा व त्या अनुषंगाने झालेले अभ्यासाचा परामर्श घेतला तसेच जातीव्यवस्थेच्या अभ्यासाची सविस्तर मांडणी केली. डॉ.आंबेडकरांनी मांडलेल्या चिंतनापूर्वी जाती निर्मूलनाचा विचार भारतात जोरकसपणे कोणीही मांडला नाही. डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेवर परखड भाष्य करून प्रस्थापित विषमताग्रस्त समाजव्यवस्थेच्या विरोधात विचार मांडले. जाती-जातीत व सर्व पातळ्यांवरील विषमता व श्रेष्ठ-कनिष्ठता अंगी मुरलेल्या भारतीय समाजाला नव्या आधुनिक विचारांची गरज त्यांनी प्रतिपादन केली. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्यायावर आधारित समाजाची उभारणी जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत भारतीय समाजाचा भविष्यकाळ उज्ज्वल होणार नाही असे डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते. जातीयता व श्रेष्ठ-कनिष्ठता डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमाद्वारे संपवली असली तरी वर्तमानात अशिक्षिताबरोबरच सुशिक्षितांमध्येही जातीयतेची विषवल्ली मोठ्या प्रमाणात फोफावली आहे ही विषवल्ली जोपर्यंत आपण नष्ट करणार नाही वा त्या संदर्भात कृती कार्यक्रम हाती घेणार नाही तोपर्यंत सामाजिक बंधूतेवर आधारलेला नवा समाज निर्माण होणार नाही असे डॉ. वाघमारे म्हणाले.

डॉ. वाघमारे पुढे म्हणाले की, जात आणि जातिव्यवस्था हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभ्यासाचा

संशोधनाचा व चिंतनाचा विषय होता. अस्पृश्यतेचे चटके त्यांना बसले होते. पावलोपावली त्यांच्या मार्गात जात आडवी येत होती. जातीने त्यांना अंतर्मुख बनविले होते आणि आक्रमकही म्हणून जातिप्रथेचे विध्वंसन कसे करावे हा विचार बाबासाहेबांच्या मनात आयुष्यभर घोळत राहिला. विद्यार्थी दशेपासूनच जातीव्यवस्थेचे स्वरूप त्यांनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अभ्यासाला व चिंतनाला अनुभवाची जोड होती. जात या संस्थेचे त्यांनी सखोल आकलन करून घेतले होते. त्याचबरोबर जातीचे निर्मूलन करण्याचा संकल्पही त्यांनी केला. कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना बाबासाहेबांनी 'भारतातील जाती' या शीर्षकाखाली एक विचारप्रवर्तक शोधनिबंध लिहिला त्यामध्ये त्यांनी जात या संस्थेची व प्रथेची अतिशय खोलात जाऊन चिकित्सा केली आणि त्यानंतरही त्यांनी जात व जातीप्रथेवर बरेच लिखाण केले.

Annihilation of caste या पुस्तकात त्यांनी जातीप्रथेच्या निर्मूलनाची रणनीती सांगितली आहे. जात आणि जातीव्यवस्था यावर आजपर्यंत अनेकांनी संशोधन केले आहे. पाश्चात्त्य विद्वान आणि भारतीय विद्वान या दोघांनीही तिच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. याबाबत नेसफील्ड (Nesfield) आणि सर एच.रिस्ले या दोन पाश्चात्त्य विद्वानांचा बाबासाहेब विशेषत्वाने उल्लेख करतात. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचेही नाव जातिव्यवस्थेच्या चिंतनासंदर्भात घेतले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या विद्वानांची मते ग्राह्य मानलेली आहेत. जात निर्मितीमध्ये विवाह हा महत्त्वपूर्ण घटक आहे. जात ही समावेशक असते. जात्यांतर्गत विवाह हाच जातीचा आधार आहे. जातींना पवित्र अपवित्रतेच्या कल्पना चिकटवण्यात आल्या आहेत आणि त्यातूनच उच्चनीचता निर्माण झाली. जातीअंतर्गत विवाहमुळेच जात आणि जातीप्रथा टिकून आहे. खरे तर हाच मुद्दा डॉ. आंबेडकरांनी आपल्या Caste in India: Their Mechanism, Genesis nd Development (१९१६) या शोधनिबंधात प्रकर्षाने मांडला आहे. जातीची निर्मितीही जात्यांतर्गत विवाहामुळे झाली आणि त्यामुळेच ती टिकून आहे. कोणत्याही समाजात विविध स्तर असतात त्या स्तरीकरणातूनच जाती व वर्ग निर्माण होतात. जन्माधिष्ठित स्तरीकरणातून जाती निर्माण झाल्या आणि त्यांना शाश्वत असे स्वरूप प्राप्त झाले. वर्ग हे जन्माधिष्ठित नाहीत व नसतात आणि म्हणून ते बदलता येतात. भारतीय समाजात जातीही आहेत आणि वर्गही आहेत पण जन्माधिष्ठिततेमुळे जाती ह्या अपरिवर्तनीय ठरल्या पण वर्ग हे परिवर्तनीय आहेत. जाती आणि वर्ग यातील हा फरक आहे म्हणून a caste is an enclosed class असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे. जातीबाहेर विवाहाऐवजी आंतरजातीय विवाह केले तर जातीप्रथा नष्ट होईल ही गोष्ट उघड आहे पण याला लोकांचा विरोध आहे कारण त्या पाठीमागे त्यांचे हितसंबंध, अज्ञान आणि अंधविश्वास दडून बसलेला आहे. डॉ. आंबेडकरांनी हाच विषय Annihilation of Caste (१९३६) या पुस्तकात चर्चिला आहे. हे पुस्तक पंजाब प्रांतातील जात-पात-तोडक मंडळाच्या १९३५ सालीच लाहोर येथे आयोजित केलेल्या वार्षिक अधिवेशनासाठी लिहिलेले अध्यक्षीय भाषण आहे पण त्यातील काही मुद्दे या मंडळाच्या मंडळींना विवादास्पद वाटल्याने हे नियोजित अधिवेशन झालेच नाही पण बाबासाहेबांनी हे भाषण पुस्तक रूपाने छापले. भाषण विविध भाषेत छापल्या गेल्याने ते अनेक लोकांपर्यंत पोहोचले. या ग्रंथांत जे विचार मांडले ते अतिशय स्फोटक व क्रांतिकारक आहेत. जग बदलणारे ते विचार आहेत. जाती पद्धती ही ज्या मूल्यांवर आधारलेली आहे त्या धार्मिक मूल्यकल्पना नष्ट केल्याशिवाय जाती तोडणे शक्य नाही हा या भाषणाचा मूळ गाभा आहे मात्र हा विचार जात-पात-तोडक मंडळाच्या लोकांना पटला नाही म्हणून त्यांनी ही परिषदच रद्द केली. या परिषदेच्या निमित्ताने डॉ आंबेडकरांना आपले मूलभूत विचार मांडायचे होते. ते म्हणाले माझा जो विचार आहे त्या विचारापासून मी तसूभरही मागे हटणार नाही एक तर तुम्ही माझ्या विचारांशी असहमत आहात असा ठराव करा अथवा माझ्या निषेधाचा ठराव मांडा, या भाषणातील परिच्छेदच नाही तर स्वल्पविरामही मी बदलणार नाही यावरून ते या भाषणाबाबत किती आग्रही होते हे दिसून येते. यातून त्यांना नवा क्रांतिकारक विचार भारतीय समाजाला द्यायचा होता.

जातीनिर्मूलनाच्या माध्यमातून भारतीय समाज-व्यवस्थेला वैज्ञानिक दृष्टिकोन देण्याचा त्यांचा मानस होता. समाजसंरचनेत जोपर्यंत मूलभूत बदल होणार नाही तोपर्यंत एकसंघ समाज उभा राहू शकणार नाही. जातीच्या पायावर कोणताही समाज खऱ्या अर्थाने उभा राहू शकणार नाही अन्यथा कधी हि हा समाज कोसळल्या शिवाय राहणार नाही म्हणून सामाजिक संरचनेत बदल करणे महत्त्वाचे आहे व त्यासाठी जाती संस्थेत बदल करणे हे गरजेचे आहे हा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. आपल्या समाजातील पोटजाती सुद्धा नष्ट केल्या पाहिजेत. विषमता व अज्ञानावर आधारलेल्या रुढी परंपरेला आपण नाकारले पाहिजे. तरच आपण खऱ्या अर्थाने प्रगती करू. समाजातील श्रेष्ठ कनिष्ठ त्याची भावना नष्ट होईल. आंतरजातीय सहभोजन यावर त्यांचा विश्वास नव्हता. सहभागी लोकांची जातीयतेची भावना जोपर्यंत नष्ट होणार नाही तोपर्यंत याला अर्थ राहणार नाही त्यासाठी आंतरजातीय विवाह हाच एक प्रभावी उपाय आहे हे त्यांनी आग्रहाने सांगितले. भारतासारख्या विषमताग्रस्त समाजाला प्रगतिपथाकडे जायचे असेल तर आंतरजातीय विवाह हा खरा उपाय आहे अशा पद्धतीची मांडणी त्यांनी केली. आंतरजातीय विवाहाचे प्रमाण समाजातून वाढले पाहिजे. आंतरजातीय विवाहाला विरोध मोठ्या प्रमाणामध्ये होतात त्यासाठी समाजाचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. आंतरजातीय विवाहामध्ये विविध प्रकारचे अडथळे आहेत

त्यापैकी धर्मशास्त्र हा सुद्धा महत्त्वाचा अडथळा आहे. समाजातील बहुसंख्य लोक धर्मशास्त्राचे पालन करतात त्यासाठी धर्मशास्त्राचे खरे स्वरूप त्यांना समजावून सांगावे लागेल. लोकांच्या मनात पावित्र्याची कल्पना आहे त्याला ते प्रमाण म्हणतात. डॉ आंबेडकर या पावित्र्याच्या कल्पनेला विरोध करतात. बहुतांश लोकांच्या मनात पुरोहित वर्गाबद्दल आदराची भावना असते व हा वर्ग अज्ञान-अंधश्रद्धेच्या नावाखाली समाजाला विषमतेच्या खाईत लोटतो. पुरोहित वर्गांला सुद्धा नकार द्यायला पाहिजे. विषमतेवर आधारलेली धर्मशास्त्र आपल्याला नाकारावे लागेल. ब्राह्मणेतर वर्ग हा विषमतेचा बळी आहे म्हणून प्रस्थापित पुरोहित वर्गाला त्याने नाकारले पाहिजे.

डॉ. आंबेडकर धर्माचे विरोधक नाही. धर्म हा मानवी जीवनाला आकार देतो, तो माणसाला जगण्यासाठी आवश्यक आहे. एकसंघ हिंदू समाज निर्माण करायचा असेल तर आंतरजातीय विवाह होणे गरजेचे आहे. माणसामाणसांत भेदाभेद निर्माण करणारा धर्म नको. धर्म समानतेवर आधारलेला हवा. जातीव्यवस्थेमध्ये बदल होईल ही त्यांना अपेक्षा होती कारण कोणतीच गोष्ट अपरिवर्तनीय नाही. परिवर्तन निश्चित होऊ शकते. परंपरेला चिकटून राहणे तसेच कालबाह्य परंपरा ह्या आमच्या प्रगतीला अडथळा निर्माण करतात म्हणून मानवताविरोधी परंपरा नाकारल्या तरच नवनिर्मिती होईल हा जॉन ड्यूईचा विचार ते पुढे नेतात. सामाजिक समता, न्याय,बंधुता यावरच खऱ्या अर्थाने राष्ट्राची उभारणी होईल. जुन्या व खुळचट धार्मिक कल्पनेला तिलांजली देऊन समतेवर आधारलेल्या आधुनिक व वैज्ञानिक विचाराचा आधार आपणाला घ्यावा लागेल. सामाजिक विषमतेचा पुरस्कार करणारे व त्यावर आधारलेले धर्मग्रंथ आपणाला आपणाला नाकारावे लागतील. जाती निर्मूलनाचे कार्य हे राष्ट्रीय कार्य आहे. स्वराज्य मिळविण्यापेक्षाही ते अवघड कार्य आहे कारण जातीअंताचा लढा हा स्वकियांशी दिला जाणारा आहे आणि तो लढलाच पाहिजे. ती राष्ट्रीय समस्या आहे म्हणून ती सोडवली पाहिजे. स्वकीयांशी लढणे हे परकियांशी लढण्यापेक्षा कितीतरी अवघड असते. जातीप्रथेने देशातील सामाजिक व राजकीय पर्यावरण दूषित केले आहे. तिने आमच्या सामाजिक व राजकीय राजकीय जीवनामध्ये विसंगती निर्माण केलेली आहे.

जातिव्यवस्थेच्या आजच्या वस्तुस्थितीबद्दल बोलताना डॉ. वाघमारे म्हणाले की जात ही आंतरजातीय विवाह केल्यानेच बदलू शकेल. आजचे राजकारण जातीवादाचा आधार घेऊन पुढे चालले आहे. संविधानाला अभिप्रेत असलेलं सामाजिक समतेचं, न्यायाचं वातावरण आज दिसून येत नाही. जातीच्या तटबंदी नष्ट झाल्या पाहिजे. समाजाच्या धृवीकरणासाठी जात वापरली जात आहे आणि अशा जातीय संघटनामुळे समाज संघटित होऊ शकत नाही. राष्ट्र तर अजिबात संघटित होऊ शकत नाही मात्र राजकारणी मंडळींना या गोष्टीचे भान नाही तिचा आधार घेऊन कोणतीही सामाजिक क्रांती होत नाही. जात माणसांमध्ये अहंकार निर्माण करते. जात न्यूनगंड निर्माण करते म्हणून अशा या जातीयतेला नष्ट करण्याचे फार मोठे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. सुशिक्षित वर्गामध्येही जातिव्यवस्थेचे समर्थन करणारा वर्ग निर्माण झाला आहे. सार्वजनिक व्यवहारांमध्ये जातीयता दिसत नसली तरी अदृष्य स्वरूपात जातीव्यवस्था दिसून येते. आजही जातीनिहाय वस्त्या, शहरी भागातील उपनगरे दिसून येतात. अशाप्रकारे जातीव्यवस्था ही सामाजिक व आर्थिक न्याय देण्याच्या मार्गात अडथळा निर्माण करते. जात आणि जातीप्रथेवर चहुबाजूंनी हल्ले केले पाहिजे. जातीविहीन व वर्गविहीन समाज निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. जाती या राष्ट्र विरोधी आहेत. त्या समाजजीवनात विभागणी करतात. जातीविरुद्ध सर्वांनी एकत्र आले पाहिजे. राष्ट्रनिर्मिती नंतरच बंधुत्व प्रत्यक्ष पाहावयास मिळेल. बंधुत्वाशिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरांसारखा केवळ बाह्य देखावा असेल. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल वा एकसंघ भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी जाती निर्मूलनाची गरज आहे असे ते म्हणाले.

सुत्रसंचालन प्रा.डॉ. शिवाजी उकरंडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.भाग्यश्री पाटील यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने श्रोतृवर्ग ऑनलाईन उपस्थित होता. हे भाषण मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वेबसाईटवर (युट्युब चॅनेलवरही) उपलब्ध करून देण्यात आले आहे.

https://youtu.be/GDMfZuaFRuw?t=7

■■■

अहवाल लेखन

प्रा. प्रियदर्शन भवरे
समाजशास्त्र विभाग,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना.
priyadarshan1971@gmail.com
Mobile : 9405913297

विशेष व्याख्यान
दि. १९ फेब्रुवारी, २०२१

लोककल्याणकारी राजा: छत्रपती शिवाजी महाराज



वक्ते : डॉ.व्ही.एल.एरंडे
सेवानिवृत्त प्राचार्य, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा जि. लातूर

प्रारंभी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे यांनी परिषदेच्या विविध उपक्रमांबद्दल प्रास्ताविकामध्ये माहिती दिली ज्यात संशोधन पत्रिका व इतर उपक्रमाच्या माध्यमातून संशोधकांना दर्जेदार माहिती देण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले.

डॉ. एरंडे यांनी लोककल्याणकारी राजा: छत्रपती शिवाजी महाराज या विषयाची मांडणी १) शिवाजी महाराजांच्या पूर्वीची सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थिती. २) शिवाजी महाराजांनी राज्यकारभार सुरू करतानाची परिस्थिती आणि ३) सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थिती बदलण्याकरिता शिवाजी महाराजांना कोणते प्रयत्न करावे लागले. अशा तीन भागांमध्ये करून त्यांनी आपले सविस्तर विवेचन मांडले.

कॉ. गोविंद पानसरे यांनी लिहिलेल्या 'शिवाजी कोण होता?' या ग्रंथाचा संदर्भ देत त्यांनी स्पष्ट केले की, सरंजामशाही काळात शिवाजी महाराजांमध्ये कोणते व असे काय वेगळेपण आहे? की त्यांना लोककल्याणकारी राजा म्हणून संबोधले गेले? जगातील एकमेव राजा सरंजामदार असूनही लोककल्याणकारी म्हणून सिद्ध झाला. तसेच रयतेला हा राजा आपला का वाटत होता. त्यांच्याप्रती अशी कोणती निष्ठा होती? याचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. तर तिसरा प्रश्न उपस्थित केला की 'आपण मेलो तरी चालेल, परंतु राजा जगला पाहिजे' असे जनतेला का वाटत होते?मावळ्यांना माहित होते की, त्यांना मरण येणार आहे. छत्रपतीचे सैनिक मरण्यासाठीच का लढले? यांची अशी कोणती निष्ठा होती? याचे उत्तर शोधले तरच लोककल्याणकारी राजा का म्हणतात हे आपणास समजेल असे डॉ. एरंडे यांनी सांगितले.

शिवाजी महाराजांच्या पूर्वीची महाराष्ट्रातील परिस्थिती अत्यंत वाईट, सरंजामदारीने पिचलेली होती. सरंजामदार, वतनदार हे जनतेवर जुलुम, अत्याचार, मनमानी करणारे होते. या व्यवस्थेत स्त्री ही उपभोग्य वस्तू मानली जात होती, स्त्री-पुरुषांना गुलाम मानले जात होते.'आपण मालक आहोत असे समजून रयतेची लूट करणे हा आपलाअधिकार आहे', असे वतनदार समजत होते. यामुळे सामाजिक अन्यायाची व धार्मिक दहशतवादाची परिस्थिती निर्माण झाली होती. १६४० मध्ये आदिलशहाचा सरदार 'मुरार जगदेव' यांनी पुण्याच्या भोवती गाढवांचा नांगर फिरवून त्याठिकाणी पहार रोवली आणि जनतेला सांगितले की, ही वस्ती किंवा जागा वस्ती करण्यासाठी योग्य

नाही. जो कोणी या ठिकाणी वस्ती करील त्याचा निर्वंश होईल.' अशा स्थितीमध्ये जनता जीवन जगत होती. ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केला.'आधुनिक महाराष्ट्रातील प्रबोधन' या ग्रंथांमध्ये लेखक रा.ना. चव्हाण असे म्हणतात की, छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यक्रांती करिता सामाजिक क्रांती केली त्यांनी ज्या लढाया केल्या हे महाराजांचे २० टक्के कार्य असून ८० टक्के कार्य सामाजिक,आर्थिक, भौतिक, कृषी विषयक आहे. हे महाराजांच्या चरित्रातून दिसून येते. शेतकऱ्यांचा वतनदारांकडून होणाऱ्या छळास पायबंद कसा घालता येईल यासाठी छत्रपतींनी प्रयत्न केले. शेजवळकर व कॉ. शरद पाटील असे म्हणतात की, महाराजांना वतनदाऱ्या नष्ट करणं शक्य नव्हते. परंतु ही वतनदारी नष्ट करून रयतेसाठी राज्य निर्माण करण्याची पार्श्वभूमी महाराजांची होती. १७ व्या शतकात स्त्रीला गुलाम म्हणून विकले जात असे. त्यांच्या चारित्र्याला, अब्रूला कोणतीही किंमत नव्हती. तिला स्वातंत्र्य, सुरक्षितता नव्हती. अशा या काळात 'स्त्रीवादा'ची मांडणी करणारा राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखले जाते. स्त्रीला सन्मान मिळावा, त्यांना मानाचे स्थान मिळावे, प्रतिष्ठा मिळावी व माणूस म्हणून स्त्रीला जगता यावे. महाराजांचे हे विचार त्यांना निष्ठा देऊन गेले त्यामुळे ते लोककल्याणकारी राजा बनले. तत्कालीन व्यवस्थेत बहुजनांकरिता व सर्वसामान्याकरिता धार्मिक व राजकीय अंधश्रद्धा जाचक ठरत होती. तसेच वतनदार, सरंजामदार यांच्या कडून सुटका होऊ शकत नाही, अशी स्थिती निर्माण झाली. यामुळेच शिवाजीमहाराजांचे वेगळेपण शोधावे लागते. छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राजे, कुळवाडीभूषण, बहुजन प्रतिपालक, क्षत्रिय कुलावंत होते. 'बहुजनांचा राजा' म्हणून शिवाजी राजाचा उल्लेख महात्मा फुलेंनी केला आहे. छत्रपती शिवाजी राजांनी सरंजामदारी व्यवस्थेकडून लोककल्याणकारी राजाकडे वाटचाल कशा पद्धतीने झाली याचे विवेचन डॉ. एरंडे यांनी केले. याप्रसंगी त्यांनी महाराजांचे तीन पैलू मांडले. १) महाराजांचे चरित्र, २) महाराजांची विचारसरणी आणि ३) महाराजांचे प्रजाप्रती असलेला व्यवहार किंवा कार्य पद्धती. छत्रपती शिवरायांनी प्रस्थापित समाजरचनेला विरोध करून समाजक्रांतीकडे वाटचाल केली म्हणून डॉ. आनंद पाटील म्हणतात १७ व्या शतकामधील पाटीलकी, वतनदारी, आदिलशाही आणि मोगलशाही यांना छेद देऊन प्रस्थापितांविरुद्ध राज्य स्थापित केले. चंद्रशेखर शिखरे म्हणतात की, महाराजांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये दोन-तृतीयांश संघर्ष आपल्या स्वकीयांविरुद्ध केला. त्यामध्ये मराठा वतनदार, मराठा सरदार यांच्या बरोबर केला, कारण हे मराठा स्त्रियांवर जुलूम करणारे, अत्याचार व बलात्कार करणारे होते. शेतकऱ्यांवर,कष्टकाऱ्यावर अत्याचार करणारे होते, त्यांच्या वतनदाऱ्या होत्या, ते मालक होते. म्हणून त्यांनी या प्रस्थापित सत्ता रचनेला विरोध केला. दुसरा संघर्ष त्यांनी मोगलांविरुद्ध केला. हा संघर्ष पाहिला तर त्यांची 'लोककल्याणकारी राजा' ही प्रतिमा निर्माण होते किंवा समोर येते. छत्रपती शिवाजी महाराजांची 'कुळवाडीभूषण'आणि 'बहुजन प्रतिपालक' ही प्रतिमा निर्माण झाली. ही प्रतिमा का निर्माण झाली? तर कॉ. गोविंद पानसरे म्हणतात की, 'महाराजांच्या स्वराज्याचा केंद्रबिंदू बहुजन समाज व शेतकरी समाज हा होता. म्हणून ते कुळवाडीभूषण होते.' त्यांनी सरदारांच्या लूटीला विरोध केला' जे सरदार छोट्या शेतकऱ्यांची लूट करत होते. तुम्हाला शेतकऱ्यांकडून अतिरिक्त कर वसूल करता येणार नाही, पिकलं नाही तर शेतसारा वसूल करता येणार नाही, दुष्काळ पडला तर शेतसारा माफ करावा लागेल, उत्पन्न पाहून शेतसारा लावावा. अशा स्वरूपाच्या वतनदारांच्या आर्थिक जाचाला प्रतिबंध घालून लोककल्याणकारी व्यवस्था महाराजांनी निर्माण केली. म्हणून त्यांना कुळवाडीभूषण असे संबोधले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांना 'बहुजन प्रतिपालक' असे म्हटले जाते. महाराजांनी अस्पृश्यता, भेदभाव आणि शुद्रता मानली नाही. म्हणून त्यांच्या सैन्यामध्ये अठरापगड जाती-धर्माचे सैनिक आढळतात. यामुळे त्यांना बहुजन प्रतिपालक असे म्हणतात. चंद्रकांत शिखरे असे लिहितात की, 'महाराजांचे सैनिक हे बहुजन समाजातील आहेत. त्यांनी मराठा क्षत्रियांना बाजूला सारून रामोशी, कोळी, सोनकोळी, मुस्लिम, बेरर, महार, मांग, माळी यासारख्या जातींमधून व शेतकऱ्यांमधून आपल्या सैनिकांची नेमणूक केली. म्हणजेच महाराजांनी कष्टकऱ्यांना क्षत्रिय बनविले. त्यांना स्वराज्याचा महत्त्वाचा भाग बनविले. म्हणून महाराजांना रयतेच्या निष्ठा प्राप्त झाल्या व महाराज बहुजन प्रतिपालक व कुळवाडीभूषण बनले.'

समाजक्रांतीकारी राजा

छत्रपती केवळ योद्धे नसून नव-समाजरचनेचे व नव्या कृषीरचनेचे जनक होते. महाराजांनी शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रामध्ये नव्या कृषीरचनेची संस्कृती निर्माण केली. त्याची आजही अनुभूती आपल्याला येते. त्यांनी शेतकऱ्यांसाठी आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञापत्रे लिहिली. तसेच महाराजांनी एका पाटलांना लिहिलेल्या आज्ञापत्राचा उल्लेख केला. तुमची पाटीलकी ही रयतेच्या हितासाठी सोपविलेली जबाबदारी आहे, तुम्ही पाटील असून रयतेचे मालक नाहीत. म्हणून तुमच्याकडे काहीही शिल्लक राहिले नाही तरी चालेल, परंतु माझ्या स्वराज्यात कोणीही उपाशी राहता कामा नये.

कोणत्याही शेतकऱ्याला अडवू नये, त्यांना कर्ज द्यावे, स्वराज्यात नव्याने दाखल झालेल्या शेतकऱ्यांना नांगर, बी-बियाणे, आर्थिक मदत करा. अशा प्रकारचा आदेश महाराजांनी पाटलांना केला. यातून महाराजांची रयतेचेप्रतीची निष्ठा दिसून येते. म्हणून शेतकऱ्यांची लेकर महाराजांच्या सैन्यामध्ये गेली. 'आपण मेलो तरी चालेल, पण आपला हा पोशिंदा राजा जगला पाहिजे.' अशी भावना या शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची बनली.

म्हणून शिवा नाव्ही, बाजीप्रभू, तानाजी मालुसरे यांच्यासारखे सैनिक तयार झाले. अशा प्रकारची लोककल्याणकारी निष्ठा महाराजांच्या चरित्रातून दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यक्रांती ऐवजी समाजक्रांती केली. त्यांनी स्वराज्यासाठी पोषक ठरेल अशी सामाजिक पार्श्वभूमी तयार केली. यातून महाराजांची चांगली प्रतिमा निर्माण झाली. विशेषतः शेतकरी, कष्टकरी व स्त्री रक्षक म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली. डॉ. गोविंद पानसरे लिहीतात की, एका स्त्रीवर बलात्कार केला म्हणून सखुजी गायकवाड यांना शिक्षा दिली. ज्यांच्या बळावर स्वराज्य निर्माण करणार आहोत,अशांना शिक्षा देण्यासाठी समान न्यायावर निष्ठा लागते.ती महाराजांकडे होती.'किल्लेदार, सुभेदार आपला असला काय?, स्त्री स्वकीय किंवा परकीय असली काय? व शत्रूची असली तरी स्त्रीच्या अब्रूला हात लावण्याचा अधिकार मी तुम्हाला दिलेला नाही.' यातून महाराजांचा महिलांप्रती असलेला आदर स्पष्ट होतो. जेथे महिलांना प्रतिष्ठा नसेल तेथे स्वराज्य स्थापन करण्याचा अधिकार मला नाही असे महाराज म्हणतात.

म्हणजेच बहुजन स्त्रिया, शेतकरी, शूद्रातिशूद्र, अस्पृश्य या चार घटकांच्या कल्याणासाठी महाराजांनी आपले स्वराज्य व सत्ता वापरली. छत्रपती शिवरायांच्या विचारसरणीमध्ये समाजक्रांती, नव-समाजरचना आणि नवी कृषी संस्कृती या तीन गोष्टी दिसतात. आपल्यास रयतेचे राज्य, लोककल्याणकारी राज्य निर्माण करायचे असेल तर समाज आपल्या सोबत हवा, म्हणून त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेतले प्रसंगी आपल्या समाजाचा विरोध पत्कारला परंतु दौलत खान सारख्या अनेकांना प्रमुख बनविले. जे लोक शेती व समुद्रावर जीवन जगत होते त्यांना क्षत्रिय बनविले. महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी सत्तेचा वापर केला. यावेळी घोरपडे, शिर्के, निंबाळकर, खेडसावंत हे सर्व मराठे महाराजांच्या विरोधात गेले.तरीही महाराजांनी त्याचा विचार केला नाही. या त्यांच्या विचारसरणीतून लोककल्याणकारी धोरण जाणवते. १७ व्या शतकात देशांमध्ये गुलामगिरीची प्रथा सुरू होती. त्यांनी गोव्याचे डच, पोर्तुगीज यांना पत्र लिहिले. त्यात महाराज असे म्हणतात की,बादशहाच्या काळात स्त्री पुरुषांची खरेदी-विक्री होत असे, परंतु माझ्या काळात हे होऊ देणार नाही किंवा माझे सैनिक तुम्हाला खरेदी-विक्री करू देणार नाहीत. जी प्रथा या सरंजामदारी व वतनदारी व्यवस्थेत सर्रासपणे चालू होती त्याला प्रतिबंध घालण्याचे काम महाराजांनी केले यातून त्यांची सामाजिकक्रांतीची व सामाजिक न्यायाची भूमिका स्पष्ट होते.

महाराजांना लोककल्याणकारी राजा संबोधण्याचे कारण म्हणजे शोषणमुक्त बहुजन समाजरचना होय. ते कोणत्याही समाजातील धार्मिक, आर्थिक, लैंगिक शोषणाच्या विरोधात होते. म्हणून त्यांनी स्वराज्यामध्ये शोषणमुक्त समाजाचा आग्रह धरला. शेतकरी, स्त्रीयांचे शोषण कोणीही करणार नाही याचे फर्मान महाराजांनी काढले होते हे स्पष्ट करतांना त्यांनी चिपळूनचा प्रसंग अधोरेखित केला.

महाराजांचा चिपळूण येथे सैनिकांचा तळ होता. त्यास त्यांनी आज्ञापत्र पाठवले होते. त्यात ते म्हणतात की, 'आता उन्हाळा पडत आला आहे, तुम्हाला अन्नधान्य कमी पडत असेल, परंतु तुम्ही कोणीही लूट करायची नाही किंवा शेतकऱ्यांच्या शेतामध्ये चोरी करायची नाही. त्यांच्याकडून पैसे देऊन अन्नधान्य खरेदी करावी. नसता जनता असे म्हणेल की यांच्यापेक्षा मोगल बरे.' अशाप्रकारची सक्त ताकीद महाराजांनी सैन्याला दिली होती. महाराजांनी स्त्रीयांच्या शोषणाला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शत्रूच्या स्त्रीला सुद्धा सन्मान दिला. किल्लेदार सावित्रीबाई व रायभागी हे त्यांचे उत्तम उदाहरण सापडते. म्हणजे महाराज अन्याय व शोषण सहन करत नाहीत म्हणून ही व्यवस्था लोककल्याणकारी होती असे अधोरेखित होते.

१६४० मध्ये जगदेवच्या पराक्रमामुळे पुणे सोडून गेलेल्या रयतेस महाराज नवी रयत असे संबोधतात. यासाठी त्यांनी आज्ञापत्र काढले. 'स्वराज्यामध्ये जी नवी रयत सामील झाली आहे, त्यांना कसण्यासाठी जमिनी द्या, त्यांना त्यासाठी लागणारे साहित्य, बैलगाडी, लाकूड-फाटा, बी-बियाणे आणि पैसे द्या. यातून ते शेती करू शकतील हा सामाजिक परिवर्तनाचा व सामाजिक न्यायाचा प्रवाह महाराजांनी तयार केला. तत्कालीन समाजव्यवस्थेने सर्व बहुजन समाजाला प्रतिष्ठा, सन्मान व जीवन नाकारले गेले होते. यासाठी महाराजांनी महार, मांग, रामोशी, मदारी, साळी, कोळी, बंजारा, नाव्ही आणि मुस्लिम यासारख्या असंख्य जातींना क्षत्रियत्व प्राप्त करून दिले. महाराजांनी यांना शुद्र किंवा अस्पृश्य न मानता आपले सवंगडी मानले. त्यांना स्वराज्याचा घटक मानले. या संदर्भात डॉ.आनंद पाटील व मुजुमदार असे म्हणतात की,'महाराजांच्या या वर्तनामुळे समाजातील स्पृश्य-अस्पृश्य हे अंतर कमी होऊन, जातीयता व अस्पृश्यता महाराजांच्या काळात कमी झाली.' छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व बहुजन समाजास वतनदारांच्या आणि सरंजामदारांच्या गुलामीतून मुक्त केले. म्हणून महाराजांना रयत आपली मानत होती. तत्कालीन समाजव्यवस्थेत असलेल्या वतनदाऱ्या महाराजांनी नष्ट केल्या. त्यांनी संपूर्ण आयुष्यात रयतेचे कल्याण पाहिले.

१७ व्या शतकात महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य व इतर मोघलाया यामध्ये फरक जाणवतो. कारण महाराजांनी स्वतः स्वराज्य निर्माण केले. तेही रयतेच्या जीवावर. त्यांनी शोषणमुक्त समाज आणि सामाजिक न्याय यावर आधारित समाजरचना निर्माण केली. स्वराज्यात असलेली जुनी कर पद्धती बंद करूननवीन कर पद्धती निर्माण केली. ती पूर्ण पद्धती बहुजनांच्या हिताची होती. छत्रपती शिवरायांचे चरित्र, विचार आणि व्यवहार या तीनही पातळीवरती जगाच्या पाठीवर एकमेव

राजा होता. त्यांचा संपूर्ण व्यवहार सामाजिक न्याय, शोषणमुक्त समाजाची रचना करण्यावर होता म्हणून त्यांनी प्रस्थापितांना बाजूला करून बहुजनांना सोबत घेऊन स्वराज्याची निर्मिती केली. महाराजांनी शेतकरी, कष्टकरी व स्त्रियांना सन्मान व प्रतिष्ठा मिळवून दिली. तत्कालीन कालखंडात महाराजांनी शेतकऱ्यांना जमिनी दिल्या, कर पद्धतीत बदल केला, दुष्काळामध्ये होरपळलेल्याना मदत केली, शेत सारा पद्धतीत बदल केला, शेती साहित्य दिले. यातून त्यांची कार्यपद्धती बहुजन समाजाच्या हिताची व कल्याणासाठीची होती असे दिसते. महाराजांनी शूद्र समजल्या जाणाऱ्या समाजास आपले सैनिक बनवून त्यांना सैन्याचा प्रमुख बनविले त्याला प्रतिष्ठा मिळवून दिली, त्यांना स्वराज्याचे घटक बनविले यातूनच त्यांचा लोककल्याणकारी दृष्टिकोन दिसतो. त्यांची संपूर्ण आज्ञापत्रे पाहिली तर त्यात केवळ आणि केवळ शेतकरी, गुलामगिरी, अत्याचार, शोषण यांच्या विरोधात होती. त्यांची संपूर्ण कार्यपद्धती शूद्र व कष्टकरी समाजाला प्रतिष्ठा मिळवून देण्याची होती.

महाराजांना कुळवाडीभूषण, बहुजन प्रतिपालक, कुलावंत आणि गो-ब्राह्मणप्रतिपालक ही विशेषणे लावली आहेत. यातील गो-ब्राह्मण प्रतिपालक हे विशेषण नंतर खोडसाळपणाने लावण्यात आले. ते गो-ब्राह्मणप्रतिपालक नव्हते, तर बहुजनप्रतिपालक होते. जून १६७४ मध्ये महाराजांचा पहिला राज्याभिषेक वैदिक पद्धतीने केला. कॉ. शरद पाटील असे म्हणतात की,'महाराजांनी जाणीवपूर्वक शाक्त धर्मीय पद्धतीने दुसरा राज्याभिषेक केला.' हा राज्याभिषेक करण्याचा महाराजांचा हेतू होता की, त्यांना बहुजनांची निष्ठा प्राप्त करायची होती. 'मी ब्राह्मणांचा राजा किंवा गो-ब्राह्मणप्रतिपालक ही प्रतिमा त्यांना नष्ट करायची होती. तर मी बहुजनांचा, शूद्रातिशूद्रांचा, शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, सर्वसामान्यांचा, रयतेचा राजा आहे.' हे सिद्ध करायचे होते. म्हणून महाराज कुळवाडीभूषण व बहुजन प्रतिपालक होते. हिंदवी स्वराज्याची संकल्पना ही स्पष्ट करताना ते म्हणाले; 'हिंदवी स्वराज्य' म्हणजे हिंदूंचे राज्य नसून 'एतदेशीय' राज्य होय. हा शब्द धर्मवाचक नसून प्रदेश वाचक आहे. आपलं स्वराज्य या अर्थाने हिंदवी स्वराज्याची संकल्पना महाराजांनी वापरली. म्हणून ते धार्मिक जरी असले, तरी सर्वधर्म समावेशकता मानणारे होते. महाराज मुस्लीम विरोधी नव्हते हिंदू-मुस्लिम वाद हा धार्मिक नसून तो राजकीय होता.

महाराजांना 'क्षत्रिय कुलावंत' असे विशेषण लावले जाते यामागे त्यांची लोककल्याणकारी निष्ठा दिसून येते कारण महाराजांनी अठरापगड जातींना क्षत्रियत्व प्राप्त करून दिले. त्यांच्या हातात तलवारी, भाले दिले. प्रसंगी नांगरही दिला. म्हणून ते क्षत्रिय कुलावंत ठरतात. महाराजांनी १६७६ मध्ये 'प्रभानवल्ली'च्या सुभेदाराला लिहिलेल्या एका अज्ञापत्रामध्ये असे लिहिले की, 'पाटील रयतेकडून भाजीच्या एका देठाची ही अपेक्षा न ठेवता तुम्ही योग्य वर्तन करावे, त्यांना बी-बियाणे, नांगर, बैल नसतील तर त्यांना बिनव्याजी कर्ज किंवा आवश्यक वस्तू खरेदी करून द्याव्यात, त्यांनी कर्ज फेडले नाही तर त्यांच्या शेतावर व घरावर जप्ती आणू नये.' अशा प्रकारच्या कष्टकरी व शेतकऱ्यांसाठी त्यांनी निर्णय घेतले. महाराजांची सामाजिक न्यायाची भूमिका आजपर्यंत एकाही इतिहासकाराने समोर आणली नाही. याची खंत डॉ. एरंडे सरांनी बोलून दाखवली. महाराजांचा खरा इतिहास महात्मा फुले यांनी समोर आणला. महाराजांनी नेहमी सामाजिक न्यायाची भूमिका घेतली. कोणावरही अन्याय अत्याचार होणार नाही, शोषण होणार नाही याची दक्षता महाराज घेत असत. महाराजांनी शोषणमुक्त समाजाची रचना निर्माण केली. म्हणून ते समाजक्रांतिकारक, लोककल्याणकारी व नवसंस्कृतीचे जनक झाले.लोकशाहीत 'नव-सरंजामदारी' राजकीय व्यवस्था निर्माण झाली आहे. महाराजांच्या विचारांचे स्मरण करून 'प्रजाहितदक्ष' राजकीय व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. शौर्यवान, पराक्रमी, ध्येयवादी, परिवर्तनवादी, पर्यावरणवादी राजा पुन्हा होणे नाही असे सांगून शिवाजीराजाच्या विचाराचा विपर्यास करणाऱ्या लोकांपासून जनतेला दूर ठेवणे गरजेचे आहे म्हणून संशोधकांनी महाराजांचा खरा इतिहास समोर जनते समोरआणावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन डॉ. स्निग्धा कांबळे यांनी तर आभार डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी मानले. याप्रसंगी परिषदेचे सर्व कार्यकारिणी सदस्य यांचेसह बहुसंख्येने श्रोतावर्ग ऑनलाइन उपस्थित होता.

■■■

अहवाल लेखन

डॉ. विनोद बी. खेडकर
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर-२२
khedkarvinod09gmail.com
9421537123 / 9423724701

विशेष व्याख्यान

दि. ०४ एप्रिल २०२१, वेळ – सकाळी ११.०० वाजता

विषय : समाजशास्त्र पद्धतीचे नवीन नियम : अँथनी गिडेन्स

मार्गदर्शक

डॉ. नारायण चौधरी

सेवानिवृत्त प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , नाशिक

प्रास्ताविक : डॉ. नारायण कांबळे अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद

मराठी समाजशास्त्र परिषदेद्वारे आयोजित विशेष व्याख्यानाचे प्रास्ताविक डॉ.नारायण कांबळे यांनी केले. याप्रसंगी सर्व उपस्थित व्यक्तींचे सरांनी स्वागत केले. सर्व प्राध्यापक संशोधक अधिकाधिक संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद देत आहेत त्यामुळे मराठी समाजशास्त्र परिषदेचा उत्साह वाढला असल्याचे मत व्यक्त केले व याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. तसेच याच महिन्यात महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. अनेक व्यक्तींनी दिलेल्या सूचनेमुळे व मागणीमुळे 'शोध निबंध कसा लिहावा' या विषयावर याच महिन्यात व्याख्यान आयोजित केले जाईल अशी माहिती दिली.

या कोविडच्या काळातही कार्यकारिणीचे काही सदस्य व इतरही काही जण आजारी असतानाहीया कार्यक्रमांसाठी मदत करीत आहेत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यापुढेही सर्वांच्या सूचनांचा विचार करून नवनवीन उपक्रमांचे आयोजन करण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासन याप्रसंगी दिले. मराठी समाजशास्त्र परिषदेचे आजीवन सभासद असणारे व ज्यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेला विकसित करण्यात मोलाचे योगदान दिले.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष पद भूषविले अशा डॉ. सरोज आगलावे आणि डॉ. स्मिता अवचार यांच्या भरीव योगदानाबद्दल मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने त्यांचे आभार मानले, त्यांच्या सेवानिवृत्तीपर

जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्वाईं सर यांच्या शैक्षणिक नेतृत्वाचे कौतुक केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील सामाजिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. ए आय शेख यांच्याही कार्याची दखल घेतली व त्यांना ही सेवानिवृत्तीपर जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयीन पातळीवर गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा येथील डॉ. बस्वराज गणाचारी आणि डॉ. बसू कानडे, पीपल्स कॉलेज नांदेड येथील डॉ. कृष्णा शेंडे, गोविंदराव वारजूरकर महाविद्यालय नागभीड येथील डॉ.अशोक सालोटकर, डॉ.शामल देशमुख औंढा नागनाथ महाविद्यालय औंढा नागनाथ, प्राचार्य डॉ. अनिल शिंदे बल्लारशहा जिल्हा चंद्रपूर, डॉ. शिवकुमार सोळंके जालना, डॉ. सिन्हा सर हिस्लॉप कॉलेज नागपूर, डॉ.अनिल कोसमकर पवनी जिल्हा भंडारा, डॉ. मंदा वाघ न्यू कॉलेज अहमदनगर या सर्वांनाही आरोग्यसंपन्न व सुखी, समृद्ध सेवानिवृत्तीपर आयुष्यासाठी मंगलकामना व्यक्त केल्या.

पुढील आयुष्यात मराठी समाजशास्त्र परिषदेला त्यांचे सहकार्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर डॉ. नारायण चौधरी सरांचा परिचय करून दिला व सरांनी या व्याख्यानासाठी लगेच होकार दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. सरांच्या सेवानिवृत्तीपर क्रियाशीलतेचे कौतुक केले आणि सरांच्या शैक्षणिक कार्याची सविस्तर माहिती या प्रसंगी दिली.

डॉ.नारायण चौधरी

आज दिनांक ४ एप्रिल २०२१ ला मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. नारायण चौधरी सरांनी समाजशास्त्र पद्धतीचे नवीन नियम: अँथनी गिडेन्स या विषयावर आपले विचार व्यक्त केले. सर्वप्रथम सरांनी मराठी समाजशास्त्र परिषदेचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या वरिष्ठ समाजशास्त्रज्ञांप्रती विशेषतः डॉ. सुधा काळदाते मॅडम, डॉ. कुलकर्णी, डॉ. उत्तम भोईटे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. मराठी समाजशास्त्र परिषदेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे सर आणि समस्त कार्यकारिणीचे या व्याख्यानासाठी आमंत्रित केल्याबद्दल आभार व्यक्त केले. याप्रसंगी सरांनी डॉ. उत्तम भोईटे सरांच्या कार्यकाळापासून मराठी समाजशास्त्र परिषदेने सतत प्रगती केल्याचा उल्लेख केला. तसेच डॉ. जगन कराडे सरांच्या अध्यक्षपदाच्या काळापासून मराठी समाजशास्त्र परिषद ही समाजशास्त्रीय संशोधनाच्या खऱ्या मार्गाने पुढे जात आहे असे गौरवोद्गार काढले आणि डॉ. नारायण कांबळे, डॉ. वेद प्रकाश मलवाडे, डॉ.बळीराम पवार व सर्वच कार्यकारिणीने पुढाकार घेऊन या कोविड्च्या विचित्र परिस्थितीतही ऑनलाइनच्या माध्यमातून विविध व्याख्यानांचे आयोजन केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. डॉ. नारायण कांबळे सरांनी अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर केलेल्या भाषणातील आश्वासनाप्रमाणे पुढाकार घेऊन कार्य करीत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

मराठी समाजशास्त्र परिषदेने या विशेष व्याख्यानांची सुरुवात दिनांक २७ सप्टेंबर २०२० ला ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. उत्तम भोईटे सरांच्या व्याख्यानाने केली. डॉ.भोईटे सरांनी समाजशास्त्राची जडणघडण पूर्णपणे बघितलेली आहे, अनुभवलेली आहे व त्यावर आधारित त्यांचे भारतीय समाजशास्त्राची पूर्वपीठिका विकास व समस्या हे व्याख्यान खूप महत्त्वपूर्ण ठरल्याचा व त्याचे अहवाल लेखन डॉ.मोरे सरांनी चांगल्याप्रकारे केल्याचा उल्लेख केला.

त्यानंतर दिनांक ६ डिसेंबर २०२० ला डॉ.पी जी जोगदंड सरांचे सामाजिक चळवळ संकल्पना आणि स्वरूप : दलित चळवळीच्या संदर्भात या विषयावर आयोजित व्याख्यान अतिशय प्रभावी झाल्याचे प्रतिपादन केले. विशेषतः त्यांच्या दलित चळवळीची ओळख हे पुस्तक समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी व संशोधक विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वपूर्ण असल्याचे मत मांडले. यानंतर डॉ.श्रीकांत सरांचे बदलत्या जगातील समाजशास्त्रीय संकल्पना यावर आयोजित व्याख्यान, डॉ.सुरेश वाघमारे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातीनिर्मूलन विषयक विचार या विषयावरील व्याख्यान, शिवजयंतीच्या निमित्ताने डॉ.व्ही एल एरंडे सरांचे लोक कल्याणकारी राजा : छत्रपती शिवाजी महाराज या विषयावरील व्याख्यान ही सर्व व्याख्याने अतिशय उत्तम झाले आहे. याप्रसंगी डॉ.विनोद खेडकर डॉ.प्रियदर्शन भवरे यांच्या अहवाल लिखानाचे कौतुकही सरांनी केले.

मराठी समाजशास्त्र परिषद डिजिटल संप्रेषणावर प्रभुत्व मिळवून इलेक्ट्रॉनिक मीडियाचा चांगला वापर करून गुगल मीट, झूम मीट तसेच वेबपोर्टल याचा वापर करून पुढे जात असल्याबद्दल व यात सर्व समाजशास्त्राचे प्राध्यापक, संशोधक अधिकाधिक संख्येने सहभागी होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. मराठी समाजशास्त्र परिषदेची प्रगती अशाच रीतीने कायम होत राहावी याबद्दल शुभेच्छा दिल्या आणि आपल्या विषयाची मांडणी सुरू केली..

अँथनी गिडेन्स यांनी New Rules of Sociological Method म्हणजेच समाजशास्त्र पद्धतीचे

नवीन नियम दिले आहेत. गिडेन्सने हे मूळ काम करताना Classical Sociological Tradition पूर्णपणे हाताळली आहे आणि त्यानंतर समाजशास्त्रातील संशोधन कसे करायला हवे याबद्दल चे नियम दिले आहेत असे मत मांडले.१९७६ साली New Rules of Sociological Method हे पुस्तक प्रकाशित झाले तेंव्हा त्यावर भरपूर टिका झाली. अँथनी गिडेन्सने या सर्वांना समर्पक उत्तरे देऊन १९९३ साली त्याची दुसरी आवृत्ती पॉलिटी प्रेसद्वारे प्रकाशित झाल्याचा उल्लेख केला. अँथनी गिडेन्स हे किंग्स कॉलेज यु. के. ला प्राध्यापक असताना डॉ.चौधरी सरांनी त्यांच्याशी पत्रव्यवहार केल्याचाही उल्लेख केला.

अँथनी गिडेन्सने समाजशास्त्र पद्धतीचे नवीन नियम हे पुस्तक उपशिर्षक देऊन लिहिले आहे. स्पष्टीकरणार्थक समाजशास्त्राचे एक सकारात्मक समालोचन असे उपशिर्षक अतिशय महत्त्वाचे ठरते. गिडेन्सच्या मतानुसार हा त्यांचा एक स्वतंत्र अभ्यास म्हणून वाचायला पाहिजे कारण त्यांनी बऱ्याच गोष्टींना स्पर्श केला आहे. त्याचे पूर्ण विवरण शक्य नाही, जरी सर्व मुद्दे महत्त्वाचे असले तरी यातील पुढील तीन मुद्दे त्यांच्या अभ्यासात महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

१. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक सिद्धांताच्या विकासनावर टिकाकुशल दृष्टिकोन विकसित करणे आणि त्यानंतरच्या विसाव्या शतकात समाजशास्त्र, मानवशास्त्र आणि राज्यशास्त्र यांचा संस्थात्मक आणि शैक्षणिक विद्याशाखांमध्ये समावेश करणे.

२. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक विचारातील काही प्रमुख विषय जे प्रगत समाज तयार होण्याच्या विचारात बांधले गेले आणि जे समालोचनासाठी पुढे आले त्यांचा मागोवा घेणे.

३. या विषयांशी संबंधित सामाजिकशास्त्राची गुणवैशिष्ट्ये तपासणे व ही गुणवैशिष्ट्ये तपासताना बऱ्याच त्रासदायक समस्या निर्माण होतात, त्यांचा विचार करून विस्तार करणे. तसेच त्यांची पुनर्बांधणी सुरू करणे व या शास्त्रांचा स्वतःचा आधार असणाऱ्या मानवी सामाजिक कृती कार्यक्रम (Social ctivity) आणि आंतरवैयक्तिक क्रिया (Intersubjectivity) या संकल्पना अभ्यासणे.

वरील तीनही मुद्दे परस्परांना व्यापतात परंतु यामधील तिसऱ्या मुद्याला महत्त्व देऊन गिडेन्सने हे पुस्तक लिहिले आहेअसे प्रतिपादन केले. यामध्ये समकालीन सामाजिक धारणा ह्या समीक्षात्मक विश्लेषणासाठी वापरून त्यांना एकत्रित बांधण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकात पद्धती या शब्दाचा अर्थ एमिल डरखाईमच्या Rules of Sociological Method मधील अर्थाप्रमाणेच घेतला आहे. या पुस्तकात गिडेन्सने Classical Sociological Tradition म्हणजे एमिल डरखाईम, कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर व टॉलकॉट पारसन्स यांच्या सिद्धांतामधील तार्किक मुद्द्यांचा (Logical Issues) संयुक्तिकपणे विचार करून हे नवीन नियम गिडेन्सने मांडले आहेत असे सांगितले. या अभ्यासाला उपयुक्त समीक्षा (Positive Critique) आणि स्पष्टीकरणार्थक समाजशास्त्रे (Interpretative Sociologies) अशी दोन उपशीर्षके दिलेले आहेत. स्पष्टीकरणार्थक समाजशास्त्र म्हणजेच समाजशास्त्राचा उपयोग अशा पद्धतीने करायला हवा की, समाजातील कुठलीही घटना आपणास स्पष्ट करून सांगता आली पाहिजे, असेच लिखाण कोते यांच्या सामाजिक व नैसर्गिक शास्त्रातील तत्त्वज्ञानात नक्की आढळते. स्पष्टीकरणार्थक समाजशास्त्रे ही संज्ञा अर्थपूर्ण कृतीशी संबंधित लेखनास एकत्रित गुंफवून सर्व स्पष्ट करते, यासारखी दुसरी संज्ञा नाही. या अभ्यासात सामाजिक कृती ही अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते, व सामाजिक सिद्धांताचा उपयोग केला जातो. कारण ती कृती सामाजिक अभिकर्त्याच्या (Agent) विवेकशील वागण्यातून परावर्तीत होते आणि ती फक्त भाषा या माध्यमातून प्रत्यक्ष व्यवहार्य होऊ शकते. हे सांगताना सरांनी अभिकर्ता (Agent), अभिकर्तृत्व (Agency)व स्वयंपरावर्तीतता (Self Reflection) या संकल्पना ही स्पष्ट केल्या. समाजातील कोणतीही घटना घडल्यानंतर त्यांना सामान्य माणूस (Layman) आणि समाजशास्त्रज्ञ समान दृष्टीने पाहतो हे गिडेन्सचे मतही सरांनी प्रतिपादित केले. या विद्याशाखेचे योगदान समाजशास्त्र पद्धत आणि तर्कशास्त्राचे स्पष्टीकरणासाठीचे योगदान यासंदर्भात गिडेन्सने चार मुद्दे महत्त्वाचे मानले आहेत. स्पष्टीकरणार्थक समाजशास्त्र ही एक विद्याशाखाच असावी असे गिडेन्सचे मत आहे व त्याची पुढील चार वैशिष्ट्ये आहेत.

१. दक्ष मानवी कर्त्याची कौशल्यपूर्ण कृती ही निसर्गातील जगासारखी नसते ती आपणास जाणून घ्यायची असते.

२. अर्थपूर्ण तपशीलवार किंवा समजेल अशी या जगाची रचना किंवा बांधणी भाषेवर अवलंबून असते. तथापि ती नुसती साध्या संज्ञा किंवा संकेताशी संबंधित नसते परंतु व्यवहारिक कृतीचे माध्यम असते.

३. ह्याच कौशल्यावर आधारित गरजेनुसार समाजशास्त्रज्ञ ज्याचे/ जिचे वर्तन त्याला वर्णन करायचे असते ते तो करतो.

४. सामाजिक वर्तनाची वर्णन निर्मिती अर्थाच्या चौकटीत शिरकाव करून स्पष्टीकरण देण्याच्या कामावर

अवलंबून असते, जी सामान्य कृतक (Actor) स्वतः सामाजिक जगाच्या रचना व पुनर्रचनेवरून काढतात.

या बाबी स्पष्ट करण्यासाठी सरांनी स्वतः सहभागी निरीक्षणातून अभ्यासलेली तीन उदाहरणे सांगितली ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. सामाजिक संरचना आणि व्यक्ती (Social Structure and Individual) :- एक मुस्लिम महिला अशक्तपणामुळे इंजेक्शन घेते, पण ते संततिनियमनाचे असते, तसे मात्र ती कोणालाही घरात सांगत नाही पण दवाखान्यात जाऊन इंजेक्शन घेते, कारण तिचा नवरा रोज रात्री शय्यासोबत करीत असतो त्यामुळे तिला अशक्तपणा आलेला असतो, तसेच तिला अगोदरच दोन मुले असतात व तिसरे मूल नको म्हणून ती हे सर्व करीत असते.

२. संस्थात्मक संरचना (Institutional Social Structure):- एक प्राध्यापक एक मोठा कार्यक्रम घेतो व त्यात राष्ट्रपती, राज्यपाल व युजीसीच्या चेअरमन ला आमंत्रित करतो व सर्व काही व्यवस्थितपणे घडवून आणतो. नंतर पुढच्या वर्षीच तो एका विद्यापीठाचा कुलगुरू होतो.

३. प्रशासकीय संरचना (Governance Structure) :- कुटुंब नियोजन कार्यक्रमात नसबंदी करण्याचे टार्गेट दिलेजाते. तेव्हा तेथील अधिकारी दादागिरी करून लोकांना त्यांच्या काम करण्याच्या क्षेत्रासाठी लोकसंख्येनुसार टार्गेट देतो व दम देऊन सांगतोजो कोणी हे टार्गेट पूर्ण करणार नाही, त्यास नोकरीवरून काढून टाकले जाईल. तेंव्हा नोकरी जाण्याच्या भीतीने लोक खोट्या केसेसचे फॉर्म भरून आपले टार्गेट पूर्ण करतात. नंतर ही गोष्ट शासनाच्या लक्षात येते, तेंव्हा अधिकाऱ्याला विचारण्यात येते, तेंव्हा तो म्हणतो ते वर्कर्स काय खोटं काम करतात ते शोधून काढायला मी काही पोलीस नाही. वरील तीनही मुद्द्यांचे विश्लेषण गिडेन्सने दिलेल्या मॉडेलनुसार करता येते. व हे करताना भाषा, भाषेचा वापर, दुहेरी अर्थ असणारी गोष्ट (Double Hermeneutics) आणि सामाजिक संरचनेचे द्वित्व (Duality of Structure) या संकल्पनांच्या आधारे करता येते असे प्रतिपादन केले.

तसेच हे विश्लेषण करीत असताना अर्थाची बांधणी (Paradigm), नैतिकता(Ethics) आणि सत्तेचा संबंध (Power Relations) या संकल्पनाही अत्यंत महत्त्वपूर्ण असून याद्वारेच सामाजिक घटनांचे विश्लेषण करणे शक्य होते. हे करीत असताना Thomas Kuhn च्या परिभाषेत जशी अर्थाची चौकट आहे, तशीच गिडेन्सची अर्थाची चौकट (Paradigm) असल्याचे मत मांडले. या अर्थाच्या चौकटीला अभिकर्तृत्व, संकेतवाद, सत्ता सुविधावाद व प्रमाणक/ मान्यतावाद या सर्वांच्या परस्पर संबंधातून कसे विश्लेषण केले जाते हे समजावून सांगितले.

अर्थाची चौकट (Paradigm)

अभिकर्तृत्व	संकेतवाद	सत्ता सुविधावाद	प्रमाणक/ मान्यतावाद
क्रिया (Interaction)	संप्रेषण सूचना/ (Communication)	सत्ता (Power)	मान्यता (Sanction)
आंतरक्रिया (Modality)	स्पष्टीकरणार्थक योजना (Interpretative Scheme)	उपलब्धी (Facility)	प्रमाणक (Norms)
बांधणी (Structure)	स्पष्टता (Signification)	प्रभाव/प्रभुत्त्व (Domination)	स्वीकारार्हता (Legitimation)

घेऊन संशोधन करणे महत्त्वपूर्ण ठरेल असे मत व्यक्त केले. ज्याप्रमाणे अँथनी गिडेन्सने Classical Sociological Tradition चा उपयोग करून, विश्लेषण करून आपले मॉडेल तयार केले, त्याप्रमाणे आपणही आपल्या समाजात घडणाऱ्या सामाजिक घटनांचे विश्लेषण करण्यासाठी नवीन मॉडेल तयार करू शकतो अशी प्रेरणा दिली. हे करण्यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेने या Classical Sociological Tradition चे भाषांतर करून, असे कार्य घडून येण्यासाठी हातभार लावावा असा विचार व्यक्त केला. यातही मराठवाड्यात सर्वाधिक संख्येने असणाऱ्या समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी पुढाकार घ्यावा असे मत व्यक्त केले. या काळात Indian Sociological Society चे सचिवपद महाराष्ट्राकडे डॉ.जगन कराडे यांच्या रूपाने आहे त्यांनीही याबाबतीत पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. यानंतर सरांनी सहभागी निरीक्षणातून अध्ययन केलेले मुस्लिम महिलेचे उदाहरण सविस्तरपणे स्पष्ट करून सांगितले. या उदाहरणाच्या माध्यमातून स्वयंपरावर्तीतता (Self Reflexivity), अर्थाची चौकट (Paradigm), उत्पत्ती आणि पुनरुत्पत्ती (Production and Reproduction), द्वित्वस्पष्टता (Double Hermeneutics), द्वित्व संरचना (Duality of Structure), संस्थात्मक परावर्तीतता (Institutional Reflexivity) या संकल्पना सविस्तरपणे स्पष्ट करून सांगितल्या. या अध्ययनात गिडेन्स सोबतच देरीदा, एमिल डरखाईम, हेबरमास यांचे समाजशास्त्रीय सिद्धांत कसे पूरक ठरतात यावरही प्रकाश टाकला. या उदाहरणावरून प्रत्यक्षपणे एखाद्या घटनेचे, सामाजिक वास्तवाचे सहभागी विश्लेषण कसे करावे हे अतिशय प्रभावीपणे समजावून सांगितले. तसेच या आधारे गिडेन्स ने जे सामाजिक संशोधनाचे नियम मांडले त्यावर चर्चा केली

अँथनीगिडेन्स ने मांडलेले नियम

१. समाजशास्त्र हे पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या वस्तूंच्या विश्वाबरोबर संबंधित नसते, परंतु अशा विश्वाबरोबर की, जे व्यक्तीच्या कृतिशीलतेने बांधलेले किंवा निर्माण केलेले असते.

२. समाजाची उत्पत्ती व पुनरुत्पत्ती ही त्यांच्या सदस्यांच्या भागाची कौशल्यपूर्ण कृती म्हणून वापरायला पाहिजे, ती आपोआप घडणाऱ्या प्रक्रियेची शृंखला नसते.

३. मानवी अभिकर्तृत्वाचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. मानव हे समाजाची उत्पत्ती करतात, परंतु ते इतिहासाने नोंदलेले कृतक म्हणून, त्यांनी स्वतः निवडलेल्या स्थितीनुसार नव्हे.

४. संरचना संकल्पना अशी करू नये की, त्यामुळे मानवी अभिकर्तृत्वावर दडपण येईल, परंतु त्यास शक्य होईल अशी पाहिजे , यासच गिडेन्स द्विअर्थी संरचना म्हणतो.

५. संरचनाकरणाच्या प्रक्रियेमध्ये अर्थ, प्रमाणके आणि सत्ता असतात, त्या तर्कशास्त्रीय दृष्टीने दोन्ही 'संरचना व हेतुपूर्वक कृती' या कल्पनांमध्ये समाविष्ट असतात.

६. सामाजिक निरीक्षण करणाऱ्याला एखादी प्रघटना सामाजिक जीवन उपलब्ध करून देऊ शकत नाही, कारण तो ती प्रघटना त्याच्या ज्ञानाचे साधन म्हणून वापरणे ही स्वतंत्र बाब आहे, जी बहुतांशी त्याने निवडलेल्या संशोधन विषयाशी संबंधित असते.

७. एखाद्या प्रकारच्या जीवनात पूर्णपणे सहभागी झाल्याशिवाय, निरीक्षण करून जीवनाची गुणवैशिष्ट्ये पुढे आणणे शक्य नाही.

८. अशा रीतीने समाजशास्त्रीय संकल्पनेत द्विअर्थी स्पष्टीकरण मान्य करायला पाहिजे.

या नियमांचा उल्लेख करून सरांनी मिश्र पद्धतीवर(Mixed Methodology) चर्चा केली. गिडेन्स ने सांगितलेल्या स्पष्टीकरणार्थक समाजशास्त्राला मिश्र पद्धतीने चांगल्या प्रकारे स्पष्टीकरण करता येते असे मत मांडले. परंपरागत समाजशास्त्रीय संशोधनात स्पष्टीकरणात्मक (Interpretative), प्रत्यक्षवादी (Positivistic), झीरसारींळल या तीन संशोधन पद्धतीच्या आधारे संशोधन केले जाते. या पद्धती मुख्यतः आगमन व निगमन पद्धतीवर अवलंबून असतात. त्या संशोधन पद्धतींना पुढे नेण्याचा प्रयत्न टॉलकॉट पारसन्सने केला व स्वतःचे मॉडेल तयर केले. त्यानंतर गिडेन्स ने स्वतःचे मॉडेल निर्माण करून त्याचा विस्तार केला, परंतु खऱ्या अर्थाने त्या सर्वांचा आधार Classical Sociological Tradition च आहे. या परंपरागत पद्धतीचा वापर आपण संशोधनासाठी करीत असतो. आजही संशोधनासाठी या परंपरागत पद्धती व्यवहार्य (Applicable) आहेत असे मत सरांनी मांडले. परंपरागत समाजशास्त्रामध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध घटकांना गिडेन्स ने समाजशास्त्र पद्धतीच्या नवीन नियमांना विकसित करण्यासाठी वापरले. त्या सर्व घटकांचा आढावा सरांनी व्याख्यानाच्या शेवटच्या टप्प्यात घेतला. गिडेन्स ने आधारभूत मानलेल्या घटकांमध्ये खालील घटकांचा समावेश होतो

१. संघर्ष निर्मितीची कारणे

२. द्वंद्वात्मक संघर्षाचे कारणीभूत घटक आणि द्वंद्वात्मक संघर्षाची कारणे

३. प्रघटनाशास्त्र (Phenomenology) आणि गॉफमनचे अभिनयशास्त्रीय दृष्टी प्रारूप

४. लोकन्वयशास्त्र (Ethnomethodology)

५. एडमंड हसरेलची जीवन जगत (Life Wold) संकल्पना

६. प्रतीकात्मक आंतरक्रियावाद (Symbolic Interactionism)

७. टॉलकॉट पारसन्सची समाज संरचना, अभिसंरचना, अभिमुखता, संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टिकोण, प्रकार्यात्मक पूर्वावशक्यता (GIL) यावरील विचार

९. सैद्धांतिक रचना आणि सिद्धांताचे विविध प्रकार

अशा विविध विचारांचे संकलन करूनच गिडेन्स ने एमिल डरखाईम, वेबर, मार्क्स आणि टॉलकॉट पारसन्सच्या विविध दृष्टिकोनावर टिकाटिप्पणी करून हे पुस्तक लिहिले आहे, व ही नवीन पद्धती विकसित केली आहे असे मत शेवटी मांडले. सरांनी अतिशय सविस्तरपणे विस्तृत अशा असणाऱ्या विषयाला स्वतः अध्ययन केलेल्या उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट करून सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.स्निग्धा कांबळे यांनी केले.

■■■

अहवाल लेखन

प्रा. बालाजी गंगाधर दमकोंडवार.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी, जिल्हा चंद्रपूर.

फुले–शाहू–आंबेडकर व्याख्यानमाला
११ एप्रिल २०२१ ते १३ एप्रिल२०२१
दिनांक: ११ एप्रिल २०२१ वेळ: सकाळी१०.००

विषय : समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

व्याख्याते : डॉ.प्रदीप आगलावे

अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे

मार्च, २०२० पासून भारतामध्ये करोना या संसर्गजन्य रोगने संपूर्ण भारतामध्ये हाहाकार माजवला आहे.यामहामारीच्या कालावधीमध्ये संपूर्ण जनजीवन विस्कळीत झालेले आहे. शाळा महाविद्यालय बंद आहेत.संपूर्ण देश लॉकडाऊन सारख्या व्यवस्थेने बंदिस्त केलेला आहे. मानवी संपर्कातून वैचारिक देवाण–घेवाण होत असते. मानवी संपर्क हा रोग होऊ देत नाही. त्यामुळे ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार खंडित झालेला आहे.

मराठी समाजशास्त्र परिषद ही परिषदा, चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद व व्याख्यानमाला यांच्या माध्यमातून समाजशास्त्रीय ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार सतत करत असते. परंतु covid-19 च्या कालावधीमध्ये प्रत्यक्ष संपर्कातून जे उपक्रम राबवले जात होते. हे उपक्रम राबवण्याकरिता मर्यादा आल्या. परंतु मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे व परिषदेचे कार्यकारणी सदस्य यांनी covid-19 महामारीमध्ये ही या मर्यादांवर मात करत नवनवीन उपक्रम राबविण्यास सुरुवात केली व समाजशास्त्रीय ज्ञानाचा प्रसार आणि प्रचार सतत करत आहेत. समाजशास्त्राच्या अभ्यासकांना, संशोधकांना, विद्यार्थ्यांना नवीन नवीन उपक्रमांच्या माध्यमातून ज्ञान शिदोरी देण्याचे काम परिषद करत आहे. याचाच एक भाग म्हणून परिषदेने ११ एप्रिल, २०२१ ते १३ एप्रिल२०२१ या कालावधीमध्ये फुले – शाहू – आंबेडकर व्याख्यानमाला आयोजित केली.

पहिले व्याख्यान ख्यातनाम अभ्यासक डॉ. प्रदीप आगलावे यांनी समाज शास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर दिले. डॉ. प्रदीप आगलावे यांनी प्रस्तुत विषयाला न्याय देत असताना एखाद्या विषयातील अभ्यासकाला, संशोधकाला त्या विषयाचा शास्त्रज्ञ म्हणून नामोल्लेख केव्हा केला जातो याचे विश्लेषण त्यांनी त्यांच्या व्याख्यानाच्या सुरुवातीलाच केले. ते असे म्हणतात की, 'एखाद्या अभ्यासकाला विषयातील शास्त्रज्ञ म्हणून तेव्हाच मान्यता प्राप्त होते जेव्हा तो अभ्यासक आपले विचार, चिंतन मांडत असताना त्या विचारवंताने कोणत्या वैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा उपयोग केला आहे आणि कोणते सिद्धांत प्रतिपादित केलेले आहेत. त्याच बरोबर त्या सिद्धांताची समाज उपयोगिता किती आहे यावर त्या अभ्यासकाला त्या विषयाचा शास्त्रज्ञ म्हणून मान्यता प्राप्त होते.' मांडणीचा हाच धागा पकडत डॉ. प्रदीप आगलावे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्रज्ञ होते हे आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला. ते असे म्हणतात की,' बाबासाहेब आंबेडकर हे घटनातज्ञ होते, तत्त्वचिंतक, लेखक, अभ्यासक, संशोधक होते. सामाजिक शास्त्रांतर्गत येणाऱ्या सर्व ज्ञान शाखांचे त्यांना ज्ञान अवगत होते उदा. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास वकायदा इत्यादी. या विषयांचा अभ्यास करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैज्ञानिक अभ्यास पद्धती वापर केला आहे. यामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती व तार्किक संशोधन पद्धतींचा उल्लेख करता येईल. आगलावे सरांनी ऐतिहासिक संशोधन पद्धती चे महत्त्व पटवून देत असताना किंवा ऐतिहासिक संशोधन पद्धती म्हणजे नेमके काय हे सांगत असताना त्यांनी पी. व्ही. यंग यांच्या ऐतिहासिक संशोधन पद्धतीच्या व्याख्येचा अर्थ सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये, अभ्यासामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती कशी दिसून येते हे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी विकासाच्या मागील नियमांचा शोध घेऊन समाजातील समस्यांचा अभ्यास करून त्या समस्ये पाठीमागील नियमांना शोधू घेऊन त्यावरील उपाय योजना स्पष्ट केलेले आहेत. ऐतिहासिक अभ्यास पद्धतीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जाती व्यवस्था अस्पृश्यता, शूद्र समाज यांचा अभ्यास केला असे प्रतिपादन आगलावे सरांनी केले.

भारतातील अनेक समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजाचा अभ्यास करत असताना प्राच्यविद्या दृष्टिकोनाचा वापर केला. प्राच्यविद्या दृष्टिकोनाच्या माध्यमातून भारतीय समाज, भारतीय समाजातील संकल्पना, समस्या या समजावून घेण्यावर भर दिला. यामध्ये महान समाजशास्त्रज्ञ डॉ. जी. एस. घुर्ये, आर. के. मुखर्जी, के.एम. कपाडिया, इरावती कर्वे, लुईस ड्यूमों इत्यादी अभ्यासकांनी प्राच्यविद्या दृष्टिकोनाचा अवलंब केला म्हणून त्यांना समाजशास्त्रज्ञ म्हणून मान्यता प्राप्त झाली. प्रदीप आगलावे हाच धागा पकडून ते असे म्हणतात की 'डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी या विचारवंतांच्या योगदानापूर्वी म्हणजे १९१३ ते १९१६ या कालावधीमध्ये भारतातील जातीचाअभ्यास करून जाती उत्पत्तीचा सिद्धांत प्रतिपादित केलाएवढेच नव्हे तर ९ मे १९१६ ला डॉ. गोल्डनवायझर यांनी मानवशास्त्र या विषयासंदर्भात एक चर्चासत्र आयोजित केले होते त्या चर्चासत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'भारतातील जातिव्यवस्थेच्या उत्पत्ती व जातीचे मेकॅनिझम'या संदर्भात आपला शोधनिबंध सादर केला. हे संशोधन प्राच्यविद्या दृष्टिकोनावर आधारित होते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाजशास्त्रज्ञ म्हणून मान्यता का दिली जात नाही?' हा प्रश्न उपस्थित होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अभ्यास पद्धतींचा वापर करू आपले विचार मांडत होते हे पटवून देण्यासाठी डॉ. प्रदीप आगलावे एक उदाहरण देतात ते उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जातीचा उत्पत्तीचा सिद्धांत. ते म्हणतात की 'जाती उत्पत्ती विषयक अनेक मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांनी आपले विचार प्रतिपादित केले होते परंतु ते विचार सर्वंकष असे नव्हते. जातीच्या उत्पत्तीचे खरं कारण स्पष्ट करणारे नव्हते. या अभ्यासकांमध्ये रीसले, एस.व्ही. केतकर, मदन आणि मुजुमदार या विचारवंतांच्या विचारांचा त्यांनी परामर्श घेतलेला होता. जाती उत्पत्ती संदर्भात जे जे ऐतिहासिक संदर्भ उपलब्ध होते, देश-विदेशातील विचारवंतांचे सिद्धांत उपलब्ध होते या सर्वांचा अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत तयार झाले होते की, या सर्व अभ्यासकांनी जाती उत्पत्तीचा एकाकी विचार मांडलेला होता.

प्रा. आगलावे म्हणाले की, जाती उत्पत्ती संदर्भातले इतर अभ्यासकांचे विचार हे वरवरचे होते कारण या विचारवंतांनी जाती उत्पत्तीच्या मेकॅनिझम वर भरच दिलेला नव्हता परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती उत्पत्तीच्या मेकॅनिझमवर भर दिलेला दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती उत्पत्तीचे विश्लेषण करून जाती उत्पत्तीचे संदर्भातील पुढील सिद्धांत प्रतिपादित केले, त्यामध्ये जाती- संरचनासिद्धांत, जाती-उत्पत्तीचा सिद्धांत,वर्ग-जात सिद्धांत, अस्पृश्यतेचा सिद्धांत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील स्त्री-विषमतेची कारणमीमांसा स्पष्ट करून त्यावरील उपाययोजना सांगितलेल्याआहेत.हा अभ्यास करत असताना वैज्ञानिक अभ्यास पद्धतीच्या आधारावरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री-पुरुष विषमतेची चिकित्सा केलेली आहे. डॉ. आंबेडकरांनी भारतातील हिंदू धर्माची चिकित्सा करून हिंदू धर्म हा विषमता पोषणास कसे संरक्षण देतो आहे हे विश्लेषित करून बौद्ध धर्म आणि हिंदू धर्म यांचा त्यांनी तुलनात्मक अभ्यास केलेला दिसून येतो.

ते पुढे असे म्हणाले की, भारतातील अस्पृश्य जातींची निर्मिती कशी निर्माण झाली हे त्यांनी त्यांच्या अस्पृश्य पुर्वी कोण होते? या पुस्तकाच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाज याबाबतचे जे विचार प्रतिपादित केले होते त्यामध्ये जातीची उत्पत्ती, अस्पृश्य पूर्वी कोण होते, हिंदू धर्माची चिकित्सा, हिंदू धर्म आणि बौद्ध धर्माची तुलना तसेच भारतातील स्त्री-पुरुष विषमता या सर्व विषयावरील बाबासाहेबांचे विचार हे वैज्ञानिक अभ्यास पद्धतीवर आधारलेले होते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाजशास्त्रज्ञ म्हंटले गेले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैज्ञानिक अभ्यास पद्धतीच्या आधारावरच भारतीय समाजाचे विश्लेषण केलेले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय कोळेकर यांनी केले तर आभार डॉ. नवनाथ शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले. तांत्रिकसाह्य डॉ. प्रशांत सोनवणे यांनी केले.

या व्याख्यानाला परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश वाघमारे, डॉ. स्मिता अवचार यांच्यासह समाजशास्त्राचे अभ्यासक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

■■■

अहवाल लेखन

डॉ. अर्जुन जाधव
समाजशास्त्र विभाग प्रमुख
डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी, कोल्हापूर.

फुले–शाहू–आंबेडकर व्याख्यानमाला

दि. १२ एप्रिल २०२१ वेळ : सकाळी ११.०० वा.

विषय : महात्मा फुले यांचे राष्ट्रविकासातील योगदान

व्याख्याते

प्रा.डॉ. जगन कराडे

सचिव, अखिल भारतीय समाजशास्त्र परिषद,

नवी दिल्ली. तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महात्मा फुले यांनी सामाजिक परिवर्तनासाठी केवळ वैचारिक योगदान दिले नाही तर कृतिशील कार्यक्रमही दिला, त्यामुळेच भारतात आधुनिक युगाची सुरुवात झाली. महात्मा फुले यांचे सामाजिक परिवर्तनाचे विचार स्वीकारल्याशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही. म्हणूनच त्यांचे विचार राष्ट्रविकासात महत्त्वाचे योगदान देणारे आहेत असे प्रतिपादन फुले विचारांचे अभ्यासक तथा अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. जगन कराडे यांनी केले. मराठी समाजशास्त्र परिषदेच्यावतीने आयोजित दृकश्राव्यमाध्यम प्रणालीद्वारे फुले शाहू आंबेडकर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना ते महात्मा फुले यांचे राष्ट्रविकासातील योगदान या विषयावर बोलत होते.

प्रास्ताविकात मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे म्हणाले की, महापुरुषांच्या विचार व कार्याचा प्रसार व प्रचार करण्याचं महत्त्वाचं कार्य मराठी समाजशास्त्र परिषद करत आहे. समाजाला प्रगल्भ व सशक्त बनविण्यासाठी फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांची नितांत गरज आहे. त्यांचा सामाजिक प्रबोधनाचा विचार अधिकाधिक लोकांपर्यंत गेला पाहिजे.हा विचार माणसा माणसाला जोडणारा विचार आहे त्यासाठीच ह्या व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. यावेळी त्यांनी म.स.प. तर्फे राबविलेल्या विविध उपक्रमाचा आढावा घेतला.

यावेळी डॉ. कराडे यांनी आपल्या व्याख्यानात महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचा सविस्तर उहापोह केला आहे. ते म्हणाले, महात्मा फुले यांच्या जन्मतारखेबाबत संभ्रम होता. महात्मा फुले यांचे सहकारी असलेले नारोबाजी पानसरे पाटील यांनी त्यांच्यावर 'महात्मा फुले यांचे अमर जीवन' नावाचे पुस्तक लिहिले होते. ज्या पुस्तकात त्यांनी महात्मा फुले यांची जन्मतारीख ११ एप्रिल १८२७ अशी नोंदविलेली होती. महाराष्ट्र शासनाने ही तारीख २००६ साली ग्राह्य धरली व तेव्हापासूनच महात्मा फुले यांची जयंती ११ एप्रिल रोजी संपूर्ण देशभर साजरी केली जाऊ लागली. एकोणिसावे शतक हे भारतीय समाजशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.कारण याच शतकात १८४८ साली कार्ल मार्क्स यांनी 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' प्रसिद्ध केला आणि जगभरातील कामगारांना एकत्र येण्यासाठी आवाहन केले. याच कालखंडात महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा काढली. म्हणजेच फुले यांनी सामाजिक परिवर्तनासाठी केवळ वैचारिक योगदान दिले नाही तर कृतिशील कार्यक्रमही दिला.

डॉ. कराडे पुढे म्हणाले, भारताचा एक राष्ट्र म्हणून ज्यावेळेस मी विचार करतो तेव्हा भारताला अजूनही राष्ट्र म्हणावे का या संदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण होते. कारण राष्ट्रासाठी जे घटक लागतात ते आपल्याकडे आहेत का? तर याविषयी नकारात्मक उत्तर येते. भारतीय समाज हा जाती, धर्म अशा अनेक भेदांमध्ये

विभागलेला आहे. हे भेद संपुष्टात आल्याशिवाय राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊ शकत नाही. राष्ट्र उदयास येण्यासाठी समता व बंधुता ही मूल्ये महत्त्वाची असतात. भारताचा एक भूप्रदेश म्हणून जरी आपण विचार केला. तरी या भूप्रदेशातील लोकांमध्ये कोणती जागृती करायची की ज्यामुळे ते राष्ट्रीय विकासात योगदान देऊ शकतील. या अनुषंगाने महात्मा फुले यांनी केलेले कार्य खूप महत्त्वाचे आहे.

आपल्या सविस्तर विवेचनात डॉ. कराडे म्हणाले,आपल्याला प्रामुख्याने दोन कालखंडाचा विचार करावा लागतो. पहिला कालखंड आहे १८४८ ते १८६५ दरम्यानचा. या कालखंडात महात्मा फुले यांचे कार्य स्त्री दास्य विमोचन, शिक्षण आणि दलित उद्धार अशा त्रिसूत्री भोवती गुंफलेले होते. या कालखंडात बाळशास्त्री जांभेकरांचे प्रकाशित होणारे 'दर्पण' या वृत्तपत्रात महात्मा फुले यांनी स्त्री-शिक्षण, बालविवाह, केशवपन अशा विविध मुद्यांवर पत्रे, टिपणी, लेख व छोट्या पुस्तिका लिहिल्या. या वैचारिक लेखातून त्यांनी समाजापर्यंत हा संदेश दिला की, कोणतीही सामाजिक विषमता ही निसर्गाने निर्माण केलेली नाही तर मानवाने निर्माण केलेली आहे. दुसरा कालखंड होता १८६५ ते १८९० या काळात महात्मा फुले यांनी शेती व धर्मचिकित्सा या अनुषंगाने कार्य केलं, यासोबतच शेतकरी, अनुसूचित जाती आदिवासी, कामगार वर्ग यांचं संघटन करण्यात महात्मा फुले यांचे योगदान महत्त्वाचे आहे. महात्मा फुले यांच्या कालखंडात अनेक समाजसुधारक होते. तेही वेगवेगळ्या स्वरूपाचे काम करत होते. परंतु महात्मा फुले यांचे योगदान हे सगळ्यात अग्रभागी होते. अलीकडच्या काळात गेल ओम्वेट यांनी लिहिलेल्या 'वासाहतिक काळातील सांस्कृतिक बंड' या ग्रंथात त्या स्पष्टपणे नमूद करतात की, उत्तरेकडे समतेचा विचार त्या काळात उदयास आलेला नव्हता मात्र दक्षिणेकडे विशेषतः दक्षिण भागांमध्ये महाराष्ट्र राज्य असल्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी अधिक प्रमाणात झाल्या आणि त्या अनुषंगाने इतर अनेक राज्यही विकसित होत गेले म्हणून समतेचा विचार हा दक्षिणेकडे अधिक सरकलेला दिसतो. त्या काळातील समाजसुधारकांची नोंद घेतली तर महात्मा फुले यांचे नाव आघाडीवर होते. भारतातील १८ ते १९ वे शतक या काळात जो काही परिणाम झाला तो महात्मा फुले यांच्या विचारांमुळे झालेला आपल्याला दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांना आपले गुरू मानले होते. भारतात दोनच बॅरिस्टर होते महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन व्यक्तींपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना आपले गुरू मानले यावरून हे लक्षात येते की, महात्मा फुले यांचे त्या काळातील विचार किती प्रगल्भ व दूरदृष्टीचे होते. त्याकाळातील इतिहासाचे पुनर्लेखन ज्यांनी-ज्यांनी केलं त्यांनी हे स्पष्ट पणे नमूद केलेले आहे की, त्या काळातील समाजव्यवस्था ही जुलमी, अन्याय करणारी व शोषक अशा स्वरूपाची होती. समाजामध्ये धर्म, चातुर्वर्ण्य, कर्मकांड, शेती, शेतकरी व लिंगभेद यावर आधारलेली अशी भेदभावाची व्यवस्था होती. जिला नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांचे अतिशय महत्त्वाचे योगदान राहिलेले आहे.

पी. ए. इनामदार वर्सेस गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र अँड आदर्स २००५ साली सर्वोच्च न्यायालयाने एक निकाल दिला आहे. त्या निकालामध्ये सात न्यायमूर्तींनी १४१ पानाच्या अहवालात पहिल्या पानावर हे मान्य केलेले आहे की, भारतीय समाज हा अनेक जातींमध्ये विभागला गेला आहे. भारतात एकूण ६४४६ जाती आहेत. या जातींमध्ये परत अनेक उपजाती आहेत. या भेदभावावर आधारित व्यवस्थेमध्ये श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना होती. अशा या जाती व वर्णभेदभावासंदर्भात प्रश्न विचारणारे महात्मा फुले हे पहिले समाजसुधारक होते. म्हणून त्याकाळातील इतिहासाचे पुनर्लेखन करताना महात्मा फुले यांच्या विचारांचा त्याकाळातील समाजव्यवस्थेचा, अर्थव्यवस्थेचा, नैतिकतेचा व मूल्यव्यवस्थेचा देखील पुनर्लेखनाच्या अनुषंगाने विचार करणे महत्त्वाचे आहे. जी समाजव्यवस्था व धर्मव्यवस्था व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देत नसेल तर अशा धर्मव्यवस्थेला न स्वीकारण्याचा अधिकार देखील माणसाला असला पाहिजे असे महात्मा फुले यांचे मत होते.

स्त्रीवादी दृष्टीकोन:

महात्मा फुले यांनी १८४८ ते १८५२ या कालखंडामध्ये सबंध स्त्रीवर्ग डोळ्यासमोर ठेवून महत्त्वाचं कार्य केलेलं होतं. ज्यावेळेस युरोपियन देशांमध्ये स्त्रीला मतदानाचा हक्क द्यायचा की नाही यावर चर्चा व गदारोळ सुरू होता. त्या वेळेस आपल्या भारतामध्ये स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा हक्क देखील नाकारलेला होता. महात्मा फुले यांच्या मते, स्त्री ही कोणत्याही जाती वा वर्गातली असो तिला भेदभावाला सामोरे जावे लागत होते. महात्मा फुले यांनी स्त्रियांना आत्मसन्मानाने जगण्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी काढलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेमध्ये ज्या नऊ मुली शिक्षण घेत होत्या त्यापैकी सहा या ब्राह्मण समुदायाच्या होत्या. यावरून आपल्याला हे लक्षात येतं की महात्मा फुले यांचा ब्राह्मण समुदायाला विरोध नव्हता तर 'ब्राह्मण्यवादाला' विरोध होता. त्या काळातील स्त्री-पुरुष भेदभावाची परिस्थिती जाणून घ्यायचे असेल तर ताराबाई शिंदे यांनी लिहिलेली छोटी पुस्तिका 'स्त्री-पुरुष तुलना' आणि महात्मा फुले यांच्या सोबत ब्राह्मणेत्तर चळवळीमध्ये काम करणारे केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांनी लिहिलेले पुस्तक 'मर्दांनो नाके कापून घ्या' या दोन्ही पुस्तकांमध्ये त्या काळातील स्त्रियांचे प्रश्न व त्यांचे केले जाणारे शोषण याचे सविस्तर विश्लेषण केलेले आहे. फुल्यांच्या काळामध्ये स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते तसेच सामाजिक भेदभावाची वागणूकही त्यांना दिली जात होती.

विशेषत्वाने विधवा स्त्रियांचे केशवपन करण्याची जी पद्धत होती तिचा जर आपण विचार केला तर ही पद्धत ब्राह्मण समाजामध्ये अधिक प्रमाणात होती. महात्मा फुले यांना देखील अनेक वेळा भेदभावाची वागणूक मिळाली होती. त्यांच्या ब्राह्मण मित्राच्या लग्नात मिळालेली वागणूक ही त्यापैकीच एक उदाहरण होय. समाजामध्ये हे भेदभावाचे वातावरण जरी असलं तरीही महात्मा फुले यांनी स्वतःच्या अंगी, विचारांमध्ये व कृतींमध्ये हा भेदभाव कधीच येऊ दिला नाही. समाजातील हा भेदभाव दूर करण्यासाठी त्यांनी जाती धर्मापलीकडे जाऊन काम केले. आपल्या सांस्कृतिक व्यवस्थेमध्ये असलेली केशवपनासारखी जाचक रूढी परंपरा नष्ट करण्यासाठी त्यांनी तळेगाव ढमढेरे या गावातील नाव्ही समाजाला संप घडवून आणण्यासाठी तयार केलं आणि ही त्या काळातील एक फार मोठी घटना होय. स्त्री पुरुष हा भेद निसर्गाने केलेला नसून मानवाने केलेला आहे. म्हणून महात्मा फुले यांचा स्त्रीवादी दृष्टिकोन समतेची बाजू मांडणारा आहे. हा विचार मांडण्यासाठी फार मोठे मन लागते जे महात्मा फुले यांच्याकडे होते. १९ व्या शतकामध्ये जे जे समाजसुधारक ब्रिटिश शिक्षण व ब्रिटिशांच्या सहवासात आले. त्यांना ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली की, आपल्या भारतीय समाजव्यवस्थेमध्ये असलेली भेदभावाची व्यवस्था ही अतिशय चुकीची आहे. महिला सुधार कार्यक्रमांतर्गत त्या काळातील अनेक समाजसुधारक सावित्रीबाई, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी यांनी स्त्री शिक्षणाबद्दल व स्त्रियांच्या हक्काबद्दल जे काही कार्य केलं ते कार्य म्हणजे महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचं काम होतं. म्हणून १९ व २० व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्री सुधारणेसाठी जे काही प्रयत्न झाले त्यात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे योगदान उल्लेखनीय असे राहिलेले आहे.

शैक्षणिक योगदान :

आज अनेक समाजसुधारक असतील, अर्थतज्ञ असतील किंवा नियोजन मंडळाचे सल्लागार असतील या सर्वांनी हे मान्य केलेले आहे की, शिक्षण हे परिवर्तनाचे एकमेव साधन आहे. फुले यांच्या कालखंडामध्ये त्यांच्या समकालीन असलेले जे सुधारक होते त्यांनी केवळ आपल्या कुटुंबातील आई व बहीण यांना कोणत्या प्रश्नांना सामोरे जावे लागते, एवढेच पाहून त्या दिशेने ती चळवळ नेण्याचा प्रयत्न केलेला होता. मात्र फुल्यांनी त्या पलीकडे जाऊन समाज सुधारण्याचा विचार केला तो अतिशय क्रांतिकारक होता. शिक्षण घेणे हा प्रत्येक मानवाचा हक्क आहे आणि म्हणून प्रत्येकाला शिक्षण घेता आले पाहिजे असा विचार महात्मा फुले यांनी मांडला.

१८८२ साली महात्मा फुले पुणे महानगरपालिकेचे सभासद होते आणि त्या काळातच हंटर कमिशन आले. या हंटर कमिशनला महात्मा फुले ज्या पद्धतीने सामोरे गेले ते वाखाणण्यासारखे होते. ब्रिटिशांनी यापूर्वी शिक्षणाच्या झिरपण्याचा सिद्धांत (फिल्टर डाऊन) मांडलेला होता. त्याला महात्मा फुले यांनी विरोध केलेला होता. युरोपियन राष्ट्रांमध्ये वरच्या वर्गातील उच्चशिक्षित व्यक्तींकडून चर्चच्या माध्यमातून ते शिक्षण खालच्या वर्गापर्यंत किमान त्या लोकांना धार्मिक शिक्षण घेता यावे म्हणून का होईना शिक्षण दिले जात होतं, त्यामुळे आपोआपच वरच्या वर्गातून खालच्या वर्गापर्यंत शिक्षण दिले जाण्याची फिल्टर डाऊन थेअरी ब्रिटिश समाजव्यवस्थेमध्ये यशस्वी झालेली होती. परंतु भारतामध्ये अनेक सामाजिक भेदभाव होते आणि एका विशिष्ट वर्गाकडे शिक्षण व्यवस्थेचे सर्व हक्क एकवटलेले असल्यामुळे शिक्षण खालच्या स्तरापर्यंत जाणे शक्य नव्हते. म्हणून महात्मा फुलेंनी या थेअरीला विरोध केला होता. शिक्षणाची व्याख्या करताना ते म्हणत असत, विद्येविना मती गेली, मती विना नीती गेली, नीती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ता विना शूद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले. महात्मा फुले यांनी विद्येची आणि अविद्येची केलेली व्याख्या समजून घेताना मला वारंवार हा प्रश्न पडतो की, आज विद्यापीठाद्वारे व महाविद्यालयांच्याद्वारे जे शिक्षण दिले जाते ते खरंच योग्य आहे का? कारण आज बहुतांश व्यक्ती शिक्षित होत आहेत, परंतु ते शिक्षित असूनही अज्ञानी आहेत.फुल्यांना अभिप्रेत असलेली विद्या आज आपण घेत आहोत काय ? आजच्या शिक्षण व्यवस्थेमधून मानवी मूल्य नष्ट होत आहेत. फुलेंना अभिप्रेत असलेली शिक्षण व्यवस्था सर्व व्यक्तींसाठी समावेशक होती. म्हणूनच त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. आज अनेक मोठ्या पदांवर कार्यरत असलेल्या स्त्रियांना महात्मा फुले यांचे योगदान माहीत नाही ही आपल्यासाठी अत्यंत खेदाची बाब आहे. १८२६ मध्ये धारवाड या ठिकाणी एका अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांला शिक्षण नाकारलं होतं. या घटनेच्या अनुषंगाने महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार हे जातीपातीच्या सीमारेषा ओलांडून पुढे जाणारे होते, असे आपणास म्हणता येईल.

महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार समजून घेताना असे निदर्शनास येते की महात्मा फुले यांचा भर पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यावहारिक ज्ञानावर जास्त होता. मोडी लिपीचे शिक्षण, कृषी विषयक शिक्षण, निसर्ग शिक्षण, नीतीमूल्यांचे शिक्षण, आरोग्य विषयक शिक्षण आदींचा अंतर्भाव प्राथमिक शिक्षणात केला जावा असे महात्मा फुले यांचे मत होते. ब्रिटीश काळात शिक्षण विषयक जे मेकॉले पासून ते चार्ल्स वुड पर्यंत आयोग आले, त्याची इतिहासामध्ये नोंद आहे. चार्ल्स वुड यांच्या खलित्याला तर शिक्षणाची महान सनद असे म्हटलेले आहे. आजच्या आपल्या राष्ट्र निर्माणाच्या संदर्भात महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार अतिशय महत्त्वाचे आहेत. कारण आज जरी आपण सर्व जाती व धर्माच्या व्यक्तींना शिक्षण घेण्याचा हक्क देत असलो किंवा कागदोपत्री तसे निदर्शनास येत जरी असले. तरीही आज अनेक जातीवर्गातल्या व्यक्तींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे

काम सुद्धा सुरू आहे. म्हणून खऱ्याअर्थाने राष्ट्रनिर्माण करायचे असेल तर महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आज अंमलात येणे गरजेचे आहे. शिक्षणाचे ध्येय व तत्त्वे ठरविण्याच्या अनुषंगाने आतापर्यंत आपल्या देशांमध्ये अनेक शिक्षण आयोग आलेले आहेत. परंतु या आयोगांमध्ये शिक्षणविषयक ध्येय, तत्त्व व मूल्यांचा अभाव असलेला आपल्याला दिसतो. जो अभाव फुलांच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये नव्हता. म्हणून जर आपल्याला आज पुढे जायचे असेल तर फुल्यांनी घालून दिलेले शिक्षणविषयक ध्येय व मूल्य यांचा अवलंब करावा लागेल.

डॉ. कराडे म्हणतात, माझ्या मनात गेल्या काही आठवड्यांपासून हा विचार येतोय की, शिक्षण व्यवस्था हे समाजपरिवर्तनाचे एकमेव साधन आहे, असे आपण म्हणतो आणि म्हणूनच आपण त्यावर वेगवेगळे आयोग नेमतो. अशाच पद्धतीचे आयोग आपल्या राजकीय व्यवस्थेवर सुद्धा नेमण्याची गरज आहे. कारण आजच्या आपल्या राजकीय व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती ह्या आपली ध्येय व मूल्य यांचा विचार न करता एका विशिष्ट समुदायासाठी काम करत आहेत. ही बाब आपल्या राष्ट्रीय विकासामध्ये मोठा अडसर ठरत आहे. म्हणून फुल्यांचे विचार घेऊन नवीन राजकीय आयोग नेमावा का? असा विचार येतो.

सत्यशोधक समाज :

सत्यशोधक समाजाद्वारे एका नवीन समाजव्यवस्थेची निर्मिती करणे हा त्या काळातील मोठी घटना होती. त्या कालखंडात समाजावर धर्माचा प्रचंड प्रभाव होता. अशा काळात धर्माची चिकित्सा करणे, धार्मिक बाबींचे टिकात्मक विश्लेषण करणे आणि धर्मामुळे निर्माण झालेल्या मानवी असमानतेला विरोध करणे हे एक अतिशय कठीण कार्य होते. जे फूले यांनी केले. समाजात असलेले मानवा-मानवातील जातीय व धार्मिक भेद संपवून सर्वजण समतेने एकत्र नांदावेत हाच सत्यशोधक समाजबांधणी मागचा महात्मा फुले यांचा विचार होता. डॉ. घनश्याम शहा यांनी आपल्या Social Movements in India या ग्रंथामध्ये दोन चळवळींचा उल्लेख केलेला आहे. एक धार्मिक सुधारणावादी चळवळ आणि दुसरी पर्याय निर्माण करणारी चळवळ. सत्यशोधक समाज ही देखील प्रस्थापित समाजव्यवस्थेला पर्याय म्हणून निर्माण झालेली चळवळ होय. महात्मा फुले यांनी सुरू केलेली वैचारिक चळवळ आजच्या समाजव्यवस्थेपर्यंत पोहोचलेली आपल्याला दिसते. आज अनेक विवाह सत्यशोधक समाज पद्धतीने होताना दिसतात. महात्मा फुले यांनी त्या काळात जे काही विचार मांडले ते विचार नंतरच्या काळामध्ये शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात रुजविण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांनी महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचा अंगिकार करणाऱ्या 'विचारे' नावाच्या व्यक्तीच्या नावाने कोल्हापूर मध्ये एका ठिकाणाला विचारेमळा हे नाव दिलेले आहे. भारतात पर्याय निर्माण करणाऱ्या चळवळीचा पाया महात्मा फुले यांनी घातलेला आपल्याला दिसतो आणि या चळवळीमुळेच सामाजिक न्याय असतील, आंतरजातीय विवाह असतील या सगळ्या बाबी समाजामध्ये रुजायला लागल्या होत्या.

शेती विषयक विचार :

महात्मा फुले यांनी शेती विषयक महत्त्वाचे विचार मांडले होते. वर्तमानात दिल्लीच्या सीमेवर जी शेतकऱ्यांची चळवळ सुरू आहे त्याकडे बघितलं तर मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात. एकीकडे आपण म्हणतो की भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. मात्र दुसरीकडे शेती करणाऱ्या शेतकऱ्याला समाजामध्ये मानाचे स्थान मिळत नाही. दिल्लीच्या सीमेवर शेतकरी चळवळीला जवळपास दीडशे दिवस उलटून गेले आहेत. परंतु अजूनही त्यांना न्याय मिळालेला नाही हा किती विरोधाभास म्हणावा लागेल ? भारत हा कृषिप्रधान देश आहे तर मग शेतीचे आपल्या अर्थव्यवस्थेमधील योगदान गृहीत धरून आपल्या राजकीय व्यक्तींनी व समाजव्यवस्थेने कृषी अर्थव्यवस्थेकडे पहिल्यांदा पाहिले पाहिजे. आपल्या उद्योगधंद्यांचे सेन्सेक्स वर खाली होत असतात. त्यावर आपली अर्थव्यवस्था आधारलेली आहे. मग फुले यांच्या अनुषंगाने विचार करता आपल्या कृषी अर्थव्यवस्थेचा यामध्ये समावेश होतो का? या अनुषंगाने प्रश्नचिन्ह निर्माण होतात.

म. फुले हे शेतकऱ्यांविषयी किती संवेदनशील होते हे सांगिताना डॉ. कराडे म्हणाले. १८८८ साली ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या आगमना प्रित्यर्थ हरि रावजी चिपळूणकर यांनी मेजवानी आयोजित केली होती. त्या मेजवानीस महात्मा फुले शेतकऱ्यांचा वेष परिधान करून आलेले असता, त्यांना प्रवेशद्वारावरच अडविण्यात आलेलं होतं. मग चिपळूणकरांना स्वतः येऊन महात्मा फुले यांना आत घेऊन जावे लागले. याचाच अर्थ ब्रिटिश काळातही शेतकऱ्यांना अडविण्यात आलेलं होतं आणि आजही आपल्या समाजव्यवस्थेत शेतकऱ्यांची अडवणूक होताना दिसते. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती व प्रश्न याविषयीचे सविस्तर विवेचन 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथामध्ये केलेले आहे. महात्मा फुले यांचा शेठजी आणि भटजी या व्यवस्थेला विरोध होता. महात्मा फुले स्पष्टपणे म्हणत असत की, माझा विरोध हा ब्राह्मणांना नसून ब्राह्मण्यवादाला आहे. या अनुषंगानेच त्यांनी ब्राह्मणेत्तर चळवळ पुढे नेलेली दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या वेळेस सुद्धा केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर यांनी या सत्याग्रह मध्ये ब्राह्मणांना सोबत घेऊ नये असे म्हटले असताना, बाबासाहेब त्यांना असे म्हणाले होते की, माझा विरोध ब्राह्मणांना नसून ब्राह्मण्यवादाला आहे. ब्राह्मण्यवाद म्हणजे अशी मानसिकता ज्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठत्व व भेदभाव आहे. म.फुल्यांचे साहित्यविषयक योगदान सांगताना ते म्हणाले की,

साहित्याच्या अनुषंगाने महात्मा फुले यांनी लिहिलेले 'शेतकऱ्यांचा आसूड' आणि 'ब्राम्हणांचे कसब' हे दोन्ही ग्रंथ शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनाचे विवेचन करणारे आहेत. शेतकरी त्या काळात कशा पद्धतीने अंधश्रद्धेमध्ये अडकलेला होता. त्यांचे धर्माच्या नावावर कशा पद्धतीने शोषण केले जात होते. याचे वर्णन या दोन्ही ग्रंथांमध्ये केलेले आपल्याला पाहायला मिळते. शेतकऱ्यांना या अंधश्रद्धेच्या व्यवस्थेतून बाहेर काढण्यासाठीच कार्य महात्मा फुले यांनी केलेले आहे. त्या काळात चालणाऱ्या पत्रिका जसे की, 'दर्पण' 'दिनबंधू' आणि 'प्रभाकर' यामधून वेळोवेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चर्चा केली होती. शेतकऱ्यांसोबतच त्या काळात कामगारांची ही अवहेलना मोठ्या प्रमाणात होत होती. म्हणून कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी नारायण मेघाजी लोखंडे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांची बांधणीही केली. लोखंडे यांनी पहिली कामगार चळवळ उभारली आणि ही चळवळ उभारण्यामागे महात्मा फुले यांचाच विचार होता असे म्हणावे लागेल.

त्या काळातले अनेक समाजसुधारक जसे की, विठ्ठल रामजी शिंदे असतील, महात्मा फुले असतील आणि साहित्यिक चळवळ असेल. या माध्यमातून आपल्या भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये, समाजव्यवस्थेमध्ये, शिक्षण व्यवस्थेमध्ये आणि अर्थव्यवस्थेमध्ये कोणत्या प्रकारचे परिवर्तन होणे अपेक्षित आहे, याविषयीचे महात्मा फुले यांनी भरपूर लेखन केले होते. ही सगळीच चळवळ ही ब्राह्मणेत्तरांसाठी होती. फुल्यांचे हे विचार समाजसुधारणेच्या संदर्भात क्रांतिकारक होते. परंतु समाजसुधारणेच्या अनुषंगाने कृतिशील असे मोठे पाऊल उचलण्याचे धाडस महात्मा फुले यांनी केलेले असल्यामुळे त्यांना आपल्याला 'समाजक्रांतीकारक' असं म्हणावं लागेल.आजच्या व्यवस्थेमध्ये महात्मा फुले यांना महात्मा ही उपाधी लावावी की नाही याविषयी काहीजण असे म्हणतात की 'महात्मा' या शब्दाचा संबंध 'आत्म्याशी' आहे म्हणून ती उपाधी लावू नये. परंतु महात्मा फुले यांनी केलेल्या क्रांतिकारक अशा सामाजिक कार्याचा गौरव म्हणून १८८८ मध्ये त्यांना ही उपाधी मुंबई येथील जाहीर सत्काराच्या कार्यक्रमामध्ये प्रदान केली होती. या कार्यक्रम प्रसंगी एक व्यक्ती समोर आली आणि तिने असे म्हटले की, हा व्यक्ती धर्मविरोधी वर्तन करतो अशा व्यक्तीला 'महात्मा' ही उपाधी दिली जाऊ नये. याप्रसंगी काशीबाई नावाची विधवा स्त्री समोर येते आणि ती असं म्हणते की, ज्या समाजव्यवस्थेने मला आत्महत्येसाठी प्रवृत्त केले होते, अशावेळी महात्मा फुले यांनी माझा जीव वाचवला. माझी सेवा सुश्रुषा केली आणि माझी प्रसूती झाल्यानंतर माझ्या मुलाला 'यशवंतला' दत्तक घेतले. एवढं मोठं कार्य फुले करू शकतात म्हणून जर कोणाला महात्मा ही उपाधी घेण्याचा अधिकार असेल तर तो केवळ फुले यांनाच आहे.

समारोप करताना डॉ. कराडे म्हणाले की, महात्मा फुले यांचे विचार आजही आपल्या समाजव्यवस्थेला उपयुक्त आहेत. आपण समाजशास्त्राचे अभ्यासक म्हणून महात्मा फुले यांचे विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपणास देखील धर्माची चिकित्सा करता आली पाहिजे. धर्माला व माणुसकीला काळीमा फासणारे अनेक सामाजिक प्रश्न आजही आपल्या समाजव्यवस्थेत आहेत. व्याख्यानमालेस मराठी समाजशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. वेदप्रकाश मलवाडे, कोषाध्यक्ष प्रा. बळीराम पवार आणि कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रा. डॉ. स्निग्धा कांबळे यांनी मानले. यावेळी व्याख्यानास श्रोतावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

हे व्याख्यान ऐकण्यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वेबसाईट व यूट्यूब चॅनलला भेट द्या व सबस्क्राईबकरा.

https://youtu.be/XUXDcSCD63s

■■■

अहवाल लेखन

डॉ. मंजूषा नळगीरकर
श्री. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
फुलंब्री ता. फुलंब्री, जि- औरंगाबाद.
मोबाईल: ९४ ०३ ७५ ६१ ५६

फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला, पुष्प तिसरे
दि. १३ एप्रिल २०२१

राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री उद्धाराचे कार्ये आणि आजचे वास्तव

प्राचार्या डॉ. मंजुषा पवार

फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना शाहू महाराजांच्या स्त्री विषयक कार्यांचा आढावा या विषयावर बोलताना प्राचार्या डॉ. मंजुषा पवार यांनी राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री उद्धाराचे कार्ये आणि आजचे वास्तव या विषयावर आपल्या विचारांची मांडणी केली.

महाराष्ट्राचं समाजकारण आणि राजकारण ज्या व्यक्तींच्या विचारांनी प्रभावित झालेले आहे त्या लोकांचे विचार पुन्हा एकदा लोकांसमोर आणणे, पुन्हा एकदा त्यांच्या विचारांची वास्तविकता ज्यामध्ये वर्तमानातले विचार निरसन या फुले, शाहू, आंबेडकर व्याख्यानमालेचा उद्देश आहे.

महाराष्ट्राला लाभलेल्या या पुरोगामी विचारवंतामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे एक वेगळेपण आहे. ते वेगळेपण म्हणजे असे की, ज्याला आपण राजा, शासक असे म्हणतो परंतु शोषित वर्गासाठी आपले आयुष्य पणाला लावणारा असा हा राजा महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतात एकमेव राजा होता आणि त्यांनी काय केले तर महात्मा ज्योतीबा फुले यांनी समता आणि समानतेचे बीज पेरलं, अज्ञान आणि गुलामगिरीच्या वेढ्यात शेकडो वर्षे पडलेल्या शूद्रातीशूद्रांनी आणि स्त्रियांना ज्ञानाचा आणि सत्याचा मार्ग दाखविला. सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून एक नवीन पर्यायी संस्कृती निर्माण केली व महात्मा फुल्यांची परंपरा महाराष्ट्रामध्ये खंडीत न होता ती छत्रपती शाहू महाराजांच्या

कार्यातून अबाधित राहिली, प्रवाहित होत राहिली. ही अत्यंत महत्त्वाची बाब आपल्या दृष्टीकोनातून असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या अनुषंगानेच आणखी एक बाब निर्माण झाली ती म्हणजे जे प्रश्न शाहू महाराजांच्या काळामध्ये होते त्या शाहू पूर्व काळामध्ये सुद्धा काही संवेदनशिल, बुद्धीवादी असे लोक होते, ज्यांनी समाजप्रबोधनाचे कार्येकेले, परंतु त्यांचे कार्य हे केवळ समाजाच्या वरच्या थराला स्पर्श करणारे होते आणि राजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे समाजातल्या सर्व स्तरातील व्यक्तींसाठी होते हे शाहू महाराजांच्या कार्याचे वेगळेपण असल्याचे स्पष्ट होते असे मला वाटते.शाहू महाराजांच्या कार्याचे जर थोडक्यात महत्त्व सांगायचे झाल्यास त्यांचे हे मानवमुक्तीचे कार्येहोते. ही मुक्ती कशापासून होती तर ती मुक्ती प्रस्थापीत सांस्कृतीक गुलामगीरी पासून, अज्ञानापासून, वर्णव्यवस्थेतूनची मुक्ती होती. राजर्षी शाहूंच्या या परिवर्तनवादी विचारांच्या व्यापक संकल्पनेने सामाजिक समतेची, एकसंघतेची उत्स्फूर्त जाणीव होते आणि या जाणीवेतूनच राजर्षी शाहूंनी स्त्री मुक्ततेचा ध्यास घेतलेला दिसतो. शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी केलेले कार्येजेव्हा आपण जागतिक स्त्री मुक्तीचा विचार करतो त्या वेळेला आपल्याला भारताच्या संदर्भामध्ये स्त्री उद्धारातूनच जावे लागते. म्हणजे भारतासारखा देश जिथे धर्माचा, परंपराचा पगडा प्रचंड आहे, स्त्री दास्य सनातन आहे, इथल्या राजापासून ते सर्वसामान्यापर्यंत पुरोहित वर्गापासून ते इतिहास लेखकांपर्यंत कोणीही लिंग-भावात्मक श्रेष्ठत्वातून मुक्त नाही. अशा देशामध्ये स्त्री उद्धार हे स्त्री मुक्तीचे महाद्वार ठरते. आपण जागतिक स्तरावर जे स्त्री मुक्तीचे जे काही चार स्तंभ पाहतो ज्यात उदारमतवादी, समाजवादी, जहाल स्त्रीवादी आणि मार्क्सवादी यामध्ये शाहू महाराजांच्या स्त्रीवादी दृष्टीकोन कशात बसतो तर मला असे वाटते की तो उदारमतवादी दृष्टीकोनामधले शाहू महाराजांचे कार्य आहे. आणि आपण भारताचा विचार करतो तेव्हा त्याची तीन कालखंड पाडावे लागतील. ते म्हणजे, स्त्री उद्धाराचा वा स्त्री मुक्तीचा कालखंड (जो पुरुष उद्धारकांनी, सुधारकांनी केलेल्या स्त्री दास्य विमोचनाचा पाहिला कालखंड), दुसरा कालखंड म्हणजे स्त्री चळवळीचा कालखंड, आणि तिसरा म्हणजे स्त्री स्वातंत्र्याचा कालखंड तर अशा प्रकारे शाहू महाराजांचे कार्य हे पहिल्या कालखंडामधले म्हणजे जे पुरूष उद्धारकांनी केलेल्या स्त्री दास्य विमोचनाच्या कालखंडामध्ये बसत.एकोणीसाव्या शतकामध्ये असा स्त्री उद्धार अनेक संवेदनशील लोकांनी केला. पण शाहू महाराजांना एक अधिष्ठान लाभलेले होत जे शिवछत्रपतींच्या सिंहासनाच ते अधिष्ठान होत. प्रजाहित रक्षणाच, अन्यायाच्या विरूद्ध पेटून उठण्याचे आणि त्यामुळे ही एक सर्व शोषित घटकांच्या उद्धाराचे कार्य हातामध्ये घेऊन शाहू महाराज या लढ्यामध्ये उतरले असल्याचे आपणास दिसते. आता स्त्रियांच्याकडे पहात असताना आपण महाराजांच्या लक्षात आले जे बहुजन वर्गाला शोषणातून मुक्त करू इच्छित आहे. त्या बहुजन वर्गाचा अर्धा भाग या स्त्रिया आहेत आणि या स्त्रिया आपल्याच घरातल्या पुरूषी वर्चस्वाखाली भरडल्या गेल्या आहेत. महाराष्ट्रामध्येच नव्हे तर सर्वत्र अशी एक उतरंड निर्माण झाली आहे. आपल्या देशातील जो अभिजन वर्ग होता तो अभिजन वर्ग इंग्रजांच्यापासून सुटका करून घेऊ इच्छित होता. इंग्रजांच्या गुलामगिरीतून सुटका करून घेऊ इच्छित होता, पण आपल्याच समाजातला बहुजन वर्गाला आपल्यापेक्षा खालच्या वर्गातल्या लोकांना मात्र तो वर्ण वर्चस्ववादातून मुक्त करू इच्छित नव्हता. त्यांना मात्र गुलामगिरीत ठेवत होता. म्हणजे अशी एक उतरंड होती आणि ही उतरंड जर खंडीत करायची असेल या उतरंडीला अथवा शृखंलेला खंडीत करावयाचे असेल आणि इथे यामध्ये समानता आणायची असेल तर काय करावे लागेल तर सर्वप्रथम स्त्री वर्गाला शिक्षित करावं लागेल.

राजर्षी शाहू महाराजांना हे लक्षात आले आणि मग राज्यावर आल्या-आल्या स्त्री शिक्षण हाच त्यांच्या सुधारणावादी कारभाराचा एक भाग झाला. राज्यावर आल्यानंतर त्यांनी स्त्री शिक्षणाच व्रत तर घेतलच व त्यात त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आणि तेव्हा इंग्रज सरकार या मुंबई इलाक्यासाठी म्हणजे त्या वेळचा मुंबई, गुजरात, सिंघ, कर्नाटक एवढ्या मोठ्या इलाक्यासाठी एक लाख रूपये सुद्धा खर्च करीत नव्हते. त्यावेळेला राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या स्वत:च्या खजिन्यातून प्राथमिक शिक्षणासाठी एक लाख रूपये फक्त कोल्हापूर संस्थानसाठी खर्च करीत होते. ज्याच्यामध्ये स्त्री शिक्षण अंतर्भूत होते. आता या स्त्री शिक्षणासाठी महाराज जो खर्च करत होते आणि ज्या प्रकारे त्यांनी स्वत:ला वाहून घेतले होते त्याच्यावरून त्यांची फलश्रृती काय झाली तर शाहू महारजांनी स्त्री शिक्षणावर कार्य करायला सुरूवात केल्यावर १९१७ साली कोल्हापूर संस्थानामध्ये २४ शाळा होत्या त्या १९२१ ला ४०० शाळा झाल्या. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मुलं-मुली शिकायला लागले आणि १२९६ मुलं-मुली शिकत होते ते १९२१ ला २२ हजार मुलं-मुली शिकायला लागले आणि जो खर्च एक लाख रूपये करीत होते तो खर्च पुढे त्यांनी तीन लाखावर नेला अशा प्रकारे स्त्री शिक्षणावर त्यांनी खूप मोठा भर दिला. केवळ शहरी किंवा उच्चशिक्षीत वर्गामध्ये नव्हे तर डोंगरी, मागास भागामध्ये, ग्रामीण भागामध्ये स्त्री शिक्षणासाठी त्यांनी स्वतंत्र मुलींच्या शाळा काढल्या. जेव्हा शाहू महाराजांना आपल्यातील जातीव्यवस्था अत्यंत कठोर आणि क्लिष्ट असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी ज्या प्रकारे वसतिगृह वेगवेगळी काढली. त्याचप्रमाणे राजर्षी शाहू

महाराजांनी मुलीच्या शाळा चांभार मुलींची शाळा, ढोर मुलींची शाळा, अशाप्रकारे डोंगर कपाऱ्यामध्ये धनगर वाड्यामध्ये, ग्रामीण भागामध्ये त्यांनी स्त्री शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले अभिनव अशा प्रकारे उपक्रम केले. त्यातला एक उपक्रम म्हणजे ज्या मुलींना चांगले मार्क्स पडतील त्या मुलींच्या शिक्षकांना बक्षीस देण्यास सुरूवात केली. एवढेच नव्हे तर प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाकडे शाहू महाराजांनी तेवढेच लक्ष दिलेले दिसते. त्यांनी १९१९ ला शाहू महाराजांनी शोधून काढले की मागास जातीतील प्रौढ स्त्रियांना शिक्षण घेऊ इच्छिनाऱ्यांना वाव दिला. प्रौढ शिक्षणासाठी त्यांनी मराठा समाजाच्याच स्त्रिया म्हणू शकले असते. परंतु शिक्षणासाठी व मागासवर्गाच्या प्रौढ शिक्षणासाठी त्यांनी आपल्या दरबारात राहण्या खाण्यापिणयची व्यवस्था केल्याचे आढळतो, नव्हे तर अशा प्रकारचा हुकूमच त्यांनी १९१९ ला काढला. एवढेच नव्हे तर त्यांनी महाराष्ट्रासह गुजरातमध्ये स्त्री शिक्षणासाठी शिष्यवृत्या जाहिर केल्या. त्याचबरोबर स्त्रीयांनी केवळ पदवीपर्यंतचे शिक्षण नव्हे म्हणजे प्राथमिक शिक्षण तर होतच पण स्त्रियांनी उच् शिक्षित व्हावे याकडे शाहू महाराज यांचा अधिक भर होता. एवढेच नव्हे, तर एका ख्रिश्चन मुलीला उच्च शिक्षणासाठी पुण्याला पाठविले. तर कृष्णाबाई केळकर नावाच्या स्त्रीला उच्च शिक्षणासाठी मुंईला ग्रॅड मेडिकल कॉलेजला पाठवले. अशा प्रकारे शाहू महाराजांनी स्त्री उच् शिक्षणासाठी मोठ आणि भरीव कार्य केले. केवळ स्त्रीने शिक्षण घेऊन चालणार नाही तर स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला पाहिजे. म्हणजे शंभर वर्षापूर्वीचा हा काळ परंतु आजही स्त्रियांना राजकीय सहभागासाठी झगडावे लागते त्या काळामध्ये शाहू महाराजांनी १९९५ ला पुण्याला राष्ट्रीय काँग्रेचे अधिवेशन भरले होते या अधिवेशनाला दोन प्रतिनिधी पाठवायचे होते अशा वेळी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या प्रत्येक सहभागाची म्हणजे सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा प्रत्येक गोष्टीकडे लक्ष दिल्याचे आपल्याला दिसते. यापुढे जाऊन शंभर वर्षापूर्वी विधवा स्त्रियांना न्याय देण्याचे कार्य केलेला खंबीर असा राजा ज्यांनी आपल्या अकरा वर्षाच्या इंदूमती नावाच्या विधवा सुनेला त्यांनी शिक्षणासाठी पाठवून त्यांच्यासोबत चार वेगवेगळ्या जातीच्या स्त्रियांना सोबत पाठविले. ते दरबारातील मोठ्या चार वेगवेगळ्या सरदारांच्या स्त्रियांना इंदुमतीसोबत पाठवू शकले असते, परंतु तसे न करता वेगवेगळ्या जातीच्या स्त्रियांना स्वत:च्या सुनेसोबत पाठवून हा समतेचा संस्कार शाहू महारजांनी घडवून आणलेला दिसतो. त्यांनी इंदूमतीला केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही तर जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रातले विविध अंगी अशा अनेक प्रकारचे ज्ञान दिले.

यावरून लक्षात येते की, शाहू महाराज आपल्या घरातील स्त्रियांवर समतेचा संस्कार कसे करत होते ते दिसते. यामागे शाहू महाराजांची प्रबळ इच्छा होती की, आपल्या इंदूमती सुनेने उच् शिक्षण घेऊन या समाज प्रबोधन, सुधारणा लढ्यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, शिक्षित होऊन उतराव लोकांची आापल्या हाताने सेवा करावी अशी त्यांची तळमळ आपणास दिसते. इंदुमतीचे आयुष्य म्हणजे शाहू महाराजाच्या सुधारणेची प्रयोगशाळाच असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही असे मला वाटते. हे करीत असताना शाहू महाराजांना अनेक वेळी राज कुटुबांचा रोषही पत्करावा लागला होता. परंतु शाहू महाराजासारखे सुधारक योद्धे महाराष्ट्रात खूप कमी होऊन गेले. कारण पुरोगामी विचारांचा प्रसार करणारे परंतु स्वत:च्या जीवनात अशा प्रकारची वेळ आली तेव्हा प्रतिगामी प्रवृत्तीने वागल्याचे दिसून आले. पण शाहू महाराज त्यातले नसल्याचे दिसते. त्यांनी अगदी त्या काळी विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला. तेव्हा आपल्या इंदुमती नावाच्या सुनेपुढे पुनर्विवाहाचा प्रस्ताव ठेवला होता. त्यांनी अंतरजातीय विवाहाचा कायदा केला. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या बहिणीचा आंतरजातीय विवाह घडवून आणला. म्हणजे सुधारणा या स्वत:च्या घरापासून करणारा व विचार आणि कृतीमध्ये फरक न करणारा असा हा राजा होता. शिक्षणाचे वंगण घातल्याशिवाय स्त्रियांच्या जीवनात परिवर्तन घडणार नाही, परिवर्तनाचे चाक फिरणार नाही हे शाहू महाराजांना कळले होते. आणि म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. म्हणून महाराष्ट्रातील लेकी इथपर्यंत पोहचल्या. परंतु आजच वास्तव काय आहे हे पाहणे गरजेचे आहे.

आज शाहू महाराजांच्या संस्थानामध्ये मुलींच्या शिक्षणाची अत्यंत वाईट अवस्था असल्याचे दिसते. मोठ-मोठ्या मुंबई, पुणे यासारख्या शहराकडे पाहून आपण अनुमान लावता कामा नये व काही उच्च शिक्षित भगामधले उदाहरण न पाहता आपण ग्रामीण महाराष्ट्राकडे जर आपण पाहू तर आपल्या लक्षात येईल की, किती भयावह स्थिती आहे. जिथे आजही मुलींच्या शिक्षणामध्ये पालकांना रस नाही आहे. म्हणजे एवढे आमचे महापुरूष सांगून गेले, परंतु तरीही त्याचा विवाह हे डोक्यावरचे ओझे असल्याचे मातापित्यांना वाटते. आजही ग्रामीण भागात मुलींना शिकू दिले जात नाही. कोविड-१९ काळ लक्षात घेतल्यास असे लक्षात येते की या लॉकडाऊनमध्ये अनेकांनी अल्पवयीन मुलींचे विवाह लावले गेले आहेत. परिणामी त्या मुलींची बुद्धिमत्ता, तिची जी काही कुवत आहे ती सगळी वाया जाते, तीला पदवीपर्यंत शिक्षण घेऊ दिले जात नाही. तर अशा प्रकारची अवस्था आजही महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आढळते. त्यामुळे आपल्याला शाहू महाराजांनी जो स्त्री विषयक सुधारणाचा वसा हाती घेतला होता तो पुढे घेऊन जाने आज गरजेचे आहे. कारण पुण्यासारख्या ठिकाणी महात्मा फुले सारख्या समाजसुधारकांनी हे बीज पेरलं आहे त्या ठिकाणी हे चित्र

दिसते म्हणजे दुर्दैव म्हणावे लागेल वा आपण हे विचार पुढे नेण्यास कुठे कमी पडलो आहे याचा पुनर्विचारही करण्याची वेळ आहे.

शाहू महाराजांना हे लक्षात आले होते की, स्त्रीला शिक्षण देऊन थांबता येणार नाही तर तीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे आणि हा अधिकार देण्यासाठी त्यांनी आपल्या राजदंडाचा वापर केला. शाहू महाराजांचे एक वेगळेपण होते. फुले, शाहू, आंबेडकर म्हणत असताना यात शाहू महाराजांचे वेगळेपण असे आहे की, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघेही एका शोषित वर्गातले होते. त्यांनी दु:ख, अवहेलना, अन्याय अपमान याचे चटके भोगले होते. ही सगळी दाहकता त्यांनी सोसलेली होती, पण शाहू महाराज हे गजांडलक्ष्मी पायाशी जन्म घेतलेला राजा तो शोषक वर्गासाठी त्यांनी आपले आयुष्य वाहिलेले आहे. शाहू महाराजांना जेव्हा लक्षात आले की, आपल्या राजदंडाचा वापर हा स्त्रीला माणूस म्हणून जगू देण्यासाठी केला पाहिजे तेव्हा मग त्यांनी स्त्री उद्धाराचे पाच कायदे करून सामाजिक परिवर्तनाच्यामध्ये आपले पाऊल टाकले आणि स्त्री जीवनामध्ये क्रांती घडून आणण्यासाठी जहाल सामाजिक परिवर्तकाची आवश्यकता आहे. आजवर असलेला विवाह संस्था, कुटुंब संस्था, प्रचलित सामाजिक व्यवहार इष्ट व्यवहार या सगळ्यामध्ये आमूलाग्र बदल केला पाहिजे. याची जाणीव त्यांना झाली आणि त्यातून त्यांनी पहिला कायदा केला तो म्हणजे १९१७ ला विधवा पुनर्विवाहाचा. आता अगोदरच स्त्रीला दुय्यम स्थान, त्यात विधवेचे जीवन हलाखीचे त्यात पुनर्विवाहाला बंदी घातली गेली होती आणि त्यामुळे शाहू महाराजांनी असे ठरवले की या विधवा स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा मार्ग मोकळा करून दिला आणि या कायद्यामुळे स्त्रीला पुढील जीवन सुरळीत जगण्यासाठी कायद्याचे हत्यार शाहू महारजांनी स्त्रियांच्या हाती दिले. एवढेच नव्हे तर आपल्या सुनेसमोर त्यांनी पुनर्विवाहाचा प्रस्ताव ठेवला होता. हे इंदुमती राणी साहेबांनी स्वत: सांगितलेली गोष्ट आहे, तर आत्ताची काय अवस्था आहे तर तरूण विधवाची पुनर्विवाहा थोड्याफार प्रमाणात होत आहे, परंतु प्रौढ विधवांची पुनर्विवाहाकडे आज समाज कसा पाहतो त्याला शासन मान्यता आहे, पण समाज मान्यता किती असते, हे महत्वाचे आहे. एखाद्या विधवा स्त्रीला धार्मिकतेतून तीची अवहेलना केली जाते. ती दुबळी असहाय्य असे समजून तिच्या एकट्यापणाचा गैर फायदा घेण्याची प्रवृत्ती वाढते. तर अशा परिस्थिमध्ये शाहू महाराजांचे वारसदार म्हणून या विधवा भगीनींच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक केला पाहिजे असे वाटते.

दुसरा कायदा शाहू महाराजांनी केला तो म्हणजे अंतरजातीय, अंतरधर्मीय विवाह कायदा. स्त्रीचा उद्धार तर करायलाच पाहजे, पण त्याच बरोबर समाजाच्या हितसंघतेला, राष्ट्रीय एकात्मतेला पुष्ठी देणारा हा कायदा होता आणि जातीभेदाचा समूळ नष्ट करणारा हा कायदा १२ जुलै १९१९ ला आणला. हा कायदा आणताना शाहू महाराजांना प्रचंड विरोध ही पत्कारावा लागला होता. या कायद्यात वधूचे वय हे १२ वर्षेकरीत असताना त्यावेळी भारतामध्ये प्रचंड मोठा गदारोळ झाला. सनातनीय आणि सुधारकांमध्ये प्रचंड खडाजंगी चालू झाली होती. त्यावेळी टिळक, शंकराचार्य, मदन मोहन मालवीय हे या १२ वर्षे संमतीवयाच्या विरोधात असल्याचे दिसले. आणि आरविंद घोष, रविंद्रनाथ टागोर, लाला लचपत राय यांच्यासारखे सुधारक हे या बिलाच्या बाजूनी होते. अशा प्रकारचा संघर्ष धारदार बनलेला असताना शाहू महाराजांनी एखादा बॉम्ब पडावा या प्रमाणे हा कायदा अंमलात आणला आणि या कायद्यानी वधूचे वय १४ वर्षेकेले होते. यावेळी टिळकांसारख्या सनातनी पुढाऱ्यांनी प्रचंड विरोध केलेला होता. अशा सगळ्या गदारोळ चालू असताना शाहू महाराजांनी हा कायदा करून वधूचे वय १४ वर्षे केले. म्हणजे वराचे वय १८ आणि वधूचे वय १४ आणि यामुळे प्रचंड उलथापालथ सामाजिक घुसळण झाली. खर म्हणजे त्या काळामध्ये अंतरजातीय अंतर धार्मिक विवाहच बेकायदेशिर समजला जात होता. त्यातून होणारे संतती अनावर समजली जात होती. शाहू महाराजांनी या विवाहाला आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संततीला शाहू महाराजांनी कायदेशीर मान्यता दिली. एवढे मोठे धाडस त्याकाळी केले. आता यामध्ये आणखीन एक बाब महाराजांनी केली ती म्हणजे १८ वर्षावरील मुलीला आपला जोडीदार निवडण्यासाठी पालकांच्या परवानगीची गरज नाही यावरून लक्षात येते की किती क्रांतिकारक हा कायदा आहे.

१९५५ ला हिंदू विवाह कायद्याखाली आपल्या स्वतंत्र भारतामध्ये हा स्त्रीला स्वातंत्र्य दिल्या गेल्याचे आढळते. या पुढे जाऊन १८ वर्षेपूर्ण झाल्यानंतर स्त्री जोडीदाराची निवड करू शकते. हे स्वातंत्र्य शाहू महाराजांना १९१९ ला या कायद्यात मुलींना दिलेले आहे. तर अशा प्रकारे अत्यंत क्रांतीकारक कायदा शाहू महाराजांनी त्याकाळी केला त्यामुळ शाहू महाराजाचे कार्य हे मुलतत्ववादी तथाकथित त्यावेळी राष्ट्रवादी चळवळी मानव तयार नव्हते. त्यामुळे शाहू महाराजांचा कार्यवाद आणि या लोकांचा मुलतत्ववाद या मध्ये महाराष्ट्रात संघर्ष झालेला आपल्याला दिसून येतो. यानंतर शाहू महाराजांनी ३ कायदे केले. स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणारा तो म्हणजे घरगुती छळ प्रतिबंधक कायदा जो

२००५ ला सरकारने Domestic Violenc या नावाने काढलेलाआहे. तर शाहू महाराजांच्या स्त्रीमुक्ती उद्धाराच्या कार्याचा कळस म्हणजे हा कायदा आहे असे वाटते. कारण त्याममध्ये शाहू महाराज अत्यंत संवेदनशिलतेने स्त्रियांना जगण्याकडे पाहतात त्यांच्या प्रश्नांकडे ते पाहतात, मानसिक क्लेश यावर महाराज जोर देतात, शारीरिक छळ व मानसिक छळहोणाऱ्या बाबीवर ते भर देतात. त्यानंतर शाहू महाराजांनी आणखी क्रांतीकारक कायदा केला तो म्हणजे काडीमोड कायदा. म्हणजे स्त्रीला नको असणाऱ्या जोडीदारापासून मुक्त होण्याचे स्वातंत्र्य हे फार महत्वाचे होते. कारण हे स्वातंत्र्य स्त्रीला नव्हतं आणि ज्या व्यवस्थेकडून हे स्वातंत्र्य पुरूषांना मिळत होतं. जी जात पंचायत व्यवस्था पुरूषसत्ताक होती, जाती वर्चस्वाची होती, तीथ स्त्रीला तीच्या कोणत्याही विचाराला स्थान नव्हतं. त्यामुळे तीला न्याय मिळत नसे अशावेळी शाहू महाराजांनी १९१९ ला 'काडीमोड कायदा' करून स्त्रीला नको असणाऱ्या जोडीदारापासून सुटका करून घेण्याचा कायदा केला. त्यात त्यांनी विविध बाबींचा उल्लेख केला. स्त्रीला तो जोडीदार शारीरिक, मानसिक दुखापत करीत असेल, जोडीदाराला महारोग असेल, पीडा असेल, नपुसक असेल किंवा त्याने पत्नीच्या अधिकाराचा त्याग केला असेल असे अनेक कारणे त्याच्यामध्ये होती आणि महत्त्वाची गोष्ट शाहू महाराजांनी केले ते म्हणजे जातपंचायतीच्या कायद्याखाली होणारी काडीमोड बंद केली. शंभर वर्षापूर्वी या राज्याला या जातपंचायतीची पुरूषसत्ताक पद्धत कळलेली होती आणि त्यामुळे त्यांना लक्षात आले की या जातपंचायतीमुळे स्त्रीला न्याय मिळणार नाही. म्हणून आज समाजात महाराजांचा पुरोगमी असा विचार करायला शिकणं आणि शिकवणं ही काळाची गरज आहे. उदारमतवादी दृष्टीकोनात महाराजांचे विचार बसतात ते आता उदारमतवादाकडून समाजवादाकडे जातात तसेच स्त्री उद्धाराकडून स्त्री मुक्तीकडे जातात आणि स्त्री विमोचनाकडून स्त्री स्वातंत्र्याकडे जाताना आपणास दिसतात. अशाप्रकारे शाहू महाराजांच्या विचारांमध्ये आपल्याला उत्क्रांती दिसते. तर सर्वच स्तरातील स्त्रियांच्या बद्दल, शोषणाबद्दल ते जागरूक होते. म्हणून त्यांनी देवदासी, जोगीन, मुरळी यांच्यासाठीचा सुद्धा कायदा केला ते १७ जाने १९२० ला. ज्या स्त्रियांना देवदासी, जोगीन, मुरळी, ज्या समाजात सोडून दिल्या जात होत्या त्यांना कोणताही संततीचा अधिकार नवहता तो मिळवून दिला व त्या प्रथेतून त्यांची सुटका केली व त्यांना वडिलोपार्जित मिळकतीतला हक्क कायदेशीररित्या त्यांना मिळवून दिला.

आज परिस्थिती बदललेली असली तरीही या स्वरूपांच्या प्रथा समाजात आढळून येतात. याबाबत महाराष्ट्र सरकारने व्यापक असा कायदा केल्याचे दिसत नाही. परंतु कर्नाटक व केरळ सरकारने असा कायदा केला आहे. महाराष्ट्रात २००५ ला एक कायदा झाला पण त्याची नियमावली बनवली गेली नसल्याने अनेकांना हा अशा प्रकारचा कायदा आहे हे ज्ञात नाही त्यामुळे या देवदासींचे पुनर्विसन कराचे याचे नियोजन नाही त्यामुळे शाहू महाराजांनी १०० वर्षापूर्वी १९२० ला जो कायदा केला त्याच्याकडे पुन्हा एकदा पहावे लागेल. या पार्श्वभूमीवर राजश्री शाहूने इंग्रजापेक्षाही प्रगत असे कायदे केले आणि महाराष्ट्राच्या परिवर्तनाच्या इतिहासाला गती दिली.

■■■

अहवाल लेखन

डॉ. गजानन रा. मुधोळकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कोहिनूर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खुलताबाद. औरंगाबाद.

एक दिवसीय संशोधन कार्यशाळा
दिनांक २५ एप्रिल २०२१, वेळ दुपारी १२.०० सत्र : पहिले

विषय : शोधनिबंध कसा लिहावा?

साधन व्यक्ती डॉ. अनघा तेंडुलकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख, सोफिया कॉलेज, मुंबई.

अध्यक्ष : डॉ.नारायण कांबळे
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद.

सखोल ज्ञानासाठी दर्जेदार शोध निबंधांचे लेखन व्हावे. त्यासाठी शोधनिबंधलेखनाची सुरुवात पेन्सिलपासून ते पेनापर्यन्त व्हावी म्हणजे शोधनिबंधामध्ये सुधारणेला वाव असावा. मराठी समाजशास्त्र परिषदेने आयोजित केलेल्या एकदिवसीय संशोधन कार्यशाळेत सोफिया कॉलेज, मुंबई येथून डॉ. अनघा तेंडुलकर यांनी हे मत व्यक्त केले.

Covid-19 च्या पार्श्वभूमीवर कोरोना विषाणू ची दुसरी लाट प्रभावी असताना प्रत्यक्ष उपस्थितीत कोणतेही उपक्रम राबवणे अशक्य झाल्यामुळे मसपने टेक्नोसावी बनत ऑनलाईन व्याख्याने आयोजित करण्यास सुरुवात केली. त्याला संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर भारताच्या विविध राज्यातून उत्तम प्रतिसाद लाभला. या उपक्रमात आणखी एक पाऊल उचलत मसपने दि. २५ एप्रिल २०२१ रोजी संशोधन कार्यशाळा आयोजित केली. त्यातील शोध निबंध कसा लिहावा या विषयावर सोफिया कॉलेज मुंबई येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनघा तेंडुलकर यांनी मार्गदर्शन केले.

सुरुवातीला मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे यांनी प्रास्ताविक मांडले. त्यात त्यांनी शोधनिबंधाची शास्त्रशुद्ध मांडणी व्हावी व नवीन संशोधकांना शोध निबंध लेखनासाठी मार्गदर्शन मिळावे हा या कार्यशाळेचा उद्देश असल्याचे नमूद केले. कोरोना प्रसाराच्या या काळात ऑनलाइन स्वरूपात विविध व्याख्यानमाला तसेच कार्यशाळा आयोजित करून विविध विषयांवर विचारमंथन घडवून आणण्याचा मनोदय त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच नजीकच्या काळात महाराष्ट्रातील समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासकांचा 'व्यक्तिपरिचय' पुस्तक रूपात प्रकाशित करण्याचा मानसही व्यक्त केला. या कार्यशाळेत शोधनिबंध लेखनावर मार्गदर्शन करताना डॉ. अनघा तेंडुलकर यांनी मार्गदर्शनाचे तीन विभागात विभाजन केले.

१. शोधनिबंध कशासाठी?
२. शोध निबंध कसा लिहावा?
३. शोधनिबंध कसा प्रकाशित करावा?

शोधनिबंध लिहिताना तो आपण कशासाठी लिहीत आहोत हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. अर्थातच लेखनाचा उद्देश हा सखोल ज्ञान प्राप्ती व संकल्पना मांडणे हा असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर मला लिहायचे आहे ही ऊर्मी स्वतःच्या आतून येणे गरजेचे आहे. तसेच मी माझे लेखन इतरांशी शेअर करेन हा विचार पक्का असावा. यामुळे आपल्या लेखनात सुधारणेला वाव मिळेल. यासाठी लेखन करताना पेनाचा वापर सुरुवातीला न करता पेन्सिलचा व खोडरबर चा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे हे त्यांनी अधोरेखित केले.केवळ एपीआय स्कोरसाठी किंवा इतरांशी स्पर्धा करण्यासाठी शोधनिबंध लेखनाकडे वळल्यास लेखनाच्या दर्जाकडे किंवा गुणवत्तेकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. सध्या वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या शैक्षणिक वर्तुळात एपीआय हा घातक व्हायरस असल्याचे मत डॉ.तेंडुलकर यांनी व्यक्त केले. आपल्याला आपला शोधनिबंध वाचावासा वाटणे आणि इतरांपासून न लपवता तो प्रकाशित करणे या बाबींचे महत्त्व त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, संशोधन हे कमावता येण्यासारखे कौशल्य आहे. प्रत्येक प्राध्यापक हा उत्तम संशोधक नसतो .पण त्याने उत्तम संशोधक बनले पाहिजे. प्राध्यापक पदवी शिक्षक असो वा पदव्युत्तर शिक्षक असो , तो विभागीय भाषेत लिहिणारा असो वा परकीय भाषेत लिहिणारा असो, विभागीय पातळीवर प्रकाशित करणारा असो वा आंतरराष्ट्रीय पातळीवर, लघु प्रकल्प हाती घेतलेला असो वा मोठा प्रकल्प करणारा, संख्यात्मक संशोधन करणारा असो वा गुणात्मक संशोधन करणारा यामध्ये भेदभाव नसतो. केवळ गरज आहे ती त्याच्या संशोधनातील गुणवत्तेची. वरील बाबींमध्ये डॉ. तेंडुलकर यांनी संशोधनाच्या दर्जाकडे अधिक लक्ष देण्यास सुचवले.

दुसऱ्या भागात त्यांनी शोध निबंध कसा लिहावा यावर प्रकाश टाकला. लेखनाची सुरुवात म्हणजे वैचारिक मंथन चालू असताना पेन्सिलचा वापर करून योग्य तेथे खोडरबर वापरून सुधारणा करण्याची गरज त्यांनी सांगितली. शोधनिबंधाचे विभाजन पुढील मुद्द्यांमध्ये झाले पाहिजे. १. शीर्षक Title २. गोषवारा Abstract ३. प्रस्तावना Introducton ४. पूर्वपीठिका Background ५. कार्यपद्धती Methodology ६. परिणाम Result ७. निष्कर्ष Conclusion ८. परिशिष्ट Appendix.

१. शीर्षक : शोध निबंधाचे शीर्षक देताना शोध निबंधाचा उद्देश आणि शीर्षक यात सुसंगती असावी. शोधनिबंधात काय असणार आहे हे शीर्षका मधून स्पष्ट व्हावे. शीर्षक मांडताना ते उद्देश सुसंगत, वैशिष्ट्यपूर्ण, स्पष्ट आणि नेमके असावे. त्यात वापरल्या जाणाऱ्या संकल्पना स्पष्ट आणि माहीत करून घेऊन वापरल्या जाव्यात. शीर्षकाची Pretest होणे आवश्यक आहे. शीर्षक देताना गाण्यांची सुरुवात किंवा पिक्चर चे टायटल देणे टाळावे. लालित्यपूर्ण शीर्षक नसावे. गुगलवर शीर्षक टाकल्यावर ते बाहेर येणारे असावे. शब्दांची मांडणी त्यात अचूक असावी. वृद्धत्व आणि वार्धक्य शास्त्र किंवा सीनियर सिटीजन आणि Elderly अशा शब्दांना योग्य तेथे वापरणे आवश्यक आहे.

२. गोषवारा : यामध्ये शोध निबंधाचा आशय व्यक्त होतो. Essence of research paper. गोषवारामध्ये आवश्यक तेवढेच शब्द येणे आवश्यक आहे. गोषवारा विषयांशी संलग्न असणे महत्त्वाचे असते.

३. प्रस्तावना : संपूर्ण शोध निबंधासाठी प्रस्तावना लिहिणे आवश्यक असते. त्यामध्ये शोध निबंधात काय मांडणी होणार आहे याचा परिचय द्यावा लागतो. आपला शोधनिबंध वाचणारा वाचक आपल्या बरोबर प्रवासाला निघालेला असतो. त्याची पूर्वकल्पना त्याला येणे आवश्यक असते. म्हणून शोधनिबंधामध्ये आपण जी मांडणी करणार आहोत ती थोडक्यात प्रस्तावना मध्ये आली पाहिजे.

४. पूर्वपीठिका : कोणत्याही शोधनिबंधात प्रस्तावना आणि पूर्वपीठिका यामध्ये खूप गल्लत केली जाते. प्रस्तावना ही आपला शोध निबंध इंट्रोड्युस करण्यासाठी असते .आणि पूर्वपीठिका ही आपल्या टॉपिक साठी असते. उदाहरणार्थ 'कोविडमुळे होणाऱ्या लॉकडाऊन मध्ये वृद्धांना येणाऱ्या समस्या' या विषयांमध्ये वृद्धांना काय समस्या आहेत ते प्रस्तावने मध्ये मांडले जाईल. आणि वृद्धांना कोवीड मुळे काय समस्या निर्माण होतात ते पूर्वपिठीकेमध्ये मांडले जाईल. विशिष्ट अभ्यास आपण का करतो हे पूर्वपिठीकेत मांडले जाणे आवश्यक असते.

५. कार्यपद्धती : कार्यपद्धती मांडताना आपण ज्या पद्धतीने विषयाकडे बघतो तो पैलू स्पष्ट होणे आवश्यक असते. त्यासाठी paradigm चा वापर आवश्यक असतो. शोध निबंधासाठी तुम्ही गुणात्मक पद्धतीचा वापर करत आहात की संख्यात्मक पद्धतीचा वापर याची नोंद होणे आवश्यक असते. प्रत्येक शोधनिबंधाचे उद्देश वेगवेगळे असतात. शोध प्रबंधातून शोधनिबंध लिहिल्यास प्रबंधाचे उद्देश निबंधाला लावता येणार नाही. त्यामुळे शोधनिबंधाचे उद्देश प्रथम नीट लिहून काढावेत.आपण शोधनिबंध कशाप्रकारे मांडत आहोत ?नमुना निवड कशी केली आहे ? नमुना निवडीसाठी कोणत्या प्रकारांचा वापर केला आहे? तथ्य कशी जमा केली आहेत? याची अचूक मांडणी या मध्ये असावी. नमुना निवडीबाबत संशोधक फार गंभीर असल्याचे दिसत नाही. जसे की वृद्धांचा अभ्यास करत असल्यास १०० निवडलेले नमुने नेमके कोणते होते, वयोगट ६० ते ७०, ७० ते ८०, ८० ते ९० याचा स्पष्ट उल्लेख नमुना निवड मध्ये यायला हवा. तरच नमुना निवडीमध्ये नेमकेपणा आणि अचूकता येईल. आणि त्याची मांडणी कार्यपद्धतीमध्ये येणे

आवश्यक आहे.

६. परिणाम आणि निष्कर्ष : शोधनिबंधाची मांडणी करताना आधी परिणाम व्यवस्थित मांडणे आवश्यक आहे. सुरुवातीला परिणाम आणि निष्कर्ष या दोघांमधील फरक समजून घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ विद्यार्थ्यांची परीक्षा झाल्यानंतर जो नीकाल हाती येतो तो परिणाम असतो. त्यावरून अभ्यासक्रम किती शिकवला गेला? कसा शिकवला गेला? परीक्षा पद्धतीचा काय फायदा झाला?याचा शोध घेतल्यास त्यावरून निष्कर्ष काढता येतात. जसे, 'अभ्यासक्रम पूर्ण न शिकवला गेल्यामुळे रिझल्ट कमी लागला' हा निष्कर्ष आहे. परिणाम लगेच दिसून येतात. परंतु निष्कर्षावर अधिक वेळ घालवून नीट अभ्यास केला पाहिजे.

७. परिशिष्ट : शोधनिबंध चा शेवटचा भाग खूप महत्त्वाचा ठरतो. शोधनिबंधासाठी तुम्ही ज्या बाबींचा वापर केला आहे त्यांचा संदर्भ येथे जोडणे आवश्यक असते.

अ. प्रश्नावली जोडणे

ब. मुलाखतीतील तथ्य जोडणे

क. वापरलेले संदर्भ देणे

ड. Respondant ची यांची यादी देणे

या सर्वांमध्ये एकसंघता असावी. अचूकता असावी. डॉ. अनघा तेंडुलकर यांनी तिसऱ्या भागामध्ये शोधनिबंध कसा प्रकाशित करावा? यावर प्रकाश टाकला. यामध्ये त्यांनी शोधनिबंध प्रकाशित करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. त्यासाठी,

१. लिहिलेल्या शोधनिबंधावर प्रक्रिया किंवा संस्करण करणे गरजेचे आहे. आधी कच्चे लिहून काढणे आणि नंतर त्यावर प्रक्रिया करून त्याला अंतिम स्वरूप देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. शोधनिबंध प्रकाशित करताना कोणत्या जर्नलमध्ये प्रकाशित करायचा आहे ही बाब महत्त्वाची ठरते. वेबसाईट वरून विविध जर्नल्सची नावे शोधता येतात. आपल्या लेखनाची पद्धती कोणती आहे, सैद्धांतिक की व्यावहारिक हे बघून जर्नल ची निवड आपल्याला करता येते.

३. जर्नल ची निवड करताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात. तुम्ही निवडलेले जर्नल हे विशिष्ट (Specific) विषयाला धरून प्रकाशित केले जाते की त्यामध्ये जनरल(General) विषय येतात.

अ. वाचक वर्ग कोण आहे याचाही जर्नल निवडताना विचार करावा.

ब. जर्नल प्रिंट होणार आहे की ऑनलाइन असणार आहे?

क. जर्नल प्रकाशनाचा काळ किती आहे... मासिक, त्रैमासिक, वार्षिक.

ड. शोध निबंध प्रकाशित करताना सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतो तो इम्पॅक्ट फॅक्टर. आपल्याला आवश्यक तो इम्पॅक्ट फॅक्टर बघून जनरलची निवड करता येते.

इ. जर्नल पियर रिव्ह्यूड असावे. जर्नल च्या संपादक मंडळावर कोण आहे, पियर समितीमध्ये कोण आहे या बाबी महत्त्वाच्या असतात. समितीने दिलेल्या सर्व सूचना शोधनिबंध लेखकाला पाळाव्या लागतात.

वरील सर्व बाबींवरून जर्नलची गुणवत्ता ठरते. शोध निबंध लेखनात शब्दमर्यादा, फॉंट स्टाइल, फॉंट साइज आणि फॉर्मेट महत्त्वाचा असतो. शोधनिबंध प्रकाशित करण्यापूर्वी त्यात सुधारणा करण्याची सतत तयारी ठेवली पाहिजे. प्रत्येक प्राध्यापकांनी स्वतःचे वेबपेज बनवणे आणि विविध समाज माध्यमांवर आपला शोधनिबंध प्रकाशित करणे ही काळाची खरी गरज आहे असे प्रतिपादन डॉ. अनघा तेंडुलकर यांनी समारोपा मध्ये केले. शोध निबंध लेखनाची सर्वातीत दृष्टी या मार्गदर्शनाने प्राप्त झाल्याचे मत अनेक सहभागींनी व्यक्त केले.

सत्राच्या शेवटी डॉ. शिवाजी उकरंडे यांनी सर्वांचे आभार मानले.

■■■

अहवाल लेखन

डॉ.अंजली जोशी – टेंभूर्णीकर
समाजशास्त्र विभाग
दयानंद महाविद्यालय लातूर.

एक दिवसीय संशोधन कार्यशाळा
दिनांक २५ एप्रिल २०२१, वेळ सकाळी १०.०० सत्र : दुसरे

विषय : शोध प्रबंध कसा लिहावा

साधन व्यक्ती : मा. डॉ. घनश्याम येळणे
संचालक, सामाजिक शास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.
अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे
अध्यक्ष – मराठी समाजशास्त्र परिषद

मराठी समाजशास्त्र परिषदेद्वारा आयोजित एक दिवसीय संशोधन कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्राचे संचालन करते डॉ. शिवाजी उकरंडे यांनी प्रस्तुत कार्यशाळेस उपस्थित अध्यक्ष, सर्व माजी अध्यक्ष, कार्यकारणी सदस्य आणि उपस्थित सर्व सहभागी यांचे सर्व प्रथम शब्दसुमनाने स्वागत केले. समाजशास्त्राचा शाखा-उपशाखीय विस्तार होत असून पत्रकारिता, महिला उद्योजकता, नागरी प्रशासन, वार्धक्य या सोबतच अनेक दुर्बल व वंचित घटकांना केंद्रस्थानी ठेवून समाजशास्त्रीय ज्ञानशाखेतून संशोधन होत असल्याचे आढळते. त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. संशोधन प्रबंध, शोधनिबंध, निबंध आणि शोधनिबंध यातील फरक या बाबींची उकल होऊन आपण केलेल्या संशोधनाची मांडणी कशी करावी? संशोधन मूल्यांची जपणूक कशी करावी? या अनुषंगाने संशोधन प्रबंधाची मांडणी कशी असावी? या उद्देशाना समोर ठेवून मराठी समाजशास्त्र परिषदेने प्रस्तुत कार्यशाळा आयोजित केली आहे डॉ. उकरंडे यांनी सांगितले. करोना महामारीच्या बिकट काळातही मराठी समाजशास्त्र परिषदेने मोठ्या आशेने व जिद्दीने ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ, मार्गदर्शकांच्या सकारात्मक पाठबळाने व विशेषत: मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष मा. डॉ. नारायण कांबळे यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाने ही संशोधनात्मक संवर्धनाची वाटचाल सुरू केली, यास महाराष्ट्रभरातून मोठा प्रतिसाद मिळतोय ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले.

म.स.प. अध्यक्ष माननीय डॉ. नारायण कांबळे यांनी आपल्या प्रास्ताविकात प्रस्तुत कार्यशाळेस उपस्थित सर्व सन्माननीय जेष्ठ व्यक्तीं, स्नेही, संशोधन, अध्यापक व अभ्यासकांचे मनःपूर्वक स्वागत केले. मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे करोना महामारीचा वाढता प्रादुर्भाव व संसर्गास बळी पडून मृत्त पावलेल्या समाजशास्त्रीय अभ्यासकांना म.स.प.च्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त करून, त्यांच्या जाण्याचे दुःख आणि निर्माण झालेली पोकळी क्लेशदायक आहे अशी भावना व्यक्त केली. Covid-19 चा वाढता प्रादुर्भाव आणि निर्माण झालेली स्थिती लक्षात घेऊन परिषदेचे काम, उपक्रम न थांबवता आभासी प्रणालीद्वारे उल्लेखनीय उपक्रम, महनीय व्यक्तींचे मार्गदर्शन, व्याख्याने आयोजित केले आहेत. अभिनव उपक्रम म्हणून फुले-शाहू-आंबेडकर ही व्याख्यानमाला देखील सुरू केली, त्यास उस्फुर्त सहभाग लाभला याबद्दल आनंद

वाटतो, या सोबतच दिनांक १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून आपण संशोधन पत्रिकेचे प्रकाशनही केले असे ते म्हणाले. आपल्या सर्वांचे सहकार्य आणि उपस्थितीने म.स.प.चे मनोबल वाढत असल्याचे डॉ. कांबळे यांनी प्रास्ताविकात मांडले, व त्याबद्दल सर्वांचे आभार मानून भविष्यातही सहकार्य असू द्यावे असे आवाहन केले.यासोबतच संशोधनाचा दर्जा सुधारावा, गुणवत्ता विकसित व्हावी. या प्रांजळ उद्देशाने प्रस्तुत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले वयातूनच संशोधनात्मक दर्जा उंचावला जाईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मौखिक परीक्षा सादरीकरण प्रसंगी 'संशोधन पर्यवेक्षक' यांनी त्या-त्या संशोधन प्रबंधातील शक्तिस्थळे व मर्यादा याबाबत विवेचन करावे, मूल्यमापनात्मक भाष्य असावे, असे अपेक्षित आहे परंतु काही वेळा तसे दिसत नाही, केवळ एक सोपस्कार पूर्ण केल्याचा भाव दिसून येतो. ही बाब चिंतनीय आहे, तेव्हा उत्कृष्ट दर्जेदार संशोधन नावारूपाला येण्यासाठी प्रस्तुत कार्यशाळा उपयुक्त ठरेल अशी सार्थ अपेक्षा असल्याचे मसपचे अध्यक्ष प्रा. डॉ. नारायण कांबळे यांनी व्यक्त केली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात डॉ. प्रशांत सोनवणे यांनी 'साधनव्यक्ती' मा. डॉ. घनश्याम येळणे यांचा परिचय करून देताना अशी माहिती दिली की, डॉ. येळणे हे संचालक, सामाजिक शास्त्र संकुल स्वा.रा. ती. म. विद्यापीठ नांदेड येथे कार्यरत असून मागील तेवीस वर्ष अध्यापनाचा आणि संशोधनाचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. Gender empowerment microcredit NGOs and rural development या विषयावर त्यांचे आचार्य पदवीचे संशोधन झाले असल्याचे त्यांनी सांगितले, या सोबतच ते ७ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सक्रिय सहभागी झाले,असून जवळपास ११ कार्यशाळा आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले आहे, तर त्यांनी ८ संशोधन प्रकल्प पूर्णत्वास नेले, असून४ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. विविध महत्त्वाच्या संस्थांच्या पदांवर ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत, त्यांनी २० एम फिल. व २० पीएचडी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांची संशोधन कार्य पूर्णत्वास नेले आहे, तर सध्या ८ विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य करीत आहेत. असा प्रभावी कार्यशील परिचय करून देण्यात आला.

'संशोधन प्रबंधाची मांडणी कशी करावी' या विषयावर बोलताना डॉ. घनश्याम येळणे सरांनी सुरुवातीला काही बाबी स्पष्ट करताना वैयक्तिक जीवनातील स्वानुभव मांडले. मी आजही संशोधन प्रक्रियेत शिकतो आहे, मी आजही संशोधनाचा विद्यार्थी आहे, ही प्रांजळ अभिव्यक्ती त्यांनी प्रथमत: दिली, पुढे संशोधन कार्याची वाटचाल स्वानुभवातून सांगताना ते म्हणतात, की त्यांचे सहकारी पुष्पेष कुमार(समाजशास्त्रज्ञ) व मी आम्ही दोघांनी सैद्धान्तिक व क्षेत्रकार्य याचा समन्वय घालून Women Registering Violence Economic As Political या विषयावर आधारित एक शोधनिबंध सोशॉलॉजीकल बुलेटीन सारख्या महत्त्वपूर्ण जर्नलमध्ये प्रकाशित करण्यासाठी जवळपास एक वर्षभर त्या विषयावर अभ्यास करून त्याची शोधनिबंधात मांडणी करून तो प्रकाशनासाठी पाठवला आणि तो प्रकाशित झाला. त्यावेळी या प्रकाशनाचा आनंद आम्हाला खूप मोठ्या प्रमाणात झाला व आत्मविश्वासात वाढ देखील होऊ लागली. तर दुसरा अनुभव सांगताना ते म्हणाले की 'त्यांचा मित्र व विद्यार्थी डॉ. गंगाभूषण मुलंनकर सध्या आसाम विद्यापीठ येथे कार्यरत असून आम्ही दोघांनी एक शोधनिबंध लिहिला. तो शोधनिबंध 'ऑस्ट्रेलियन जर्नल' सोबत संपर्क करून प्रकाशनासाठी पाठवला, त्या संपादक मंडळाने जवळपास २८ शंका (Queries) उपस्थित करून त्यास परिपक्व बनवण्याच्या प्रक्रियेकडे नेले, आम्हीही त्यास वेळोवेळी प्रतिसाद दिला, परंतु त्यांचे अपेक्षित समाधान न झाल्याने तो पेपर प्रकाशित होऊ शकला नाही. त्यानंतर आम्ही Sian journals participative research या नावाच्या जर्नल मध्ये प्रकाशनासाठी पाठविला व तो तिथे प्रकाशित झाला. या दोन अनुभवाच्या आधारे त्यांनी अभ्यासकांना असे आवाहन केले, की अभ्यासकाने Discourage होऊ नये, 'प्रयत्न तिथे मार्ग सापडतो' असा विश्वास ठेवून आपले संशोधन कार्य प्रगतीपथावर न्यावे. २६ वर्षाच्या सेवा काळामध्ये EPW Economic and Political Weekly मध्ये अद्यापही मी पेपर प्रकाशित करू शकलो नाही परंतु ते प्रकाशनाचे ध्येय मात्र माझ्या मेहनत व दर्जेदार संशोधनातून मी करणारच आहे असेही ते म्हणाले. त्यांची विद्यार्थिनी सोनाली वाकर्डे यांचा संशोधन पेपर EPW मध्ये प्रकाशित झाला ही आनंदाची व प्रेरणादायी बाब आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले यातून हे लक्षात येते की आपण लहान व्यक्तीकडून देखील प्रेरणा घेऊ शकतो, संशोधन कार्यात चढ-उतार, अडचणी येत असतात, तेव्हा संशोधकांनी न थांबता आपले संशोधन कार्य करीत रहावे, असे त्यांनी सूचित केले.

शोधप्रबंधांची मांडणी करताना मागील १० वर्षातील मौखिक परीक्षा घेण्याचा अनुभव व मार्गदर्शन कार्य या आधारे काही आकलन, निरीक्षणे व अनुभव आधारित मांडणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आपण एक संशोधनाचा विद्यार्थी असतो, आपल्या संशोधनातून आपण ज्ञान प्रगल्भतेकडे वाटचाल करीत

असतो, म्हणून आजच्या मांडणीतून उपस्थितांच्या ज्ञानार्जनाला मदत व्हावी ही अपेक्षा आहे, कोणत्याही विद्यापीठाच्या एम. फिल, पीएचडी प्रबंधा करिता मार्गदर्शक तत्त्वे, सूचना प्रबंध मांडणी कशी असावी याबाबतची (Guidelines)त्या त्या विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रकाशित केलेली असते, त्यामध्ये लहान-सहान बाबींची स्पष्टता व सूचना दिलेल्या असतात. परंतु या मार्गदर्शक बाबींचा, दस्तऐवजाचा संशोधकाकडून शोध किंवा माहिती घेतल्याचे दिसत नाही आणि तिथेच अनेकदा त्रुटी निर्माण होतात. ही बाब सुधारल्या गेली पाहिजे असे त्यांनी म्हटले.

त्यांची मांडणी त्यांनी तीन टप्प्यात केली आहे, ही मांडणी समाजशास्त्र व समाजकार्य या दोन्ही शाखांना समोर करण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले. पहिला टप्पा म्हणजे सुरुवात (Begining) याबाबत बोलताना मुखपृष्ट कसे असावे, त्याची संरचना कशी असावी, याबाबत मार्गदर्शक सूचना आहेत, जसे 'शीर्षक (Title)' कसे असावे? हे सांगताना ते म्हणाले की कित्येकदा शिर्षकामध्येच संशोधकांच्या त्रुटी राहतात, कित्येकदा एखादे शीर्षक समाजशास्त्रीय अध्ययन असे सूचित करते आणि सादरीकरण समाजकार्य या ज्ञानशाखेत होते, असा विरोधाभास पण तिथे नको. हे ते सांगतात. आपल्या संशोधनाचे अभ्यासक्षेत्र, व्याप्ती, कोणत्या घटकाविषयी आणि कोणत्या बाबींविषयी संशोधन केले जाणार आहे याचा समावेश जर शिर्षकामध्ये असेल तर आपल्या संशोधनाची पूर्वकल्पना ही इतरांना त्यामधून येऊ शकते. म्हणून आपण ज्या सैद्धांतिक दृष्टिकोणातून, ज्या ज्ञानशाखेतून अध्ययन करायचे निश्चित केले, असेल तोच 'शब्द' वापरून समर्पक मांडणी शीर्षकात असावी. पुढे ते सांगतात की, अनेकदा शीर्षकात in to inverted coma असतो, तो नसावा. एकाद्या ग्रंथाच्या शिर्षकाप्रमाणे प्रबंधाचे शीर्षक असावे असे ते म्हणाले. सुरुवातीलाच शिर्षकाबद्दल संशोधकांनी दक्षता घेऊन त्याची व्यवस्थित मांडणी करावी असे ते इथे निर्देशित करतात, म्हणून प्रबंधाच्या सुरुवातीलाच संशोधन आराखडा (Synopsis) तयार करताना विषय निश्चिती आणि शीर्षक संरचीत करण्यावर वेळ देऊन, अधिक काळजीपूर्वक व जागरूकपणे त्याची मांडणी केली पाहिजे, म्हणजे संशोधन कार्य व प्रबंधातील, प्रबंध मांडणीतील त्रुटी व उणीवा दूर होऊन संशोधन कार्य व प्रबंध मांडणी योग्य दिशेने मार्गक्रमण होईल, ते स्वतः सुद्धा या बाबी लक्षपूर्वक दखल घेतात असे त्यांनी सांगितले.

विषयाची निवड : विषयाची निवड ही कशी करावी याबाबत बोलताना ते म्हणतात की 'एखादा विषय आपण ज्या दशकात जगतोय त्या काळातील असावा, तो एक ज्वलंत प्रश्न असावा, वर्तमानास प्रभावित करणाराव त्याचा समाज जीवनावर, समाज व्यवस्थेवर किंवा समाजाच्या विविध अंगांवर प्रभाव / परिणाम पाडणारा असावा ज्यामुळे त्या विषयाचे अधिक महत्त्व व उपयोगिता निर्माण होते'. जसे Covid-19 करोना महामारी चा प्रभाव व सामाजिक, आर्थिक.... बदल, वगैरे. सद्यस्थितीत करोना महामारीचा सर्वच घटकांवर व क्षेत्रांवर मोठा विपरित परिणाम झालेला निदर्शनास येतो, अशा प्रश्नांना किंवा विषयाला संशोधन रूपाने हाताळावे असे प्रकर्षाने वाटते असे ते म्हणाले. नव ज्ञान निर्मिती करणे, अस्तित्वात असलेल्या सिद्धांतांना चिकित्सक पद्धतीने विश्लेषण करण्याच्या उद्देशाने कार्यान्वित केले जाणारे संशोधन शीर्षक असावे असेही त्यांनी सांगितले.

प्रबंधाचे दुसरे पेज : आपण प्रबंध कुठे सादरीकरण करीत आहोत याबाबतची मांडणी व्हावी, त्यानंतर ऋणनिर्देश याची मांडणी करणे क्रमप्राप्त आहे, ज्यांनी ज्यांनी संशोधन कार्यास हातभार लावला, सहाय्य केले, सहकार्य केले त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, त्यातून एक प्रकारचा ऋणानुबंध टिकून राहतो म्हणून ते असावे. त्यानंतर अनुक्रमणिका ही क्रमवार व पान क्रमांक निहाय संरचित केलेली असावी. पुढे प्रबंधाची प्रकरण मांडणी साधारणत: पीएचडी साठी चार ते पाच प्रकरणे असावीत असे त्यांचे मत आहे, पहिले प्रकरण प्रास्ताविक किंवा प्रस्तावना, दुसरे प्रकरण संदर्भ साहित्याचा मागोवा, तिसरे सामाजिक संशोधन पद्धती, चौथे तथ्य संकलन व आशय विश्लेषण आणि पाचवे निष्कर्ष आणि सूचना इत्यादी. त्यानंतर सारणीकरणाचा तक्ता देणे गरजेचे आहे व तो प्रकरणाच्या क्रमवार असून त्याला विशिष्ट नंबर देणे आवश्यक आहे, जसे पहिल्या प्रकरणातील सारण्या असतील तर १.१,१.२..... असे. त्यानंतर आलेख यादी हीसुद्धा द्यावी प्रकरणनिहाय क्रमांक देऊन दिली जावी, तसेच तो आलेख कोणत्या पृष्ट क्रमांकावर आहे, याबद्दलची देखील नोंद तिथे असावी, जेणेकरून एखादा अभ्यास किंवा वाचकाला आपले संशोधन सहज सुलभपणे समजून घेता येईल. पुढे फोटो ची यादी पान क्रमांकानुसार द्यावी, संशोधकाने आलेख किंवा सारणी यापैकी एका तंत्राद्वारे एक माहिती दर्शवावी, आलेख आपल्या उद्देश व गृहीतकांना निर्दर्शीत करणार्या तथ्यांचे द्यावेत असे त्यांना वाटते. आलेख मांडणी क्रमांक प्रकरण निहाय क्रमवार द्यावेत जसे: प्रकरण चौथे मधील आलेख असतील तर आलेख क्रमांक ४.१, ... वगैरे. अशी संपूर्ण प्रबंधातील आलेखाची यादी क्रमांकानुसार द्यावी. त्यानंतर पहिल्या प्रकरणात काय

असावे हे ते स्पष्ट करताना म्हणतात, की जर आपला विषय 'स्वयंसहाय्यता बचत गटातून महिलांचे सक्षमीकरण' असा असेल तर या प्रकरणात महिलांचे सक्षमीकरण हा शब्द शीर्षकात असल्यामुळे त्याबद्दल ची प्रस्तावना, त्याबद्दल व्याख्या, त्याबद्दल झालेले देशातील आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधने, महिला सक्षमीकरणाकरीता करण्यात आलेले प्रयत्न व त्याचे फलित या सोबतच अध्ययनाच्या बाबतीतील सैद्धांतिक दृष्टिकोण याचाही अवलंब करणे गरजेचे आहे. उपरोक्त विषयास अनुषंगून स्त्रीवादी सैद्धांतिक परिप्रेक्षचा अवलंब व त्याची मांडणी करणे अत्यंत गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

संशोधकाच्या लिखाणात सुसूत्रता असावी, आपण जे सिद्धांत, संदर्भ, संकल्पना कोणत्या ग्रंथातून,कोणत्या दस्तऐवजातून घेतलेल्या आहेत, त्याबाबत लिहिणे किंवा तळटीपा देणे गरजेचे आहे जसे: (एखाद्या ग्रंथातून एखादा संदर्भ घेतला असल्यास त्या लेखकाचे नाव: प्रकाशन वर्ष व पृष्ठ क्रमांक द्यावा, येळणे: २०२६,२०३) आणि याबाबतची सविस्तर नोंद प्रमाण नियमावलीनुसार (API) प्रकरणाच्या शेवटी द्यावी. अशा पद्धतीने ४० ते ६० पृष्ठापर्यंत या प्रकरणाची सुव्यवस्थित पद्धतीने मांडणी व्हावी असे ते सांगतात. 'आपली मांडणी इतकी सुसंबंधित व प्रभावी असावी की वाचकाला समोर काय लिहिले किंवा काय मांडले याबाबत उत्सुकता निर्माण व्हावी' आपल्या लिखाणात सुसूत्रता असावी परंतु कित्येकदा या बाबी बहुतांश प्रमाणामध्ये आढळत नाहीत ही शोकांतिका आहे, असे ते खेदाने म्हणतात.

पुढे ते हेच सांगतात की आपल्या शोध प्रबंधाचा चे लिखाण पेन्सिलने लिहून, खोड रबराच्या साहाय्याने सहजतेने दुरुस्त्या करून, हळूहळू ते पेनाने लिहिण्याकडे जायला पाहिजे, आपलेच लिखाण आपणच पुन्हा-पुन्हा वाचावे, समजून घ्यावे, दुरुस्त करावे. अनेकदा आपले संशोधन मार्गदर्शक, विषयतज्ञ, सहकारी संशोधक मित्रमंडळी यांच्या कडून देखील सहकार्य घेऊन आपले लिखाण व मांडणी तपासून घ्यावी, चर्चा करावी, आलेल्या सूचनांचे संयुक्तिक वाटल्यास स्वागत करावे, जेणेकरून त्रुटी विहीन लिखाण व प्रबंध मांडणी होत राहील.

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा मागोवा घेताना आपल्या विषयाशी संबंधित कोणकोणते संशोधने झाली? कोणी केली, कुठे प्रसिद्ध झाली, याचाही आढावा घेणे अत्याधिक महत्त्वाचे आहे. संशोधक यामध्ये अनेकदा ग्रंथांची मांडणी करतात, ही बाब इथे अपेक्षित नाही असे त्यांना वाटते. या प्रकरणात केवळ संबंधित संशोधनाचा मागोवा घेणे इतकेच अपेक्षित आहे. यातून संशोधकाला हे स्पष्ट व्हावे की झालेल्या संशोधनावरून कोणते क्षेत्र, कोणता घटक, कोणती बाब संबंधित विषयातील प्रकाश टाकण्याची, संशोधन होण्याची शिल्लक आहे, ज्यामुळे तुम्ही त्या विषयाला अधोरेखित करून संशोधन कार्य करीत आहात, हे तुमचे वेगळेपण असणार आहे या बद्दलचा एक परिच्छेद जर तुम्ही मांडला तर तो अधिक संयुक्तिक ठरतो. असे ते सूचित करतात.

प्रकरण तिसरे : संशोधन पद्धती हे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे असून संशोधकाने काळजीपूर्वक याची मांडणी करावी असे ते प्रथमत: सांगतात. या प्रकरणात विद्यापीठ, यूजीसी द्वारा मार्गदर्शक तत्त्वांनुसार (Law full Ph.D.) या आकृतीबंधात संशोधक विद्यार्थ्यांची प्रवेश पात्रता, कोर्सवर्क (४०० गुण) व गुणांकन व पात्रता धारण करण्याची अनिवार्यता याबाबत ते माहिती देतात.

आपले संशोधन गुणात्मक आहे किंवा संख्यात्मक आहे याबाबतची स्पष्टता संशोधक विद्यार्थ्यांना असावी असे ते सांगतात, परंतु मौखिक परीक्षेच्या वेळेपर्यंत ही बाब विद्यार्थ्यांना स्पष्ट नसते, हे दुर्दैवी आहे. याची प्रचिती मौखिक परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांच्या विरोधाभासी उत्तरातून अनेकदा समोर येते. आपणास गुणात्मक व संख्यात्मक अशा दोन्ही पद्धतीचा वापर करता येतो. अशा लहानसहान बाबींकडे कटाक्षाने संशोधकांनी लक्ष द्यावे व सततच आपणास संशोधनाच्या माध्यमातून नव ज्ञान निर्मिती करायची आहे याबाबत स्वतःला सांगत राहावे असे त्यांना वाटते. पुढे संख्यात्मक माहिती संकलन तर विशेष संदर्भाने व्यष्टीअध्ययन (Case Study) ही करता येते, असे सांगताना त्यांचे पीएचडी संशोधन मिश्र पद्धतीवर आधारित होते, त्या संशोधनाचे ग्रंथरूपाने women empowerment in self-help group lpha publication Nanded. इथून प्रकाशित झाल्याचे सांगून त्याची उपलब्धता अनेक ग्रंथालयात आहे, त्यामुळे वाचक त्याचा आधार घेऊ शकतील असे त्यांनी सुचित केले.

संख्यात्मक संशोधनासाठी मुलाखत अनुसूची, प्रश्नावलीचा अवलंब करावा, विद्यार्थ्यांना मुलाखत अनुसुची व प्रश्नावली यामधील मूलभूत फरक लक्षात घ्यावा. याबाबत विद्यार्थ्यांची अनेकदा गल्लत होत असल्याचे आढळते, या तंत्राचे काही गुणदोष आहेत असले तरी आपण त्याचा अवलंब करतो असे ते म्हणाले. संशोधकाने स्वतःची कौशल्य वापरून वास्तव तथ्य संकलित करण्याचा प्रयत्न करावा, कारण अनेकदा उत्तरदाता खरे उत्तर देईलच असे सांगता येत नाही, तेव्हा संशोधकाने आपले कसब, कौशल्य वापरून उत्तरदात्याला खरे उत्तर देण्याकरिता उदिक्त करावे, किंवा काही बाबी आपण निरीक्षणाच्या माध्यमातून वास्तविक तथ्य म्हणून संकलित कराव्यात, संशोधनाचे निश्चित (Specific) उद्देश

विषयाला अनुषंगून तयार केलेले असावे त्याची संख्या आपल्या विषयाला परिपूर्ण करणारे असावे, विनाकारण उद्देशाची किमान किंवा कमाल संख्या घेऊन नये. साधारणत: एम फिल करिता ३ तर एचडी करिता ५ ते ६ उद्देश पुरेसे आहेत असे त्यांना वाटते.

गृहीत कृत्य हे अध्ययन विषय आणि उद्देश यास अनुषंगून तयार केलेले असावेत याचा संबंध संशोधन पद्धतीची आहे. गुणात्मक स्वरूपाच्या संशोधनात गृहीत कृत्य नसते, कारण अध्ययनातून ते सिद्ध करता येत नाही. त्या वेळी अशा अभ्यासात संशोधन प्रश्न असावेत असे ते आवर्जून सांगतात, जसे 'स्वयंसहाय्यता गट, त्याचा उदय, त्याचे ध्येय, त्याचे फायदे, नुकसान काय आहेत या संबंधीचे प्रश्न असावेत. किंवा आपणास मिश्र पद्धतीत दोन्ही बाबींचा देखील अवलंब करता येतो असे त्यांनी म्हटले.

नमुना निवड पद्धती : ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे. संशोधकांनी भौगोलिक क्षेत्रास समान प्रतिनिधित्व देऊन लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणारा नमुना किंवा एक म्हणून त्याची निवड शास्त्रीय पद्धतीने करावी. संभाव्यता आणि गैर संभाव्यता या पद्धतीचा अवलंब करून टक्केवारीच्या प्रमाणात आपला नमुना दर्शवावा, जेणेकरून आपल्या नमुना निवडीची पद्धत, नमुना निवडीचा आकडा, याबद्दलचे स्पष्टीकरण (Justification)आपण देऊ शकलो पाहिजे. या सोबतच संशोधनाच्या निश्चित केलेल्या क्षेत्रातूनच नमुना निवड व्हावी असे ते प्रकर्षाने मांडतात.

तथ्य संकलन पद्धती:प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धती मध्ये कशाचा अवलंब करणार आहोत, याची स्पष्टता संशोधकाने करावी, पु. ल. भांडारकर म्हणतात की संशोधनात ८०% मांडणीही प्राथमिक तथ्यावर आधारित असावी, तर त्यास पूरक २०% माहिती ही दुय्यम तथ्य असावी. परंतु या संदर्भातही अनेक संशोधनात, प्रबंधात समाधानकारक स्थिती आढळत नाही सुद्धा एक चिंतनीय बाब आहे. म्हणून ते आग्रहाने म्हणतात की ८० - २० किंवा ७० -३० टक्के असे तरी प्रमाण प्राथमिक व द्वितीय तथ्यांमध्ये असावे.

ज्या मुद्द्यांची आपणास उत्तरदात्यांसोबत चर्चा करायची असेल, त्याची यादी (Checklist) तयार असावी. रेकॉर्डिंग या साधनाचा वापर करावा की नाही हे संशोधकाने ठरवावे, परंतु एखाद्या संशोधकाने उत्तरदात्यांसोबत केलेली चर्चा, गटचर्चा याबाबतचे मुद्दे आणि नोंदी लगेच घरी आल्यानंतर नोंदवून घ्याव्यात, लिहून ठेवाव्यात किंवा रेकॉर्ड करून ठेवाव्यात, जेणेकरून त्यामध्ये विस्मरण होऊन महत्त्वाच्या बाबी सुटणार नाहीत.

तथ्यांचे आशय विश्लेषण : संकलित तथ्यांचे विश्लेषण आपण मानवी व तंत्रज्ञानाच्या साह्याने करू शकतो. डझडड किंवा संगणकाच्या अन्य मार्गाने ही आशय विश्लेषण केले जाऊ शकते. सांकेतिकरण, सारणीयन, मास्टरचार्ट व सहसंबंध सारणीयन या बाबी विद्यार्थ्यांना कोणत्या तंत्राच्या आधारे, वा कसे केले आहे या बाबतची स्पष्टता त्यास असावी. यासोबतच गृहीतकृत्य एकचल किंवा द्विचल आहे, याबाबतची मांडणी, सहसंबंध सारणी, (Cross Table) च्या रूपाने करावी. ज्यामध्ये वय आणि लिंग, वय आणि शिक्षण या बाबीचा सहसंबंध स्पष्ट करता येईल. ही देखील बाब अनेक विद्यार्थ्यांच्या संशोधनात, प्रबंधात आढळत नाही असेही ते अनुभवातून सांगतात. प्रत्येक संशोधकाने जेव्हा फिल्डमध्ये जाऊन तथ्य संकलन करायचे आहे, त्यावेळी पायलट टेस्टिंग केलीच पाहिजे, ज्यातून मुलाखत अनुसूची किंवा प्रश्नावली योग्य दिशेने तयार होईल व पुढील त्रुटी, चुका, संभ्रम कमी होतील. त्यानंतर प्राप्त तथ्यांच्या आधारे, संदर्भ साहित्याचा मागोवा आणि आपले संशोधन निष्कर्ष यात तुलना करून आपल्या संशोधनाचे साम्य, वेगळेपण काय हाती लागले याची चिकित्सा करावी. यातून आपल्या संशोधनाचे महत्त्व वाढते. संशोधनाच्या प्रक्रियेत संशोधक सजग, परिपक्व बनत जातो, आपल्या संशोधनातून काहीतरी नवनिर्मिती व्हावी हे महत्त्वाचे आहे. मात्र सध्याच्या माहिती उपलब्धतेच्या युगात दर्जेदार संशोधन होताना दिसत नाही. म्हणून संशोधनाचा दर्जा राखला पाहिजे असेही ते आवर्जून सांगतात.

शेवटच्या प्रकरणाबद्दल बोलताना ते म्हणतात, की निष्कर्ष व सूचना या प्रकरणात आपल्या संशोधनातून समोर आलेली तथ्ये(Findings), निष्कर्ष, गृहित कृत्यांची पडताळणी, सूचना या मुद्द्यांचा समावेश व्हावा. कित्येकदा संशोधकाला तथ्ये आणि निष्कर्ष (Findings Conclusion) यातील फरक / भेद स्पष्ट करता येत नाही. यातील फरक त्यांना समजला पाहिजे. त्यांची मांडणी गुणात्मक व संख्यात्मक अशा स्वरुपात व्हावी किंवा उद्देश निहाय तथ्ये (Findings) मांडता येतील याआधारे संशोधकाने निष्कर्ष निर्मिती करावी.

गृहीत कृत्याची पडताळणी संशोधकाने प्रबंधात केलीच पाहिजे असे ते आग्रहाने सांगतात. संशोधन हे आंतरविद्याशाखीय आधाराने पुढे न्यावे. सिद्धांता सोबत प्राप्त तथ्यांची तुलना करावी. प्राप्त तथ्ये सिद्धांताशी पूरक, अपूरक किंवा आव्हानात्मक ठरत आहेत, या बाबीची उकल किंवा स्पष्टता करावी हे अत्यंत महत्वाचे आहे. याबाबतचे विश्लेषण करताना ते एक उदाहरण देतात, की 'खिल्लारी भूकंप आधारित एक अभ्यास प्रकल्प विद्यापीठ चमूने हाती घेतला. एकीकडे समाजशास्त्रीय सिद्धांत सांगतात, की आपत्तीतून लोक स्थलांतर करीत असतात,

परंतु या चमूने केलेल्या अध्ययनात असे आढळले, की खिल्लारी येथे झालेल्या आपत्ती संदर्भात लोक स्थलांतर न करता गावाकडे परत येत आहेत, कारण शासनाच्या जाहीर झालेल्या आर्थिक मदतीचा लाभ घेण्यासाठी अनेक लोक नातेवाईक गावाकडे परत येऊ लागले आहेत, तेव्हा प्रस्तुत अध्ययनातून उपरोक्त मांडलेला सिद्धांत लागू झाला नाही. दुसरे उदाहरण ते त्यांच्या एचडी संशोधनाचे देतात, ते म्हणतात की वीना अग्रवाल या स्त्रीवादी विचारवंताने मांडलेली Space Within Theory डॉ. येळणे यांच्या संशोधनात सिद्ध होते. म्हणजेच आपल्या संशोधनातून समोर आलेल्या तथ्यांचा सैद्धांतिक मांडणीशी संदर्भ जोडला पाहिजे असे ते सुचित करतात. यासोबतच ते सर्व समाजशास्त्रज्ञ, मार्गदर्शक व विद्यार्थ्यांना विनंती करतात की आपल्या संशोधनात सिद्धांताचा आधार आणि तथ्यांचा सहसंबंध जोडलाच पाहिजे. इतकेच नाही तर आपण सिद्धांत निर्मिती केली पाहिजे व भारतीय समाज शास्त्रज्ञांनी मांडलेल्या सिद्धांतांचा अवलंब देखील केला पाहिजे.

पुढे ते सांगतात की, संशोधकाने आपल्या संशोधनात अभ्यासपूर्ण, उपयुक्त अशा सूचना कराव्यात. आपला प्रबंध त्यातील नवनिर्मिती ज्ञान, शोधून काढलेले वास्तव, तथ्य हे ग्रंथरूपाने वाचकांसमोर आणावे. याबाबत शासनाला, संबंधित मंत्रालयाला पत्र लिहून आपला अहवाल व सूचना पाठवाव्यात. वेगवेगळे शोध निबंध लिहून ते प्रकाशित करावेत. काही संशोधन प्रबंधात एक नवीन बाब पहावयास मिळते, ती म्हणजे अध्ययन क्षेत्र असलेल्या जिल्ह्याची सांख्यिकीय माहिती घेतली जाते. ती माहिती घेण्यास हरकत नाही, मात्र त्या माहितीचा आपल्या संशोधन, अध्ययनाशी सहसंबंध संशोधकाने जोडणे गरजेचे आहे, अन्यथा प्रबंधाच्या पानांची संख्या वाढेल, म्हणून भौगोलिक घटक किंवा चल हा इतर घटकांवर किंवा चलावर प्रभाव करीत असतो त्यामुळे त्याचा सहसंबंध विश्लेषित करता आला पाहिजे.

मांडणीच्या तिसऱ्या टप्प्यात शेवटाकडे जाताना ते पुढील विश्लेषण करतात, आपण जे काही संशोधन केले त्याकरिता वापरलेली ग्रंथ, त्या ग्रंथांची नोंद घेण्याची एक विशिष्ट पद्धत असते, त्यास संदर्भग्रंथ सूची म्हणजेच (Bibliography) असे म्हणतात. ती वेगवेगळ्या प्रमाण पद्धतीने द्यावयाची असते. उदाहरणार्थ: (API), संदर्भ ग्रंथ सूची लिहितांना अ,ब,क,ड,... असा क्रम असतो, ही मांडणी लक्षपूर्वक व मान्य पद्धतीद्वारे करावी लागते, जसे :- (भांडारकर, पु. (२०००), सामाजिक संशोधन पद्धती व मुलतत्वे, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, पृष्ठ क्रमांक ४०३). तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी ग्रंथांची स्वतंत्र सूची द्यावी. संदर्भ घेतलेल्या ग्रंथांत याची नोंद Footnote किंवा एपवर्पींश स्वरूपात द्यावी असेही त्यांनी सांगितले. प्रामुख्याने संशोधन पेपर लिहिताना टीप वापरली जाते ही टीप कुठे वापरायचे याबद्दल सांगताना उदाहरण देऊन त्यांनी स्पष्ट केले. जसे: महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) असा शब्द वापरला असेल, तर महाराष्ट्रातील अनेक लोकांना माविम म्हणजे काय हे माहित आहे परंतु परराज्यातील किंवा परदेशातील लोकांना माविम संकल्पना माहीत नसते आणि म्हणून मग माविम या शब्दाचे विश्लेषण देतांना टीप द्यायची आहे. महाराष्ट्र शासनाने १९९५ मध्ये महिला सक्षमीकरण वर्ष घोषित केल्यानंतर महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्थापन केलेली संस्था म्हणजे माविम होय. आपण जर संशोधनात काही नवीन शब्दप्रयोग वापरले असतील, तर त्यास टीपच्या माध्यमातून विश्लेषित करावे असे ते सांगतात. त्यानंतर पुढे परिशिष्ट (Appendices) याबद्दल बोलताना ते स्पष्ट करतात, की परिशिष्ट मध्ये मुलाखत अनुसूची किंवा प्रश्नावली ज्याचा वापर केला ते समाविष्ट करणे गरजेचे आहे, मुलाखतदारांच्या नावाची यादी देखील आपणास लावता येऊ शकते, यासोबतच संकलित करताना छायाचित्रे घेतली असतील तर त्यातील निवडक व संबंधित छायाचित्रे (Caption) लिहून लावावेत, आणि नकाशे असतील तर ते सुद्धा आपणास देता येतील.

शेवटी संशोधनाच्या गुणात्मकते बद्दल विवेचन करताना झेब्रा क्रॉसिंग चे उदाहरण देऊन सर्व उपस्थितांना आत्मचिंतन करण्यासभाग पाडतात. झेब्रा क्रॉसिंग म्हणजे अब्राहम लिंकन यांच्याशी संबंधित असलेली घटना होय. याबाबत चे विवरण देताना ते सांगतात, की अब्राहम लिंकन राष्ट्रपती झाले, त्यांना विद्यापीठात एका समारंभात बोलावण्यात आले, सर्व मान्यवर व कुलगुरू पासून कुलसचिव आणि विद्यार्थ्यांपर्यंत सर्वजण उपस्थित होते, त्यांना विद्यापीठाचा परिसर फिरून दाखविला जात होता, माहिती दिली जात होती, एका ठिकाणी लिंकन यांनी गाडी थांबवण्यास सांगितले, तिथे पांढऱ्या आडव्या पट्ट्या चे झेब्रा क्रॉसिंग होते, त्या पट्ट्यांमध्ये एक पांढरा धब्बा होता, लिंकन यांनी विचारले, की 'झेब्रा क्रॉसिंग मध्ये तर केवळ पांढरे आडवे पट्टे असतात, मग हा डब्बा का? याचे उत्तर कुलगुरू, कुलसचिव, प्राध्यापक, विद्यार्थी यापैकी कुणालाही देता आले नाही, आणि मग स्वतः अब्राहम लिंकन यांनी त्याचे उत्तर दिले व सांगितले की 'मी ज्यावेळी या विद्यापीठात शिकत होतो, त्यावेळी माझी आर्थिक परिस्थिती बिकट होती, त्यामुळे 'मी कमवा आणि शिका' या योजनेत काम करीत होतो. हा पट्टा रंगवण्याचे

काम माझ्याकडे होते, त्यावेळी माझ्याकडून इथे पांढरा रंग सांडला होता, तो धब्बा खराब दिसू नये, म्हणून मी त्याचा चौकोनी डब्बा तयार केला, मात्र माझ्या नंतर येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने तो तसाच रंगवला, त्याची चिकित्सा कुणीही केली नाही,की झेब्रा क्रॉसिंग मध्ये केवळ आडव्या पांढऱ्या पट्ट्या असतात, हा डब्बा का? अर्थात आपल्या संशोधनातही असेच झाले आहे, असे आढळते.

खरेतर अपेक्षित असे आहे आपण संशोधन आराखडा (Synopsis) लिहितांना भविष्यात काय करणार आहोत, याबाबतची बतावणी करायची आहे. आणि गोषवारा मध्ये आपण काय केले आहे याबद्दल मांडणी करायची आहे. परंतु या कॉपी करण्याच्या च्या भानगडीत कित्येकदा वर्तमान आणि भूतकाळ (करणार आणि केले) यातली भानच संशोधकास अनावधानाने राहात नाही. म्हणून जेव्हा संशोधन कार्य संपले तेव्हा गोषवारामध्ये (भूतकाळात) कार्य पूर्ण झाल्याचे लिहायचे आहे असे स्पष्ट केले. डॉ. येळणे यांनी आपल्या संशोधन, अध्ययन, मार्गदर्शन आणि स्वानुभवाच्या आधारे केलेल्या मांडणीचा लाभ नवोदित संशोधक, विद्यार्थी यांना निश्चितच दिशादर्शक ठरुन, शोधप्रबंध मांडणी बाबत स्पष्टता आणणारा असेल असा विश्वास व्यक्त केला, व संवाद साधण्याची संधी उपलब्ध झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व आयोजकांना धन्यवाद दिले.

प्रा. डॉ. पिलगूलवार यांच्या विनंतीवरून संशोधन पर्यवेक्षक यांनी 'प्रबंध मूल्यांकन अहवाल' लिखाण किंवा मांडणी कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. त्यामध्ये ते सांगतात की, संशोधन पर्यवेक्षक (Research Supervisor) म्हणून जेव्हा तुमच्याकडे एखादा प्रबंध येतो, त्याच वेळेस, त्यासोबत एक Format सुद्धा पाठवला जात असतो, तो फॉरमॅट किंवा अहवाल लिहिण्याची एक विशिष्ट पद्धत आहे, त्यानुसार आपण तो रिपोर्ट किंवा अहवाल लिहावा, त्यात प्रत्येक प्रकरणांमध्ये काय लिहिले आहे? याची थोडक्यात मांडणी करावी. प्रामुख्याने संशोधन पर्यवेक्षक यांनी याबाबी आवर्जून मूल्यांकन अहवालात द्याव्यात, की एखाद्या प्रबंधातील शक्ति स्थाने, अभिनव बाबी काय आहेत,आणि त्या प्रबंधातील मर्यादा कोणत्या आहेत? याबाबतचे विवरण देणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुत संशोधन कार्यात कोणते बदल अथवा सुधारणा करण्यासाठी काय संधी आहे याबाबतही विवेचन करावे. असे त्यांनी म्हटले. याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात की संशोधनासंबधित संशोधन पेपर लिहिले असतील, तर त्याच्या नोंदी ह्या बाबी त्या संशोधनातील शक्तिस्थाने आहेत, आणि संशोधनात एखाद्या ग्रंथातील संदर्भ घेतला असेल आणि तो नोंदवला नसेल तर ती त्या प्रबंध मांडणीतील मर्यादा होय. इंटरनेटवरील माहिती घेताना कोणती वेबसाईट, माहिती घेतल्याचा दिनांक आणि वेळ याची नोंद असणे गरजेचे आहे, कारण गुगल वरील माहिती ही अनेकदा बदलत असते. शेवटी पर्यवेक्षकाने याबाबत आवर्जून लिहावे की, ज्या ज्ञानशाखेच्या संशोधन कार्यावर आधारित प्रबंध असेल, त्या ज्ञानशाखेला प्रस्तुत संशोधनातून कोणते योगदान मिळाले किंवा समोर आले, किंवा काहीही योगदान आले नाही याचाही उल्लेख करणे गरजेचे आहे. परंतु अनेक संशोधन पर्यवेक्षकांच्या अहवालात या बाबीची उणीव दिसून येते. पुढे ते स्पष्ट करतात की पर्यवेक्षकाला १०० गुणांचा एक तक्ता दिलेला असतो. त्यानुसार त्या प्रबंधाचे मूल्यांकन व गुणांकन करावे, ते गुणांकन मुद्दे निहाय केले जावे, या बाबींचा अंतर्भाव निरपेक्षपणेच करणे हे अपेक्षितच असते, आणि तसेच पर्यवेक्षकाने करावे असे त्यांनी आग्रहाने सांगितले. प्रा. उकरंडे यांनी आभार व्यक्त केले. प्रस्तुत व्याख्यान ऐकण्यासाठी, मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वेबसाइट अथवा युट्युब चॅनेल ला भेट द्यावी.
लिंक :
https://Youtu.be/6fNJXJ3Qo

■■■

अहवाल लेखन

डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे (नवलाखे)
सहा. प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ.

व्यक्ती परिचय ग्रंथ प्रकाशन
दि.१६ मे २०२१ रविवार

या महत्वपूर्ण ग्रंथाचे प्रकाशन मा.प्रा.डॉ.उत्तमराव भोईटे (माजी कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या ऑनलाईन प्रकाशन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.प्रा.डॉ.जगन कराडे हे उपस्थित होते. त्याच बरोबर मा.प्रा.डॉ.सरोज आगलावे (माजी अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद) यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच प्रा.डॉ.राहुल भगत (संपादक, व्यक्ती परिचय ग्रंथ),प्रा.डॉ.नारायण कांबळे (अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद), प्रा.डॉ.वेदप्रकाश मलवाडे (सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद) व कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

प्रास्ताविक : डॉ.नारायण कांबळे

प्रथम त्यांनी ऑनलाईन प्रकाशन समारंभासाठी महाराष्ट्रातून उपस्थित झालेल्या सर्व मान्यवरांचे, समाजशास्त्राच्या अभ्यासकांचे शब्द सुमनांनी स्वागत केले. तसेच डॉ.सुरेश वाघमारे, डॉ.स्मिता अवचार, डॉ.दिलीप खैरनार, डॉ. किशोर राऊत, डॉ. सरोज आगलावे, प्रकाशन समारंभ ज्यांच्या हातून पार पडला असे आदरणीय डॉ.उत्तमराव भोईटे सर,याप्रकाशन समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.जगन कराडे सर (सचिव, अखिल भारतीय समाजशास्त्र परिषद या सर्वांचा आवर्जून उल्लेख केला व आभार मानले. त्यांनी असेही सांगितले कि, या पूर्वीच्या सर्व कार्यकारिणीने प्रकाशनासाठी खूप प्रयत्न केले परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे या अत्यंत महत्वपूर्ण ग्रंथाचे प्रकाशन होऊ शकले नाही. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सर्व माजी अध्यक्षांनी या ग्रंथ प्रकाशनाचा पाया रचला असेही ते प्रास्ताविकात म्हणाले. २०१८ साली डॉ.सरोज आगलावे यांची नवीन कार्यकारिणी स्थापन झाली आणि २०२० ला आलेल्या दुसऱ्या कार्यकारणीने हे राहिलेले काम पूर्ण केले. सर्वांच्या सहकार्यातून, सर्वांच्या भूमिकेतून आज हा प्रकाशन समारंभ पार पडत आहे. आदरणीय डॉ.उत्तमराव भोईटे यांनी अतिशय चांगला संदेश या ग्रंथासाठी

दिलेला आहे. २०१८ ते २०२० या अवघ्या दोन वर्षाच्या काळात पूर्ण केलेले काम आहे आणि आज प्रकाशन समारंभ हा त्याचे फळ आहे. डॉ.राहुल भगत, डॉ. दीपक पवार यांनी ग्रंथाच्या प्रकाशनासाठी अहोरात्र मेहनत घेतली. यामुळे प्रो.डॉ.नारायण कांबळे यांनी त्यांचे विशेष आभार मानले.डॉ.उत्तमराव भोईटे यांच्याशी वेळोवेळी संवाद साधून हा प्रकल्प पूर्ण केला. तसेच Mahasociology ग्रुपचे आभार मानले. त्याचबरोबर त्यांनी असेही सांगितले की, मराठी समाजशास्त्र परिषदेचे एकूण १२०० सदस्य आहेत परंतु केवळ ३५० सदस्यांनी आपली माहिती डॉ. राहुल भगत यांच्याकडे दिली. प्रो.डॉ.नारायण कांबळे यांनी ग्रंथ प्रकाशन समारंभाचा उद्देश सांगताना म्हटले कि, या महत्वपूर्ण ग्रंथातून नव्या संशोधकांची माहिती संपूर्ण महाराष्ट्राला व्हावी, सामाजिक समस्यांशी कसे सामोरे जावे, समाजशास्त्राच्या दृष्टीकोनातुन प्रश्नांची उकल व्हावी.विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा आधार घेऊन महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला योगदान देता यावे यासाठी हा ग्रंथमहत्वपूर्ण आहे. ३४-३५ वर्षापूर्वी डॉ. सुधाताई काळदाते यांनी अशा ग्रंथासाठी खूप प्रयत्न केले होते. हा ग्रंथ कुणाचा उदो उदो करण्यासाठी नाही असेही ते प्रास्ताविकातून म्हणाले. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विद्यापीठातून समाजशास्त्राचे प्राध्यापक योगदान देत आहेत. व्यक्ती परिचय हा ग्रंथ कालचे प्राध्यापक कसे होते आजचे प्राध्यापक कसे आहेत आणि उद्याचे प्राध्यापक असे असावेत या साठी मार्गदर्शन करणारा आहे. डॉ.राहुल भगत यांनी वेळोवेळी माहिती घेऊन हा ग्रंथ पूर्ण केला. १७० पानामध्ये हा ग्रंथ साकार झालेला आहे. डॉ. वेदप्रकाश मलवाडे (सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद), डॉ.बळीराम पवार (कोषाध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद)यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. असे प्रास्ताविकातून सांगितले.

डॉ. राहुल भगत (संपादक, व्यक्ती परिचय ग्रंथ)

जाने. २०२० मध्ये डॉ. महेंद्र जाधव यांच्याकडून प्रो. डॉ. नारायण कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणी आमच्याकडे आली. २०१८ ते २०२० या दोन वर्षाच्या अथक मेहनतीतून हा महत्वपूर्ण ग्रंथ आकाराला आला होता. परंतु खरे काम या ग्रंथाचे प्रो.डॉ.नारायण कांबळे यांच्या नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे झालेल्या भेटीतूनच झाले. असे प्रो. डॉ. राहुल भगत यांनी मनोगतातून सांगितले. डॉ. राहुल भगत हे नांदेड येथे एका पीएच. डी. च्या व्हायवा साठी गेले होते. तेंव्हा विद्यापीठात डॉ. नारायण कांबळे यांची भेट झाली. चर्चेतून त्यांना अशी माहिती मिळाली कि, कांबळे सर हे नांदेड विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या समाजशास्त्राच्या प्राध्यापकांची व्यक्ती परिचय ग्रंथासाठी माहिती संकलित करीत आहेत. तेंव्हा प्रो.डॉ. राहुल भगत यांनी आपण महाराष्ट्र स्तरावर काम सुरु करावे असे सुचविले.डॉ. नारायण कांबळे यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा मुद्दा मांडला व्यक्ती परिचय या ग्रंथाचे काम संपादक म्हणून प्रो.डॉ. राहुल भगत यांच्याकडे आले. पूर्वी संकलित केलेली माहिती काहीही उपलब्ध नव्हती. असे त्यांनी सांगितले. मग समाजशास्त्राच्या म.स.प.ग्रुप वरून माहिती मागवण्याचे काम सुरु केले. बऱ्याच प्राध्यापकांची माहिती ईमेल वर मागवली. त्याच बरोबर संशोधन पत्रिकेच्या माध्यमातून माहिती संकलित केली.

२०२० पर्यंत ज्या ज्या ठिकाणी मराठी समाजशास्त्र परिषदेची अधिवेशने झाली त्यांची फोटोग्राप्स मागवले. प्रा.डॉ.सुधीर येवले, प्रा.डॉ.उकरंडे, प्रा.प्रियदर्शन भवरे, प्रा.डॉ.संदीप चौधरी यांनी मोलाचे सहकार्य केले. खरेतर कार्यकारिणी बदलल्यानंतर हा प्रकल्प पूर्ण करण्याची विनंती प्रो.डॉ. नारायण कांबळे यांच्याकडे केली होती. पुढे हे कार्य संपादक म्हणून असेच सुरु ठेवण्याचा आग्रह कांबळे सरांनी केला. डॉ. नारायण कांबळे यांनी असे सुचविले कि, या ग्रंथासाठी एक प्रस्तावना असावी. प्रस्तावनेसाठी आदरणीय डॉ.उत्तमराव भोईटे सरांना विनंती केली. त्यांनी आमच्या विनंतीला मान देऊन सुंदर अशी प्रस्तावना दिली. डॉ.राहुल भगत यांनी असेही सांगितले कि, या ग्रंथाच्या निर्मितीसाठी मी जरी संपादक असेल, तरी याचे श्रेय मराठी समाजशास्त्र परिषदेला जाते. तसेच प्रा.डॉ.दीपक पवार, प्रा.डॉ.सरोज आगलावे अशा सर्वांना श्रेय जाते. मी केवळ परिषदेसाठी कार्य केले आहे असेही ते आपल्या मनोगतातून म्हणाले. प्रकाशन समारंभानंतर त्यांनी डिजिटल स्वरुपात हा ग्रंथ सर्वांसाठी उपलब्ध करून दिला. शेवटी त्यांनी असेही सांगितले की, डिसेंबर पर्यंत हा ग्रंथ हार्डकॉपी मध्ये सर्वांसाठी उपलब्ध होईल. हा ग्रंथ मराठी समाजशास्त्र परिषदेचा ग्रंथ आहे. उपस्थित सर्वांकडून ग्रंथाचे स्वागत होईल अशी अपेक्षा व्यक्त करून प्रो.डॉ. राहुल भगत यांनी मनोगत संपवले.

प्रा. डॉ. सरोज आगलावे :

डॉ. आगलावे म्हणाल्या आजचा प्रकाशन समारंभ हा आनंदाचा व मंगलमय कार्यक्रम आहे. अतिशय सुंदर आणि आगळा वेगळा उपक्रम साजरा होत आहे. या महत्वपूर्ण ग्रंथाचे बीजारोपण मा.प्रा.डॉ.सुधाताई काळदाते यांच्या काळात झाले आहे. या ग्रंथात ३५० प्राध्यापकांचा परिचय आलेला आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेचे १२०० सदस्य आहेत. त्या सर्वांकडून माहिती मागून

घेऊन आपण दुसरा खंड प्रकाशित करू शकतोत. डॉ. सुरेश वाघमारे यांनी या ग्रंथाला वेगळे स्वरूप देण्याचे कार्य केले आहे. त्याच बरोबर डॉ. किशोर राऊत, डॉ. जगन कराडे, डॉ. महेंद्रकुमार जाधव यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेला चांगली उंची देण्याचे कार्य केले. या ग्रंथाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील समाजशासत्राच्या ३५० प्राध्यापकांची माहिती प्राप्त झाली आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्राध्यापक, जीवन गौरव पुरस्कार प्राप्त प्रध्यापाक अशा सर्वांची माहिती या पुस्तिकेतून प्राप्त होते. व्यक्ती परिचय ग्रंथ सर्वांना एका सूत्रात बांधण्याचे काम करते. प्रा.डॉ.राहुल भगत आणि प्रा.डॉ. नारायण कांबळे या दोघांनाही हे सर्व श्रेय जाते. हे दोघेही अभिनंदनास पात्र आहेत असेही त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले आहे.

प्रा.डॉ.जगन कराडे

कोवीड-१९ च्या पेन्डामिक परिस्थितीमध्ये आपले अनेक प्राध्यापक बांधव बळी गेले आहेत. एक व्यक्ती हा एक कुटुंब, एक समाज असतो. अशा सगळ्या परिस्थिती मध्ये डॉ.राहुल भगत आणि प्रा.डॉ. नारायण कांबळे यांनी अतिशय मेहनतीतून या ग्रंथाचे काम केले आहे. त्याबद्दल या दोघांचेही प्रथम त्यांनी अभिनंदन केले आहे.कारण व्यक्ती परिचय हा ग्रंथ प्रकाशित करणे अतिशय जिकरीचे काम होते. संशोधन पुरस्कार प्राप्त प्राध्यापक, डॉ.जी.एस. घुर्ये पुरस्कार प्राप्त प्राध्यापक, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्राध्यापक, जीवन गौरव पुरस्कार प्राप्त प्रध्यापाक अशा सर्वांची माहिती या ग्रंथातून मिळते. या ग्रंथाचा उल्लेख १९८७ साली डॉ. सुधाताई काळदाते यांनी केला होता. व्यक्ती परिचय हा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सर्व अडथळे दूर करून डॉ. राहुल भगत यांनी या ग्रंथाचे प्रकाशन केले. कोवीड-१९ च्या परिस्थितीमध्ये ऑनलाईन काम करणे, अनेक उपक्रम राबविणे अत्यंत जिकरीचे आहे असे ते म्हणाले.

या ग्रंथाची प्रस्तावना भविष्यासाठी दिशादेणारी आहे. आपल्या हातात परिचय पुस्तिका आल्यानंतर केवळ स्वतःचा परिचय पाहून ठेऊन देऊ नये. कारण यात संपूर्ण मराठी समाजशास्त्र परिषदेचा इतिहास आहे, परिषदेचे अधिवेशन कोठे आणि कोणकोणत्या विषयावर झालेले आहे. अशी सर्व माहिती या पुस्तिकेत आहे. या ग्रंथ प्रकाशनापूर्वी अनेक जणांनी नकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. अनेकांनी याची शैक्षणिक गुणवत्ता काय आहे? अशीही विचारणा केली. तसेच अनेकांनी नाऊमेद करण्याचा प्रयत्न केला. तरीही डॉ.राहुल भगत आणि प्रा.डॉ. नारायण कांबळे यांच्या अथक प्रयत्नातून आज ही परिचय पुस्तिका आपल्या हातात येत आहे यासाठी दोघांचेही मनापासून अभिनंदन केले.

डॉ.उत्तमराव भोईटे

निवृत्त झालेल्या फौजदाराला कुणी मानसम्मान देत नाही. मला निवृत्त होऊन २० वर्ष झाली तरीही मला विसरला नाहीत. मला आपण मान दिला, प्रकाशन समारंभासाठी आपण बोलावले. परिषदेची सदस्य संख्या १२०० असताना केवळ ३५० लोकांनी यात सहभाग नोंदवला ही अत्यंत खेदाची बाब आहे. या ग्रंथाला परिपूर्ण करण्यासाठी जे प्राध्यापक राहिलेले आहेत त्यांच्याकडून २०० रुपये दंड स्वरुपात घेऊन त्यांचा समावेश ग्रंथात करावा. जेणेकरून ही रक्कम मराठी समाजशास्त्र परिषदेसाठी होईल. प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे यांनी भा. रा. तांबे यांच्या कवितेच्या सुंदर ओळी सांगितल्या....

'मधु मागशी माझ्या सख्या परी ,
मधुघटची रिकामे पडती घरी
आजवरी कमळाच्या द्रोणी
मधु पाजिला तुला भरोनी,

ते पुढे ते म्हणाले, आपण मला आग्रहाचे निमंत्रण दिले आणि मी ते स्वीकारले. माझ्याकडे नवीन असे सांगण्यासारखे काही नाही. नवीन पिढीने उगवत्या सूर्याचे स्वागत केले पाहिजे. ते म्हणतात १९८० सालची आठवण येते मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एम. जी. कुलकर्णी आणि प्रा. डॉ. सुधाताई काळदाते यांच्या विचारातून मराठी समाजशास्त्र परिषद स्थापन झाली . ते पुढे म्हणाले बऱ्याच प्राध्यापकांनी Sociology of Profession (व्यवसायाचे समाजशास्त्र) हा विषय शिकला असेल. त्यात प्रामुख्याने ४ घटक महत्वाचे असतात.

१) व्यवसाय प्रमुख ज्ञानाच्या आधारे चालतात.
२) व्यवसाय शिकावा लागतो.
३) व्यवसायाचे काही नैतिक बंधने असतात.
४) व्यवसाय संघटन असते.

प्रत्येक संघटनेच्या काही क्रिया असतात, त्यांच्या सदस्यांत चर्चा होते, नवीन माहिती मिळते, संघटनेमुळे ते एकत्रित येतात. ते पुढे म्हणाले, मी १९६० साली मुंबई येथे अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेत सहभाग घेतला. कारण डॉ.जी.एस.घुर्ये यांना पहावयाचे होते, ते कसे बोलतात, ते कसे बसतात हे जाणून घ्यायचे होते. कारण अशा परिषदामधून नवीन ज्ञान प्राप्ती होते. जेष्ठ लोकांच्या बोलण्याचा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा परिणाम हा तरुणावर होतो.परिषदेने लोकांना लिहिते केले, बोलते केले. त्यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावने मध्ये एका प्राचीन ऋषीचे वचन सांगितले आहे. ते म्हणतात.....'प्रारंभा प्रिया, घडू दक्षिणात्य' याचा अर्थ विन्ध्य पर्वताच्या दक्षिणेकडील लोक प्रारंभ प्रिय असतात. त्यांना कोणतीही गोष्ट सुरुवात करण्यात अत्यंत आनंद असतो, पण ती गोष्ठ कडेला नेतीलच असे मात्र नाही. परंतु मराठी समाजशास्त्रपरिषदेच्या कार्यकारिणीने हे वचन खोटे ठरवले आहे. त्यांनी एक पुस्तक वाचले होते "Bombay has Three Phases' या ग्रंथात लेखिकेने महाराष्ट्रीयन लोकांची काही स्वभाव वैशिष्ट्ये सांगितली.

१) महाराष्ट्रीयन लोक हे कोणत्याही विषयावर अविरत पणे

बोलू शकतात.

२) महाराष्ट्रीयन लोकांच्या डोक्यामध्ये अतिशय चांगल्या कल्पना येतात. पण ते पूर्ण करण्यात त्यांची गफलत होते, त्या कल्पना विकृत करतात.

परंतु मराठी समाजशास्त्र परिषदेचे कार्य हे अविरत पणे चालू आहे. त्यामुळे सर्वांचे अभिनंदन केले.ते पुढे म्हणतात अनेक विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विषय सुरु झाला, अनेक महाविद्यालयामध्ये हा विषय सुरु झाला, अनेक लोकांनी ग्रंथ लिहिले, समाजशास्त्राला समृद्ध केले. समाजशास्त्राच्या ज्ञान शाखा वाढल्या Sociology of Religion, Sociology of Education, Sociology of Family. परंतु काही उणीवा यात राहिल्या आहेत Sociology in India मध्ये खूप प्रसार झाला असे ते म्हणतात आणि Sociology of India यात काय झाले आहे हि उणीव राहिली आहे. कारण भारतात समाजशास्त्रात कोणी सिद्धांत मांडू शकले नाही, कोणी चांगल्या संकल्पना मांडू शकले नाही हि खंत आहे. कारण बाकीच्या राष्ट्रांमध्ये सिद्धांत निर्माणझाले. फ्रांस, इटली, जर्मन, अमेरिकेत आणि इंग्लंड मध्ये सिद्धांत निर्माण झाले. आपल्या देशात सिद्धांत निर्माण होऊ शकले नाहीत कारण आपल्या देशात सामाजिक वास्तवता ही अत्यंत गुंतागुंतीची आहे. भारतात अनेक जातींच्या मध्ये, धर्मांच्या मध्ये, प्रदेशांमध्ये भिन्नता आढळून येते. समाजशास्त्र हे समाजावरच भाष्य असल पाहिजे. आपण मार्क्स होऊ शकत नाहीत, आपण दुर्खीम होऊ शकत नाही पण आपण बुद्धिवंत म्हणून अन्यायाप्रती अस्वस्थ असलं पाहिजे. प्राध्यापकांनी परिस्थिती मधल्या उणीवा दाखवल्या पाहिजे. आदर्श समाज कसा असावा त्याच स्वरूप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटनेमध्ये पाहायला मिळते. समाजशास्त्राच्या प्राध्यापकाने समाजाचे वर्णन करू नये. जेंव्हा समाजात बदल होतो, तंत्रज्ञानात परिवर्तन होते, तेंव्हा अन्यायाच्या नवीन जागा निर्माण होतात. भेदाच्या जागा निर्माण होतात. नवीन वर्चस्व दाखवणारे वर्ग निर्माण होतात. Green Revolution मुळे एकीकडे सधन शेतकरी निर्माण झाला. तर दुसरीकडे मजूर शेतकरी वर्ग तयार झाला. हे सर्व परिवर्तन समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी विद्यार्थ्यांना समजून सांगितले पाहिजे. ते पुढे म्हणतात सामाजिक वास्तव हे बहुआयामी असते, या सामाजिक वास्तवाला अनेक पापुद्रे असतात, तसेच सामाजिक वास्तवाला ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, वैयक्तिक बाजू असते. सामाजिक वास्तवता समजून घ्यायची असेल तर Sociological Imagination असली पाहिजे असे ते म्हणतात. कोणतेही प्रश्न बाहेरून समजणार नाहीत किंवा नुसते पाहून त्याचे अंतरंग कळणार नाहीत. तर तो घटक समजून घ्यावयाचा असेल तर त्याचे काल्पनिक सदस्यत्व स्वीकारावे लागेल. तेंव्हा समस्या जाणून घेता येते.

सामाजिक वास्तवता जाणून घेण्यासाठी समाजशास्त्राच्या प्राध्यापकाने राज्यशास्त्राची पुस्तके वाचली पाहिजे. इतिहासाची पुस्तके वाचली पाहिजे. अर्थशास्त्राचा परिचय असला पाहिजे, तसेच अभ्यासकाने ललित साहित्य वाचले पाहिजे. तत्वज्ञानाची पुस्तके वाचली पाहिजे. कारण यामुळे विचाराला समृध्दता येते.ज्ञानाच्या कशा वाढतात. त्याच बरोबर फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आपण किती पुढे चालवतो याचा विचार करायला हवा. शेवटी मा.प्रा.डॉ. उत्तमराव भोईटे म्हणतात आपण नव्या पिढ्यांमध्ये प्रबोधन विचाराच्या पणत्या लावण्यासाठी सतत प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी व्यक्ती परिचय ग्रंथाचे प्रकाशन झाले असे जाहीर करून मराठी समाजशास्त्र परिषदेला २५,००० हजारांची देणगी जाहीर केली.

या समारंभाचे संचलन डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले. तर प्रा.डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी आभार मानले.

■■■

अहवाल लेखन

प्रा. सोनटक्के रमेश शंकरराव
स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय,
परळी रोड, अंबाजोगाई, जि. बीड -४३१५१७
मोबा.नं. ९०९६१२१५०२
Email ID: - sontakkerssrtmagmail.com

संशोधन कार्यशाळा
दि.२७ जून २०२१, रविवार सकाळी ११:०० वाजता

वार्षिक प्रगती अहवाल व संशोधन प्रबंध पूर्व सादरीकरण

वक्ते : डॉ. घनश्याम येळणे
संचालक, सामाजिक शास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रास्ताविक : डॉ. नारायण कांबळे

मराठी समाजशास्त्र परिषद आयोजित आजच्या 'वार्षिक प्रगती अहवाल व संशोधन प्रबंध पूर्व सादरीकरण' एक दिवशीय संशोधन कार्यशाळेसाठी उपस्थित राहिलेले स्नेही डॉ. घनशाम येळणे, संचालक, सामाजिक शास्त्रे संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, यांचे प्रा.डॉ. नारायण कांबळे यांनी स्वागत केले. संशोधन कार्यशाळेसाठी डॉ. वेदप्रकाश मलवाडे, प्रा.बळीराम पवार, सन्माननीय सदस्य, सूत्रसंचालक डॉ. स्निग्धा कांबळे, तांत्रिक बाजू सांभाळणारे प्रा.प्रशांत सोनवणे व उपस्थित सर्व सदस्य यांचे आभार व्यक्त केले. नेहमी मदत करणारे डॉ. राहुल भगत, प्रा. प्रियदर्शन भवरे, डॉ. हिरालाल भोसले, डॉ. महेंद्र जाधव यांनाही धन्यवाद दिले. मराठी समाजशास्त्र परिषद ही समाजशास्त्राच्या अध्यापकाची मातृसंस्था आहे असे डॉ. कांबळे म्हणाले.

आज विविध कार्यक्रमातून, उपक्रमातून संशोधनाच्या संदर्भात मार्गदर्शन घडून येत आहे. 'समाजशास्त्रीय विचारवंत आणि त्यांचे योगदान' या विषयावर देवचंद कॉलेज, अर्जुन नगर येथे महत्वाची कार्यशाळा झाली, जि. कोल्हापूर यामुळे कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. सुषमा जाधव, निमकर यांचे धन्यवाद व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. सोबत डॉ. अर्जुन जाधव, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी यांचे धन्यवाद व्यक्त केले. तसेच महासोशिओलोजि ग्रुपने संशोधक विद्यार्थ्यांना

मार्गदर्शन व्हावे यासाठी व्याख्याने आयोजित केल्यामुळे डॉ. संदीप चौधरी यांचे अभिनंदन केले. डॉ. मच्छिंद्र सकटे, वंचितांच्या संबंधाने जो राष्ट्रीय सेमिनार वरोरा, चंद्रपूर येथे घेतला त्याबद्दल डॉ. श्रीनिवास पिलगुलवार यांचेही अभिनंदन केले. डॉ. राहुल भगत हे संशोधन पत्रिका प्रकाशित करीत असतात. डॉ. खंडेराव काळे कोल्हापूरहून पत्रिका काढतात त्यांचेही अभिनंदन केले.

डॉ. घनश्याम येळणे

असे म्हणाले की, विद्यापीठ कार्यक्षेत्रात त्यांना अनेक RC, RRC समित्यांमध्ये उपस्थित राहावे लागते. आठवड्याला २-३ Viva-Voce होतात. सर्वांना मार्गदर्शन मिळावे यासाठी आजची कार्यशाळा आयोजित केली आहे. सर्वसाधारण UGC hr Ph.D. प्रबंधाचा दर्जा सुधारला पाहिजे यासाठी अनेक पत्रके काढते. यावेळी त्यांनी पीएच.डी. दर्जेदारपणे संपादन करण्यासाठी अतिशय सखोल माहिती सांगितली. दर सहामाही प्रगती अहवाल सादर केला पाहिजे. काही अडचणी येत असतील तर त्या दूर करून नव्याने प्रगती अहवाल सदर केला पाहिजे. संशोधन प्रगती अहवाल सादर करण्यासंदर्भात काही मुद्यांच्या आधारे मार्गदर्शन केले.

वार्षिक सादरीकरण :-

१) संशोधकाचे संशोधन मार्गदर्शकाकडून विनंती पत्र.
२) संशोधक सादरीकरणासाठी स्वतः हजर असला पाहिजे.
३) मार्गदर्शक उपस्थित असला पाहिजे.
४) सह महिन्यांचा प्रगती अहवाल सोबत पाहिजे.
५) अहवालामध्ये प्रकरण मांडणी केलेली असावी.
६) विद्यार्थांचा उपस्थिती अहवाल जोडला पाहिजे.

प्रगती अहवाल कसा असावा :-

१) RC समितीकडून मान्यता केलेले संशोधन शीर्षक.
२) संशोधन नोंदणी तारीख
३) Synopsis प्रमाणे प्रकरण मांडणी करावी.
४) पहिल्या सहा महिन्यामध्ये वाचलेली पुस्तके .
५) दुसऱ्या सहा महिन्यामध्ये वाचलेली पुस्तके.
६) जर्नल्स देणे आवश्यक .
७) काही प्रात्यक्षिक काम केलेले असावे.
८) पुढे तुम्ही काय करणार आहात ते लिहावे.
९) संशोधन नोंदणी कश्या स्वरुपाची आहे.
१०) संशोधन मार्गदर्शकाचा रिमार्क असणे आवश्यक आहे.

सादरीकरण झाल्यानंतर संकुलाकडून प्रमाणपत्र दिले जाते. तसेच संशोधन प्रबंध सदर करण्यासाठीचे नियम व प्रक्रिया सांगितली. संशोधन प्रबंध कसा असावा ? या संदर्भात त्यांनी नमुना म्हणून 'महिला सक्षमीकरण आणि स्वयंसहाय्यता गट' या प्रबंधाची सविस्तरपणे माहिती दिली. संशोधनासाठी सरांनी काही यशस्वी स्वयंसहाय्यता गटांची केस स्टडी केलेली होती. ज्यात राणी लक्ष्मीबाई-नसरतपूर, रमाबाई-पिंपळगाव, चेतना-दगडगाव, सावित्रीबाई- शेखापूर, ज्योती-घोडज यांचा समावेश होता तसेच अनुसयाबाई, अंजनाबाई, शोभा भारती, लक्ष्मीबाई चंपत चौधरी, कदमबाई आणि लक्ष्मीबाई शिरफुले या काही यशस्वी महिलांची केस स्टडी केली. यावेळी प्रा.मारोती गायकवाड, प्रा.बर्डे नंदलाल, प्रा.फुलचंद काळे, प्रा.आशालता होळकर, डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, डॉ. विजय मुसाई, डॉ. के.एस.काळे काळे, प्रा.प्रशांत सोनावणे, डॉ. राहुल भगत यांनी प्रश्न उपस्थित करून आपला सहभाग नोंदविला. कार्यशाळेचे आभार डॉ. स्निग्धा कांबळे यांनी मानले.

■■■

अहवाल लेखन

प्रा. सोनटक्के रमेश शंकरराव
स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय,
परळी रोड, अंबाजोगाई, जि:-बीड -४३१५१७
मोबा.नं.९०९६१२१५०२
Email ID: - sontakkerssrtmagmail.com

विशेष व्याख्यान:

महाराष्ट्रातील स्त्री चळवळी

वक्त्या : डॉ. स्मिता अवचार
निवृत्त प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

प्रास्ताविक : मा. डॉ. नारायण कांबळे

पुरुष प्रधान समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना मिळणारे दुय्यम स्थान, धर्म, संस्कृती, परंपरा इत्यादींच्या नावाखाली केले जाणारे स्त्रियांचे शोषण आणि यातून निर्माण झालेले अगणित प्रश्न हे सोडविण्यासाठी आणि स्त्रियांना सर्वांगाने स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी व समानतेचा हक्क मिळवून देण्यासाठी निर्माण झालेल्या स्त्री चळवळींचा लेखाजोखा, मूल्यमापन या अनुषंगाने महाराष्ट्रातील स्त्री चळवळी या विषयावर वैचारिक मांडणी व्हावी याकरिता मराठी समाजशास्त्र परिषदेने डॉ. स्मिता अवचार यांना आमंत्रित केले आहे.

डॉ. स्मिता अवचार

डॉ. अवचार यांनी आपल्या मांडणीच्या प्रारंभीच म.स.प.चे अध्यक्ष व कार्यकारिणीचे मनापासून अभिनंदन केले. कारण सध्याची Covid-19 मुळे निर्माण झालेल्या आव्हानात्मक स्थितीतही आभासी मार्गाने का होईना आपला सातत्याने कार्यशील व गतिशील ठेवणे आणि विकास प्रक्रियेकडे वाटचाल करणे हा स्तुत्य वाटचाल असल्याचा उल्लेख करून त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. या निमित्ताने आपण दोन गोष्टी साध्य करू करीत असल्याचे समाधान आहे. एक विद्यार्थ्यांना व संशोधकांना, अभ्यासकांना विषयाशी जोडून ठेवण्याला मदत करून एक प्रकारची संधी उपलब्ध करून देत आहोत. तर दुसरे म्हणजे सर्व प्राध्यापकांना, अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना, संशोधकाला डिजिटल साक्षर ही करतो आहोत. ज्यामुळे समाजशास्त्राशी संबंधित व्यक्तींमध्ये संवाद, समन्वय घडतोय, ही उपलब्धी एक जमेची बाजू आहे. म. स. प. चे सन्माननीय अध्यक्ष व कार्यकारिणीला पुढील वाटचाली करिता त्यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या. परिषद आणि विषय लावून धरण्याचा, टिकवून धरण्याचा आणि वर्धिष्ठ करण्याचा, विचारांचे आदान-प्रदान करण्याचे काम, घटनेमध्ये जे अभिप्रेत होतं. ज्यामुळे ही परिषद अस्तित्वात आली, त्या संस्थापकांना, प्रवर्तकांनाही ते जिथे कुठे असतील तिथून त्यांना आनंद होत असेल, किंवा ज्यांनी कोणी लिहिले, शब्दबद्ध केले त्यांना ही निश्चितच अभिप्रेत होते म्हणून आपण सर्व अभिनंदनास पात्र आहात. असे त्या म्हणाल्या.

महाराष्ट्रातील स्त्री चळवळीबद्दल मांडणी करणं आणि त्यांचे मूल्यमापन करणं व त्यानंतर येणारा पुढचा टप्पा म्हणजे पुढील वाटचाल कशी करावी अथवा पुढील दिशा काय असेल? याबद्दल काही भाकीत करणं, अथवा अंदाज वर्तवणे हे काम जिकरीचे किंवा अवघड स्वरूपाचं काम आहे, आणि मी ते उपस्थितांच्या साक्षीने करते आहे. महाराष्ट्रातल्या चळवळी किंवा समाजामध्ये सामाजिक चळवळी ही संकल्पना आपण शिकवतो अथवा वापरतो, आणि वेगवेगळ्या चळवळींचे मूल्यमापन ही करतो. साधारणपणे आपण असे म्हणतो की, सामाजिक चळवळी म्हणजे व्यक्तींचा अनौपचारिकरीत्या संघटित असलेला एक मोठा गट ज्यामध्ये संघटन हे अपेक्षित आहे आणि त्याचं लक्ष विशिष्ट राजकीय-सामाजिक मुद्दा हा असू शकतो, त्याला आपण एक सामाजिक चळवळ असं म्हणतो' म्हणजे सामूहिक कृतीचा हा एक प्रकार आहे आणि काही मुद्दा किंवा काही विशिष्ट अशा हेतूने ज्या वेळी लोक संघटित होतात, केवळ संघटित होत नाहीत तर काही कृती करतात, त्या वेळेला आपण त्या कृतीला, संघटनाला, त्या लोकांच्या एकत्र येण्याला आणि नुसतं एकत्र

येणं हे केवळ त्या मुद्द्यावर किंवा केवळ त्या प्रसंगात पुरत एकत्र येणं नसतं तर त्या एकत्र येण्यामध्ये सातत्यही असतं आणि म्हणून अधिक कालखंडापर्यंत ज्यावेळी हे प्रयत्न राहतात, त्या वेळेस आपण त्या प्रयत्नांना सामाजिक चळवळ असे म्हणतो. याच अनुषंगाने महाराष्ट्रातल्या स्त्री चळवळीचा मागोवा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या सामाजिक चळवळींची व्याख्या करायची झाली तर समाजातला एखादा घटक अनेकदा आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला ओळखून, त्याचं निराकरण करण्यासाठी काही मूलभूत संस्थात्मक बदलांची अपेक्षा करतो, त्या दृष्टीने कृती वा प्रयत्न करतो, अनेकदा संस्थात्मक बदलांमध्ये ते तीव्र क्रांतिकारी बदल अपेक्षित करतो आणि अनेकदा प्रस्थापित नियमाला किंवा व्यवस्थेतल्या चौकटीला थोडासा वळसा घालूनही पुढे जाणं ही अपेक्षित करीत असतो. तर दुसरे असे चळवळींमध्ये अपेक्षित आहे, की ज्या वेळेला लोक एकत्र येतात, एक समूह एकत्र येतो, एखाद्या मुद्द्यावर ती काम करायला लागतो आणि अधिक कालखंड एकत्र आल्यामुळे, त्या वेळेला त्यांना काही दृष्टी असणं हे अपेक्षित असतं, संघटनात्मक व्यवहार हा अपेक्षित असतो, आणि ज्या वेळेला घडणारी कृती सुद्धा चळवळीमध्ये ही असू शकते. केवळ एका संघटनेच्या इशाऱ्यावर हे चालत नाही. तर त्यामध्ये उस्फुर्त असे आकृतीबंध ही तयार झालेले दिसतात. अनेकदा त्यामुळे नवीन मूल्यव्यवस्था, नवे सांस्कृतिक उन्मेष किंवा आकृतिबंध हे तयार होत जातांना दिसतात आणि म्हणून या सगळ्या पार्श्वभूमीवर मला महाराष्ट्रातल्या स्त्री चळवळीचा मागोवा घ्यायचा आहे तसेच मला हे देखील स्पष्ट करायचे आहे, की महाराष्ट्रातल्या स्त्री चळवळीचा मागोवा घेत असतांना सातत्याने 'भारतीय स्त्री चळवळ आणि महाराष्ट्रीय स्त्री चळवळ' यांची एक देवाण-घेवाण झालेली आपणास बघायला मिळते.अनेकदा महाराष्ट्रीयन स्त्री चळवळीचा मुद्दा पुढे जाऊन भारतीय पातळीवर उचलला गेलेला दिसतो, तर अनेकदा भारतीय पातळीवर काम उचलल्या गेलेल्या मुद्द्याचा प्रतिबिंब किंवा त्यांच्या चळवळीचा पाठिंबा महाराष्ट्रातून दिला गेलेला दिसतो. म्हणजे या दोन्ही बाबी परस्परांशी संबंधित, प्रभावित असून आणि मग एक केवळ महाराष्ट्रातील चळवळ म्हणून तुकडा पाडून हे होत नाही. पण तरीही भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्र या प्रदेशाला मी अधोरेखित करण्याचा, Stick Up राहण्याचा प्रयत्न करणार आहे.

साधारणपणे चळवळीची सुरुवात एकोणिसाव्या शतकात झाली हे आपण गृहीत धरतो आणि लौकिकार्थाने किंवा समाजशास्त्रीय परीभाषेमध्ये ज्याला आपण चळवळ म्हणतो, हा भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास शोधला तर आपल्याला चळवळ म्हणून सामूहिक हुंकार म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीकडे जावे लागते. परंतु असे म्हणतात एकोणिसाव्या शतकाच्या आधी आजही ती पाळेमुळे आपल्याला दिसतात किंवा तिकडून काही आलेले संचित आपल्याला ५००० वर्षाचा आढावा घ्यावा लागतो आणि मी तो एक थोडक्यात घेण्याचा प्रयत्न करणार आहे. आपणास पहिल्या स्त्री-स्वातंत्र्याचा किंवा स्त्री स्थानाचा, स्त्री दर्जाचा हुंकार जो दिसतो, तो पाली भाषेतल्या ग्रंथांमध्ये दिसून येतो, आणि त्यातील थेरीगाथा पासून मी या मांडणीला सुरुवात करते. सामान्य घरातल्या ७३ स्त्रियांनी स्वतःच्या आयुष्याच्या आलेल्या अनुभवाचं केलेले चित्रण साधारणत: ५२२ गाथांच्या माध्यमातून ते उपलब्ध आहे, याची भाषांतरे देखील उपलब्ध आहेत, त्या आधारे मी असे सांगू शकते की, त्या काळात या सगळ्या ज्या बौद्ध भिक्खुनी आहेत, त्या बुद्ध समकालीन आहेत आणि त्या स्वतःचे आर्थिक निर्णय त्या स्वतः घेत होत्या, त्यांचा जीवनाकडे बघण्याचा, सुखदुःखाचे विश्लेषण करण्याचा, स्वतःचा असा वेगळा दृष्टिकोन होता आणि आपल्या परीने आपल्या जीवनाचं मूल्यमापन करण्याचं त्यांना स्वातंत्र्य होतं असं आपणास म्हणता येईल.

साधारणपणे वैदिक कालखंड किंवा वैदिक धर्म, हिंदू धर्म, जैन धर्म, (काहींच्या मते बौद्ध धर्म ही) तयार झाला असं म्हणतात, परंतु मुख्यतः वैदिक धर्माने जे काही स्त्रियांच्या मूल्यमापनाच्या चौकट निर्माण केल्या, विशेषता ज्या पंच महाकन्या यांच्या माध्यमातून पुढे आल्या, या चौकटीतूनच स्त्रियांच्या मूल्यमापनाची व्यवस्था ही नंतरच्या काळात निर्माण झालेली दिसते. हिंदू, जैन, बौद्ध धर्मीयांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा वेगळा आहे, परंतु भारतीय स्त्री म्हटल्यानंतरचा जे भारतीय स्त्रीचे प्रतिमान किंवा जी चौकट निर्माण झाली, ती मात्र वैदिक चौकटीला धरून असलेली दिसते. जी आजतागायत आपल्याला तो धागा पुढे जातांना दिसतो. साधारणपणे १३ व्या शतकामध्ये महानुभव पंथामध्ये आपल्याला प्रभावी स्त्री दिसते. महदंबिका/महदाईसा हिने मांडलेले ढवळे आपल्याला उपलब्ध आहेत. ती एक कणखर स्त्री म्हणून आढळते. त्याच काळात भक्ती साहित्यातून डोईचा पदर खांद्यावर आला, कशी भरल्या बाजारी जाईन मी, जनी म्हणे देवा, मी झाले विसवा, निघाली केसवा, घर तुझे असं म्हणणारी जगाची नियम मोडून केशवाच्या घरी विठ्ठलाशी एकरूप झालेली ही 'जनी' स्वतःला खुशीने 'वेश्या' म्हणून घेते. ही तिने दिलेली व्यवस्थेला चपराकच आहे. परंतु त्याच्या नंतरची संत भेटते ती कानोपात्रा ते आपल्याला तिची स्वतःची सामाजिक कुचंबना ही विठ्ठलाला सांगते आणि म्हणायला लागते की हरिणीचे पाडस, व्याघ्रे धरियेले, ऐसे मज झाले देवा तर यापुढे तुकारामाची शिष्य बहिणाबाई ही आणखी एक विद्रोहाचा किंवा एक वेगळं रुप घेऊन येते आणि तिने आत्मचरित्रपर १३ अभंग लिहिलेले आहेत आणि ती असं म्हणते की,बा विठ्ठला माझं लक्ष तुझ्याकडे लागलंय आणि घरच्या नवऱ्याचं मी काय करू? यावरून मला असं वाटतं या सगळ्या लेखिका आत्तापर्यंत उपलब्ध असलेल्या साहित्यामध्ये चित्रीत झालेल्या स्त्री प्रश्नांनी जे नोंदवलंय वा मांडलय, जे विचारलय हे कधीही जागतिक वांग्मयामध्ये चित्रित झालेलं दिसत नाही. यानंतरचे किंवा कुठल्याही देशातल्या स्त्रियांना हे प्रश्न पडलेले दिसत नाहीत. असेही त्या स्पष्टपणे मांडतात. नंतरच्या काळातील जिजाबाई किंवा अहिल्याबाई होळकर असतील या पराक्रमी स्त्रिया आणि इतर अनेक जणी त्यातल्या काही नावांचा

उल्लेख मी इथे केलेला नाही, परंतु ह्या स्वतःच्या कर्तुत्वाने पुढे आलेल्या आहेत. व्यवस्थेला उत्तर दिलेलं आहे. आपल्या कृतीतून आणि स्वतःचा असा मार्ग त्यांनी चोखाळलेला आहे. पण या सगळ्या स्त्रिया हया स्वत:चा एक कर्तुत्व आणि स्वतःच्या स्वतंत्र प्रज्ञेने विचार करण्याच्या पद्धतीतून वेगळा आकृतिबंध, वर्तनाचा निर्माण करणाऱ्या अशा या स्त्रिया होत्या. सर्वसामान्य बहुजन स्त्रीचा पाठिंबा किंवा बहुजन स्त्रीच्या जगण्याचा काय आहे? तिचे प्रश्न कोणते आहेत? व्यवस्थेत त्यामुळे कसा बदल होईल? याबद्दल त्या बोलत नाहीत, पण वैयक्तिक पातळीवर मात्र त्या व्यवस्थेला प्रश्न विचारतात, व्यवस्था तोडून मोडून देतात आणि हा एक व वैचारिक वारसा भारतीय स्त्रीवादाच्या उभारणीला निर्माण झालेला दिसतो हे आपणास लक्षात घ्यावं लागेल आणि या सगळ्यावर भारतीय स्त्रीवाद हा उभा राहिलेल्या दिसतो, हे देखिल आपण लक्षात घेतलं पाहिजे. असे त्या अधोरेखित करतात.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे जर आपण सर्वसाधारणपणे स्त्री चळवळीचे काही टप्पे करायचे ठरवले, तर प्रामुख्याने दोन कालखंडामध्ये आपल्याला स्त्री चळवळ विभागता येऊ शकते, आणि मग परत दोन कालखंड हे ढोबळ मानाने दोन विभागांमध्ये विभागले जाऊ शकतील. ते म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिशांच्या राजवटीचा हा कालखंड साधारणपणे एकोणिसावे ते विसावे शतक, कारण ब्रिटिश राजवटीचा सुद्धा आपल्याला धोरणांमध्ये बदल झालेला दिसतो, आणि ब्रिटिशांच्या धोरणातून इथे नवशिक्षित असा समाज निर्माण झालेला दिसतो, आणि या नवशिक्षित समाजाने स्त्री प्रश्नांकडे बघण्याची एक प्रक्रिया सुरू झालेली दिसते. त्यातूनही खूप बदल झालेले दिसतात, आणि या बदलाची ही रूप खूप वेगवेगळे निर्माण झालेली दिसतात, या एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आपल्याला असं दिसतंय की साधारणपणे स्त्री प्रश्नांची सांगड ही सांस्कृतिक श्रेष्ठत्वाशी घातली गेलेली दिसते. महात्मा फुलेंचा विचार त्या स्वतंत्रपणे मांडताना म्हणतात की लोकहितवादी किंवा रानडे, आगरकर अथवा त्याआधी राजा राममोहन रॉय पासून ही सुरुवात झालेली दिसते. ह्या सगळ्यांनी स्त्री प्रश्नांची चर्चा, त्यांचं समाजातलं स्थान हे वैयक्तिक अनुभवातून असेल किंवा त्यांच्या सामाजिक घडामोडी च्या निरीक्षणातून असेल, ह्याबद्दल चर्चा करायला सुरुवात केलेली होती. आणि त्यातून महात्मा फुले यांचे काम यापेक्षा वेगळे आहे, कारण महात्मा फुले हे व्यवस्थेमध्ये सुधारणा बघत नाहीत किंवा अपेक्षित करत नाहीत, तर ते व्यवस्थेला आव्हान देण्याचं काम करतात. प्रतीव्यवस्था निर्माण करण्याचे काम करतात, आणि स्त्री-पुरुष समानतेचा (म्हणजे काळाच्या पुढचा द्रष्टेपणा झोपासतात) म्हणजे ते कोण्या एका समुदायासाठी काम करत नाहीत, तर स्त्री-पुरुषा मधली असमानता ही जात, वर्ग, पक्ष, पंथ, प्रदेश या पलीकडे जाऊन असमानतेची पितृ क्षेत्रे आहेत, अशा प्रकारची एक व्यापक मांडणी फुल्यांनी केलेली दिसते. सावित्री फुलेंचा भक्कम आधार व पाठिंबा म. फुले यांच्या कार्याला असलेला दिसतो. महात्मा फुले यांच्या पुढे जाऊनही सावित्रीबाई काम करतांना दिसतात, आणि ती मांडणी आपल्याला वेगळ्या पद्धतीने अभ्यास असावी लागते. थेरीगाथेचा एक थोडा उत्क्रांतीचा किंवा व्यवस्थेला आव्हान देण्याचा किंवा व्यवस्थेचे मूल्यमापन करण्याचा एक धागा फुलांच्या रूपाने पुढे आलेला आपल्याला दिसतो.

म. फुले यांचा विचार म्हणून क्रांतिकारी असतो, प्रस्थापित सामाजिक चौकटीला आव्हान देऊन, नवीन स्वतंत्र व्यवस्था निर्माण करणारी मूलगामी असा होता. आणि भारतामध्ये हा विचार प्रथमच निर्माण झालेला दिसतो. जशी त्यांनी शूद्र-अतिशूद्र गटातल्या पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या शोषणातली मांडणी केली, शोषणाच्या बद्दलची जागृती केली, तसेच उच्च जातीतल्या स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल ही त्यांचे चिंतन आणि विवेचन पुढे गेलेलं दिसतं. 'अडचण अशी आहे की फुले यांनी जी भूमिका घेतली, ती मुख्यतः सत्यशोधक आणि स्त्रीमुक्ती हे विषय घेतले. हे विषय आपल्याला पुढे गांधींना सुद्धा टाळता आलेले दिसत नाहीत. आपल्याला असं लक्षात येतं, की फुलांच्या सशक्त अशा मांडणीतून आणि केलेल्या कृतीतून आपल्याला 'मुक्ता साळवे,ताराबाई शिंदे निर्माण झालेल्या दिसतात. आणि त्यातील व्यवस्थेला प्रश्न विचारणं, त्रुटी शोधून काढणं व पर्याय उपलब्ध करणं, अशा सगळ्या शक्यता चळवळींमध्ये ज्या अपेक्षित आहेत. हया शक्यता धाग्यातून पुढे आलेल्या दिसतात. यावरून आपणास असे लक्षात येते की रानडे, आगरकर किंवा त्या वेळचे जे समाजसुधारक होते, हयांनी स्त्रियांवर होणाऱ्याविविध प्रकारच्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये अनेक स्त्री समाजसुधारक ही समाविष्ट झाल्या. अनेकांनी आपल्या पत्नीला शिकवण्याचा प्रयत्न केला, तसा प्रयत्न महात्मा फुलेनी देखील केला. पण सावित्रीबाई फुले या म. फुले यांनी केलेल्या शिकवणीच्या प्रयत्नांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देतांना दिसतात, आणि ह्या उलट रमाबाई रानडे, काशीबाई कानेटकर किंवा इतर अनेक महिला या शिक्षणाच्या प्रवाहात आल्या, त्या साधारणपणे नवऱ्याला घाबरून, किंवा नवऱ्याच्या धाकांनी. हे सावित्रीबाई वेगळेपण आहे. सुरुवात त्यांची अशी झालेली दिसते, त्यानंतर त्यांना शिक्षणाचे आकलन होऊ लागल्यावर, त्याची ओढ निर्माण होऊ लागली, व त्या शिक्षणात रमल्या. या तुलनेत सावित्रीबाईंचे वेगळेपण या निमित्ताने आढळतं.

यानिमित्ताने जे प्रश्न हाताळले गेले, जसे: बालविवाह, सतीप्रथा, विधवा पुनर्विवाह वगैरे... जसे विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न हाताळला गेला, त्याच वेळेला सनातनी किंवा काही गटांनी यास विरोध करणारा विचारही मांडला, या बाबतची स्वतंत्र चिकित्सा आपल्याला उपलब्ध आहे. विशेषत्त्वाने कोणत्या विधवांचे पुनर्विवाह झाले, आणि कुणी कुणाशी पुनर्विवाह केले, हे पाहिले तर

पुन्हा जात, वर्ग घट्ट राहतील किंवा पारंपारिक समजुतीच्या आहेत योनीसुचिता प्रश्न आहे. तोही शिल्लक आहे. जरी हे प्रश्न हाताळले गेले, तरी सुद्धा फारसा पितृसत्ताक व पितृप्रधान समाजव्यवस्थेला हादरे बसले किंवा संस्कृतीला नवे आकृतिबंध निर्माण झाले असं काही घडलं नाही. हेच प्रकर्षाने जाणवते. एक प्रकारची स्त्री-पुरुषांच्या नात्यातली रम्य कल्पना त्या काळात अस्तित्वात असलेली दिसते. आणि ती विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुद्धा आढळून येते, स्त्रियांच्या शिक्षणाची गरज काय याबद्दल लिहितांना गेल ओम्वेट संदर्भ देतात की रवींद्रनाथ टागोरांनी असं म्हटलं, की स्त्रियांनी शिकावं तर किती शिकावं आणि का शिकावं याबद्दल बोलत असताना ऑम्वेट यांनीटागोरांच म्हणणं असं अधोरेखित केलेले आहे, की शिकलेल्या पुरुषांना आपल्या न शिकलेल्या पत्नीशी संवाद साधण्यासाठी अडचण येते, आणि म्हणून महिलांनी शिकलं पाहिजे म्हणजे शिकलेल्या नवऱ्याशी संवाद साधणं याच हेतूने शिक्षण स्त्री शिक्षणाला सुरुवात ही झालेली दिसते आणि मग त्यांनी काय शिकावं तर मग स्त्रियांनी गृहकृत्यदक्ष व बालसंगोपन किंवा कौटुंबिक भूमिका, पाककला, गृहरचना हे विषय त्यांच्यासाठी असावेत अगदी आधुनिक शिक्षणाचा जो कालखंड अहवाल आहे, या अहवालामध्ये स्त्रीयांसाठी 'विज्ञान आणि गणित' हे विषय असू नयेत, त्यांना संगीत,भाषा, नृत्य, साहित्य असे सोपे विषय द्यावेत, जेणेकरून त्या समाजामध्ये अधिक शिकलेल्या पुरुषांना पूरक भूमिका बजावू शकतील, असा सूर पुढे आलेला दिसतो.

पुढे त्या म्हणतात, की ज्यावेळी ताराबाई शिंदे आणि मुक्ता साळवे यांचे लिखाण जेव्हा मी वाचते तेव्हा, असे जाणवते की व्यवस्थेला प्रश्न विचारणार्या किंवा आजही आपल्याला काही प्रश्नांची उत्तरे न सापडलेल्या अवस्थेत आहेत. याची पूर्णपणे जाणीव होत असलेली दिसते. आणि म्हणून हा विचारांचा धागा पुढे येताना दिसतो, या कालखंडात (एकोणिसावे शतक आणि ब्रिटिश कालखंड) याचा समावेश होतो. ब्रिटिशांनी सुरुवातीला भूमिका घेतली ती ऐतदेशीयांच्या सार्वजनिक जीवनामध्ये सहभागी होण्याची, प्रभाव टाकण्याची आणि त्यावेळी त्यांची भूमिका होती ती, की यांच्याकडे किती अन्याय अत्याचार आहेत आणि आम्ही कसे सुधारणावादी आहोत अशा प्रकारची एक भूमिका सुरुवातीच्या कालखंडात ब्रिटिशांनी घेतलेली दिसते आणि म्हणून एक प्रकारचा वर्चस्वाचा आधुनिकतेचा श्रेष्ठत्वाचा आव किंवा भूमिका ब्रिटिश सरकारने त्या काळात घेतलेली दिसून येते. आणि नंतरच्या बदलत्या राजकीय पटलाचा परिणाम हा असा झालेला दिसतो, की एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी असा बदल दिसून येतो, की भारतीय स्त्रियांकडे किंवा भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांकडे ब्रिटिश सरकारने ऐतदेशीयांच्या घरगुती बाबींमध्ये लक्ष न घालण्याची भूमिका ही घेतलेली दिसते. आणि ह्याचा परिणाम हा व्यक्तिगत जीवनात हस्तक्षेप करायचा नाहीअसा असून ह्या भूमिकेचा प्रभाव देखील वाढत गेलेला दिसतो. आपणास रकमाबाई राऊत यांनी आपल्या विवाहाला नकार देणे, विवाह विच्छेदाची मागणी करणे या बाबींची प्रचिती या प्रकरणाच्या वाचनातून लक्षात येईल त्या वेळेला राजकीय सुधारक, सुशिक्षित आणि नेतृत्व करणारी जी मंडळी होती, त्यांच्यामध्ये दोन गट पडलेले आपणास दिसून येतात. आणि भारतीयांच्या धर्मामध्ये व्यक्तिगत जीवनामध्ये ब्रिटिश सरकारने हस्तक्षेप करू नये अशी भूमिका घेतली गेलेली दिसते एकीकडे रकमाबाईंना कारावासही झालेला दिसतो, तर दुसरीकडे रकमाबाईंना पाठिंबा देणारेही अनेक जण असल्याचे दिसून येतात पुरुषांची भूमिका एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्री प्रश्नांकडे लक्ष वेधण्याची महत्त्वाची असलेली दिसते आणि मग नंतर दुसऱ्या फळी किंवा टप्प्यामध्ये स्त्रिया आलेल्या दिसतात त्या प्रामुख्याने ह्याने समाजसुधारकांच्या घरातून आलेल्या दिसतात, त्या शिकल्या, पुढे आल्या, स्त्री चळवळीच्या संपर्कात आल्या आणि त्यातून दोन प्रकारचे आकृतिबंध हे निर्माण झालेले दिसतात. आणि हे आकृतिबंध एक ऐतदेशीय आर्यन समाज, ब्राह्मो समाज. प्रार्थना समाज असेल. या वेगवेगळ्या संघटना त्यावेळेला निर्माण झाल्या आणि ह्या संघटनांनी भारतीय सामाजिक व्यवस्थेमध्ये फारसा बदल न करता थोडाफार बदल करून ती व्यवस्था टिकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही भूमिका घेतल्या गेल्या, व काही भूमिका महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुलेंच्या व्यवस्था बदलाच्या घेतल्या गेलेल्या, विचारावर पुढे जाऊन त्याबाबतचे लढे आणि कायदे कानून केले गेलले दिसतात.

महाराष्ट्रामध्ये या दोन्ही भूमिका घेतलेले नामवंत आपल्याला आढळतात. असे लक्षात येते की टिळक हे व्यवस्थेच्या बाजूने असलेले दिसतात तर या उलट व्यवस्था बदलून टाकावी म्हणणारे फुले असतील, राजर्षी शाहू असतील, त्याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्वही देखील पुढे आलेलं दिसतं. आणि हळूहळू एकंदरीतच भारतीय स्त्रियांकडे पतिव्रता किंवा पत्नी किंवा आईच 'मातृत्व' गौरवीकरण, स्त्री एक शक्तीचं प्रतीक अशा स्वरुपात बघणारे यातून घर आणि कुटुंब याची चौकट स्त्रियांवर अधिक बंदिस्त झालेली दिसते. आणि राष्ट्र, जात व जमात या गटांमध्ये स्त्रिया या दुभंगल्या गेल्याचे दिसतात. याच काळात विविध संघटना या निर्माण झालेल्या दिसून येतात. आणि या संघटनांमध्ये जे नेतृत्व आहे ते नेतृत्व उच्चवर्गीय, उच्चवर्णीय, मोठे शहरी अशा स्त्रियांकडे असलेल्या दिसतं. साधारणपणे ग्रामीण कनिष्ठ वर्गीय, कनिष्ठ जातीय, स्त्रिया या संघटनांच्या दायऱ्यामध्ये आलेली दिसत नाही. आपल्याला हे लक्षात घ्यावं लागतं की साधारण पणे १९०५ पर्यंत स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटना ज्या निर्माण झाल्या, त्या म्हणजे भारतीय सेवा समाज, भगिनी समाज, आर्य शिक्षण समाज....असेल, अंजुमन पाताय-ए-इस्लाम किंवा शामानबाई प्रसूतिगृह किंवा बालकल्याण समिती अशा अनेक संघटना निर्माण झाल्या. व राष्ट्रीय पातळीवर आपल्याला 'इंडियन वुमेन असोसिएशन' ॲनी बेझेंट यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेली दिसते. परंतु या संघटनांच्या विचार परीप्रेक्ष्यामध्ये स्त्री ही स्वतंत्र आहे, माणूस म्हणून आहे. आणि तिच्या वरचे अन्याय-अत्याचार

हे दूर केले पाहिजे असं म्हणत प्रस्थापित रूढीमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा कार्यक्रम हा झाला, महात्मा फुले हे त्याला अपवाद होते, आणि त्यांच्या सारखा प्रयत्न कोणी केलेला दिसत नाही, अजून तरी तो नोंदवले गेलेला दिसत नाही.

आपल्याला राजकीय पटलावर त्या काळात काय घडत होतं, हेही लक्षात घ्यावं लागतं, की याच कालखंडात एकंदर भारत देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ ही पुढे आलेली दिसते आणि त्या चळवळीचा प्रभाव स्त्री चळवळी बाबत खूप मोठा पडलेला दिसतो. त्या पुढे असे विवेचन करतात की मला आणखी एक गोष्ट इथे नोंदवून ठेवायची आहे, ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारताची विभागणी साधारणत: तीन भागांमध्ये झालेली दिसते. एक उत्तरेकडची राज्य जी आदिवासीबहुल होती आणि बफरझोन म्हणून होती तिथे ब्रिटिशांचा हस्तक्षेप नव्हता व तिथे फारसा प्रयत्न, घडामोडी घडल्या नव्हत्या, ते सुधारणेच्या, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेच्या खूप लांब होते. तर दोन संस्थानिकांचा भाग: संस्थानिकांना आपापली स्वतंत्र स्वातंत्र्य होतं आणि साधारणता हे सरंजामशाही पद्धतीचे वारसदार होते आणि जसा राजा असेल तशी तेथील जनता ही त्याच्या नियंत्रणाखाली होती यास अपवाद पुढील तीन आहेत त्यापैकी दोन हे महाराष्ट्रातील होते, एक सयाजीराव गायकवाड बडोदा संस्थान आणि दुसरं राजश्री शाहू महाराज कोल्हापूर संस्थान आणि तिसरं औंध पंतप्रतिनिधी यांचा संस्थान. या तिन्ही राज्यात स्त्रियांच्या प्रश्नांच्या बद्दलचा उहापोह हा खूप मोठ्या प्रमाणावर चालू होता. आणि अनेक स्त्री आणि शूद्र अतिशूद्र यांच्या संदर्भातील पुरोगामी असे पावलं किंवा कृती कार्यक्रम राबविले गेले. त्यामध्ये स्त्रियांसाठी मोठा वाटा होता हे आपणास लक्षात घ्यावे लागेल. पण दुसरा भारताचा गट हा संस्थानिकांच्या वर्चस्वाखाली असलेला भूप्रदेश आहे. तर तिसरा भूप्रदेश हा ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली होता आणि आपल्या असे लक्षात येईल, की ब्रिटिशांच्या भूप्रदेशात असलेल्या भागामध्ये सामाजिक सुधारकांची निर्मिती झाली. कारण शिक्षण सुरू झालं, ते आधुनिकीकरणाच्या प्रवाहात आले, त्यांनी तिथे काही चळवळी सुरू केल्या, आणि तेच आज महत्त्वाची स्त्री चळवळीचे केंद्र म्हणून उदयास आले. कलकत्ता असेल, दिल्ली असेल, मुंबई असेल आणि म्हणून महाराष्ट्रामध्ये आपल्याला हे धार दिसतात, म्हणून स्त्रियांच्या चळवळी म्हणजे कुठे काय झालं म्हणजे चळवळ का रुजली नाही किंवा चळवळ का फुटली हे वर्गीकरण चळवळीचे मूल्यमापन करताना उपयोगी पडू शकेल.

राष्ट्राच्या स्वातंत्र्य चळवळीचा परिणाम असा झाला, की जोपर्यंत टिळक यांच्या नेतृत्वाखाली ही चळवळ जहालवादी गटा गटामध्ये १९२० पर्यंत होती तोपर्यंत बहुसंख्य सामान्य स्त्रिया या स्वातंत्र्याच्या चळवळी मध्ये फारशा सहभागी झालेल्या नव्हत्या. टिळकांनी देखील स्त्रियांना चळवळीमध्ये सहभागी करून घ्यावं अशी कोणतीही व्यूहरचना केलेली आपणास आढळत नाही. परंतु महात्मा गांधी यांचा राजकीय पटलावर उदय झाल्यानंतर सत्यशोधन आणि स्त्रीमुक्ती हे फुलेंनी मांडलेले दोन मुद्दे महात्मा गांधी ने पुढे उचललेले दिसतात. आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीच्या किंवा व्यावहारिक गरजेतून अतिशय कटू असले तरी स्त्रियांचा सहभाग गांधींनी घेतला. राष्ट्राच्या ५०टक्के असलेल्या स्त्रिया चळवळीत उतरल्या खेरीज चळवळीचा पाया मजबूत होणार नाही, हा तो दृष्टीकोण होता. स्त्रियांवर अन्याय होतो त्यांना काही हक्क द्यावेत असा काही तो स्त्री मुक्तीचा विचार नव्हता, स्त्रिया ज्यावेळेला गांधीजींच्या नेतृत्वाखाली खूप मोठ्या प्रमाणावर लढ्यात सहभागी झाल्या त्या सर्व जाती, पंथ, खेडे आणि शहर या भेदाच्या पलीकडे जाऊन सर्वस्तरातून आलेल्या होत्या. स्त्रियांना घराच्या चौकटीतून बाहेर आणण्याचं काम किंवा श्रेय हे महात्मा गांधींनी केलेलं दिसतं. परंतु गांधींचा लढा अहिंसा असा होता. यातून एकीकडे घराबाहेर पडून पुरुष सहकार्यांच्या बरोबरीने स्वातंत्र्य चळवळीत जाणारी स्त्री ही एक प्रतिमा तर दुसरीकडे कुटुंबाच्या आणि समाजाच्या मधल्या मर्यादित चौकटीमध्ये असलेली स्त्री प्रतिमा जोपासली गेली. स्त्रियांना त्यांचा सबंध कार्यक्रमातून सांगण्यात व सुचविण्यात आले, की 'चळवळीचा अग्रक्रम हा राजकीय स्वातंत्र्य आहे आणि राजकीय स्वातंत्र्य मिळालं की बाकीचे प्रश्न आपोआप सुटतील या स्वरूपाचा भाबडा आशावाद हा या कालखंडात निर्माण झाला' आणि फारशी पारंपरिक भारतीय स्त्रीची प्रतिमा विचलित न होता गांधींच्या मोहिमेमध्ये स्त्रिया सहभागी झाल्या. त्या घराबाहेर, सार्वजनिक जीवनामध्ये आल्या आणि स्त्रियांना समान हक्क पाहिजे त्यांना पुढे आणले पाहिजे असा कोणताही आकृतीबंध गांधींनी या बहुसंख्य स्त्रीयांसाठी वापरलेला दिसत नाही.

आपणास असं लक्षात येतं की गांधींचा राजकीय पटलावर उदय होत असतानाच, म. फुल्यांचा वारसा घेऊन सत्ताधारी राजर्षी शाहू महाराजांची वाटचाल सुरु झालेली दिसते. सर्वच सत्ताधारी संस्थापकांनी सामाजिक न्यायाच्या निर्मितीसाठी कृतियुक्त विचार केला नाही. परंतु राजर्षी शाहूंनी ते केले त्यांनी स्त्रियांसाठी कायदे केले, त्याची योग्य अंमलबजावणी होण्याकरिता देखील ते दक्ष राहिले, हे त्यांचं ऋण लक्षात घ्यावंच लागते आणि पुढे फुले यांच्या विचारांचा अविष्कार हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातून पुढे आलेला दिसतो. ज्यावेळेला गांधी काम करीत होते, त्याच वेळेस डॉ. आंबेडकरांचे कार्य देखील समोर येत होते. मूकनायक, बहिष्कृत भारत या दोन्हींमध्ये डॉ. आंबेडकर सामाजिक समता, लिंगभाव समानता, स्त्री शिक्षण यानुषंगाने वंचित गटातल्या स्त्री-पुरुषांच्या समस्या सोडविण्यासाठी चिंतन, विचार आणि कृती कार्यक्रमांचे प्रयत्नदेखील जाणीवपूर्वक करीत असल्याचे आपणास आढळते. चवदार तळे सत्याग्रहाच्या वेळी अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात त्यांनी असं सांगितले, की जात दर्शवणारी नावाची

'चिन्ह' जी तुम्ही बाळगता ते बाळगण्याचे कारण नाही ते सोडून द्या. यासोबतच वेशभूषा कशी असावी, याबाबतही ते मार्गदर्शन करतात, उच्च जातीतील स्त्रियांचा सारखा तुम्ही स्वच्छ पेहराव करावा. एखादाच मोजका पण, सोन्याचा दागिना घालावा, पायघोळ वस्त्र नेसावे अशासारख्या छोट्या छोट्या बाबी परंतु व्यवस्थेमध्ये मूलगामी परिवर्तन आणू शकणाऱ्या आणि विचारांच्या पातळीवर या बाह्य परिवर्तनाचे रूपांतर मूलभूत परिवर्तनात करू शकणाऱ्या बाबीं बाबासाहेबांनी सांगितलेल्या दिसतात. त्यांचे १९२० ते १९४२ या कालावधीतील कार्य आणि भूमिका व्यवस्थेला आव्हान देत, कृतिकार्यक्रम आखून राबवल्या जाईल याची बांधणी त्यांनी केलेली दिसून येते. त्यांच्या नेतृत्वाखाली दलित महिला मोठ्या प्रमाणात संघटित झालेल्या दिसतात, पहिल्यापासून आजतागायत पर्यंत त्यांना मानणाऱ्या महिला ह्या खूप मोठ्या प्रमाणात आहेत. दलित, वंचित, आदिवासी समुदायांमध्ये त्यांच्या अनुयायी महिला असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला वसा त्या सार्थपणे, सजग राहून पुढे नेत असलेल्या, कार्य करीत असलेल्या व भूमिका मांडत असलेल्या दिसून येतात. अशा जाणकार व जागरूक स्त्रिया बाबासाहेबांच्या चळवळीतून पुढे आलेल्या आहेत. दुर्दैवाने दलित चळवळ आणि नंतरच्या निर्माण झालेल्या चळवळीचा सांधा हा जुळा गेलेला दिसत नाही. याबाबतची मांडणी शेवटी करण्यात येईल, हे आपण लक्षात घ्यावे. असे त्या नमूद करतात. परंतु गांधीजी आणि डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वात मूलगामी फरक दिसतो, आणि हा फरक ब्रिटिश स्वातंत्र्यपूर्व कालखंडात चले जाव आंदोलनात स्त्रिया आल्या, त्यांना असे सांगण्यात आले की राजकीय स्वातंत्र्य प्रथम व सामाजिक स्वातंत्र्य हे नंतर अशा प्रकारची भूमिका मांडली अथवा घेतली गेली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र राजकारण हे सत्ता संबंधाशी संबंधित असल्यामुळे इथे पितृसत्ता पुन्हा प्रभावी ठरली आणि सार्वजनिक क्षेत्रात आलेल्या महिलांचा राजकारणात आता काही काम नाही त्यांनी शिक्षण आणि आरोग्याच्या सामाजिक कामांमध्ये भाग घ्यावा अशा प्रकारचा दिशा दिग्दर्शन जाणीवपूर्वक करण्यात आलं त्यामुळे १९२० पासून १९४८ पर्यंत सार्वजनिक क्षेत्रांमध्ये प्रगल्भ झालेली महिला, वावरत असलेल्या महिलेला आता केवळ सामाजिक क्षेत्र खुले ठेवलेलं दिसतं, आणि स्त्रियांचा समाजकारणा मध्ये सुद्धा मिळालेल्या थोड्या संधीतून स्त्रिया काम करत असलेल्या दिसतात.

कोणत्याही चळवळीला एक चक्र असते, उदय, विकास आणि ऱ्हास असतो, किंवा एक गती असते, ती सुरुवातीला मंद त्यानंतर तीव्र त्यानंतर मंद किंवा तीव्र अशी अवस्था असू शकते. अशा एका मंद गतीने १९५० ते १९७० पर्यंत स्त्री चळवळ ही असलेली दिसते, कारण या कालखंडामध्ये विविध पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शासन आपल्या विकास अनुषंगाने काही काम करेल व आपल्याला काही मिळेल असा आशावाद निर्माण झाला होता. जो स्त्रियांसाठी आधी फुलवला होता त्याचीच स्त्रिया वाट बघत होत्या, डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वातून १९५० ला जे संविधान त्यामध्ये भारतीय स्त्रियांना खूप सारे अधिकार मिळाले मतदानाच्या अधिकारासाठी सुद्धा खूप चळवळी स्त्रियांना कराव्या लागल्या, पण भारतामध्ये स्वातंत्र्य, समानता, बंधुता, सामाजिक न्याय, भाषण स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क यासारख्या अनेक बाबी आपणास मिळाल्या. हिंदू कोड बिल यासाठी कोणतीही चळवळ किंवा लढा द्यावा लागला नाही. या बिलाच्या रूपातून डॉ. बाबासाहेबांनी संपूर्ण महिलांना व्यवस्थेतही सुधारणा करत प्रसंगी, बदल करत (उदा: सगोत्र विवाह) एक समाजहित बदलाचा पायंडा त्यांनी घालून दिला, त्याची किंमत त्यांनी मोजली परंतु विरोध ही त्यांना तितकाच सहन करावा लागला. तत्कालीन चर्चा पाहिल्या तर असे निदर्शनास येते, की या बिलाला तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूजींचा पाठिंबा होता, पण तत्कालीन राजकारणाला हे बिल जसंच्या तसं संमत होणं परवडणारं नव्हतं, परिणामी टप्प्या टप्प्याने हे बिल संमत झालं. आजही डॉ. आंबेडकर यांच्या स्वप्नातील समाजरचना कागदावर सुद्धा निर्माण झालेली नाही ही एक कटू वस्तुस्थिती आहे आणि म्हणून इथल्या व्यवस्थेने हे काम केलेले दिसतं, हा भाग १९४८ पर्यंतचा संदर्भ आहे. १९४८ ते १९७० या टप्प्यात असे लक्षात येते, की 'प्रामुख्याने शासनाच्या स्त्रिया आणि कल्याण या बाबी पंचवार्षिक उपक्रमातून पुढे येईल अशी आशा होती.

साधारणत: नोंदवून ठेवायचं असेल तर त्या वेळच्या काँग्रेसमध्ये काही महिला सरोजिनी नायडू किंवा हंसा मेहता, कमलादेवी चटोपाध्याय इत्यादी कार्य करीत होत्या, आणि अखिल भारतीय स्त्री परिषद निर्माण झालेली होती. स्त्री आणि बाल कल्याणासाठी सामाजिक सुधारणा करण्यासाठी काही काम देखील सुरू झालेलं होते. याच कालखंडामध्ये १९३३ ला किसानसभा गोदूताई परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झाली होती. १९३७ ला राष्ट्रीय घटना स्थापन झाली होती, दलित महिला आघाडी देखील स्थापन झालेली होती या स्वातंत्र्याच्या चळवळीने स्त्रियांना काय दिलं? तर समान नागरिकत्व दिलं, हिंदू विवाह कायदा दिला, बहुपत्नीत्व बेकायदेशीर ठरवलं, पोटगी हक्क, घटस्फोट मुभा, विवाह वयात वाढ, मालमत्ते स्त्रियांचा हिस्सा, स्त्रियांचे स्थान आणि दर्जा या सगळ्या बाबींमुळे बदलण्याला मदत झाली मूलभूत हक्काची प्राप्ती ही झाली, परंतु भारतीय स्त्रीची 'माता' म्हणून जे एक रूप तयार झालेलं होतं, त्याला साधारणपणे छेद देण्याचा प्रयत्न संविधानाने केलेल्या दिसतो. आपल्याला १९२० ते १९५० या कालखंडातील स्त्री चळवळीचे अनेक पदर समोर येतांना दिसतात, त्यामुळे एकीकडे भारतीय स्त्रीची माता म्हणून प्रतिमा तयार झालीच, आणि त्यातून पारंपारिक भारतीय स्त्री प्रतिमा म्हणून उच्चवर्णीय स्त्रीच प्रारूप हे स्थापित झालं. म्हणजे ह्या प्रारूपातून आदिवासी, दलित,

वनवासी स्त्रीला वगळण्यात आलं, तसंच दुसरीकडे सनातनी हिंदू धर्माला मानवतेच्या भूमिकेतून आव्हान देत माणूसपणाच्या जगण्याला अधिकाधिक महत्त्व देत आधुनिक स्त्रीचे एक समानतेवर आधारलेला प्रारूप निर्माण होण्यास सुरुवात झालेली दिसते.म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक क्षेत्रात सहजगत्या वावरणारी स्त्री निर्माण झाली, मात्र आता तुमचं काम राजकीय क्षेत्रात नाही या भूमिकेतून अग्रेसर असलेल्या स्त्रिया निश्चितच मागे पडल्या. परंतु ज्या संघटना निर्माण झाल्या त्या संघटना म्हणजे १९५४ ला साम्यवादी विचारसरणीवर आधारित भारतीय महिला फेडरेशन गोदुताई परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक आदिवासी स्त्रियांच्या चळवळी तर डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली दलित चळवळी निर्माण झालेल्या दिसतात, आणि पुढे राष्ट्रीय सेवा समितीचे काम पुढे जनसंघाच्या विविध संघटना आहेत, त्यामध्ये स्त्री संघटनाला सहभाग, वैयक्तिक संपर्क व अडचणींचे निरसन यावर त्यांचा भर होता. म्हणजे एकाच वेळेला स्त्री चळवळीचे असे विविध पदर किंवा प्रवाह भारतीय समाज जीवनामध्ये प्रस्थापित झालेले दिसतात.या पार्श्वभूमीवर १९७५ नंतर निर्माण झालेली नवीन स्त्री चळवळ आपल्याला तपासावी लागते. संयुक्त राष्ट्राने १९७३ ला असे आवाहन केले, की ज्या त्या देशातील स्त्रियांच्या स्थितीचे अभ्यासपूर्ण आकलन करून अहवाल सादर करावा. भारतात फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापित झाली होती त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीतून संबंधित अहवाल सादर केला. संयुक्त राष्ट्र संघाने जगातील बहुतांश अहवालाचे अवलोकनावरून महिला हितासाठी १९७५ महिला वर्ष म्हणून जाहीर केलं.

महाराष्ट्रातील १९७२ चा दुष्काळ आणि साधारणत: १९७३ मध्ये सुरू झालेलं महागाई विरोधी आंदोलन. मृणाल गोरे, अहिल्याबाई रांगणेकर आणि इतर.. यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू झालं होतं, आणि ह्या आंदोलनाकडून नंतर स्त्रिया मोठ्या प्रमाणामध्ये संघटित झालेल्या दिसतात. समतेकडे वाटचाल या अहवालात असे दिसते की स्वातंत्र्यपूर्व कालखंड ते १९७० पर्यंत जे जे काही घडलं जे जे काही विचारप्रवाह निर्माण झाले, त्या प्रवाहातच प्रतिबिंब Toss Equality मध्ये झालेलं दिसतं. यातून असे लक्षात आले, की आपल्याला स्वतंत्र चळवळ निर्माण केल्याखेरीज, आपल्या मागण्या मांडल्या खेरीज काही मिळेल याचा भ्रम निर्माण झालेला दिसतो. कारण १९७४ पर्यंत चौथी पंचवार्षिक योजना पूर्ण झालेली होती. या सोबतच कल्याणकारी राज्याची संकल्पना देखील स्थापित झालेली होती, आणि या पार्श्वभूमीवर ही स्त्रियांना काही मिळत नाही आहे. १९७३ ला महागाईविरोधी झालेल्या आंदोलनातून ग्रामीण भागापर्यंत प्रसार झाला होता. नव तंत्र म्हणजे थाळी आणि लाटणे घेऊन (पाणी वाली आणि लाटणेवाली बाई) हे वापरलं गेलं होतं,यातून एक नवीन दिशा मिळाली होती. पाणीप्रश्न व इतर प्रश्न घेऊन महाराष्ट्रामध्ये एक वैचारिक घुसळण निर्माण झालेली दिसते. आणि स्त्रिया खूप मोठ्या प्रमाणावर संघटित झालेल्या ही दिसतात. त्यावेळच्या साठेखोराना आणि आमदारांना घेराव घालून बांगड्या भेट देणं, हे नवीन तंत्र वापरलं गेलं. (त्यावर पुढे आक्षेप वगैरे... आला. हे वेगळ...) परंतु या सगळ्या बदलातून आपल्याला १९७५ आंतरराष्ट्रीय महिला वर्ष या निमित्ताने स्त्री चळवळ ही एका वेगळ्या टप्प्यावर पोहोचली आणि १९७५ ला स्त्री चळवळ विकसित होत असतांना वेगळाच मार्ग स्त्रियांना, संघटित प्रयत्नातून महागाई विरोधी आंदोलनातून, आपल्या मागण्या, हक्क, लढा साध्य होऊ शकतो. ह्या बाबी महिलांच्या लक्षात येऊ लागल्या. जवळपास १९७८ ला हुंड्याच्या अनिष्ट प्रथा किंवा प्रश्ना विरुद्धचा लढा दिल्लीमध्ये उचलला गेला, आणि त्याला महाराष्ट्रातून खूप मोठा प्रतिसाद हुंडाविरोधी चळवळीच्या रुपाने मिळाला. अनेक मोर्चे, बैठका, वैचारिक आदान-प्रदान होत गेली. साधारणपणे १९६१ च्या हुंडाविरोधी कायदयामध्ये १९८४ ला काही सुधारणा साध्य करण्यात स्त्री चळवळीला यश आलं.पुढे बलात्कार विरोधी आंदोलन, मथुरा बलात्कार प्रकरण किंवा ह्या निमित्ताने बलात्काराच्या विरुद्ध आंदोलन झालं या आंदोलनाचा भाग आपणास २०१२ च्या निर्भया केस पर्यंत दिसतो, त्यातून कायद्यामध्ये सुधारणा मोठ्या प्रमाणात झालेली ही दिसते. मथुरा बलात्कार, माया त्यागी किंवा रवीझाबी बलात्कार यातून कायद्यात जी सुधारणा झाली, ती म्हणजे खप उराशीर चौकशी आली, त्याच्यानंतर कस्टडी रेप ही संकल्पना पुढे आली, आता तर निर्भयाच्या केसच्या निमित्ताने बलात्कार कायदा हा खूप कडक करण्यात आला, तो चार भागात म्हणजे अ,ब,क,ड या विभागात विभागला गेला, आणि ३५४ हे कलम विनयभंगाच्या कलमाला ही अधिक दुरुस्ती झाली.

१९८५ ते १९९० या काळात सातवी पंचवार्षिक योजना झाली त्यामध्ये सबलीकरण या विषयावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला.एकीकडे कामगार चळवळीमध्ये स्त्रिया खूप मोठ्या प्रमाणावर आल्या आणि कामगार चळवळीतून असं लक्षात यायला लागलं की मनिवेदकारा असो, स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये या सर्व जणींच्या कामातून असं स्पष्ट होऊ लागलं, की अति उच्च पदी किंवा स्त्रियांच्या प्रश्नांना स्थान मिळत नाही किंवा कोणी भूमिका घेत नाही यातून कामगार चळवळीचा ही भ्रमनिरास झालेला दिसतो.पुढे १९८० नंतर नवीन कायदे निर्मिती असलेल्या कायद्यात दुरुस्ती किंवा ते कायदे अधिक कडक करण्यात आले आणि स्त्रिया ह्या वेगवेगळ्या पातळीवर संघटित झाल्या. १९८० मध्ये जी स्त्री चळवळीची स्थिती होती. ही स्त्री चळवळीची स्थिती यासोबतच एक बदल झाला. तो म्हणजे विविध स्वयंसेवी संस्थांची निर्मिती झाली. १९७५ ला ज्या संघटना निर्माण झालेल्या होत्या त्या संघटना त्या-त्या पातळीवर पुण्यातली पुरोगामी महिला आघाडी किंवा मुंबईतली स्त्रीमुक्ती संघटना असेल याचं काम सुरू होतं, पण विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शासकीय कार्यक्रमांचा पुरस्कार

करणार म्हणून गाव पातळीवर किंवा स्थानिक पातळीवर एन.जी.ओ.ने स्त्रियांचे प्रश्न हाती घेऊन त्या अनुषंगाने काम करू लागल्या. ह्या परिणामातून असं लक्षात येतं, की मुख्य स्त्री चळवळ म्हणून ह्या संघटना उभ्या राहिल्या नाहीत किंवा त्यांचे महत्त्व राहील नाही किंवा ते कमी झालं असे नोंदवला गेला आहे, की १९८५ मध्ये साधारणपणे असं लक्षात येतं की महागाई विरोधी आंदोलनानंतर जी स्त्री मुक्ती परिषद पुण्यात निर्माण झाली, त्यातून स्त्री मुक्ती संघटनेने सबंध महाराष्ट्रभर स्त्री मुक्ती यात्रा काढली त्यांचे पाच प्रमुख कार्यक्रम होते त्यामध्ये महाविद्यालयीन युवक-युवतींची संवाद साधणे, स्लाईड शो दाखविणे, पोस्टर प्रदर्शन करणे, परिसंवाद घडवून आणणे, व प्रबोधनात्मक गाणी सादर करणे इत्यादी या अनुषंगाने त्यांनी काम केले. त्यांनी जाणीव जागृती करिता शिबिरांचे देखील आयोजन केले. प्रेरक ललकारी सारखं मासिक चालवलं आणि विविध स्त्री प्रश्नांची चर्चा व त्याचा तड लावण्याचा प्रयत्न केला. संघर्षात्मक चर्चा एकीकडे हुंडाविरोधी, बलात्कार विरोधी, मोर्चेकाढणे, संस्थात्मक पातळीवर व वस्ती पातळीवर देखील जाणीव जागृती करण्याचं काम त्यांनी केलं. कचरावेचक महिला संघटन चेंबूर मुंबई हे त्यांच्या कामाचं प्रारूप पुढे आलं. ह्या काम करत असतानाच १९३६ राष्ट्रसेविका समिती आली आणि हिंदू स्त्रियांचे संघटन करण्याचा प्रयत्न झाला. १९७५ साली महिला वर्षाच्या पार्श्वभूमीवर साधारणपणे आता स्त्रियांकरिता स्त्री प्रश्नांत करिता काम करायला पाहिजे अशी एक प्रकारची भावना निर्माण झाली. १९८८ पासून भारतीय स्त्री शक्ती, संघटनेचं काम महाराष्ट्रात सुरू झालं...

स्त्री संघटनचे तीन महत्त्वाचे कार्य होते. एक वाचक संघ, दोन बचत गट आणि तिसरे कुटुंब साहाय्य केंद्र इ. या कामातून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. विविध विषयांवर संशोधन करून प्रबोधिनीच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम म्हणून हे काम भारतीय स्त्रीशक्तीने केलं. पण एकंदर हिंदुत्ववादी आणि हिंदुसाठी भूमिका अशी होती. स्त्री प्रश्न असतील पण त्याची तड जर लावायचे असेल, तर त्याची तड चौकटीतच लावली गेली पाहिजे. अशा प्रकारची भूमिका या चळवळीने घेतली. महाराष्ट्रातल्या ह्या चळवळी चलू असतांनाच पुरोगामी महिला संघटना किंवा सत्र मुक्ती संघटना असतील संघटनांचे नेतृत्व हे प्रामुख्याने मध्यमवर्गीय, शिक्षित, उच्चवर्णीय, उच्च जातीय स्त्रियांकडे असलेले दिसते, आणि ते त्यांच्यामध्येच राहिलेले दिसते. आणि आपल्याला असे लक्षात येतं, की त्यांच्या परीप्रेक्ष्यामध्ये दलित, मुस्लिम, स्त्री असलेली दिसत नाही. यासोबतच एक उल्लेख असा २२ मार्च १९७० पासून मुस्लीम सत्यशोधक समाजाची स्थापना हमीद दलवाईंच्या प्रेरणा आणि नेतृत्वातून झाली. आणि त्यांनी महात्मा फुले यांचा विचार प्रमाण मानून त्यांनी मुस्लीम महिलांच्या उन्नतीसाठी कार्य बांधणी केली. ज्यात मोर्चेबांधणी, एकसंधता केली. १९६६ पासून त्यांच्या कार्याला सुरुवात झाली. शिक्षणाचा प्रश्न ही लावून धरला. १९७१ मध्ये त्यांनी जगातली पहिली मुस्लीम महिला परिषद गठित केली. जवळपास १७६ मुस्लीम महिला त्यात सहभागी होत्या. द्विभार्या प्रतिबंधक, जुबानी तलाक बंदी करावी अशा मागण्या होत्या. शिक्षण परिषद जी आयोजित करण्यात आली. मदरशांमध्ये दिल्या जाणाऱ्या धार्मिक शिक्षणाबद्दलचे आक्षेपही नोंदवले गेले, आणि त्या शिक्षणाचे आधुनिकीकरण करावे अशी मागणी त्यांनी केली. आपल्या लढ्यातून अनेक मागण्या मान्य झालेल्या दिसतात. त्यांनी संस्थात्मक बांधणीतून कार्य केले. १९७९ ची शाहबानो केस. मुस्लीम महिलांच्या संघटनेच्या निमित्ताने महत्त्वाचा टप्पा झाला. शहाबानो केस राजकारण आपणा सर्वांना ज्ञात आहेच, परंतु मुस्लिम महिलांना त्याचं आत्मभान मिळालं/अनेक मुस्लीम महिला स्वत:च्या अस्तित्व, प्रगतीबाबत सजग झाल्या. आणि त्या काम करू लागल्या, याचीही नोंद आपणास घ्यावी लागेल. यासोबतच अजून एक चळवळीचा धागा किंवा प्रवाह आपल्याला दिसतो.

शेतकरी आणि शेतमजूर महिलांसाठीचा १९८० च्या दशकामध्ये साधारणत: असे लक्षात येते, की शेतकरी महिला आघाडीच्या माध्यमातून शेतमजूर आणि शेतकरी महिलांचे प्रश्न १९८० ते ८४ मध्ये स्व. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली हे काम सुरू झालं. आणि ग्रामीण भागातल्या स्त्रीला आर्थिक प्रश्नांवर लढण्यासाठी, संघटीत करण्याचा प्रयत्न झाला. १९८६ चे चांदवड परिषद स्त्रियांसाठी एक मैलाचा दगड ठरलेली दिसते. कारण या परिषदेमध्ये अनेक प्रश्नांबरोबरच (रोजगार, शिक्षण) होते. तिथे ३ लाख स्त्री-पुरुष होते. त्यातील निम्म्या स्त्रिया होय. लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम झाला. यांच्याकडे शेती आहे. त्या कुटुंबामधल्या शेतीच्या सातबारावर नवऱ्याबरोबर पत्नीचे नाव लावावं हा कृती कार्यक्रम होता. मालमत्तेचा अधिकार देण्याच्या कार्यक्रम होता. आजही नाशिक जिल्ह्यात जिथे कुठे शेतकरी आघाडीचा प्रभाव आहे त्या भौगोलिक प्रदेशाचा जर अभ्यास केला तर अनेक स्त्रिया ह्या शेतमालक झालेल्या दिसतात. जरी महिलांनी शेतीचा शोध लागला असला, तरी प्रत्यक्षात येण्यासाठी शेतकरी आघाडीच हे काम महत्त्वाचं असल्याचं दिसतं, हीच भूमिका पुढे परिषदेचा धागा जेंव्हा मराठवाड्यात २००३ मध्ये गायरानाचा लढा सुरू झालेला होता, दादासाहेब गायकवाड स्वाभिमान सबलीकरण योजना, शासनाने आणलेली होती. त्या शासनाच्या निर्णयाचं मसुदा समिती निर्माण केली गेली, आणि त्याचे सभासदत्व त्या वेळेला मंगल खिवंसरा आणि डॉ. शांताराम पंधेरेकडे होतं. त्यांनी ज्या वेळेला लक्ष्मी मुक्तीआंदोलनातून प्रेरणा घेऊन किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातून प्रेरणा घेऊन जो स्त्री-पुरुष समानतेचा मसुदा तयार केला, आणि स्त्रियांना या योजनेखाली मिळणाऱ्या जमिनीची मालकी मिळावी अशी तरतूद केली गेली. शेतीच्या जमिनीची मालकी हा २००३ चा अध्यादेश आहे, पण त्याची आजही अंमलबजावणी झालेली दिसत नाही, ही खेदाची बाब आहे.मुळात अशा पद्धतीने विविध गटाच्या चळवळी होत असताना, विविध राजकीय पक्ष आरक्षणातून महिला आघाड्या निर्माण केल्या.

आरक्षणामुळे जवळपास पंधरा लाख ग्रामीण महिला निर्णय प्रक्रियेत आल्या असं माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी नोंदवलेलं आहे, कारण त्यावेळी प्रश्न पडलेला होता की, आता भाकरी कोण भाजणार? आता भाकरी कोण भाजणार हा अहवाल प्रसिद्ध झालेला दिसतो. आता भाकरी भाजणाऱ्या १५ लाख स्त्रिया निर्णय प्रक्रियेत आल्या म्हणून हा सत्तेचा बिंदू महिलांकडे सरकलेला दिसतो, आणि त्यातून महिला आघाड्या निर्माण झाल्या, अनेक महिलांना सार्वजनिक जीवनामध्ये हे पद मिळायला लागलं. मुळात अशा पद्धतीने विविध गटा तटा मधल्या चळवळी होत असतांना विविध राजकीय पक्षांनी स्वतःच्या महिला आघाड्या स्थापन केलेल्या दिसतात. एकूण पक्षाच्या ध्येय धोरणाशी सुसंगत अशी भूमिका या महिला आघाड्यांनी घेतलेल्या दिसतात. त्यातून फारसं काही साध्य झालं नसलं तरी स्त्रिया संघटित झाल्या सामुहिक रित्या मोर्चा, मागण्यांमध्ये त्यापुढे येऊन मांडणी करायला लागल्या. आरक्षणामुळे जवळपास पंधरा लाख महिला पंचायतराज व्यवस्थेत आल्या. पुढे महिला आघाडी निर्माण झाल्या. या आघाड्यांचे काम मुख्य पक्षाच्या ध्येय धोरणाला पाठिंबा देणं जरी असलं आणि मुख्यत: पोलचीट वाटणे आणि हळदीकुंकवाचे कार्यक्रम करणे अशा प्रकारचे जरी असले, तरी महिलांना एक प्रकारचं स्थान किंवा दर्जा मिळत गेला हे आपल्याला नोंद घेऊन ठेवावं लागेल.

काही मुद्यांवर ह्या चळवळी निर्माण झालेल्या आहेत. बलात्कार विरोधी म्हणजे बलात्काराच्या संबंधी सबंध मथुरा प्रकरणापासून तर आजतागायत पर्यंत मग भंवरीदेवी हे त्याचे वेगळे प्रारूप आलं, आणि त्यातून २०१३ चा कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण निर्मुलन व प्रतिबंध कायदा आपल्याला मिळाला, जळगावच्या वासनाकांडाने स्त्रियांना कलम १६४ मिळालं. १६४ dying declaration घेत असतांना कलम१६४ मध्ये In Camera ते घ्यावं आणि NGO चा प्रतिनिधी तिथे हजर असावा. अशी तरतूद करण्यात आली. त्यानंतर हिंसेचं एक वेगळ प्रारूप ४९८ (अ) सारखा कायदा आला. कुटुंब न्यायालय प्रस्थापित झालं. १९८४ ला हुंडाविरोधी कायदा अधिक कडक झाला. स्त्रीमुक्ती संघटनेतून मुलगी झाली हो हा प्रयोग सगळीकडे जाणीव जागृतीचा होत होता, आणि १९९४ गर्भपात हा मोठ्या प्रमाणावर होतो, आणि विशेषत्वाने स्त्री गर्भाचा गर्भपात होतो हे चळवळीने लक्षात आणून दिलं. त्यानंतर PC-PNDT गर्भ जल विरोधी परीक्षण कायदा हा आपल्याला मिळाला.

हिंसेचं दुसरं प्रारूप आपल्याला अलीकडच्या काळात निर्माण झालं होतं, एकतर्फी प्रेमातून हत्या करणं किंवा त्या महिलेला विद्रूप करून टाकायचं जगणंच नाकारायचं मग मुंबईची रिंकू पाटील असेल औरंगाबादची विना देशमुख असेल श्रीरामपूरची मुंदडा असेल किंवा ऍसिड अटॅकची लक्ष्मी अग्रवाल असेल किंवा इतर अनेकजणी असतील, ह्या संदर्भाने या चळवळी उभ्या राहिल्या. एकतर्फी प्रेम म्हटल्यानंतर आणखी एक भाग आला तो म्हणजे ऑनर किलिंगचा होय. महाराष्ट्राचा पॅटर्न ऑनर किलिंग बाबत समोर आला. आपणास असं लक्षात येतं, की ऑनर किलिंग चा हा काय म्हणायचा पण तो शब्द वापरला जातो. कुणाचा ऑनर, कुणाचा सन्मान, कोण त्याची किंमत देतं, आणि सन्मान तरी नेमका काय? असे अनेक प्रश्न स्त्री चळवळीमध्ये काम करतांना पडत आहेत, परंतु नांदेड चे सातगाव असेल, औरंगाबादचे पालपारधी असेल, अहमदनगरची सोनाई, कोपर्डी हत्याकांड असेल, असे अनेक ऑनर किलिंगचे प्रारूप महाराष्ट्रभर निर्माण झाले. आणि त्याविरुद्ध त्या त्या वेळेला काही चळवळी ह्या निर्माण झाल्या. जसे एकतर्फी प्रेमातून हिंसा किंवा स्त्रियांची लैंगिकता या बद्दलचे प्रश्न समोर आले.तसेच पुढे परित्यक्ताचं त्यांच्यासाठीचं आंदोलन झालं, १९८४ ला एक महत्त्वाची परिषद औरंगाबादला झाली, आणि परित्यक्ता हा किती मोठा गट आहे, आणि तो कुठच्याच चौकटीत कसा बाध्य नाही? अशा प्रकारचा एक अस्वस्थपणा १९८४ च्या परिषदेने महाराष्ट्राला दिला. आणि एकल महिला म्हटलं आणि ह्यातून समाजवादी विचारांच्या मंडळींनी ही परिषद घेतलेली होती. निषा शिऊरकर यांच्या नेतृत्वाखाली ही परिषद झाली. आणि एकल महिलांचे संघटन करण्याचा प्रयत्न हा सातत्याने होत गेला.

महाराष्ट्रात अजून एक आंदोलन सातत्याने झालं आणि ते एक दारूबंदी आंदोलन होतं यामध्ये बहुसंख्य स्त्रिया सहभागी झाल्या. कायदा झाला पण कडक अंमलबजावणी झाली नाही. दारूतून खूप मोठा महसूल मिळतो, आणि मिळालेल्या महसुलाचा खूप मोठा वाटा महिलांना आणि बाल कल्याणासाठी आम्हाला खर्च करता येईल अशी एक सुटसुटीत मांडणी किंवा सोयीची मांडणी या अनुषंगाने झाली. आणि ह्या मध्ये पुन्हा वेगवेगळे गट सहभागी झाले, आता अलीकडच्या ज्या जागा निर्माण झालेले प्रश्न होते, त्यामध्ये आत्महत्याग्रस्त एकल महिलांचे प्रश्न हा एक मुद्दा पुढे आला. शेतकरी कुटुंबात होणाऱ्या आत्महत्या, त्यातून निर्माण होणाऱ्या एकल महिला, त्यांचे काही प्रश्न पुढे येत आहेत कारण वारस म्हणून नाव नाही नावावर शेती नाही व घर नाही माहेरी व सासरी दोन्हीकडे ही जागा नाही उत्पन्नाचं इतर कोणतेही साधन नाही अशा सारखे प्रश्न किंवा समस्या समोर आल्या. महिला किसान अधिकार मंचच्या अनुषंगाने सीमा कुलकर्णी यांचे नेतृत्व पुढे येत आहे.

दलित अत्याचार आणि महिला हे एक स्वतंत्र मांडण्याचं आणि स्वतंत्र खूप मांडणी करता येईल. अशी घटना घडते याचे अनेक Fact finding reports हे केलेले आहेत. प्रत्येक ठिकाणी दलित महिलेवरचे हे अत्याचार दोन प्रकारे घडतात. एक म्हणजे 'स्त्री आहे म्हणून' आणि दुसरे म्हणजे 'ती दलित स्त्री आहे म्हणून'. ती अत्याचाराच्या केंद्रस्थानी आलेली दिसते, मग त्यातून खैरलांजी असेल सातेगाव सिंधी, अहमदनगर असे त्यातून अनेक आंदोलनं, आकृतिबंध निर्माण झालेले दिसतात. स्त्रियांच्या लैंगिकतेवर त्यांच्या जातीय स्थानाबद्दल यातून अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. खैरलांजी हे त्याचे एक मोठं उदाहरण म्हणून आपल्याला पाहता येऊ

शकतं.या सगळ्यात साधारणपणे चळवळीतून आपल्याला काय काय मिळालं, काय प्राप्त झालं? तर असे लक्षात येते की गर्भपात विरोधी कायदा मिळाला, बलात्काराचे कायदे अधिक कडक झाले, शहाबानो व त्यानंतरच्या प्रकरणानंतर साधारणपणे मुस्लिम महिला विषयक प्रश्न पुढे आले, तलाक विरोधी वातावरण निर्माण झालं, नोकरदार महिलांसाठी २०१३ ला अधिनियम आला, काही प्रश्न हे एकोणिसाव्या शतकापासून आजपर्यंत सतीबंदी झाली, कायदा झाला असे म्हणून विश्वास टाकेपर्यंत १९८४ ला रूपकुंवर सती गेली, हुंडा हा उच्च जातीयांना मध्येच दिला जातो, असे म्हणतानाच १९६१ ला हुंडाविरोधी कायदा करावा लागतो, कारण सगळ्या जाती, धर्म, पंथीयांनी हुंडा प्रथा अंगिकारलेली दिसते. आणि त्यातून १९८४ ला हा कायदा अधिक कडक करण्याचा प्रयत्न झाला. पण एवढं होऊनही आजही हुंड्यासाठी छळ झालेल्या, बळी गेलेल्यांची आकडेवारी आपल्याला 'नॅशनल क्राईम रिपोर्ट' मध्ये सातत्याने बघायला मिळते. आता हे सगळं होत असताना जळगाव मध्ये मुस्लिम महिला संदर्भात मुस्लिम महिलांकरिता काम करताना रजिया पटेल हे नेतृत्व पुढे आलेले दिसते. साध सिनेमा बघायला बंदी म्हणजे, किती छोट्या छोट्या मुद्द्यावर किती मोठ मोठा लढा द्यावा लागतो. स्त्रियांच्या चळवळीना छोटे छोटे पोत म्हणजे त्यादेशा पुरते गावा पुरते मर्यादित असला तरी, मुद्दा किती मोठा आहे हे आपल्याला लक्षात येतं. आणि म्हणून आपल्याला लक्षात येतं की खूप आंदोलने झाली, स्वातंत्र्यलढा असेल डॉ. आंबेडकर याच्या नेतृत्वाचा, मानवमुक्तीचा लढा असेल, किंवा दादासाहेब गायकवाड यांचा भूमी मुक्तीचा लढा असेल, तर यासोबतच विनोबा भावेंच्या नेतृत्वाखालील भूदान चळवळ असेल. भावेंच्या भूदान चळवळीत सुद्धा स्त्रिया सहभागी होत्या, आणि स्त्रियांनी काय करायचं व स्त्रियांना जर पुढे यायचं असेल तर त्यांनी सन्याशी म्हणून वागावं अशा प्रकारचा एक कार्यक्रम विनोबांच्या भूदान चळवलीच्या नेतृत्वात राहिलेला दिसतो. त्यानंतर मराठवाड्यातल्या निजाम विरुद्धचार निजाम विरुद्धच्या लढ्यामध्ये महिला सहभागी असल्याचे आपल्याला दिसतात. अनेक अनेक लढे सांगता येतील, दलित आघाडीचे किंवा दलित महिलांच्या विद्रोहाचे दोन रूप डॉ. अवचार नोंदवतात.

एक नामांतराचा लढा ज्यामध्ये १४ वर्ष हा लढा महिलांनी ज्वलंत ठेवला, आणि सबंध लढयावरती त्यांनी एक जागल्याची भूमिका घेतली, हेही आपल्याला नोंद घ्यावी लागेल असे त्या सांगतात, खैरलांजी प्रकरणांमध्ये ही एक चांगली भूमिका महिलांनी निभावलेली आपल्याला दिसते असेही त्या म्हणतात. अनेक चळवळींमध्ये भटक्या-विमुक्तांची चळवळ आहे. तिथेही महिला आहेत त्यांच्याही महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, त्यांचे आंदोलन चळवळ निर्माण झालेली दिसते.आज आपल्याला लक्षात येतं की आजचे प्रश्न म्हणून गेल्या दहा वर्षांत निर्माण झालेले प्रश्न म्हणून आपल्याला तीन चळवळी लिहिता येतील किंवा मांडता येतील त्यामध्ये ठळसहीं झशश स्वच्छतागृह उपलब्धता घरामध्ये, घराबाहेर, सार्वजनिक ठिकाणी, शाळा-महाविद्यालय, कामाच्या ठिकाणांमध्ये राहणाऱ्या वावरणाऱ्या महिलांना स्वच्छतागृह पासून सुरक्षित (Natural forms) नैसर्गिक गरज भागवण्यासाठी सुरक्षित साधनं मागणारी Right To Pee ही चळवळ आज मुंबईमध्ये निर्माण झालेली दिसते काही प्रमाणात मुंबईमध्ये ह्या चळवळीला यश मिळालेलं दिसतं. आपल्याला सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृह दृश्य स्वरूपात तरी निर्माण झालेली दिसतात. परंतु शहरांमध्ये ही चळवळ आहे. तिचा खेडोपाडी सुद्धा प्रसार होणे किंवा त्यावर काम करणं आवश्यक आहे. कारण जे अनेक अहवाल आहे विशेषतः मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण का कमी होत आहे असा प्रश्न घेऊन शाळांचे जेव्हा अभ्यास झालेले आहेत तिथे स्वच्छतागृहाचा अभाव हे महत्त्वाचं कारण आहे.

वाहतूक व दळणवळणाच्या सोयी उपलब्ध आहेत त्यातील महिलांचा वावर कमी आहे, याचा देखील एक महत्त्वाचं कारण म्हणजे स्वच्छतागृहाच्या उपलब्धतेचा अभाव हे होय. खेड्यांमध्ये विशेषत: महिलांना किडनीचे प्रश्न आरोग्यावर विपरीत परिणाम हे या उपलब्धतेच्या अभावाचे कारण आहे. पूर्वी पांदी, शेतीचे बांध, बांधावरचे झाडंझुडपं छोट्या खोदलेल्या चर/लवण ह्या नैसर्गिक मात्र विसर्जनाच्या प्रवृत्तीला मार्ग करून देण्याचा आडोसा म्हणून उपयोगी पडत होते, परंतु शेतजमीन ही जितकी महत्त्वाची होत गेली, आणि त्याच्या सोबतीला यंत्र आलं, त्यामुळे तितका तितका हा झाडांचा झुडपांचा आडोसा कमी कमी होत गेला. आता शेतीत कामासाठी जाणारी दिवसभर राबणारी स्त्री सुद्धा तिच्या ह्या नैसर्गिक प्रवृत्ती वरती निर्बंध ठेवण्यास बाध्य झाली. त्यातून तिचे आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले. स्त्री शिक्षणाचे प्रश्न निर्माण झाले Right to Pee (RTP) हे आता गरजेच ठरलंआहे. दुसरी एक चळवळ म्हणजे आज आपल्याला असे दिसते, की भारतीय समाज जीवनाच्या वरच्या क्षेत्रावर ती आहे याचा खाली फारसा बोलबाला होत नाही. ही चळवळ म्हणजे me too होय. me to साधारणत: २०१७ ला निर्माण झालेली चळवळ होय परंतु २०१८ ला ती आपल्याकडे आलेली दिसते. तनुश्री दत्ताच्या माध्यमातून ही चळवळ पुढे आलेली दिसून येते, तिने नाना पाटेकर या कलाकारावर लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. तनुश्री दत्ताच्या मांडणीनंतर आपल्याला असं लक्षात येतं, की अनेक प्रसारमाध्यमांमध्ये शासनामध्ये अनेक जणींनी आपणही अशा प्रकारच्या लैंगिक अत्याचाराला बळी पडलेले आहोत, अशा प्रकारच्या तक्रारी पुढे होऊन केलेल्या, नोंदवलेल्या दिसतात. स्त्रियांवरच्या अत्याचारांच्या तक्रारींची दाद मागण्याचा प्रयत्न स्त्रिया करत नाहीत हे एक वास्तव आहे. तरीसुद्धा ही चळवळ मूळ धरू लागली आहे. स्त्रिया काही प्रमाणात का होईना पुढे येऊन अत्याचाराबद्दल दाद मागत आहेत. असंही निदर्शनास येतं. आणखी एक महत्त्वाचं बिल आलेलं आहे ते म्हणजे Right to Disconnect होय.मा. खा. सुप्रिया सुळे यांच्या पुढाकाराने आलेलं हे बिल आहे. ते सर्वांसाठीच आहे. एकीकडे सायबर क्राईम मोठ्या प्रमाणावर घडतोय, त्याला बळी पडणाऱ्या

स्त्रिया आहेतच. गुन्हेगारी प्रवृत्ती, स्त्रियांसाठीच अत्याचाराचं एक क्षेत्र यातून निर्माण झालेलं दिसतं, आणि काम करतांना करोनाच्या पार्श्वभूमीवर digital क्रांती आलेली असतांना आणि अत्यावश्यक असताना यामधून आपल्याला कोणते धोके आहेत, किंवा आपल्या कामाच्या अवकाशावर त्याचं किती आक्रमण होत आहे याचं निवेदन आणि त्यापासून सुटका ही RIGHT TO DISCONNECT या चळवळीतून येतांना दिसते.

या सगळ्या चळवळी प्रामुख्याने काही ठोस चळवळीबद्दल उहापोह केला असं लक्षात येतं, किंवा मुळात हे लक्षात ठेवावं लागतं, की भारतीय स्त्री हे काही एकतर्फी, एकसंघ असं वास्तव नाही. भारतीय स्त्रिया वेगवेगळ्या जातीत, धर्मात, पंथात, पक्षात, प्रदेशात भिन्न भाषा बोलणाऱ्या गटाच्या समूहात समाविष्ट आहेत. आणि म्हणून त्यांचे सगळेच प्रश्न, त्याचे स्वरूप, तीव्रता ही सारखी नाही. त्यामुळे सगळ्याच प्रश्नांवर ती सगळीच उत्तरही एकसंघ येत नाहीत आणि येण्याची शक्यता सुद्धा नाही. आपल्याला असं लक्षात येतं की चळवळ १९७५ पासून आली एकत्र येण्याचा प्रयत्न झाला, काही गट- संघटन हे (नवीन स्त्रीवादी चळवळ) १९७५ नंतर आलं, चळवळीमधून जे नेतृत्व आलं ते शहर, उच्चशिक्षित, उच्चजातीय उच्चवर्णीय असं होतं इतकंच नाही, तर विविध विचार प्रणालीतून त्यांनी त्यांनी आप-आपल्या विचार प्रणालीतूनही काही कामे करण्याचा प्रयत्न केला. परंतु या एकमेकांशी किमान समान मुद्द्यावर एकत्र येण्याचा प्रयत्न झाला नाही. आणि म्हणून आपल्याला दोन्ही गोष्टींची नोंद घ्यावी लागते. की दलित महिला आघाडीने असं म्हटलेल आहे. किंवा नेहमीच म्हटलं जातं की, (डॉ. पी.जी. जोगदंड यांच्या दलित वुमेन या संपादित ग्रंथात, अविनाश डोळस असं म्हणतात, की ज्या वेळेला औरंगाबाद मधल्या सिल्लोड मध्ये गायरानाच्या जमिनीचा लढा हा लढण्याचा प्रयत्न केला गेला, किंवा जमिनी स्त्री-पुरुषांच्या नावावर कराव्यात. म्हणून अध्यादेश करून त्याची अंमलबजावणी करा, असा लढा ज्या वेळेला लढला गेला त्या वेळेला व्यापक स्त्री चळवळींनी त्याला पाठिंबा दिला नाही ती दलित चळवळ म्हणून बाजूला टाकली गेलेली दिसते आणि ही स्थिती खैरलांजी प्रकरणातही दिसते. विशेषत्वाने बळी पडलेली कोण आहे? आमची आहे का? तुमची आहे? अशा वाटण्या होत चळवळीने अनेकदा बचावात्मक भूमिका ही घेतलेली दिसते. आणि हे दलित चळवळी बाबत जितकं खरं आहे तितकंच आम्हाला 'आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने सुद्धा किमान काही समान प्लॅटफॉर्म वर सहभागी करून घेतलं जात नाही' अशी तक्रार भारतीय स्त्रीशक्ती संघटनेनेही केलेली दिसते. आणि म्हणून आपल्याला हे वास्तव लक्षात घ्यावं लागतं की स्त्री चळवळ म्हणून एकसंध ही रहाणं नाही राहिली नाही किंवा पूर्वीही नव्हती असेही प्रकर्षाने जाणवते. परंतु आपण त्याचे विवेचन करताना म्हणतो की पूर्वी होतं आणि आता नाही ही बाब वास्तवतेची जोडूनच त्याबाबत मांडणी केली पाहिजे. विशेषत्वाने समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी तर फार जबाबदारीने या बाबींचाविचार मंथन व मांडणी करावी. अनेकदा संदर्भ आढळतो, की 'स्त्रिया भांडखोर असतात' म्हणून कुटुंब फुटतात, असं जे पुस्तकांमध्ये लिहिलेलं आढळतं, तेच आपण स्त्री चळवळीबद्दल बोलतो आणि म्हणतो की, तुम्ही एकत्र येत नाही, आमचा काय दोष? तुमच्या मागण्या तुम्ही एकत्रपणे मांडल्या, तर आम्ही काही बोलू! ही बचावात्मक भूमिका पितृसत्ताक समाजव्यवस्थेत जो तो स्तरीय, जातीय आणि धर्मीय चौकटीमध्ये घेत जाताना दिसतो. आणि म्हणून स्त्री चळवळी आता कुठे आहेत असा प्रश्न सातत्याने केला जातो.

याप्रसंगी स्त्री चळवळीचा ऐतिहासिकतेपासून तर आजतागायत असा लेखाजोखा नियोजित वेळात मांडणे, ही एक तारेवरची कसरत होती असेही त्या म्हणाल्या, त्यामुळे काही मांडणे सुटलं असेल तर लक्षात आणून द्यावे असेही आवाहन त्यांनी उपस्थितांना केले, ज्यामुळे पुढील मांडणीत सुधारणा करता येईल. असे प्रांजळ मतही त्यांनी मांडले. मुद्दा किंवा समस्या निर्माण होते. महिला एकत्र येतात, आपाआपल्या पक्षीय, धार्मिक, सामाजिक जातीय चौकटीतून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. आपाआपल्या परीने उत्तर मिळवतात कधी शासनाच्या तर कधी एन.जी.ओ. च्या मदतीने हस्तक्षेप करून उत्तर मिळवतात आणि उत्तरं मिळाले की पुन्हा एकदा त्या व्यवस्थेत निघून जातात. पुन्हा एका नव्या प्रश्नाच्या प्रतीक्षेत असतात. प्रश्न संपत नाहीत, उत्तरं शोधण्याचा लढाही संपत नाही, अशीही एक बहुआयामी, बहुपदरी अशी महाराष्ट्रातली स्त्री चळवळ दिसते.

डॉ. स्मिता अवचार यांच्या मांडणीवर प्रतिक्रिया देतांना डॉ. श्रुती तांबे म्हणाल्या, डॉ. स्मिता अवचार यांनी एका क्लिष्ट,अवघड विषयावर उत्कृष्ट मांडणी केली. या विषयाचा परिघ खूप मोठा दिसतो. भारतीय समाजामध्ये जी उतरंड आहे, त्याप्रमाणे परत आकांक्षा आणि त्या पद्धतीच्या चळवळी म्हणा, छोट्या छोट्या मोहिमा म्हणा, असा फार मोठा पट तो होता, परंतु त्यांनी आपल्याला एक चांगली अभ्यासपूर्ण मांडणी करून एक प्रवास घडवून आणला. यावेळी श्रोत्यानी विचारलेल्या विविध प्रश्नांना डॉ. अवचार यांनी समर्पक उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले तर डॉ. अर्चना जगतकर यांनी आभार मानले.

प्रस्तुत व्याख्यान ऐकण्यासाठी आवर्जून भेट द्या.

Link: https://youtu.be/6M5gxzl5OM4

■■■

अहवाल लेखन

डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे (नवलाखे)

परिसंवाद
महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि सद्यकालीन परिस्थिती

दिनांक: १३ जून २०२१ वेळ सकाळी : १०.३०

अध्यक्ष : डॉ. प्रल्हाद जोगदंड,
मुंबई विद्यापीठ मुंबई.

सहभाग
प्रा. डॉ. श्रुती तांबे, पुणे
प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे, कराड
डॉ. शिवकुमार सोळुंके, जालना

अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे

प्रास्ताविक :

परिसंवादाचे प्रास्ताविक करतांना डॉ. संजय कोळेकर म्हणाले की, मागील काही महिन्यांपासून म. स. प. च्या वतीने सातत्याने अनेक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे, त्यात काही व्याख्याने व्याख्यानमाला व कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या त्याचा एक पुढील टप्पा म्हणजे आजचा परिसंवाद होय.महाराष्ट्र आणि सामाजिक चळवळी यांचा एक नातेसंबंध आहे, महाराष्ट्राची ज्यावेळी आपण जडणघडण पाहतो, त्यावेळी सामाजिक चळवळी बाजूला ठेवून महाराष्ट्राची जडणघडण, इतिहास सद्यस्थिती देखील अभ्यासणे, हे अत्यंत अवघड आहे. आणि त्यामुळे महाराष्ट्राची एकूण सामाजिक, राजकीय संस्कृतीची बैठकही आपण पाहतो. त्यावेळी ती सामाजिक चळवळीच्या घुसळणीतून उभी राहिलेली आहे, किंबहुना भारतातील जे काही ठराविक राज्य आहेत. त्या राज्यांमध्ये महाराष्ट्र हे एक असे राज्य आहे, की महाराष्ट्राने नेहमीच भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय पटलाला एक दिशा देण्याचं काम केलेलं आहे. आणि यात सामाजिक चळवळींची भूमिका मध्यवर्ती राहिलेली आहे. आणि म्हणून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी हा खूप व्यापक विषय आहे. केवळ व्यापकच नाही, तर तो सर्वांच्या जवळीकतेचा, जिव्हाळ्याचा विषय आहे. महाराष्ट्रातली राजकारणी, समाजकारणी, अभ्यासक त्यातील सामाजिक शास्त्राचे, समाजशास्त्राचे अभ्यासक आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्रातला सामान्य माणूस हा सामाजिक चळवळी पासून आपण अलिप्त करू शकत नाही. आणि सामाजिक चळवळीची वैचारिकता, Ideological Stand जो आहे, हा नेहमीच येथील सामाजिक स्थिती आणि स्थित्यंतरं प्रभावित करीत राहिलेला आहे. त्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने आज निश्चितच मराठी समाजशास्त्र परिषदेला आनंद होतोय, की या विषयावर आपण परिसंवादाच्या माध्यमातून एक विचार मंथन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. यासाठी आपण या विषयातील तज्ञ आपल्या सोबत जोडले आहेत.आजच्या परिसंवादाच्या माध्यमातून तज्ञांच्या अनुभवात्मक, वैचारिक विचारमंथनातून या विषयावर प्रकाश टाकला जाईल, ज्यातून आपल्याला एक दिशा अथवा चर्चेला वाव मिळेल.सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने आज अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. केवळ जागतिकीकरणाचा रेटा म्हणूनच नव्हे, तर एका ज्येष्ठ अभ्यासक सामाजिक चळवळींशी संबंधित स्नेहीच्या चर्चेतून एक खंत समोर आली की कुठेतरी असं वाटतं, की सामाजिक चळवळी आणि सामाजिक चळवळीचे चर्चा विश्व हे व्यक्ती केंद्रित व्हायला लागले का? हा एक चिंतनीय प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हे गंभीर आहे.आणि ज्यावेळी म.स.प. असा एखादा परिसंवाद घेते, तर निश्चितच आपण त्यामध्ये अधिकाधिक सखोल व गंभीर अशा चर्चेची अपेक्षा करतो. आणि आनंद आहे की आजचे सहभागी, सर्व अभ्यासक व वक्ते आणि परिसंवादाचे अध्यक्ष यांची सामाजिक चळवळी बाबतची विशिष्ट अशी मांडणी ही एक उपलब्धी आहे.

आजचा परिसंवाद जेवढा संयुक्तिक आहे, तो महाराष्ट्रातील स्थित्यंतरे पाहिली तर सामाजिक चळवळींचा

विचारमंथन होणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक चळवळीची दिशा काय आहे? सा. चळवळी स्थिरावल्यात का? सामाजिक चळवळीची वाटचालीची दिशा बदलली आहे का? सामाजिक चळवळी जाती केंद्रित होत आहेत का? की जातीकेंद्रित होणे आवश्यकच आहे? महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी ह्या कामगार क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र आणि जे (सीमांत) समूह आहेत त्या सिमांतिक समूहांना प्रभावित करणाऱ्या किंबहुना त्या समूहाच्या मध्ये नव्या चळवळी उभ्या करण्यासाठी हातभार लावणाऱ्या अशा स्वरूपाची सामाजिक चळवळीची भूमिका राहिलेली आहे? आणि सामाजिक चळवळ व समाज व्यवस्था मग ते समाजकारण असेल वा राजकारण असेल सांस्कृतिक व्यवस्था असेल, शिक्षण व्यवस्था, औद्योगिक क्षेत्र असेल या सर्व व्यवस्था आणि उपव्यवस्था ह्या परस्परांना प्रभावित करताना आपल्याला दिसतात. आपण महाराष्ट्रातील राजकारण आणि सामाजिक चळवळी यांना वेगळं करू शकत नाही. महाराष्ट्रातले सांस्कृतिक क्षेत्र आणि महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी देखिल वेगळ्या करू शकत नाही. या बरोबरच महाराष्ट्रातील अकादमीक क्षेत्र, जातीव्यवस्था आणि सामाजिक चळवळी ह्या देखील आपण परस्परांपासून वेगळ्या करू शकत नाही, त्या एकमेकांना प्रभावित करीत असतात. आणि त्याच दृष्टिकोनातून महाराष्ट्रामध्ये सामाजिक चळवळी व स्थित्यंतरे हा खूप संवेदनशील विषय आहे, आणि म्हणून आनंदाची बाब ही की आजचा या विषयावर आधारित परिसंवाद आयोजन होय. मराठी समाजशास्त्र परिषदेशी संबंधित सर्व माजी-आजी अध्यक्ष, मान्यवरांच्या सन्माननीय उपस्थिती सर्व आपला म.स.प. विषयीची जिव्हाळा, आत्मीयता आणि सहकार्य व योगदान यामुळे निश्चितच मराठी समाजशास्त्र परिषद अधिक प्रभावीपणे कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले. व प्रस्तुत परिसंवादाला जोडल्या गेल्याबद्दल सर्वांचे स्वागत व आभार व्यक्त केले.

डॉ. श्रुती तांबे

डॉ. श्रुती तांबे यांनी आपल्या वैचारिक मांडणीला सुरुवात करण्याआधी म.स.प. च्या सातत्याने उपयुक्त अशा कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल धन्यवाद दिले, ज्यामुळे महाराष्ट्रात नवा चांगला विचार पसरतो आहे, अशाही भावनाही त्यांनी व्यक्त केल्या.त्या पुढे म्हणाल्या की, आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष जोगदंड सर यांनी २००३ मध्ये Gglobalization and social movement हा ग्रंथ संपादित केला आहे. ज्याचा आपण अनेकदा संदर्भ म्हणून आधार घेतो. त्यामध्ये काही सामाजिक आंदोलनावरच्या व्यस्टी अध्ययने उरीश Studies पण आहेत. प्रस्तुत परिसंवादात सहभागी असलेले तीनही साधन व्यक्ती हे केवळ समाजशास्त्रज्ञ म्हणून महाराष्ट्रातल्या आंदोलनाच्या घटिताकडे बघत नाही तर स्वतः कुठेतरी समोर येऊन आंदोलन, मोर्चा, निदर्शनांमध्ये ते असतात, अथवा लोकशाही पद्धती कुठेतरी वेगवेगळी पिटीशन किंवा पत्रव्यवहार करण्यामध्ये सुद्धा असतात आणि धोरणात्मक बदलात सुद्धा आपली भूमिका मान्य करतात व त्यात प्रत्यक्ष उतरतात. अशा ग्राउंडवर उतरणाऱ्या व्याख्यात्यांना एकत्र आणण्याचा मेळ हा निश्चितच महत्त्वपूर्ण आहे. ज्यातून नवविचार, शिकण्याची नव संधी प्राप्त होऊ शकते. विषयाचा आवाका अधिक असल्यामुळे काहीच पैलूंवर प्रकाश टाकणे शक्य होईल हेही त्यांनी स्पष्ट केले. सामाजिक आंदोलनांची सद्यस्थिती सिद्धांत संकल्पना व आजची आव्हाने या विषयावर अनुषंगाने तांबे यांनी विवेचन केले.सर्वप्रथम महाराष्ट्रातलं आजचं वास्तव काय आहे? आणि हे केवळ महाराष्ट्रातलं नाही तर भारतातले देखील वास्तव काय आहे? हे पाहणे गरजेचे आहे. पण महाराष्ट्राविषयी अर्थातच ते अधिक क्रमप्राप्त ठरतं.

पुढे मांडणीशी संबंधित त्या एक उल्लेख करतात की, इंटरनॅशनल सोसिओलोजिकल असोसिएशन ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील एक व्यावसायिक परिषद आहे. त्याचे सदस्यत्व असलेली संस्था म्हणजे मराठी समाजशास्त्र परिषद होय त्यामुळे हे नातं आपण लक्षात घ्यायला हवं आणि या आंतरराष्ट्रीय असोसिएशन मध्ये १९९९ पासून सामाजिक आंदोलनाविषयी च्या गटात मी स्वतः संशोधन समितीमध्ये सक्रिय सहभागी असल्याचे त्यांनी सांगितले. २००२ पासून सदस्य तर आहे, परंतु २०१८ ते २००० ते वीस पर्यंत सक्रीय कार्यकारिणीवर निवड झालेली असून तिथे विशिष्ट अभ्यास गट आज घडीच्या जगभरातल्या आंदोलनाचा अभ्यास करतो आहे. त्याचं देखील नेतृत्व त्या करीत आहेत. त्यामुळे मांडणी करताना आवर्जून जागतिक घटक, भारतातले एकूण राष्ट्र-राज्य म्हणून असणारी परिस्थिती, महाराष्ट्रातले जे इतिहास विशिष्ट आणि या भूमीशी विशिष्ट असे काही पैलू आहेत आणि त्या त्या ठिकाणचे, त्या त्या प्रकरणाचे वास्तव या सगळ्यांच्या संदर्भात मला एक अभ्यासक म्हणून मांडणी करायला आवडेल असेही त्या म्हणाल्या. आणि इथे चार संदर्भ घेतल्याशिवाय समाजशास्त्रीय विश्लेषण न्याय देणारे असणार नाही, म्हणून या संदर्भाचा उल्लेख असणारच आहे हेही त्यांनी स्पष्ट केले.

आपण बघितलं तर आजचं वास्तव काय याबाबत दोन शब्दात त्या वर्णन करतात. एक सरमिसळ आणि दुसरे हायब्रीड.या दोन शब्दांच्या वर्गीकरणाचा अर्थ काय, तर मुळांमध्ये हे मिश्र वास्तव आहे. सरंजामशाही भांडवलशाही काहीअंशी माहिती तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन पद्धती, याचे मिश्रण असा इन्फॉर्मेशन कॅपिटॅलिझम १९९९ च्या दरम्यान जो शब्द वापरला, त्या अर्थाने त्या तो वापरत आहेत. अशा विविध mode of product ची सरमिसळ आज महाराष्ट्रात दिसते. म्हणजे आदिवासी भागांमध्ये आजही आपल्याला काही ठिकाणी अजूनही 'बंधूआ मजदूर' वेठबिगार, काम करणारे लोक दिसतात. दलितांवर अत्याचार आजही गावगाड्यांमध्ये चालू आहेत. सरंजामशाही प्रकारची एक व्यवस्था आजही आपल्याला दिसते. मूल्यव्यवस्था

तीच आहे असा आपल्याला दिसतं, दुसरीकडे भांडवलशाही आज आपल्या विद्यापीठांमध्ये देखील हाताळत (Operate) करते आहे, की ज्या कोर्समध्ये नफा आहे, ते चालू ठेवा बाकी समाजशास्त्र सारखे विषय बंद केले तरी हरकत नाही. आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित जी एक तंत्रज्ञान केंद्री अशी महत्त्वपूर्ण उत्पादन पद्धती आहे. तीही आलेली आहे याचा परिणाम असा आढळतो की समाज घटकांमध्ये सुद्धा या सर्व प्रवाहांचे आपल्याला प्रभुत्व आणि प्रतिबिंब दिसून येते आणि त्याचा परिणाम असा होतो, की एकुणामध्ये एक हायब्रीड, अशा प्रकारची सामाजिक नाती आणि संस्कृती आपल्याला दिसते. दुसरीकडे आपण असं बघतो की, परंपरा आणि आधुनिकता याच्या तथाकथित द्वंद विषयी भारतीय समाजशास्त्रात इतकं लिहिलं गेले की त्याचे सुद्धा काही छोटे छोटे आपल्याला ripples आज सुद्धा आसपास दिसतात.ही बाब पुढील दोन ते तीन उदाहरणांवरून स्पष्ट करता येईल.

होळी : ज्या प्रकारे आपण 'हॅपी होली' हे जागतिकीकरणाच्या वातावरणाला साजेस संभाषिता मधलं एक रूप घेऊन आले, आणि त्याच वेळेला भरपूर दारू पिऊन स्त्रीच्या शरीराशी संबंधित शिव्या देत, रस्त्यावरन हव तसं आणि त्यादिवशी जातीय आणि एकूणच सरंजामी पद्धतीच्या जन्माधारित आपल्या अस्मितांना घेऊन, युद्ध अक्षरश: घडणं मग ते कधी प्रत्यक्ष घडतं, तर कधी खून सुद्धा घडतात किंवा सांकेतिक स्वरूपामध्ये मानसिक द्वंद्व आणि युद्ध देखील घडत राहतात अशाप्रकारे आपण होळी पाहतो.

गुढीपाडवा : त्याच्यातला गुढीपाडव्या वरचं वस्त्र हे खरं तर ज्या समुदायांना या जातींना जिंकला गेलं, त्यातल्या स्त्रियांना नागव करून जी वस्त्र नाचवत तलवारीवर भाल्यावर आणलेली असतं आणि ती स्वतःच्या घराला खोचली जात. कि मी किती शूर आहे, या प्रकारच्या पितृसत्ताक आणि सरंजामी प्रथा आज आपण सर्व जातींचे लोक सुद्धा आधुनिक म्हणून साजरे करताना दिसत आहोत, आणि दुसरीकडे ख्रिसमस व नववर्ष सारखे सण ज्या प्रकारे वापरले जात आहेत, आपल्या सगळ्या एकूण समाज भानामध्ये ते पहाता मला काही संकल्पना आपणास सांगाव्याशा आहेत, असे त्या म्हणाल्या.

आजचं महाराष्ट्रातला वास्तव आत्ताची आधुनिकता आहे ती लेनियर आधुनिकता होय, कॉम्प्ट, वेबर, दुर्खीम यांच्या विचारांमध्ये होती. मार्क्समध्ये जो आशावाद किंवा एका लिनियर कशा एका उत्क्रांतीचा नाही आहे, तर दिपांकर गुप्ता म्हणतात तसे ती Mistaken Modernity आहे, ती सुजाता पटेल आणि इतर अनेक शास्त्रज्ञांनी म्हटले तशी colonial modernity आजही आहे, वसाहतवाद आणि जुनी कलोनियल मूल्य यांची एक हायब्रीड colonial modernity आपल्याला इथे दिसते. आणि हायब्रीड Modernity हे ही एक नवं रूपक जागतिक पातळीवर वापरलं जातय, तेही आपल्याला आपल्याकडे अनेकदा दिसतं. या सगळ्या पार्श्वभूमीवर मुळात महाराष्ट्रातलं आजची जी काही सद्यस्थिती आहे, आंदोलनांकडे जाण्यापूर्वी मुळात समाजातले ताणेबाणे आणि गतिशास्त्र काय दिसतं तर लोकशाही नावाच्या गोष्टीविषयी आज विश्वासाचा ऱ्हास प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे. लोकशाहीचे तत्व आहे. लोकशाहीची जी एक विचारसरणी आहे. त्याची जी मूल्यव्यवस्था आहे. त्याच्याविषयी विश्वास निर्माण झालेला दिसतो. परंतु त्याच लोकशाहीच्या स्पर्धात्मक बहुमत वादाचा वापर करून कुरघोडी करणं, स्पर्धात्मक हितसंबंधी गटांचे रस्सीखेच आपल्याला त्यामुळे सतत दिसून येत राहते. आणि अशा वातावरणामध्ये आपल्याला मोजकी सामाजिक आंदोलन ज्याला समाजशास्त्रीय व्याख्येत म्हणता येतील, ती अतिशय चांगल्या प्रकारे पुढे येतांना दिसतात. परंतु ती मोजकी आहेत, बाकीच्या बहुतेक या आपल्याला मोहिमा दिसतात.

व्यावसायिक अकॅडमिक समाजशास्त्रावर एका अर्थाने आजच्या ह्या संकरित सरमिसळ असणाऱ्या वसाहतिक आधुनिकता असणाऱ्या, चुकीची आधुनिकता असणाऱ्या आणि त्याच प्रमाणे लोकशाहीचा देखील सोयीस्कर आणि हितसंबंधी अर्थ लावण्याच्या आजच्या काळामध्ये एक वेगळं अरिष्ठ त्यामुळे आलेलं दिसतं. जे अगदी मराठी समाजशास्त्र परिषद असो, वा Mahasociology असो या व्हाट्सॲपगटाने सुद्धा ते वारंवार दिसतं, जसं मार्क्सवर वर्गविग्रहाची चर्चा आहे, तसं जातीविग्रह हा आपला ऐरणीवर आलेला मुद्दा सर्व सामाजिक व्यवहारांमध्ये दिसतो. त्याचं प्रतिबिंब आपल्याला व्हाट्सॲप ग्रुप मध्ये सुद्धा पडत असलेलं दिसून येतं. काय अर्थाने मी विग्रहाचा मुद्दा इथे मांडते आहे, तर व्यावसायिक अकॅडमिक समाजशास्त्रज्ञ आहे. त्यांच्या मनामध्ये सुद्धा कुठेतरी हा संभ्रम आपल्याला दिसतोय, की जन्माधारित अस्मितेला चिकटून आपण आपली मते बनवायची आणि त्या मतांची खिंड लढवत राहायची चूक का बरोबर? त्या त्या क्षणी न पाहता की आपल्या समाजशास्त्रीय संकल्पना सिद्धांत आणि ज्ञान याच्यावरच्या निष्ठेने नुसार Professionally आपण आपली मतं आणि वर्तणूक.....त्यामुळे हा एक अरिष्टाचा भाग आपल्याला आलेला दिसतो. थोडक्यात मी असं म्हणते की महाराष्ट्रातल्या सद्यस्थिती कडे सरळ बोट करून बोलण्या ऐवजी त्यातील तीन बोटे आपल्या प्रत्येकाकडे आहेत याचेही आपण आत्मपरिक्षण करावे. असं Reflected Sociology च्या अंगाने मांडणी करीत त्यांनी पुढील विवेचन केले. कारण चिकित्सक आणि विमर्शात्मक समाजशास्त्र आपण जर मानत असू तर मुक्तिदायी समाजशास्त्राची मांडणी करण्यासाठी स्वतःला सुद्धा आपल्याला चिकित्सेच्या भिंगाखाली बघावा लागेल. कालच वास्तव काय होतं तर व्यापक लोकशाही पद्धती आणि समाज निर्माण करण्यासाठीचे लढे आपल्या महाराष्ट्राने पाहिले, आणि मला असे वाटते की महाराष्ट्राचा सुद्धा फार Uniqueness आपण किती एकमेवद्वितीय आहोत असही म्हणू नये कारण पर्यायही इतिहास सगळीकडचे लिहिले जायचे आहेत.

अर्थात आपण अतिशय सुदैवी अशा भूमीमध्ये आले आहोत, की जिथे मगाशी म्हटले तसे विमर्शात्मक होती. आणि

वैयक्तिक आयुष्य खाजगी आयुष्य आणि जाहीर घेतलेल्या भूमिका यातलं अंतर कमी कमी होत लोकांचं.... ते कधीही १००% कोणाच्याही आयुष्यात भेटत नाही. ते कमी तरी होतं की नाही कमी करण्याचा प्रयत्न तरी व्यक्ती करतात की नाही? तर महात्मा फुले, शाहू महाराज, महाराष्ट्रातले त्या त्या काळामध्ये विविध प्रवाह पाहतांना न्या. रानडे असतील, पंडिता रमाबाई असतील, ज्यांनी धर्म बदलला स्त्रीशिक्षण आणि इतर मुद्द्यांच्या अनुषंगाने लोकमान्य टिळक आणि आगरकर सुधारणावादी, नारायण मेघाजी लोखंडे, म. फुले यांचे अनुयायी ज्यांनी वर्गाला आधारित कामगार चळवळ उभारली. आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सारखा युगदर्शी नेता यांनी लोकशाही समाजवाद आणि भौतिकवादाला अनुसरून सामाजिक, राजकीय व आर्थिक न्यायाची कल्पना आणि लोकशाहीचा एक प्रत्यक्षात आणण्याचे स्वप्न नुसतं लेखी मांडलं नाही, तर आयुष्यात ते आणण्यासाठी आपलं वैयक्तिक, सामाजिक आयुष्य आणि आपलं करियर पणाला लावलं. अशी व्यक्ती आपल्या मध्ये नुकती नुकती होऊन गेली. हे आपलं भाग्य आहे. दादासाहेब गायकवाड यांच्या सारखा नेता ज्यांनी दलितांच्या भौतिक हक्कांविषयी याठिकाणी व्यवस्था बदल होणार नाही, आणि म्हणून जमीन हक्काचा लढा हा अतिशय महत्त्वाचा मानला, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सारखी व्यक्ती ज्यांनी जात कोटीक्रमाच्या व्याख्येकडे अत्यंत मूलभूत असं विमर्श करत आपलं लक्ष वेधलं, या सगळ्यांच्याकडे आपल्याला एक उदाहरण म्हणून बघता येईल, कालच्या महाराष्ट्रामधलं सामाजिक आंदोलनाचं वास्तव आणि त्याविषयी विचार विमर्श काय प्रकारे चालू होता!विवेकवाद तर्कनिष्ठा युरोपीय आधुनिकतेतील मानवी प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि समान पातळीवर सर्वांनी एकत्र येऊन सोडवणूक करण्यासाठी एकमेकांवर विश्वास ठेवणे व आंदोलनाशी जोडून घेणं, त्यामुळे कितीही राजकीय मतभेद असले, तरी चर्चेला नकार न देता एकत्र येऊन, सोडवणं आपल्याला अनेकदा या मंडळींनी केलेलं दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याला दिसतं, की विविध प्रवाह पूर्वीसारखेच जात, वर्ग, लिंगभाव आणि धर्म सुद्धा याला अनुसरून आपल्याकडे होते. आणि आर्थिक स्तरानुसार ही अनेक प्रवाह होते आणि या विविध प्रवाहांमध्ये वंचितांच्या लढ्यांना सन्मान देणे, त्यांची सन्मानाने दखल घेणे, प्रश्न सोडवणुकीसाठी पुढे येणे, या प्रकारची स्वातंत्र्योत्तर काळातली आपल्याला एक दिसते. मग संयुक्त महाराष्ट्र चळवळ मध्ये ज्याप्रकारे कामगार नेते आणि दलित नेते एकटे आलेले आपल्याला दिसतात. अण्णाभाऊ साठे जीवन कार्य जर आपण बघितलं तर लक्षात येतं, की अण्णाभाऊ हे एक विलक्षण तत्कालीन नेतृत्व होतं, परंतु तो काळ मग पूर्ण वाचताना हेही लक्षात येतं, की त्या वेळेला अनेक विविध असे प्रवाह एकमेकांबरोबर झगडत ही होते आणि लेश्रश्ररलींरींश होत होते. आणि या विविध प्रवाहांमुळेच आपल्याला दिसतं, की स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या दहा ते बारा वर्षांमध्ये स्त्री दलित आणि कामगार आंदोलने हे वेगवेगळ्या पातळ्यांवर पुढे आले. १९७० नंतर विशेषत: केवळ स्त्रियाच नाही तर महाराष्ट्रामध्ये भूमिहीनांचा प्रश्न, आदिवासींचे प्रश्न यासाठीं चे रश्रश्रळरपलश पण आपल्याला उभे राहिलेले दिसतात.आपण जाणतो की मागोवा गट असेल वा इतर काही प्रयत्न असतील, ज्यांच्यामध्ये मुंबईमधल्या दलित कवी पासून तर आय.आय. टी. मध्ये शिक्षण पूर्ण करून स्वतःला झोकून दिलेल्या मुलांपासून ते उच्च जातीय विवाहित स्त्रिया पर्यंत अनेक लोक आपापले घर, संसार, मूलबाळ, खाजगी स्वप्न सोडून एका भूमिहीन आदिवासीच्या लढ्यामध्ये सामील झाले होते, हे महाराष्ट्रातील गौरवशाली उदाहरण आहे.आपण जर भारत पाटणकर सारखे उदाहरण पाहिले तर त्याच काळामध्ये भूमिहीन दलित आदिवासी जमीन आणि पाण्याचा प्रश्न म्हणजे नैसर्गिक स्त्रोत ची लढाई किंवा लढे त्या काळामध्ये उभे राहिले, आणि त्या लढ्याला मधलं आपल्याला काय दिसतं, तर लोकशाही समाजवाद ही अपेक्षा म्हणजे लोकशाहीचा जो खुलेपणा आहे, तो राहावा पण सगळ्यात तळाच्या माणसाला भाकरी आणि जमीन, जल, जंगल, संसाधन त्याबद्दलचे कायदेशीर हक्क म्हणजे स्त्रोतांवर ची मालकी या प्रकारची एक जात आणि वर्ग, जात वर्ग आणि लिंगभाव वेगवेगळ्या चळवळीमध्ये, वेगवेगळे combinations आपल्याला दिसतात. परंतु ही combinations आणि त्याची गती पण वेगवेगळी आहे. म्हणजे दर वेळेला हे सर्व काही लिनियर पद्धतीने घडलं असं नाही. पण या प्रकारे, त्या काळामध्ये झालेले दिसते. आणि त्यासाठीचे अनेक विविध आंदोलनं आपल्याला पेटलेले दिसतात.रोजीरोटी, मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आणि अत्याचार विरोध हे common theme यातल्या अनेक मोहिमांमध्ये आपल्याला कोणी आलेल्या दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात एक अत्यंत मोठं आणि प्रेरित करणारं आंदोलन म्हणजे मराठवाडा विद्यापीठाचे नामांतरण करण्याचे आंदोलन होय. जात, वर्ग आणि लिंगभाव या तीनही गोष्टी एकत्र आल्या आणि आलायंस बिल्डिंग्स एक वेगळे राजकारण, समाजवादी, मार्क्सवादी आणि दलित चळवळीतले प्रखर व मवाळ नेते या सगळ्या प्रवाहातल्या लोकांनी एकत्र येऊन नामांतर लढ्यामध्ये आपली भागीदारी निभावलेली दिसते. ज्या वेळी औरंगाबादला जेव्हा गोळीबारासाठी पिस्तूल काढलं गेलं, त्याच्या आठवणी आजही आपल्याला अनेकजण सांगतात, आणि मराठवाडा कसा पेटला हे ही आपण जाणतो. आणि तो कडवट पणा मात्र चळवळीमध्ये कुठेतरी हळूहळू कमी झाला असंही दिसतं. पाठलाग करून माणसं मारली गेली, याचे दुःख आणि खल मनात शिरून होती परंतु ही जी आंदोलनं किंवा आदिवासीची जमीन हक्काची जी आंदोलनं होती, त्यांनी फार प्रेरक सुफळभूमी निर्माण करून ठेवलेली होती. परंतु नंतर च्या काळामध्ये आपण हेही जाणतो, की राज्यव्यवस्थेचे आणि अर्थव्यवस्थेचे चरित्र आणि मध्यम वर्गाची भूमिका ही तीन मधून कोणत्याही कालखंडात मधून चळवळी उगम पावतात किंवा मरतात आणि सहाजिकच हळूहळू जसं १९८५नंतर उदारमतवादाच्या ऐवजी उदारीकरण आणि आर्थिक आणि मग सामाजिक पद्धतीचं खाजगीकरण आणि उदारीकरणाला पूर्ण समर्थन

देणारी एक मानसिकता, सामाजिकता जशी पुढे आली, तसं मात्र मग मध्यमवर्गाची भूमिका सुद्धा पूर्णपणे काठावर उभं राहण्याची झालेली दिसते. आणि चळवळीतला प्राण सुद्धा कमी झालेला दिसतो. चळवळीची संख्या अजिबात कमी झालेली नाही, पण चळवळीची Visibility ही प्रसारमाध्यमांनी आणि इथल्या मध्यमवर्गीयांनी मात्र नक्कीच कमी केली आहे. म्हणजे आपण जाणतो की महात्मा फुले पण एक अत्यंत यशस्वी कंत्राटदार होते. परंतु त्यांनी अत्याचाराच्या कुठल्याही मुद्द्यावर माघार घेतली नाही. आज किती कंत्राटदार हे करताना दिसतात माहित नाही. सावित्रीबाई फुले या शिक्षिका होत्या आणि नंतर सरकारी सेवेत ही होत्या, तरीही त्यांनी हिंमत धरून अन्याय-अत्याचाराच्या विरोधात आपली स्पष्ट भूमिका मांडली होती, आज हे कितपत दिसतं, आपल्याला माहिती आहे की त्यामध्ये बरीच संदिग्धता ही आहे. मध्यमवर्गाची भूमिका मी त्यामुळे विश्लेषित करीत आहे असे त्या म्हणाल्या.

समाजशास्त्रीय ज्ञानाकडे थोडंसं वळताना त्या स्पष्ट करतात, की सामाजिक आंदोलन आणि समाजशास्त्र ही दोन्ही आधुनिकतेची अपत्य आहेत, आणि त्या अर्थाने भावंड आहेत अशी मांडणी पहिल्यांदा आरेन तूरेन यांनी केली आणि नंतर गिडेन्स, ब्लूकलर यांनी अधिक विस्ताराने मांडली आहे. ज्ञान उदयाच्या कालखंडामध्ये विवेकवादी क्रांती म्हणूनच केवळ सामाजिक आंदोलन जन्माला आहे. त्यामुळे सामाजिक आंदोलनांचा उदय व्हायचा असेल तर आधुनिकते मधल्या व्यक्ती प्रतिष्ठा, व्यक्ती सन्मान, बंधुभाव आणि स्वातंत्र्य या मूल्यांवरचा ठाम विश्वास आणि विवेकवादी पद्धतीने सहभाग निर्माण करणं, एकमेकांसोबत Alliance Building करणं, या सगळ्या गोष्टी वरचा विश्वास असल्याशिवाय आपण सामाजिक आंदोलनांची कल्पना करू शकत नाही.जन्माधिष्ठित आपला दर्जा आणि अस्मितेशी सामाजिक आंदोलनाची पायाभरणी होऊ शकते, पण ती आंदोलन शाश्वत होऊ शकत नाहीत, हा पाश्चात्य जगातला ही इतिहास आहे, आणि आपल्याकडे ते काही वेळा तसे दिसलेले पण आहे, व्यक्ती म्हणून प्रत्येकाला प्रतिष्ठा, मानवी प्रतिष्ठा हे सामाजिक मूल्य हे वरिष्ठ वर्ग ते कनिष्ठ वर्गांनी मान्य करणं ते मान्य करायला कनिष्ठ वर्गाने भाग पाडणं, प्रसंगी रक्तरंजित क्रांती यातून या सगळ्या सामाजिक आंदोलनांच्या चौकटीचा उदय झालेला आपल्याला दिसतो. Structure agency debate ज्याला आपण अगदी थोडक्यात म्हणतो, त्याच्यामध्ये आपण जाणतो, की मार्क्स, वेबर, हेबरमास आलेन तुरेन, गिडेंस, लाक्लाऊ, मुफ, औफे, माहू, आणि कास्टल्स हे काही अलीकडच्या काळापर्यंत चे महत्वाचे विचारवंत आहेत आणि त्या चौकटीत मी त्या सगळ्यांचा विचार करते आहे, असे त्यांनी सांगितले.

सिद्धांताचे जर वर्गीकरण करायचं तर प्रकार्यवादी संरचनात्मक सिद्धांतामध्ये ताण आणि तुलनात्मक वंचितता यामुळे आंदोलने निर्माण होतात. अशा प्रकारचा एक Relative Deprivation सिद्धांत हा कायम मानला जातो. अगदी अलीकडच्या काळापर्यंत भारतात हा दृष्टिकोन आजही सगळ्यात जास्त वापरला जातो आहे. मार्क्सवादी आणि नवा मार्क्सवादी विश्लेषण आणि मध्ये कामगार हा मध्यभागी असणे गरजेचा आहे. कारण पाश्चात्य औद्योगिक जगामध्ये तो सगळ्यात तळा मधला घटक होता, साधनविहीन, सत्ताविहीन घटक होता, तो सगळ्यात शोषित आणि वंचित होता, म्हणून कामगार हा केंद्रभागी असणं क्रमप्राप्त आहे.

एक आपण विसरता कामा नये, की मार्क्सवादी विचारवंताने मुळात युरोपाच्या संदर्भात झाले, ते युरोप बाहेर जाते तेव्हा ते त्याप्रमाणे बदलण्याची जबाबदारी ही त्या त्या ठिकाणच्या अर्थातच विचारवंत आणि अभ्यासकांवर आहे. परंतु मार्क्सवाद आणि नवं मार्क्सवाद या दोन्हींमध्ये कर्त्याला महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीला एजंट, दुवा मानला गेला आहे. इतिहास घडवण्याची शक्ती असणारा असा करता असं कायम बघितलं गेलेल्या आहे, आणि आत्ताच्या काळा मधला एक नवा अर्थातच संकल्पना व्यूह शिलीरीळरीं की ज्या वेळेला पूर्ण वेळ जॉब संपलेले आहेत, ज्या वेळेला पक्क्या नोकऱ्याच उरलेल्या नाही. आजचं जागतिकीकरण एका अरिष्टामध्ये संकटामध्ये अडकलेलं आहे, अशा वेळेला उद्याची शाश्वती नसणारे करोडो लोक हे जगाचं वास्तव आहे. आणि आता जी काही आंदोलन आहेत, पाश्चात्त्य जगामध्ये ही सज्ञा वारंवार वापरत आहे, की प्रोलोकॅरीयट नाही. Precrariat आज महत्त्वाच्या जागी आलेली आहे. आंतरक्रियावादी दृष्टिकोनामधल्या अनेक नव्या प्रकारच्या व्यक्तिनिष्ठते सारख्या काही संकल्पना आहेत, की ज्या खूप महत्त्वाच्या ठरत आहेत. याकडे बघतांना दिसतं, की नवसामाजिक आंदोलन औफे याने हे पहिल्यांदा मांडले, आणि नंतर हेबरमास आणि इतरांनी त्याचा भरपूर वापर केला.

स्त्रोत गतिशीलन सिद्धांत जो आजचा हा सर्वात प्रचलित सिद्धांत जगभर वापरला जाणारा आहे. आणि कृतीवादी जो ही आलेन तुरेन चाही सिद्धांत सर्वाधिक वापरला जाणारा सिद्धांत आहे. काही महत्त्वाच्या संकल्पना मांडताना नवसामाजिक आंदोलन ही नवी लोकप्रिय भूमिका साधारण १९८० पासून आपल्याला दिसते. सामूहिक कृती Collective Action हा एक Perspective पण खूप महत्त्वाचा म्हणून मानला जातो. ज्यात सामूहिक कर्तेया संकल्पनेला महत्त्व आहे. आंदोलनात जेव्हा व्यक्ती स्वतःला झोकून देते, मनापासून तन-मन-धनाने सामील होते, तेव्हा ती एकटी उरत नाही. एका सामूहिक कर्तेपणाचा ती भाग होते, तेव्हा ती व्यक्ती वेगळ पण वागते. त्यामुळेच ह्या गोष्टीचं theorization आणि आंदोलनाच्या बाबतीतची भिंग वापरून अनेक अभ्यास पुढे येत आहेत.

अगदी अलीकडच्या काळात प्रत्येक आंदोलनामध्ये भावनांची भूमिका काय? कारण आंदोलनामध्ये चढ आणि उतार असतात, परंतु चढाच्या वेळेला आलेल्या भावना Bitterness Advisory विषयीचा द्वेष आणि पराकोटीची तीव्र विरोधाची भावना ही उतार आल्यानंतर जर व्यक्तीच्या मनात उतरली नाही,

आंदोलनांना उतार लागतो, आंदोलन संपतं.पण व्यक्ती मनातल्या मनात धुमसत राहतात. तसेच Solidarities Building - Alliances Building जेव्हा होतं, अगदी वेगळ्या पार्श्वभूमीचे लोक जेव्हा एकत्र येतात, त्या आंदोलनांच्या उद्दिष्टांसाठी तेव्हा त्यांच्यात जर एकमेकांवर विश्वास नसेल, तर आंदोलन टिकाऊ पद्धतीने पुढे जाऊ शकत नाहीत, किंवा नेतृत्वाच्या बाबतीत सुद्धा भावनांची भूमिका काय? अशा प्रकारचे अनेक मुद्दे आज self-subjectivity - emotions`m तिन्ही पातळीवर खूप मोठे संशोधन आज घडीला चालू आहे.

अन्वय कसा लावायचा? Interpretation of agenda and actions हा एक मोठा भाग आंदोलनाच्या अभ्यासामध्ये आपल्याला दिसतो, आणि एकूणच सामाजिक आंदोलने म्हणजे काय? तर वंचितांची त्या त्या समाजातल्या सत्ताधाऱ्यांसोबत सत्तेसाठी चालू असणारी घासाघीस, चढा-ओढ, दावे-प्रतिदावे, Can citations, claims and counter claims and negotiation हा एक आज आंदोलनाच्या अभ्यासातला महत्त्वाचा टप्पा आहे, आणि त्याच बरोबर २०००नंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण ज्या प्रकारे आले, त्याच्यामध्ये नागरी समाज ही संस्था आंदोलन या संस्थे पेक्षा महत्वाची घडली आहे, आणि त्याहीकडे आज लक्ष दिलं जाते. भारतामध्ये जे अभ्यास आहेत. त्याच्या मध्ये आजही मिशन मेल्सरच्या ग्रंथातील व्याख्या कुठेतरी आंदोलनाच्या केस स्टडी मध्ये आजही त्याचा प्रभाव खूप जाणवतो आणि ते कार्यवादी होते. त्यामुळे अर्थातच मूळ समाजव्यवस्था योग्य आहे. आंदोलन तात्पुरते ताण असतात आणि ती पुन्हा शमतात. आणि ती पुन्हा समाजव्यवस्था आहे, तशी चालू राहते. ह्या विचारसरणीवर स्मेल्सर यांचा भर असतांना दुर्दैवाने दलित आंदोलन, महिलांचे आंदोलन यांचे अभ्यास करताना लोकांनी स्मेल्सर वापरलेला आहे. म्हणजे आपल्या आंदोलनाच्या मागण्या वेगळ्या दिशेला आहेत. आपली स्वतःची विचारसरणी ही कदाचित वेगळी आहे, पण आपण समाजशास्त्रातील चौकट मात्र काहीतरी बरोबर विरोधी वापरत आहोत, कसा मोनोग्राफ केस स्टडीज बघतांना जाणवतो.

भारतामध्ये वर्गीकरणावर जो भर दिलाय त्यामुळे कामगारांचे, स्त्रियांचे, दलितांचे, शेतकऱ्यांचे सद्यस्थितीतील आंदोलन अशा वर्गवारीना आपण जास्त महत्त्व दिलेले दिसते. त्यामानाने की सूत्रबद्ध विश्लेषण मागणी नुसार, विचारसरणीनुसार त्यामानाने कमी झालेली दिसतात. आणि म्हणून एकूण कोटी क्रमांकाची अपूर्णता, पाश्चात्त्य सिद्धांताचे अनुकरण आणि नव जागतिक जे वास्तव आणि पैलू आहेत. त्या संदर्भातल्या नव्या संकल्पना मात्र अभावाने दिसतात. आजची आव्हान काय दिसतात, तर आपण परिवर्तन, परिवर्तनासाठी आंदोलन असा विचार करतो? का परिवर्तन, पुनरुज्जीवन या सगळ्यांनाच आपण आंदोलन म्हणतो? मूळ आपण जर समाजशास्त्रीय व्याखेला प्रामाणिक राहिलो तर मुक्ती आणि मूलगामी व्यवस्थेत मूलगामी परिवर्तन याच्यासाठी जे संघटित प्रयत्न होतात, केवळ त्याला आपल्याला सामाजिक आंदोलन म्हणता येईल, बाकीचे जे प्रयत्न आहे किंवा पुनर्जीवनवादी गोष्टी आहेत, जेव्हा पुनरूज्जीवनवाद म्हणते, तेव्हा जन्माधारित अस्मितांचा अतिरेकी गौरवीकरण कोणत्याही अंगाने, कोणत्याही रंगाचे हे त्यातच बसतं, म्हणजे जात, धर्म, जमात या सगळ्याविषयी जन्माने आम्ही अमुक आहोत, म्हणून अमुक अशा Puritan जर विचार मांडत असेल तर त्या सगळ्याला आपल्याला पुनर्जीवनवादी म्हणावं लागतं आणि म्हणून आजच्या मोहिमांच्या बाबतीत असं आपल्याला दिसतं, की मुक्तीचा प्रारुप ही कुठेतरी हे बद्ध झालेलं आहे. आत्ताच्या एकूण राजकीय परीप्रेक्ष्यामध्ये, मुक्तीचं स्वप्नसुद्धा हे एक सीमांत आणि कदाचित चुकीच्या दिशेचा स्वप्न असं आपल्याला दिसते. जात, वर्ग, लिंगभाव, वांशिकता, धर्म, लैंगिकता आणि पर्यावरण या काही विषय आपल्याला दिसत असले तरी तरुण मुला-मुलींमध्ये जीवनमूल्य यांविषयीची मांडण्याची खाजगी पातळीवर मोठ्या प्रमाणात दिसते आहे. जीवनमानामध्ये Living दिसते. घरच्यांना न सांगता विवाहबद्ध होऊन, सहजीवन अनेक जण सुरू करीत आहेत. त्यांच्यामध्ये दिसते आहे किंवा वेगळी जीवनसरणी एकदम स्वीकारणारे तरुण-तरुणी दिसत आहेत. भारतात सुद्धा स्लो - डाऊन करणारे दिसत आहेत, त्या सगळ्यांना मात्र सामूहिक पातळीवर एक वाट मिळतांना आंदोलन रुपी वाट मिळताना दिसत नाही.

आपली Academic Discourse मात्र विकास विरुद्ध विस्थापन, परंपरा विरुद्ध आधुनिकता ह्या संकल्पना व्युहामध्ये आपण आंदोलनाची चिकित्सा करतो आहोत. जागतिक की स्थानिक, शोषण आधारित उपभोग की शाश्वत विकास हे प्रश्न मात्र आज ऐरणीवर आलेले आहेत. आपल्याकडे अलीकडील वास्तवावर आधारित जी परिस्थिती दिसते आहे, की लोकानुनयवादी लोकशाही म्हणजे डॉ. आंबेडकरांनी जी स्वप्नात बघितलेली आणि त्यांच्या सोबत जे घटना समितीमध्ये बाकी सर्व जाती, धर्मातले लोक होते. बेलायुधन मॅडम केरळ मधील एकमेव दलित स्त्री सदस्य म्हणून घटना समितीवर नेमल्या गेलेल्या होत्या. अशा सर्व स्त्री-पुरुषांनी ज्या प्रकारचं एक नवभाराताचे, नवनिर्माणाचे स्वप्न पाहिलेलं होतं, स्त्री म्हणून पण त्यांची काही निरीक्षण आणि प्रतिक्रिया होत्या. तर त्या लोकशाही समाजवादी वंचित मुक्तीवर आधारलेली लोकशाही ह्या स्वप्नांकडून आज आपण लोकांना संवादी लोकशाही Populist democratic government यांच्याकडे आलो आहे, आणि मग बहुमतवाद, बहुमत म्हणेल तेच खरं, बहुमत मागणी करेल त्या प्रमाणे झालं पाहिजे, म्हणून मग इतरांनी संख्याबळाची लढाई करण्याचा सतत प्रयत्न करणं हया प्रकारची एक नवीनच प्रारुप आता आपल्यासमोर आहे. आणि अशा वेळेला व परिवर्तनशील समाजशास्त्र म्हणून आपण ह्याकडे कसं बघणार हा मोठा प्रश्न आहे.

आजचा जागतिकीकरण हे दुतोंडी वास्तवाचं एक सुचन होतं हे कास्टल सारख्यांनी हेबरमास, समीर, आमिन आणि वॉलस्टीन सारख्यांनी १९९०च्या दशकात वर्तवलेलं होतं व नंतर ते

मांडलं देखील ते म्हणजे एकाच वेळी मुक्तीच्या तीव्र आकांक्षा करोडो सामान्य लोकांमध्ये उफाळून येतात, उर्मी निर्माण होतात, स्वप्न निर्माण होतात, त्याच वेळी ती लोक पुन्हा पुनरुज्जीवनवादी, लबाड व्यवहारांकडे आणि उपभोगाकडेपण आकर्षिली जातात, आणि ही दुतोंडी अवस्था ही वास्तवामध्ये आपल्याला वारंवार दिसते, आणि त्यामुळे सामाजिक आंदोलनांमध्ये सुद्धा त्याचं प्रतिबिंब पडते. यात समाजशास्त्रज्ञाची भूमिका काय असावी? आपण सगळेजण जाणतो की टी. के. ओमन, द.ना. धनागरे, पी. एन. मुखर्जी यांचा संबंधित विषयाशी संबंधित अभ्यास आपण जाणतो आहोत.

गेल ऑम्वेट, कल्पना कन्नबिरन, इलिन सेन, अमिता बाविस्क, हेबरमास, आलेन तुरेन, जौफरी प्लेयर्स , ब्रेनो बी गेल, द सुसा सान्तोस या मंडळींनी पश्चिम विशेषत: गोलार्धातल्या गरीब भारतासारख्याच देशांच्या संदर्भात जे Theorization सदर Theory अंगाने मांडलेलं आहे. त्याकडे आपण बघायला हवं. आणि म्हणून महाराष्ट्रातल्या सामाजिक आंदोलनाच्या एकूण चौकटीकडे बघतांना सामान्य व्यक्ती हेच सामाजिक, सामुहिक कृतीचे शिल्पकार असतात. राजकीय अर्थकारणात मग आणि नव प्रघटनशास्त्र भूमिका मानून आपल्याला व्यक्तिगत पातळीवरचे संबंध आणि त्यातून सामूहिक कृती व कधी आंदोलन किंवा आंदोलन पूर्वीच संपणाऱ्या मोहिमा अशाप्रकारे जसं सामूहिक कृतीचे व्यवस्थापन तयार होतं हे बघणं महत्त्वाचं वाटते... असे त्या म्हणाल्या.

After globalization ही जी World social forum आणि Raps Spring आणि इतर सगळ्या आंदोलनांविषयीची भूमिका.जौफ्री प्लेयर्स हे आजचे International Sociological Association चे उपाध्यक्ष सातत्याने मांडत आहेत, ती महत्त्वाची बाब वाटते. आणि विशेषत: आपल्या संदर्भात मला स्वतःला मार्क्स, फुले-आंबेडकर यांना एकत्र घेऊन निर्माण केलेला जो दृष्टीकोण आहे, तो पद्धतीशास्त्रीय दृष्ट्या सुद्धा सामाजिक आंदोलनाच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचा वाटतो. शरद पाटलांपासून तेअलीकडच्या पिढीमधल्या अनेकांपर्यंत हा दृष्टिकोण महाराष्ट्रामध्ये तर अतिशय चांगल्या पद्धतीने स्थापित झाले आहे. तो इंग्रजी साहित्यामध्ये ही तो वापरला गेला आहे. सामान्य लोक जर अशा प्रकारे महत्त्वाचे असतील, तर जागतिक पातळीवर आज वंचितांच्या राजकारणातल्या अस्मितांचे महत्व, दोष व तोटा काय? आणि वसाहत - उत्तर भूमिका वंचित नेमकं काय घेतात? या दोन मुद्यांच्या काठछेदावर आज बरीच चर्चा करण्यात आली.मग आता नवीन अग्रदूत कोण असावेत? मार्क्सने म्हटले तसं कामगार हा अग्रदूत मांडला होता. औद्योगिक भांडवलशाही होती, आपल्याकडे आज स्थलांतरित, पहिल्या पिढीतील अल्पसंख्यांक समाजातल्या स्त्रिया, अल्पसंख्यांक तळातले, साधन विहीन, वंश, जात, लैंगिकता या अक्षांवर एकत्र येऊ शकणारे सर्व ,आणि त्यांचे सर्व पाठीराखे, lliance building so called share to post-colonial society and post globalized worlds. त्यामुळे आज विरत जाणाऱ्या वर्तुळ यांची प्रतिमा Disordering Circles ही एक संकल्पना २०१८ च्या World Toronto मध्ये जी मांडली, संबंधित संशोधन समितीमध्ये आणि त्यावर खूप काम सुरू आहे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याच प्रकारे आता जन्म, धर्म आणि वंश आधारित पवित्र, शुद्ध, एकमेव अशा अस्मितेचा अंगीकार करून आंदोलन यशस्वी करण्याच्या शक्यता कमी होत आहेत. मग त्या मोहिमा वापरल्या जातात. थोडक्यात यापूर्वीच्या माझ्या कामातून मराठवाडा जनता विकास आंदोलनाचा लोकांनी संवाद आणि आधुनिकतेच्या, पाश्चात्य प्रारूपाच्या मर्यादा या संदर्भात अभ्यास केलेला होता.

शहरी राजकारणामध्ये आज अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांचं राजकारण आहे, त्याच्या सगळ्यात मोठ्या शक्यता मला भविष्यासाठी दिसतात. आणि Alliance building आणि वंचितांच्या मुक्तीचे परीघ वाढवणं हे दोन्ही या प्रकारच्या कामामधून दिसू शकते. नवसामाजिक आंदोलन ही मला आपल्याकडे ही संज्ञा वापरणं चुकीचं वाटतं, कारण पाश्चात्य जगामध्ये ही संज्ञा मागे पडली आहे. कारण औफे या विचारवंताने सुद्धा स्वतः म्हटलं, की चुकीच्या पद्धतीने सगळे वापरत आहेत.सामाजिक आंदोलनाच्या अभ्यासातले (Rate campaigns gitation and movement) धोके असे दिसतात, की समोर येईल त्या मोहिमेला संख्या खुप दिसली की आपण अनेकदा आंदोलनं मानत असतो. आंदोलन मोहीम, दंगल, सामूहिक कृती collective action या सर्व संकल्पना आणि कोटी क्रमामध्ये फरक आहे. ती संकल्पना आणि कोटीक्रम अत्यंत बारकाईने समजून घेऊन, समाजशास्त्रज्ञांनी मांडणी व उपयोग करायला हवा असं मला वाटते. अनेकदा वैचारिक बांधिलकीमुळे आदी निष्कर्ष काढून, मग पुरावा अशीसुद्धा एक आपल्याला बाब दिसते. आणि आत्ता महाराष्ट्रात आणि भारतात ज्या प्रकारचं विचारसरणीचं एक ध्रुवीकरण आहे, त्यामुळे हे सहाजिकच आहे. जसं जात विग्रह ज्याप्रकारे ऐरणीवर आला आहे, त्यामुळे टोकदार भूमिकांचे प्रतिबिंब मग अभ्यासांमध्ये ही पडतं. गटा-तटा प्रमाणे झालेल्या अभ्यासकांना महत्त्व द्यायचे की नाही हे ठरतं.

काही लोक अभ्यासच नाही किंवा झालेच नाहीत, असंही आपण मानायला व delete करायला शिकतो. भारतामध्ये एकूणच Established con आहे ते न मोडण्याची वृत्ती पण आपल्याला दिसते. आणि डॉ. जोगदंड यांचे विशेषत्व यासाठी Canan च्या पलिकडची मांडणी करण्याचा सातत्याने प्रयत्न आणि बॉर्डर थिंकिंग त्यांनी नेहमी केलेली आहे. भारतीय लोकशाही समाजवाद, न्याय, वंचितांची मुक्ती, नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचाच नव्हे तर अभ्यासकांचा तरी विश्वास उरला आहे का? हा ही प्रश्न समोर येतो. तो आपल्या मांडणीमध्ये आणि व्यवहारांमध्ये सुद्धा कुठेतरी या आपल्या गोष्टी खोट्या आहेत, असा एक Estonian कालखंड आपण सगळे असल्यामुळे Utopia सुद्धा आपल्याला महत्वाचा वाटत नाही.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी एक स्वप्न दिलं होतं,

आपल्याला भारतात सामाजिक आणि आर्थिक पातळीवर लोकशाही येऊ शकते, ती प्रत्यक्षात आणता येईल असं त्यांना काय माहीत नव्हतं का? तर हा एक युटोपिया आहे, हा स्वप्नीलोप आदर्श लोक आहे, मृगजळ फार दूर आहे हे तर माहीत होतं, परंतु मृगजळ महत्त्वाचा मानून त्याचा ध्यास घेतला तरच, थोडे थोडे पाण्याचे साठे प्रत्यक्षात बांधता येतात, निर्माण करता येतात, त्या पिढीतले डॉ. आंबेडकर होते. आणि इतरही आपले धूरीन हे त्या काळातले ज्यांनी एकमेकातलं मतभेद असूनही एकमेकांच्या स्वप्नांना बरोबर घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न केला आणि ते कुठे तरी आज मात्र अभ्यासकांमध्ये नेतृत्वात आणि अनुयायांमध्ये सुद्धा दिसत नाही. शिवाय आजच्या अर्थरचनेचं फलित आहे का? आजच्या राजकीय वातावरणाचे फलित आहे का? हे आपल्याला बघावं लागेल.भारताला एकमेवाद्वितीय मानने, Indian isolationism त्यामुळे तुलनात्मक अभ्यासाचा खूप मोठा अभाव आपल्याकडे दिसतो. लॅटिन अमेरिका आणि युरोपातल्या लोकांच्या मानाने आणि हा एक आपल्याला विचार करावा लागेल की यातून आपण अलिप्त वादाची isolation ची भूमिका घ्यावी का? सोडावी का? Southern theory and colonial theory चा यांचा संदर्भ न घेता, आपण जर भारतीय व्यष्टींचे विश्लेषण करत राहिलो, तर Etiological पातळीवर काही गोष्टी लेंशी करत नाही असाही धोका दिसतो.

डॉ.शिवकुमार सोळुंके, जालना.

सद्यस्थितीत महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींची परिस्थितीच्या अनुषंगाने आकलन व विचार डॉ. सोळुंके यांनी व्यक्त केले. प्रत्यक्ष चळवळीमध्ये काम करणं आणि केवळ अभ्यास करणं या दोन्हीमध्ये फरक असल्याचे त्यांनी सांगितले. आजमितीला महाराष्ट्रातील चळवळीची परिस्थिती ही चिंताजनक बनलेली असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्रातल्या ज्या चळवळी Back foot ला आलेल्या आहेत, त्याची कारणमीमांसा व चिंतन करत असताना जी बाब प्रामुख्याने लक्षात आली, ती म्हणजे महाराष्ट्रातल्या सर्वच चळवळी मध्ये ज्या पुरोगामी व परिवर्तनाच्या चळवळी आहेत, त्या चळवळी मुख्य विचारधारेचे पासून दूर जात असल्याचे आपणास दिसून येते. मुख्य विचारधारा म्हणजे कोणती, तर सर्व चळवळींची मुख्य विचारधारा ही फुले - शाहू - आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना ही राहिलेली आहे. सर्व चळवळींनी भारतीय राज्यघटनेला प्रमाण मानलेलं आहे आणि आपले जे चळवळीचे मार्गदर्शक आहेत, ते शाहू-फुले-आंबेडकर असलेले आपणास दिसून येतात आणि त्यांची विचारधारा लक्षात घेऊन आज पर्यंत चळवळी ह्या उभ्या झालेल्याअथवा कार्यरत असलेल्या दिसतात. जोपर्यंत हया विचारांची बांधिलकी सर्वच प्रकारच्या परिवर्तनवादी चळवळीत, कार्यकर्त्यांची होती वा कार्यकर्त्यांनी या विचारांशी निष्ठा ठेवलेल्या होत्या, तोपर्यंत चळवळ प्रामाणिकपणे चालू असलेल्या दिसतात. आणि त्याचे सामाजिक परिणाम जे आहेत ते देखील चांगल्या पद्धतीचे आपल्या अनुभवाला आलेले दिसून येतात. आता अलीकडच्या काळामध्ये सामाजिक परिस्थिती मध्ये खूप मोठे बदल झालेले आहेत. अलीकडे ज्यांच्या हातात चळवळीचे नेतृत्व आहे, ती मंडळी विचारांच्या पातळीवर परिपक्व आहे? अशी शंका निर्माण होत आहे. कारण विचारसरणीच्या बाबतीतच दोलायमान परिस्थिती निर्माण होत आहे. दोलायमानता चळवळीला मुख्य मार्गावरून विचलित करीत आहे, ही अवस्था जवळपास सर्वच चळवळीच्या बाबतीमध्ये दिसून येते, मग ती दलित, महिला, शेतकरी यासंदर्भातील चळवळ असो, या चळवळींवर बदललेल्या सामाजिक परीप्रेक्ष्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. त्यातल्या त्यात आपल्याला असं लक्षात येतं की राजकारणामध्ये झालेले बदल आणि त्याचाच दुष्परिणाम हा महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळींवर झालेला दिसून येतो. या जागतिकीकरणाच्या परिणामांमध्ये आपल्याला असे दिसते, की भारताची अर्थव्यवस्था ही भांडवलशाहीकडे भांडवलवादा कडे वाटचाल करीत असलेली दिसून येते. मग भारतीय राज्यघटनेचे जे मुख्य ध्येय अथवा उद्दिष्ट आहे, डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत होतं ते साध्य करण्यासाठी या ठिकाणच्या कोणत्या शक्ती ह्या सक्रियतेने कारणीभूत ठरलेल्या आहेत, या एकदा तपासून पाहावे लागते. राजकीय पक्षांच्या बाबत आपण पाहतो, की राजकीय चळवळी देखील आपल्या मूळ तत्त्वांना, मूळ विचारसरणीला फारशा स्टिकप असलेल्या, बांधिलकी मानणाऱ्या दिसून येत नाहीत. आणि म्हणून संपूर्ण आयुष्य पुरोगामी मध्ये घातलेलं, परिवर्तनासाठी प्रयत्न केलेलं माणसं अलीकडील काळामध्ये आपल्याला पाहायला मिळतात. एकीकडे आम्ही शाहु-फुले-आंबेडकर यांचे अनुयायी आहोत असे म्हणत आलेले, आज मात्र विचार आणि कृतीच्या बाबतीमध्ये शाहू-फुले-आंबेडकर विचारसरणीपासून दूर गेलेले दिसतात. आणि हे जे वास्तव आहे, मूळ मूलभूत जो विचार आहे, भारतीय राज्यघटना आहे त्याच्याशी चळवळी प्रामाणिकपणा असायला हव्या, कार्यकर्त्यांना भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत केलेल्या गोष्टी साध्य करायच्यात आणि त्याच्यासाठी आज सर्वच परिस्थिती बिकट होत असलेली दिसून येते. कारखानदारी मध्ये यांत्रिकीकरण स्वयंचलन आधुनिकीकरण याचे मोठे प्रमाण वाढले आहे, आणि कुठे तरी आपण राज्यकर्त्यांच्या धोरणात भांडवलदारांना पोषक वातावरण निर्माण करून देण्याची स्थिती दिसते.

सर्वांना समान न्याय, हितसंबंधांची जोपासना, वंचितांचा विचार, विशेषत: स्वातंत्र्योतर काळामध्ये शासनाच्या झालेल्या बदलात वंचितांच्या संदर्भात विचार शासकीय पातळीवर गंभीरपणे झालेला किंवा करण्यात आलेला दिसत नाही. आणि त्याच्यासाठी खंबीरपणे लढा देणारी यंत्रणा पूर्वी होती. विविध माध्यमातून लोक रस्त्यावर येऊन अन्यायाविरुद्धचा रोष व्यक्त करताना दिसायचे, ती स्थिती आज आढळत नाही. वंचिताचा आक्रोश, वेदना व्यक्त करणारे व्यासपीठ देखील आढळत नाही, कारण भारतातला जो माध्यमे आहेत, ते देखील भांडवलदारांचे प्रतिनिधित्व करीत

असल्याचे आपल्याला दिसते. भांडवलदारांची हितसंबंध जोपासणारी जी काही व्यवस्था आहे, त्या व्यवस्थेला पूरक ठरेल तेवढ्याच गोष्टीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे काम मीडियाच्या माध्यमातून होत असलेलं पाहायला मिळते, म्हणजे पूर्वी मीडिया सामाजिक चळवळींना एक आधार देण्याचं काम करीत होता. आता तसे दिसत नाही, उलट ही व्यवस्था आहे सामाजिक, राजकीय-आर्थिक असे दिसते, की काम करणारे जे चळवळीची कार्यकर्ते आहेत या कार्यकर्त्यांचे खच्चीकरण कसे करता येईल याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते.

सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने सामाजिक न्यायासाठी प्रस्थापित न्यायव्यवस्था व मीडिया या दोन्हीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते आज भारतातील प्रस्थापित न्याय व्यवस्था देखील वंचितांना खरोखरच न्याय देते का? हा सुद्धा प्रश्न आहे. आणि मग काही प्रश्न आहे, की दुसरी बाब म्हणजे महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळी या चळवळींचे नेतृत्व आहे. हेच मूलतः पांढरपेशा वर्गाकडे केंद्रित झालेल्या आपल्याला पाहायला मिळते,आणि ही जी माणस आहेत ते मूळ विचारसरणी, प्रामाणिकपणा असल्याचे त्यांच्यात दिसत नाही. कारण यांच्या ज्या गरजा आहेत त्या वेगळे आहेत आणि प्रकर्षाने असे जाणवते की पूर्वी पूर्णवेळ सक्रियपणे झोकून देऊन, पूर्णवेळ काम करणाऱ्या कार्यकर्तेअसायचे त्यास चळवळीमध्ये, समाजामध्ये वेगळी प्रतिष्ठा, स्थान असायचं. आज या वेगवेगळ्या चळवळीत पूर्णवेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची अवस्था काय आहे? हे आपण पाहणे गरजेचे आहे.ज्यांच्या कुटुंबातील पूर्वजांनी सामाजिक चळवळीमध्ये आपले पूर्णवेळ आयुष्य खर्ची घातले आहे त्यांच्या कुटुंबाची अवस्था आज कशी आहे? हेही पाहणे गरजेचे आहे. त्याच्या जीवन जगण्यामध्ये अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. ह्या अशा प्रकारची पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील पुढची पिढीही आज या भांडवली व्यवस्थेचाच एक भाग बनत असलेली आपल्याला दिसून येते. कारण त्यांचं संरक्षण करणारी, न्याय देणारी व्यवस्था आपण निर्माण करू शकलेले नाही हे एक वास्तव आहे.

डॉ. सोळुंके आपल्या मांडणीत एक आक्षेप नोंदवतात की, सर्वच सामाजिक चळवळीमध्ये कमी-अधिक प्रमाणामध्ये प्रामाणिक कार्यकर्त्यांची संख्या ही कमी कमी होत चाललेली पाहायला मिळते. आणि या ठिकाणी संधिसाधूपणा ज्याला आपण म्हणतो याचा लाभ घेणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचेही दिसते याचे अनेक उदाहरण माध्यमांच्या संदर्भाने दिसून येतात. जर चुकीच्या माणसाच्या हातात नेतृत्व गेले, तर खंबीर आधार किंवा नेतृत्व मिळत नाही, ज्यामुळे चळवळी प्रभावी होत नाहीत. एकूण सामाजिक जीवनामध्ये जीवन जगत असताना सामान्य व वंचित माणूस यांच्या हितसंबंधांची जोपासना करणारी व्यवस्था सामाजिक पातळीवर आज शिल्लक असलेली आपल्याला दिसत नाही. भांडवलशाही व्यवस्था आणि त्याचे समर्थन करणारेच आहेत असे दिसते. आणि म्हणून सामाजिक चळवळीच्या विचारसरणीशी निष्ठा ठेवून काम करणारा कार्यकर्ता हे दुर्मिळ बाब झाली आहे. उदाहरणार्थ: शेतकरी संघटना. मा. शरद जोशी यांच्यासोबत ज्यांनी काम केले त्यांच्या उत्तरार्धात आणि त्यांच्या पश्चात शेतकरी संघटनेची दुरावस्था पाहायला मिळते. ते कार्यकर्तेराजकीय हितसंबंधांसाठी विभागल्या गेल्याचे पाहायला मिळतात. जसे पाशा पटेल, सदाभाऊ खोत अशी मंडळी. शेतकऱ्यांच्या वेदना, प्रश्न आता सत्तेत आल्यामुळे ते तीव्र वाटतच नाहीत किंवा त्यांच्या एकूण विवेचनात विरोधाभास आढळतो. अशी अवस्था महाराष्ट्रतील इतरही चळवळींची झालेली आढळते.

खोटे दुटप्पी असं वागणं हे चिंतेची बाब होय. आज केवळ नावापुरतं शाहू-फुले-आंबेडकर यांचे नाव घेतलं जातं, परंतु यांच्या विचारांची जोपासना होत नाही,संक्रमन शिस्तबद्ध शिक्षण व्यवस्था आपल्या प्रस्थापित समाज व्यवस्था देत राहिलेली दिसत नाही. असे विचार पुढे नेणारी एक विशिष्ट प्रकारची कार्यपद्धती असावी लागते. पूर्वी ती असायची, कार्यकर्त्यांचे प्रबोधन, चर्चा व्हायची, मार्गदर्शन असायचे मग अशा प्रकारची यंत्रणा आहे, अनेक संघटना बदल घडवण्यासाठी कार्य करीत असतात. आपली चळवळीची विचारसरणी ती त्या कार्यकर्त्यांनी पूर्णत: आत्मसात करावी यासाठी जाणीवपूर्वक पणे कार्य करणारी, प्रयत्न करणारी यंत्रणा दिसते. परंतु अलीकडील काळात यामध्ये शिथिलता आलेली दिसून येते याउलट परिवर्तनाच्या विरोधात असलेली जी काही यंत्रणा आपल्या देशात आणि राज्यात आहे. त्यांच्यामध्ये मात्र मूलतत्त्ववाद यांचा शिस्तबद्धपणा हा खूप मोठा असलेला दिसतो. मूलतत्ववादामध्ये विचारांचे स्थित्यंतर घडवण्याची एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रक्रिया चालू असलेली दिसते आणि तेवढाच बेशिस्तपणा सामाजिक चळवळींमध्ये येऊ घातलेला किंवा काही प्रमाणात आलेला देखील दिसून येतो. असे माझे आकलन आहे असे सोळंखे म्हणाले. आणि त्यामुळे आंदोलनाची तीव्रता ही कमी झालेली आहे, वारंवार अशा प्रकारच्या अन्यायाच्या विरोधात काहीतरी, केव्हातरी घटना घडली, की त्या अनुषंगाने आपल्याकडे चालवली ह्या मोठ्या प्रमाणावर उदयाला आलेल्या दिसून येतात. आज महाराष्ट्रामध्ये अनेक गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. विशेषत: शेतकऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे, एकीकडे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील, असं स्व. शरद जोशींना वाटायचं म्हणून त्यांनी मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला दिसून येतो. परंतु शासनाने खाऊजा धोरण शेती क्षेत्र सोडून स्वीकारले आहे. आज शेतकऱ्यांची अवस्था काय आहे? शेतकरी उद्योगधंद्यांमध्ये निर्माण झालेला माल त्यांनी निश्चित केलेल्या किमतीनुसार तो खरेदी करतो, म्हणजे महागाई भत्त्याचा दर वाढला की त्याला मिळणारे इम्पोर्ट आहेत. त्याच्यावर त्याचा परिणाम होतो आणि त्यांनी उत्पादित केली असता मालाला आहे त्या आधारभूत किमती ठरवताना, मात्र शासन महागाई ते निर्देशांकाचा याचाही विचार करत नाही, आणि मुक्त धोरणाचा हि विचार करत नाही. ज्या वेळेला शेतमालाच्या किमती वाढण्याच्या शक्यता असते. त्या वेळेला त्यांच्यावर नियंत्रण मिळवण्याचा,

आयात करण्याचा आणि निर्यातीवर बंदी करण्याचा निर्णय हा शासन पातळीवर घेतलेला आपल्याला पाहायला मिळतो. आणि म्हणून देशातल्या शेतकऱ्यांची दुरावस्था ही दिवसेंदिवस वाढत असलेली आपल्याला पाहायला मिळते. या देशातले बुद्धिवंत, राजकारणी, तथाकथित तत्त्ववेत्ते शेतकऱ्यांच्या संदर्भात कधी आपल्याला आवाज उठवताना दिसत नाहीत, इतकेच नाही तर गेल्या अनेक महिन्यांपासून चालू असलेल्या आंदोलनाकडे आम्ही पद्धतशीरपणे डोळेझाक करण्याचं काम केलेले आहे का? याचंही आपण आत्मपरीक्षण करावं.खरं तर या आंदोलनांकडे स्वतःला बुद्धिवादी म्हणणाऱ्या सर्व व्यक्तींनी दुर्लक्ष केलेले आपल्याला दिसतं. कारण या भांडवलशाही व्यवस्थेच्या विरोधात जाण्याची क्षमता या व्यक्तींमध्ये असलेली दिसून येत नाही, म्हणून मूळ तत्त्वज्ञानापासून झालेली जी फारकत आहे, या फरकतीमुळे आपल्या महाराष्ट्रातल्या चळवळीचे नुकसान अधिक मोठ्या प्रमाणावर झालेले दिसते. वंचित वर्गाचं प्रतिनिधित्व करणारा खऱ्या अर्थाने प्रामाणिक कार्यकर्ता, नेतृत्व करणारा नेता असला पाहिजे असेही डॉ. सोळुंके यांनी आग्रहाने सांगितले. एकूणच सामाजिक चळवळींचे वास्तववादी विवेचन डॉ शिवकुमार सोळुंके यांनी केले.

डॉ. मच्छिंद्र सकटे

सामाजिक चळवळ ही एक प्रक्रिया आहे, त्याचा संबंध सामाजिक परिवर्तन अशी आहे. मग ते परिवर्तन सकारात्मक वा नकारात्मक असेल, हर्बट ब्लुमर ची सामाजिक चळवळीची समर्पक व्याख्या नोंदवली, त्यांच्या मते, Social movement in social collective action established is New social worker in society म्हणजे अस्तित्वात असलेली समाजव्यवस्था जेव्हा त्या लोकांना नको असते त्यावेळेला Collective social action समूहाने लोक एकत्र येऊन कृती करतात, ती कृती एक नवीन समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी ही सामुदायिक कृती समूहाकडून होते. त्यालाच सामाजिक चळवळी असे म्हणतात. अर्थातच सामाजिक चळवळी ही कुणाच्या बाजूने अथवा विरुद्ध असते, संघर्ष असतो वा एखादा कायदा, विचारप्रवाह समूहाच्या विरुद्ध असू शकतो अशा पद्धतीने सामाजिक चळवळीचा प्रवास सुरू असतो. समाजातील जे काही Issues, समस्या, प्रश्न आहेत ते लोकांना जीवन जगत असताना अडचणीचे ठरतात किंवा नकोसे होतात, त्या वेळेला हे लोक एकत्र येतात आणि चळवळी करतात. तो लढा व्यवस्था रूढी प्रथा परंपरेबद्दल असेल म्हणजे नको असलेली व्यवस्था नष्ट करून नवी व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने होत असतात.

महाराष्ट्रात या सामाजिक चळवळीमध्ये सामुदायिक प्रयत्न, संघटन महत्त्वाचे आहे, संघटनेला संरचनात्मक बांधणी असते. एक तत्वज्ञान व विचारप्रवाह असतो. सोबतच अधिक चांगल्या व्यवस्थेची अपेक्षा असते. आणि त्या दृष्टीने चळवळी होत असतात. अगदी भारत देशापुरते बोलायचं झाले तर सती प्रथेविरोधात राजा राममोहन रॉय यांनी चळवळ सुरू केली होती. ती स्त्रियांच्या स्वार्थासाठी होती. ज्या वेळेला सामाजिक चळवळी सुरू होत असते, त्यावेळेला Counter चळवळ सुद्धा होत असते. ज्या वेळेला सती प्रथा बंदी साठी प्रयत्न केले जात होते, त्याच वेळी ही प्रथा चालू राहावी म्हणून दुसरीकडे सामूहिक आग्रह पश्चिम बंगालमध्ये धर्मसभा नावाने सुरु होते. आमच्या धर्मामध्ये लुडबूड नको, परंपरा टिकली पाहिजे, असा आग्रह होता आणि काउंटर चळवळ एकाच वेळेला सुरू असतात. युरोपात जेव्हा कृती चळवळ चालू होती, तेव्हा आयर्लंडमध्ये Phase counter movement चालू होती.जेव्हा स्त्री शिक्षणाची चळवळ महात्मा फुलेनी चालू केली, त्या वेळेला शेणाचे गोळे फेकणारे व स्त्री शिक्षण नको म्हणणारे लोक सुद्धा होते. नामांतराची चळवळ ज्या वेळेला सुरु होती, त्यावेळी नामांतर कशाला पाहिजे आहे? आहे तेच ठीक आहे, असे म्हणणारे काउंटर Movement चालू होती. अशी स्थिती अनेकदा जगातील चळवळी बाबतही आढळते. समाजशास्त्रामध्ये School of Thought मध्ये उत्क्रांतीवादी जे विचारवंत एमिल दुर्खीम, ऑगस्ट कॉम्त, स्पेन्सर या सगळ्यांचे असे मत आहे, की समाजात परिवर्तन होत असतात असे असले तरी सामाजिक चळवळीची भूमिका त्यामध्ये महत्त्वाची आहे. सामाजिक चळवळी अभ्यास समाजशास्त्रामध्ये अपरिहार्य आहे, जगभरामध्ये शिक्षण व्यवस्था किंवा क्षेत्रामध्ये सामाजिक चळवळीचा अभ्यास होत असतो. सामाजिक चळवळीच्या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक कृतीमध्ये सातत्य राखणं आणि दोन उस्फूर्तता या दोन मुद्द्यांवर जर विचार केला तर आपण सामाजिक चळवळीला चळवळ हा शब्द वापरणं योग्य नाही असे मला वाटते. उदाहरणार्थ सहकार चळवळ ही अभ्यासक्रमात आहे, खरंतर सहकार चळवळ हा सामाजिक चळवळ नाही, कारण सहकार चळवळीमध्ये साखर कारखाना, सूतगिरण्या या चळवळी नाही यासोबतच ट्रेड युनियनची सुद्धा चळवळ होऊ शकत नाही. कारण जर का अन्याय करणारी वा मालकांचा प्रतिनिधी जर ट्रेड युनियनमध्ये असेल तर ही सामाजिक चळवळ होऊ शकत नाही असेही वाटते. असे ते म्हणाले.

या सर्व पार्श्वभूमीवर आपल्याला सामाजिक चळवळी मधून जायचे असेल, तर सगळ्यात मोठी आणि जगाच्या इतिहासातली सर्वात मोठी चळवळ म्हणजे प्रबोधनाची, विचार क्रांती करणारी चळवळ होय. अशा चळवळीची सामाजिक चळवळीला मोठी ताकद वा दिशा मिळत असते. रुसो, मॉंटेस्क्यू किंवा इंग्लंडमध्ये फ्रॅन्सीस बेकन सारख्या शास्त्रज्ञ असतील या सगळ्यांनी सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी तयार केली आणि या पार्श्वभूमीतून युरोप मध्ये पहिल्यांदा चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. या प्रबोधनाच्या चळवळी मध्ये सर्वप्रथम चांगलं काय असलं पाहिजे? आणि वाईट काय आहे? ते कसं नष्ट झालं पाहिजे? या सगळ्या गोष्टींची चर्चा, नवा आदर्श, नवमूल्य याची मांडणी प्रबोधनाच्या चळवळी मध्ये झाली. आणि या सगळ्या

चळवळीला जन्म घालण्यासारखे परिस्थिती निर्माण झाली आणि यातूनच पुढे अमेरिकन, फ्रेंच राज्यक्रांती झाली हे उदाहरण सांगता येईल.

सामाजिक चळवळीचे अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये क्रांतिकारक चळवळ हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. या चळवळीसाठी सुद्धा प्रबोधनाची चळवळ अत्यंत महत्त्वाची आहे असे वाटते. सामाजिक चळवळीमध्ये जे प्रकार आहेत, त्यामध्ये सुधारणावादी चळवळ Revolutionary movement re Terminator movement addictive movement असे चार प्रकार प्रामुख्याने सांगीतले जातात.

सामाजिक चळवळी का होतात? याची कारणांमध्ये चार सिद्धांताचा समावेश होतो आणि हर्बर्ट ब्लुमरने मांडलेला Social unrest theory हा सिद्धान्त होय. ब्लुमर असं म्हणतात, की 'जेव्हा सध्याची समकालीन परिस्थिती लोकांना नको असते, तेव्हा त्या वेळी ते बदलण्यासाठी प्रयत्न करीत असतात. कारण त्यांना परिवर्तन हवे असतं, मग १८५७ चा बँड असेल, तो सुद्धा एक Social unrest Theory मधूनच ती चळवळ/उठाव उभा राहिलेला दिसतो. शेतकऱ्यांची चळवळ असेल, आदिवासींच्या चळवळी असतील या unrest मधून होत असतात. अर्थात उभ्या होतातच असेही नाही, तुमचे म्हणणे शंभर टक्के लागू पडत नाही कारण स्त्रियांवर, दलितांवर खूप अत्याचार होत आलेले आहेत, त्यांच्या नवीन चळवळी उभ्या राहिलेल्या नाहीत.

Relative deprivation theory ही महत्वाची theory आहे. यामध्ये म्हटले की 'आम्ही कमी आहोत, आमच्याकडे कोणीतरी दुर्लक्ष करते, आमचे हक्क, प्रतिष्टा आम्हाला मिळत नाही. आम्हाला वंचित, उपेक्षित ठेवले. आणि या वंचिततेमधून पीडी एशियन मधून चळवळी व संघर्ष उभी राहात असते. उदाहरणार्थ भारत-पाकिस्तानच्या फाळणीनंतर पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान निर्माण झालं. परंतु या पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान मध्ये संपूर्ण स्त्रोत आहेत ते पश्चिमकडे. म्हणजे आत्ताच्या पाकिस्तानमध्ये. पूर्ववाल्यांना असा प्रश्न पडला, की आपल्याकडे काहीच नाही, कुठला आधार नाही व इतरही काही स्त्रोत नाही आणि यातून एक चळवळ उभी राहिली आणि त्या चळवळीतूनच नवा बांगलादेश उभा राहिला. हीच गोष्ट USSR मध्ये पुर्वीचा जो सोव्हीयत रशिया मध्ये जे काही केंद्रभूत यंत्रणा आहेत ते मास्को मध्ये होत, आणि मास्कोचे वितरण होत होतं, शित्पर गेनिगराऊ स्टेलीन गरार, तिकडेच जात होतं आणि म्हणून सोवियत युनियन मधली जी काही पश्चिमेकडची राष्ट्र आहेत, त्या राष्ट्रांना असं वाटतं की आपल्यावर अन्याय होतोय, आपल्या कडे दुर्लक्ष होते, आपण उपेक्षित राहतो व त्यांनीही लढा देऊन संघर्ष केला आणि त्याच्यातून जवळजवळ सोवियत युनियन मध्ये फूट पडली आणि १२ नवे देश निर्माण झाले. अर्थात असं प्रत्येक वेळेला होत असं नाही, प्रत्येक सिद्धांताच्या काही मर्यादा असतात. वंचित सत्तेच्या माध्यमातून सुद्धा सामाजिक चळवळी किंवा आंदोलन, क्रांतीच्या दिशेने बदल ह्या सर्व गोष्टी होत असतात. त्यांच्या नंतरचा महत्त्वाचा सिद्धांत Structure strength theory मिल्स, स्मेल्सरने सामाजिक सांगितलेली आहे. मिल्स, स्मेल्सरला टाळणं हे उचित नाही, असं वाटतं त्यांच्या मते , प्रत्येक समाजामध्ये (यू.एस. इंग्लंड, भारत, युरोप सर्वत्र) मूल्यव्यवस्था आहे.

उदा. यू.एस. मध्ये democratic Value system आहे, मतदान मूल्य आहे, समानता मूल्य आहे, पण असे असून सुद्धा हे आम्हाला मिळत नाही, आम्ही त्या पासून वंचीत आहोत, आम्हाला संधी नाही आणि अशा ह्या मूल्य व्यवस्थेमध्ये आम्ही वंचितत्वाची भावना निर्माण होते. आणि त्याच्यातून एक चळवळ निर्माण होत असते. रॉबर्ट मर्टन ने merican dream नावाची एक संकल्पना मांडली आहे. त्याचे हे म्हणणे आहे, की माणसाला बंगला, गाडी.... पाहिजे, त्यांची कष्ट करण्याची तयारी आहे हे असून सुद्धा जेव्हा त्याला रोजगार मिळत नाही, किंवा हे सगळं मूल्य व्यवस्थेमध्ये असून सुद्धा आमच्यापर्यंत येत नाही तेव्हा लोक चळवळ करतात. इंग्लंड मधली स्त्री मतदान हक्कांची चळवळ असेल किंवा American civil right movement असेल, या सगळ्या गोष्टी ह्या string theory ज्या माध्यमातून आपल्याला सांगता येतील. एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे यु. एस. मधील रोजा पार्क, त्यांना वंशभेदाच्या आधारे एसटी मधून उतरून टाकली जाते. ती याला विरोध करते, आंदोलन करते, या आंदोलनात रोझा पार्क यांचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. भारतामधील दलित चळवळीचा उल्लेखही इथे घेता येईल, आम्हाला संधी नाकारली जाते, हक्क नाकारले जातात, आणि त्याच्यातून मग दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्तांची चळवळ उभी राहते, आणि शेवटचा एक सिद्धांत म्हणजे Resources mobilization होय. हा सिद्धांत असे म्हणतो की सामाजिक चळवळी उभ्या करायच्या असेल, तर स्त्रोत असले पाहिजेत. दलितांची चळवळ, भटक्या-विमुक्तांची चळवळी यांच्याकडे स्त्रोतच नाहीत. या लोकांकडे घर, पैसा, प्रतिष्ठा, मान सन्मान, प्यायला शुद्ध पाणी, अन्न-निवारा नाही, गावकुसाबाहेर वास्तव्य आहे. अशा प्रकारचा संसाधन/स्त्रोत हिन असलेला लोकसमूह होय, ते स्त्रोताविना चळवळ कसे करणार कसे चालवणार? हा प्रश्न आहे. अशा अवस्थेमध्ये सुद्धा अनेक चळवळी झालेल्या आहेत. १९२७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड सत्याग्रह केला होता. कुठलीही चळवळ (स्त्रोत) साधनांशिवाय फारशी गती घेत नाही. या चळवळीकडे समाधानकारक त्यावेळी उपलब्ध नव्हती, या चळवळीला मदत करण्यासाठी महाडच्या आसपासच्या चाळीस गावातल्या विशेषत्वाने दलितांनी प्रत्येकी गावाने तीन रुपये मदत केली, एका गावातून १२० रुपये मदत केली तर महाराष्ट्रातला सत्याग्रह म्हणून, मुंबईतल्या लोकांना आणि त्यातून निर्माण झालेले २३ रुपये अशा एकूण १४३ रुपयांमध्ये महाड सत्याग्रह आंदोलन झालं ही बाब ऐतिहासिक आहे.

तर याउलट स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या दहा दिवस

आधी 'बिर्ला नावाच्या उद्योगपतीने' महात्मा गांधींनी स्वातंत्र्य चळवळीसाठी दोन लाख रुपये मदत केली. म्हणजे हा जो रिसोर्स/स्त्रोत मधला फरक आहे तो आपण सर्वांनी समजून घेणे गरजेचे आहे, व त्या दृष्टीने या सिद्धांताचे महत्व आपल्याला लक्षात येऊ शकते. अर्थात पैसा हाच सोर्स महत्त्वाचा भाग असतो, असं नाही. तर नेतृत्व हासुद्धा महत्त्वाचा भाग आहेनेतृत्व हे ज्ञानी, शिक्षित असायला पाहिजे हे आपल्याला माहीत आहे. परंतु जनसमूह हजारो वर्षापासून शिक्षणापासून, ज्ञानापासून वंचित आहे, तो कसा चळवळीचे नेतृत्व करणार हाही प्रश्न आहे. मॅक्स वेबर यांनी म्हटले आहे की 'भारतामध्ये थेरी ऑफ कर्मा जे आहे, तिने या देशाचे किंवा समाजाचे फार नुकसान केलेले आहे. या सिद्धांतानुसार भारतातील समाज समूह आजही मुक्त झालेला नाही. असं खेदाने म्हणावं वाटतं.जिथे एक नेतृत्व उभं राहत नाही, तिथे मग चळवळ कशी उभी राहिल? आणि जेव्हा एखादं डॉ. आंबेडकरांसारखे नेतृत्व उभे राहते, त्या वेळेला ते उभा राहिलेले नेतृत्व कसं कमजोर होईल, एकट पडेल, दुर्लक्षित कस राहील, कसं संपवता येईल यादृष्टीने सर्व व्यवस्था कार्य करीत राहते. एक आठवण म्हणून ज्या वेळेला महात्मा गांधींनी स्वतंत्र मतदार संघाच्या प्रश्नांवर सत्याग्रह केला होता आणि डॉ. बाबासाहेबांच्या भूमिकेला विरोध केला होता. त्यावेळेला त्या काळातल्या तामीळनाडूला सर्वात एम. सी. राजा याला काँग्रेसने साथ करावी व डॉ. आंबेडकर यांना एकट पाडण्याची चर्चा झाली होती.

१९३१ ला जी गोलमेज परिषद गांधींनी 'मुस्लिम लीग' बांधवांसोबत चर्चा केली की 'आम्ही तुम्हाला सहकार्य करतो, तुम्ही स्वतंत्र मतदार संघास विरोध करा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या एका विद्वान आणि लढाऊ नेत्याला, अभ्यासू नेत्याला, चळवळीतून एकटा पाडण्याची, जगजीवनराम बाबू सारख्यांनी, दलितांच्या चळवळी कशा मोडता येतील अथवा मोडल्या जातील, बाजूला होतील याचा प्रयत्न प्रस्थापित व्यवस्थेकडून होत असतो. खरं म्हणजे दलितांचे प्रतिनिधित्व झालं नाही पाहिजे, गोलमेज परिषदेच्या वेळेला महात्मा गांधी म्हणायचे, की 'मी हिंदुस्तान - भारताचा प्रतिनिधी आहे, त्यावर डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिनिधित्वाला काहीच अर्थ उरत नाही, त्या वेळेला लोकांमधून एक प्रचार झाला, की दलितांचा प्रतिनिधी कोण आहे. गरीब समाजातल्या लोकांनी ब्रिटिश सरकारला 'तार' करून कळवले की बाबासाहेब हे आमचे प्रतिनिधी आहेत, या पद्धतीने दलितांना प्रतिनिधित्व मिळणार नाही, चळवळ तशी होणार नाही यादृष्टीने सर्व व्यवस्था काम करीत होती.

स्त्रोतामध्ये अजून एक महत्त्वाचा भाग आहे, तो म्हणजे मीडिया हाऊस होय. भारतामध्ये सर्वोच्च ५ माध्यम हाउस आहेत. त्यातील चार मालक वैश्य असून एक ब्राह्मण आहे, टाइम्स, ग्रुप, रिलायन्स ग्रुप गुजराती वैश्य मालक आहेत तर द हिंदू ब्राह्मणांकडे आहे, दैनिक जागरण, भास्कर, इंडियन एक्सप्रेस, हिंदुस्तान टाइम्स या सगळ्या टॉपच्या Editorial मध्ये आज पर्यंत कोणीही दलित मालक/मुख्य संपादक/ Chief reporter नाही. हे सर्व खाजगी व्यवस्था असल्यामुळे तिथे आरक्षण देखील नाही. अशा अवस्थेमध्ये दलितांचे प्रश्न समोर येणार कसे? आणि येतच नाहीत, त्यामुळे त्यावर चर्चाही होत नाही आणि दलितांच्या प्रश्नाला वाचा ही फुटत नाही.संसदेमध्ये संविधानाने दिलेले दलितांचे प्रतिनिधी आहेत, पण ती भूमिका पार्टीची मांडतात, दलितांचे प्रश्न मांडत नाहीत, त्यामुळे अशा लोकांना संधी एवढ्याच साठी दिलेली आहे, की ती गप्प बसण्यासाठी. या उलट मराठा मोर्चाची अवस्था बघा काय आहे? मी स्वतः ही माझ्या संघटनेच्यावतीने मराठा समाज जातील जे गरीब मराठा आहेत त्यांना आरक्षण मिळाले पाहिजे या मताचा जाहीरपणे या आंदोलनाला पाठिंबा दिलेला आहे. पण मी संसाधनांच्या/स्त्रोतांच्या बाबतीत एवढेच म्हणतो, की 'दलितांचे मोर्चे१०० लोकांचे काढणे, सुद्धा कठीण होते हजारांच्या पटीत तर सोडाच. या उलट मराठा मोर्चासाठी गाड्या, पाणी बॉटल, खाद्य वाटप, कार्यकर्त्यांची जेवणाची व्यवस्था, झेंडे त्या शहरातील त्या दिवशी दुकाने बंद, स्टेज देखील भव्यदिव्य, फेटे, पत्रकार, टी.व्ही.... सर्व प्रशासकीय व पोलीस यंत्रणा, हेलिकॉप्टरमधून होणारी शूटिंग म्हणजेच स्त्रोत/संसाधने असल्यामुळे चळवळी देखील मजबूत बनतात आणि ज्या काही चळवळी मजबूत बनतात ते अनिष्ट आहे असं माझं मत नाही, पण आंदोलन बांधणीसाठी संसाधनांची उपलब्धता फार महत्त्वाची असते.अण्णा हजारे यांचे आंदोलन जेव्हा भ्रष्टाचार निर्मूलन करिता दिल्लीच्या जंतरमंतर वर झालं, तिथेदेखील खूप मोठ स्टेज, मिडीया, मी अण्णा हजारे अशा टोप्या उपलब्ध होत्या. हजारे तर मूळ ठिकाणी होते, पण ही यंत्रणा, व्यवस्था कोणी उभी केली? स्त्रोत कुठले? हा प्रश्न निर्माण होतो. या तुलनेत स्त्रियांच्या चळवळी कुठे प्रभावी आहेत? दलित, वंचित, भटके विमुक्तांच्या चळवळी कुठे आहेत? भटके-विमुक्त दखलपात्र चळवळी नाहीत. हे होत नाही कारण स्त्रोत/संसाधनांचा अभाव आढळतो. या सर्व पार्श्वभूमीला लक्षात घेऊनच आपणास चळवळीकडे बघावे लागेल.

पुढे ते म्हणतात की,भारतामधल्या चळवळी संदर्भात पि.के. वूमनने खूप चांगल्या पद्धतीने सांगितले की, कलोनियल, पोस्टकॉलोनियल चळवळी, समकालीन चळवळी आणि या सगळ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रामध्ये, भारतामध्ये एकूण ज्या चळवळी आहेत. वारकरी चळवळी, ब्राह्मणेतर चळवळी, दलित, आरक्षण, पर्यावरण संदर्भातील चळवळी, धर्मांतराची, अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ आहे. शेतकरी व शेतमजुरांची, नाशिक संयुक्त महाराष्ट्राची चळवळ अशा अनेक चळवळी आहेत.वारकरी किंवा भक्ती चळवळ अतिशय महत्त्वाची आहे. या काळात राष्ट्रीयता प्रचंड मोठ्या प्रमाणात होती. असे असताना सुद्धा पंढरपूरच्या, चंद्रभागेच्या वाळवंटात का होईना. समतेचा विचार व भूमिका घेऊन लोक एकत्र येत होते. एकमेकांच्या गळ्यात माळ घालत होते. एकमेकांमध्ये भगवंत पांडुरंग माऊली बघत होते. त्यामुळे ही गोष्ट त्या काळातली सुद्धा कमी महत्त्वाची आहे. असे म्हणून चालत नाही. त्यानंतर अधिक महत्त्वपूर्ण वाटलेली ही चळवळ म्हणजे ब्राह्मणेतर चळवळ होय ही चळवळ महात्मा फुले

यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन पुढे आलेली आहे. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे सुद्धा योगदान येथे महत्त्वाचे आहे. एक महत्त्वाची बाब म्हणजे, या चळवळीचे नेतृत्व एका श्रीमंत आणि शिक्षित वर्गाकडे होते. ते जरी ब्राह्मण नसले तरी श्रीमंत व प्रभावशाली जातीतून समोर आलेले होते. त्यामुळे स्त्रोत उपलब्धीचा प्रश्न नव्हता या सर्व चळवळीबद्दल एक महत्त्वाचे उदाहरण सांगता येईल, की तामिळनाडूमध्ये जी जस्टीस पार्टी होती, ती ब्राम्हणेतर चळवळीचे उत्तम उदाहरण आहे. १९१६ –१९१७ या पार्टीची स्थापना झाली. मुदलियार टी. एम. नायर हे त्याचे लीडर होते, ज्याला आपण Tardyon movement म्हणतो, तामीळनाडूत १९२० च्या निवडणुकीत जस्टीस पार्टी विजयी झाली. या पार्टीने एम. सी. राजा बरोबर युती केली होती. परंतु जेव्हा मंत्रिमंडळाच्या खाते वाटपाची वेळ आली, तेव्हा दलितांना डावललं गेलं, त्यांना संधी नाही. बिल्ला, रेड्डी ह्या प्रबळ जाती होत्या, त्यांनी ब्राह्मण अन्याय करतात, म्हणून वेगळा समूह केला होता. यांच्या कडून सुद्धा त्यांच्यापेक्षा कनिष्ठ जातीवर अन्याय होतो असे लक्षात आल्यावर एम. सी. राजा त्यांच्यातून बाहेर पडले. त्याचा परिणाम असा झाला की, १९२६ ला जस्टीस पार्टीचे सरकार पडलं. म्हणजे अन्याय कोण करतंय, तर ज्याला संधी मिळेल, तो करतो असं दिसतं, आणि त्यातूनच चळवळी निर्माण होतात, आणि मोडतात सुद्धा.

१९२५ मध्ये Self Rrespect पेरियार रामास्वामीच्या नेतृत्वाखाली चळवळ सुरू झाली. मानवी हक्कांशी निगडित ही चळवळ असून यामध्ये सर्व विषय घेतले होते. स्त्री पुरुष समानता, शिक्षण समानता, मंदिर प्रवेश, तामिळ भाषा अस्मिता हे विषय घेऊन ही चळवळ उभी राहिली. १९२५ ला सेल्फ रिस्पेक्ट आणि १९२७ ला डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली दलितांची चळवळ उभी राहिली आहे. पेरियर आणि डॉ. आंबेडकर हे क्रांतिकारी विचारांची माणसं होती, त्यांना व्यवस्थेत मुळातून बदल हवा होता आंबेडकरांची ब्रोकन मेन Theroy सुद्धा अतिशय महत्त्वाची आहे, त्याचा सुद्धा अभ्यास होण्याची गरज आहे असे वाटते.

१९२७ ला मनुस्मृती जाळणं, मंदिर प्रवेश करणं, बंगालमध्ये नामशूद्राची चळवळ उभी राहणं, दर्जा तिची चळवळ उभी राहणं, छत्तीसगडमध्ये सत्तानीची चळवळ ह्या ब्राह्मणेतर चळवळीचे आहेत.या सर्व चळवळी आपल्या अस्मितांचा शोध घेण्यामध्ये आणि आपल्याला डावलले जाते, वंचित ठेवले जाते, या भावनेतून निर्माण झाल्या आहेत. दलितांचा नेता, दलित संघटना मध्ये जेव्हा एखाद लीडरशिप किंवा नेतृत्व तयार होते, त्या वेळेला त्या चळवळीच्या नेत्याला बदनाम करण्याचा प्रयत्न होतो. प्रस्थापित पक्ष संघटना, जसे गोलमेज परिषदेमध्ये काँग्रेसने बहिष्कार टाकला, परंतु डॉ. बाबासाहेब सहभागी झाले, त्यावेळी त्यांच्या वर ब्रिटिशांचे ऐकत आहात, त्यांच्या विचाराने जात आहात, असा आरोप केला होता. सगळ्या मंत्रिमंडळातल्या लोकांनी राजीनामे दिले, त्यावेळेला डॉ. बाबासाहेब कामगार मंत्री होते. त्या वेळेला त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न झालेला होता. सांगण्याचे तात्पर्य की 'महात्मा गांधी सारखे नेते, जे वर्ण, धर्म मानत होते, खरं तर दलित आणि अस्पृश्यांच्या बद्दल त्यांच्या मनात सहानुभूती होती. पण ते सशक्त झाले पाहिजे या दृष्टीने काही केल्याचे समोर येत नाही. लॉर्ड बेंटिंग ज्यावेळेला व्हॉईसरॉय दलितांचे प्रतिनिधी होते, त्या वेळेला निधी कोण असणार हे काँग्रेसने ठरवावं, असं बेन्टिंग नी सांगितले. त्यामुळे नाईलाजाने डॉ. बाबासाहेब एकटे पडल्यामुळे त्यांना काँग्रेस बरोबर तडजोड करावी लागली, आणि त्यांनी नंतर देशाचे शिल्पकार म्हणून इतिहास घडवला. भारतामध्ये शेतकरी चळवळीबाबत जेव्हा आपण बोलतो, या चळवळी प्रभावीपणे जमीनदार व श्रीमंत शेतकरी चालवतात, यामध्ये शेतमजुरांची संख्या कमी आहे. मालाला दर मिळाला पाहिजे, हा गट प्रभाव असलेल्या वर्ग होय. याचा संबंध राजकारणाशी असल्यामुळे त्यांच्या मागण्या अनेकदा मान्य होतात. स्त्रोत उपलब्ध होतात. म्हणून शेतकरी आंदोलन मोठे होतात, आणि त्यांच्या मागण्या मान्य होतात. परंतु याचा लाभ शेतमजुरांना होत नाही. १९६४ चा दादासाहेब गायकवाड यांचा जर अपवाद सोडला, तर शेतकऱ्यांच्या चळवळी फारशा जोर धरत नाहीत. आज अशी स्थिती आहे, कि पंजाब व महाराष्ट्रामध्ये मोठ्या शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला. त्यांची प्रगती झाली, सुधारणा झाली. पण त्यांच्या शेतावर काम करणारी बिहार आणि यू.पी. मधील लोक/मजूर कमी मोबदल्यात/पैशांमध्ये काम करतात, इतर राज्यातून कमी पैशात मजूर उपलब्ध झाल्यामुळे येथील दलित मजूर बेरोजगार होत असल्याचे चित्रही दिसते आहे. त्यामुळे शेतकरी चळवळीचा फायदा शेतमजूर दलितांना होत नाही असेच दिसते.

स्त्रियांच्या चळवळीबाबत सुद्धा अशीच परिस्थिती आढळते. प्राचीन व जुना इतिहास, भक्ती चळवळी आहेत, संत मिराबाई, जनाबाई, चोखाबाई असतील स्त्रीयांना स्वातंत्र्यलढ्यात सहभाग असला तरी स्त्रियांना गांधींनी व इतरांनी सांगितले कि, 'तुम्ही देशाच्या स्वातंत्र्याबाबत बोला, स्त्री स्वातंत्र्यावर बोलू नका, स्त्री–पुरुष तत्त्व त्यांना माहीत होतं, पण स्त्रियांनी घरातली कामे करावी हा आग्रह होता. या सोबतच पुरुषप्रधानता, प्रभावी नेतृत्वाचा अभाव हे प्रश्नही आहेत. आणि जेव्हा स्त्री चळवळीचे नेतृत्व एखाद्या प्रस्थापित नेत्याची बहू, बेटी, बीबी करते. ह्या स्त्रिया असतील तर संसाधने/स्त्रोत भरपूर असतात आणि ती चळवळ होण्याऐवजी तो एक ऐंशपीं किंवा उपक्रम होऊन जातो. या सगळ्या गोष्टी स्त्री चळवळी बाबत सुद्धा सुरू आहेत. चळवळीतून बदल होतो आहे, मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, सईद अहमद खान.... स्त्रीवादी चळवळीची अशी परिस्थिती आहे.

इंग्लंडमध्ये ज्या वेळेला स्त्री मतदानाची चळवळ झाली, तेव्हा त्यांनी बोलण्यापेक्षा कृतीला अग्रस्थान दिले. इमिल डेव्हिड स्त्री चळवळीत काम करण्याची स्त्री आहे, इंग्लंडमध्ये ज्या घोड्यांच्या शर्यतीत राजे लोक सहभागी होतात, तिथे इमिल डेविस नावाची स्त्री चक्क घोड्याच्या शर्यती मध्ये समोर येऊन आडवी झाली आणि धावणारे घोडे तिच्या अंगावरून गेले, त्यामध्ये ती

मृत्त झाली.अथवा शहीद झाली. म्हणजे कृती Action ही चळवळीसाठी फार महत्त्वाची असते असे मला अधोरेखित करायचे आहे. डॉ. सकटे असे ते म्हणाले.

मला असा प्रश्न पडतो की 'अमेरिकेतील ब्लॅक चळवळी यशस्वी झाल्या, आणि भारतातील दलित चळवळ पाहिजे तेवढ्या प्रमाणात यशस्वी झालेल्या नाहीत. याचा शोध घेतला तेव्हा असे जाणवते, की 'अमेरिकेत असणार भाषण स्वातंत्र्य, लिहिण्याचा स्वातंत्र्य, आपल्याकडे संविधानामध्ये आहे. पण प्रत्यक्षात तसे नाही.

मित्रहो, अमेरिकेमध्ये इतक्या सडेतोड, जाहीर व कडवटपणाने सरकार आणि व्यवस्थेच्या विरोधात लिहिले, बोलले जाते आणि त्याचे स्वागतही केले जाते. भारतात हि स्थिती दिसत नाही, इथे आनंद तेलतुंबडे सारखा विचारवंत जेलमध्ये अडकतो. येथील विचारवंतांवर नक्षलवादाचा शिक्का मारला जातो. अशा पद्धतीची व्यवस्था, शासन आणि कायदे असतील तर कशा चळवळी यशस्वी होतील हा प्रश्न आहे Role of University हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. अमेरिकेमध्ये GT असेल, LGBT असेल, Environment movement असेल याच्यामध्ये विद्यापीठातील प्राध्यापक सहभागी आहेत. भारतात तसे आढळत नाही. अमेरिकेमध्ये Freedom school नावाचा समूह आहे. तो नीग्रो मुलांना शिकवलं पाहिजे म्हणून गोरी मुले निग्रो मुलांना शिकवत होते. तेथील काही गोऱ्या कर्मठ लोकांनी या मुलांवर गोळीबार केला, त्यांच्या हत्या केल्या, जेवढे विद्यार्थी मारले गेले. त्या दुप्पट विद्यार्थी वसाहतीमध्ये शिकवायला गेले, त्यांच्यावरही गोळीबार झाला. तिसऱ्या दिवशी त्याहीपेक्षा अधिक संख्येने विद्यार्थी सहभागी झाले. ही विद्यापीठीय भूमिका आणि ताकत(University Roll) आहे.

भारतात आपण पाहिलं, की जे, एन, यु, मध्ये विद्यार्थ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल होतो, विद्यापीठात रणगाडे उभे केले जातात, अशोका युनिव्हर्सिटीच्या कुलगुरूना राजीनामा द्यावा लागतो. अशावेळी विद्यापीठातील संबंधितांची भूमिका काय असते?....

अमेरिकेमध्ये मायकेल जॉर्डन ही 'लोक चळवळ' सोबत कमी लोक आहेत. १९६८ ला मेक्सिकोमध्ये ऑलिंपिक सामन्यात दोनशे मीटर रनिंग मध्ये गोल्ड मेरीट घेतलेला टॉम्मि स्मिथ व बाऊस मेंडल घेतलेला जॉन हे दोघेजण ज्या वेळेला हे मेडल स्वीकारून आले, त्या वेळेला तिथे अमेरिकेचे राष्ट्रगीत लावले होते त्यावेळेला त्यांनी मान खाली घातली, आणि कमिटमेंट निग्रो बरोबर आहे हे त्यांनी दाखवून दिले.व्हियेतनामच्या युद्धामध्ये त्या वेळेला मात्र अमेरिकेची भूमिका वेगळी होती तिथल्या सरकारचं म्हणणं होतं की वंशभेद जरी असला तरी आपण जिंकलं पाहिजे. आणि अमेरिकेच्या सैन्यामध्ये निग्रोची भरती मोठ्या प्रमाणात होऊ लागली, कारण वंशभेदा पेक्षा महत्त्वाचं आहे, अमेरिका हारली नाही पाहिजे हे अग्रणी होतं.

भारतामध्ये मात्र विचित्र भूमिका आहे. भारतीयांमध्ये हजारो वर्ष क्षत्रियांनीच लढायचं, शूद्र समाज मोठा आहे, हरलो तरी चालेल, पण शूद्रांना हातात शस्त्र घेण्याचा अधिकार नाही. म्हणून त्यांनी लढायचं नाही, क्षत्रियांनी लढायचं आणि दलितांना जर गावात प्रवेश नसेल, तर सैन्यामध्ये प्रवेश कोण देणार, दलितांना सैन्यात प्रवेश ब्रिटिशांनी दिला. ब्रिटिशांनी आपल्या सैन्यात दलितांना घेतलं, या ब्रिटिशांनी परंपरेने चालत आलेल्या क्षत्रियांबरोबर भीमा कोरेगाव लढाई केली, आणि पारंपरिक क्षेत्रीयांचा यांचा पराभव केला. म्हणून ज्यांना संधीच नाही, जे दलित, दुबळे आहेत म्हणून ते बाहेर आहेत. ते दलित, शूद्र आहेत, म्हणून त्यांना बाजूला ठेवल्या जात होतं, आणि खेळात नाहीत की चळवळीत नाहीत, अनेक क्षेत्रात त्यांचा सहभाग नसल्यामुळे त्या चळवळीचे नेतृत्व सुद्धा प्रभावीपणे उभे राहात नाही, या सर्व बाबी लक्षात घेणं महत्त्वाच्या आहेत. स्मित प्रॉमिस आणि यांनी जे काही हातात काळे मोजे, गळ्यात काळी मफरल आणि मान खाली असा त्यांनी एक प्रतीकात्मक आंदोलन केलं होतं,या सगळ्या आंदोलनाचा मास्टरमाइंड हॅरी एडवर्ड हा होता. तो कॅलिफोर्निया विद्यापीठात समाजशास्त्राचा प्राध्यापक होता. म्हणजेच प्राध्यापक काय करू शकतात. त्याचं हे उदाहरण आहे. आपल्याला माहिती असेल, की अमेरिकेत झालेल्या anti-bar चळवळीला समर्थन दिलं होतं. मोहम्मद अलीना तो बॉक्सीयनचा चंपियन होता, तर अमेरिकन शासनाने त्याचे सर्व मेडल्स काढून घेतले. त्याला देशातून हद्दपार केलं. ४ ते ५ वर्ष तो बाहेर राहिला. पण अलीने ब्लॅक लोकांसोबत कमिटमेंट ठेवली. ही चळवळ संपल्यानंतर अमेरिकेने अलीला परत बोलावलं, सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्याने नंतरही मेडल्स मिळवली. म्हणजे सामाजिक चळवळी प्रती कुर्बानी देण्याची तयारी भारतामध्ये, भारतातील नेते, कार्यकर्त्यांमध्ये किती आहे? हा भाग देखिल तितकाच महत्वाचा आहे, त्याकडे लक्ष वेधणे देखील गरजेचे आहे.

साहित्याची भूमिका सुद्धा महत्वाची आहे. अण्णाभाऊ साठे, मुक्ता साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे लिखाण, राजा ढाले, अरुण कांबळे आणि त्यानंतरचे दलित पँथर, नामांतर, दलित चळवळ सुरू झाली. त्या मधून जे काही लेख, लेखन, कविता, साहित्य, कथा मांडल्या गेल्या. या सगळ्यांचा परिणाम हा इतका जबरदस्त झाला, की 'एक समाज मन चळवळीसाठी तयार झालं, नामांतराची चळवळ असेल, दलित पँथरची चळवळ असेल या चळवळीला फार मोठं बळ या साहित्याने दिलेलं आहे. आणि एक खेदाची बाब म्हणजे साहित्यिक लिहितो, की दलित चळवळीनी आक्रमक नाही झालं पाहिजे. असं कसं होऊ शकते म्हणजे या सगळ्या जगभरातल्या चळवळींचा इतिहास बघितला तर या साहित्यिकाचं मार्गदर्शन मला उमजत नाही. त्यांना एका संस्थेने पुरस्कार दिला आणि तो पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांची मतं बदलली हा एक माझ्यासाठी धक्काच आहे, असे मला वाटते.म्हणजे ह्या सगळ्या अशा गोष्टी, मोहिमांची भूमिका महत्त्वाची आहे. लोकांचे प्रश्न, मोहिमेच्या माध्यमातून मांडलेत. अमेरिकेत जान्गो यांचे नावाचा चित्रपट आहे. हा चित्रपट

निग्रोंच्या जीवनावर आधारित आहे. भारतात तामिळनाडूमध्ये ओरे ओरे ग्राम किल्ले नावाचा सिनेमा आला, त्यावर राज्य सरकारने बंदी घातली, त्यास सुप्रीम कोर्टाने बंदी उठवली. भारतामध्ये दलितांवर अन्याय होतात, कसा, किती, होतोय? यावर पाहिजे तशा प्रकारचे प्रकर्षाने दलितांचे प्रश्न मांडणारा सिनेमाच होत नाही. 'जांगो चेनला ऑस्कर पुरस्कार मिळाला, रोल ऑफ म्यूझिक सांगतो की 'मायकेल जॅक्सन' यासारख्याना ग्रामर अवार्ड ने सन्मानित करण्यात आले. आपल्याकडे मा. नरेंद्र मोदीं पंतप्रधानांची नक्कल करतोय म्हणून त्या कलाकाराला त्या शो मधून काढून टाकलं जातं. अशा पद्धतीने दलित, उपेक्षित स्त्रिया या सगळ्यांना बाजूला काढलं जातं, आणि हे बाजूला काढण्यामध्ये प्रशासन आणि सरकार, सरकारचे प्रतिनिधी असतात खैरलांजीच्या प्रकरणांमध्ये शहारे आणणारा अन्याय-अत्याचार तिथे घडला. त्यामध्ये शासनाचे एस. पी. पर्यंतचे लोक निलंबित झाले, अलीकडेच घडलेली हाथरस येथील जी घटना घडली, त्यामध्ये रेकॉर्डला हे आहे, की जिल्हाधिकारी त्या पिडीत मुलीच्या घरी जातो आणि सांगतो, की मीडिया आज है, कल नहीख लेकिन कल हम और तुम होंगे, तो सोचो क्या करना है! एखादा जिल्ह्याधिकारी असा असेल, तर अशा स्थितीत चळवळी उभ्या कशा राहणार? हीच सगळी अशी परिस्थिती असली, तरी अशा स्थितीतही स्प्रिंग प्रमाणे एखादी चळवळ उभी राहिली, मजबूत झाली पाहिजे.

नामांतराची चळवळ अतिशय जातीच्या पलीकडे गेलेली चळवळ आहे. पोचीराम कांबळे हे पहिले आणि नांदेडचे वाघमारे हे अखेरचे बलिदान आहे. सगळ्यांनी जेव्हा प्रण केले, सवर्ण त्यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. भूमिकेच्या बरोबर लोक येत आहेत, परंतु आज परिस्थिती वेगळी आहे. आपण पाहतो की दिल्लीमध्ये शेतकऱ्यांच्या चळवळीवर खंदक काढलेला आढळतो. शेतकऱ्यांनी मोर्चेकरू नये, म्हणून दिसून येतो शेवटी चार्ल्स स्टेलीन नावाचा समाजशास्त्रज्ञ त्यांनी Large Cycle of Social Movement सांगितलेली आहेत.त्यामध्ये तो असे म्हणतो की, चळवळीत सुरुवातीला एखाद्या प्रश्नावर नेता तयार होतो, त्यानंतर लोक तयार होतात, त्यानंतर एक संरचना तयार होऊन, त्यास चळवळीचे स्वरूप येते. आणि मग त्या चळवळीला स्वरूप/संरचना आली, की ती चळवळ सुरू होते. मग ती यशस्वी किंवा फेल होते. किंवा सॉफ्ट होते किंवा ती मुख्य प्रवाहात समाविष्ट होते. अशा पद्धतीने ती शेवटी वशलश्रीशव होते.

दलित चळवळी बाबतही तशी स्थिती दिसून येते. दलित चळवळ १९७२ ला उभी राहिल. पुढे पुढे गेली, परंतु नामांतराचा प्रश्न संपल्यानंतर दलित चळवळ मागे पडलेली दिसते, दास चळवळ, दलित मुक्ती सेना, कुठे आहे? शेतकरी चळवळीची पण तीच अवस्था आहे त्यामुळे चार्ल्स स्टॅलिन ने सांगितलेले जे Large Cycle of Social Movement आहे. ती भारतातल्या चळवळीना सुद्धा पुरेपूर लागू पडते. परंतु या सगळ्या पार्श्वभूमीवर समाजशास्त्रज्ञ म्हणून, प्राध्यापक म्हणून आपली काय जबाबदारी आहे असे वाटते. की मॅक्स वेबरने एके काळी म्हटले होते, की संशोधन केले पाहिजे. डेलळरश्र उहरपसश सामाजिक परिवर्तन हे काम शासनाचे आहे. पण प्राध्यापकाने संशोधन करावे. सी. राईट मिल्स कोलंबिया विद्यापीठात प्राध्यापक आहेत. त्याने Sociological imagination या ग्रंथात असं म्हटलेलं आहे, की Social Change या प्रक्रियेमध्ये प्राध्यापक उतरले पाहिजे, लोकांची जागृती करणे. लोकांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने विश्लेषण करणारे लिखाण करणे, ही समाज शास्त्रज्ञांची जबाबदारी आहे. चळवळीला दिशा देण्यासाठी त्या कामामध्ये समाजशास्त्रज्ञांनी उतरले पाहिजे. कारण त्यांच्याकडे वेगवेगळे दृष्टिकोन आहेत, ते एखाद्या प्रश्नाकडे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून (Angle) पाहतात. आणि त्यांनी पाहिलं पाहिजे. पण भारतात हे फारसं होत नाही आणि म्हणून भारतामध्ये सामाजिक चळवळी फारशा प्रभावी नाहीत. इथे Counter Movement जास्त चाललेल्या आहेत. आणि त्याच्याबद्दल लिहिणारे ही लोक जास्त आहेत.

ग्रामसीने सांगितलं होतं, Counter Hegemony intelligence किंवा भूमिका किती महत्त्वाची आहे. ह्या गोष्टी लक्षात घेऊन मराठी समाजशास्त्र परिषद आणि त्यात सहभागी असलेल्या प्राध्यापकांनी या सगळ्या आजूबाजूच्या चळवळीमध्ये कधी लांबून का होईना विचारपूस करावी. संवाद साधावा आणि आपले लेखन, संशोधन व शोधनिबंध याच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न जनतेसमोर आणावेत व आणतील अशी अपेक्षा आहे. असे डॉ. सकटे म्हणाले.

प्रकाश आंबेडकर यांचा ग्रंथ दलित चळवळ संपली आहे. ज्या महामानवाने दलित चळवळ सुरुवात केली. जगभरात चळवळीला प्रेरणा दिली. त्या डॉ. आंबेडकरांचे नातू म्हणतात, की दलित चळवळ संपली आहे असे म्हटले, तरी या वाक्याला गृहीतकृत्य म्हणून समोर ठेवून या चळवळींचा नव्याने अभ्यास व्हावा, अशी अपेक्षा सकटे यांनी व्यक्त केली. एका अतिशय महत्त्वाच्या विषयावर लक्ष केंद्रित केल्याबद्दल मराठी समाजशास्त्र परिषद अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकारिणीचे त्यांनी कौतुक केले व आपल्या विचारांना विराम दिला.

अध्यक्ष: डॉ. प्रल्हाद जोगदंड, मुंबई

सहभागी तीनही साधन व्यक्तीने केलेल्या मांडणीचा मूल्यमापनात्मक आढावा घेऊन, त्याबाबत भाष्य केले. डॉ श्रुती तांबे यांनी केलेल्या उत्कृष्ट मांडणीचा ऊहापोह करताना ते म्हणाले कि त्यांनी 'महाराष्ट्रातलं कालचं वास्तव' आणि त्या वास्तवामध्ये झालेल्या सुधारणा चळवळी याचाही आढावा घेतला आहे. त्यासोबतच स्वातंत्र्योत्तर काळ त्यामध्ये विविध प्रवाह कसे निर्माण झाले. Common theme चा देखील तांबे यांनी उहापोह केला आहे. सोबतच जागतिकीकरण, माफाओ दृष्टिकोण आजच्या घडीला किती महत्वाचा आहे, अशी भूमिकाही त्यांनी मांडलेली आहे. त्याबरोबरच शहरी राजकारण, अलायन्स बिल्डिंग, नवीन सामाजिक चळवळी, त्यास असणाऱ्या मर्यादा व त्या वापरणं कसं चुकीचा आहे, या बाबींची चर्चा त्यांनी केलेली आहे. व सामाजिक चळवळींचा तौलनिक अभ्यास व्हावा. असेही डॉ. तांबे यांनी

अधोरेखित केले आहे. तर डॉ. सोळुंके यांनी Activist हा सामाजिक चळवळीमध्ये किती महत्त्वाचा असतो. याचे विवेचन करून, वेगवेगळी उदाहरणे वा संदर्भ दिले आहेत. वंचितांचा विचार व्हावा, सामाजिक न्यायासाठी चळवळी विकसित व्हाव्यात, निष्ठा नसलेले कार्यकर्तेव प्रामाणिक कार्यकर्त्यांची फार उणीव आहे असे ते म्हणतात. याप्रसंगी एका ग्रंथाची आठवण होते, ती म्हणजे Eric hopper यांनी लिहिलेलं True believer हे पुस्तक. म्हणजे कार्यकर्ता कसा असला पाहिजे (अतिश वसंत असला पाहिजे). आणि तो झपाटलेला, ध्येयवेडा असला पाहिजे. त्यास असे वाटले पाहिजे, की मला सामाजिक बदल घडवून आणायचा आहे. त्यात मला सहभागी व्हायचे आहे. True believer च्या अंगाने या सगळ्यांचे विवेचन या ठिकाणी आपल्याला अधोरेखित करता येईल. डॉ. तांबे आणि सकटे यांनी बऱ्याच सामाजिक चळवळीच्या सैद्धांतिक बाजू वा सिद्धांत सांगितले आहेत. त्यांनी सैद्धांतिक मांडणी केली आहे. त्याचे प्रकार व सिद्धांतांचा आढावा घेतला आहे. विशेषत: डॉ. सकटे यांनी Resource Mobilization बद्दल बोलतांना एखादी चळवळ सुरू करण्याच्या, शाश्वत करण्याच्या दृष्टीकोनातून स्त्रोत/संसाधन किती महत्त्वाची आहेत, यावर भर दिला. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेबांनी मांडलेल्या लीलज्ञारप Theory यावर देखील त्यांनी थोडक्यात प्रकाश टाकला. आणि नेतृत्व किती महत्त्वाचे आहे, हे सांगून ते पुढेही असे म्हणाले, की 'दलित चळवळी फारशा यशस्वी झालेल्या नाहीत किंवा झालेली नाही. त्यांचे हे निरीक्षण फारसे संयुक्तिक वाटत नाही. कारण दलित चळवळीचे यश-अपयश सांगत असतांना, आपल्याला विशिष्ट्य Indicators, Formula लावता येणार नाही. मला असं वाटते, की दलितांच्या सामाजिक प्रतिष्ठेसाठी, शैक्षणिक विकासासाठी, आत्मसन्मानासाठी, Identification आणि अपारंपारिक व्यवसाय स्वीकारण्यासाठी दलित चळवळीचा फार मोठा हातभार लागलेला आहे. आणि म्हणून सामाजिक गतिशीलता निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून चळवळी हा एक घटक आहे. विशेषत्वाने हे अनेक भारतीय शास्त्रज्ञांनी सांगितलेलं आहे. डॉ. जोगदंड म्हणतात, मला जे आपल्या समोर Methodological and theoretical issues मांडायचे आहेत. एकंदरीत असं दिसतं, की चळवळ Conversational किंवा Traditional अशा स्वरूपाच्या चळवळी आहेत. ज्याची चर्चा प्रामुख्याने इथे केली आहे, आणि म्हणून हे वर्णनात्मक अशा स्वरूपात चळवळी आपल्यासमोर झालेल्या आहेत, माझ्यासहित अनेक प्राध्यापकाने व्येष्टी अध्ययन म्हणून सुद्धा ह्या चळवळीचा अभ्यास केलेला आहे. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी बाबत माझे निरीक्षण असे आहे, की महाराष्ट्रातील चळवळी "These are tired and exhausted". अशा पद्धतीच्या झालेल्या आहे. नाविन्य असं काही दिसत नाही. या चळवळी थंडावल्या आहेत. संथ झालेल्या किंवा थिजलेल्या आहेत, असे इथे दिसून येते. एकंदरीत असं का व्हावं? यामागील कारणे काय? याचाही विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. सामाजिक स्थित्यंतर परंपरा व आधुनिकता या बाबी तांबे यांनी विश्लेषित केल्या आहेत. ही जी लळपरी आहे. तर ह्या सामाजिक चळवळी का थंडावल्या, नेमकं काय झालंय, का अस होऊ शकते? या प्रश्नांची उकल समजून घेताना, मला असं वाटतं की, या चळवळीकडे संसाधने/स्त्रोत Resource ची मोठी उणीव आहे. भौतिक व अभौतिक स्त्रोतांच्या अभावामुळे ह्या सामाजिक चळवळी थंडावल्या आहेत. असे प्रकर्षाने वाटते. यासोबतच चळवळीमध्ये चे एक ऊर्जा केंद्र लागते, Power house think/tank हा असा नाही आहे, आणि म्हणून जरी think tank काही चळवळींमध्ये त्यास बाजूला सारून बाकीच्या लोकांचे राजकारण पुढे येतं. आणि म्हणून Think tank किंवा Ideological force जो आहे, त्याची फारशी दखल लोक घेत नाहीत. त्याबरोबर चळवळीकडे Social and cultural capital/भांडवल राहिलेलं नाही आहे. Lack of co-ordination आहे. तशा पद्धतीचे उद्दिष्ट किंवा Vision पण आढळत नाही. दीर्घकालीन किंवा नजीकच्या अशा पद्धतीचे विशिष्ट, उद्दिष्टे, विशिष्ट दृष्टी सामाजिक चळवळी समोर असावे लागतात. पण ते सारखे बदलतात, आणि आपल्याला कुणाबरोबर संघर्ष करायचा, तुमचा शत्रू पक्ष कोण आहे? याच्याविषयी फारसं गांभीर्य, स्पष्टता महाराष्ट्रातील सर्व चळवळीमध्ये नाही. असे मला नोंदवायचे आहे, असे डॉ. सकटे म्हणाले.

चळवळी म्हणजे चढ आणि उतार (Up down) असतो, तर सर्व चळवळी या सारख्या सारख्या धावतील असे म्हणता येणार नाही. चळवळीतील चढ-उतारास अनेक कारणे देखील कारणीभूत आहेत. व्यवस्था त्याचे कारण आहे. सामाजिक संरचना त्याचे कारण आहे. चळवळी शाश्वत करण्याच्या दृष्टिकोनातून तुम्हाला Issues लागतात, ते निर्माण करावे लागतात. नवीन नवीन अशा पद्धतीचे प्रश्न, किंवा उद्दिष्टे सहभागींना समोर ठेवून सामाजिक चळवळी कराव्या लागतात, आणि ही खरी नेतृत्वाची, (Leadership) ची फार मोठी परीक्षा असते. यासोबतच Ideology असणं अत्यंत आवश्यक आहे. परंतु नवनवीन issues समोर आल्यानंतर, नेतृत्वाची फार मोठी आव्हानात्मक स्थिती निर्माण होते. अशा आव्हानात्मक स्थितीत चळवळ शाश्वत करणं फार जिकिरीचं काम असतं. चळवळीची बीजे सामाजिक चौकटी मध्येच आहेत असे आपल्याला दिसते, मग प्रश्न तर आहेत. जात, अस्पृश्यता, श्रेष्ठ-कनिष्ठता, पदसोपान परंपरा, शोषण-अन्याय, लिंगभेद, repulsion, मानवी हक्काचे उल्लंघन इत्यादी. सोबतच rooth state, दमनकारी शासन आहे. चळवळीचे वा चळवळीसमोर आजही हे प्रश्न आहेत. तरीसुद्धा दलित व इतर चळवळी संथ का झाल्या? हा खरा प्रश्न वा कार्यसूची (Jenda) संशोधनासाठी आपल्यासमोर आहे. हे प्रश्न तर आहेतच, पण चळवळी नाही असं का होऊ शकते. तर सामाजिक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून

सर्वसामान्यांच्या हातामध्ये एक शस्त्र असतं, हत्यार असतं ते म्हणजे सामाजिक चळवळ होय. प्रश्न सोडवण्यासाठी सामाजिक चळवळी आपण करतो, वाटाघाटी करण्यासाठी आपण शासनासोबत negotiation करतांना आपणास चळवळींचा आधार लागतो, आणि म्हणून समाजव्यवस्थेमध्ये आपल्याला सामाजिक बदल घडवून आणायचा असेल, तर सामाजिक चळवळीचा रेटा कायम असावा लागतो, तो मात्र नाही आणि ही फार दर्दैवाची अशी गोष्ट आहे असं लक्षात येते. बरेच लोक असे म्हणतात, की चळवळीच नाहीत किंवा चळवळी कुठे आहेत? नामांतरानंतर चळवळी झाल्याच नाहीत... वगैरे वगैरे. परंतु National alliances of people movement च्या एका आलेल्या अहवालानुसार भारत देशामध्ये २०० चळवळी आज या ना त्या कारणाने सुरू आहेत. छोटासा मुद्दा (issue) असेल, स्थानिक वा शहरी भागातला प्रश्न असेल, आदिवासींचे, मजुरांचे, कामगारांचे प्रश्न असतील, अशा पद्धतीच्या विषयांना धरून चळवळी स्थानिक पातळीला जास्त मोठ्या प्रमाणात सुरू आहेत आणि म्हणून सामाजिक चळवळी नाहीत किंवा नाहीशा झाल्या, असे आपल्याला म्हणता येत नाही. चळवळीमध्ये चढ-उतार आहेतच यात काही शंका नाही. आत्तापर्यंत नेमकं काय झालंय, तर सामाजिक चळवळीचा जो अभ्यास झालाय तो ethnographic पद्धतीने अभ्यास झाला आहे. Secondary resource वर आधारित अशा पद्धतीचा अभ्यास या ठिकाणी झालेला आहे. जुनी कागदपत्रे (old documents), न्यूज पेपर रिपोर्टरस, मुलाखती, तथ्य संकलन वरीर collection, participation, observation,ongoing movement असा अभ्यास आपल्याकडे होत नाही. तर आपण चळवळी संपल्यानंतर अभ्यास करतो. ऐतिहासिक अंगाने एखाद्या न्यूज पेपरचे रिपोर्टर्स, मुलाखती, जुन्या दस्तऐवजाच्या आधारे आपण निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न समाजशास्त्रज्ञांनी केलेला आहे. आणि म्हणून सुरू असणाऱ्या चळवळीचा अभ्यास केला पाहीजे, सहभागी निरीक्षण तंत्र म्हणून आपण चळवळीचा अभ्यास केला पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने आपल्याला चळवळ कुणाची आहे, चळवळीत कोण सहभागी आहे, चळवळीची नेमकी अवस्था काय? याबाबत समजण्यासाठी स्पष्ट होण्यासाठी आवश्यक आहेत. त्याचबरोबर जर आपल्याला बदल किंवा परिवर्तन घडवून आणायचे असेल, तर कोणत्या पद्धतीचा बदल घडवून आणायचा आहे? समाज व्यवस्था, संरचना बदलायची आहे. म्हणजे social structural transmission आपल्याला करायचं का? कि आपणास थातुरमातुर सुधारणा करायच्या का? किंवा त्याला polished change असं म्हणतात. आपणास छोटे मोठे सामाजिक बदल पाहिजेत का? याची प्राथमिकता आपल्याला स्पष्ट असणं अत्यंत आवश्यक आहे.

Structural transformation किंवा Polished change याचं चित्र याची blue-print सामाजिक चळवळीच्या नेत्या समोर असणे आवश्यक आहे. आपल्याकडे Issues किंवा प्रश्न तर भरपूर आहेत. परंतु प्रामुख्याने प्राथमिकतेने आपण कोणता मुद्दा किंवा प्रश्न किंवा issue निवडणार? आणि विषय निवडल्यानंतर त्या विषयाला अनुषंगून त्याच्या सोडवणुकीच्या दृष्टिकोनातून आपण काय कृती कराल, हे नेतृत्वाला माहिती असणं अत्यंत आवश्यक आहे. leadership Mm नेतृत्वाचा मुद्दा आहे. डॉ. सोळुंके यांनी दिलेल्या स्व. शरद जोशींचे महत्त्वाच्या उदाहरणाचा संदर्भ घेऊन ते म्हणतात, कि शेतकरी नेते शरद जोशी गेल्यानंतर, एवढ्या शक्तिशाली आणि प्रबळ चळवळीचं काय झालं, हे पाहणे गरजेचे आहे. आज त्या चळवळीची फार वाईट अवस्था आहे. आज शेतकरी चळवळीची सुद्धा त्यामुळे चळवळी मध्ये नेतृत्व (Leadership) उभं करणं महत्त्वाचं आहे. चळवळीमध्ये बहुश्रुत नेतृत्व (multiple Lear's of leadership) उभं करणं फार महत्त्वाचं आहे/गरजेचे आहे. कारण तो नेता गेला, की ती चळवळ गलितगात्र होते किंवा थंड होते/ मंदावते. म्हणून एक खांबी तंबू किंवा एक व्यक्तीकेंद्रीत नेतृत्व चळवळ असता कामा नये. असे मत डॉ. जोगदंड यांनी मांडले.

Connectivity फार महत्त्वाची आहे. Issues agenda, primordial connectivity gender crises अशा प्रकारची, अशा स्वरूपाची Collectivity काही शास्त्रज्ञांनी म्हटलेली आहे. आणि म्हणून collective action करण्याच्या दृष्टिकोनातून connectivity फार महत्त्वाची आहे. दलित चळवळ असेल, बामसेफ ची चळवळ असेल, किंवा शेतकरी संघटनेची चळवळ असेल, या चळवळी थांबून राजकीय पक्षांमध्ये त्यांचा समावेश किंवा बदलाव झालेला आहे. म्हणून सुधाताई असे म्हणतात की, 'ह्याच चळवळी प्रकल्प आहेत. त्या चळवळी होत्या. दलित चळवळ होती. नंतर राजकीय पक्षांमध्ये बदल झाला. बामसेफ आणि बाकेसर चळवळ होती, नंतर बसपामध्ये रुपांतरण/बदल झाला'.

महाराष्ट्रामध्ये शेतकरी चळवळ होती, नंतर स्वतंत्र भारत पक्ष तयार झाला.म्हणजे ह्या चळवळी न राहता राजकीय पक्षांमध्ये यांचा बदल वा रूपांतरण झाले. चळवळीचे रूपांतरण पक्षात झाले, ज्यामुळे चळवळ संपते आणि राजकीय पक्ष निर्माण होऊन, तुम्हाला राजकीय पक्षाच्या अखत्यारीतून सर्व गोष्टी कराव्या लागतात आणि म्हणून सामाजिक क्षेत्रामध्ये असे दिसले, की इलेक्ट्रॉल पॉलिटिक्स हे मध्यवर्ती टप्यावर /सेंटर स्टेजला आलेलं आहे.

सामाजिक प्रश्न असतील किंवा सांस्कृतिक मुद्दे असतील ह्या बाबी सर्व issue आहेत. या issue ला दुय्यम महत्त्व प्राप्त झाले आहे, आणि त्या चळवळी बाजूला सारल्या गेल्या. व electrol politics यालाच प्राथमिकता प्रधान आली, अथवा देण्यात आली. आणि म्हणून चळवळीचे रूपांतरण राजकीय पक्षात झाले. म्हणून चळवळ थांबली आणि पक्षाच्या अनुषंगाने मग हीच आमची चळवळ आहे हे दाखवण्याचा फार मोठा प्रयत्न सामाजिक कार्यकर्तेकरीतहोते वा आहेत. सोबतच चळवळीचे

स्वयंसेवी संस्थीकरण (NGO) झाले, त्यामुळे स्वयंसेवी संस्था यांनी काही चळवळी आपल्या कवेत घेतल्या. चळवळींचे institutionalization of social movement झालं. म्हणून दबावगट (pressure group) यामध्ये बदल/रुपांतरण झाले. ती एक सामाजिक चळवळ न राहता, एक दबाव गट वा दबावगटांची निर्मिती तिथे झाली. तर राज्यशासन काही चळवळींना आपल्या कवेत घेते. त्यास crop करते, किंवा चळवळींना demolish करते. म्हणून डॉ. सकटेनी म्हटले कि, आमचे काही कार्यकर्ते जेलमध्ये आहेत. असेही अनुचित प्रकार घडत जातात. State is very powerful. तुमच्या चळवळीला कुठपर्यंत प्रायोजित (sponsor) करायचं, आणि कुठपर्यंत मदत करायची, हे ठरलेलं असतं आणि कुठल्याही राज्य असू द्या. ते very ruthless दमनकारी अशा पद्धतीचं असतं. तुमच्या चळवळी त्यांच्या अंगलट येत असतील, तर त्या चळवळी मग demorish करण्याचं काम हे शासन करतं. असे अनेक चळवळीचे झालेले आहे. मग एकीकडे एका ठराविक प्रमाणात चळवळीला बळ द्यायचं, पाठिंबा द्यायचा आणि मग कसं वशोळीह करायचं असं एक पद्धतीशास्त्र (methodology) ही शासन वा राज्याकडे असते. म्हणून तर चळवळीतले कार्यकर्तेजेलमध्ये टाकलेले आहेत असे दिसते. पुन पुन्हा तांत्रिक मुद्दा हा आहे, की 'काही लोक picketing असेल, strike असेल, मोर्चा असेल, सत्याग्रह वा घेराव असेल, या उपक्रमाला लोक चळवळी म्हणतात, खरं तर ह्या चळवळी होऊ शकत नाही. हा एक उपक्रम अथवा घटना असते. आणि म्हणून याला चळवळ आहे असे म्हणता येणार नाही, म्हणून खऱ्या अर्थाने, शास्त्रीय पद्धतीने किंवा सैद्धांतिक पातळीवर जर बघितलं तर तो एक Event आहे व उपक्रम आहे किंवा घटना आहेत, म्हणूनच त्याला आपण सामाजिक चळवळी म्हणू शकत नाही. किंवा म्हणणार नाही.

सामाजिक चळवळींमध्ये सहभागी किंवा participants यांची भूमिका फार महत्त्वाची असते. सहभागी शिवाय कुठलीही चळवळ खऱ्या अर्थाने चळवळ होत नाही. आणि ती चळवळ पुढे जाऊ शकत नाही. आणि म्हणून सहभागींचे किंवा participants ४-५ प्रकार आहेत. Core participant एक गाभ्याचे, प्रमुख अशा स्वरूपाचे असतात,काही शब्द प्रभाव असतात. man of action ही अत्यंत महत्त्वाची आहे. खरा कणखर, फ्रंटवर आणणारा माणूस हा, खरा कृती करणारा आहे. आणि खराकृती करणारा सहभागी सामाजिक चळवळीमध्ये अतिशय महत्त्वाचा आहे. आणि त्याचबरोबर काही कार्यकर्ते असतात, ते periafal participant असतात, या प्रकारे फार झालं तर एखाद्या वेळी चळवळीस फंड (fund) वगैरे देणारे, periafal participant, men of actions, therotetions core participants अशा प्रकारची वर्गवारी सामाजिक चळवळीच्या कार्यकर्त्यांची असते. कार्यकर्तेज्या वेळेस एकत्र येतात, त्यावेळेस खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळीला फार मोठं बळ येऊ शकतं. पुढचा जो मुद्दा आहे, तो म्हणजे Time span चा हा कुठल्याही चळवळीचा फार महत्त्वाचा परिमाण (dimension) आहे. एखादी चळवळ छोट्या कालावधीसाठी निर्माण होते, आणि ती लोक पावते, तर एखादी चळवळ एकच प्रश्न वा मुद्दा (single issue) ला घेऊन लढणारी असते. तो साध्य झाला कि ती चळवळ लोप पावते. चळवळ खऱ्या अर्थाने संपते आणि म्हणून सामाजिक चळवळी करिता time span महत्वाचा आहे, एखाद्या चळवळी life cycle काय आहे? हे पाहणे देखील गरजेचे आहे. दलित चळवळी बाबत काही महत्वपूर्ण मुद्दे सांगणे क्रमप्राप्त वाटते. याबाबतचा माझा काहीसा अभ्यास, असून त्या संदर्भातील काही प्रभावी निरीक्षणे देखील असल्यामुळे त्यातील बारकावे मी टिपले आहेत. 'दलित चळवळी वर्तमान स्थितीत काय आहेत? कशा आहेत? काय झालं नेमकं? याचा शोध बोध घेताना असे आढळते की, दलित चळवळ ही थंडावलेली, मंदावलेली आहे, फार मोठी स्थिरता निर्माण झालेली आहे, आणि म्हणून मी चवळीच्या स्थितीबाबत tired exhausted असे शब्द वापरले आहेत. काळानुरूप दलित चळवळीकडे फार मोठा कृतीकार्यक्रम (Agenda) नाही आहे. Alienation of caste हा ऐरणीवर येणारा मुद्दा आहे, पण तो अद्यापही आलेला नाही आहे. आणि म्हणून alienation of caste घेऊन, मला सामाजिक चळवळी होतांना दिसत नाहीत. कित्येकदा रीलळीं होतात, मागील काही दिवसापूर्वी परभणी जवळील गावात हा गुन्हा झाला, पण अन्याय-अत्याचार झाल्याबरोबर लोक रस्त्यावर येतात, एकत्र येतात, हे असे का व्हावे? म्हणजे तुम्हाला/लोकांना एकत्र आणण्याच्या दृष्टीकोनातून Atrocity चा मुद्दा घडायलाच पाहिजे, असा त्याचा अर्थ होतो, मग Atrocity चा गुन्हा झाला की लोक रस्त्यावर का येतात? याच्या पाठीमागे काय कारण आहे? हे या ठिकाणी आपण बघितले पाहिजे. पुढे ते विश्लेषित करतात की, Political of symbolism : भीमा कोरेगावला लाखो लोक जमा होतात, त्याचबरोबर अलीकडे दुम निघाली, की बाबासाहेबांच्या इव्हेंटचे दिवस समोर करून त्याला अभिवादन करायचे. भीमा कोरेगाव च्या संघर्षाला अभिवादन करायचं, डॉ बाबासाहेबांचा शाळा दिवस साजरा करायचा, त्यांचे कोलंबियाला गेले त्याबद्दल अभिवादन करायचं, यावरून मला एक कळत नाही ते म्हणजे 'अभिवादन करण्याशिवाय दुसरा कोणता पर्याय आपल्यासमोर नाही का?' अन्य काही शिल्लक आहे की नाही? आयुष्यभर आणि वर्षभर अभिवादन करावे लागते, इतकच आपण मर्यादित राहायचं का? एकंदरीत मला असं वाटतं की politics of symbolism थोडसं बाजूला ठेवून, एक नवीन subaltern अशा पद्धतीची कार्यसूची (Agenda) घेऊन शिक्षणाचे मुद्दे, economics issues, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेला alienation of caste चा मुद्दा आहे. हे मुद्दे आपण in cash केले पाहिजेत. तरच खऱ्या अर्थाने दलित चळवळीला भविष्य आहे, अन्यथा भविष्य राहणार नाही. असे प्रकर्षाने जाणवते. असेही विचार डॉ. जोगदंड यांनी मांडले. भीमा कोरेगावच्या बाबतीमध्ये बरेचसे कार्यकर्तेछाती ठोकून पुढे येतात ना, मग एकीकडे म्हणायचे की दलित ही संज्ञा, ही term नको, दलित हा शब्द वापरू नका. दलित शब्द वापरायचा की नाही, अशीही धूम निघाली आहे. माझे असे मत आहे, की तुम्ही भीमा कोरेगाव ला महार म्हणूनच जाता ना, दलित

Identity चे काय करायचं? नवबौद्ध identity चे काय करायचं? एक समूह समाजव्यवस्थेत वावरतांना तीन identity घेऊन वावरतो, हे काय चांगलं लक्षण आहे का? काय ते एकदा म्हणा 'नवबौद्ध, दलित किंवा महार' म्हणा. पण आपण काय म्हणायचं हे निश्चित करून पुढे गेले पाहिजे की नाही? अलीकडे यावर एक पुस्तक आलेलं आहे Ornest Beans याचं आणि ते असं म्हणतो की 'एक समूह समाजात वावरतांना तीन identity घेऊन वावरतोय. ही गोष्ट चांगली की वाईट हे आपण उपस्थितांनी गांभीर्याने विचार करून ठरवावे. मी यावर माझी काहीच भूमिका मांडणार नाही, असे खेदाने ते म्हणाले.

अलीकडे आरक्षण आधारित promotion चा देखील मुद्दा समोर आलेला आहे. दलित चळवळीतील मध्यमवर्गीयांवर फार लोक टीकाटिपणी करीत आहेत. परंतु सामाजिक चळवळीला आर्थिक बळ देणारं फार चांगलं क्षेत्र (sector) आहे, असं मला माझ्या एका अभ्यासात दिसून आलं, आणि म्हणून They are playing that society अशा प्रकारचा कार्यक्रम त्यांच्या हातामध्ये दिसतो. महाराष्ट्रातील १०० दलित मध्यमवर्गीयांच्या आम्ही मुलाखती घेतल्या, आणि आम्हाला असे आढळले, की हा वर्ग शांत बसणारा वर्ग नाही. त्यांच्या पद्धतीने ते लोक दलित चळवळीला मदत करतात, म्हणून सब घोडे बारा टक्के असं म्हणणं देखील बरोबर नाही आणि म्हणून दलित मध्यमवर्गीय Activism ची भूमिका सुद्धा फार महत्त्वाची आहे. असे मला वाटते. Literally movement फार महत्त्वाची आहे. हे राजकीय पार्टी महत्त्वाची आहे. different forms of mobilization चळवळीमध्ये स्त्रियांचे, सामाजिक कार्यकर्त्यांचे Mobilization गतिशीलन झाले पाहिजे. Male of action त्यांचे देखील गतिशीलन (Mobilization) झालं पाहिजे. जे सहभागी आहेत Theoretician, co-participant यांचे देखील वेगवेगळ्या पद्धतीने गतिशीलन (Mobilization) झालं पाहिजे, त्यांची शक्ती सामाजिक चळवळी बलवान करण्याच्या दृष्टिकोनातून आपल्याला पुढे येऊ शकते.

बाबासाहेबांना सुद्धा दलितांनी एका Narrative mode मध्ये उभं केलेलं आहे. डॉ. बाबासाहेबांचे कथन सांगायचे, ते असं होतं, ते तसं होतं या Narration मधून आपण बाहेर आलं पाहिजे. आणि बाबासाहेबांनी समकालीन सामाजिक प्रश्नांच्या दृष्टिकोनातून त्यांचे विचार किती महत्त्वाचे होते, यावर भर द्यावा. म्हणून We have translate ideas, agenda, into practice. असं केल्याशिवाय चालणार नाही. आपणास Symbolique issues घेऊन चालणार नाही. व्यापक चळवळ निर्माण करायची असेल, तर सर्व दलितांना, वंचितांना, व लोकांना आपल्या बरोबर घ्यावं लागेल. तरच खऱ्या अर्थाने ही चळवळ पुढे जाऊ शकते. नुसत्या प्रतीकात्मक Symbolic गोष्टी समोर करून, भावनिक होऊन ही चळवळ पुढे जाणार नाही. खरे तर ही चळवळ फार मोठ्या पेचा/संकटामध्ये अडकली आहे, फार मोठ्या Crisis मध्ये अडकली आहे. त्यास आपण Crisis of leadership असं म्हणतो, मित्रहो, नेतृत्व करणारा फार महत्त्वाचा आहे/असतो, दलित चळवळीमध्ये नेतृत्व करणारे लोक फार हुशार आहेत. त्यांची ५२ गट, RIP गट अधिकृत Recognized आहेत. त्याचं बरं चाललय, मला अधिक चीड येते, ती म्हणजे सहभागींची/Participant. कारण Participant किंवा सहभागी असल्याशिवाय ५२ गट उभे राहू शकतात का? काही लोक त्यांना सहकार्य करतात, पाठिंबा देतात म्हणून तर की, The crisis in participant in Dalitmovement Maharashtra.

जे सहभागी आहेत, कधी या गटात, कधी त्या गटात उड्या मारतात. त्या त्या गटातल्या लोकांनी विचारलं पाहिजे, की तुम्ही तिकडे होतात, इकडे कसे? काय झालं नेमकं, तुम्ही इकडे आलात? म्हणून There is a crisis,not only leadership, way into the participants. सहभागी लोकांचा, कार्यकर्त्यांचा फार मोठा पेच निर्माण झालेला आहे. दलित चळवळीत हे सर्व प्रश्न असल्यामुळे त्याबाबत काही विधानं निर्माण (Assertion) झाले आहेत.एकंदरीत विचार करता 'जरी ही चळवळ थंड/मंद झाली, तरी यामध्ये फार मोठे Potential आहे. हा डॉ.बाबासाहेबांनी सांगितलेला विचार किंवा विचारसरणी आहे. त्यांनी दिलेली शिकवण, रसशपवर Schedule castefederation ची घटना आणि त्याच्यामध्ये बरेसे issues आहेत, ते issues घेऊन ताकतीने चळवळी पुढे आणल्या, तर खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये सामाजिक चळवळी ताकदीने पुढे येऊन, जे काही सदस्य आहेत ते सामाजिक संरचना, व्यवस्था नष्ट करण्याचा, परिवर्तन आणण्याचा प्रयत्न करतील, आणि alienation of caste, equality चे मुद्दे घेऊन आपल्याला अनेक चळवळीचे alliances केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही, असे मला प्रकर्षाने वाटते. असे बोलून डॉ. जोगदंड यांनी आपले विवेचन पूर्ण केले. चळवळी जरी थंडावल्या, मंद झाल्या असल्या तरी त्या संपलेल्या नाहीत आणि त्या तेवढ्याच ताकदीने समाज परिवर्तनात राहतील असा विश्वास आहे, या आशावादाने निश्चितच आजचे परिसंवादातील विवेचन व्यक्तींच्या विचार व कृतीला प्रवृत्त करणारे ठरेल हे सांगून परिसंवादाचा आशावादी समारोप करण्यात आला.परिसंवादाच्या सुरुवातीलाच समाजशास्त्राचे डॉ. एल. डी. गायकवाड रेनापूर, डॉ. काशिनाथ कावळे, नांदेड, डॉ. विजयकुमार पोकळे, आष्टी कडा, डॉ. उमराव कावळे, वसमत, डॉ. विजयकुमार सूर्यवंशी, परभणी. यांचे निधन झाल्यामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या परिसंवादाचे सूत्र संचलन प्रा. डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. प्रदीप गजभिये यांनी मानले.

प्रस्तुत परिसंवाद You Tube Channel वर उपलब्ध आहे. https://youtu.be/k2JVYQO2fOs

■■■

अहवाल लेखन : प्रा. डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे (नवलाखे)
सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ. संपर्क : ९४०४३७३२८२

इरावती कर्वे स्मृति व्याख्यानमाला
दिनांक १८ जुलै २०२१
वेळ – सकाळी ११ वाजता

विषय : परिघ आणि ज्ञाननिर्मिती प्रक्रियेचे दृष्टीकोण

व्याख्याते
डॉ. रमेश कांबळे

प्राध्यापक (निवृत्त), माजी विभाग प्रमुख,
समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.

केंद्र आणि परीघ यांचा जवळचा संबंध असतो. परिघाचा स्वतंत्र असा विचार करता येत नाही कारण परिघ केंद्राने निर्माण केलेली असते. म्हणून न्यायीक समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी परिघाचा विचार केंद्राची चिकित्सा करूनच करावा लागेल असे प्रतिपादन सिमांन्तक गटाचे अभ्यासक तथा माजी विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठातील डॉ. रमेश कांबळे यांनी केले. मराठी समाजशास्त्र परिषदेच्यावतीने आयोजित दृकश्राव्य माध्यम प्रणालीद्वारे इरावती कर्वेस्मृती व्याख्यानमालेत ते परिघ आणि ज्ञाननिर्मिती प्रक्रियेचे दृष्टीकोण या विषयावर बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नारायण कांबळे यांनी करून दिला. प्रास्ताविकात डॉ. नारायण कांबळे यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आगामी वाटचालीबद्दल चर्चा केली. ज्यात त्यांनी अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या धरतीवर मराठी समाजशास्त्र परिषदेमध्ये संशोधन समिती (RC) निर्माण करण्याचा प्रयत्न होणार आहे. तसेच परिषदेच्या माध्यमातून आत्तापर्यंत प्रकाशित झालेल्या सर्व संशोधन पत्रिका मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने देण्यात येणारे विविध पुरस्कारासंबंधी सुद्धा येत्या काळामध्ये नियोजन होईल असे सांगितले.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वार्षिक

अधिवेशनात इरावती कर्वेयांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला घेतली जाते. परंतु मागच्या वर्षी लॉकडाऊन मुळे ही व्याख्यानमाला होऊ शकली नाही. म्हणून ती आता ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आलेली आहे. डॉ. इरावती कर्वेह्या मानववंशशास्त्र व समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक होत्या. भारतीय समाजशास्त्राच्या विकासामध्ये सुद्धा त्यांचे मोलाचे योगदान राहिलेले आहे. म्हणून त्यांच्या योगदानाविषयीची माहिती सर्व अभ्यासकांपर्यंत पोहचावी म्हणून डॉ. इरावती कर्वेस्मृती व्याख्यानमाला घेत आहोत अशी भूमिका डॉ. कांबळे यांनी मांडली.

डॉ. रमेश कांबळे यांनी असे मत मांडले की, इरावती कर्वेया मानववंशशास्त्र तसेच समाजशास्त्राच्या अभ्यासिका आहेत. परंतु त्या दुर्लक्षित राहिल्या त्यांच्यासोबत दोन प्रमुख समाजशास्त्रज्ञ डॉ. श्रीधर केतकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघेही ट्रेन्ड सोशॉलॉजीस्ट असून देखील त्यांचा एक समाजशास्त्रज्ञ म्हणून उल्लेख आढळत नाही.

डॉ. गोविंद घुर्ये हे भारतीय समाजशास्त्रज्ञ म्हणून त्या काळात सगळीकडेच प्रचलित झाले. सॉक्रेटिस यांचे अतिशय प्रसिद्ध वाक्य आहे An unexamined life is not living म्हणजेच ज्या जीवनाची चिकित्सा करता येत नाही ते मानवी जीवन म्हणून जगण्याच्या लायकीचे नसते. सॉक्रेटिस नंतर अनेक विचारवंतांनी Unexamined life जगण्याला नकार दिला. त्यात अण्णाभाऊ साठे यांचाही उल्लेख करावा लागेल. ज्यावेळेस आपण आपल्या जीवनाचे किंवा जगण्याची चिकित्सा करतो त्यावेळेस ते अधिक वेदनादायी असतं. म्हणूनच आजचा व्याख्यानाचा विषय हा तितकाच महत्त्वाचा आहे.

पुढे ते म्हणाले, केंद्र आणि परीघ या संकल्पनेची जाणीव आपणास समाजशास्त्राचे विद्यार्थी म्हणून विकासाचे समाजशास्त्र शिकत असताना झालेली होती. १९६० ते ७० च्या दशकात लॅटिन अमेरिकेत आधुनिकीकरणाच्या संदर्भात अभ्यास झाला. ज्यात अमेरिकन समाजशास्त्रज्ञ समीन अमीन आणि ईम्यालूयन पॅलेस्टाईन यांनी केंद्र आणि परिघ ही संकल्पना मांडली. परीघ हि संकल्पना स्वतंत्र अभ्यासता येत नाही. ही संकल्पना समजून घेत असताना केंद्राचा विचार करावा लागतो. परीघ हे केंद्राने निर्माण केलेले असते.

समाजातील स्त्रियांचे प्रश्न किंवा अस्पृश्यांचे प्रश्न हे अस्पृश्य व्यक्ती संबंधित नसून अस्पृश्यतेशी संबंधी आहे. स्त्रियांचे प्रश्न सुद्धा स्त्रियांचे नसून पुरुष प्रधान व्यवस्थेशी निगडित आहेत. अस्पृश्यता आणि पुरुषप्रधानता ही एका व्यवस्थेने निर्माण केलेली संकल्पना आहे.परीघ हे केंद्राने निर्माण केलेले असल्यामुळे परिघाच्या बाबतीत जे काही विकासात्मक घडत ते केंद्राची गरज म्हणून त्यांच्यासाठी आणलेलं असतं आणि त्याचा परिणाम हा परिघावर होत असतो. Development paradigms creates underdevelopment itself. अविकासकांचा विकास साधण्यासाठी आपल्याकडे विकासात्मक योजनांचा विचार केला जातो. समाजशास्त्रामध्ये आलेल्या विकासात्मक समाजशास्त्र या उपशाखेमध्ये या सर्व बाबींचा अभ्यास केला जातो. समाजशास्त्राला एक शास्त्र म्हणून दर्जा आहे. समाजशास्त्रीय अध्ययन हे वस्तुनिष्ठ अशा पद्धतीशास्त्रावर आधारलेलं असतं.

म्हणून ज्ञाननिर्मितीच्या बाबतीत वस्तुनिष्ठतेला महत्त्व दिलं गेलेल आहे. समाजशास्त्रामध्ये मांडला गेलेला संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोण हा समाज व्यवस्थेला महत्त्व देणारा दृष्टिकोण आहे. तर ज्ञान निर्मितीच्या बाबतीत ज्ञान हे अधिक वस्तुनिष्ठ असले पाहिजे अस मानल जात. समाजशास्त्रामध्ये ज्ञाननिर्मितीची सुरुवात सी. राईट मिल्स यांच्यापासून झाली. दि सोशिओलॉजिकल इमॅजिनेशन हा त्यांनी लिहिलेला ग्रंथ.

ज्ञान निर्मिती ही भारतीय समाज अधिक चांगल्या मूल्यांवर आधारलेला बनविण्यासाठी आवश्यक आहे. केंद्र आणि परीघ हे दोन्ही एकमेकांशी निगडित आहेत म्हणून सीमेवर असलेल्या व्यक्तींचा अभ्यास देखील होणे गरजेचे आहे. केंद्रावरील लोकांचा परिघावर असलेल्या लोकांशी जस जसा संपर्क यायला लागला तस तसे केंद्रातील लोकांनी निर्माण केलेले ज्ञान प्रमाण मानले जाऊ लागले. आपले सामाजिक जीवन, आपले एकमेकांशी असलेले संबंध आणि केंद्रातील लोकांचे एकमेकांशी असलेले संबंध यात कमालीची तफावत होती.

केंद्राने निर्माण केलेले ज्ञान आपल्या सर्वांनी अंगीकारले पाहिजे आत्मसात केले पाहिजे. असे प्रशिक्षण आपल्या सर्वांना मिळालेले होते. १९७० च्या नंतर ज्ञान व्यवहाराच्या संदर्भात चिकित्सा करण्यात आली. ज्यात आपण आपल्या जीवनातील अनुभवाच्या आधारे समाजशास्त्रामध्ये ज्ञानाची निर्मिती करता येऊ शकते. ही जाणीव केव्हा निर्माण झाली जेव्हा आपण या ज्ञान व्यवस्थेचा भाग व्हायला लागलो. असे होणे हे काही सोपे नव्हते. Being omitted and being silent and deleted. आपण निशब्द होतो शांत होतो आणि आपण वगळले गेलेलो होतो.

यासंदर्भातले एक उदाहरण म्हणून मला आवडलेला The great debaters हा सिनेमा याचे उदाहरण मी देईल. या सिनेमात अमेरिकेतील कृष्णवर्णीय शिक्षकांनी आपल्या चार ते पाच विद्यार्थ्यांची एक टीम

तयार केलेली होती. जे विद्यार्थी अतिशय बुद्धिमान होते आणि त्या बुद्धिमत्तेच्या जोरावर ते वशलरींशी झाले होते आणि या टीमने अमेरिकेतील बुद्धिजीवी वर्गातील व्यक्तींना आपल्या वादविवादाने हरवले होते. ज्या वेळेस या टीमचा सत्कार झाला आणि त्या सत्कार प्रसंगी शिक्षकाला बोलण्यास सांगितले व आपला परिचय करून देण्यास सांगितले. त्यावेळी शिक्षकाने स्वतःची ओळख करून देताना म्हटले We are people without records म्हणजे आम्ही अशा व्यक्ती आहोत की, ज्यांची दखल घेण्याची गरज कुणालाच वाटली नाही.

या संदर्भातले आणखीन एक सुंदर उदाहरण म्हणजे प्रसिद्ध लेखक नामदेव ढसाळ यांच्या गोलपिठा या कादंबरीला प्रस्तावना लिहिण्यासाठी त्यांनी विजय तेंडुलकरांना सांगितले होते. विजय तेंडुलकर यांनी जी प्रस्तावना लिहिली ती आवर्जून वाचण्यासारखी आहे. नामदेव ढसाळ यांनी लिहिलेली कादंबरी मुंबईतील शोषित आणि बहिष्कृत अशा समाजावर आधारलेली होती. या समाजाविषयी तेंडुलकरांना काहीच माहिती नव्हते. त्यामुळे ढसाळ यांनी त्यांना तो मुंबईतला सगळा भाग फिरून दाखवला. म्हणून तेंडुलकर यांनी आपल्या प्रस्तावनेत असे नमूद केले आहे की, मला आत्तापर्यंत आपल्यापेक्षाही दुसरे काही वेगळे जग असते, असे माहित नव्हते. एवढेच नाही तर मी या जगाचे अस्तित्व देखील नाकारले होते. असे त्यांनी प्रांजळपणे नमूद केले आहे.

ज्ञानव्यवस्थेतील प्रस्थापित व्यक्तींनी समाजातील शोषित व बहिष्कृत वर्गाचे जगनेच खोडून टाकले वा डिलीट करून टाकले होते. त्यांची दखल घेण्याची गरज नाही असे त्यांनी नमूद केले होते. ह्या जगण्याच्या उपरोक्त ज्ञान निर्मिती करता येऊ शकते असे सगळीकडे प्रचलित होते.या संदर्भातला एक अनुभव नमूद करावासा वाटतो शाळा ही प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे ठिकाण आहे.

शाळेशी प्रत्येक मुलाची नाळ जोडलेली असते. परंतु माझ्या बाबतीत शाळेबद्दलचा अनुभव वेगळा आहे. मी ज्या शाळेत शिकलो तिथल्या शिक्षकांनी माझी कधीच दखल घेतली नाही. जणू काही मी त्या शाळेचा घटकच नव्हतो. दक्षिण भारतातले जी. कल्याणराव यांनी एक सुंदर पुस्तक लिहिलेले होते अंतरामी वसंतम् The untouchable spring कांबळे सरांनी त्यांना एका कार्यक्रमानिमित्त व्याख्यानासाठी बोलाविले असता, त्या व्याख्यानामध्ये त्यांनी आपलं मत नमूद केले ते म्हणाले, When I read history book, there is no page of my history आतापर्यंत इतिहासाच्या पुस्तकांमध्ये मी स्वतःचा इतिहास शोधला परंतु मला तो सापडला नाही. मी वारंवार परत परत माझा इतिहास तपासला त्यावेळेस मला असे जाणवले की, जिथे माझा इतिहास लिहिला होता तीच पाने पुस्तकातून फाडून टाकलेली होती. म्हणून मला परत ज्ञान व्यवहाराकडे पाहण्याची गरज वाटली. जर आमचे अस्तित्वच खोडलं किंवा मिटवला जात असेल. तर परिघाच्या संदर्भातील ज्ञान व्यवहाराचा विचार पुढे येतो. एम एन श्रीनिवास यांनी मधल्या काळात असे मांडले होते की, I was looking at village, my place in village and my locality in village. भारतीय गावांच्या स्वरूपाची जी सत्यता आहे ती सार्वत्रिक अशा स्वरूपाची मानली गेलेली आहे. रॉबर्ट बिलीयेंज यांनी आपल्या The untouchable या पुस्तकात दोन गावांचे वेगळेपण स्पष्ट केले आहे.

ते असं नमूद करतात की यापेक्षा वेगळे जग होते याची जाणीव त्यांना नव्हती. समाजशास्त्रातील आणखी एक महत्त्वाचे विचारवंत आंद्रे बेते यांनी भारतीय समाजशास्त्राला जागतिक परिप्रेक्षात एक अधिष्ठान प्राप्त करून दिले होते. Doing sociology as comparative sociology या अनुषंगाने यांनी आपली मांडणी केलेली आहे. ते म्हणतात Common sense is necessary but not enough condition for doing sociology अनुभवाचे आकलन करण्याच्या आधारे ज्ञान निर्मिती होते. पण सामान्य माणसाचे ज्ञान व अनुभव याचे आकलन करण्याची क्षमता यातूनच ज्ञान निर्मितीची प्रक्रिया होत असते.

आंद्रे बेते यांनी दिलेल्या व्याख्याना संबंधी माझा एक प्रश्न होता की, कोणत्या समाजाच्या अनुभवाला ज्ञान निर्मितीमध्ये महत्त्वाचे मानले . कारण एका समाजव्यवस्थेत स्त्री म्हणून एका व्यक्तीचा आणि शोषित म्हणून एका व्यक्तीचा अनुभव हा इतरांपेक्षा वेगळा असू . मग कोणत्या अनुभवाला आपण प्रमाण म्हणायचे? या प्रश्नाचे उत्तर आंद्रे बेते यांच्याकडेही नव्हते. म्हणून सर्व घटकांच्या अनुभवाच्या आधारेच ज्ञान निर्मिती करता येते.

डॉ. रमेश कांबळे हे ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेबद्दल परखडपणे म्हणतात, जेव्हा केंद्रस्थानी असलेल्या व्यवस्थेतील अनुभवाला सार्वत्रिक स्वरूप दिले जाऊन त्याच्या आधारे ज्ञान निर्मिती केली जात असेल तर त्याची चिकित्सा करण्याची वेळ येते. मग आपण जे समाजशास्त्र शिकवितो त्यात माझे स्थान काय? माझा अभ्यास कुठे आहे याचा विचार करावा लागतो. Margins have been created by centres परिघामध्ये सामाजिक स्थान मधून बोलणे होय. आणि हे सामाजिक स्थान अभ्यासत असताना दलित प्रश्न, महिला प्रश्न आदिवासी प्रश्न याचा विचार होणे गरजेचे आहे. दलित प्रश्न हा समाजव्यवस्थेने घालून

दिलेल्या उतरंडीशी, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक भेदासी निगडित आहे. परंतु दलित प्रश्न हे वेगळ्या पद्धतीने अभ्यासले गेले. दलित अभ्यास दलित सुधार योजना या माध्यमातून हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले गेले.

परिघ का निर्माण झाले? याची चिकित्सा करणे गरजेचे आहे. मी जेव्हा स्वतःच्या जगण्याविषयी बोलत असतो तेव्हा मी माझ्या सोबत असलेल्या इतर व्यक्तींच्या जगण्याबद्दल ही बोलत असतो. एवढेच नाही तर ज्या व्यवस्थेत मी जगत असतो त्या व्यवस्थेविषयी ही बोलत असतो. When I write my life then I write someone else life. My life is mirror to your life माझं जीवन एक आरसा आहे ज्यात तुमचं जीवनही पाहता येते. ज्या व्यवस्थेने नाकारलेले व शोषित जीवन दिलेली आहे त्या व्यवस्थेसमोर हा आरसा धरलेला आहे. तुमचे अस्तित्व आहे हे असे आहे. याचा दुसरा अर्थ आहे To speak from margin is to make margin critical

आत्मकथनांमध्ये मांडलेल्या दुःखा बद्दल माझे असे मत आहे की, केंद्र प्रस्थापित व्यवस्था तुमच्या जीवन जगण्याच्या दुःखाबद्दल सहानुभूती दर्शविते. तुम्ही दुःखाबद्दल लिहा असे देखील म्हणते परंतु हे दुःख व्यवस्थेने निर्माण केलेले आहे हे मात्र ते अमान्य करते. तुमचे दुःख संपवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार नाही, तुमचे दुःख तुम्ही स्वतः स्वतःच्या खांद्यावर घेऊन पुढे चालत राहा अशी मानसिकता आहे. आज आपण ज्ञाननिर्मितीच्या क्षेत्रात अभ्यासाचा वा चिकित्सेचा विषय झालो आहोत.

प्रसिद्ध विचारवंत स्मिथ यांनी संकल्पना व सिद्धांताच्या आधारे होणारे सत्तेचे निर्धारण याविषयी आपले मत मांडले. ज्ञान व्यवस्थेच्या आधारेच सत्ता निर्धारित होत असते असे ते म्हणतात. तसेच सत्ता व्यवस्थेने निर्धारित केलेल्या संकल्पना व मापदंडाच्या आधारित आपण आपल्या जीवनाची वा अनुभवाची चिकित्सा केली पाहिजे. ही सत्तेची एक वेगळी लेअर आहे. व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या प्रभुत्वधारी व्यवस्था आपण मान्य केल्या पाहिजेत. यासंदर्भात एक फेमिनिस्ट ॲप्रोच आपल्याला पाहायला मिळतो. अर्थशास्त्रज्ञ असे म्हणतात की, ज्या कामाला मोबदला आहे त्यालाच काम म्हणायचे स्त्रियांनी दिवसभर केलेली घरातील कामे आहेत, की ज्याला कुठल्याही प्रकारचा मोबदला मिळत नाही. त्याची गणना आपण काम म्हणून करत नाही. Work is related to wages ही साधी चिकित्सा आहे.

एक स्त्री दिवसभर जे काम करते त्याची चिकित्सा केंद्र निर्धारित केलेल्या संकल्पनांच्या आधारे केले तर ते योग्य ठरेल. अन्यथा तो अनुभव ज्ञान व्यवहाराच्या आधारे चिकित्सा करणे गरजेचे आहे. पहिली चिकित्सक पायरी ही आहे की परिघा बद्दल विचार करणे गरजेचे आहे. केंद्रस्थानी जी ज्ञान निर्मिती झालेली आहे तिचे आकलन करणे आणि परिघातील व्यक्तींच्या अनुभवाशी ते ज्ञान मिळतेजुळते आहे का याचेदेखील आकलन करणे गरजेचे आहे.

तुमचे जगणे व अनुभव legitimate basis वर ज्ञाननिर्मिती प्रक्रियेचा भाग बनणे गरजेचे आहे. मधल्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, महात्मा फुले संशोधन केंद्र, स्त्री अभ्यास केंद्र व दलित अभ्यास केंद्र सुरू झालेत. याचा अर्थ असा होतो की, आता Margins are now becoming visible in knowledge making process अगोदर इन्व्हिजिबल होते ते आता विजीबल होत आहेत. त्यांच्या अनुभवाच्या आधारे नवीन ज्ञान निर्मिती होत आहे. पण ही प्रक्रिया सहज शक्य झाली का? तर नाही. केंद्राने ज्ञान व्यवहाराच्या आधार यावे किंवा ज्ञान व्यवहाराच्या पातळीवर तुमचा विचार केला आणि तुम्हाला समजावून घेतले का? तर नाही. ज्ञान व्यवहाराच्या संदर्भात तुम्ही प्रश्न निर्माण केलेत. एवढेच नाही तर तुम्हाला ज्ञान व्यवहाराची चिकित्सा करून केंद्रस्थानी असलेल्या व्यवस्थेविरोधात व्यक्तिगत व सामूहिक स्वरूपाचा संघर्ष करावा लागला.

केंद्राने उपकृत होऊन तुमचे अस्तित्व वा दृष्यता मान्य केले नाही. तर तुम्हाला ज्ञाननिर्मितीची चळवळ उभी करावी लागली. मृणाल मिरी या तत्वचिंतक व्यक्तीने margin, marginality, marginalization and marginal यासंदर्भात आपले विचार मांडले. मार्जिन च्या संदर्भात बोलणे म्हणजे to become critically about margins without reference to centre परिघात घडणार्या घटना या केंद्राच्या अनुभवाच्या आधारेच त्याची चिकित्सा करावी अशी धारणा आहे. केंद्राच्या परिप्रेक्ष्यातून परिघा बद्दल विचार केला जातो. हे केव्हा कळत जेव्हा आपण परिघाच्या जगण्याची व अनुभवाची चिकित्सा करतो.परीघ आणी परिघाचे व्यक्तिगत आणि सामुदायिक अनुभव हा चिकित्सक ज्ञान निर्मितीचा पाया आहे किंवा मुख्य स्त्रोत आहे. When you speak from margin you are trying to understand central question why margins? परिघाचा विचार का? परिघाची निर्मिती कशी झाली? परिघाचा विचार एकटा करता येणार नाही. परिघाचा विचार केंद्राची चिकित्सा करूनच करा वा लागेल. To

speak about margin is to speak about centre.

ते म्हणतात, की,आणखी एका गोष्टीची चर्चा करणे गरजेचे आहे. ते म्हणजे Sociology of social movement ची सैद्धांतिक मांडणी.समाजव्यवस्थेच्या मांडणीची चिकित्सा करण्यासाठी Protest movement निर्माण झाल्या. या चळवळीच्या मागचा मुख्य हेतू म्हणजे अशी व्यवस्था निर्माण करणे जिथे न्याय आहे, माणसाला माणूस म्हणून मूल्य आहे आणि माणसांचा एकमेकांबद्दलचा सन्मान आहे. ही चळवळ मूलगामी व्यवस्थेच्या संदर्भात प्रश्न निर्माण करणारी होती.

प्रस्थापित व्यवस्थेची केलेली चिकित्सा आणि त्या चिकित्सेच्या आधारे केलेली सामूहिक कृती म्हणजेच सामाजिक चळवळ होय. Relative deprivation आम्हाला त्यांच्या सारखे मिळत नाही. आम्हाला त्यांच्या सारख्या गोष्टी द्या म्हणजेच आमच्यातील decent निघून जाईल. टू मेक मार्जन क्रिटीकल प्रस्थापित सत्ता व्यवहाराची चिकित्सा करणे म्हणजे नवीन न्यायीक समाज व्यवस्था निर्माण करणे आहे. म्हणजेच ज्ञान व ज्ञान व्यवहार ही महत्त्वाची अशी प्रक्रिया महत्त्वाची अशी क्रिया आणि प्रक्रिया आहे.

शेवटचा मुद्दा कांबळे सरांनी मांडला can you speak about independence of margin या बाबतीत विचार करताना परिघातील व्यक्तीचे जगणे सरळधोपट नाही. त्याला अनेक पदर आहेत. हे सगळे पदर हे एकमेकात गुंतलेले आहेत. ज्याला multilayered marginality असं म्हणता येईल. तसेच co-impacting factor आणि interconnecting of margin असे देखील आहे. परिघ ही संकल्पना अनेक पैलू असलेली आहे. तसेच इतर परिघांशी आंतर संबंधित आहे. एवढेच नाही तर ती एकमेकांवर परिणाम करणारी देखील आहे. दलित व्यक्तींचे प्रश्न आहेतच परंतु एक दलित स्त्री म्हणून तिचे आणखी वेगळे प्रश्न असणार. आदिवासी स्त्री म्हणून देखील तिचे वेगळे प्रश्न असणार. म्हणून परीघांचा विचार करताना प्रस्थापित केंद्र व्यवस्थेशी निगडित बृहत दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे आहे.

फ्रेंच मधील ब्लॅक फिलोसोफर फ्रान्स फेनन यांनी आपल्या Black skin and white mask या ग्रंथामध्ये आपले मत मांडले. त्याचा Dilemma असा आहे की त्याला ब्लॅकनेसपणा इरेज केल्याशिवाय व्हाईट सोसायटी मध्ये स्थान नाही. म्हणजेच त्याला व्हाईट सोसायटीची कल्चरल, सोशल आणि मटेरियल व्यवस्था आपली मानल्यायाशिवाय व्हाईट सोसायटीमध्ये स्थान मिळू शकत नाही.

यासंदर्भात आणखी एक विचारवंत कॉर्नर बेस्ट यांनी १९९३ मध्ये The race matters नावाचं पुस्तक लिहिलं आणि हे पुस्तक त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यावेळेस बराक ओबामा झाले त्या वेळेस लिहिले. त्या वेळेस त्यांनी म्हटले होते Black face of white merica taking merica forward. या ग्रंथात त्यांनी एक महत्त्वाचा विचार मांडला तो म्हणजे प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला तुमचं अस्तित्व व असण प्रस्थापित व्यवस्थेला धक्का न लागू देता अशा पद्धतीने ज्ञान व्यवहाराची योजना व आखणी केलेली दिसते.

म्हणून when we speak about the margin is beyond the margin, in context to multi-layered margin and complex margin. Margins are reproduced and simultaneously reconstitutes. म्हणून ज्ञान व्यवहाराची चिकित्सा करणे गरजेचा आहे किंवा या गोष्टींचा विचार करणं गरजेचं आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी ऊकरंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत सोनवणे यांनी केले.सदरील व्याख्यानास ऑनलाइन श्रोतावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

https://youtu.be/fjhUhMxflP0.

■■■

अहवाल लेखन

डॉ. मंजूषा नळगीरकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
फुलंब्री ता. फुलंब्री, जि- औरंगाबाद.

विशेष व्याखान

दिनांक : ८ ऑगस्ट, २०२१, सकाळी ११:०० वाजता

विषय : दिल्ली स्थित किसान आंदोलनाची भूमिका व वाटचाल : एक आकलन



वक्ते : कॉ. किशोर ढमाले
(सत्यशोधक शेतकरी सभा महाराष्ट्र राज्य संघटक)

अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद

प्रास्ताविक :

मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे यांनी प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्रमुख वक्ते कॉ. किशोर ढमाले यांचा परिचय करून दिला. डॉ. नारायण कांबळेयांनी व्याख्यानाची भूमिका स्पष्ट केली.मराठी समाजशास्त्र परिषदेद्वारा आयोजित कार्यक्रमाच्या माध्यमातून वैचारिक चिंतन, मंथन व्हावे हा उद्देश असतो. डॉ. श्रीराम खाडे व प्रा. स्निग्धा कांबळे यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेचे सदस्य वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करून नवीन सदस्यांची नोंदणी केली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील मुंबई पुणे आणि नाशिक यासारख्या भागातून देखील सदस्य संख्या वाढली पाहिजे,असाआशावाद व्यक्त केला.

आज दिल्ली स्थित शेतकऱ्याच्या आंदोलनाची दिशा आणि वाटचाल यावर सविस्तर विचार मांडण्यासाठी कॉ. किशोर ढमाले यांना निमंत्रित केले आहे. ते या आंदोलनामध्ये स्वतः सहभागी झालेले आहेत, त्यांनी नेतृत्व केलेले आहे. तेव्हा या चळवळीच्या संदर्भाने सविस्तर विचार व चर्चा करण्यासाठी कॉ. किशोर ढमाले हे योग्य न्याय देऊ शकेल असे परिषदेला वाटल्यामुळे यासाठी कॉ. किशोर ढमाले यांना निमंत्रित केले आहे. कॉम्रेड किशोर ढमाले हे महाराष्ट्र आणि देशातील सर्वांना ज्ञात आहे व त्यांचे कार्य देखील सर्वजण जाणता आहात तरीसुद्धा त्यांचा थोडक्यात परिचय करून देणे संयोजकाचे कर्तव्य आहे, असे सांगत किशोर ढमाले यांचा मार्क्स, फुले-शाहू आणि आंबेडकरवादी यासारख्या सत्यशोधक चळवळीतील संबंध नेते व कार्यकर्ते या रुपाने नेहमीच राहिलेला आहे. ते महाराष्ट्रातील एक नामवंत विचारवंत आणि अभ्यासक देखील आहेत. विद्यार्थिदशेपासून ते चळवळीत सक्रिय राहिलेले आहेत. विविध चळवळीच्या माध्यमातून न्याय आणि हक्क हा त्यांच्या चळवळीचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. मग ती आदिवासी

चळवळ असो, आंतरजातीय विवाहाची चळवळ असो, शेतकरी चळवळ असो या सारख्या चळवळीत त्यांनी नेहमीच योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे आपल्या विचारातून आणि लेखनातून देखील त्यांनी योगदान दिलेले आहे.

किशोर ढमाले

५ जून, २०२० ला केंद्र सरकारने वटहुकूम काढून;

१. शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य प्रोत्सश्रहन व सुविधा विधेयक २०२०
२. शेतकरी हक्क व किंमत विधेयक-२०२०
३. कृषी सेवा करार विधेयक-२०२०

वरील वटहुकुमावर कॉ. किशोर ढमाले यांनी काही प्रश्न उपस्थित केले जसे की,

१. कोरोना मुळे देशातील लोक घरात बसलेले होते, अशा काळात हे वटहुकूम निघाले. त्यामुळे प्रश्न उपस्थित झाला की संपूर्ण देशात लॉकडाऊन असताना असे वटहुकूम काढण्याची घाई कशासाठी?
२. शेती हा विषय भारतीय राज्यघटनेत राज्याच्या आखत्यारीत असतानादेखील केंद्राने वटहुकूम काढणे आवश्यक आहे काय?
३. या वटहुकुमासाठी संसदेत व संसदेबाहेर चर्चा का झाली नाही?
४. चर्चा न करता हे वटहुकूम काढणे आवश्यक होते काय?

अशा प्रकारचे प्रश्न प्रामुख्याने पुढे आले, असे त्यांनी नमूद करून आपल्या व्याख्यानाची दिशा स्पष्ट केली. उपरोक्त वटहुकुमाच्या विरोधात सर्वप्रथम पंजाबमध्ये आंदोलनास सुरुवात झाली. मोर्चेनिघाले, लोक रस्त्यावर आले, रेलरोको सुरू झाले, हे साधारणत दीड महिना सुरू होते. ते पुढे असे म्हणाले की, एक तर असे वटहुकुम काढणे म्हणजे संघराज्य पद्धतीवर हल्ला आहे. कारण हे राज्याच्या आखत्यारीत असतांना म्हणजेच समवर्ती सूचीत किंवा केंद्र सूचीत हा विषय नसतानादेखील केंद्राने हे काम केले. त्यामुळे हा लोकशाही व राज्यघटनेवरील हल्ला आहे. कृषी हा विषय राज्यसूची मध्ये म्हणजेच घटक राज्याच्या आखत्यारीत आहे. केंद्र सरकारला यामध्ये हस्तक्षेप करता येत नाही.भारतीय राज्यघटनेमध्ये तीन वेगवेगळ्या प्रकारच्या सूची आहेत आणि या प्रत्येक सूचीमध्ये काही विषय समाविष्ट करून त्याची मर्यादा निश्चित केली आहे, जसे की, राज्यसूची - ६१ विषय, केंद्रसूची - ९७ विषय आणि समवर्तीसूची मध्ये- ५२ विषय आहेत, म्हणजेच उपरोक्त स्वरूपाचे तीनही कायदे केंद्रसूची किंवा समवर्तीसूची मध्ये नसताना देखील केंद्र सरकारने यासंदर्भात वटहुकूम काढलेले आहेत. देशामध्ये असे कायदे असाधारण परिस्थितीमध्ये करता येतात, ती असाधारण परिस्थिती म्हणजे;

१. दोन तृतीयांश बहुमताने संसदेत राष्ट्रीय हितासाठी एक वर्षाकरिता कायदा बनवता येतो.
२. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५६ नुसार, देशामध्ये आणीबाणीची स्थिती असेल तर
३. दोन किंवा अधिक घटक राज्यांनी विनंती केली असेल तर भारतीय राज्य घटनेच्या कलम २५२ नुसार, अशा स्वरूपाचे कायदे तयार करता येतात.
४. परराष्ट्रीय करार आणि तह करण्यासाठी वटहुकूम काढता येतात.
५. देशामध्ये राष्ट्रपती राजवट लागू असेल तर,

म्हणजेच उपरोक्त स्वरूपाच्या पाच विशिष्ट संदर्भानुसारच राज्यसूची मध्ये हस्तक्षेप करून असाधारण परिस्थितीमध्ये अशा स्वरूपाचे वटहुकूम काढता येतात, परंतु देशात अशा कुठल्याही स्वरूपाची परिस्थिती नसताना हे कृषी विषयक तीन वटहुकूम काढून केंद्र सरकारने एक प्रकारे संघराज्य पद्धती मोडीत काढून हुकूमशाहीकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न केलेला आहे, असे पंजाब मधील शेतकऱ्यांना वाटते, त्यामुळे त्यांनी या तीन कायद्यांना कडाडून विरोध करत आंदोलन उभे केले आहे. तसेच माध्यमाची देखील गळचेपी यासंदर्भात झालेली दिसते. त्याचबरोबर त्यांनी कायदा तयार करताना ज्या घटनात्मक तरतुदीची पायमल्ली केली, त्यामुळे पंजाब राज्यातील शेतकऱ्यांनी आंदोलनाला सुरुवात करून दिल्लीकडे आपल्या आंदोलनाचा मोर्चा वळवला असताना शासनाने आपल्या सत्तेचा गैरवापर करून या मोर्चाला अडविण्यासाठी रस्त्यात खंदक खोदले. हे आत्तापर्यंत देशात कधीही झाले नव्हते. त्यानंतर भर थंडीमध्ये आंदोलक शेतकर्यांच्या अंगावर थंड पाण्याचे फवारे, हवेत गोळीबार व शेवटी रस्त्यात खिळे आणि सळया रोवल्या या यासारखा निंदनीय प्रकार हे आंदोलन आढविण्यासाठी करण्यात आला आहे.

पंजाब राज्यातील विविध सीमेवर २६ नोव्हेंबर, २०२० ला सर्व आंदोलक एकत्र येऊन एका नव्या आंदोलनाला सुरुवात झाली. आज आठ महिन्यांपेक्षा अधिक काळ झाला तरी हे आंदोलन ऊन, पाऊस, वारा आणि थंडी यासारख्या नैसर्गिक संकटाचा सामना करून यशस्वीपणे तग धरुन आहे. शासनापुढे आंदोलक शेतकऱ्यांनी आपले मत देखील व्यक्त केले आहे. तसेच सत्यशोधक शेतकरी सभेच्या वतीने स्वतः कॉम्रेड किशोर ढमाले हे या आंदोलनात सहभागी झाले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनाचा एक भाग म्हणून मुंबई येथे आदानी आणि अंबानी यांच्या कॉर्पोरेट हाऊस समोर २३ डिसेंबर, रोजी तसेच, २३ ते २६ जानेवारी दरम्यान आझाद मैदानावरील आंदोलन या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केले असल्याचे नमूद केले. हे आंदोलन पंजाब किंवा आपापल्या राज्यात करण्याऐवजी दिल्लीमध्ये का? असा सवाल देखील केला

जातो. परंतु १९८४ ला देशामध्ये विशेषता पंजाब राज्यात जी आंदोलन दडपण्यात आली होती त्या आंदोलनाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून हे आंदोलन पंजाब ऐवजी दिल्लीसारख्या ठिकाणी करण्याचे नियोजन केले व जर हे आंदोलन दडपले तर संपूर्ण देशासमोर येईल, म्हणून हे आंदोलन दिल्लीच्या दिशेने निघाले आहे. या तीन कायद्याच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची भूमिका काय आहे? हे समजून घेतले पाहिजे, तेव्हा यातील पहिला कायदा, शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य प्रोत्सश्रहन व सुविधा विधेयक २०२० यासंदर्भातला आहे. हे वटहुकूम सप्टेंबर मध्ये पारित झाले. परंतु त्यासाठी एक पार्श्वभूमी आहे महाराष्ट्र व इतर राज्यातील बाजार समिती आहेत त्या साधारणत: ब्रिटिश काळात सुरू झालेल्या आहेत व त्यानंतर वेगवेगळे कायदे निर्माण होऊन त्यातील स्वरूपही बदलत गेले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या बाजार समित्यांचे कल्याणकारी स्वरूपात रूपांतर करण्याचा प्रयत्न झाला. यामध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे कल्याणकारी व लोकशाही पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे देशातील शेतकरी हिताला वाव होता. दुसऱ्या बाजूला, येथेही आपणास भांडवलशाहीचा शिरकाव दिसतो. परंतु त्यावर कुठेतरी निर्बंध होते. त्या विरोधात आवाज उठविता येत होता. परंतु १९९० नंतर यामध्ये प्रचंड बदल होत गेला व शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कावर गदा येत गेली. त्यास कायदेशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न या तीन कायद्याच्या माध्यमातून केलेला दिसून येतो. शासनाने आपले अंग काढून घेण्याचा प्रयत्न या तीन कायद्याच्या माध्यमातून केला आहे. त्यामुळे ही नवीन बाजार व्यवस्था एकदम खुली होते आणि मग दीनदुबळ्या शेतकऱ्याचा यामध्ये टिकाव लागत नाही. असेच कॉ. किशोर ढमाले यांना यातून सुचवायचे होते.

डंकेल, जीएटीटी आणि डब्ल्यूटीओ कराराच्या माध्यमातून कायदेशीर व रचनात्मक स्वरूप देण्यात आले आहे. त्यातून कल्याणकारी व्यवस्था जगभरातून संपविण्याचे काम, शेतकऱ्यांना असलेल्या सवलती बंद करण्याचे काम, खुल्या व्यापाराला बांधील राहण्याचे, भांडवलदारांचा फायदा व स्वतंत्र या निमित्ताने बहाल करायचे आहे, असे सूचित केले. हमीभाव जाहीर करण्याची शासनाची जबाबदारी यातून मुक्त होणार. अन्नधान्याची खरेदी शासन बंद करणार. यातून सार्वजनिक वितरण प्रणाली (राशन) बंद होणार. म्हणजेच येथून सहकार तत्त्व पूर्णपणे हद्दपार होणार व खाजगी मालकीचे वर्चस्व येणार. हे सरळ सरळ उद्दिष्ट ठेवून सरकारने हे पहिले विधेयक आणले आहे. अशी मांडणी कॉ. किशोर ढमाले यांनी केली.

दुसरा कायदा शेतकरी हक्क व किंमत विधेयक २०२० आहे आणि तो देखील पहिल्या विधेयकासारखाच आहे. या कायद्यापुढे देशातील शेतीची मालकी अधिकार कंपन्याकडे जाणार आहे. शेतीची अवस्था वाईट असताना शेती शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी सरकार या कायद्यामध्ये म्हणते की, शेतकऱ्यास शेती परवडत नसेल तर त्यांनी ती कंपनीकडे करार पद्धतीने द्यावी. कंपनीला हवे ते उत्पन्न व पीक कंपनी घेईल. म्हणजे शेतकऱ्याच्या मताला व हिताला या ठिकाणी पूर्णपणे नाकारले आहे. तसेच एखाद्या शेतकऱ्याला न्याय व हक्कासाठी न्यायालयात देखील दाद मागता येणार नाही. अशी तरतूद देखील करण्यात आली आहे. म्हणजेच देशातील शेतीचे कंपनीकरण करण्याच्या पद्धतीला या कायद्याच्या माध्यमातून अंतिम स्वरूप देण्याचे प्रावधान आहे.

तिसरा कायदा, कृषी सेवा करार विधेयक २०२० हा आहे.'आवश्यक वस्तू व संशोधन कायदा १९५५' ला भारत सरकारने केला होता. त्यानुसार जीवनावश्यक वस्तूंचा साठा करता येत नव्हता आणि आता तिसऱ्या विधेयकाच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तू जसे की तांदूळ, बटाटे, तेल, गहू अशा विविध वीस वस्तू वरील साठेबाजीचे निर्बंध उठविण्यात आले आहे. त्यामुळे या वस्तूची साठेबाजी करण्याचे एक प्रकारे प्रोत्साहन मिळाले. हिसार मध्ये आदानी आणि अंबानी यांचे गोडाऊन तयार आहे. त्यात कोट्यावधी टन अन्नधान्य साठेल एवढी क्षमता आहे. दुसऱ्या बाजूला, सरकारने असे म्हटले आहे की, आम्ही या कायद्यानुसार साठेबाजी करण्यास शेतकऱ्यांना परवानगी दिली आहे. परंतु देशातील किती टक्के शेतकरी साठेबाजी करेल? व ती त्यांना शक्य होईल का? या बाबीचा विचार केला तर शेतकऱ्यांची साठवण क्षमता आणि आदानी –अंबानी यांची साठवण क्षमता बघितली तर आपल्या लक्षात येते. म्हणजेच हा सरळसरळ देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला करण्याचा प्रकार आहे.

देशातील उपासमार आणि भूकबळीची संख्या बघितली तर त्यामध्ये, भारत ९४ व्या क्रमांकावर आहे. म्हणजेच देशातील अवस्था यावरून आपल्या लक्षात येते. असे असताना देखील हे कायदे करणे म्हणजे देशाला कंपन्यांच्या हवाली करणे, असे हरियाणा व पंजाब मधील शेतकऱ्यांना वाटते. किमान विक्री मूल्य हमी कायदा करा, सर्व शेतमालाला आधारभूत किंमत दिली गेली पाहिजे, त्यामध्ये तांत्रिक बाबींचा विचार करून, उत्पादन खर्च विचारात घेऊन ही आधारभूत किंमत जाहीर करावी. परंतु हे होताना दिसत नाही. त्यामुळे देशातील शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करेल? असा सवाल देखील या निमित्ताने उपस्थित होतो व हा सवाल पूर्णपणे तर्कसंगत वाटतो. कारण त्यांनी पुराव्यानुसार बाजार व्यवस्था आणि त्यातील उलाढाल यांच्यातील आकडेवारीचा संदर्भात स्पष्टीकरण दिले व खाजगी बाजार व्यवस्था कशी वाढत

चालली आहे. हे देखील स्पष्ट केले.

पंजाब मधील पेप्सिको कंपनीने शेतकऱ्यासोबत बटाट्याच्या संदर्भाने जो करार केला होता. त्यामध्ये देखील शेतकऱ्याची फसवणूक केली व ठरलेल्या दराप्रमाणे बटाटा खरेदी केला नाही. महाराष्ट्र राज्यात २००८ मध्ये पुणे जिल्ह्यातील नीरा देवगड धरण पूर्णपणे तयार करून त्यानंतर पूर्ण पाण्यासह लिलावात काढले तेव्हा प्रा.एन डी पाटील यांच्या नेतृत्वात आंदोलन केल्यानंतर काही बाबी समोर आल्या की, या धरणाचा लिलाव करण्याचे ठरले होते. प्रकरण कोर्टात गेले. या लिलावा मागे कारण काय होते? तर हे धरण अंबानीला हवे होते. कारण त्यांच्या मॉलमधून ताजा भाजीपाला उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना शेती करायची होती. त्याचबरोबर या धरणालगत दहा एकर शेती त्यांना पाहिजे होती. म्हणजे यातून आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, देशातील कॉर्पोरेटची भूक किती मोठी आणि व्यापक आहे? यातून शेतकऱ्यांची हजारो एकर शेती ते घेतील. सर्व यांत्रिक पद्धतीने शेती करतील आणि यातून मनुष्यबळाला देखील वजा केले जाईल. या दिशेने ही सर्व वाटचाल चालू आहे. म्हणजेच या तीन कायद्यातून सहकारी बाजार समिती नष्ट होणार आहे, शेती परवडणार नाही या नावाखाली तिचे कंपनीकरण होणार आहे. किमान विक्री मूल्याची हमी न दिल्यामुळे शेतकऱ्यामध्ये कर्जबाजारीपणा वाढणार आहे. ते आत्महत्या सारखा पर्यायाकडे वळतील, सरकारी खरेदी बंद होणार, सार्वजनिक वितरण प्रणाली बंद होणार. म्हणजे कोट्यावधी दलित, आदिवासी, गरीब, दारिद्र्य रेषेखालील लोक जे रेशनवर अवलंबून आहेत, त्यांनाही उघड्यावर पाडण्याचे काम यातून होईल. साठेबाजीवर नियंत्रण राहणार नाही. कंपनी हवी तेवढी साठेबाजी करेल, म्हणजे सर्व दृष्टचक्र या तीन कायद्यातून सुरू होईल. त्यासाठी या तीन कायद्याच्या विरोधात दिल्ली येथे किसान आंदोलन चालू आहे. असे कॉ. किशोर ढमाले यांनी आपल्या मांडणीत सपष्ट केले.

आंदोलनाची वाटचाल:

या आंदोलनाची पुढील वाटचाल किंवा दिशा स्पष्ट करतांना कॉ. किशोर ढमाले यांनी आपले अनुभावाधीष्टीत विचार अगदी मुद्देसूतपणे मांडले. देशातील शेतकरी त्या ठिकाणी ठामपणे ठाण मांडून बसलेले आहेत. आता ते याच ठिकाणी पक्के घर बांधण्याच्या तयारीत आहे. अनेक वाहनांच्या ट्रॉलीचा किंवा ट्रकचा निवाऱ्यासाठी उपयोग करत आहे. सिंधू सीमेवर जवळपास बावीस किलोमीटर अंतरापर्यंत सर्व आंदोलक शेतकरी वसाहत पसरली आहे. मुख्य मंचापासून निवास स्थानापर्यंत जाण्यासाठी सायकलरिक्षा उपलब्ध आहे. स्थानिक लोकांनी देखील पाठिंबा दिला आहे. त्याचप्रमाणे डॉ.स्वा ई मानसिंग हे आपला अमेरिकेतील वैद्यकीय व्यवसाय सोडून आंदोलन स्थळी आले व त्यांचे म्हणणे आहे की, 'हे आंदोलन जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत मी परत जाणार नाही'. यावरून आंदोलनाची जीद्द लक्ष्यामध्ये येते. 'जब तक कानून वापसी नही, तब तक घर वापस नही'. आंदोलक शेती कामासाठी हंगामात शेती करून पुन्हा या आंदोलनामध्ये सहभागी होत आहेत. त्याचप्रमाणे पोस्टाचे पत्ते देखील आता निर्माण झाले आहेत. या आंदोलनात आतापर्यंत जवळपास साडेपाचशे शेतकरी मृत्युमुखी पडले आहेत. काहींनी आत्महत्या देखील केलेली आहे. काही आजारपणाने मृत्यू पावलेले आहेत. परंतु कोरोनामुळे एकही आंदोलक शेतकरी मृत्युमुखी पडलेला नाही. कारण त्यांच्यामध्ये सामूहिक प्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे. असे डॉ. स्वाईमान सिंग यांचे म्हणणे आहे. लोक आपला व्यवसाय, नोकरी सोडून आंदोलनामध्ये अत्यंत शांत, संयमीपणाने सहभागी होत आहेत. आंदोलन मार्गात अडथळे निर्माण करून रस्ते बंद केले आहेत. या आंदोलनात पाचशेपेक्षा अधिक संघटना सहभागी झाल्या आहेत. ४० प्रतिनिधी निवडलेले आहेत. ११ वेळा सरकार सोबत बोलणे झाले आहेत. परंतु सरकार तसूभरही माघार घेत नसल्याचे दिसून येते.

यापुढे देखील शेतकरी बोलणी करण्यास तयार आहेत. आंदोलनाचे निर्णय सामूहिकपणे होतात आणि जर एखादा मोठा नेता सुद्धा चुकीचा बोलला तर पंधरा दिवसासाठी त्यास आंदोलनातून निलंबित केले जाते. जगाच्या इतिहासातील प्रदीर्घ चाललेले हे एकमेव आंदोलन आहे. या आंदोलनास बदनाम करण्याचे प्रयत्न देखील झाले. आंदोलनात फूट पाडण्याचे प्रयत्न झाले, परंतु शेतकरी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन पुढे नेत आहेत. पंजाब आणि हरियाणा या राज्यातील पाणीप्रश्न विवाद देखील एक अश्र म्हणून आंदोलनात फूट पाडण्यासाठी वापरण्यात आले. परंतु शेतकऱ्यांनी त्यास भिक घातली नाही. हरियाणात जात पंचायती व खाप पंचायती आहेत, त्या देखील या आंदोलनामुळे भरल्या नाहीत. तर त्यांनी एकच महापंचायत सर्व जाती-धर्मासाठी आयोजित केली. म्हणजेच या आंदोलनाच्या निमित्ताने लोकांची प्राथमिकता काय आहे? हे देखील लक्षात आले व हे देशातील जाती-धर्म विरहित आंदोलन असल्याचे सिद्ध झाले.

या आंदोलनाच्या निमित्ताने स्त्रियांच्या पारंपारिक दर्जा देखील परिवर्तित झालेला दिसतो. यानिमित्ताने लंगरची व्यापकता वाढली, लंगरची ओळख सीख धर्मापुरती न राहता सर्व जाती धर्मासाठी खुली झालेली आहे. असे आंदोलनस्थळी दिसून येते. देशामध्ये एक प्रकारची वैचारिक अराजकता असताना देखील या आंदोलनातून लाखोंच्या

संख्येने आंदोलनात प्रश्न विचारण्यासाठी पंजाब मधील शेतकरी पुढे आलेत. त्यांना सलामच केला पाहिजे, असे कॉ. किशोर ढमाले यांनी मत व्यक्त केले. एकंदरीत देशाच्या स्वातंत्र्यासाठी पंजाब मधील लोकांचे योगदान आणि आताच्या आंदोलनात देखील त्यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे वाटते.

त्याचप्रमाणे आंदोलनास अपयशी करण्यासाठी जे प्रयत्न झाले, त्या सर्व प्रयत्नांना हाणून पाडण्याचे काम आतापर्यंत या आंदोलनात दिसून आले. एका भारतीय सैनिकाचे आई-वडील या आंदोलनात सहभागी आहेत आणि तो सैनिक सुट्टीवर आई-वडिलांना भेटण्यासाठी थेट युनिफॉर्ममध्ये आंदोलन स्थळी आला व येताना त्याच्या सैन्यातील मित्राने पाठवलेली मदत घेऊन आला. तेव्हा त्यास पत्रकारांकडून विचारणा झाली की, आपण युनिफॉर्म वर येथे कसे? तर त्यांनी दिलेली प्रतिक्रिया फार महत्त्वाची होती. कारण तो म्हणाला की, 'मी माझ्या आई-वडिलांना समर्थन देण्यासाठी आलो आहे आणि यामध्ये काही गैर नाही'. म्हणजे त्या निमित्ताने पुन्हा एकदा देशात लालबहादूर शास्त्री यांनी दिलेला 'जय जवान जय किसान' चा नारा पुनरुज्जीवित झाल्याचे दिसून येते असे देखील कॉ. किशोर ढमाले यांनी व्यक्त केले.

आंदोलनाची दिशा :

प्रस्तुत किसान आंदोलनाची दिशा स्पष्ट करतांना कॉ. किशोर ढमाले यांनी देशातील राजकीय परिस्थितीचे दाखले देत मांडणी केली. पश्चिम बंगालमध्ये राजकीयदृष्ट्या लक्ष्यात आले की, ममता बॅनर्जी यांच्या विजयासाठी शेतकरी आंदोलन करणाऱ्या नेत्यांनी केलेला प्रचार महत्त्वाचा ठरला. कारण हे आंदोलन केंद्र सरकारच्या तीन कृषी कायद्याच्या विरोधी होते. तीच भूमिका त्यांनी निवडणूक प्रचारात मांडून एक प्रकारे राजकीय शक्ती दाखवण्याचे काम केले. त्याचप्रमाणे पुढे येणाऱ्या विविध निवडणूकी मध्ये देखील असेच दिसेल. असे मत व्यक्त केले.

ते पुढे असे म्हणाले की, देशातील बुद्धीजीवी जसे की विद्यापीठातील प्राध्यापक मंडळीदेखील आंदोलनामध्ये सहभागी होत आहेत व वैचारिक प्रबोधन करत आहेत. त्याचप्रमाणे आंदोलनाची भौगोलिक स्थिती व्यापक असल्यामुळे एका ठिकाणी घडलेली घटना दुसऱ्या ठिकाणी कळावी यासाठी डॉ. किरण नावाच्या मुलीने 'ट्रॉली टाइम्स' नावाने एक वृत्तपत्र सुरू केले. आंदोलनाच्या वेगवेगळ्या सीमेवरील वृत्तांकन करून ते छापण्यास सुरुवात केली. म्हणजे या बुद्धीजीवी वर्गांचा या आंदोलनास कशा पद्धतीने पाठिंबा आहे? याची जाणीव एक प्रकार यातून होते. स्व -समूहातील बुद्धी जीवी साधारणत: समाजाच्या विरोधात काम करतात, असे अन्तीनियो ग्राम्शी यांचे म्हणणे आहे ते या आंदोलनात पूर्णपणे नाकारलेले दिसते. त्याचे उदाहरण म्हणजे डॉ. स्वाईमानसिंग व डॉ.किरण नट यांचे योगदान होय, असे विचार त्यांनी मांडले. म्हणजेच बुद्धीजीवी वर्ग या आंदोलनास जोडल्या जात आहे.

त्याचप्रमाणे या आंदोलनाच्या निमित्ताने जातिभेद व धर्मभेद देखील लोक विसरुन सहभागी झालेले आहेत. विविध राज्यातील शेतकरी या आंदोलनामध्ये सहभागी आहेत. हा केवळ पंजाब मधील शेतकऱ्यांचा लढा नाही तर समग्र भारतीय शेतकऱ्यांचा लढा आहे. असे आता सर्व राज्यातील लोकांच्या लक्षात येत आहे व आंदोलनात त्यांचा सहभाग वाढत आहे. शेतकरी लढा हा जन लढा बनून यातून शेतकरी व देश वाचायला पाहिजे या निमित्ताने हे लक्षात घेणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे समाजशास्त्राच्या सर्व अभ्यासकांनी याचा व्यापक दृष्टिकोनातून अभ्यास करावे असे आव्हान देखील केले. त्याचप्रमाणे शेवटी असा आशावाद व निर्धार व्यक्त केला की, हे आंदोलन आंदोलकातील चिकाटी, जिद्द आणि विश्वास यासारख्या प्रयत्नामुळे निश्चितच यशाच्या ठिकाणी थांबेल. सरकारला माघार घ्यावी लागेल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्निग्धा कांबळे यांनी केले तर डॉ. मंगलमूर्ती धोकटे यांनी आभार मानले

व्याख्यानाची लिंक : https://youtu.be/cjšwqiqthr

■■■

अहवाल लेखन

डॉ. साहेबराव हिवाळे
समाजशास्त्र विभाग,विनायकराव पाटील महाविद्यालय,
वैजापूर जि. औरंगाबाद-महाराष्ट्र
भ्रमणध्वनी: ७५८८०४३८०४
ई-मेल : sahebhiwalegmail.com

गेल ओम्वेट स्मृती व्याख्यान

दिनांक १२ सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ११ वाजता.

प्रा. डॉ. गेल ओम्वेट एक समाजशास्त्रीय आकलन

वक्ते

प्रा. डॉ. रमेश कांबळे, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

प्रा. डॉ. सुरेंद्र जोंधळे, राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ मुंबई.

डॉ. संजय कुमार कांबळे, समाजशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने आयोजित एक दिवसीय व्याख्यानमाला या अंतर्गत प्रा. डॉ. रमेश कांबळे, डॉ. जोंधळे, प्रा. संजय कुमार कांबळे यांच्या व्याख्यानमालेचा एक संक्षिप्त रूप आणि अहवाल सादर करत आहोत ऑनलाईन घेण्यात आलेल्या या गेल ओम्वेट स्मृति व्याख्यानमालेत. सूत्रसंचालन डॉ. नीलिमा श्रॉफ. यांनी करून त्यांनी या विषयावर सांगितले की ऑम्वेट यांचे कार्य व्याख्यान व लिखाण तसेच त्यांचे सामाजिक कार्य याविषयीचे चर्चा या ऑनलाईनच्या माध्यमातून होणार आहे त्यांना समजून घेताना त्यांचे सहकारी म्हणून राहिलेले त्याविषयीचे त्यांचे अनुभव या व्याख्याना द्वारा मांडणार आहेत तसेच या संस्थेचे सल्लागार म्हणून त्यांची निवड झाली त्यांचे अभिनंदन करून देऊन त्यांचे सर्व प्रमुख व त्यांची ओळख सूत्रसंचालक प्रा. नीलिमा सराफ यांनी करून दिली प्रमुख विचारपीठ खुले करून दिली.

प्रा. संजय कुमार कांबळे :

प्रा. कांबळे यांनी आपल्या व्याख्यानात सुरुवात गेल यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे कौतुक करत त्यांनी त्यांच्या भेटीचा प्रसंग सांगितला. मित्र परिवाराचा एक भाग आम्ही आहोत असे सांगत गेल ऑम्वेट जगातील जागतिक पातळीवर या बहुआयामी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या कार्यकर्त्या होत्या प्राध्यापक होत्या. अमेरिकेतून गेल येत आहेत त्यांच्यासोबत भारतात आल्या सोसिओलोजी ऑफ नॉलेज मध्ये यांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे हे त्यांचं मत होतं. समाधानी व्यक्तीचा विचार यांच्या संबंधाचा अभ्यास

करत असेल सामाजिक अंतर्विरोध समजून घेऊन परिवर्तन घडून येते हे गेल ऑम्वेट जमत होतं या मार्क्सवादी होत्या निर्मितीमध्ये अपारंपारिक दृष्टिकोनातून त्यांनी मांडणी करत त्यांनी ग्रामस्थ यांच्या जैविक विचाराची मांडणी केली त्यांच्या विचारांच्या दृष्टिकोनातून त्यांनी बुद्धिजीवी विचार स्पष्ट केले. तसेच कांबळे सरांनी सांगितले की गेल ओम्वेट यांच्या ग्रंथाची नावे सांगून अशी मांडणी भारत हिंदू राष्ट्र बुद्धी हिंदू जन ब्राह्मण असं अशी मांडणी त्यांनी केलेली आहे यांना महात्मा फुले यांच्या विचारांचा विचार महत्त्वाचा वाटत असेल त्यांनी भारत भ्रमण केलेले आहे ते नेहमी शोषितांच्या बाजूने उभे राहून वेगवेगळ्या चळवळीत सहभाग घेऊन त्यांना आधी आधार दिलेला आहे तसेच उद्दिष्ट तत्वज्ञान त्यांनी स्वीकारलेली आहे जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे संत तुकोबा चा विचार आला जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे वादाचा प्रश्न निर्माण करू नये तर तू निर्मूलनाचा विषय म्हणून विचार केला पाहिजे असे मत त्यांचे होते विचार हा इथला सांस्कृतिक विचार म्हणून त्या पुढे मांडत होत्या जगभरात त्यांनी या विषयाची मांडणी केलेली आहे.

महात्मा फुले यांच्या विचारात केंद्रस्थानी त्यांनी दिलेले आहे वर्ग जातीनुसार पुरुष सत्ता ही एक वर्चस्व असे समाजशास्त्रीय विचार गेल ऑम्वेट त्यांचे होते. गेल मॅडम यांनी अनेक वरिष्ठ विचारवंत सोबत लढतीला शोषितांच्या बाजूने उभे राहून त्यांनी शोषणाची संरचना व त्यांच्या वाटचालीची संभाव्यता यातील सहसंबंध लक्षात घेतला असाच व शोषण हे सामाजिक संबंधात घडत असतील असे त्यांनी आपले मत मांडाले. सन्मानाने जगण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे तो त्यांना द्यावा असं त्याचं ठाम मत होतं.

अरुंधती रॉय, मेघा पाटकर वेळोवेळी या जाती धर्म पंथाचा प्रभाव प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करत होत्या तसेच दलित साहित्यावर ही पाया तयार करत असेल या अंत दीपक तत्वज्ञानातून आपले सिद्धांत मांडणी करत असेल त्यांनी मुक्तीचा विचार केला आहे, वेगवेगळ्या ग्रंथाची निर्मिती केली आहे, टेलीनॉर जेली यांच्यासमवेत त्यांनी दलित साहित्याची सैद्धांतिक मांडणी केली आहे. भारतातील परिवर्तनवादी चळवळीत प्रतिष्ठित सहभाग घेण्याचे काम त्यांनी केले आहे अमेरिकन अस्मिता म्हणून त्या स्वतः कडे न बघता भारताला आपलंसं करून घेतलेला आहे आंबेडकर चे योगदान शेतकरी चळवळीमध्ये दिसून येतो त्यांच्या विचारात बुद्ध, कबीर , बाबासाहेब, येशू प्रभू यांना समजून घेणे मोठे काम आहे असे प्रा. संजय कुमार कांबळे यांनी आपल्या व्याख्यानातून स्पष्ट केले. त्यांची एकूण ७० पुस्तके प्रकाशित आहेत तर शंभर आर्टिकलचे लिखाण करून त्यांनी प्रकाशित केले आहे त्यामुळे त्यांचे हे ज्ञान समाज परिवर्तनासाठी महत्त्वाचे आहे महिला चळवळीतील लिखाण व इतर लिखाण मॅडमचे एक मोठे योगदान आहे

डॉ. सुरेंद्र जोंधळे

आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा कोणी एखाद्या प्राध्यापकाला एवढा मान मिळाला नसेल एवढा मान गेल यांना मिळालेला नंतर त्यांना वेगवेगळ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ती आदरांजली व्यक्त केली जात आहे या कोणत्याही खासगी किंवा शासकीय महाविद्यालय व विद्यापीठ आता पूर्णवेळ प्राध्यापिका म्हणून कार्यरत नव्हते तर त्या अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले लेख प्रकाशित करत आपल्या वेगवेगळ्या चळवळीमध्ये आपली कृती दाखवा कृतिशील कार्य करत असतात प्रत्येक चळवळीच्या टप्प्यात त्यांचे मार्गदर्शन हे त्या चळवळीतील व्यक्तींना लागत असे. भारतीय सामाजिक आर्थिक चळवळी समवेत दखल न घेतल्यामुळे खंत व्यक्त केली. खंत व्यक्त करत त्यांनी काही प्रश्न निर्माण केले की, त्यांच्या वैचारिकतिकडे भारतीय समाजशास्त्रज्ञांनी का दुर्लक्ष केले ? त्याचबरोबर त्यांनी त्याचं उत्तर दिलं.

डॉ सतीश सबरवाल यांच्या लेखाचे संदर्भ देत त्यांनी सांगितले की, भारतीय समाजशास्त्र हे सामाजिक आणि आर्थिक प्रश्नाबद्दल असावी दिशेने राहिलेले आहेत कारण, भारतीय सार्वजनिक विचार प्रणाली ही वसाहत संस्थांमधून निर्माण झाली आहे व ब्रिटिश काळातील विचार भारतीय समाजशास्त्रीय यांच्यावरती रुजले आहेत असे सार्वजनिक विचार त्यांनी मांडून यांच्या समाजशास्त्रीय वैचारिकते विषयीचे संवेदनशीलता स्पष्ट केली. गेल ऑम्वेटचा मार्क्सवाद आता मार्क्सवादी वैचारिकतेवर सीमांत परिणाम आहे असे त्यांनी सांगितले. त्यांच्या संशोधन पद्धती वर मार्क्स यांच्या विचारांचा परिणाम झालेला दिसून येतो. तसेच ऐतिहासिक समाजशास्त्र हे सार्वजनिक व्यवस्था संरचनात्मक प्रक्रिया म्हणून गेल ऑम्वेट यांनी त्यांच्याकडे पाहिले आहे अब्राहम या विचारवंतांनी आपले मत मांडताना म्हटले आहे की इतिहास आणि समाजशास्त्र हे सारखे आहेत यातील थोडाफार फरक हा संस्थात्मक अभ्यासाचा आहे परंतु केंद्रस्थाने गाभा जो आहे तो म्हणजे सारखाच म्हणून गेल्यामुळे त्यांनी तुलनात्मक ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा स्वीकार केला आहे आणि ही अभ्यासाची पद्धत त्यांचे अतिशय लोकप्रिय ठरली आहे. गेल त्यांच्या वैचारिकतिचा दुसरा प्रभाव म्हणजे संस्कृतिक मार्क्सवादाचा प्रभाव सोशल मुव्हमेंट इन इंडिया या पुस्तकामध्ये संस्कृतिक मार्क्सवादाचाच्या माध्यमातून त्या समाजाकडे पहात असे .

सुरेंद्र जोंधळे यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये त्यांची दोन वैचारिक मुद्द्यांना स्पर्श केला एक वैचारिक योगदान आणला त्यांनी स्पष्ट केले आणि दुसरे की भारतीय जातीचा प्रश्न गेनोमे त्यांनी अतिशय विस्तृतरित्या अभ्यासलेल्या आहे या गोष्टीला त्यांनी अग्रक्रमाने अभ्यासलेले आहेत तेव्हा जातीविषयक प्रश्न मांडताना गेलो यांचे विचार हे योगेन्द्र सिंह यांच्या अध्ययनाच्या माध्यमातून त्यांनी आपले जातीविषयक विचार व अभ्यास केलेला आहेत सामाजिक शास्त्राच्या ध्यानामध्ये गेलो त्यांनी जातीचा प्रश्न हा तिचे विस्तृत या मांडला आहे त्या जाती व्यवस्थेकडे अतिशय चिकित्सक पण बघत असेल असे जोंधळे जोंधळे यांनी आपल्या व्याख्यानातून मांडलेली आहे.

डॉ. रमेश कांबळे :

डॉ. रमेश कांबळे यांनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात केली व गेल ओम्वेट या आपल्यातून गेल्याचे दुःख व्यक्त करत त्यांनी त्यांचा मृत्यू म्हणजे एका विचारवंताचा मृत्यू आहे असे मत व्यक्त केले, कारण गेल ऑम्वेट मुळे त्यांच्या अध्ययनातून नवीन विचारवंत समोर आलेले आहेत आणि त्या एक मोठा विचारवंत होत्या असे त्यांनी सांगितले. गेल ओम्वेट यांच्या अध्ययनाचा पूर्ण सार न घेता त्यांनी महत्त्वाचे आणि महत्त्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. डॉ. रमेश कांबळे यांनी यांच्या जातीचा मुद्दा आणि त्याचा चिकित्सक अभ्यासावर भर दिला. सामाजिक जगाचे आकलन करण्यासाठी या तीनही मुद्द्याचे महत्त्व आहे असे त्यांचे मत होते. क्वॉलिटी ऑफ सब्जेक्टिव्ह ॲण्ड ऑब्जेक्टिव्ह ही संकल्पना आपल्या अध्ययनातून मांडली. भारतीय जातीचा अभ्यास करणे इंडियन थेरी च्या माध्यमातुन चिकित्सा स्पष्ट होतें. जातीकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा इतिहासिक आहे असे ते म्हणतात. समाजामध्ये जे उगम पावते त्याचा अंतही होतो या मांडणीचा स्वीकार ऐतिहासिक तिने केलेला आहे तेव्हा सामाजिक, मानसिक, बौद्धिक इत्यादी अंगांनी जातिव्यवस्था व्यापक राहते त्यातूनच वर्णआश्रमाची idiology पंधराशे ते दोन हजार वर्षापूर्वी पासून तयार झालेली आहे आणि जात हे एक समाज वास्तव आहे असे गेल् यांनी मांडणीतून समोर येते. गेल यांनी आपल्या मांडणीतून जात, Hinduism, कलोनियाझम ची मांडणी केली तसेच बलुतेदारी व जजमानी पद्धत ही विस्तृतरित्या स्पष्ट केली. त्यांनी भारतीय चिकित्सक सामाजिक सिद्धांताची मांडणी केली. सिव्हिलायझेशन जातीच्या चिकित्सकांनी सोशल व्यवस्था याअंतर्गत आंबेडकरी दलित चळवळीच्या माध्यमातून लोकशाही करण्याची सुरुवात झाली. गॅल ओम्वेट त्यांचे योगदान हे जात, वर्ग आणि लिंगभावच्या माध्यमातून अधिक विस्तृत स्पष्ट होते, यापुढे आपले दोन दृष्टिकोनातून विचार मांडले एक कीर्तीसाईट क्रिटिकल स्टरीज अंड दलित स्टडीज, गेल ओम्वेट यांनी भूमिहीन स्त्री शेतमजुरांची मुलाखत घेऊन त्यांनी वर्ग, जात आणि जेंडर यातील मांडणी ही समाजासमोर ठेवली.

■■■

अहवाल लेखन

डॉ. आरती धनवे
समाजशास्त्र विभाग,
डॉ. सौ. इ. भा. पा. महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद.

विशेष व्याख्यान

दिनांक : १६ जानेवारी २०२२, वेळ : सकाळी : ११.००

विषय : भारतातील समाजशास्त्राचे शतक : अवलोकन आणि आव्हाने

वक्ते : मा. डॉ. बालाजी केंद्रे

प्राध्यापक व प्रमुख, समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.

अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे

प्रोफेसर पॅट्रिक गेडस (Patrick Geddes) यांच्या मार्गदर्शनाखाली १९२० मध्ये मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विभागाची सुरुवात झाली. देशातील अध्ययन व संशोधनाचे हे पहिले केंद्र होते, त्यास शंभर वर्ष पूर्ण झाले आहे. याकाळात समाजशास्त्राच्या अध्ययनामध्ये कोण कोणती परिवर्तने झाली, आणि कोणती नवे आव्हाने अभ्यासकांसमोर आहेत, या बाबींची उकल करण्याकरिता डॉ. बालाजी केंद्रे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ मुंबई. यांना भारतातील समाजशास्त्राचे शतक अवलोकन आणि आव्हाने या विषयावर मांडणी करण्यास आमंत्रित केले गेले. म. स. प. चे अध्यक्ष मा. डॉ. नारायणराव कांबळे यांनी नव्या उमेदीने, नववर्षात विविध उपक्रमाचा मानस व्यक्त केला. याप्रसंगी त्यांनी सत्रास जोडल्या गेलेल्या म. स. प. चे आजी-माजी अध्यक्ष, सचिव, सन्माननीय कार्यकारणी, व सर्व उपस्थितांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

समाजशास्त्र विचार विश्वामध्ये अलीकडील काळात घडलेली दुःखद घटना म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील माजी सहकारी डॉ. सुनालिनी मॅडम यांना विनम्र अभिवादन व आदरांजली व्यक्त केली. सोबतच त्यांचे संशोधन कार्य व सेवाभाव आणि विद्यार्थीप्रियतेला अधोरेखित केले.तर आनंदाची बाब म्हणून डॉ. प्रदीप आगलावे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती, महाराष्ट्र राज्य यावर सदस्यसचिव म्हणून निवड झाल्याबद्दल समाजशास्त्र विचार विश्वाकरिता महत्त्वपूर्ण बाब असल्याचे सांगून अल्प कालावधीतील प्रकाशित खंडाबाबत म. स. प. च्या वतीने हर्षोल्हासीत होऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी त्यांनी समाजशास्त्र परिषदे अंतर्गत दिल्या जाणाऱ्या व नव्याने समाविष्ट झालेल्या पुरस्काराबद्दलचा उहापोह देखील केला, संशोधन पत्रिका व अहवाल संकलन ग्रंथ प्रकाशन याचाही मानस बोलून दाखवला.डॉ. उत्तमराव भोईटे सरांचे व्याख्यान 'जागतिकीकरणाला पर्यंत, जागतिकीकरणानंतर' समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासातील आव्हानांची विचार करण्याची गरज वाटते, म्हणून ग्रामीण पार्श्वभूमी, तरुण अभ्यासक, अभ्यासातील बदलाच्या अंगाने अभ्यास केला पाहिजे, नवनवीन सिद्धांत, नवनवीन संकल्पना निर्माण केल्या पाहिजे, असे त्यांनी म्हटले. डॉ. आनंद कुमार यांचे समाजशास्त्रीय योगदान महत्त्वाचे ठरते आहे. तर महाराष्ट्रात डॉ. बालाजी केंद्रे यांचे योगदान महत्त्वाचे ठरते आहे. असेही डॉ. कांबळे यांनी उद्गार काढले.

डॉ. बालाजी केंद्रे, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

ग्रामीण भागातून वाटचाल करीत प्रवास झालेला असल्यामुळे सिंहावलोकन करीत समाजशास्त्राचे भवितव्य, पुढील काळ किंवा आव्हाने काय? या अनुषंगाने प्रकाश टाकणार आहे. तत्पुर्वी जपान मधील टोकियो मध्ये समाजशास्त्र विषय विभाग हा सुरू झाला. तर १९१९ मध्ये आशिया खंडातील मुंबई येथे समाजशास्त्राचा दुसरा विभाग सुरू झाला. सर पॅट्रिक गेडस (Patrick Geddes) यांनी १९१९ ते १९२४ पर्यंत हा विभाग प्रमुख म्हणून पदभार सांभाळला, ते नागरिकशास्त्रज्ञ, biologist, इतरही शास्त्राचे अभ्यासक होते.भारतातील समाजशास्त्रास शंभर वर्ष पूर्ण झाले, तरीही आजही आपण समाजशास्त्राच्या अध्यापनात Classical Sociological Theories / traditions ह्या

आपणास प्रमाण मानावे लागतात, आणि हे प्रमाण मानत असताना आपल्याला ऑगस्ट कॉम्ट, मॅक्स वेबर यांचे विचार व कार्य आकलन करावे लागते. याच पद्धतीने विविध विचारवंतांच्या विचारांनी समाजशास्त्राची पायाभरणी झाली त्याचेही आपण अवलोकन करतो. याआधारेच समाजशास्त्राची सुरुवात ही युरोपमध्ये १८३९ ला झाली. समाजशास्त्र ही ज्ञानशाखा उदयास आली. इतर सामाजिक शास्त्रे हे तुलनेने जुनी व ऐतिहासिक आहेत. परंतु समाजशास्त्राची स्वतंत्र गरज वा आवश्यकता काय? या बाबीची उकल भारतीय समाजशास्त्रात मिळत नाही. म्हणून ज्या classical society sociological theories आहेत, त्या सिद्धांतातील जे योगदान आहे, त्यामध्ये ऑगस्ट कॉम्ट हे समाजशास्त्राचे जनक यांना त्यांच्या समाजशास्त्रीय योगदानाला आपणास विसरून चालणार नाही म्हणून हे समाजशास्त्रीय विचार खूप शास्त्रीय व महत्त्वपूर्ण आहेत. सामाजिक शास्त्रातील विचार हे नैसर्गिक शास्त्राप्रमाणे १००% पूर्णत्वास उतरत नसले तरी स्थल-काल परिस्थितीत ते न बदलणारे असे नसतात तर अशा सामाजिक शास्त्राच्या विचारात टीकाटिपणी होते, त्यावर विचारविनिमय होतो व नवा विचारही समोर येतो, ज्यामुळे नवीन विचार, नवीन वास्तव समजून घेता येतं आणि म्हणून ऑगस्ट कॉम्टने जरी समाजशास्त्र मांडलं, तरी त्यापूर्वी सामाजिक विचार हे समाजात होतेच, त्यामुळेच आपण सर्व आज प्रगत स्थितीत आहोत किंवा विकसित होऊ शकलो ही प्रक्रिया घडताना समाजशास्त्र विषयाची किंवा विचारांची गरज काय, समाजशास्त्राचा उदय आणि विकास का आणि कुठून झाला? याबाबतचा धांडोळा घेणे क्रमप्राप्त आहे.आज प्रत्येक विद्यापीठात व बहुतांश महाविद्यालयांमध्ये समाजशास्त्र हा विषय शिकवताना आपण हे सांगत असतो, की भारतीय समाजशास्त्राचा पाया हा 'युरोपियन आणि अमेरिकन' समाजशास्त्रामध्ये दिसून येतो. आपण 'भारतीय समाजशास्त्राची उभारणी केली व त्यास बळकटी दिली' याबाबत मत-मतांतरे असू शकतात, परंतु हा विषय स्वतंत्र चर्चेचा आहे असे वाटते.आपण पाहिले की, समाजशास्त्र या विषयाला सुरुवात करायची म्हटले, तर आपण प्रबोधन आणि पुनरुज्जीवन "Eenlightenment and ncient" आता हे शब्द दैनंदिन जीवनातही वापरतो असे आढळते. पण युरोपियन देशाच्या संदर्भात जे Enlightenment आहे, त्याचा संबंध हा१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीशी जोडलेला आहे. ज्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वतंत्रता, बंधुता, समता ही मूल्येतत्वे जगाला दिली.मानवाला स्वातंत्र्य, समता, न्याय पाहिजे या तीनही बाबी त्यांच्यासाठी अत्यावश्यक आहेत. या बाबींची सुरुवात तत्कालीन ऊरीज्ञ रसश मध्ये किंवा प्रबोधन काळात केली. Dark age मध्ये केवळ सरंजामदार सर्वेसर्वा होता, त्या काळात कोणीही, कोणतेही कारण विचारलेलं चालत नव्हतं, केवळ सरंजामदार ठरवतील तेच मान्य करावे लागेल म्हणजेच कोणत्याही गोष्टीची कार्यकारण, शोधण्याची, विचारण्याची, चिकित्सा करण्याची मुभा तिथे मान्य नव्हती. Enlightenment मध्ये Resun आणि fact या गोष्टी सर्वात महत्त्वाच्या मानल्या गेल्या. आणि मग कारण आणि त्याचं सर्वात महत्त्वाचे योगदान हे सत्य/तथ्य किंवा वास्तवता पुढे येण्यासाठी महत्त्वाचं होतं. आज काही लोक सत्यासाठी लढतात. सत्यासाठी लढ्याची परंपरा ही प्रत्येक काळात आली आहे. त्यासाठी लढणाऱ्या माणसांनी अनेक प्रतिकुल बाबी भोगलेल्या आहेत, याचा उल्लेख आपणास इतिहास देतो. आजही अनेक लोक सत्यासाठी लढतात.म्हणून गॅलिलिओच्या काळापासून पाहतो, की आजही आपण धर्म, जातव्यवस्था, समाज ह्या तीन ते चार गोष्टी बदलत्या भूमिकेतून पाहणं गरजेचं आहे. नवीन पद्धतीने या सर्व बाबींकडे पाहणे व त्यातून नवीन मार्ग सुचवणे यास समाजशास्त्रीय विश्लेषण म्हणतात.

म्हणून या सर्व बाबी आपण लक्षात घेतल्या पाहीजे, की Enlightenment झालं, फ्रेंच राज्यक्रांती झाली, त्या काळामुळे ज्या वेळेस मानवाला एक Dignity/मोठेपणा वा मानवाचं अस्तित्व मानायला लागलो, मान्य करायला लागलो तर नक्कीच त्याच्यातून सुधारणा होते, विकास होतो हे आपणास आतापर्यंतचा इतिहास सांगतो आहे. आणि म्हणून प्रबोधनकाळानंतर झालेली फ्रेंच राज्यक्रांती, तिथे प्रस्थापित सरंजामदारांची एकाधिकारशाही (Monopoly), त्यांचे जे अन्याय-अत्याचार-गुलामगिरी होती, लोकांना गरिबीत / दारिद्र्यात ठेवणे, लूट करणे. याबाबी विरुद्ध लढा देण्यासाठी व प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य, समता, न्याय मिळाला पाहिजे याकरिता फ्रेंच राज्यक्रांती झाली, या क्रांतीच्या विजयातून आपण समाजशास्त्राकडे बघितलं पाहिजे.

एखाद्याने काहीतरी लिहिलं म्हणजे तेच सत्य आहे किंवा महान आहे असं नाही. हजारो बळी पडलेले शोषित, गुलाम, दारिद्र्यात असलेले लोकाचं मानवपण व्यवस्थेनं नाकारलं होतं. या लढाईत भाग घेऊन, क्रांती करून मानवीहिताची मूल्य खूप संघर्षातून मिळालेली आहेत. या संघर्षातून मग मानवाचा विकास झाला पाहिजे आणि मानवाच्या विकासासाठी मग ह्या मूलभूत बाबी आहेत हा नवीन विचार समोर आला, या नवीन विचाराला प्रबोधन काळ असे म्हणतात. प्रबोधन या शब्दाची गरिमा, व्याप्ती खूप समर्पक आणि व्यापक आहे. हे आपण लक्षात घ्यावं, हजारो लोकांनी ज्यावेळी त्याग केला, एखादी अन्यायकारक व्यवस्था पूर्णत: बदलून टाकली अशा परिस्थितीला आपण प्रबोधन म्हणतो. आणि ह्या प्रबोधनातून समाजशास्त्र विषयाची उत्पत्ती झाली हे आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणून मग हे प्रबोधन झाल्यानंतर युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. मानवी श्रमाच्या ऐवजी मशीन किंवा यंत्र आली, उद्योगातील तयार उत्पादनास विक्रीसाठी बाजारपेठेची आवश्यकता म्हणून ट्रेड कॉमर्स या बाबी आल्या, मग या बरोबरच मानवाच्या जगण्यासाठीची संपत्ती आहे ती वाढली, ज्यातून वैज्ञानिक ज्ञानाचा देखील विकास होत गेला, आणि मग समाजाच्या प्रगतीला सुरुवात झाली. ही सुरुवात झाल्यानंतर औद्योगीकरणाचा परिणाम काय? याचा शोध घेतला, ज्या दृष्टिकोनातून आपण त्याकडे पाहतो किंवा अभ्यासतो तसे तर तथ्य त्यांना प्राप्त होतात.

औद्योगीकरण झालं, उत्पादनात वाढ झाली, संपत्ती वाढली, मानवाकडे संपत्ती वाढली, काहीजण प्रबळ झाली, यातून प्रत्येकाला वाटायला लागलं की अजून माझी संपत्ती वाढायला पाहिजे या मनोवृत्तीतून वसाहतवादा सारख्या व्यवस्थेचा उदय झाला आणि या वसाहतवादाचा एकच उद्देश किंवा कारण आहे,

की सगळ्या जगाची संपत्ती आपल्याकडे असली पाहिजे. आपण त्यावर राहून राज्य केले पाहिजे, आणि आपले देश किंवा संघ आहेत त्यांनी जगावर राज्य केले पाहिजे ही वसाहतवादाची मूळची संकल्पना आहे. इतरांना सातत्याने खाली ठेवणे आणि आपण सतत वर चढत राहणे, ही त्यांची एक नीती किंवा धोरण/ मनोवृत्ती होते. औद्योगिक क्रांतीतून विकासाचा एक टप्पा त्यातून दिसून येतो. दुसरा टप्पा असा निदर्शनास आला की हे 'जे बदल झालेले आहेत, ते मानवीय दृष्टिकोनातून ते पूरक आहेत का? सोबतच औद्योगिक क्रांतीतून झालेले परिणाम मानवी जीवनावर काय परिणाम करतात? तर बरेच वेळा असे झाले की शेतीत काम करणारे लोक, उद्योगात, कारखान्यात काम करण्यासाठी स्थलांतर करू लागली, त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर, जगण्यावर झाला, त्यांच्या समुदायावर व समाजावर देखील त्याचा परिणाम झाला असे निदर्शनास येते. बरेच लोक चांगल्या कामासाठी अधिक पैसे मिळावेत, म्हणून कारखान्यात काम करणे, स्थलांतर करणे पसंत करू लागले. स्थलांतरामुळे तेथील नवीन व्यवस्था निर्माण झाली, त्यांच्या कुटुंबावर, त्यांच्या जगण्यावर त्याचा परिणाम होऊ लागला आणि ह्या बदलाबरोबर नवीन व्यवस्था देखील अस्तित्वात येऊ लागली.औद्योगिक क्रांतीतून उत्पादनात वाढ झाली. ज्यात मानवी श्रमापेक्षा, यांत्रिक शक्तीला अधिक महत्त्व प्राप्त झाले. या यांत्रिक प्रगतीतून असे वाटले होते, की जास्त उत्पन्न व संपत्ती निर्माण करणार आणि सर्वांना समान वाटप करणार व सर्वांचे हित साधणार ज्यामुळे यातून मानवी मूल्यांची अवहेलना होणार नाही. परंतु तसे झाले नाही, वसाहतवाद (Colonization) व्यवस्थेत/ग्यालिलिओ काळात लोकांच्या संपत्तीची लूट करणे, गरीब देशांवरआपली संस्कृती लादणे व गरिब लोकांवर अन्याय करणा-या बाबी खूप मोठ्या प्रमाणात झाल्या, आणि म्हणून ही एक बहूवसाहतवाद आणि त्यानंतर स्वातंत्र्याच्या चळवळी निर्माण झाल्या. तर काही देश यातून स्वतंत्रही झाले. आणि म्हणून स्वातंत्र्याच्या पुर्वीच समाजशास्त्र आणि स्वातंत्र्यानंतरच समाजशास्त्र ह्या बाबी पण लक्षात घेणे गरजेचे आहे. हा समाजातील बदल होत असताना तत्कालीन जे समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्ट यांनी विचार केला, की समाज बदलत आहे म्हणजे काय बदल आहे? त्यांनी या बदलाची चिकित्सा व स्पष्टीकरण देतांना 'तीन अवस्थांचा सिद्धांत' मांडला. १) धार्मिक अवस्था २) अध्यात्मिक अवस्था आणि ३) वैज्ञानिक अवस्था, त्यांच्या मते माणूस हा सुरुवातीला abstract/fiction काल्पनिक होता, जेव्हा तो विज्ञानाचा अवलंब करू लागला, नंतरच्या काळात त्यांनी 'पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' ही संकल्पना सांगितली. त्यामध्ये माणूस हा प्रयोगशील व निरीक्षणाच्या तत्त्वावर विसंबलेली होती. आणि त्याला आपण positive methodology असे म्हणतो. हे असे विचार आल्यानंतर ज्या वेळेस प्रत्यक्षवाद आला, वैज्ञानिक पद्धती होती त्यांना वाटले की निसर्ग जसा नियंत्रित होतो तसं मानवी जीवन देखील नियंत्रित होऊ शकतो आणि आपण त्याचा अभ्यास करू शकतो. मग ही बाब त्यांनी मांडली. पण कार्ल मार्क्स सारख्या विचारवंतांनी या सगळ्या प्रक्रियेकडे वेगळ्या पद्धतीने बघितलं, त्यांनी सांगितले की उत्पादन प्रणाली ही सतत dialectical modeda असते, त्यामध्ये दोन पद्धती असतात, एक मालक असतो तर दुसरा काम करणारा कामगार असतो म्हणजे आहे रे आणि नाही रे (haves and haves not) असे दोन वर्ग असतात.

कार्ल मार्क्स म्हणतो, ज्याच्याकडे संपत्ती आहे, ही संपत्ती नवीन पद्धतीने परत गुंतवणूक करून, नवीन संपत्ती घेऊन ज्यांच्याकडे नाही त्याला सतत कंगाल ठेवतो. आणि मग हे जे दारिद्र्य आहे, वा दारिद्र्याचे दुष्टचक्र आहे या प्रबोधनाचा त्यांना म्हणजे 'नाही रे' गटाला काहीच फायदा होत नाही. आधी जमीनदार प्रबळ होते, लोकशाहीमध्ये लोकशाहीतील मंत्री प्रबळ आहेत, काय फरक पडला, गाव आहे तसेच आहे, गोरगरीब आहेत तसेच आहेत, 'जो पर्यंत सामान्य लोक हे प्रश्न विचारत नाही, की लोकशाही ही फक्त श्रीमंतांचीच व्यवस्था आहे का?' तोपर्यंत ही विषम असलेली व्यवस्था नाहीसी होणार नाही. मुळात आजही जिथून लोकशाही आल्या खरे तर वाद हे खूप तात्विक स्वरूपाचे होत असतात, परंतु भारतीय समाजात बहुतांश गोष्टी वैयक्तिक किंवा सापेक्ष आढळतात.व्यक्तीचे सामाजिक संदर्भ लक्षात घेतले जातात, त्यामुळे यातून काही ठोस (concrete) असे काही पुढे येत नाही, आणि मग कोणीतरी आपला मालक आहे आणि आपण त्याचे नोकर आहोत, वर बसलेला माणूस म्हणजे आपला बॉस आणि आपण त्याची नोकर आहोत ही भावना प्रबळ व्हायला लागते. आणि अशी स्थिती आपल्याकडे अधिक पाहायला मिळते. मार्क्सचा जो वर्ग संघर्षाचा सिद्धांत आहे तो त्या काळात जगाला बदलणारा होता. देशपरत्वे वर्ग वेगवेगळा आहे, मार्क्सने जो वर्ग संघर्ष dialectical materialism मांडला. परत मग . परात्मवादाची संकल्पना मांडली, या संकल्पनावर आजही लोक अध्ययन करतात. लोकांना वाटतं जरी उत्पादनाने संपत्ती वाढली, तरी आपण त्या व्यवस्थेचा भाग आहोत का नाही? आणि हे जे लाभ किंवा फायदे आपल्याला मिळतात का? असे विचारले तर मोठा घटक (Section) म्हणतो, की आम्ही सीमेवरच आहोत, वंचित आहोत. आम्हालाही लाभ मिळत नाही.मार्क्सने हेच सांगितले की 'भांडवलशाही ही नवीन रुपात येईल, परंतु लाभ घेणारे हे तेच आहेरे आणि दुर्लक्षित असणारे नाही रे असतील.लाभ घेणारे हे नवनवीन पद्धतीने लाभ घेत जातील, उलट ते लाभ वाढत जातील म्हणजे उत्पादन प्रणाली मध्ये 'जे आहे रे आणि नाही रे हे दोन घटक आहेत, त्याची तीव्रताही वाढत जाईल आणि त्यावर उपाय/उतारा म्हणून आपण काहीतरी बघायला पाहिजे असे मार्क्सने सांगितले.वेबरने सांगितलेली औद्योगीकरणाला लागणारी नवीन व्यवस्था रशिया नोकरशाही सुपरिचित आहे. त्याच प्रमाणे जॉर्ज सिमेल सारखा विचारवंत या प्रत्यक्षवादास थोडं बाजूला करून जे कॉम्टने नैसर्गिक विचार मांडले होते, त्या नैसर्गिकतेवरच प्रश्न केला आहे, ते म्हणाले की 'प्रत्यक्षवाद, तत्वज्ञान ही पद्धत खरंच विज्ञानाकडे घेऊन जाते का? Humanest आहे का? या गोष्टीवर त्यांनी एक दुसरा interpretthought दिला त्यानंतर Weberian thought आला. आणि पुढे वेबरच्या विचारांची परंपरा आपल्याला पाहायला मिळते.

मार्क्सच्या विचारांची परंपरा - Frankfrut School critical theoryho आपल्याला जागतिक संदर्भात पाहायला मिळतात. कॉम्टच्या विचारांना Positive School आहे त्यामध्ये विशेषत: आपल्याला हे स्पेन्सर, दुर्खीम यांचे विचार आपल्याला पाहायला मिळतात. हे सर्व होत असताना, ह्या सर्व बाबी महत्त्वाच्या असताना आपण हे सर्व विसरून वा बाजूला सारून काही दुसरं लगेच इथे शिकू शकतो का? याचा शोध घेतला तर 'होय' असे उत्तर मिळते. जागतिक पातळीवर सुद्धा जे मुद्दे (Issues) आहेत ते आपण पाहतो, जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था, वंशभेद, (सामाजिक विषमता) हा जाचक होता/आहे. त्याच्यातून काही नवीन व्यवस्था, भेदावर आधारित व्यवस्था निर्माण झाली आणि अशा व्यवस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर होत्या. त्याच बरोबर काळे-गोरे भेद आणि त्यातून जी नवीन व्यवस्था आली ती म्हणजे लिंगभाव- स्त्रीवादी व्यवस्था आली. स्त्रीवादाच्या ज्या चळवळी आहेत, त्याची सुरुवात ही आपल्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेली दिसते आणि त्याचा परिणाम आपल्याकडे आलेला प्रभाव (Impact) आहे.काही वेळेलाअनुकरण (Imitate) करता आपल्या सोयीने वापरायचे बघतो, पण आपल्या व्यवस्थेतून आलेली चळवळ जोपर्यंत उभी करत नाही, तोपर्यंत त्याचा अधिक प्रभाव आपल्याला दिसणार नाही, आणि म्हणून जागतिक पातळीवरील समाजशास्त्राची स्थिती ही आता classical contemporary आणि आधुनिक विचार modern thought संबंधित आहे. आधुनिक सामाजिक विचारांमध्ये अंथनी गिडेंस, मिशेल फुको, डेरीडा आहेत. जे विचारवंत आंतरविद्याशाखीय ज्ञानशाखीय अध्ययनावर भर देतात. त्याचा प्रभाव आपल्या अध्ययनावर आढळतो.सांगायचे एवढेच की ही जी सुरुवात आहे, ती जागतिक पातळीवर कुठल्या एका विश्वातून किंवा देशातून अथवा भागातून निर्माण झाली, त्यास जी पार्श्वभूमी आहे, ती पार्श्वभूमी आपण लक्षात घेणे गरजेचे आहे.

आपण ज्यावेळेस भारतीय समाजशास्त्राकडे वळतो, भारतात १९१९ ला जरी औपचारिकरित्या समाजशास्त्र विभागाची स्थापना झाली, तरी त्यापूर्वी सामाजिक विचार देशात नव्हता असे नाही, यापूर्वीसुद्धा जाती अंताचा/निर्मूलनाचा लढा चळवळ देशात होती. जातीअंताचा यापूर्वीचा संदर्भ जर पाहिला आणि डॉ. बाबासाहेबांचा संदर्भ आपण लक्षात घेतला तर या देशात बराच काळ जो संघर्ष सुरू आहे, तो संघर्ष, विचार प्रणाली आणि विचारसरणीचा आहे. म्हणून ते म्हणतात की, Buddhism आणि Brahmanism म्हणजे तथागत गौतम बुद्धाच्या काळापासून एका व्यवस्थेशी लढा देणारी दुसरी व्यवस्था या देशात आहे आणि होती. हे पण आपण त्यांचा संदर्भ लक्षात घेऊन म्हणू शकतो, म्हणजेच १९१९ लाच औपचारिक सुरुवात झाली तरी इथे संघर्ष नव्हता किंवा पूरक सामाजिक व्यवस्था होती असे मात्र नाही. आणि म्हणून हा जरी औपचारिक विभाग सुरू झाला असला तरी या काळातच वेगवेगळे विचारवंत, वेगवेगळ्या ठिकाणी भारतीय समाजाच्या व्यवस्थेविषयी लिहिणारे देखील होते. त्यांच्यामध्ये प्रामुख्याने १९०९ ला एस. व्ही. केतकर यांनी "history of caste in India' हा ग्रंथ लिहिलेला होता. १९१६ ला डॉ. बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठामध्ये "Caste in India: Their mechanism, Genesis and development हा पेपर लिहिला होता. म्हणून आधीचे योगदान आपल्याला विसरता येणार नाही. ते समाजशास्त्रीय विचाराचाच भाग आहे, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे.

यानंतर ज्या वेळेस १९१९ ला समाजशास्त्र विभागाची स्थापना झाली. डॉ. घुर्येविभागाचे दुसरे प्रमुख होते. पहिल्या विभाग प्रमुखांनी भारतीय समाजाचा पाया बसवला. त्यांच्या बाबतीत बोलायचे म्हटले, तर ते U.K. मध्ये असणारे जीवशास्त्रज्ञ होते. कॉम्टच्या विचाराचा गिडसच्या विचारावर प्रभाव होता. ते एक भूगोलतज्ञ होते, मानववंशशास्त्रज्ञ, सेवा करणारे ते एक दानधर्म करणारे होते, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ते एक नगर नियोजकदुेप झश्ररपपशी होते आणि समाजशास्त्रज्ञ देखील होते. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राचा पदभार त्यांनी घेतला आणि ते विभाग प्रमुख होते, त्याच्या पूर्वी भारतातील बऱ्याच शहराचा त्यांनी अभ्यास केला होता. त्यांनी केलेले अध्ययन आणि स्वतःच्या संशोधनाच्या आधारावर त्यांनी संकल्पना, सिद्धांत मांडण्याचा/देण्याचा प्रयत्न केला हे त्यांचे शैक्षणिक योगदान होय. शैक्षणिक दृष्ट्या (cademic) त्यांचे योगदान पाहताना असे आढळते की, त्यांनी concept of region, प्रदेश ही संकल्पना, त्याकाळापासून कोणत्याही वास्तुकला (rchitecture) आणि नगराच्या नियोजनामध्ये दखल घेतली जाते. त्याच्यानंतर गिडस यांनी १९१५ लिहिलेला ग्रंथ cities and evolution त्यामध्ये त्यांनी Conservative /conversation invention, collaborationhm एक असा भाग आहे. metro polities संबंधित आहे. मोठे शहर व सोबत असताना तेथील लोकसंख्या, लोकसंख्या वाढ, होणारी गर्दी आणि त्यातून येणारं औद्योगिकीकरण, नागरीकरण या गोष्टीचा एकत्रीकरण जे होतं त्याला त्यांनी conversionhr संकल्पना वापरली आहे. नागरी समाजशास्त्राच्या संदर्भात ती सुंदर संकल्पना वापरल्याचे आढळते. त्यानंतर त्यांनी शहरामध्ये वाहतूक कशा पद्धतीने असायला पाहिजे, कशा पद्धतीची असावी, केंद्रीकृत झालेली लोकसंख्या कशा पद्धतीने वसवली जावी, माणसाचा प्रगतीचा आलेख कसा वाढला पाहिजे. हे त्यांनी त्यावेळेस मांडले आहे.

आपण जे म्हणतो की National capital region असेल, town planning act of Maharashtra, नगर नियोजनामध्ये ह्या त्यांच्या सूचना मोठ्या प्रमाणात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. म्हणून विशेष नागरी विकासाच्या प्रकल्पांमध्ये पेट्रिक गिडस यांनी सुचवलेल्या त्याकाळातील सूचना मोठ्या प्रमाणात समाविष्ट करण्यात आल्या हे त्यांचे योगदान खूप मोठी आहे. त्याच वेळी त्यांनी सांगितले की शहर ही एकटी किंवा अलिप्त जगू शकत नाही, म्हणून शहराचा संबंध हा ग्रामीण भागाशी इथल्या संस्कृतीशी भौगोलिकतेशी व समाजजीवनाशी, आर्थिक जीवनाशी हा येतच असतो. आणि म्हणून शहर ही वेगळी वा स्वयं थोडीशी असू शकतात पण पूर्णतः वेगळी नसतात हा संबंध त्यांनी अधोरेखित केला. सोबतच ते जीवशास्त्राचे असल्यामुळे त्यांनी मुल्यांकन (Valuation) चा अभ्यास केला आहे. त्यांनी 'कुटुंब' हा घटक महत्त्वपूर्ण असल्याचे मानून मूलभूत (Basic) मांडला आहे आणि ते सांगतात, की कुटुंबातूनच बाकीच्या सर्व गोष्टींची निर्मिती होते. आजही पाहिले तर या विचाराचे समाजशास्त्रीय सैद्धांतिककरण्यामध्ये

याचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो, मग कुणी म्हणते कि याचा family, cultural reproduction म्हणजे 'कुटुंब' हेच महत्त्वाचं असतं, म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये कुटुंबाची भूमिकामहत्वपूर्ण आहे, हे व्यावसायिक उभारणीमध्ये भूमिका आहे. या गोष्टी आज आपण बोलतो हे त्यांनी त्यावेळेसच सांगितले होते. समाजातील कुटुंब हा मूलभूत घटक होय. ज्यातून इतर गोष्टींची सुरुवात होते आणि म्हणून हे सर्व नागरी नियोजन करत असतांना सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण होण्याची शाश्वती ही तिथे दिली पाहिजे आणि शहर नियोजन हे त्याच्याशी संबंधित मूल्यांनी निर्माण केले आहे असा विचार विशेषतः गिडस यांनी त्यांच्या लिखाणातून मांडलेला आहे. त्याचबरोबर त्यांनी असेही सांगितले आहे, 'जोपर्यंत नैतिक विकास होत नाही, तोपर्यंत विशेषत: जर पाहिले तर...शहरे सुंदर सुदृढ व्हावी, शहरात मुलांसाठी गार्डन असायला पाहिजे, या बाबी त्यांनी १९१५ मध्ये cities in evolution याग्रंथात मांडल्या. त्याचा परिणाम आजही शहर नियोजनाच्या प्रक्रियेवर आढळतो. म्हणून social ecology ही संज्ञा पाहतो. परिस्थितीकीशास्त्राच्या जनक असलेल्या विचारवंताशी समतुल्य असे विचार त्यांनी मांडले आहेत.

Man's interaction with environment, आपण पर्यावरणाला बाजूला सारून जगू शकत नाही मानवाच्या जगण्याच्या मूलभूत गोष्टी निसर्गातून येतात आणि म्हणून निसर्गाला बाजूला सारून प्रादेशिक नियोजन करता येणार नाही म्हणूनच त्यांनी सर्व पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर केला होता. Survey पद्धतीमध्ये एकंदरीतच काय सुरू आहे, आणि पहिल्या टप्प्यातील निदान वरवरचे विचार जाणून घेता येतात सोबतच तेथे लोकांच्या गरजा, दृष्टीकोन (view point) लक्षात येतात. सर्व्हेम्हणजे सर्व भौगोलिक क्षेत्र, संपत्ती व परिस्थितीचा Survey अभ्यास करण्याची नवीन पद्धती हि पॅट्रिक यांनी दिलेली आहे.त्यांच्या मते प्रत्येक शहर हे इतर शहरांवर अवलंबुन असते. आणि ती आंतरसंबंधी (Interconnect) असतात आणि सर्व शहरे मिळूनच समाज हा गतिशील होऊ शकतो.

१९१९ च्या काळात colonial युग जेव्हा वसाहतवादाच्या होतं त्यांनी इमारती, बांधकाम करण्यासाठी जी व्यवस्था निर्माण केली, त्यास गिडस यांनी विरोध केला आणि सांगितले की, ज्या पद्धतीने बांधकाम करणे गरजेचे नाही. ते करू नये. येथिल लोकांची गरज लक्षात घेऊन त्या आधारावर करायला पाहिजे, त्याकाळात बॉम्बे टाऊन प्लॅन ॲक्ट १९१५ आला. (Bombay town planning act 1915) या अधिनियमामध्ये घुर्येयांनी भरपूर सूचना केल्या होत्या, आणि या कायद्यामध्ये मुंबई नियोजनात या सूचना समाविष्ट केल्या त्या पुढीलप्रमाणे १) शहरात वरवरचे सौंदर्यीकरण करू नका, पण मानवाच्या मूलभूत गरजा आहेत त्या तिथे संवर्धित झाल्या पाहिजे. २) पर्यावरण संरक्षण लक्षात घेऊन जमीन व इमारत बांधकाम याचा दुवा साधावा आणि म्हणून ३) शहर व्हायचं असेल तर शहराला एक नियोजन हवं, तिथं पाणी व्यवस्थापन हवं, व्यापार विकसित व्हावा, त्याचबरोबर धार्मिक जागा व इमारती या त्या संस्कृतीतून आलेल्या आहेत, त्याचं रिझर्वेशन reservation केलं पाहिजे. शहर हे नागरी गरजा पूर्ण करणार विकसित केंद्र झालं पाहिजे. केवळ भौतिक गरजांची परिपूर्ती होऊन चालत नाही तर आनंद संवर्धित केला पाहिजे. नगर स्वास्थ्य जपलं पाहिजे, निवास व्यवस्था सुस्थितीत असलेली पाहिजे, शहराविषयी लोकांना आत्मीयता वाटली पाहिजे, आणि या सर्व गोष्टीचा प्रभाव असा होतो की विषमता प्रचंड होती, एकीकडे गगनभेदी इमारती तर दुसरीकडे भुईसपाट झोपडी अशी कमालीची विषमता लक्षात घेता अशा सूचना १९१५ च्या अधिनियम झोपडपट्टी पुनर्वसन कसं करावं, लोकांचे प्रश्न कसे सोडवावे, आरोग्य सुदृढता आणि पर्यावरण संतुलन कसे राखावे, एकंदरीत शहराचे सौंदर्य कसं राहता येईल आणि Vibrante City कशी करता येईल या गोष्टी त्यावेळी त्यांनी requirement recommend सांगितलेल्या होत्या. आणि आज जर पाहिले तर Maharashtra regional planning act १९६६ आला, त्यात त्यांच्या सूचनांचा खूप बारकाईने समावेश केलेला आढळतो, आणि म्हणून शहराचं समाजशास्त्र विकसित होण्यासाठी आणि त्याच्यावर मांडणी करण्यासाठी पेट्रिक गिडसचे काम आहे. त्यास आपण मुलभूत काम म्हणून ओळखतो.

शहरांमध्ये पर्यावरण रक्षण करणे या बाबी आजही चिरंतन शाश्वत विकासाच्या माध्यमातूनही वृक्षारोपण व संवर्धन, उद्यान याचा आग्रह धरतो. ते उद्यान सर्वसामान्यांसाठी उघडे पाहिजे, सामाजिक न्यायाच्या भावनेतून नागरीकरण कसे व्हावे, याचा अट्टाहास त्यांनी धरला, या संदर्भातील पॅट्रिक गिद्देंस चे विचार मांडायला पाहिजेत, आणि ती समाजशास्त्राची सुरुवात ही न्यायाच्या भावनेनं, सर्वसमावेशकतेच्या,एका सामाजिक भावनेने झालेली आहे हे सांगायला चांगलं वाटते ही एक बाजू महत्वपूर्ण आहे. प्रत्येक ब्रिटिश आलेला वसाहतवादाचा एक एजंट होता, त्यांनी काही गोष्टी समाजहित पूरक, जाचक व्यवस्थेला तडा देणाऱ्या केल्या. पेट्रिक यांनी येथील लोकांच्या कल्याणासाठी एक अकॅडमिक भूमिका म्हणून त्यांनी इथे काम केलेले आहे. म्हणून आपण त्याचं नाव, त्यांनी दिलेलं योगदान लक्षात घेणे गरजेचे आहे. अशा व्यक्तीचं मुलभूत/ प्रमुख काम सर्वांनी वाचायला पाहिजे. पहिले विभाग प्रमुख याचा थोडक्यात परिचय मांडला.

आता घुर्येहे दुसरे विभाग प्रमुख, युरोप मध्ये तयार (ट्रेन्ड) झाले होते, पण याचे जे काम आहे, ते Legacy काम आहे. त्यांना आपण समाजशास्त्राचे जनक म्हणतो. जनक होण्यासाठी देखील काही निकष असतात. याबद्दल सांगताना असे स्पष्ट होते, की घुर्येयांचे जे काम आहे, ते वैयक्तिक तर काम त्यांनी केलेले आहे. परंतु विषयासाठी त्यांनी समाजशास्त्र हे एक संस्था देखील केलेली आहे आणि ते आजतागायत जिवंत आहे. म्हणून त्यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक असे म्हटले जाते.त्यांच्या शैक्षणी कार्यातून, योगदानातून 'जनक' ही मान्यता मिळाली आहे. डॉ. घुर्ये साधारणत: १९२४ ते १९५९ या ३४ वर्षापर्यंत समाजशास्त्र विभाग प्रमुख होते. हा एक प्रदीर्घ काळ होय. त्यांनी या काळात समाजशास्त्राच्या विकासासाठी काम केलेले आहे, त्यामध्ये जवळजवळ ५५ विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली आचार्य पदवी पूर्ण केली असे संशोधन मार्गदर्शनाचे अदम्यकाम त्यांनी केले आहे.

एम. एन. श्रीनिवास यांनी त्यांच्यावर टीका केली. एम एन श्रीनिवास, ए आर देसाई, इरावती कर्वे, वाय. बी, दामले, एन. राव अशा विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी समाजशास्त्र हे देशभर पसरवले.त्यांचे अकॅडमिक कार्य पाहिले तर caste and race in India भारतीय जाती व्यवस्थेचा अभ्यास त्यांनी केला. घुर्ये याच्या मते युरोपमध्ये जसा वंशभेद आहे, तसाच भारतात देखील जातीभेद आहे, त्यांनी जातिव्यवस्थेची प्रमुख सहा वैशिष्ट्ये सांगितली यांनी लिहिले. त्यांनी आदिवासींबद्दल केलेल्या (Backward hindu) संबोधनावर आजही मत-मतांतरे आहेत. त्यांच्या ह्या म्हणण्यास कांही ना कांही तत्कालीन संदर्भ वा पार्श्वभूमी असेल असे वाटते. डॉ. घुर्ये यांनी sociology of religion urban area वर काम केलेले आहे. १९५१ ला भारतीय समाजशास्त्र परिषदेची स्थापना त्यांनी केली आहे. आज त्याचा मोठा विस्तार झालेला आढळतो. Professional लेवू म्हणून ही त्याची एक lagecy आहे.त्यांनी Sociological bulletin १९५२ला सुरू केले, आज ते जगातलं एक प्रतिष्ठित (Reputed) जर्नल आहे, आणि म्हणून प्रदीर्घ अनुभव, संशोधन, संशोधन मार्गदर्शन, मोठी ग्रंथ संपदा (साधारण पस्तीस ग्रंथ), भारतीय समाजशास्त्र परिषद देशात संस्था आणि जर्नल चालवणे व समाजशास्त्राचा विकास, प्रसार करणे या कारणांमुळे त्यांना समाजशास्त्राचे जनक संबोधले जाते असे वाटते.

एमिरटस प्रोफेसर ही दुर्मिळ असलेली पदवी त्यांनासमाजशास्त्र विषयातील योगदानामुळे मिळाली होती. ज्यांनी संबंधित विषयात अव्दितीय, अतुलनीय काम केले वा योगदान दिले, त्यांना ही पदवी दिली जाते. समाजशास्त्र विषयास व्यावसायिकता आणण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याचा विशेष भर आप्तसंबंध, विवाह, नागरीकरण, जातीव्यवस्था यावर होता. त्यांनी siatic culture, आदिवासी समुदाय आदींबाबत विचार मांडले आहेत. त्यांचे महत्वपूर्ण योगदान आणि प्राप्ती होती.

ए. आर. मोमीन यांनी त्यांच्या लेखात latest see of G. S. Ghurye यामध्ये त्यांनी लिहिले की, fruitful sentences of ideological, sociological and anthropological perspectives. आज जे आपण आंतरविद्याशाखीय विचार पद्धतीचा संबंध जोडले पाहिजे असे म्हणतो. ते विचार अंतरविद्याशाखेचा पुरस्कार व अंगीकार डॉ. घुर्ये यांनी केला होता. आज यू.जी.सी.च्या निर्देशानुसार, सूचनेनुसार आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन समाजशास्त्रात संबंधित क्षेत्र व विषयाच्या अध्ययनात वापर / अवलंब करणे गरजेचे आहे. त्यांनी भारतीय समाजशास्त्र परिषदेची स्थापना, समाजशास्त्राच्या परिषदेने समाजशास्त्रीय अभ्यासकांना प्रोत्साहन दिले. आज पावेतो देशभरातील विविध शहरात, जवळपास ठिकाणी ४७ परिषदा झालेल्या आहेत. ISS ला राष्ट्रीय पातळीवर संस्था म्हणून आपण त्याचे याबाबतीत Professionalization of Sociology, mainstream of discipline त्याचे योगदान लक्षात घेणे गरजेचे आहे.

घुर्ये हे हिंदू राष्ट्रीय Nationalist होते, भारतीय संस्कृतीचा अभ्यास मोठ्या प्रमाणात होता. त्यांचे काम त्यांच्या ग्रंथातून अगदी स्पष्ट होते. की हिंदूच integration assimilation and Hindus हा उजव्या विचारसरणीकडे झालेली आहे का? अशी टीका आढळते. त्यांनी आदिवासींना 'मागासलेले हिंदू' म्हटले, परंतु स्वतंत्र असलेल्या आदिवासी जमात आहेत, असा विरोधाभास आढळतो.

Kancha Ilaiah Shepherd यांच्या Why I am not Hindu हा ग्रंथ येतो. हिंदू म्हणजे कोण आहेत? काय तुमच्या प्रथा आम्ही पाळतो का?.....याचे मूल्यांकन/चिकित्सा घरपलहर यांनी केले आहे. काहींच्या मते घुर्य हे exclusion आणि वर्जित/वगळणारे होते, अशी त्यांच्यावर टीका झालेली आहे. काहींच्या मते घुर्येची विचारसरणी ही brahminical model of Indian society मधून आलेली आहे अशीही टीका होते. ते सतत assimilation and homonization सजातीयकरणावर बऱ्याच समाजशास्त्रज्ञांनी टीका केलेली आहे. सजातीयकरण्याच्या प्रकल्पाबाबत टी. के उमेन यांचे मोठे योगदान आहे.

Critic of opposite of hominization सजातीयकरण, हिंदू संस्कृती टिकली पाहिजे. संवर्धित झाली पाहिजे, असा विचार, जोपासना या बाबींना टीकात्मक दृष्टीने पाहिले आहे.त्यांनी कधीच आपल्या लिखाणात तथागत गौतम बुद्धाची विचारसरणी, जैनांची विचारसरणी, मुस्लिम धर्माचे तत्त्वज्ञानाचा विचार किंवा योगदान व आदिवासींच्या कलाजीवन संस्कृतीला फार काही महत्त्व दिले नाही. तसेच भारताच्या निर्मितीमध्ये हिंदू आणि हिंदू धर्माची विचार प्रणाली हे त्यांनी आग्रहाने मांडण्याचा प्रयत्न केल्याची टीका त्यांच्यावर केली जाते. आणि म्हणून त्याच्या विचारसरणीवर मोठी टीका झालेली आढळते. Hindu nationalism चा विचार त्यांनी पुढे नेला अशी टीका आहे. विशेषता विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या त्यांच्या विचारावर प्रभाव होता. म्हणजे डॉ. घुर्ये यांचे समाजशास्त्रीय योगदान मोठे असले तरी नंतरच्या काळातील समाजशास्त्रज्ञांनी एका एका शब्दावर, एका एका विचारावर टीका, चिकित्सा केलेली आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. तर ही टीका करताना काय संदर्भ मांडलेले आहेत, तर कुठलाही देश जेव्हा प्रगतीकडे जातो, तिथे (pluralism) सभ्यता, विविध संस्कृती एकत्र होऊ शकतात. दुसऱ्यांचं वेगळेपण स्वीकारून व मान्य करून राहणारा समूह ज्याला बहुसांस्कृतिक समूह हा त्यांनी त्यांच्यामध्ये विसावलेला नाही, किंवा ते तो विसरलेला आहेत. जे आधुनिक समाजाचे वैशिष्ट्य आहे, बहुसंस्कृतिवाद (multiculturalism) आज जगामध्ये तो मानला जातो, परंतु त्यांनी ते मान्य केले नाही, असीही टिका त्यांच्यावर केली जाते.

मुंबई समाजशास्त्र विभागाबद्दल : (Bombay School)

आज पर्यंत इथे (मुंबई विद्यापीठ समाजशास्त्र विभाग) कार्यरत समाजशास्त्राच्या व्यक्तीने (प्रत्येक प्रमुखाने) समाजशास्त्राला वेगळ्या पद्धतीने दिशा देण्याचं काम सातत्याने केलेलं आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून अनेकांनी योगदान दिलेले आहे. के. एम. कपाडिया यांनी मानवशास्त्र,

मानसशास्त्र आणि समाजशास्त्राच्या संदर्भात आपले योगदान दिले. तर ए. आर. देसाई हे देखील विभाग प्रमुख होते, त्यांनी मार्क्सवाद दृष्टिकोनाचा समर्थन करून त्यावर काम केले. Social background of Indian nationalism यासारखं महत्त्वाचे योगदान नोंद घेण्याजोग दिलेला आहे. जे. व्ही. फरेरा यांचं integrated anthropology मानवशास्त्राच्या क्षेत्रामध्ये अद्वितीय काम आहे. जे देशावर आणि जागतिक पातळीवर मान्य केलेले आहे. फरेरा नंतर विरेंद्र नारायण यांनी विशेषता Centre periphery आधारित विकासाच्या मुद्द्यावर काम केलेलं आहे. ए. आर. मोमीन यांनी विशेषत : minorities studies Indian society यावर काम केलेलं आहे. घुर्ये यांनी फार चांगल्या पद्धतीने काम केल्याची मांडले आहे.

शरीत भौमिक हे Sociology of informal sector यासंदर्भात एक मोठ व्यक्तिमत्त्व उभं झालेलं दिसून येतं. पी. जी जोगदंड आणि रमेश कांबळे यांचे योगदान Bombay school यासंदर्भात त्यांनी टीकात्मक लिहिलेला आहे. Cognitive block out ही संकल्पना त्यांनी या संदर्भात Bombay school संदर्भात मांडलेली आहे. त्यांनी सांगितले आहे की 'समाजशास्त्राला शंभर वर्षेजरी पूर्ण होत असली, तरी इथे वंचित घटकातील व्यक्तीला (दलित व्यक्तीला) संधी मिळायला १९८६ हे साल उजडलं, एवढ्या दिवसाचं विद्यापीठ असून आणि इथे पहिले विभाग प्रमुख मागासवर्गीय जे होते ते जोगदंड यांनी २००२ मध्ये ते विभाग प्रमुख झाले व त्यांनी एका परिसंवादामध्ये सांगितले की इथे डॉ. बाबासाहेबांची चळवळ झाली, दलित या शब्दावर इथे कोणीही काम केलेलं नाही. Cognitive स्वरूपाचा विचार इथे आढळतो आणि जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जाते हा विचार मनात येतो. म्हणजे तेथील Hierarchy बद्दल ते बोलले.

इंद्रा बसिन मुन्सी यांनी 'आदिवासी महिला आणि पॅट्रीक गीडेंस यांच्या विचारावर काम केलेलं आहे. Family, marriage, kinship यावर भर देत त्यांनी काम केलेलं आहे. शेवटी देवी भोसले Common Sector and OBC चे राजकारण या विषयावर त्यांनी काम केलेलं आहे. अशा पद्धतीने बॉम्बे स्कूल बद्दल डॉ. केंद्रे यांनी माहिती दिली.केवळ बॉम्बे स्कूल मध्येच समाजशास्त्र आहे असे नाही, तर त्या काळात पण लखनऊ स्कूल ऑफ सोसिओलॉजी मध्ये अधिक कार्य होते, आज स्वातंत्र्यानंतर आणि स्वातंत्र्यपूर्वी पाहिले तर स्वातंत्र्यानंतर खूप मोठ्या प्रमाणात विद्यापीठांची निर्मिती झाली आहे. ज्यामध्ये JNU 1966 Delhi University, 1922 Pune University, 1949 Dr. Babasaheb mbedkar Marathwada University, 1958 Shivaji University, 1965 Nagpur University, SGB-U 1983, SRTMU अशी अनेक नवीन विद्यापीठे आणि अनेक नवीन संस्था जसे आय. टी आहे, केंद्रीय विद्यापीठ हैदराबाद, आहे, अशा संस्थांमधून आता समाजशास्त्राकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन निर्माण होत आहे. विशेषता आय. टी. आणि केंद्रीय विद्यापीठात शिक्षणाच्या ज्या अद्यावत सुविधा आहेत, तसेच जे विचारांचे स्वातंत्र्य आहे, तिथे समाजशास्त्राची वाढ आणि विकास ही झपाट्याने व वेगळ्या पद्धतीने होत असल्याचे दिसून येते. सोबतच विद्यापीठ अनुदान आयोग या बाबतीत नियंत्रण देखील ठेवत आहे.

Marxist मार्क्सवादी विचार म्हटले तर ए. आर. देसाई Subaltern study (उठावात्मक सिद्धांत)असतील किंवा जाती आधारित विचार म्हटले, तर एस. व्ही. केतकरांनी 'हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया' डॉ. बाबासाहेबांचा लेख, आणि त्यानंतरचा जर प्रवास आपण पाहिला तर दीपंकर गुप्ता "district caste phenomenology of caste" या गोष्टी आलेल्या आहेत. जातीचे राजकारण आहे, ते आपल्याला माहिती आहे, जे विशेषता नवीन समाजशास्त्रज्ञ त्यांनी जाती (Caste) वर मोठ्या प्रमाणात नवीन विचार दिलेला आहे. ज्यामध्ये आंद्रे बेटिले (Andre Beteille)आहेत, ते caste,c lass and power वर लिहितात.

Changing pattern of classification of tandoor village या असे काही अभ्यास आहेत जे महत्त्वाचे आहेत, परंतु जातीच्या विचारसरणीच्या बाबतीत जर पाहिले तर पुणे विद्यापीठातील प्राध्यापक एस. एम. दहिवले यांचे जे Understanding Indian society non-brahminical perspectiveho एक मोठे योगदान आहे. भारतीय समाज समजून घेण्यासाठी टी. के. वुमन यांचं पण understanding Indian society from the below prospective हे आहे. हे नवनवीन साहित्य विचार आणि विचार प्रणाली, जातीव्यवस्था किंवा समुदायाबाबत येत आहे.हा राष्ट्रीय पातळीवरील मोठ्या प्रमाणातील विकास म्हणता येईल. लिंगभाव (gender)च्या संदर्भात जर पाहिले, तर स्त्रीवाद ही चळवळ मुळात आपल्याकडे युरोपियन देशातून आली, आपल्याकडे असं गृहीत धरलं की सगळ्या स्त्रिया समान आहेत आणि आम्ही स्त्रीवादी भूमिका घेऊन लढू आणि आमचे हक्क मिळवू. पण ते तसे झाले नाही. कारण बर्याच स्त्रियांमध्ये स्त्रिया असमान हे आपल्याला दिसायला लागलं आणि म्हणून युरोपमध्ये जसा 'काळा स्त्रीवाद' आला, तसा येथे दलित स्त्रीवाद आला आणि मुख्य प्रवाह (mainstream) येथील जो स्त्रीवाद होता, त्याचा आणि दलित व बहुजन विचार प्रवाह यांचे वेगवेगळे विचार निर्माण झालेले दिसतात. त्याच बरोबर आदिवासी सारखा नवीन घटक यामध्ये आला आणि वर्जीतता..... योगदान लक्षात घेण्यासारखं आहे.यासोबतच भारतीय समाजशास्त्राच्या तुलनेत वेगवेगळ्या संस्थात्मक वृद्धी झालेली आहे. जेवढे विचारवंत, अभ्यासकांची नावे घ्यावीत ती कमीच आहेत. 'जात' हा विषय भारताबाबत उत्तर वैदिक काळापासून ते आज पर्यंत आहे. ज्यावेळेस काहींच्या मते वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था आली पण वर्णव्यवस्था ही पूर्ण अर्जित म्हणजे स्व-संपादित दर्जावर आधारित होती. ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार त्याच्या वर्णातून त्यास वर्ण लागू होत असे, ज्ञान आणि अध्ययना बरोबर ब्राह्मण, लढाई व संरक्षण करणारे क्षत्रिय, व्यापार व शेती करणारे वैश्य आणि ज्यांना ज्ञान ग्रहण नको, वाचन व बुद्धीचं काम नको ते शूद्र वर्णात समाविष्ट होत असत, पण हा वर्ण/वर्णव्यवस्था खुली होती. म्हणजे जन्माने कोणी ब्राह्मण वा जन्माने कोणी शूद्र होत नव्हते पण हळूहळू ही व्यवस्था बंद झाली आणि सगळ्या गोष्टी जन्माने ठरायला लागल्या, बांधल्या जाऊ लागल्या आणि म्हणून हि व्यवस्था बंधिस्त झाली,

जातीव्यवस्था झाली म्हणून याचा परिणाम आजही आपण पाहतोय आणि आजही आपण त्याच्यावर संघर्ष करतोय, जन्माने जात ठरायला नको, आजही माणसाची जात जन्माने ठरते.

माणसाला आपली जात आपल्याबरोबर राहावी हे वाटते, म्हणजे एवढा विरोधाभास (contradiction) हे आज आपल्या विचारात राष्ट्रीय पातळीवर पण आहे. आणि म्हणून त्या वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटलं होतं की साधारणत: आपण आपल्या कोणत्याही गोष्टी व्यक्त करायला काही हरकत नाही. महात्मा फुलेंनी ब्रह्मनिकल विचारसरणी द्वारे जो हल्ला केला, तो त्या सगळ्या समाजाने केला होता असे नाही. समाज त्यावेळी शिक्षित नव्हता, ते शिकले आणि त्या समाज परिवर्तन केलं होतं. जाती विरोधी चळवळ म्हटलं की महात्मा फुलेचे नाव घेतल्याशिवाय आपल्याला सुरुवात करता येत नाही. माझी जात काय आहे आपण म्हणतो की भारतीयांचं सोडून द्या परकीय काय म्हणतात तर यांनी जाती विषयी बोललेला आहे त्याच्यानंतर हेर्बट रिस्ले यांनी देखील याबाबत विचार व्यक्त केलेले आहेत. एस. वि. केतकर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील यावर मोठ्या प्रमाणात मांडणी वा चिकित्सा केली आहे. इरावती कर्वेयांनी विचार सांगितले आहे. आपण शेवटी येतो कुठे तर 'जातीअंताचा लढयापर्यंत' या लढ्याला पण समाजशास्त्राने पर्याय दिलेत, ते घेण्याची आपली हिंमत आहे का? तर नाही घेऊ शकत. डॉ. बाबासाहेबांनी जातीला मोडून काढण्यासाठीचे मार्ग सांगितले आहेत की 'उपजाती संपवा, जात एकटी कधीच जगत नाही, या जातीला समजून घेणाऱ्या, मदत करणाऱ्या १, २ जातीची गरज आवश्यक आहे आणि म्हणून जात ही समूहाने असते आणि डॉ. बाबासाहेबांनी पहिल्यांदा म्हटले की 'उपजाती नष्ट करा, रोटी-बेटी व्यवहार करा, एकमेकांच्या कार्यक्रमाला जा'बाबासाहेबांनी म्हटले की हे तिनही मार्ग काही खरे नाही या आधारे पण जात जात नाही, नष्ट होत नाही. कारण त्याला धार्मिक आधार आहे.

लिंगभावाबाबत लीला दुबे, शर्मीला रेगे, पंडिता रमाबाई यांचे विचार व काम आहे. हे आपण लक्षात घ्यावं आणि हे विचार आपल्याला संशोधनामध्ये कुठेही जातीवर किंवा लिंगभावावर काम करीत असतांना आढळतात, ते लक्षात घ्यावे लागतात. हे सर्व बाबी साधक-बाधक घडत असताना यावर आपण काय भूमिका घ्यायला पाहिजे, किंवा काय करायला पाहिजे? तर एम. एन. श्रीनिवास यांनी जो नवीन ग्रंथ caste its 20th century Avatar मध्ये त्यांनी आठ ते दहा लेख लिहिले. जाती कशा बदलतात किंवा बदलायला लागल्यात यावर आधारित ते लेखन होते, की जात ही राजकारणामुळे, आर्थिक विकासामुळे किंवा जागतिकीकरणामुळे बदलत आहे आणि सगळ्या बाबी त्यांनी त्यामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक विचारवंताचे फार महत्वाचे आणि मोठे काम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण काम समजून घ्यायचे असेल तर साधारणत: एखादे वर्ष तरी अध्यापन-अध्ययन प्रक्रिया चालवावी लागते. इतका प्रगत आणि प्रगल्भ ज्ञान त्याचे होते.

डॉ. जी.एस. घुर्ये यांचे आज आपण समाजशास्त्राचे विचार, संकल्पना व सिद्धांत मांडणी व समाज उभारणीस दिलेले योगदान याबाबत चर्चा करीत आहोत, सोबतच आपल्याला पुढे कोणत्या क्षेत्रात व कोणत्या घटकाला घेऊन समाजशास्त्रीय योगदान द्यायचे हे आकलन करण्यासाठी आपण चर्चा करीत आहोत. काही तत्त्वज्ञ, विचारवंत यांनी भारताच्या बाबतीत आपले विचार मांडले. मॅक्समुलर (indologist) भारतीय समाजाला प्रेरित करणारे आहेत. तर ड्यूमा यांनी जातीबाबत Homo hierarchy लिहिले आहे, हे आपणास आजही लागू पडते असे वाटते. पवित्र - अपवित्रतेच्या त्याच्या संकल्पना आजही जातीव्यवस्थेत आढळून येतात. आणि वंशपरंपरा व समानता hierarchy and equality ही भारतीय जातीव्यवस्थेमध्ये ड्यूमा यांनी मांडले आहेत. त्यानंतर अत्यंत महत्त्वाचे व्यवसायिक योगदान ज्यांनी या शतकात दिले त्यामध्ये गेल ओम्वेट यांना विसरून चालणार नाही. अमेरिकेत जन्मलेल्या आणि भारतीय पुरुषाशी लग्न करून खेड्यात राहून २० ते २५ ग्रंथ लिखाण करून तेही वंचित घटकांच्या बाजूनी भूमिका घेऊन योगदान देण्याचे काम गेल यांनी केले आहे. त्यांचे आपण स्मरण ठेवले पाहिजे. त्यांचे काम आणि लिखाण भारतीय समाजशास्त्रज्ञानीं वाचणे खूपच गरजेचे आहे. त्या बुद्धिझमवर बोलतात, professional development gender यावर बोलतात, एकूणच त्या सामाजिक चळवळ आणि नव सामाजिक चळवळ यावर बोलतात, त्या आशिया देशातील कुठल्याही समूहाशी संबंधित नसून एका निरपेक्ष दृष्टिकोनातून भारतीय समाजात जाती, विविध विचारवंत व समाज सुधारक याबाबत विवेचन करतात, चिकित्सा करतात. महात्मा फुलेने काय केलं, डॉ. बाबासाहेबांनी काय लिहिलं, येथील समाजातील स्त्रियांची स्थिती काय? समाजव्यवस्था कशी चालते? याबाबत त्यांनी शास्त्रीय पद्धतीने योगदान दिलेलं आहे. या त्यांच्या योगदानाचा भारतीय समाजशास्त्राच्या शतकपूर्ती वाटचालीत समाविष्ट केले पाहिजे. आम्ही त्यांचं काम पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अवलोकन केल्यानंतर आव्हाने काय याकडे कटाक्ष टाकू,

जागतिक पातळीचा आढावा घेताना फ्रेंच राज्य क्रांती, औद्योगिक क्रांती, त्यानंतरची दोन महायुद्धे (१९१४ ते १८ आणि १९३९ ते १९४५) पाहिल्या तर १९४५ ला युनायटेड नेशन ऑर्गनायझेशन (UNO) ठरवली जगात सगळ्यांना शांतता आली जगात सगळ्यांना dignity-equality पाहिजे आणि सगळ्यांना स्वस्थ (healthy) राहायला पाहिजे, या बाबी लक्षात घेऊन जे आपल्याकडे णछज आलं, त्यानंतर २००० मध्ये आपण जगाच्या आणि समाजाच्या विकासासाठी millennium goal set केले. हे शंभर वर्षाच्या समाजशास्त्रामध्ये देखील प्रभावित झालेले दिसते. पण अजूनही खूप अधिक भर या उद्दिष्टांवर आढळतो. पुढे ते म्हणतात, जसे: दारिद्र्य निर्मूलन व्हावे. सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळावे. महिलांना समानता मिळावे, व त्यांचे सक्षमीकरण व्हावे. बालमृत्यू कमी व्हावा. प्रजनन दर वाढावा, संसर्गजन्य आजार साथीचे रोग कमी व्हावेत, पर्यावरणाचा शाश्वत विकास जपला जावा. सोबतच जागतिक स्तरावरील सहभागिता partnership ही आपल्याला जपता आली पाहिजे. थोडक्यात मिलेनियम डेव्हलपमेंट विकास ही संपलेली आहे आता आपल्याकडे २० ते ५० आलेला आहे. हे समाजशास्त्रज्ञांनी लक्षात घ्यावं, पारंपारिक प्रश्न किंवा मुद्दे (Issue) तर आहेतच, पण नवीन ध्येय ज्यावेळी आपण पाहतो, हेच ध्येय शाश्वत विकासाची सुसंगत असतील तर ते आपल्याला समाजशास्त्र विषय पुढे घेऊन जाण्यासाठी व विचार परिवर्तनाला निश्चित मदत करतील. यामध्ये

कुणीही उपाशी राहू नये, दारिद्र्य निर्मूलन व्हावे, सगळ्यांना आरोग्य उत्तम मिळावे, दर्जेदार शिक्षण, लिंगभाव समानता, स्वच्छ पाणी उपलब्धता, सर्वांना विद्युत पुरवठा किंवा ऊर्जा मिळावी, सर्वांना त्यांच्या क्षमता व गुण, कौशल्य आणि नैपुण्यतानुसार काम मिळाले आणि त्यातून अर्थार्जन घडून आले पाहिजे तसा विकास व्हावा, औद्योगिक विकास व्हावा व नवविचारप्रवाह समोर यावेत, विषमता कमी व्हावी, शहरांचा विकास हा शाश्वत झाला पाहिजे. त्याच बरोबर संयोजन (conjunction) जबाबदारीने केलं पाहिजे.

पर्यावरण संरक्षण व्हावं, समुद्र जीवन संपत्ती जतन, संवर्धन व संरक्षण करणे गरजेचे आहे सोबतच पर्यावरणातील विविध घटक, जीव प्राण्यांचे संरक्षण व्हावे आणि सर्वत्र शांतता, न्यायीक वातावरण, संस्था स्थापन होऊन प्रसारित व्हाव्यात. न्याययंत्रणा प्रस्थापित व कार्यान्वित व्हाव्यात. पोलीस यंत्रणा मजबूत व्हावी. जे गुन्हेगार चुकीचे आहेत त्यांच्यावर वचक व नियंत्रण आणि त्यांना शिक्षा झाली पाहिजे.. सर्वांनी सहभागी होऊन शाश्वत विकासाचे १७ ध्येय जे आहेत, त्यामध्ये सर्वतोपरी यथाशक्ती योगदान दिले पाहिजे. जागतिक आणि भारतीय समाजशास्त्राचा शंभर वर्षाचा आढावा आपण घेतला महाराष्ट्रातील समाज शास्त्राकडे पण थोडक्यात प्रकाश टाकला पाहिजे.महाराष्ट्र मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर, जळगाव, अमरावती या सर्व विद्यापीठातील समाजशास्त्रामध्ये योगदान हे महाराष्ट्रात समाजशास्त्रामध्ये खूप चांगले आहे. महाराष्ट्राच्या समाजशास्त्रामध्ये त्यांचे योगदान खूप चांगलं आणि महत्त्वाचा आहे हे आपण लक्षात घेतलं पाहिजे.

भारतीय सामाजिक संरचना सामाजिक परिवर्तन या संदर्भात डॉ. उत्तम भोईटे सरांच्या मराठी भाषेतील लिखाण आहे, समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना डॉ. सर्जेराव साळुंखे, डॉ. विलास संगवे, डॉ. सुधा काळदाते काचोळे डॉ. प्रदीप आगलावे, समाजशास्त्रीय दृष्टिकोन यावर डॉ. पद्माकर सहारे यांचे पुस्तक, सिमांतिक समुहाबाबतच्या भारतातील बौद्ध धर्माबद्दल गेल ओम्वेट यांचे पुस्तक भारतातील सामाजिक चळवळी घनश्याम शहाचे सामाजिक चळवळी बाबतचे पुस्तक, पि. के. कुलकर्णी यांनी लिहिलेलं समाजशास्त्रीय सिद्धांत भांडारकर, घाटोळे, बोधनकर व अलोणी अशा समाजशास्त्रज्ञांची ग्रंथांची मालिका आपणास आढळून येते. डॉ. जोगदंड यांचे सामाजिक चळवळी वरील लिखाण खूप व्याख्यान्याजोगा आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेचे जर्नल हे खूप महत्त्वाचे आहे. समाजशास्त्राच्या पत्रिका यांचा त्यांनी दर्जा राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा पद्धतीने समाजशास्त्राची पायाभरणी व विविध विचारवंतांचे समाजशास्त्रीय सैद्धांतिक विचार, संकल्पना मांडणी आणि समाजशास्त्रीय ग्रंथसंपदा याची सविस्तर व समर्पकपणे माहिती देऊन डॉ. केंद्रे यांनी आपल्या मागणीचा समारोप केला.

डॉ. श्रुती तांबे यांनी उत्कृष्ट मांडणी बाबत आनंद व्यक्त केला व मुंबई स्कूल, भारतातल्या समाजशास्त्राची सुरुवात आहे त्याची मूळ कोणत्या प्रकारच्या समाजशास्त्रात दिसतात आणि त्याची काय प्रकारे चिकित्सा झाली पाहिजे या वरील मत त्यांनी विचारले. तसेच वेगवेगळ्या देशातील समाजशास्त्र हे वेगवेगळ्या पद्धतीने परिप्रेक्ष्यातून प्रकाश टाकीत होतं जागतिक परिपेक्षात तून समाजशास्त्र कडे कसे पाहता येईल याबाबत विवेचन करावे किंवा यावर प्रकाश टाकावा असे सुचविले. प्रस्तुत प्रश्नांची उकल करताना ते म्हणाले, की समाजशास्त्राची मुळात सुरुवातच नवीन विचारांमधून झालेली आहे. समाजशास्त्रात नविन चर्चेला प्रोत्साहन मिळते, बॉम्बे स्कूल ऑफ सोसिओलॉजी च्या संदर्भात जर पाहिलं, तर व्दंद आहे किंवा मुळात समाजशास्त्रात भारताच्या संदर्भात कोणता विषय अधिक आहे तर ती जातीव्यवस्था, जातिव्यवस्था आली की मग सुरुवात कशी, कुठे, कोणी केली? असे अनेक विषय आहेत आणि म्हणून जी पहिली सुरुवात पॅट्रिक गिडेस यांनी केली. Civil thought नागरी सुविधा, नागरी विचार, नागरी सामाजिक स्वास्थ्य, नगर नियोजन, सर्वांसाठी शहर या विचारातून समानता आलेली आहे. घुर्ये हे समाजशास्त्राचे जनक आहेत. ते पारंपारिक होते, त्यांना assimilation पाहिजे होतं आदिवासींना त्यांनी 'मागासलेली हिंदू' संबोधले, असे जरी असले तरी ते शैक्षणिक (अकॅडमी) जे काही योगदान त्यांनी दिलेल्या आहे ते व्याख्यान्याजोग आहे. एखादी professional institution उभी करण्यासाठी जे समर्पण (dedication) लागत, ते घुर्ये यांचे योगदान आपणास मान्यच करावे लागते.

ए. आर. मोमीन यांनी let's see Bombay School मध्ये जे लिहिलेले आहे, वुमेन हे minorities studies चे होते. त्यांनी बऱ्याच गोष्टी तात्विक त्याच्या जमत नसले तरी त्यांनी एवढं मात्र केलं, की घुर्ये हे समाजशास्त्राचे प्रमुख व्यक्ती होते. म्हणून त्यांच्या नावाचा चौक हवा याकरिता त्यांनी प्रयत्न केले. जरी वेगवेगळ्या पार्श्वभूमी किंवा विचारसरणीतून लोक एकत्र आले तरी विषयासाठी त्या त्या व्यक्तीचे योगदान मान्य केलं पाहिजे. आणि म्हणून कार्ल मार्क्सच्या विचारांना आपल्याला मान्य करावं लागेल, ए. आर. देसाई यांनी मार्क्सवाद पुढे चालवला, एम. एन. श्रीनिवास जागतिक कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ होते. त्यांच्यात आणि घुर्ये यांच्या विचारसरणीत भिन्नता आढळते. म्हणजे समाजशास्त्रात व्यक्तींची विचारसरणी वा वैचारिकता वेगवेगळी असू शकते हे यातून स्पष्ट होते. म्हणजे विचारात मतभिन्नता असू शकते. प्रामुख्याने हे सांगायचे की समाजशास्त्राचा जो उद्देश आहे, तो expressions of human being from exploitation opposition discrimination inequality या मुद्यांना धरून असायला पाहिजे. व्यक्ती ह्या येत - जात राहतात. माणसाचा जन्म कुठे व्हावाहे व्यक्तीच्या हातात नाही, जर त्याला परिस्थिती लाभली तर त्याने त्यास लढा द्यावा, आणि फायदा होत असेल तर सर्व घटकांचा विचार करून इतरांप्रति भूमिका निभावावी असे ते म्हणाले.

बॉम्बे स्कूलमध्ये त्या परंपरा आहे त्या खूप वैविध्यपूर्ण (diverse) विविध विचारांचे आहेत आणि काहींच्या मते बॉम्बे स्कूलचा वारसा (legacy) आहे, It is not one legacy, it not a g s Ghurye Legacy, there are legacies.

मार्क्सवाद हा वर्गावर आधारित असला, तरी ती एक विचारसरणी आहे. तसं वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून येऊन वेगवेगळा विचार मांडणं हे प्रथमदर्शनी आवश्यक असलं, तरी तो विचार विवेकशील व निरपेक्ष हवा, ज्याला उपलब्धी (output) असली पाहिजे. अशा बाबी असतील तर बॉम्बे स्कूलच्या बाबतीत ज्यांना चिकित्सा करायची आहे ते करू शकतात. आधीच्या विभाग प्रमुखांनी केलेले काम खूप मोठे आहे. आणि म्हणून त्यावर भर देण्याचा प्रयत्न

करतोयअसे ते म्हणाले.

Bombay School of Sociology यावर सतत विचारांची देवान-घेवान असते, आणि विचार हा जुळल्याच पाहिजे असेही नाही. भिन्न विचार प्रवाह आलेली व मान्य केलेले आहेत, त्याच बरोबर टीकात्मक पद्धतीने त्याचा सामना केलेला आहे.फ्रान्समध्ये ज्या प्रकारे संरचनात्मक समाजशास्त्राची शाखा विकसित झाली, त्यामानाने मुंबईला झाले नाही, त्यामुळे भारतातील समाजशास्त्र ज्याप्रकारे जातिव्यवस्था किंवा जातीसंस्थेच्या विळख्यात (Trap) मध्ये अडकले. जशी आफ्रिका या देशांमध्येसामाजिक वंशभेद, विषमता अधिक असलेली दिसते. जी विषमता आधारित आहे वंशभेद आहे, लिंगभेद हा मुद्दा सर्वत्र आहे. तशी स्थिती भारतात जातीभेदाबाबत आढळते. परंतु प्रकार्यवादाचा इतिहास आपल्याकडे ब्रिटिश मानववंशशास्त्राची मूळ शाखा राहिली, त्यामुळे आपण काही वेगळ्या शाखा झाली असे वाटते. जगाच्या इतर ठिकाणी मात्र समाजशास्त्र वेगळ्या पद्धतीने अभ्यासले जात नाही, तर विशिष्ट्य पद्धतीने शिकवला जाते, आणि आजही संशोधनाचे मुख्य विषय किंवा शाखा पाहिले तर ते वेगवेगळे आहे. आपल्याकडे प्रकार्यवादाचा प्रभाव बराच दिसतो. म्हणजे एखाद्या बाबीचा/समस्येचा उदय, कारणे, परिणाम व समस्या उपाय हेच सूत्र आपल्याकडे बहुतेक अध्ययनात, संशोधनात, मांडणीत आढळते. म्हणजे प्रकार्यवादी विचारसरणीचा खोलवर प्रभाव असल्यामुळे असे वाटते, पॅट्रिक गिडेंसने विद्यापीठात आणलेल्या समाजशास्त्र हे वेगळं होतं. भारतातील समाजशास्त्र हे एका दिशेला गेलं असं वाटतं असे डॉ. श्रुती तांबे म्हणाल्या.

प्रश्न: २) पाश्चात्य समाजशास्त्रीय सिद्धांत, वाचन साहित्य, विचारवंतांच्या विचारांचं भारतामध्ये अंधानुकरण केले जाते, आणि ते होता कामा नये अशी बरेचदा समाजशास्त्रज्ञ चर्चा करतात असे आढळते, आणि भारतीय विचार, सिध्दांत, समाजशास्त्रीय साहित्य पुरेस आहे असे वाटत नाही, तेव्हा पाश्चात्य विचारवंतांचे विचार, वाचन साहित्य, समाजशास्त्रीय सिद्धांत यांचा अवलंब वा आधार घ्यावा कि नाही ? डॉ. अर्जुन जाधव.

डॉ. केंद्रे म्हणाले की, भारतात जाती व्यवस्थेचा सिद्धांत, संस्कृतीकरण-पाश्चिमात्यीकरण, प्रभूत्वशाली जाती, प्रबळ जातीव्यवस्था ह्या संकल्पना भारतातील समाजव्यवस्था विश्लेशीत करण्यास मोठी मदत करतात, ज्या भारतीय समाजशास्त्रज्ञांनी संकल्पना मांडल्या आहेत आणि त्याचा आपण आधार घेत असतो. आपण पाश्चिमात्य समाजशास्त्रीय विचारवंतांच्या संकल्पना, सिद्धांत, मांडणी व लिखाण साहित्याचा आधार घेतलाच पाहिजे. अधिक वाचन -चिंतन - मनन त्याचे अवलोकन केले पाहिजे, आणि मग भारतातील समाजव्यवस्था, समाज आणि विकास याबाबत काय लागू होतं किंवा होत नाही या अनुषंगाने पुढील वाटचाल केली पाहिजे. पाश्चात विचारवंतानी मांडलेले विचार, सिद्धांत, लिखाण खूप खूप मूलभूत व महत्त्वाचे आहे. भारतीय समाजशास्त्रातील पहिली पिढी जसे डॉ. जी. एस घुर्ये, श्रीनिवास, देसाई यांनी त्यांच्या लिखाणाचा आधार घेतला आहे. त्यांचे संदर्भ हे जागतिक पातळीवरचे आहेत. कारण अभ्यासाच्या आधारे तुलना करता आली पाहिजे. ही परिस्थिती का आली याचे विश्लेषण करता आलं पाहिजे, म्हणून युरोपीय आणि भारताबाहेरील समाजशास्त्रज्ञांना वाचलं पाहिजे असे त्यांन मत त्यांनी आग्रहाने सांगितले. मूलभूत आकलन करून घेण्यासाठी जे काही अक्डेमिक योगदान वाचलं पाहिजे. इतकच नाही तर काही विषय (Theme) इतरही विषयाचे लेखन साहित्य आपण वाचायला पाहिजे.

प्रश्न: ३) स्त्रीवादी विचारसरणी समाजशास्त्रात समाविष्ट होते, स्त्रीवाद हा मुख्य प्रवाह होतो आहे. अजूनही उपेक्षित होतय, याबद्दल विविध मतप्रवाह आहेत. समाजशास्त्राचा अभ्यास विषय व्यापक आहे. सगळ्या माणसाच्या क्रिया - आंतरक्रिया, संस्था, इन्स्टिट्यूशन हे समाजशास्त्राच्या व्याप्तीचा भाग होय. प्रा. कांबळे यांच्या म्हणण्यानुसार व्यावसायिक समाजशास्त्रज्ञ यांच्याकडून ज्या गोष्टी यायला पाहिजे होत्या, स्त्रीवादाविषयी, लिंगभावाविषयी, न्याय भूमिकेविषयी त्या बाहेरून (अन्य देशातील शास्त्रज्ञांकडून) समाजशास्त्रात आल्यात यावर आपले मत काय ? - संजयकुमार कांबळे, पुणे.

याबद्दल डॉ. केंद्रे म्हणतात, की एखादी गोष्ट मुळात कुठे घडली, कोणत्या सामाजिक संदर्भाने घडली, त्यात कोणती परिस्थिती कारणीभूत होती या बाबी आपणास समजून घेणे गरजेचे आहे, जसे की भवरी देवी अत्याचार प्रकरण आणि कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध व निवारण अधिनियम २०१३ याचा सहसंबंध आहे, हे आपणास समजून घ्यावे लागते. यासोबतच पद्धतीशास्त्र अध्ययन पद्धतीचा देखील अवलंब केला जावा असेही त्यांनी सूचित केले. भारतातील विविध पार्श्वभूमी आणि स्तरीकरणाला प्रभावावीत करीत असते. त्यामुळे त्याचे प्रश्न Issues हे सारखे नाहीत. स्त्रीवादाच्या वेगवेगळ्या शाखा किंवा प्रवाह निर्माण झाले. उदारमतवादी, मार्क्सवादी, जहालवादी, समाजवादी स्त्रीवाद आला. त्यांचे दृष्टीकोण perspectives सुद्धा आले, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्त्रीवादाची जी भूमिका आहे, ती निश्चितच एक नवीन चळवळ म्हणून आलेली आहे. पद्धतीशास्त्र (methodological pluralism) Positivist आपणास जर असे वाटत असेल की we cannot get justice, and cannot really justify this या दोन्ही पण plural methodolism एकाच पद्धतीच्या वापरामध्ये एखादा विषय स्पष्ट होईल किंवा समजेल असेही नाही, एखाद्याने वापरलेली पद्धतीत बदल होऊ शकतो, नवीन पद्धती सुद्धा वापरले जाऊ शकते. ऑगस्ट कॉम्टने प्रत्यक्षवादावर सुरुवातीला भर दिला. तिथे प्रयोग आणि निरीक्षणाला महत्त्वाचं मानलं आणि सांगितलं की जसा निसर्गाला नियम आहे तसे मानवी जीवनालाही नियम करून, मानवी जीवनाची निरीक्षण करून एक सामाजिक संशोधन करू शकतो परंतु त्यांच्या चे विरुद्ध होते त्यांना प्रत्यक्षवाद पटला नाही तर त्यांनी सांगितले की निसर्गाला नियम नाहीत, निसर्ग हा त्याच्या नियमामुळे होतो मानवी हस्तक्षेप अथणी निसर्गाला प्रभावित करतो का हे हे निश्चित सांगता येत नाही प्रत्यक्षवाद हा पूर्णतः वैज्ञानिक आहे ही बाब काहींना त्यावेळी अमान्य होती जोर से मिलने असे विवेचन केलेले आढळते म्हणून methodology ही पद्धत ही आपण border perspective नी आपल्याला जे योग्य वाटते, आणि जी justify करता येते ती आपण वाचायला पाहिजे त्यामध्ये dialectical approach जे जॉर्ज सीमेल म्हटले आहे, की multi casual and multi directional method आहे. आपणास जी पद्धती स्पष्ट करता येते किंवा ती अवलंबली तर ती त्यांना योग्य वाटेलच असे नाही. आपल्याकडे विचार वेगवेगळे विचार प्रवाह आहेत त्याबाबत आपण तर्कसंगत राहिले पाहिजे सोबतच शेवटी

तत्त्वज्ञानाकडे आपणास वळावे लागते.

What is the nature of being, what do trust, do you think that science gives us scientific outcomes or it is just process and don't believe that so... Nature of being वर आपणास कुठल्यातरी एका बाजूला यावे लागेल. re in there in the lot of know think to say and continue final thought असं काही आपल्याला त्याबाबत देता येणार नाही. Plural methodology we can use dialectical method.

प्रश्न डॉ. संपत काळे: सद्यस्थितीत आव्हाने कोणती?

आधुनिकतेच्या नावाखाली मोठी आव्हाने येत आहेत. त्यामुळे पर्यावरण असंतुलन, मानवी जीवन धोक्यात येत आहे, अशी एक भीती आहे, कि भांडवलशाहीच्या विकासाच असे मॉडेल घेऊन आपण पुढे जात असू तर त्यातून भौतिक बदल आणि प्रगती ही 'आहे रे आणि नाही रे' वर्गसंस्कृती जोपासणारी नव्या व्यवस्था रुजू होत आहे, हे एक मोठं आव्हान आहे. लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन हिरावून घेणे वगैरे.... वगैरे... म्हणून भविष्यात असे धोके निर्माण होऊ नयेत, मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाधारित आपला भर असला पाहिजे. आणि जे काही चिरंतन किंवा शाश्वत विकासाचे ध्येय (Goal) जी आहे, ती आपण सर्वांनी वाचून आकलन करावे व त्यांच्या पूर्तीचं ध्येय बनवून ही जागतिक व मानवी हिताचे ध्येय आहेत आणि हीच आपली भविष्यातील वाटचाल असावी.

Universal education च्या दृष्टीने पाहतांना असे दिसते की २००९ ला सर्वांसाठी १४ वर्षाच्या पर्यंतच्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण साधण्याकरिता अधिनियम आला. त्याआधारे सर्वच मुले शाळेत जातात का याचा धांडोळा घेतला, तर नाही असेच वास्तव समोर येते. Millennium development मध्ये आपण अयशस्वी झालो. शाश्वत विकासामध्ये सुद्धा आपण अपयशी होण्याची स्थिती आल्याचे दिसून येते, तर दुसरीकडे शासनाव्दारे मुलीचे विवाहाचे वय १८ वर्षावरून २१ वर्ष करा म्हणजे सर्व प्रश्न सुटतील. असा सुर निघतो. पण हा राजकीय निर्णय आहे. नैसर्गिक साधने नसताना, मुलींच्या शिक्षणाची सुविधा व सामाजिक सुरक्षितता राज्यकर्तेकेवळ व वाढवत असाल तर ते योग्य नाही म्हणून आव्हानं आहे ती मूलभूततेकडून विशेषीकरण पर्यंत घ्यायला पाहिजे.

प्रश्न: डॉ. विठ्ठल एरंडे : डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक परिवर्तन आणि लोकशाही ची जोड घातली होती. लोकशाहीच समाजशास्त्रीय चिंतन, लिखाण पुढे येत नाही याबाबत आपले मत काय?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी राज्यघटना लिहिली, त्याचे आणि लोकशाहीचे एक अचूक नातं आहे आणि राज्यघटनेप्रमाणे चालू आहे, परंतु काही दबाव/फोर्सेस हे त्यांना चालू द्यायची नाही की आज आपण करून पुन:सादरीकरणाच्या सादरीकरणाचा अधिनियम आलेला आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत आपल्याला प्रतिनिधी निवडून द्यावा लागतो पूर्वी राजकारण हे जनसेवा मानत, आता मात्र राजकारण पैसा आणि सत्ता मिळवण्याचे साधन बनले आहे, त्यामुळे सर्वांना वाटते की पैसा आणि सत्ता माझ्याकडे यायला पाहिजे.आता आरक्षण किंवा सहभाग सर्वांना हवा आहे, परंतु कुणीही समाधानी नाहीत, कारण ते एका पक्षाच्या संबंधित आहेत, आणि जनता कल देत असेल तरीही राजकीय पक्षाच्या ध्येय धोरणाशी सुसंगत त्यांना काम करावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की आरक्षण नको, अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षण रद्द करा, त्याचा काहीच उपयोग होऊ शकत नाही, कारण त्यांचे प्रश्न हे प्रतिनिधी मांडू शकत नसतील, तर काय उपयोग! सगळ्या राजकीय पक्षांनी त्यांना नियंत्रित केलेले आहे. राजकीय लोकशाही सुरूच आहे, पण त्यामध्ये धर्माचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. राजकिय पक्षाची राजकारणावर मोठी पकड आहे. राजकारणात धर्माचा, जातीचा, प्रदेशाचा, भांडवलाचा वापर मोठ्या प्रमाणात होताना आढळतो. खरंतर धर्म हा राजकारणाचा मुद्दा व्हायला नको, कारण 'धर्म' ही खाजगी बाब आहे, त्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. पण तो सार्वजनिक ठिकाणी आला नाही पाहिजे, पण लोक त्याचे सार्वजनिक ठिकाणी अवलंब करतांना आढळतात, उघडपणे बोलतात. आपण त्यास विरोध करू शकत नाही, अंध भक्तांची संख्या अधिक असते. अशी परिस्थिती आपल्याकडे आलेली दिसते. राज्यघटना पण बरोबर आहे. लोकशाही व्यवस्था स्थित आहे. ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांना आपण बोलणारे कमी पडतोय, आणि मग शेवटी जनादेश (mandate) मिळतो, लोकशाही म्हणजे आकड्यांचा खेळ आहे, तिथे कुणाची हुशारकी हवी असे नाही. आपल्याकडे सामाजिक विकास कमी असल्यामुळे आपण त्या लोकशाही वर टीका करू शकत नाही, आणि मग त्यांना मोकळा अवकाश मिळतो. मग त्यांना वाटते कि, धर्मावर बोलू, निवडून येऊ, सत्ता उपभोगू अशा प्रकारची वृत्ती अलीकडील राजकीय राज्यकर्त्यांची झाली असेच भासते. राज्यकर्तेजर धर्माचा मुद्दा अवलंबत असतील तर सामान्य जनतेकडून काय वेगळी अपेक्षा करावी असे मत डॉ. विलास एरंडे यांच्या प्रश्नांची उकल करतांना डॉ. केंद्रे यांनी मांडले.

प्रश्न: समाजशास्त्र ज्ञानशाखेतील महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावरील दरी (hierarchy) कशी कमी करता येईल? त्यात समाजशास्त्र विभागाची काय भूमिका असेल? प्रा. नरवटे

उत्तर देताना डॉ. केंद्रे म्हणाले, की विद्यापीठ अनुदान आयोगाने या दोन्ही स्तरावर समानतेचे तत्व/रचना अवलंबलेली आहे. सहाव्या आयोगात विद्यापीठ अनुदान आयोगाने 'प्राध्यापक' हे पद महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सारखा आहे. नियमाने ही दरी कमी केलेली आहे. महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कुलगुरू होण्याची संधी जितकी सहजतेने उपलब्ध होते. तितकी सहज संधी विद्यापीठात कार्यरत प्राध्यापकांना मिळेलच असे नाही. महाविद्यालयात पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम असतो तर विद्यापीठात मात्र पदव्युत्तर आणि संशोधन यास अधिक वाव असतो, तिथे संशोधनाला पोषक वातावरण व सुसज्ज ग्रंथालयउपलब्ध असते. ज्याचा अभाव महाविद्यालय स्तरावर आढळतो. परंतु सध्याच्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या काळात इ-संसाधने, इंटरनेट सुविधा, डिजिटल मीडिया व साहित्याची उपलब्धता यामुळे ही दरी तुलनेने कमी झाली आहे. यासोबतच आपले शैक्षणिक क्षेत्रातील संपर्क (Social Networking) कसे आहे यावर सुद्धा आपली वाटचाल निर्भर असते. त्यामुळे विद्यापीठ स्तर हेच फारसा मुख्य भाग आता राहिला नाही असे मत त्यांनी मांडले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले तर डॉ. प्रशांत सोनवणे यांनी आभार मानले.

Link: https://youtu.be/-d5EMGeVEKw

■■■

अहवाल लेखन : डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे (नवलाखे)

विशेष व्याख्यान

दि. ३० जानेवारी (रविवार) २०२२, सकाळी ११.०० वा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजशास्त्रीय योगदान

वक्ते : प्रा. राहुल कोसम्बी

समाजशास्त्र विभाग, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद

अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे

बाबासाहेबांच्या वैचारिक आणि राजकीय जडणघडणीत छत्रपती शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांचा मोलाचा वाटा होता हे सर्वश्रुत आहे. या दोघांच्याही पाठबळामुळेच बाबासाहेबांमधील सर्वोत्तम विद्यार्थी आणि एक दूरगामी विचार करणारे राजकीय नेतृत्व घडवले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजशास्त्रीय योगदान या विषयी चर्चा करताना त्यांच्या समकालीन सामाजिक आर्थिक राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीचे सम्यक भान आपणाला ठेवावेच लागेल नाही तर अगदी 'काळ' या एकाच परिणामकारकानुसार शंभर वर्षानंतर आपण जगातल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा त्याच्या विचारालाही अडगळीत टाकू शकतो, कारण काळाची अंगभूत आणि नैसर्गिक मर्यादा ओलांडणे अनेकांना नेहमीच शक्य नसते. हे करत असताना जसे समकालीन परीप्रेक्ष्याचे सम्यक भान आपणाला बाळगावे लागते तसेच आपणाला हेही लक्षात ठेवावेच लागेल की, कोणत्याही परंपरेत काम करत असताना काळाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतीही व्यक्ती अगदीच स्वयंभूपणे वागू शकत नाही. पुढे जाऊन आपणास असे म्हणता येईल की, त्याने/तिने जरी त्याच्या म्हणूनच्या वैचारिक परंपरेत मूलभूत भर घातली तरी आपल्या विरोधी परंपराची नीट चिकित्सा करतच त्याला हे सर्व करावे लागते. म्हणजेच कोणताही महापुरुष एकाच वेळी आपल्या विरोधी वैचारिक परंपरेला नाकारत आपल्या वैचारिक परंपरेतील पूर्वसुरींच्या मर्यादा ओलांडत असतो.या दृष्टिकोनातून पाहता बाबासाहेब आंबेडकर यांची परंपरा, त्यातील त्यांचे पूर्वसुरी व कालौघात त्यांच्या मांडणीला पडलेल्या मर्यादा यांच्या सम्यक आकलनाबरोबरच त्यांच्या विरोधी वैचारिक परंपरा आणि त्यांच्या वैचारिक मांडणीच्या मर्यादा याही आपणाला लक्षात ठेवाव्या लागतील आणि याचपार्श्वभूमीवर मग समकालीन तुंबलेल्या प्रश्नांचा त्यांनी सोडवलेला गुंता आणि त्यांनी दिलेले मूलभूत योगदान आपणाला तपासता येईल; पणआपणाला हेही तितक्याच स्पष्टपणे लक्षात ठेवावे लागेल की, आपण बाबासाहेबांच्या समाजशास्त्रीय योगदानाची चर्चा आज त्यांच्या पहिल्या निबंध वाचनानंतर जवळ जवळ शंभर वर्षांनी करताहोत. त्यामुळे त्यांनी तत्कालीन समाजशास्त्रीय आकलनाला दिलेल्या योगदानचीफक्त आपणाला चर्चा करूनचालणार नाही, तरआजच्या समाजशास्त्रीय आकलनातही आताच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यात्या वेळच्या योगदानाचे औचित्य काय याची आपणाला चर्चा करावी लागेल.

आधी भारतीय समाज समजून घेण्यासाठी ज्यांनी ज्यांनी गंभीर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रयत्न केले त्या त्या आधीच्या प्रमुख पूर्वसुरींची मांडणी नीटपणे समजून घ्यावी लागेल. त्यांच्या चिकित्सक आकलनातून त्यांच्या मर्यादाही जाणून घ्यावे लागतील आणि मग या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांनी इथल्या सामाजिक व्यवस्थेच्या आकलनाला दिलेल्या योगदानाची चर्चा करता येईल. आपण ज्याला भारतीय समाजशास्त्र असं म्हणत आहोत ते प्रामुख्याने इथल्या

जातीव्यवस्थेचे समाजशास्त्र होय. एक-आता मांडणीच्या पुढच्या टप्प्यात जाण्याआधी आपण प्रथमतः हे समजून घेतले पाहिजे की, बाबासाहेबांच्या या अभ्यासक पूर्वसुरींचे इथल्या जाती व्यवस्थेबद्दलचे आकलन कसे बनत गेले, त्यानंतरच त्यांच्या मांडणीचा चिकित्सक आढावा घेत त्यांच्या मर्यादाही आपल्याला मग अधोरेखित करता येतील. जातिव्यवस्थेवर मागच्या शंभर-दीडशे वर्षात जेवढे लिखाण झाले त्यावरून आपल्याला आता नि:संशय असे म्हणता येईल की, आधुनिक समाजशास्त्रीय दृष्टिकोनाआधी आपण असं शोधायचा प्रयत्न केला की, प्राचीन किवा मध्ययुगीन भारतीयांचे या व्यवस्थेकडे पाहण्याचे किंवा तिला प्रत्यक्षपणे (एम्पिरिकल) वस्तुनिष्ठपणे समजून घेण्याचे काही गंभीर प्रयत्न झालेत का? तर आपल्याला आश्चर्य वाटेल की, जातीव्यवस्था आपली म्हणणाऱ्या कोणत्याही सनातनी माणसाने असा कोणताही गंभीर प्रयत्न त्यावेळी केलेला नव्हता आपल्याकडे जातीव्यवस्था समजून घेण्याचे जे एकमेव भारतीय प्रारूप आहे ते वर्णव्यवस्थेचेच-चातुर्वार्णाचेच आहे; पण कालौघात जातीव्यवस्थेचा प्रत्यक्ष वस्तुनिष्ठ अभ्यास होऊ लागल्यानंतर आपणाला हे कळुन चुकले आहे की, वर्णव्यवस्था हा तद्दन पुस्तकी आणि प्रामुख्याने जातीव्यवस्थेमध्ये ज्यांचे हितसंबंध गुंतले आहेत अशा उच्चवर्णीयांकडून पसरवली गेली धार्मिक विचारप्रणाली आहे. वेगवेगळ्या प्रदेशातील जातिव्यवस्थेला ही वर्णव्यवस्थेची संकल्पना ढोबळपणे व्रत-वैकल्य, धार्मिक सण-उत्सव कर्मकांड यांनी बांधून ठेवते एवढेच, पण तरीही इतक्या वर्षाच्या सम्मिलीकरणाच्या प्रयत्नानंतरही वेगवेगळ्या जातीच्या काही विशिष्ट परंपरा अजूनही या प्रक्रियेच्या विरोधात उभ्या असलेल्या दिसतात. प्रत्यक्षातील जातीव्यवस्था आणि त्याचे वर्णन करणारी वर्णव्यवस्था यात फक्त ढोबळ समानतेपलीकडे विशेष असे काहीच नाही.वर्णव्यवस्था एकच आहे, तर जातीव्यवस्था अनेक आहेत असे जातिव्यवस्थेच्या प्रदेशागणिक बदलत जाणाऱ्या रुपाकडे पाहून कोणालाही सांगता येईल. जातीव्यवस्था अशी प्रदेशागणिक बदलत गेली तरी वर्णव्यवस्था सारखीच राहते. ब्राह्मण सर्वात वर, तर त्या-त्या प्रदेशात आढळणारे अस्पृश्य सर्वात तळाला ही एक अपरिवर्तनीय बाब सोडल्यास मधल्या वर्णाचे किंबहुना जातीच्या स्थानाबाबत, कोणत्याही प्रदेशाचे उदाहरण घेतल्यास काहीही ठोसपणे सांगता येत नाही हेच खरे ! किंबहुना ज्यांना अस्पृश्य ठरवले गेले त्यांनीही त्यांना वर्णव्यवस्थेत दिले गेलेले स्थान कधीही मान्य केले नाहीच. म्हणजे वर्णव्यवस्था ही जातीव्यवस्था प्रत्यक्षात नक्की कशी आहे याबाबत नीटपणे काहीही सांगू शकत नाही हे तर खरेच, पण तिला बहुसंख्य लोकांकडून कधीही मान्यता मिळाली नाही हे तर आणखीन जास्त महत्त्वाचे सत्य आहे. आपल्याला हे माहीतच आहे की, जातीच्या वसाहतवाद्यांनी सुरू केलेल्या खानेसुमारीतील किंवा जिला लोकप्रियपणे आता जनगणना म्हणतात त्यातील आकडेवारीनुसार चार हजारांपेक्षाही जास्त जाती आहेत. तुमच्यातील कोणी तरी माझ्या या आकडेवारीशी सहमत होणार नाही कारण त्यांच्याकडे जातीचा आणखी वेगळा आकडा असण्याची शक्यता नाकारता येणार नाही पण इथे आपल्यासाठी इतके पुरेसे आहे की, वर्ण चारच आहेत तर जातीची संख्या हजारात; किंबहुना मघाशी यापूर्वी उल्लेखलेला जातीव्यवस्थेतील सर्वात तळाचा पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातीसमूह हा तर चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा भागच नाही ! ढोबळमानाने पाहू गेल्यास, उत्तर भारत आणि दक्षिण भारत-अगदी महाराष्ट्र सुद्धा यात वर्णव्यवस्थेची आदर्श रचना कोणत्याही एका गावात, खेड्यात पूर्णपणे दिसत नाही. महाराष्ट्रात तर आपणास माहीतच आहे की, क्षत्रिय आणि वैश्य म्हटले जाणारे दोन्ही वर्ण नाहीत म्हणजे उरले दोनच वर्ण-ब्राह्मण आणि शूद्र. आतावर जातीव्यवस्थेबाबत सांगितलेल्या सर्व बाबी आणि ब्राह्मणांनी गळी उतरवलेली चातुर्वण्याची संकल्पना यात काही एक साम्य नाही हे आपल्या लक्षात आले असेलच. त्यातही जातीव्यवस्था ही एक अत्यंत शोषणकारी व्यवस्था आहे; पण कोणतीही व्यवस्था कितीही शोषणकारी असली तरी काही मुठभरांना तिचा फायदा होतच असतोच; पण बहुसंख्य लोकांना ती खूपच जाचक आणि अन्यायकारी ठरत असते त्यामुळे जातीव्यवस्थेतील उच्चवर्णीयांनी कडून तिचे टोकाचे समर्थन केले जाते तर खालच्या जातीतल्या बहुसंख्य लोकांकडून बहुसंख्यांकाकडून तिला टोकाचा नकार दिला जातो.अशा प्रकारे भारतीयांची जातीव्यवस्थेबद्दलची मते, या दोन टोकावर एकमेकांच्या विरोधात उभी असतात; पण बहुसंख्यांकाकडून दिला जाणारा नकार हा वर्णव्यवस्थेला असतो. जी मघाशी म्हटल्याप्रमाणे जातीव्यवस्थेची अप्रत्यक्षपणे दुरून संबंधित असणारी एक विचारप्रणाली मात्र आहे. त्यामुळे हा नकार बराचसा साप म्हणून भुईला बडवण्या सारखाच म्हणता येईल आणि म्हणून वर्णव्यवस्थेच्या इतक्या टोकाच्या खंडन-मंडन आणि नकारानंतरही जातिव्यवस्थेच्या प्रत्यक्ष आचरणात काहीही फरक पडलेला नाही! उलट जातीच्या नावे वर्णप्रतिष्ठेला नाकारायचं पण जातिव्यवस्था पाळायची असा हा उफराटा प्रकार म्हणता येईल. थोडक्यात काय तर, आपली समज आणि रणनीती दोन्ही चुकल्या आहेत. म्हणजेच भारतीयांची जातीची समाज ही अगदी ज्याला जातीव्यवस्था नाकारायची आहे त्यांचीसुद्धा ब्राह्मनीच राहिली आणि पुस्तकी दृष्टीकोणाचीच राहिली. आज मात्र प्रकर्षाने अस्तित्वशील जातिव्यवस्थेला ठोस आणि वस्तुनिष्ठपणे समजून घ्यावे लागेल.

शास्त्रीय दृष्टिकोनातून जातीव्यवस्था समजून

घ्यायला इथे युरोपीय खलाशी, व्यापारी, प्रवासी आणि नंतर मग जे राज्यकर्तेम्हणून स्थिरावले त्या वसाहतवाद्यांच्या आगमनापर्यंत वाट पहावी लागणार होती, पण त्यापूर्वीही इतर काही परदेशी प्रवाशांनी या वैशिष्ट्यपूर्ण आणि आश्चर्यकारक अशा जाती व्यवस्थेबद्दल आपापल्या प्रवास वर्णनात लिहिले होतेच. येशू ख्रिस्ताच्या मरणानंतर इसवीसन ५२ मध्येच भारतात केरळच्या मलबार किनाऱ्यावर ख्रिश्चन धर्मप्रसारकाचे आगमन झाले. मध्य आशियातील इस्लामी राज्यकर्त्यांची लाट अकराव्या- बाराव्या शतकानंतर अविरतपणे पसरतच राहिली. या वाढत्या धार्मिक आणि राजकीय प्रक्रिया मुळे त्या-त्या प्रदेशातील वेगवेगळ्या लोकांच्या भेटी वाढत गेल्या. व्यापारी म्हणून, धार्मिक भेटी म्हणून किंवा राजदूत वकील किंवा प्रवासी म्हणूनही जे अनेक लोक भारताला भेटत राहिले त्यांनी त्यांनी आपले अनुभव लिहून ठेवले आहेत. त्यातून त्यांची त्या वेळच्या जातिव्यवस्थेबद्दलची निरीक्षणे आपणाला समजतात.

पारसी, रोमन्स, बायझंटाईन्स, ज्युज, इजिप्शियन, ग्रीक, अरब, तुर्क, अफगानी आणि चिनी अशा अनेकांची निरीक्षणे, प्रवासवर्णने त्यावेळची जातीव्यवस्था समजून घेण्यासाठी सहायक ठरतात. मेगॅस्थेनीस, अल्बरूनी, अबुल फजल, ह्यूएनश्वांग, फाहिएन, इत्यादींची प्रवासवर्णने आजही वाचताना निरीक्षण शक्तीला दाद द्यावीशी वाटते, पण त्यानंतर म्हणजे खास करून सोळाव्या शतकाच्या सुरुवातीपासून जेव्हा युरोपियन खलाशी, व्यापारी, प्रवासी जेव्हा भारतात येऊ लागले तेव्हापासून या जाती व्यवस्थेच्या थोड्या वस्तुनिष्ठ आकलनाला सुरुवात झाली, असे आपणाला निश्चितपणे म्हणता येईल याची सुरुवात अर्थातच दुआर्त बार्बोसा या इ.स.१५०० मध्ये, म्हणजे शिवाजी महाराजांच्या जन्माच्या जवळ जवळ १३० वर्षाआधी भारत भेटीवर आलेल्या प्रवाशाच्या लिखाणाने झाली. त्यांच्या भारत भेटीनंतर १५१६ साली त्याने पोर्तुगीज भाषेत प्रकाशित केलेल्या त्याच्या बुक ऑफ दुआर्त बार्बोसा या पुस्तकातील त्याची जातीव्यवस्थेबाबतची निरीक्षणे अत्यंत वस्तुनिष्ठपणे माडलेली होती.

आता अलीकडे सर्वांनीच मांन्य केलेली जातिव्यवस्थेची सर्व वैशिष्ट्ये त्यांनी मांडली होती, पण आश्चर्य म्हणजे त्यांनी त्यात वर्णव्यवस्थेचा अजिबात उल्लेख केला नव्हता. दुर्दैव म्हणजे कोणत्याही पूर्वग्रहा शिवाय जातीव्यवस्थेकडे थेटपणे पाहण्याचीही जी बार्बोसाची परंपरा आहे ती नंतरच्या वसाहतवाद्यासकट परिवर्तनवादी अभ्यासकांनीही अगदी एखाद-दुसरा अपवाद वगळता आत्ता-आत्तापर्यंतही स्वीकारलेली नाही. तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल की, जसे जातीव्यवस्थेत राहूनही भारतीयांना तिची वस्तुनिष्ठ आकलन करता आले नाही त्याचप्रमाणे आपण अगदी सहजपणे जाती या शब्दाला समानार्थी असणारा जो इंग्रजी शब्द आहे कास्ट- तो खरे तर आपण जी जात ही संकल्पना ज्या व्यक्ती व्याप्तीसह वापरतो त्यापेक्षा या इंग्रजी कास्ट या संकल्पनेचा आवाका मोठा आहे, पण किमान मागच्या दोन-अडीचशे वर्षापासून या शब्दाने किंवा संकल्पनेने भारतीय जाती या संकल्पनेला पूर्णपणे विस्थापित केले आहे. आजची आपली जातीची समज ही 'कास्टा' या शब्दाच्या वापराशिवाय शक्यच नाही. बार्बोसाने भारतीय जातीसाठी जी मूळ संकल्पना वापरली ती अर्थातच पोर्तुगीज भाषेतील कास्टा अशी होती नंतर वसाहतवाद्यानी त्याऐवजी ही संकल्पना १६१३ च्या आसपास सर्वप्रथम वापरली पण तरीही अठराशेच्या आधी क्वचितच ती सातत्याने वापरली गेली. ब्रिटिश व्यापारी इथले राज्यकर्तेबनल्यानंतर मात्र या संकल्पनेचा वापर आणि विस्तार एवढेच नव्हे तर त्याची निश्चित व्याख्या आणि मग त्याबरोबर येणारी या संकल्पनेची संकुचितता ही वाढली पण ब्रिटिश राजवटीत जातीच्या थेट वस्तुनिष्ठ आकलनाचा आवाका आणि वेग दोन्हीही वाढला आणि तिला समजून घेण्यासाठी मागचे दृष्टीकोनही वाढत गेले. पौर्वात्यवादी, धर्मप्रसारकी आणि प्रशासकीय अशा प्रामुख्याने तीन दृष्टिकोनात आपण त्यावेळच्या जातीच्या आकलनाच्या परंपरेची विभागणी करू शकतो. प्लासीची लढाई जिंकण्याआधीपासूनच ब्रिटिश इथली जीवनशैली, परंपरा, धार्मिक- सांस्कृतिक वारसा,भाषा, कायदे इत्यादी खास करून पर्शियन स्रोतावरून समजून घेत होतेच. कारण मुघल राज्यकर्त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर हिंदू धार्मिक ग्रंथांचे अनुवाद परीक्षण भाषेत करून ठेवलेलेच होते. बंगाल सुभ्याच्या प्रशासन आणि न्यायालयीन क्षेत्रात ज्या सुरुवातीच्या ब्रिटिशांचा हस्तक्षेप राहिला ते मूळ ब्रिटिश समाजाच्या उच्च कुळातून आले होते आणि त्यांनी इथल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा पंडित आणि शास्त्रींच्या माध्यमातून धार्मिक पुस्तकांच्या आधारे समजून घ्यायचा प्रयत्न केला आणि यातूनच त्यांनी भारताच्या देदीप्यमान अखंड समृद्ध परंपरेची, जी आता अध:पतीत होत आहे, समज दृढ होत गेली आणि यातूनच भारतीय समाजाच्या पौर्वात्यवादी दृष्टिकोनाचा विकास झाला याउलट मिशनरी दृष्टिकोन त्यानंतर वाढीस लागला. व्यापार,महसूल आणि राज्यकारभार यात धर्माची लुडबूड नको म्हणून ईस्ट इंडिया कंपनीने शिताफीने बरीच वर्ष ब्रिटिश मिशनऱ्यांना भारतात येण्यापासून रोखले होते पण अठराव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात आणि त्यानंतर १८२० नंतर भारतात मिशनरी मोठ्या प्रमाणात येऊ लागले. ख्रिश्चन धर्मप्रसारातून असंस्कृत भारतीय लोकांचा विकास असा उद्देश त्यापाठीमागे होता, पण भारतीय जातीव्यवस्था आणि असंख्य चिवट परंपरा यांनी त्यांना पुरते दमवले आणि त्यातूनच त्यांनी टोकाची हिंदू धर्मचिकित्सा आरंभली. खरे तर पौर्वात्यवाद्यांची आणि मिशनरी यांची ब्रिटिश समाजातील स्थाने (ब्रिटिश

पौर्वात्यवादी हे उच्चकुलीन सुसंस्कृत कुटुंबातून आलेले होते तर मिशनरी हे सहसा निम्न वर्गातून आलेले होते) त्यांची अभिरुची आणि भारतातील त्यांचे इतिकर्तव्य याचा विचार करता त्यांचे भारतीय समाजाविषयीचे आकलन विरुद्ध टोकाचेच होते पण भारतीय समाज आपणाला ब्राह्मणी धर्म ग्रंथांच्या आधारे उत्तमपणे समजून घेता येतात. इतकेच नव्हे तर त्यातील सिद्धांत हे खरे सुद्धा आहेत यावर त्यांचा विश्वास होता आणि यातूनच भारतीय समाजाबाबतची स्थितिशील, अपरिवर्तनीय, बंदिस्त अशी समज दृढ होत गेली आणि यातून जाती आकलनाचा पारंपरिक ब्राह्मणी वर्णवर्चस्ववादी सिद्धांत दृढ होत गेला. १८२० नंतर म्हणजे पेशवाईच्या पाडावानंतर मात्र ब्रिटिशांनी व्यापार आणि महसूलाबरोबरच राज्यकारभाराची भूमिका मध्यवर्ती मानायला सुरुवात केली आणि त्यातूनच जमीन धारणापद्धती पलीकडे जात एकूणच समाज, संस्कृती आणि परंपराच्या समग्र आकलनावर भर देण्यात येऊ लागला. त्यातूनच जिल्हा गॅझेटिअर, दशवार्षिक जनगणना, व्यापक मानववंशशास्त्र पाहण्या इत्यादीची मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली आणि यातूनच जातीव्यवस्थेची प्रत्यक्ष भौतिक वस्तुनिष्ठ माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली, पण तरीही जातिव्यवस्थेच्या आकलनावरचा ब्राह्मणी वर्णवर्चस्ववादी दृष्टिकोनाचा पगडा कमी झाला नाही. मात्र नव्या या सामाजिक क्षेत्रातील आधुनिक संशोधन पद्धतीने या जातीव्यवस्थेचे आकलन झाले पाहिजे, हा आग्रह वाढीस लागला आणि त्यातूनच त्यावेळच्या समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र यांच्यातील समकालीन सिद्धांताच्या परिप्रेक्ष्यात जातीव्यवस्था समजून घेण्याचे प्रयत्न वाढीस लागले आणि मग जातीव्यवस्थेच्या धर्मग्रंथ उत्पत्ती सिद्धांताला प्रश्नांकित केले जाऊ लागले. त्यातून मग जातीव्यवस्था उत्पत्तीचे नवे सिद्धांत समोर आले. मात्र या नव्या मांडणीतील अंतर्विरोध ही गुंतागुंत लक्षात घ्यायला हवी. या सर्व नव्या आधुनिक शास्त्रीय सिद्धांतानी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत जरी वेगळी मते मांडली असली तरी ब्राह्मणी चातुर्वर्ण्याचे प्रारूप मात्र सगळीकडे सारखेच गृहीत धरले होते. खरे तर ब्रिटिश प्रशासकीय दृष्टिकोण जो जातिव्यवस्थेच्या प्रत्यक्ष भौतिक वस्तुनिष्ठ आकलनावर आधारलेला होता त्याने हा पुस्तकी चातुर्वर्ण्याच्या दृष्टीकोण प्रश्नांकित करायला हवा होता, तोच केला गेला नव्हता आणि यातून जातिव्यवस्थेच्या दैवी उत्पत्तीच्या सिद्धांतावर जरी प्रश्नचिन्ह लावले गेले असले तरी चातुर्वर्ण्याचे प्रारूप अप्रश्नांकित राहिल्यामुळे नव्या आधुनिक दृष्टिकोन या ब्राह्मणी दैवी उत्पत्तीशास्त्राला कायमस्वरूपी विस्थापित करता आले नाही. कोण-कोणत्या ब्रिटिश अभ्यासकांनी जातीव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत कोणकोणते सिद्धांत मांडले याची चर्चा या ठिकाणी मी करणार नाही कारण बाबासाहेबांच्या वेगळ्या जाती विश्लेषनाबाबत मी सविस्तर बोलणारच आहे.....

इथवर आपण बाबासाहेब आंबेडकरांच्या आधी ढोबळपणे भारतीय समाज व्यवस्थेची, जातिव्यवस्थेची हकलाने कशी विकसित पावली ते पाहिले. हौशी प्रवासी ते नेहमीच्या परदेशी व्यापाऱ्यांनी इथल्या समाजव्यवस्थेचे कसे आकलन केले आणि त्यानंतर आलेल्या युरोपियन वसाहतवाद्यांनी, म्हणजेच अगदी डच, पोर्तुगीज, स्पॅनिश, फ्रेंच आणि इंग्लिश वसाहतवाद्यानी, मग मोठ्या प्रमाणावर इथल्या जातीव्यवस्थेची आधुनिक शास्त्रीय आणि वस्तुनिष्ठ आकलन प्रारूपे कशी मांडली याबाबत फक्त ढोबळ रूपरेखा मांडून त्याचे मी याआधी आपणासमोर थोडक्यात विवेचन केले.....

या सर्वाचा एकत्रित परिणाम बाबासाहेबांच्या आकलनावर असणारच होता, पण बाबासाहेबांनी त्यांच्या वैयक्तिक, सामाजिक, राजकीय अनुभवांना आपल्या अभ्यासपूर्ण शास्त्रीय आकलनाची आणि उदात्त मूल्यभानाची जोड देऊन आतापर्यंतच्या जातिव्यवस्थेच्या आकलनाला अनन्य योगदान दिले. अगदी सुरुवातीलाच हे आपणाला स्पष्ट असायला हवे की, इतर सर्व दृष्टिकोन हे वेगळे दिसत असले तरी वर्णन आणि विश्लेषणाच्या एका विशिष्ट टप्प्यापलीकडे ते कधीच जाऊ शकले नाहीत. त्याचे मूलभूत कारण हे जातीव्यवस्था मुळात कशासाठी समजून घ्यायची या हितसंबंधी राजकारणाशी संबंधित आहे. इतर जवळजवळ सर्वच प्रारूपे ही काही अंशी विश्लेषक असली तरी ती कधीच परिवर्तनकारी नव्हती. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण.....

ब्राह्मणांपेक्षाही ब्रिटिशांना या जाती व्यवस्थेची अस्तित्वशीलता हवी होती. यात फक्त बाबासाहेबाच असे होते की, ज्यांनी नेहमीच जातीव्यवस्थेला भारतीय विकास वातेलील एक कूटप्रश्न म्हणून पाहिले. जिच्या आमूलाग्र निर्मुलनाशिवाय इथे काहीही आणि कधीही भव्यदिव्य घडणार नाही यावर त्यांचा विश्वास होता. तसे पाहू जाता बाबासाहेबांचा ज्ञानातून प्रत्यक्ष परिस्थिती बदलण्याचा आग्रह त्यांना काल मार्क्सच्या जवळ नेतो.त्यांचाही आग्रह फक्त जगाच्या वर्णनात नव्हे तर त्याला ठोसपणे बदलण्याचा होता. दुसरे म्हणजे बाबासाहेब हे एकमेव असे अभ्यासक होते की, ज्यांना जातिव्यवस्थेच्या शोषण-पीडनाच्या खऱ्या क्षमतेचा प्रत्यक्ष अनुभव होता. या अर्थाने बाबासाहेबांच्या जातीव्यवस्था आकलनाचा प्रस्थानबिंदू हा इतर कोणत्याही व्यक्तीपेक्षा खास करून, प्रवासी-व्यापारी, राज्यकर्ते-प्रशासक किंवा याच व्यवस्थेचे सर्वात लाभकारी उच्चवर्णीय किंवा पुढे जाऊन सवर्णही यांच्यासारखा वरुनचा आणि ग्रांथिक असणारा नव्हता, तर तो प्रत्यक्ष शोषण-पीडनाच्या अनुभवातून आलेला थेट 'खालूनचा' असा दृष्टिकोन असणार होता. अशाप्रकारे एकदा का बाबासाहेबांच्या दृष्टिकोनांचा हितसंबंधी राजकारणाच्या अक्षरेषांवर योग्य त्या ठिकाणी प्रस्थापित केले, की मग त्यांच्या योगदानाची अनन्यता आपणाला नक्कीच लक्षात येईल.

पण ब्रिटिश राजवटीत जातीच्या थेट वस्तुनिष्ठ

आकलनाचा आवाका आणि वेग दोन्हीही वाढला आणि तिला समजून घेण्यापाठीमागचे दृष्टिकोनही वाढत गेले. पौर्वात्यवादी, धर्मप्रसारक की आणि प्रशासकीय अशा प्रामुख्याने तीन दृष्टिकोनात आपण त्या वेळच्या जातीच्या आकलनाच्या परंपरेची विभागणी करू शकतो.प्लासीची लढाई जिंकणे आधीपासूनच ब्रिटिश इथली जीवन शैली परंपरा धार्मिक सांस्कृतिक वारसा भाषा कायदे इत्यादी खास करून परिशियन स्त्रोतांवरून समजून घेत होतेच कारण मोगल राज्यकर्त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर हिंदू धार्मिक ग्रंथांचे अनुवाद पर्शियन भाषेत करून ठेवलेले होते बंगाल सुभ्याच्या प्रशासन आणि न्यायिक क्षेत्रात ज्या सुरुवातीच्या ब्रिटिशांचा हस्तक्षेप राहिला ते मूळ ब्रिटिश समाजाच्या उच्च कुळातून आले होते आणि त्यांनी इथल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा पंडित आणि शास्त्रींच्या माध्यमातून धार्मिक पुस्तकांच्या आधारे समजून घ्यायचा प्रयत्न केला आणि यातूनच त्यांची भारतात भारताच्या देदीप्यमान अखंड समृद्ध परंपरेची जी आता अधःपतित होत आहे समज दृढ होत गेली आणि यातूनच भारतीय समाजाच्या पौर्वात्य वादी दृष्टिकोनाचा विकास झाला याउलट मिशनरी (धर्मप्रसारकी) दृष्टिकोन त्यानंतर वाढीस लागला व्यापार महसूल आणि राज्यकारभार यात धर्माची लुडबूड नको म्हणून ईस्ट इंडिया कंपनीने शिताफीने बरीच वर्ष ब्रिटिश मिशनर्यांना भारतात येण्यापासून रोखले होते पण अठराव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात आणि त्यानंतर १८२० नंतर भारतात मिशनरी मोठ्या प्रमाणात येऊ लागले. ख्रिश्चन धर्मप्रसारतून असंस्कृत भारतीय लोकांचा विकास असा उद्देश त्या पाठीमागे होता पण भारतीय जातीव्यवस्था आणि असंख्य चिवट परंपरा यांनी त्यांना पुरते दमवले आणि त्यातूनच त्यांनी टोकाची हिंदू धर्माची चिकित्सा आरंभली खरेतर पौर्वात्यवाद्यांची आणि मिशनरी यांची ब्रिटिश समाजातील स्थाने सुसंस्कृत कुटुंबातून आलेले होते, तर मिशनरी हे सहसा निम्न वर्गातून आलेले होते. त्यांची अभिरुची आणि भारतातील त्यांचे इतिकर्तव्य याचा विचार करता त्यांचे भारतीय समाजाविषयीचे आकलन विरुद्ध टोकाचेच होते, पण भारतीय समाज आपणाला ब्राह्मणी धर्मग्रंथांच्या आधारे उत्तमपणे समजून घेता येतात. इतकेच नव्हे तर त्यातील सिद्धांत हे खरेसुद्धा आहेत यावर त्यांचा विश्वास होता आणि यातूनच भारतीय समाजा बाबतची स्थितिशील अपरिवर्तनीय बंदिस्त अशी समज दृढ होत गेली आणि यातून जाती आकलनाचा पारंपरिक ब्राह्मणी वर्णवर्चस्ववादी सिद्धांत दृढ होत गेला.

१८२० नंतर म्हणजे पेशवाईच्या पाडावानंतर मात्र ब्रिटिशांनी व्यापार आणि महसूलाबरोबरच राज्यकारभाराची भूमिका मध्यवर्ती मानायला सुरुवात केली आणि त्यातूनच जमीनधारणा पद्धतीपलीकडे जात एकूणच समाज, संस्कृती आणि परंपराच्या समग्र आकलनावर भर देण्यात येऊ लागला. त्यातून जिल्हा गॅझेटियर्स, दशवार्षिक जनगणना, व्यापक मानववंशशास्त्र पाहण्या इत्यादीची मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली आणि यातूनच जातिव्यवस्थेची प्रत्यक्ष भौतिक वस्तुनिष्ठ माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली; पण तरीही जातिव्यवस्थेच्या आकलनावरचा ब्राह्मणी वर्णवर्चस्ववादी दृष्टिकोनाचा पगडा कमी झाला नाही. मात्र नव्या सामाजिक क्षेत्रातील आधुनिक संशोधन पद्धतीने या जातीव्यवस्थेचे आकलन झाले पाहिजे. हा आग्रह वाढीस लागला आणि त्यातूनच त्या वेळच्या समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र यांच्यातील समकालीन सिद्धांताच्या परिप्रेक्ष्यात जातीव्यवस्था समजून घेण्याचे प्रयत्न वाढीस लागेल आणि मग जातिव्यवस्थेच्या धर्मग्रंथीय उत्पत्ती सिद्धांताला प्रश्नांकित केले जाऊ लागले. त्यातून मग जातीव्यवस्था उत्पत्तीचे नवीन सिद्धांत समोर आले. मात्र या नव्या मांडणीतील अंतर्विरोधी गुंतागुंत लक्षात घ्यायला हवी. या सर्व नव्या आधुनिक शास्त्रीय सिद्धांतानी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत जरी वेगळी मते मांडली असली तरी ब्राह्मणी चातुर्वर्ण्याचे प्रारूप मात्र सगळीकडे सारखेच गृहीत धरले होते. खरे तर ब्रिटिश प्रशासकीय दृष्टिकोण जो जातिव्यवस्थेच्या प्रत्यक्ष भौतिक वस्तुनिष्ठ आकलनावर आधारलेला होता त्याने हा पुस्तकी चातुर्वर्ण्याचा दृष्टिकोन प्रश्नांकित करायला हवा होता, तोच केला गेला नव्हता आणि यातून जातिव्यवस्थेच्या दैवी उत्पत्तीच्या सिद्धांतावर जरी प्रश्नचिन्ह लावले गेले असले तरी चातुर्वर्ण्याचे प्रारूप अप्रश्नांकित राहिल्यामुळे नव्या आधुनिक दृष्टिकोनाना या ब्राह्मणी दैवी उत्पत्तीशास्त्राला कायमस्वरूपी विस्थापित करता आले नाही. कोणकोणत्या ब्रिटिश अभ्यासकांनी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत कोणकोणते सिद्धांत मांडले याची चर्चा मी इथे मुद्दामहून करत नाही, कारण बाबासाहेबांच्या वेगळ्या जातीविश्लेषणा बाबत बोलताना मी सविस्तर बोलणारच आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बळीराम पवार यांनी केले तर सूत्रसंचालन करून आभार प्रा. शिवाजी उकरंडे यांनी मानले.

सविस्तर व्याख्यान ऐकण्यासाठी लिंक
https://youtu.be/E7ykp6IXYkk

■■■

अहवाल लेखन : प्रा. प्रियदर्शन भवरे
समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना.
priyadarshan1971gmail.com Mobile : 9405913297

भारतातील समाजशास्त्राची शतकमहोत्सवी वाटचाल

लेखन

प्रा. डॉ. आनंद कुमार
जेष्ठ संशोधक तथा
माजी समाजशास्त्र विभागप्रमुख
जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली

** हा लेख मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अमरावती येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनात दिनांक २३ जानेवारी २०२० रोजी केलेल्या बीज भाषणावर आधारीत आहे. मूळ लेख इंडिअन सोशिओलॉजीकल सोसायटीच्या हिंदी भाषेतील 'भारतीय समाजशास्त्र समीक्षा' या संशोधन पत्रिकेच्या डिसेंबर २०२० च्या (खंड ७, अंक २) अंकात प्रसिद्ध झाला आहे.*

सारांश :-

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत समाजशास्त्राचा प्रवेश १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात झाला. देशविदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या स्वातंत्र्यप्रेमी भारतीयांद्वारे एक परिवर्तन प्रेरक सामाजिक विज्ञानाच्या स्वरुपात याला स्वीकारण्यात आले. या शतक महोत्सवी वाटचालीत (१९१९-२०१९) समाजशास्त्राच्या विस्ताराचे तीन प्रमुख कालखंड राहिले आहेत. १९१९-१९४७ (भारतातील वसाहतवादाचा काळ), १९४७-१९९२ (लोकशाही राष्ट्रनिर्मितीस सहायक एक सामाजिक विज्ञान) आणि १९९२-२०१९ (जागतिकीकरण, राष्ट्रनिर्माण आणि सामाजिक अस्मितांमधील अंतर्विरोधांचे अध्ययन). सुरुवातीपासूनच आपल्याकडे समाजशास्त्राच्या अध्ययन आणि अध्यापनाच्या सैध्दांतिक पार्श्वभूमीमध्ये पाश्चिमात्य समाजशास्त्रीय चर्चाविश्वांचा खोलवर प्रभाव राहिला आहे. परंतु याची काही स्वत:ची वैशिष्टये देखील आहेत.

भारतात समाजशास्त्राच्या मागील शंभर वर्षात झालेल्या प्रगतीची फलश्रुती म्हणजे देशातील १५०० पेक्षा अधिक महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठांमध्ये आणि संशोधन संस्थांमध्ये समाजशास्त्राचे पध्दतशीर अध्ययन केले जात आहे आणि भारतीय समाजशास्त्र परिषद ४४५० पेक्षा अधिक आजीव सभासदांच्या बळावर जगातील दुसऱ्या क्रमांकाचे समाजशास्त्राचे मोठे विचारपीठ आहे. तथापि बौध्दिक स्वातंत्र्याची स्थापना, लोकशाही संवर्धन आणि आर्थिक- सामाजिक-सांस्कृतिक विकासाच्या दिशेने अनेक अपेक्षांची अद्याप पूर्तता होणे बाकी आहे.

मुख्य शब्द –

सामाजिक विज्ञान, समाजशास्त्र, युरोप, भारत, मूल्ये, संस्था, प्रक्रिया, सिध्दांत, समाज व्यवस्था, सामाजिक परिवर्तन, समाजशास्त्रीय चर्चाविश्व, उच्च शिक्षण, वसाहत, अवसाहतिकरण, लोकशाही, राष्ट्रनिर्माण, सामाजिक अस्मिता, जागतिकीकरण, बौध्दिक स्वातंत्र्य.

भूमिका : समाजशास्त्र हे सामाजिक मूल्ये, संस्था आणि प्रक्रियांचे विज्ञान आहे. समाजशास्त्राने आपले वैयक्तिक आणि सार्वजनिक दैनंदिन जीवनातील आकलनाला धर्मशास्त्रे, तत्वज्ञानाच्या व्याख्या आणि राजकीय विचारधारांच्या छायेतून बाहेर काढले आणि वास्तव परिस्थितीच्या निरीक्षण, परीक्षण आणि वर्गीकरणाच्या आधारावर सामान्यीकरणाचा आधार बनविले आहे. इतर सामाजिक शास्त्रे आणि जैविक शास्त्रे यांच्या मदतीने समाजशास्त्राचा जवळपास दोन शतकांपासून सातत्याने विकास

झाला आहे. प्रत्यक्षवादाचा सिध्दांतवेत्ता ऑगस्ट कॉम्त (१७९८-१८५७) यांनी १८३८ मध्ये याचे औपचारिक नामकरण केले आणि आपल्या मौलिक ग्रंथाद्वारे याचे अध्ययन क्षेत्र आणि पध्दतीचा आधार बनविले. परंतु हे देखील उल्लेखनीय आहे की, अरबी विचारवंत इब्न खाल्दून (१३३२-१४०६) यांचा ग्रंथ 'मुकद्दमा' मध्ये १४ व्या शतकातच मानवाच्या सामाजिक अस्तित्वाशी निगडीत प्रक्रिया आणि घटकांना चित्रीत करण्यात आले होते. म्हणून इब्न खाल्दून यांच्या साहित्याचे युरोपीयन भाषांमध्ये अनुवाद करण्यात आले आणि नंतरच्या शतकांच्या बौध्दिक चर्चाविश्वात त्यांना समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास आणि धर्मशास्त्राच्या संदर्भात महत्वपूर्ण विचारवंत मानले गेले आहे. म्हणून समाजशास्त्राला मुळात एक युरोपीयन ज्ञानप्रवाह मानणे दोषपूर्ण आहे. तरी देखील औद्योगिकक्रांती, राजकीय परिवर्तन आणि युध्दग्रस्त युरोपीयन देशांच्या बौध्दिक चर्चाविश्वाशी जोडलेल्या समकालीन समाजशास्त्राकडे भारतासहीत आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकन देशांमधील शिक्षण केंद्रे आणि बुध्दीजीवींचे लक्ष युरोपच्या जागतिक विस्ताराच्या माध्यमातून वेधले गेले आहे.

भारतात समाजशास्त्राचा प्रारंभ परकीय सत्तेच्या काळात विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकांमध्ये दोन संदर्भांना अनुसरण झाला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढा आणि वसाहतिक उच्च शिक्षण व्यवस्था. म्हणून सुरुवातीपासूनच याच्या दोन प्रतिमा होत्या. स्वातंत्र्यासाठी देश-विदेशात लढा देणारे देशभक्त भारतीय सुशिक्षितांमध्ये याला एका परिवर्तन-प्रेरक सामाजिक विज्ञानाच्या स्वरुपात स्वीकारण्यात आले. तथापि भारतीय विद्यापीठातील बुध्दिजीवींनी याला सामाजिक मानवशास्त्राशी संबंधित एका नवोदित आधुनिक पाश्चिमात्य ज्ञानशाखेच्या स्वरुपात ओळख मिळवून दिली. दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर भारत स्वतंत्र झाला आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रारंभीच्या अर्ध्या शतकात समाजशास्त्राच्या अध्ययन अध्यापनाच्या कक्षा रुंदावत राहिल्या. कारण स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजव्यवस्थेची रचना आणि परिवर्तन या दोन्हीचे आकलन करून घेण्यात ते सहाय्यभूत ठरले (सिंह, १९६७ आणि धनागरे, १९९३). समाजशास्त्रज्ञांनी भारतीय जनजीवनाच्या प्रमुख प्रवृत्ती आणि प्रश्नांना महत्त्व दिले आणि लोकशाही मूल्यांवर आधारित संविधानाच्या माध्यमातून बहुमुखी आधुनिकीकरणाच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक-अध्ययन-मूल्यमापनाच्या माध्यमातून आपली राष्ट्रीय ओळख निर्माण करण्यात यश संपादन केले (मुखर्जी, १९७७).

परंतु २१ व्या शतकात भारतात समाजशास्त्रावर जागतिकीकरणाशी संबंधित देशांतर्गत आणि जागतिक प्रश्नांची गडद छाया पडलेली दिसते. कारण हा जागतिकीकरण, अवसाहतीकरण, लोकशाही राष्ट्र निर्माण आणि देशी अस्मितांमधील अंतर्विरोधाच्या अध्ययन-विश्लेषणाचा कालखंड राहिला आहे. यावर्षांमध्ये समाजातील स्त्रियांची स्थिती, विशेषत: लिंगभावाशी संबंधित हिंसेची अनेक धक्कादायक तथ्ये समोर आली आहेत (भारत सरकार, २००६ अ). या कालखंडात भारतीय समाजाच्या वर्गीय स्वरूपाच्या (भारत सरकार, २००७) दुर्लक्षित पैलूंना प्रकाशात आणणारे अभ्यास झाले आहेत. या अध्ययनांमुळे देशातील ७७ टक्के श्रमजीवी लोकसंख्येच्या दयनीय, आर्थिक दशेचे आकलन झाले आहे. देशातील धार्मिक विविधतेतील अल्पसंख्याक विशेषता: १४ टक्के लोकसंख्या असलेल्या मुस्लिमांच्या स्थिती विषयक जाणिवांचा विस्तार झाला आहे (भारत सरकार, २००६ ब). ही माहिती देखील समोर आली आहे की, अवसाहतीकरणाचे अपूर्ण कार्य कमीत कमी दहा कोटी संख्या असलेल्या 'विमुक्त' समुदायांना राष्ट्रनिर्माणात सहभागी करुन घेण्यात सामाजिक आणि सांस्कृतिक घटक अडथळे ठरत आहेत (भारत सरकार, २००६क). या प्रकारे समाजशास्त्रज्ञांवर अनेक जुन्या प्रश्नांची नव्याने उत्तरे शोधण्याची गंभीर स्वरुपाची जबाबदारी आहे. म्हणूनच आपल्या शतक महोत्सवी वाटचालीच्या स्मृती अधिकच मोलाच्या ठरल्या आहेत.

या संक्षिप्त लेखात भारतातील समाजशास्त्राच्या एका शतकाच्या प्रदीर्घ वाटचालीची समीक्षणात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत लेखाची सात भागात विभागणी करण्यात आली आहे. १. भूमिका, २. समाजशास्त्राच्या प्रसाराचे तीन टप्पे, ३. भारतात समाजशास्त्राचे बीजारोपण, ४. स्वातंत्र्यानंतर समाजशास्त्राचा विस्तार, ५. भारतात समाजशास्त्राची सैध्दांतिक पार्श्वभूमी ६. भारतीय समाजशास्त्राची चार वैशिष्टे आणि ७. समारोप.

भारतातील समाजशास्त्राच्या विस्ताराचे तीन टप्पे –

समाजशास्त्रज्ञांनी भारतात समाजशास्त्राचा विकास आणि प्रसाराबाबत नेहमीच सजगता दाखविली आहे. यात भारतीय सामाजिक विज्ञान परिषद (इंडियन कौन्सिल ऑफ सोशियल सायन्स रिसर्च) यांचे द्वारा सत्तरच्या दशकापासून आतापर्यंत प्रत्येक दशकात झालेल्या प्रगतीचे सहा वेळा करण्यात आलेल्या समग्र चिकीत्सात्मक अध्ययनांचे महत्वपूर्ण योगदान आहे. यासंदर्भात आजपासून पाच दशकांपूर्वी १९१९ आणि १९४७ या दरम्यानच्या अर्धशतकाचे मूल्यमापन करताना एम.एस.ए. राव यांनी त्यावेळी तीन कालखंडाना अधोरेखित केले होते- १. प्रारंभीचे प्रयत्न (१९१४ च्या पूर्वी), २. विकासाची वर्षे(१९१४ ते १९५०) आणि ३. विस्ताराचा टप्पा (१९५० पासून पुढे) (राव, १९७४-२१-७२). परंतु अनेक समाजशास्त्रज्ञांच्या मते इंग्रजी सत्तेपासून मिळालेल्या मुक्तीलाच नव्या युगाच्या प्रारंभाप्रमाणे मानले पाहिजे (हेतूकर, २०१४, ३६). त्यामुळे भारतात एका शतकापासून सुरु असलेल्या समाजशास्त्रीय चर्चाविश्व आणि विकासाला खालीलप्रमाणे तीन कालखंडामध्ये विभाजीत केले जावू शकते: १. प्रवेश काळ (१९१९-१९४७), २. राष्ट्रनिर्माणात उपयुक्त समाजविज्ञानाची भूमिका (१९४७-१९९२) आणि ३. जागतिकीकरण, राष्ट्रनिर्माण आणि सामाजिक अस्मितांच्या अंतर्विरोधांचे अध्ययन (१९९२-२०१९).

वसाहतिक भारतात समाजशास्त्राचा प्रवेश–काळ (१९१९–१९४७) :

या कालावधीत समाजशास्त्राला काही विद्यापीठांच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये मानसशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र आणि इतिहासाच्या पुरक विषयांच्या स्वरुपात स्वीकृती मिळाली. ब्रिटीश राजवटीत करण्यात आलेल्या शासकीय सर्वेक्षणे आणि अभ्यासांच्या मदतीने भारतातील खेडी आणि जाती–धर्मांचे समाजशास्त्रीय विश्लेषण समोर आले. सत्ता व्यवस्था, अर्थ–तंत्र, धर्म, संस्कृती आणि सामुदायिक सण–उत्सवाच्या संदर्भात विदेशी प्रवाशांनी आणि ख्रिस्ती प्रचारकांनी लिहिलेले तपशील प्रकाशित आणि प्रचारित झाले होते. यात ग्रीक राजदूत मेगॅस्थॅनिसद्वारे इ.पू. ३०० मध्ये लिहिलेल्या तपशीलापासून तर ख्रिस्ती मिशनरी एब्बे दुबोईस यांची १८१६ मध्ये प्रकाशित 'डीस्क्रीपशन ऑफ द कॅरेक्टर, मॅनर्स, ॲण्ड कस्टम्स ऑफ द पीपल ऑफ इंडिया' आणि बेडन–पॉवेल यांचे १८९२ मध्ये तीन खंडांमध्ये प्रकाशित 'द लॅण्ड सिस्टिम्स ऑफ ब्रिटीश इंडिया' पर्यंत आपापले योगदान होते. ब्रिटीश शासनातर्फे आपल्या उद्देशांसाठी १८७१ आणि १९३१ या दरम्यान करण्यात आलेल्या जनगणनांच्या माध्यमातून भारतातील शिक्षीत वर्गासाठी देखील जात, खेडे, शिक्षण, भाषा, व्यवसाय पंथ आणि धर्मनिहाय विश्लेषण केले.

सामाजिक विज्ञान निर्माणाच्या या वसाहतकालीन काळातील अभ्यासातील दोषांच्या संदर्भात स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजशास्त्रज्ञांमध्ये फारच थोडी जाणीव होती. (कोन्ह, २००४,१–१५). त्यामुळे आनंद कुमारस्वामी, बी.एन. सील, जी.एस. घुर्येआणि के.पी. चट्टोपाध्याय यांच्यासारख्या विचारवंतांनी या वसाहतिक स्त्रोतांच्या पलीकडे जावून भारतीय समाज व्यवस्थेचे विश्लेषण करण्याचे जे प्रयत्न केले त्याचे भारताच्या सांस्कृतिक आणि सभ्यतेच्या आकलनासाठी चिरंतन महत्व आहे(हेतूकर, २०१४, ३५–४१). वसाहतवादाने प्रेरित अभ्यासांवर आधारित समाजशास्त्रीय चर्चाविश्वात २० व्या शतकाच्या भारतीय समाजाचे जमीनस्तरीय वास्तव (फिल्ड व्ह्यूव) कमीच दिसते आणि ग्रांथिक दृष्टीकोन (बुक व्ह्यूव), युरोपियन दृष्टिकोन आणि 'एकांगीदृष्टीकोन' (टनेल व्हिजन) यांचे प्राधान्य होते. (पहा, कोन्ह,कोसंबी, चट्टोपाध्याय, डर्क) याला पा. वा. काणेंच्या 'धर्मशास्त्राचा इतिहास' यासारख्या प्रभावी ग्रंथांनी स्मृति आणि पुराणांच्या संदर्भापर्यंत मर्यादित करून अधिक मजबूत बनविले (काणे).

भारतीय राष्ट्रनिर्माणात सहाय्यकारी सामाजिक विज्ञानाच्या स्वरूपातील विकासाचा टप्पा (१९४७–१९९२)

भारताला १९४७ मध्ये परकीय सत्तेपासून मुक्तता मिळाल्याबरोबरच समाजशास्त्राचाही कायापालट व्हायला सुरुवात झाली. 'खेडे' आणि 'जाती' या संकल्पनांभोवती फिरणाऱ्या वसाहतवादी समाजशास्त्रीय चर्चाविश्वाला क्रमाक्रमाने स्वातंत्र्य युगात प्रवेश करीत असलेल्या समाजातील प्रश्नांशी जोडण्यात आले. भारतीय आणि अभारतीय समाजशास्त्रज्ञांनी बहुमुखी सामाजिक परिवर्तनाच्या विश्लेषणासाठी पुढाकार घेतला (श्रीनिवास, १९६६; सिंह, १९७४).

नेहरु युग (१९४७–१९६४) हे नियोजित नवनिर्माणाशी संबंधित यश आणि अपयशांच्या काळ होता. नंतर १९६४ ते १९७७ या १३ वर्षांत लोकशाहीच्या नुतनीकरणाचा प्रयोग चालला. पाकिस्तानशी १९६५ आणि १९७७ मध्ये अशी दोन युध्दे झाली आणि पाकिस्तानपासून तुटून बांग्लादेशाचा उदय झाला. १९६७, १९७१ आणि १९७७ मध्ये तीन सार्वजनिक निवडणुका झाल्या. या दरम्यान जून, १९७५ ते जानेवारी, १९७७ पर्यंत १९ महिने लोकशाही संस्थगित ठेवण्यात आली. त्यामुळे संसद, कार्यपालिका, प्रसार माध्यमे आणि न्याय पालिका यांच्या परस्पर संबंधामध्ये अडथळे आले. संविधानात वादग्रस्त दुरूस्त्या करण्यात आल्या. नंतर नव्या संसदेद्वारे दोषपूर्ण दुरुस्त्या हटविण्यात आल्या (मुखर्जी,२०००; ओस्तेगार्द १९८५; धर, २०००).

सत्तरच्या दशकातल्या दारिद्र्याच्या आव्हानाला राजकीय समुदायाने स्वीकारण्याचे धाडस दाखविले. 'हरित क्रांती'ने ग्रामीण व्यवस्था आणि गाव–शहर संबंधामध्ये मुलभूत बदल घडवून आणले. जागतिक प्रभावामुळे महिला चर्चाविश्वाला ओळख मिळाली आणि त्यातच देशातील स्त्रियांच्या स्थितीबद्दल सादर करण्यात आलेल्या राष्ट्रीय अहवाल 'समतेच्या दिशेने' चे उल्लेखनीय योगदान होते(भारत सरकार, १९७४). याचबरोबरीने जाती व्यवस्थेशी संबंधित सामाजिक–शैक्षणिक मागासलेपणाशी निगडीत मागासवर्ग आयोगाच्या अहवालाचे (मंडल आयोग अहवाल) १९८० मध्ये सादरीकरण झाले. ज्यामुळे सामाजिक न्यायाच्या आंदोलनाची भूमिका तयारी झाली. या एका दशकाच्या प्रदिर्घ अभियानाने १९९० मध्ये देशातील ३,७४३ 'इतर मागास जातीं'साठी शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये २७ टक्के आरक्षणाची व्यवस्था करविली (भारत सरकार, १९८०). आसाम आणि पंजाबात 'विघटनवादी' प्रवृत्तीचे देखील प्रकटीकरण झाले. लोकशाही विकेंद्रीकरणासाठी संविधानात ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. ज्यामुळे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या सोबतच ग्रामस्वराज्य आणि नगरस्वराज्यच्या दिशेने प्रगती होवू शकेल (१९९२).

अशा प्रकारे देश – विदेशातील समाजशास्त्रज्ञांसाठी भारतीय समाजाच्या विविध पैलूंमध्ये होणारे संरचनात्मक परिवर्तन जिज्ञासेचे केंद्र बनले. 'विकास', 'आधुनिकीकरण' आणि लोकशाहीच्या विस्ताराला प्राधान्य दिले गेले. हे दिशा परिवर्तन भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या २० राष्ट्रीय अधिवेशनांमध्ये मूल प्रश्नांच्या स्वरुपात १९५५ आणि २००० या दरम्यान प्रतिबिंबीत होत आले आहे.

जागतिकीकरण, राष्ट्रनिर्माण आणि सामाजिक अस्मितांच्या अंतर्विरोधांचे अध्ययन (१९९२–२०१९) :

भारतीय समाजव्यवस्थेच्या अध्ययनात १९९२ पासून एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. कारण केंद्र सरकारने आपल्या

धोरणांमध्ये महत्वपूर्ण बदल करताना भांडवलवादी जागतिकीकरण आणि त्या अंतर्गत बाजारीकरण आणि खासगीकरणाला प्राधान्य देण्यास सुरुवात केली. याच कालावधीत देशातील राजकीय समुदायांमध्ये 'अस्मितेच्या' राजकारणाचे युग सुरु झाले. 'मंडल आयोगा'च्या शिफारशींना लागू करण्यासाठी 'इतर मागास जातींच्या समुहांनी' सामाजिक न्यायाच्या विचारपीठाची उभारणी केली. शिक्षण आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये केंद्र सरकारने २७ टक्के आरक्षणाचा नियम लागू केला. दुसऱ्या बाजूला धार्मिक अस्मितेलाही उभारीची देण्यात आली. पहिले 'हिंदू अस्मिते'च्या नावाखालील सामाजिक संघटनेच्या माध्यमातून अयोध्येत 'श्रीराम जन्मस्थान मंदीर निर्माणाचे' आंदोलन १९९२ च्या शेवटच्या दिवसांमध्ये परमोच्य बिंदूवर पोहोचविण्यात आले. त्यानंतर मुसलमानांच्या आर्थिक-सामाजिक-राजकीय स्थितीविषयी राष्ट्रव्यापी जाणीवेचा प्रसार झाला. याचा शेवट २००६ मध्ये सच्चर समिती अहवालाच्या स्वरुपात झाला.

भारतातील समाजशास्त्रज्ञांनी २००१ आणि २००२ मध्ये झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनांमध्ये अनुक्रमे 'भारतातील समाजशास्त्राची पन्नास वर्षे' आणि 'जागतिकीकरण' याला मध्यवर्ती सूत्र मानून चर्चा घडवून आणण्यात आली. २००० आणि २०१९ या दरम्यानच्या राष्ट्रीय अधिवेशनांमध्ये सामाजिक रूपांतरण, सामाजिक विषमता, सामाजिक न्याय, लोकशाही, नागरी समाज, विविधता आणि विकास, परीवरील जन, लोकचळवळ आणि सामाजशास्त्रीय परंपरांनाच प्राधान्य मिळाले आहे.

भारतात समाजशास्त्राचे बीजारोपण (१९१९-१९४७) :

भारतीय समाजशास्त्र आणि समाजशास्त्रज्ञांसाठी २०१९ हे शतक महोत्सवी वर्ष आहे. कारण आपल्या देशात समाजशास्त्राचा अधिकृत प्रारंभ १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात झाला होता. याचवर्षी प्रा. पेट्रीक गेडिस (१८५४-१९३२) यांना समाजशास्त्र आणि नागरिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्त करण्यात आले. प्रा. गिडीस यांच्यावर हर्बर्ट स्पेंसर यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी पाच वर्षांच्या अल्प कार्यकाळात (१९१९-१९२४) समाजशास्त्राला समुदाय जीवन, प्रादेशिक सांस्कृतिक विविधता आणि शहरी सामाजिक संबंधांमध्ये अंतर्भूत पैलूंसंदर्भात संवेदनशीलता दाखवून त्याला व्यावहारिक प्रश्नांचे समाधान, विशेषत: नागरीकरणाचा नियोजनाशी जोडले.

सुरुवातीला जी.एस. घुर्ये (१८९३-१९८४) यांनी मुंबई विद्यापीठाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, चिंतन परंपरा, सामाजिक संस्था आणि समस्यांशी जोडत एस.वी. करंदीकर, के.एम. कपाडिया, इरावती कर्वे, पी.एन. प्रभू इत्यादींच्या सहकार्याने समाजशास्त्राचा पायाभूत विस्तार केला. याच काळात ब्रजेन्दनाथ सील (१८६४-१९३८), क्षितीश प्रसाद चट्टोपाध्याय (१८९७-१९६३), विनयकुमार सरकार (१८८७-१९४९), धुर्जटी प्रसाद मुखर्जी (१८८४-१९६२), डी.एन. मजूमदार (१९०३-१९६०) आणि अवध किशोर सरण (१९२२-२००३) यांनी लखनऊ विद्यापीठाच्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरा आणि भारतीय समाजाच्या विविधतेच्या सखोल ज्ञानाच्या आधारे समाजशास्त्राला भारतीय संदर्भात जोडण्याची सुरुवात केली. यात मानवशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र इत्यादी ज्ञानशाखांशी समन्वय ठेवण्यात आला.

सुरुवातीच्या दशकांमध्ये भारतीय समाजशास्त्र समुदाय आणि भारतात समाजशास्त्राच्या अध्ययन-अध्यापनावर जगातील इतर देशांच्या तुलनेत ब्रिटीश समाजशास्त्रीय प्रवाहांचा मोठा प्रभाव पडला. तसे पाहिले तर १९१९-१९४७ या दरम्यानचा कालावधी अत्यंत मर्यादित स्वरुपात समाजशास्त्राच्या विकासाचा होता. कारण १९२० मध्ये संपूर्ण भारतात एकूण ११ विद्यापीठे होती आणि केवळ मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राच्या व्यवस्थित शिक्षणासाठी एका प्राध्यापकाची नियुक्ती करण्यात आली होती. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुध्दाच्या अंतापर्यंत ब्रिटीश भारतात एकूण २० विद्यापीठांची स्थापना झाली आणि यापैकी फक्त मुंबई आणि लखनऊ विद्यापीठांमध्ये समाजशास्त्र विभाग स्थापन करण्यात आले होते. एत्तदेशीय संस्थानांपैकी म्हैसूर मध्ये १९२८ मध्ये बी.एन. सील आणि ए.एफ. वाडिया यांनी आणि १९२९ मध्ये जर्मनीतून अध्ययन करुन स्वदेशात परतलेल्या जफर हसन यांनी उस्मानिया विद्यापीठ (हैदराबाद) येथे समाजशास्त्राची सुरुवात केली होती.

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे या संस्थापक पीढीने १९१९-१९४७ या दरम्यान वसाहतिक परिघाच्या बौद्धिक मर्यादा असतानाही भारतीय समाजाच्या पायाभूत तत्वांच्या अध्ययनात समाजशास्त्राच्या सैध्दांतिक शिस्तीचा सदुपयोग केला. विवाह, कुटुंब, आप्तसंबंध, जात, धर्म, वंश, व्यवसाय, ग्रामीण-शहरी समुदाय, पारंपरिक जीवनशैली, श्रध्देवर आधारित व्यवस्था, सामाजिक स्तरीकरण तसेच समाजातील द्वंद्व आणि परवर्तन इत्यादींच्या अध्ययन-अध्यापनाचा पाया भक्कम केला.

स्वतंत्र भारतात समाजशास्त्राचा विस्तार (१९४७-२०१९) :

स्वातंत्र्यानंतर भारतात उच्च शिक्षणासोबतच समाजशास्त्राच्या विद्यार्थी आणि अध्यापकांचाही सुव्यवस्थित विस्तार झाला. मुंबईच्या समाजशास्त्रज्ञांनी १९५१ मध्ये भारतीय समाजशास्त्र परिषद आणि १९५३ मध्ये उत्तर प्रदेशातील समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्र समितीचा प्रारंभ केला. लवकरच या दोन्ही आयोजकांनी एका संयुक्त राष्ट्रीय परिषदेची स्थापना केली. या विचारपीठाने देशातील विविध भागात राष्ट्रीय अधिवेशनांचे आयोजन आणि एक उच्च दर्जाची इंग्रजी संशोधन पत्रिका 'सोशिऑलॉजिकल बुलेटिन'च्या नियमित प्रकाशनाने राष्ट्रीय स्वरुप आणि जागतिक ओळख मिळवून दिली. या प्रक्रियेला डी.एन. मजूमदार संपादित 'ईस्टर्न एन्थ्रॉपॉलॉजिस्ट' (१९४७), निर्मलकुमार बोस संपादित 'मॅन इन इंडिया' आणि लुई डयुमा संपादीत 'कॉन्ट्रीब्युशंस टू इंडियन सोशिओलॉजी' (१९५७) यांच्याकडून सतत योगदान मिळाले.

१९५५ मध्ये पहिल्यांदाच देशभरातील समाजशास्त्रज्ञ एका अखिल भारतीय संमेलनात एकत्रित आले. १९५५ पासून ते

१९९३ पर्यंत ही संमेलन दोन वर्षांच्या अंतराने आयोजित करण्यात आली परंतु १९९३ पासून वार्षिक संमेलने होऊ लागली. या अधिवेशनांचे उद्घाटन भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते काशी विद्यापीठ (वाराणसी) ला २०१४ मध्ये, उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांच्या हस्ते २०११ ला जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (नवी दिल्ली) येथे तसेच उपराष्ट्रपती भैरवसिंह शेखावत यांच्या हस्ते उदयपूरला २००३ मध्ये होणे हे समाजशास्त्र परिषदेच्या प्रगतीचे महत्त्वपूर्ण टप्पे राहिले आहेत. भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्राच्या जागतिक व्यासपीठावर देखील अनेक वर्षांपासून सक्रिय योगदान राहिले आहे. १९८६ मध्ये दिल्लीत जागतिक समाजशास्त्र परिषदेचे आयोजन आणि १९९२ पासून ते १९९६ पर्यंत भारतीय समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षपद भूषविलेल्या प्राध्यापक टी. के. वुम्मन यांची विश्व समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी निवड होणे म्हणजे या भारतीय समाजशास्त्रज्ञांची आंतरराष्ट्रीय प्रतिमा निर्मितीच्या दोन महत्त्वपूर्ण घटना राहिल्या आहेत. मागील एक दशकापासून समाजशास्त्राच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदानासाठी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञांना जीवनभरातील योगदानासाठी सन्मानित करण्याची परंपरा निर्माण होणे हे देखील परिषदेच्या वाढत्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. एकविसाव्या शतकाची वीस वर्ष पूर्ण होण्याबरोबरच भारतात ९०० पेक्षा अधिक विद्यापीठे आणि ५० हजारांपेक्षा अधिक महाविद्यालये निर्माण झाली आहेत. यापैकी १५०० पेक्षा अधिक महाविद्यालये आणि १७५० पेक्षा अधिक विद्यापीठांमधील विभागांमार्फत समाजशास्त्राचे अध्ययन केले जात आहे. या कालखंडात समाजशास्त्राचे विद्यार्थी आणि शिक्षकांच्या रूपात समाजातील वंचित वर्ग आणि समुदायापर्यंत समाजशास्त्र पोहोचले. याचा परिणाम म्हणजे स्त्रियांचे प्रश्न, दलितांचे प्रश्न, आदिवासी अस्मिता, पर्यावरणीय आव्हाने, सीमान्त समूह आणि दारिद्र्यात खितपत पडलेल्या कोट्यावधी स्त्री-पुरुषांच्या प्रश्नांनी समाजशास्त्राला प्रवाहशील बनवून ठेवले. सामाजिक विज्ञानाच्या संकुलाबरोबरच विधी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि वैद्यकीय संकुलांमध्ये देखील समाजशास्त्राच्या अभ्यासाला प्रासंगिक मानले जात आहे. समाजशास्त्रातील उच्चशिक्षणाच्या माध्यमातून कमीत कमी पाच क्षेत्रांमध्ये उपजीविकेच्या संधी उपलब्ध होत आहेत: १) सरकारी नोकरी, २) शिक्षण केंद्र, ३) संशोधन केंद्र, ४) प्रसारमाध्यमे आणि ५) स्वंयसेवी संस्था.

आज समाजशास्त्र परिषद देखील एकूण ४४५० समाजशास्त्रज्ञांच्या आजीव सभासदांच्या बळावर अमेरिकन समाजशास्त्र परिषदेनंतर जागतिक स्तरावर समाजशास्त्राचे सर्वात मोठे राष्ट्रीय विचारपीठ आहे. परिषदेच्या हिंदी आणि इंग्रजी भाषेत प्रकाशित संशोधन पत्रिकांना व्यापक स्वरूपात मान्यता आहे. या अंतर्गत २८ संशोधन समित्या सक्रिय आहेत. तसेच परिषदेशी १३ प्रादेशिक समाजशास्त्र परिषदा संलग्नित आहेत. यांच्याद्वारे दरवर्षी महत्त्वपूर्ण संमेलने तसेच समाजशास्त्रीय साहित्य प्रकाशित करण्याची परंपरा जोपासली जाते. यांच्या माध्यमातून यांच्या माध्यमातून विविध देशी भाषांमध्ये समाजशास्त्रीय चर्चाविश्व संपन्न होत आहे.

भारतात समाजशास्त्राच्या अध्ययन-अध्यापनाची सैद्धांतिक पार्श्वभूमी :

भारतीय विद्यापीठांमध्ये समाजशास्त्राचा प्रवेश हा आपल्या ज्ञान व्यवस्थेच्या पाश्चिमात्यीकरणाशी संबंधित होता. कारण जगाच्या बौध्दिक क्षितीजावर एका विशिष्ट ज्ञानशास्त्राच्या स्वरुपात समाजशास्त्राचा जन्म आर्थिक आणि राजकीय क्रांतीमुळे निर्माण झालेल्या सामाजिक उलथा पालथीने ढवळून निघालेल्या १९ व्या शतकात युरोपात झाला होता. हा संबंध पूर्ण शतकभर अधिक घट्ट झाला आहे. समाजशास्त्रात भारतीय तत्वांना प्राधान्य देण्याची चर्चा नियमित सुरु आहे परंतु यामुळे भारतात समाजशास्त्राच्या सैध्दांतिक आधारामध्ये परिवर्तन होवू शकले नाही. फ्रेंच विचारवंत आणि समाज वैज्ञानिक ऑगस्ट कॉम्ट (१७९८-१८५७) यांना समाजशास्त्राचा जनक मानले जाते. त्यांनी 'समाजाचे' जीवंत आणि सुव्यवस्थित वास्तविकतेच्या स्वरुपात विश्लेषण करायला सुरुवात केली आणि यात जैव-विज्ञानाच्या विकासवादी प्रतिमानाचा पध्दतशीर उपयोग केला. या प्रारंभ बिंदू पासून सुरु समाजशास्त्राच्या परिचयाच्या एका शतकानंतर देखील भारताचे समाजशास्त्र आपल्या विद्यापीठीय स्वरुपात पाश्चिमात्य समाजशास्त्र विश्वाशी घनिष्ठता राखून आहे. त्यामुळे याचे संक्षिप्त विवरण देणे प्रासंगिक राहील.

कॉम्टच्या पुढाकारानंतरच्या ७० वर्षांमध्ये समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकास आणि विस्तारात १ जर्मन विचारवंत कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) यांचे तत्वज्ञानविषयक तसेच आर्थिक विश्लेषण, २ ब्रिटीश अभियंता हर्बर्ट स्पेन्सर (१८२०-१९०३) यांचा समाजाच्या विकासाचा सिध्दांत, ३. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल दुरखीम (१८५८-१९१७) यांच्याद्वारे सामाजिक श्रम-विभाजन, धर्म तसेच सामाजिक विचलनाचे सखोल अध्ययन, ३ इटालियन सामाजिक विचारवंत विल्फ्रेड परेटोचे (१८४८-१९२३) यांची समाजातील नेतृत्वात स्थापित समुहांच्या गुण-अवगुणांचे महत्व याचे विवरण, ४. अमेरिकन विचारवंत थर्स्टन वेब्लेन (१८५७-१९२९) यांचे द्वारे आधुनिक समाजात दर्जा आणि पदांच्या व्याकरणाचे सैध्दांतिकरण, ५. जर्मन सामाजिक विचारवंत जॉर्ज सिमेल (१८५८-१९१८) यांचे द्वारे भांडवल केंद्रीत आर्थिकतेतून निर्माण झालेली सामाजिकता आणि सामुदायिक धारेच्या मूळ प्रक्रियांची ओळख, ६. जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर (१८६४-१९२०) यांचे द्वारे सादर सामाजिक क्रिया तसेच सामाजिक संरचना व संस्थांच्या तर्कसंगतेच्या प्रक्रियेद्वारे केले जात असलेल्या आधुनिक रुपांतरणाची व्याख्या आणि ७. रशियन-अमेरिकन समाजशास्त्रज्ञ पीटरीम सोरोकीन यांचे द्वारा प्रतिपादीत सामाजिक प्रगती आणि अधोगतीच्या चक्रांचे सिध्दांत समाजशास्त्राच्या विकासाचा पाया रचला.

यानंतर दोन महायुध्दांमधील कालखंडात (१९१४-१९४५) संपूर्ण युरो-अमेरिकन विद्याजगत भांडवलवादी लोकशाहीच्या अध:पतनाचे साक्षीदार बनले. पहिल्या महायुध्दानंतर

युरोपच्या बहुतांश देशांमध्ये सर्वसामान्य जनता अनेक दशके राष्ट्रवादाच्या दबावाचा बळी ठरली. लहान मोठया युध्दांमुळे निर्माण झालेल्या सामाजिक-राजकीय संकटांशी सामना करीत राहिली. पुढे मात्र साम्राज्यवादाच्या अस्तालाच सुरुवात झाली. रशियात साम्यवादी क्रांती (१९१७) झाली. अमेरिकेच्या वाट्याला एका शक्तीशाली औद्योगिक राष्ट्राच्या वर्चस्वाची भूमिका आली. आशिया-आफ्रिका-लॅटीन अमेरिकेच्या देशांमध्ये स्वातंत्र्याची आस लागली. यामुळेच समाजशास्त्राचासैध्दांतिक विकास देखील एका संक्रमणातून झाला. यामुळे जर्मनीत चिकित्सात्मक सामाजिक विज्ञानाचा उदय झाला. वाल्टर बेंजामिन (१८९२-१९४०), मॅक्स होर्खहाईमर (१८१५-१९७३), हर्बर्ट मारकुज (१८९८-१९७१), नियोडोर अडोर्नो(१९०३-१९६९) आणि युरगन हेबरमास (१९२९) यांनी जगप्रसिध्द 'फ्रँकफर्ट स्कूलची' स्थापना केली. या प्रशालेद्वारे हेगेल, मार्क्स आणि फ्राईड यांच्याचितनांचा चिकित्सात्मक उपयोग करताना समाजशास्त्राच्या व्यवस्था-विश्लेषणाच्या क्षमतेत 'चिकित्सा सिध्दांतांच्या' (क्रिटीकल थ्योरी) स्वरुपात नवीन पैलू जोडले. इटली मधील कम्युनिस्ट चळवळीचे अपयश, फॅसिझमचे वर्चस्व आणि तुरुंगात बंदिस्त विचारवंतांच्या अनुभवांनी संस्कृतीच्या स्वायत्ततेशी संबंधित सामाजिक विश्लेषणाच्या धारेचे विशाल प्रवाहात रूपांतर झाले. यात मार्क्सवादी विचारवंत आणि इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाचे नायक अंतोनिया ग्रामशी (१८९१-१९३७) यांचेकैदेतील जीवनकाळात फॅसिस्ट राष्ट्रप्रमुख मुसोलिनीच्या शासनकाळाचे करण्यात आलेल्या मूल्यमापनाचे ऐतिहासिक योगदान राहिले.

हे देखील स्वाभाविक होते की युरोप-आशिया आणि आफ्रिकेच्या आत्मसंघर्षापासून फारच दूर लोकशाही भांडवलवादाच्या विस्ताराचे लाभार्थी संयुक्त राज्य अमेरिकेच्या विद्यापीठांमध्ये संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टीकोनाचे (स्ट्रक्चरल फंक्शनल स्कूल) संवर्धन झाले. सामाजिक द्वंद्व, विशेषत: मार्क्सवादी सिध्दांताची उपेक्षा करण्यात आली. या 'प्रकार्यवादी समाजशास्त्राने' १९४५ ते १९६८ या दरम्यान इंग्रजी माध्यमातील बहुतांश विद्यापीठांमध्ये समाजशास्त्राचे अध्ययन-अध्यापन तसेच संशोधन कार्यात आपले वर्चस्व अबाधित ठेवले. यात टॉलकॉट पारसन्स (१९०२-१९७९), रॉबर्ट मर्टन (१९१०-२००३), जॉर्ज हर्बर्ट मीड (१९६३-१९३१), लेव्हीस कोझर (१९१३-२००३) तसेच राल्फ डेरेडा (१९२९-२००९) आणि सरंचनात्मक प्रकार्यवादाचे टीकाकार सी-राइट मिल्स (१९१६-१९६२) यांच्या साहित्याचे कायमस्वरुपी महत्व मानले जात आहे.

परंतु १९ व्या शतकाच्या साठोत्तरी काळात अमेरिकन वर्चस्वाला जगभरात आव्हाने मिळाली. अमेरिकन समाजात वर्णभेद, व्हियतनाम युद्ध, स्त्रियांचे दमन आणि अमेरिकन समाजाच्या सत्ता-संरचनेच्या विरोधात रस्त्यापासून विद्यापीठांपर्यंत असंतोष आणि आंदोलने झाली. समाजशास्त्रात देखील ही प्रवृत्ती प्रतिबिंबित झाली. टॉलकॉट पार्सन्सच्या नेतृत्वात स्थापन झालेल्या 'सार्वभौमिक उद्विकास' मान्यते (इव्होलुशनरी यूनीव्हर्सल्स) संबंधित चर्चाविश्वाला लॅटीन अमेरिकन आणि आफ्रिकी समाजाच्या अनुभवांच्या विश्लेषणाच्या आधारावर आव्हान मिळाले. मार्क्सवादी संकल्पनांना आरंभ बिंदु मानून आंद्रे गुन्नेर फ्रँक (१९२९-२००५), समीर अमीन (१९३१-२०१८), जिओवानी आरिधी (१९३७-२००९) तसेच फर्नांडो कोर्दोसो (१९३९) सारख्या संशोधकांनी एक समांतर चर्चाविश्व स्थापन केले.

'समाजव्यवस्था' आणि 'सामाजिक परिवर्तन' या संकल्पनांच्या व्याख्या करण्यासाठी 'राष्ट्र-राज्याला' अध्ययनाच्या एककाच्या स्वरुपात अस्वीकृत करताना भांडवलवाद, साम्राज्यवाद आणि नव्यानेच स्वतंत्र झालेल्या देशांच्या अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय वास्तवाला एक समग्र म्हणून पाहण्यासाठी समाजशास्त्राला अर्थशास्त्र, इतिहास आणि राजकीय प्रक्रियांसोबत जोडण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. शतकाच्या अंतिम दशकांमध्ये एम्यनुअल वालरस्टाइन (१९३०-२०१९) यांनी या नव्या चर्चाविश्वाला समाजशास्त्राच्या पारंपारिक चौकटीच्या पलिकडे जावून'विश्व- व्यवस्था सिध्दांत समग्र' च्या स्वरुपात प्रभावी पध्दतीने परिवर्तीत केले. त्यांच्या साहित्याने इतिहासकार फर्नांड ब्रौदेल (१९०२-१९८५) आणि सामाजिक इतिहासावर आधारित 'अनाल स्कूल', मानवशास्त्रज्ञ नोर्बर्ट इलाया (१८९७-१९९०), राजकीय अर्थशास्त्रज्ञ कार्ल पोलन्यी (१८८६-१९६४) आणि रसायन शास्त्रज्ञ इलाया प्रियोजनी (१९१७-२००३) यांच्या अभ्यासांना विश्व व्यवस्था आणि त्याचे प्रादेशिक आणि राष्ट्रीय अभिव्यक्तिच्या समाजवैज्ञानिक / समाजशास्त्रीय अध्ययानांसाठी अनिवार्य म्हणून सिध्द केले. वालरस्टाईनद्वारे समाजशास्त्रासह सर्वज्ञानशाखांच्या एकत्रिकरणासाठी 'गुलबंकियन आयोगाच्या' अहवालाच्या स्वरुपात सुचविण्यात आलेल्या दूरगामी उपयांचे चिरंतन महत्व मानले गेले आहे (वालेस्टाईन,१९९७).

२० व्या शतकाच्या शेवटच्या दशकांमध्ये सामाजिक विज्ञानात साहित्य-चिकित्सा आणि कलेच्या अध्ययनाद्वारे उत्तर-आधुनिकता दृष्टीकोनाचाही प्रभाव पडला. उत्तर-आधुनिकतेने एका केंद्रीय प्रवृत्तीला अथवा सत्तेच्या मान्यतेला आव्हान देत सत्य आणि अनुभव या दोन्हींचे 'बहुआयामी' आणि 'अनेकार्थी' होण्याच्या वस्तूस्थितीला महत्त्व देण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. जर्मनीत ज्युंचा छळ (१९३० पासून १९४५ पर्यंत) आणि दुसरे महायुध्द (१९३९-१९४५) या दरम्यान झालेले क्रोर्य आणि व्यापक जनसंहारापासून तर सोवियत संघ विखरेपर्यंत (१९८९) अनेक ध्येये समोर आणले गेले. भांडवलवाद, औद्योगिक उत्पादनाचे तंत्र आणि लोकशाही सत्ता संरचनेतून ज्या रूपांतरणातून निर्मित नवे प्रश्न, नवे व्यवसाय, समूह आणि समुदायांना ओळखले गेले. माहिती क्रांती आणि प्रसारण प्रक्रियेत टेलिव्हिजन आणि इंटरनेट (आंतरजाल) च्या महत्वाच्या परिणामांकडे लक्ष वेधले गेले. यामुळे बहूसांस्कृतिकतेच्या आधारावर समाजव्यवस्थेचे आकलन होण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले. 'स्त्रिवाद', 'अस्मितावाद',

'प्रतिनिधीत्व-प्रतिरोध' सारख्या दृष्टिकोनाच्या आधारावर समाज विश्लेषणांचे महत्व स्वीकारण्यात आले. यात लियोतार्द, बौद्रिल, बोर्दियो, जुडिथ बटलर आणि मिशेल फुकोच्या साहित्य आणि त्यांच्याशी संबंधित मान्यतांकडे नव्या पिढीतील समाजशास्त्रंज्ञाचे लक्ष आकर्षिले गेले आहे. यालाच समांतरपणे आधुनिकता, विशेषत: लोकशाही आणि औद्योगिक समाजाच्या सिध्दांतांच्या चिकित्सेशी संबंधित गिडेन्स, हेबरमास, उलरिक बेक, मॅनुअल कास्टेल आणि डिग्युट बाऊमनच्या सिद्धांतांना देखील समाज परिवर्तनाच्या विश्लेषणाचा आधार बनविण्यात येवू लागले.

दुसऱ्या शब्दात, भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनात पाश्चिमात्य देशांमध्ये प्रचलित समाजशास्त्रीय चर्चाविश्वांचे मध्यवर्ती स्थान बनत आहे. परंतुसिध्दांतापासून तर संशोधन पध्दती पर्यंतच्या अध्ययनात पाश्चिमात्य विद्यापीठांमध्ये दिल्या जाणाऱ्या माहितीबाबतच्या सजगतेला महत्व देणे भारतात समाजशास्त्राच्या विकासाला तारक ठरत आहे की मारक हे अस्पष्ट आहे. वादातीत आहे की, या वस्तूस्थितीमुळे सैध्दांतिक संदर्भाना अनुसरून भारतीय समाजशास्त्र किंवा भारतीय समाजशास्त्रज्ञांची आपली वेगळी ओळख निर्माण होवू शकली नाही. या संदर्भात हा प्रश्न उपस्थित करण्यात येतो की, या देशाच्या परकीय सत्तेच्या मुक्ततेनंतर सात दशके उलटून गेल्यानंतर देखील भारतीय समाजशास्त्र समुदायात बौध्दिक स्वातंत्र्य अद्यापही का शक्य होवू शकले नाही? जागतिकीकरणाने अधिक गुंतागुतीचे बनविले आहे की सुगम्यता वाढते आहे? अन्यथा 'पश्चिम' एका संदर्भाच्या स्वरूपात निरंतर उपस्थितीचे काय गुढ आहे? (सिंह,२०१४).

भारतीय समाजशास्त्राच्या शतक महोत्सवी वाटचालीची चार वैशिष्टये -

आज आपल्या देशात समाजशास्त्राचा शतक महोत्सव साजरा करतांना या महत्वपूर्ण वाटचालीच्या चार वैशिष्टयांना आवर्जून लक्षात ठेवायला हवे. एक म्हणजे, भारतात समाजशास्त्राचा प्रारंभ युरोपातील समाजशास्त्राच्या जन्माच्या सात दशकांनंतर झाला होता. या दरम्यान यात युरोपात एका अशा व्यवस्थाभिमुख सामाजिक विज्ञानाच्या रूपात महत्व प्राप्त झाले होते, ज्याच्या अध्ययनाचा आधार संपूर्ण मानवी संस्कृती ऐवजी १६४७ च्या वेस्टफिलीया कराराद्वारे युरोपातील अस्तित्व शोधणा-या राष्ट्र राज्यांच्यी नवीनतम वस्तूस्थिती होती. हे देखील प्रासंगिक तथ्य आहे की, मानवशास्त्र त्याच्या पूरक ज्ञानशाखेच्या रूपात युरोपयीन वसाहतवाद आणि 'वंशवादाशी' संबंधित समाजिक विज्ञानाच्या चर्चाविश्वाच्या आधारावर 'वसाहतींच्या समुदायांच्या' बाबतीत आकलनाचे माध्यम बनले. कारण त्याचा उपयोग 'इतर' समुदाय, विशेषत: वसाहतिक लोक आणि त्यांच्या संस्कृतीच्या अध्ययनासाठी मोठया प्रमाणावर होवू लागला होता. परंतु भारतात समाजशास्त्राचा वसाहतवादी दृष्टिकोनातून प्रारंभ झाल्यानंतर देखील ही प्रतिमा नव्हती. याला भारतीय सामाजिक वैज्ञानिकांद्वारे भारतीय अस्मिता आणि समाजव्यवस्थेच्या अध्ययनाला स्वाभाविक बनविण्याच्या गरजेशी जोडण्यात आले.

दुसरे युरोपात समाजशास्त्राचा उदय एक अयशस्वी क्रांती, एक प्रतिक्रांती आणि एका मावळत्या युगाशी संबंधित अतुलनीयरित्या बदलांनी उत्पन्न झालेल्या उलथा-पालथीचा भाग होता. युरोपात या पार्श्वभूमीवर अर्धवट फ्रेंच राज्य क्रांती (१७८९-१७९९), ब्रिटिश औद्योगिक क्रांती, युरोपचा जागतिक साम्राज्यवादी विस्तार तसेच नेपोलियनची हुकुमशाही आणि युध्दांमुळे (१७९९-१८१४) निर्मित सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थिती होती. याउलट भारतात समाजशास्त्राचा प्रवेश स्वातंत्र्य चळवळीच्या युग प्रवर्तकअध्यायाचा प्रारंभ होणाऱ्या युगाची घटना आहे. १९१९ मधील भारतातील सर्वात मोठया घटनांमध्ये मॉंटेस्क्यू-चेम्सफोर्ड सुधारणा (ब्रिटीश भारत अधिनियम,१९१९) पहिल्या महायुध्दात (१९१४-१९१८) ब्रिटीश भारताच्या सैनिकांच्या रूपात हजारो भारतीयांच्या जगातील विविध भागातील सहभागानंतर परतणे, 'खिलाफत चळवळ', पंजाबातील जालियनवालाबाग हत्याकांड (जनसंहार), महात्मा गांधी आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली देशव्यापकी रॉलेक्ट सत्याग्रहाचे आयोजन या घटनांचा समावेश होता.

तिसरे, भारतात समाजशास्त्राच्या विकासाचे दोन प्रवाह राहिले आहेत. १. राजकीय-सामाजिक परिवर्तनाशी संबंधित चर्चाविश्व,आणि २. शैक्षणिक संस्थामधील अध्ययन-अध्यापन या दोन्ही मध्ये संवाद, सहकार्य आणि आंतरर्विरोध या तिन्ही प्रकारचे संबंध राहिले आहेत.

त्यामुळे समाजशास्त्राला वसाहतिक भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेचा भाग बनविण्याआधीच भारतात मानव समाजाच्या अनिवार्य विकासाच्या, एका परिवर्तनाच्या वैज्ञानिक ज्ञानशाखेच्या स्वरुपात ओळख मिळाली होती. परकीय सत्तेपासून मुक्तता मिळवून देणाऱ्या राजकीय-सामाजिक चळवळीच्या विचारधारेच्या स्वरूपात समाजशास्त्राला सर्वप्रथम ब्रिटनसह युरोपच्या विद्यापीठांमध्ये सक्रीय भारतीय अध्यापकांमध्ये इंग्लंडमध्ये देशभक्त विचारवंत श्यामजी कृष्ण वर्मा (१९५६-१९९०) यांनी प्रसारित केले. ते दयानंद सरस्वती आणि लोकमान्य टिळक यांच्यासोबतच समाजशास्त्राचे नामांकित सिध्दांतकार हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी प्रभावित होते आणि स्वातंत्र्यचळवळीशी संबंधित प्रवाशी भारतीयांमध्ये जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी 'द इंडियन सोशिओलॉजीस्ट' नावाची संशोधन पत्रिका १९०५ पासूनच लंडन येथून प्रकाशित केली. या पत्रिकेचा शेवटचा अंक १९२९ मध्ये निघाला. समाजवादी-सर्वोदयी नायक जयप्रकाश नारायण हे ओहायो विद्यापीठ येथून समाजशास्त्रात अध्ययन करून स्वदेशी परतले आणि राष्ट्रीय आंदोलनातील क्रांतीकारी नायकांमध्ये समाविष्ट झाले. मानवशास्त्रज्ञ निर्मल कुमार बोस हे१९३० च्या आंदोलनातील केवळ सत्याग्रहीच होते असे नव्हे, तर महात्मा गांधीजींच्या अंतिम काळात त्यांचे सचिव आणि सहकारी देखील

होते. त्याचप्रमाणे रामकृष्ण मुखर्जी, पी.सी. जोशी आणि ए. आर. देसाई हे कम्युनिस्ट चळवळीतील कार्यकर्ता म्हणून राहिले होते आणि समाजशास्त्राचे अध्यापक बनल्यानंतर मार्क्सवादी समाजशास्त्रीय विचारधारेशी संबंधित राहिले. स्वातंत्र्यानंतरच्या वर्षांमध्ये देखील मार्क्स, विवेकानंद, अरविंद, म. फुले, टागोर, गांधी, नेहरू,नायकर, आंबेडकर, माओ, लोहिया आणि जयप्रकाश नारायण यांच्या प्रभावात असलेल्या समाजशास्त्रज्ञांची पिढी विशेषत्वाने दिसून येते.

परंतु भारतीय समाजशास्त्राला पुढे नेण्यासाठी विशिष्ट व्यक्ती आणि विचारधारांशी असंबंधित समाजशास्त्राज्ञांची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. यातील बहुतांश विचारवंत, ऐतिहासिक कारणांनी हिंदू सवर्ण जातींमधील मध्यमवर्गीय स्त्री-पुरुष होते आणि यातील बहुतांश लोकांशी एतदेशी आणि आंग्ल-अमेरिकन विद्यापीठांमध्ये सेतू तयार करण्याची भूमिका पार पाडली. यात 'ब्राम्हणवाद', 'हिंदू वर्चस्व', 'पुरुष वर्चस्व' आणि बौद्धिकवसाहतवादाच्या चौकटी तयार झाल्या आणि त्याला उत्तर म्हणून अनेक प्रकारची नवी चर्चाविश्वे निर्माण झाली.

चौथे म्हणजे, भारतीय समाजशास्त्रीय समुदायावर पाश्चिमात्य प्रभाव, भारतीयत्वाचा आग्रह, प्रादेशिकता, जातीयता, लिंगभाव आणि राजकीय विचार प्रवाहांशी संबंधित समस्यांचे प्रारंभापासूनच अस्तित्व आहे. याशिवाय १. वैचारिक पूर्वग्रहांपासून अंतर, २. आंग्ल-अमेरिकन-सोवियत-चीनी समाजशास्त्रीय प्रभावापासून स्वतंत्र आणि ३. भारतीय संदर्भाशी जोडून घेण्याची त्रिस्तरीय आवश्यकतेच्या जाणीवेतून एक बौध्दिक शिस्त आणि आत्मपरीक्षणाचे सातत्य राहिले आहे. यासाठी भारतातील समाजशास्त्राच्या शतक महोत्सवी प्रदीर्घ वाटचालीत असंख्य प्रवाहांचे अस्तित्व आणि प्रमुख प्रचलित मान्यतांच्यासमीक्षणाच्या गरजेतून आवश्यक शक्यतांच्या माध्यमातून 'विविधतेत एकता' या तत्वाचे संवर्धन होत आले आहे.

समारोप :

भारतात समाजशास्त्राचा औपचारिक प्रारंभ फ्रान्समध्ये १८३८ मध्ये ऑगस्ट कॉम्ट यांचेकडून नामकरण होऊन तसेच युरोपीयन शैक्षणिक चर्चाविश्वाच्या प्रसाराच्या सात दशकानंतर २० व्या शतकाच्या प्रारंभी राष्ट्रीयत्व आणि वसाहतिकतेच्या दुहेरी संदर्भाच्या पार्श्वभूमीवर झाला होता. समाजशास्त्राच्या अध्ययन क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने १९१९ आणि १९४७ च्या सुरुवातीच्या २८ वर्षांमध्ये नगण्य प्रगती झाली. परंतु देश स्वतंत्र झाल्यानंतर देशाच्या उच्च शिक्षण व्यवस्थेत, विशेषत: साठोत्तरी दशकांमध्ये, समाजशास्त्राच्या अध्ययनाला क्रमाक्रमाने महत्व प्राप्त झाले आणि समाजशास्त्रीय संशोधकांमध्ये बौध्दिक लवचिकता असल्यामुळे संवाद विहिनतेऐवजी वाद-विवादाचे बाहुल्य राहिले.

भारतीय आणि अभारतीय समाजशास्त्रज्ञांनी एका शतकाच्या कालावधीत असंख्य विशिष्ट स्वरूपाचे प्रश्न आणि समस्यांवर लक्ष केंद्रीत करताना शिक्षण, संशोधन आणि लोकहिताच्या संदर्भात आपली भूमिका प्रभावीपणे वठविली. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये झालेल्या ज्ञानसाधनेच्या माध्यमातून समाजशास्त्रातील अध्ययन आणि संशोधनाच्या कमीत कमी चार डझन ज्ञानशाखाआकाराला आल्या आहेत. यापैकी बहुतांश ज्ञानशाखा विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात आणि राष्ट्रीय समाजशास्त्र परिषदेच्या संशोधन समित्यांमध्ये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे इतर सामाजिक विज्ञानांशी आणि इतर ज्ञानशाखांशी समाजशास्त्राचा परस्पर संबंध अधिक दृढ झाला आहे. दुसरीकडे या शतक महोत्सवी वाटचालीत अनुक्रमे १. विकास चर्चाविश्व, २. जाती-चर्चाविश्व, ३. स्त्री-चर्चाविश्व, ४. दलित-चर्चाविश्व, ५. अस्मिता-चर्चाविश्व, ६. पर्यावरण- चर्चाविश्व, तसेच ७. जागतिकीकरण-चर्चाविश्व यांचा उदय झाला. लोकहिताच्या योजनांची निर्मिती, अंमलबजावणी आणि मूल्यमापनापासून तर लोक चळवळींचे अध्ययन करण्यापर्यंत याची प्रासंगिकता राहिली आहे.

अशा प्रकारे भारतातील समाजशास्त्राच्या या शतक महोत्सवाच्या आधारावर असा निष्कर्ष काढणे अयोग्य ठरणार नाही की, भारतीय आणि अभारतीय समाजशास्त्रज्ञांची आतापर्यंतची ज्ञानसाधना आणि सृजनशीलतेमुळे सामाजिक विज्ञानाच्या एका ज्ञानशाखेच्या रुपात समाजशास्त्राने देशात आपल्या प्रासंगिकतेचा आणि उपयुक्ततेचा विस्तार केला आहे. यासाठी मागील शंभर वर्षातील समाजशास्त्राचे शिक्षण आणि समाजशास्त्रीय संशोधनात मोलाचे योगदान देणाऱ्या असंख्य अभ्यासकांचे समकालीन समाजशास्त्र शतश: ऋणी आहे. तरी देखील बौध्दिक स्वातंत्र्याची स्थापना, समाजाच्या लोकशाहीकरणातील योगदान आणि आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक विकासाच्या कसोटीवर अद्याप काही अपेक्षांची पूर्तता होणे बाकी आहे. परंतु या गोष्टीवर विश्वास ठेवायला हवा की भारतीय आणि इतर समाजशास्त्रज्ञांची नवी पिढी या आव्हानाला ओळखून पुढे मार्गस्थ होईल.

टिपा :

१. वसाहतवादातून प्रेरीत अभ्यासांवर आधारित समाजशास्त्रीय चर्चाविश्वांमध्ये २० व्या शतकाच्या भारतीय समाजाचे जमीनस्तरावरील वास्तव (फिल्ड व्हिव) कमीच आढळून येते आणि ग्रांथिक अध्ययन (बुक व्हिव), युरोपीयन दृष्टीकोन आणि सुरुंग ज्ञानाला (टनेल व्हिजन) प्राधान्य होते. (पहा, कोन्ह, कोसंबी, चट्टोपाध्याय, डर्क).बर्नार्ड कोन्ह आणि डी.डी. कोसंबींपासून तर दीपेश चट्टोपाध्याय आणि निकोलस डर्क यांनी या समस्येला अनेक पध्दतींनी अधोरेखीत केले आहे.

२. भारतरत्न आचार्य पांडुरंग वामन काणे लिखित 'धर्मशास्त्राचा इतिहास' हा पाच खंडांमध्ये संपादित ६,५०० पृष्ठांचा ग्रंथ आहे; जो भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्सिटयूट, पुणे यांनी १९३० से १९५२ या दरम्यान प्रकाशित केला आहे.

३. भारतातील सामाजिक परिवर्तन आणि आधुनिकीकरणाच्या अध्ययनात एम.एन. श्रीनिवास (१९६६)यांच्या 'सोशिअल चेंज इन मॉडर्न इंडिया' (बर्कले, युनिवर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया

प्रेस) आणि योगेंद्र सिंह (१९७४) यांच्या 'मॉडर्नायझेशन ऑफ इंडियन ट्रॅडीशन' (जयपूर, रावत पब्लिकेशन्स) या दोन ग्रंथांना महत्वपूर्ण मार्गदर्शक मानले गेले आहे.

४. रामकृष्ण मुखर्जी (१९७७) यांनी भारतीय स्वातंत्र्यानंतर तीन दशकातील समाजशास्त्रज्ञांना उद्देशून 'आधुनिकीकरण कर्ते' (मॉडर्नायझर्स) ही संज्ञा वापरली आहे.

संदर्भ –

१. ओस्तेगार्द, जेफ्री (१९८५), नवी दिल्ली, गांधी पीस फौंडेशन.

२. कोन्ह, बर्नार्ड (२००४), 'नोटस् ऑन दी हिस्ट्री ऑफ दी स्टडी ऑफ इंडियन सोसायटी अॅण्ड कल्चर', बर्नार्ड कोन्ह ओमनीबस, खंड ३, नवी दिल्ली:ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस.

३. चन्द्र, बिपन, मृदुला मुखर्जी, आदित्य मुखर्जी (२०००), इंडिया सिंस इंडिपेंडंस, गुडगाँव: पेंग्विन रॅन्डम हाउस.

४. धर, पी.एन. (२०००), इंदिरा गांधी, द 'इमरजंसी', अॅण्ड इंडियन डेमॉक्रसी, नवी दिल्ली:ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस.

५. धनागरे, डी.एन. (१९९३), 'थीम्स अॅण्ड पर्सपेक्टिव्ज इन इंडियन सोशियॉलॉजी', जयपूर:रावत पब्लिकेशन्स.

६. झा, हेतूकर (२०१४),'हिस्टॉरिकल सोशियॉलॉजी इन इंडिया', योगेंद्र सिंह (२०१४) (सं.) इंडियन सोशियॉलॉजी, खंड १, नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस.

७. भारत सरकार (२००६ अ), रिपोर्ट ऑफ दी कमिशन ऑन अमेन्डमेंटस टू क्रिमिनल लॉ, नवी दिल्ली: भारत सरकार.

८. भारत सरकार, (१९७४), टुवर्डस इक्वालिटी, नवी दिल्ली:समाजकल्याण विभाग, शिक्षण व समाज कल्याण मंत्रालय, भारत सरकार.

९. भारत सरकार (१९८०) रिपोर्ट ऑफ द बॅकवर्ड क्लासेस कमिशन, खंड २, नवी दिल्ली:नॅशनल कमिशन फॉर बॅकवर्ड क्लासेस.

१०. भारत सरकार (२००७), नॅशनल कमिशन फॉर एंजरप्राईजेस इन द अनऑर्गनाईज्ड सेक्टर (२००७), 'रिपोर्ट ऑन कन्डिशन्स ऑफ वर्क अॅण्ड प्रोमोशन ऑफ लाईव्हलीहुड्स इन द अनऑर्गनाईज्ड सेक्टर, नवी दिल्ली: जवाहर भवन.

११. भारत सरकार (२००६ ब) सोशल, इकॉनॉमिक अॅण्ड एज्युकेशनल स्टेटस ऑफ द मुस्लिम कम्युनिटी इन इंडिया, नवी दिल्ली: गृह मंत्रालय, भारत सरकार.

१२. भारत सरकार (२००६ क), रिपोर्ट ऑफ नॅशनल कमिशन फॉर डिनोटीफाईड, नॉमॉडिक अॅण्ड सेमी-नॉमॅडिक ट्राईब्स, नवी दिल्ली: सामाजिक न्याय आणि सशक्तीकरण मंत्रालय, भारत सरकार.

१३. मुखर्जी, रामकृष्ण (१९७७), 'ट्रेन्डस इन इंडियन सोशियॉलॉजी' करंट सोशियॉलॉजी, २५ (३), १-१९३.

१४. राव, एम.एस.ए. (१९७४), 'इंट्रोडक्शन', ए सर्वेऑफ रिसर्च इन सोशियॉलॉजी अॅण्ड सोशियल अॅन्थ्रॉपॉलॉजी, खंड-१, २१-७२, मुंबई:पाप्युलर प्रकाशन.

१५. वालेस्टाईन, इमॅन्युअल (१९९७), ओपन द सोशियल सायन्सेस: रिपोर्ट ऑफ द गुल्बंकियन कमिशन, स्टॅनफोर्ड:स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

१६. श्रीनिवास, एम.एन. (१९६६),'सोशिअल चेंज इन मॉडर्न इंडिया', बर्कले: युनिवर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस.

१७. सिंह, योगेंद्र (१९६७), 'द स्कोप अॅण्ड मेथड ऑफ सोशियॉलॉजी इन इंडिया', टी.के. एन. उन्नीथन इत्यादी (सं.) सोशियॉलॉजी फॉर इण्डिया, नवी दिल्ली: प्रेंटीस हॉल ऑफ इंडिया.

१८. सिंह, योगेंद्र (१९७४),'मॉडर्नायझेशन ऑफ इंडियन ट्रॅडीशन', जयपूर:रावत पब्लिकेशन्स.

१९. सिंह, योगेंद्र (२०१४),'इंट्रोडक्शन', इंडियन सोलियॉलॉजी, प्रथम खंड, नवी दिल्ली:ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस.

१. आनंद कुमारहे समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक असून नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील माजी समाजशास्त्र विभागप्रमुख आहेत. सध्या ते जवाहरलाल नेहरू स्मृति संग्रहालय, नवी दिल्ली येथे जेष्ठ संशोधक आहेत. तसेच इंडिअन सोशिओलॉजीकल सोसायटीचे माजी अध्यक्ष आहेत.

२. संदीप चौधरीहे स. भु. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद येथे समाजशास्त्राचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख आहेत.

sm.chaudhari1gmail.comContact: 9822510044



अनुवाद

प्रा. डॉ. संदीप चौधरी

समाजशास्त्र विभाग प्रमुख
स. भु. कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, औरंगाबाद

मराठी समाजशास्त्र परिषद कार्यकारिणी
२०२०–२०२२

अध्यक्ष, डॉ. नारायण कांबळे

सचिव, डॉ. वेदप्रकाश मलवाडे

खजिनदार : डॉ. बळीराम पवार

प्रा. शिवाजी उकरंडे


डॉ. संजय कोळेकर

डॉ. प्रदीप गजभिये

डॉ. नवनाथ शिंदे

डॉ. भाग्यश्री पाटील

डॉ. श्रीराम खाडे

डॉ. प्रशांत सोनवणे

डॉ. प्रवीण घोडेस्वार

डॉ. स्निग्धा कांबळे

डॉ. मंगलमूर्ती धोकटे

डॉ. हिरालाल भोसले

प्रा.डॉ. नारायण कांबळे /प्रा. प्रियदर्शन भवरे यांनी मराठी समाजशास्त्र परिषद या संस्थेकरिता हा विशेषांक यश मल्टी सर्व्हिसेस, जालना. येथे छापून मराठी समाजशास्त्र परिषद द्वारा, पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद ता. अहमदपूर, जिल्हा लातूर– ४१३५१५ येथे प्रसिद्ध केले.